# साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान

मुख्यसंपादक
**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

संपादक
**डॉ. मारोती कसाब**
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

सहसंपादक
**डॉ. अनिल मुंढे**
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**सिध्दी पब्लिकेशन हाऊस, नांदेड**

**ISBN No. 978-81-962287-7-4**

**साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान**

**मुख्यसंपादक**
**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**
**संपादक**
डॉ. मारोती कसाब
**सहसंपादक**
डॉ. अनिल मुंढे

**प्रकाशक**
**सिध्दी पब्लिकेशन हाऊस**
**६२४, बेलानगर, भावसार चौक,**
**तरोडा (खु.) नांदेड ३ ४३१६०५**
**मो. ९६२३९७९०६७**
**www.wiidrj.com**

**मुद्रक**
**अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड (महा.)**
**९१७५३३२४४३७**

**प्रथमावृत्ती : २६ सप्टेंबर २०२३**
© **सर्वाधिकार :** महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर अधीन

**मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर**

**अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर**

**मूल्य : ४००/-**

सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकुराकरीता सदरील संशोधक स्वतः जबाबदार राहतील संपादक किंवा प्रकाशक जबाबदार असणार नाही.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०९ |
| ०२. | प्रस्तावना | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | १३ |
| ०३. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे चरित्र / आत्मचरित्र लेखन : शाहीरा मीराबाई उमप | प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे | १८ |
| ०४. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन | प्रा. उन्नती संजय चौधरी | २४ |
| ०५. | साठोत्तरी मराठी साहित्य : संकल्पना व स्वरूप | प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई | ३४ |
| ०६. | साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधील स्त्री जीवन | डॉ. राहुल भा. पाटील | ४३ |
| ०७. | साठोत्तरी साहित्यातील महिलांचे योगदान: दुर्गा भागवत यांच्या 'सिद्धार्थ जातक' या साहित्यकृतीचा अभ्यास | डॉ. राहुल सदाशिव खरात | ५३ |
| ०८. | सारिका उबाळे यांच्या 'निष्णात' कवितेचे विश्लेषण | डॉ. शिंदे दुष्यंत आनंदराव | ६३ |
| ०९. | होरपळलेल्या माणसांची परिवर्तनवादी कथा : तांड्याचे पाय | प्रा. डॉ. व्यंकटी पावडे | ७० |
| १०. | साठोत्तरी कालखंडातील अनुवादक : स्वाती दामोदरे | प्रा. डॉ. बिभीषण कांबळे | ८५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | श्रीमती राठोड दैवशाला रामराव | ९१ |
| १२. | 'साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद' | हानमंत बाबुराव हांडे | ९८ |
| १३. | साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य आणि स्त्री जीवन | प्रा. डॉ. जगताप यु. एस. | ११२ |
| १४. | स्त्री मनाचा अलवार आविष्कार- अलवार क्षण | प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | ११७ |
| १५. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथा लेखन | प्रा. सारिका देवराव हानवते | १२२ |
| १६. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | डॉ. पद्माकर डिगांबर वानखडे | १४३ |
| १७. | साठोत्तरी काळातील स्त्रीयांचे कथालेखन | डॉ. विलास सिंदगीकर | १५१ |
| १८. | साठोत्तरी काळातील मराठवाड्यातील स्त्रियांचे कथालेखन विशेष संदर्भ: तिची वाटच वेगळी | डॉ. मारोती बालासाहेब भोसले | १६४ |
| १९. | पार्टटाईम काम करणाऱ्या स्त्रियांची करूण कहानी | संदीप भुजंग शेकडे | १७२ |
| २०. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | प्राचार्य डॉ. अंजली आर. मस्करेन्हस | १७५ |
| २१. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | डॉ. शाम रामनाथ निर्मळ | १८० |
| २२. | स्त्रियांच्या वेदना सशक्तपणे मांडणारी कवयित्री : अश्विनी धोंडगे | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | १८८ |
| २३. | छाया बेले यांचे हृदयी माझ्या कविता संग्रहातील स्त्री जीवन | मेघा भास्करराव ढवळे | १९६ |
| २४. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन | श्रीमती स्वाती शिवाजी चौधरी | २०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | कालानुरूप ओढवलेल्या परिस्थितीवर सक्षमपणे मात करणारी नायिकाप्रधान कादंबरी : 'घार' | प्रा. डॉ. कल्याण गोपनर | २०७ |
| २६. | साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्यविचार | नादरगे चंद्रदीप बालाजी | २१८ |
| २७. | मथू सावंत यांचे ग्रामीण स्त्रीवादी साहित्यलेखन व वर्तमान | डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे | २२८ |
| २८. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन | डॉ. राजाराम तुकाराम सोनटक्के | २३४ |
| २९. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन | प्रा. निकिता शेंडगे<br>डॉ. प्रताप गायकवाड | २३९ |
| ३०. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन | प्रा. डॉ. गणेश गोपाळराव मालटे, स्मिता संदेशराव मांडेकर (नागपूरकर) | २४८ |
| ३१. | बहिणाबाईची लेक : सीताबाई भोजने | डॉ. नम्रता बागडे | २५६ |
| ३२. | समकालीन स्त्रीसंवेदनांची अलवार गुंफण | मयुरी शरद पवार | २६७ |
| ३३. | साठोत्तरी काळातील तृतीयपंथीयांचे काव्य लेखन (विशेष संदर्भ : कुरूप) | कांचन रामदास मुखेडकर | २७२ |
| ३४. | साठोत्तरी मराठी साहित्याने समाजाला काय दिले ? | प्रा. मिलिंद ठोकळे | २८६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | साठोत्तरी काळातील भटक्या विमुक्त स्त्रीची दाहक आत्मकथा : तीन दगडाची चूल | डॉ. दिलीप साहेबराव सावंत | २९५ |
| ३६. | साठोत्तरी मराठी बालकवितेत स्त्रियांचे योगदान | प्रा. सदाशिव गंगाधर चुकेवाड<br>प्रा. डॉ. उज्वला शिवराम जगताप | ३०१ |
| ३७. | गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीवादी विचार | प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | ३१० |
| ३८. | साठोत्तरी काळातील निवडक स्त्रियांची प्रवासवर्णने | डॉ. मनिषा जगन्नाथ झोंबाडे | ३१९ |
| ३९. | साठोत्तरी मराठी नाटकातील स्त्री चित्रण | डॉ. शरद वाघोळे | ३२९ |
| ४०. | इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील ग्रामीण स्त्री | प्रा. शशिकांत काळे | ३३४ |
| ४१. | अनुराधा पाटील यांच्या 'दिवसें दिवस' मधील स्त्री जीवनातील दुःखाचे चित्रण | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | ३३९ |
| ४२. | मैनाताईंच्या धाडसी जीवनाची यशोगाथा: 'संघर्ष यात्रा ' | डॉ. मारोती कसाब | ३५४ |
| ४३. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | प्रा.महेश भाऊ थोरात | ३६० |
| ४४. | साठोत्तरी मराठी साहित्य : संकल्पना व स्वरुप | सुरेखा विठ्ठल कांबळे | ३६७ |
| ४५. | साठोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन | डॉ. संगीता भाऊसाहेब वडितके | ३७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६. | 'सूप आणि जातं' कवितेतून व्यक्त झालेले स्त्रियांच्या जगण्यातील दाहकतेचे व सोशिकतेचे चित्रण | प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले | ३८० |
| ४७. | नितळ मनाची निर्मळ अभिव्यक्ती : 'काव्यवर्षा' | प्रा. डॉ. अनिल व्यंकटराव मुंढे | ३८८ |
| ४८. | साठोत्तरी मराठी साहित्याने समाजाला काय दिले ? | नेहा रतन बनसोडे | ३९५ |
| ४९. | 'मृत्यू जगलेला माणूस' एक अद्‌भुत जीवनानुभव | अंगद श्रीपती भुरे | ४०१ |
| ५०. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्री जीवन | प्रा. दिप्ती लक्ष्मण निकाळजे | ४०९ |
| ५१. | साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद | प्रा. कांबळे डी. आर. | ४१७ |
| ५२. | गौरी देशपांडे यांच्या 'मध्य लटपटीत' कांदबरीतील नायिकेची मनोव्यथा | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | ४२३ |
| ५३. | 'वलय' कथा संग्रहातील स्त्रीजीवन | प्रा. डॉ. आशा सोपान गिरी | ४३३ |
| ५४. | मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद | चंद्रकांत ज्ञानेश्वर धस प्रा. डॉ. जालिंदर तुकाराम कानडे | ४४१ |
| ५५. | साठोत्तरी मराठी साहित्यातील दोन आत्मकथनातील स्त्री जीवन | डॉ. स्नेहा सुवास प्रभु महांबरे | ४५७ |
| ५६. | 'खुरपं' –निसर्ग आणि मानवनिर्मित दु:खानुभावाचे चित्रण | प्रा. अजित जयराम जाधव | ४६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७. | बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनातील समाजजीवन | प्रा. कविता वामन कटारे | ४७४ |
| ५८. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे आत्मचरित्र लेखन : स्थान महत्त्व | डॉ. सुमन बजरंग जाधव | ४८० |
| ५९. | ग्रामवास्तवाचा वेध घेणारी लेखिका : पद्मा मदकुंटे | रमेश गोविंदराव शेंडगे | ४८७ |
| ६०. | साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथा लेखन | प्रा. डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील | ४९१ |
| ६१. | साठोत्तरी काळातील काही मराठी कवयित्रीचे स्थान | विळेगावकर रविकांत अंतराम | ४९६ |
| ६२. | साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागर कथेतील स्त्री दर्शनाचे स्वरुप | प्रा. डॉ. सिध्दार्थ कुंडलिक इंगोले | ५०० |
| ६३. | परीघा वरून कवितेचं बोट धरून चालणाऱ्या... | प्रा. डॉ. श्यामल गरुड | ५०६ |
| ६४. | साठोत्तरी मराठी कादंबरीतील स्त्रियांच्या अस्तित्वाचा शोध | डॉ. अतुल पाटील | ५१५ |
| ६५. | बिनपटाची चौकट या इंदुमती जोंधळे यांच्या आत्मकथनाचा चिकित्सक अभ्यास | सुरेखा भगवानराव आगळे | ५२० |

# संपादकीय

प्रिय सुजाण रसिक, वाचक, अभ्यासक, संशोधक मित्रांनो, बहीणी आणि भावांनो !

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर, मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ सप्टेंबर २०२३ रोजी "साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान" या विषयावर झालेल्या एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने चर्सासत्रात सादर झालेल्या आणि संकलित केलेल्या शोधनिबंध संग्रहाचा हा सुबक आणि आखीवरेखीव, देखणा असा संशोधनमूल्य आणि संदर्भमूल्य लाभलेला दर्जेदार संपादित ग्रंथ आपल्या हाती देताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे.

"साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान" या विषयाची व्यापक प्रमाणात मराठी साहित्य विश्वात चर्चा घडवून आणावी आणि या पुढील काळात महिलांच्या साहित्याची समीक्षकांनी पुरेशी दखल घ्यावी या हेतूने प्रेरित होऊन आम्ही हे चर्चासत्र आमचे मार्गदर्शक आणि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक समीक्षक, महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. या चर्चासत्राला आपण भरभरून दाद दिली, त्याबद्दल सुरुवातीलाच आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे अध्यक्षस्थान भूषवून यथोचित मार्गदर्शन करणारे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे आभार. आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. श्रीरंगराव पाटील एकंबेकर साहेब व सचिव मा. ज्ञानदेव झोडगे साहेब यांनी शुभेच्छा संदेश देऊन आमचे मनोबल वाढविले त्याबद्दल त्यांचेही आभार. या चर्चासत्राचे अत्यंत

मूलगामी आणि अभ्यासपूर्ण बीज भाषण करणाऱ्या महाराष्ट्रातील थोर विदुषी, पुणे येथील सत्यशोधक विचारवंत तथा विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष डॉ. प्रतिमाताई परदेशी, उद्घाटक डॉ. भारत हंडीबाग (माजी अधिष्ठाता तथा माजी अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर), शोधनिबंध वाचन सत्राध्यक्षा डॉ. श्यामलताई गरुड (मुंबई विद्यापीठ, मुंबई), शोध निबंध वाचक प्राचार्य डॉ. अंजली सामंत (कोसबाड टेकडी, डहाणू), डॉ. मनीषा झोंबाडे (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय मुरुड जि. लातूर) या सर्व मान्यवरांचे हार्दिक हार्दिक आभार.

मित्र हो,

साहित्य हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी माध्यम असते. भारतासारख्या महाकाय देशात बहुस्तरीय विषमता आढळून येते. पारंपरिक चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या अंमलबजावणीमुळे येथील समाजात अनेक प्रकारचे भेदभाव आढळून येतात. जात, वर्ग, वर्णीय भेदभावाबरोबरच लिंगभावही मोठ्या प्रमाणात जोपासला जातो. त्यामुळे स्त्री-पुरुष विषमता मोठ्या प्रमाणावर आढळून येते.

या विषमते विरुद्ध मध्ययुगीन वारकरी चळवळीने अभंग निर्मितीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात बंड केले. संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई आदींनी आपल्या अभंगातून प्रस्थापित व्यवस्था बदलण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्याचबरोबर महानुभव पंथातील महदंबा आदी स्त्री लेखिकांनीही सामाजिक परिवर्तनासाठी हातभार लावलेला दिसून येतो. मध्ययुगीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ही प्रबोधनाची साहित्य परंपरा सुरूच आहे. त्यामुळे एकंदरीत भारतीय समाजात सर्व स्तरीय समता प्रस्थापित करण्यासाठी मराठी साहित्याने मोठे योगदान दिले आहे.

इ. स. १८१८ साली महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेला प्रारंभ झाला. या सत्ता बदलाबरोबरच अनेक नव्या बाबींना प्रारंभ झाला. विशेषतः इंग्रजी साहित्याचे वाचन या काळात भारतीय शिक्षित तरुणांकडून

मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यामुळे नव्या जगाची ओळख होऊ लागली. शिक्षणाचेही प्रमाण वाढले. एकूणच मराठी साहित्याचा चेहरा मोहरा या काळात बदलला.

महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, न्या. रानडे आदी समाज धुरिणांनी याकाळात साहित्याचा सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावीपणे वापर केला. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मराठी साहित्यिकांनी सामाजिक बदलांसाठी मोठ्या प्रमाणावर लिहिले. याच काळात समता, स्वातंत्र्य, मानवता, बंधुता, न्याय ही मूल्ये मराठी लेखनामध्ये दिसू लागली.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विकासाची नवीन स्वप्नं घेऊन मराठी लेखक साहित्याच्या प्रांतात उतरले. १९६० नंतर साहित्याचा सामाजिक प्रबोधनासाठी मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला. याच काळात दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, ग्रामीण साहित्य आदी नवनवीन प्रवाह निर्माण झाले.

साहित्यातील सामाजिकता ही या काळात प्राधान्याने लक्षात येऊ लागली. म्हणून 'साठोत्तरी कालखंडातील साहित्य' ही संज्ञा महत्त्वाची मानली जाते. साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनाने मराठी साहित्यात सामाजिक परिवर्तनासाठी मोलाचे योगदान दिले आहे. आज आपण एकविसाव्या शतकात असलो तरी अजूनही पारंपरिक मानसिकता ही समाज बदलू द्यायला तयार नाही. अजूनही स्त्रियांचे प्रश्न सुटलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनाची चर्चा पुन्हा पुन्हा, नव्याने होणे अपेक्षित वाटले. म्हणून प्रस्तुत राष्ट्रीय चर्चासत्रासाठी हा विषय निवडण्यात आला होता.

"साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान" हा विषय समाजातील उपेक्षित, वंचित घटक असलेल्या महिला वर्गाबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठी महत्त्वाचा आहे. आज जागतिकीकरणाच्या काळात आपण सारे जगत आहोत. वरवर विकासाचे वारे सर्व दूर वाहत आहेत. परंतु हा विकास केवळ भौतिक स्वरूपाचा असून, अजूनही दलित, वंचित आणि समग्र महिलांच्या बाबतीत आपल्या समाजाची

मानसिकता बुरसटलेली असल्याचेच मणिपूर सारख्या स्त्री अत्याचारांच्या घटनांवरून दिसून येते. जागतिक स्तरावरही स्त्रियांचे शोषण सुरूच असल्याचे जगातील विविध बातम्यांवरून आपल्याला दिसून येते. हे सर्व बदलण्यासाठी साहित्यिकांनी आपली लेखणी पुन्हा ताकदीने उचलण्याची आवश्यकता वाटते. समाजात समता नांदावी, सर्वजण आनंदात असावेत, कुणी कुणाचेही शोषण करू नये अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी आमचे लेखक, कलावंत काय विचार करतात याचा शोध घेणे महत्त्वाचे वाटले. म्हणून हा विषय निवडला होता. त्याप्रमाणे सदरील चर्चासत्रात अत्यंत गांभीर्याने चर्चा झाली याचे आम्हाला समाधान वाटते. अगदी उद्धाटकीय भाषणापासून ते बीज भाषणापर्यंत आणि शोध निबंध वाचन सत्रापासून ते अध्यक्षीय समारोपापर्यंत संपूर्ण चर्चा विषयाच्या अनुषंगाने अत्यंत अभ्यासपूर्ण आणि संशोधनाच्या नव्या दिशा सूचित करणारी झाली.

या चर्चासत्रात सादर करण्यासाठी आणि ग्रंथातून प्रकाशित करण्यासाठी देशातील विविध संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी आम्ही केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अत्यंत अभ्यासपूर्ण असे शोध निबंध पाठविले, त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. तसेच आपला अमूल्य वेळ देऊन अत्यंत दर्जेदार असा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहाय्य केल्याबद्दल आमचे स्नेही डॉ. राजेश उंबरकर आणि त्यांचे सहकारी यांचेही हार्दिक आभार.

**डॉ. मारोती कसाब**

(संपादक)

**डॉ. अनिल मुंढे**

(सहसंपादक)

## :: प्रस्तावना ::

# मराठी स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीला नवी दिशा देणारा संशोधन ग्रंथ..!

**- प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**

भारतीय समाजात लिंगभेद करणारी पुरुष सत्ताक व्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे हजारो वर्षांपासून या देशात स्त्रियांना गुलाम समजून निम्न दर्जाची वागणूक दिली जाते.

'पायीची वहाण पायी बरी', 'ढोल, गवार, पशू और नारी सब हैं ताड़न के अधिकारी किंवा 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' अशा प्रकारच्या काव्यात्मक शब्द रचनांतून स्त्रियांची आजपर्यंत मानहानीच होत आलेली आहे. समाजातील अर्धा भाग स्त्रियांनी व्यापलेला असतानाही जीवनातील विविध पातळयांवर हजारो वर्षांपासून या वर्गाची अवहेलना होत आलेली आहे. जगातील सर्व धर्मांची निर्मिती करण्यात पुरुषांनीच पुढाकार घेतलेला दिसून येतो. त्यामुळे जवळपास सर्वच धर्मांमध्ये स्त्रियांचे स्थान दुय्यम राहिलेले दिसून येते. वास्तविक पाहता समाज जीवनात स्त्रियांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची ठरलेली दिसून येते. प्रजनन, संरक्षण आणि भरण पोषण या सर्‌व पातळयांवर स्त्रियांना जबाबदारी दिली जाते. मात्र त्यांचे हक्क नाकारले जातात. स्त्रियांच्या दुःखाला येथील पुरुषसत्ताक व्यवस्था कारणीभूत ठरलेली आहे. या पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आदीम काळापासून स्त्रियांनी उठाव केला असल्याचे इतिहासात दिसून येते. आधुनिक काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी फार मोठे कार्य केले आहे. यापुढील जबाबदारी

राज्यकर्त्यांची होती. मात्र त्यांनी स्त्रियांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. स्त्रियांना केवळ शिक्षण देऊन भागत नाही; तर त्यांना समाजात सन्मानाने वावरण्याची संधी दिली गेली पाहिजे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही स्त्रियांचे शोषण सर्वत्र सुरूच असून, या शोषणाला पायबंद घातला पाहिजे. आणि हे कार्य साहित्यातून मोठ्या प्रमाणात केले जाऊ शकते. या पार्श्वभूमीवर स्त्रियांचे लेखन महत्त्वाचे ठरते.

**"साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान"** या विषयाची व्यापक प्रमाणात मराठी साहित्यविश्वात चर्चा व्हावी आणि या पुढील काळात 'महिलांचे साहित्य' हा विषय मराठी साहित्य समीक्षेच्या मुख्य प्रवाहात यावा यासाठी आमच्या महाविद्यालयातील मराठीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मारोती कसाब आणि प्राध्यापक डॉ. अनिल मुंढे यांनी दि. २६ सप्टेंबर २०२३ रोजी 'साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय ऑनलाईन चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्राच्या निमित्ताने सदरील ग्रंथ प्रसिद्ध होत आहे, ही अत्यंत कौतुकास्पद आणि आनंदाची बाब आहे.

साहित्य हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वांत प्रभावी माध्यम असते. भारतासारख्या महाकाय देशात बहुस्तरीय विषमता आढळून येते. पारंपरिक चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या अंमलबजावणीमुळे येथील समाजात अनेक प्रकारचे भेदभाव आढळून येतात. जात, वर्ग, वर्णीय भेदभावाबरोबरच लिंगभावही मोठ्या प्रमाणात जोपासला जातो. त्यामुळे स्त्री-पुरुष विषमता मोठ्या प्रमाणावर आढळून येते.

या विषमते विरुद्ध मध्ययुगीन वारकरी चळवळीने अभंग निर्मितीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात बंड केले. संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई आदींनी आपल्या अभंगावाणीतून प्रस्थापित व्यवस्था बदलण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्याचबरोबर महानुभव पंथातील महदंबा आदी स्त्री लेखिकांनीही सामाजिक परिवर्तनासाठी हातभार लावलेला दिसून येतो. मध्ययुगीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ही प्रबोधनाची साहित्य परंपरा सुरूच आहे. त्यामुळे एकंदरीत भारतीय समाजात सर्व स्तरीय समता प्रस्थापित करण्यासाठी मराठी साहित्याने मोठे योगदान दिले आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

इ. स. १८१८ साली महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेला प्रारंभ झाला. या सत्ता बदलांबरोबरच अनेक नव्या बाबींना प्रारंभ झाला. विशेषतः इंग्रजी साहित्याचे वाचन या काळात भारतीय शिक्षित तरुणांकडून मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यामुळे नव्या जगाची ओळख होऊ लागली. शिक्षणाचेही प्रमाण वाढले. एकूणच मराठी साहित्याचा चेहरा मोहरा या काळात बदलला.

महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, न्या. रानडे आदी समाज धुरिणांनी याकाळात साहित्याचा सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावीपणे वापर केला. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मराठी साहित्यिकांनी सामाजिक बदलांसाठी मोठ्या प्रमाणावर लिहिले. याच काळात समता, स्वातंत्र्य, मानवता, बंधुता, न्याय ही मूल्ये मराठी लेखनामध्ये मोठ्या प्रमाणात दिसू लागली.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विकासाची नवीन स्वप्नं घेऊन मराठी लेखक साहित्याच्या प्रांतात उतरले. १९६० नंतर साहित्याचा

सामाजिक प्रबोधनासाठी मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला. याच काळात दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, ग्रामीण साहित्य, जैन मराठी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य, जनवादी साहित्य, कामगार साहित्य आदी नवनवीन प्रवाह निर्माण झाले.

साहित्यातील सामाजिकताही या काळात प्राधान्याने लक्षात येऊ लागली. म्हणून 'साठोत्तरी कालखंडातील साहित्य' ही संज्ञा महत्त्वाची मानली जाते. साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनाने मराठी साहित्यात सामाजिक परिवर्तनासाठी मोलाचे योगदान दिले आहे. आज आपण एकविसाव्या शतकात असलो तरी अजूनही पारंपरिक मानसिकता समाज बदलू द्यायला तयार नाही. अजूनही स्त्रियांचे प्रश्न सुटलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनाची चर्चा पुन्हा पुन्हा, नव्याने होणे अपेक्षितच वाटते. म्हणून प्रस्तुत संपादित ग्रंथाचे महत्त्व अनन्य साधारण स्वरूपाचे आहे.

"साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान" हा विषय समाजातील उपेक्षित, वंचित घटक असलेल्या महिला वर्गाबद्दल जागृती निर्माण व्हावी यासाठीही महत्त्वाचा आहे. आज जागतिकीकरणाच्या काळात आपण सारे जगत आहोत. वरवर विकासाचे वारे सर्व दूर वाहत आहेत. परंतु हा विकास केवळ भौतिक स्वरूपाचा असून, अजूनही दलित, वंचित आणि समग्र महिलांच्या बाबतीत आपल्या समाजाची मानसिकता बुरसटलेली असल्याचेच मणिपूर सारख्या स्त्री अत्याचारांच्या घटनांवरून दिसून येते. जागतिक स्तरावरही स्त्रियांचे शोषण सुरूच असल्याचे जगातील विविध बातम्यांवरून आपल्याला दिसून येते. हे सर्व बदलण्यासाठी साहित्यिकांनी आपली लेखणी पुन्हा ताकदीने उचलण्याची आवश्यकता वाटते. समाजात समता, बंधुता

आणि सम्यक लोकशाही नांदावी, सर्वजण आनंदात असावेत, कुणी कुणाचेही शोषण करू नये अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी आमचे लेखक, कलावंत काय विचार करतात याचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते. त्याप्रमाणे सदरील चर्चासत्रात अत्यंत गांभीर्याने चर्चा झाली, याचे आम्हाला समाधान वाटते. अगदी उद्घाटकीय भाषणापासून ते बीज भाषणापर्यंत आणि शोध निबंध वाचन सत्रा पर्यंत संपूर्ण चर्चा मुख्य विषयाच्या अनुषंगाने अत्यंत अभ्यासपूर्ण आणि संशोधनाच्या नव्या दिशा सूचित करणारी झाली असून, त्याचे प्रतिबिंब सदरील ग्रंथात उमटलेले आपणास दिसून येईल. या ग्रंथात महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील अभ्यासक, संशोधक, प्राध्यापकांचे अत्यंत दर्जेदार असे लेख आहेत.

मराठी स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीला नवी दिशा देणारा 'साठोत्तरी मराठी साहित्यातील स्त्रियांचे योगदान' हा अत्यंत महत्त्वाचा संशोधन ग्रंथ डॉ. मारोती कसाब व डॉ. अनिल मुंढे यांनी संपादित केल्याबद्दल दोघांचेही मनापासून अभिनंदन. सर्व स्तरातील वाचकांना हा ग्रंथ नक्कीच आवडेल. या ग्रंथाचे वाचक स्वागत करतील, असा मला विश्वास वाटतो.

**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**
**महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर,**
**जि. लातूर.**

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे चरित्र / आत्मचरित्र लेखन शाहिरा मीराबाई उमप

प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे
विभागप्रमुख, लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**"खातो तुपात पोळी भीमा तुझ्या मुळे**
**डोईवरची गेली मोळी भीमा तुझ्या मुळे**
**काखेची झोळी गेली भीमा तुझ्या मुळे"**[१]

संत जनाबाई, मुक्ताई, बहिणाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा अशा महिला संतांची परंपरा महाराष्ट्राला आहे. या संत कवियत्रीसोबतच संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंगांची परंपरा ही महाराष्ट्राला लाभली आहे. संतांच्या रचना म्हणजे रूपकाश्रयी अभंग होय. या अभंगांचीच पुढे झाली अभिनित भारुडे. ही भारूडे अभंग गौळणी सादर करणाऱ्या परंपरेच्या प्रवाहात आजमितीला पंढरपूरच्या चंदाताई तिवाडी, गोदावरीताई मुंडे त्याचप्रमाणे या परंपरेत औरंगाबादच्या मीराबाई उमप ही सामील झाल्या.

मीराबाईचा जन्म मातंग समाजातील वामनराव उमप या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या एका सामान्य कुटुंबात अंतरवली, ता. गेवराई जि. बीड येथे झाला. घरात सात पिढ्यांचा गायन वादनाचा वारसा वामनरावांपर्यंत आला. वामनराव आणि आई रेश्माबाई दोघेही गाणं – बजावणे करून कुटुंबाची उपजीविका भागवायचे. वामनराव प्रमाणे रेश्माबाई चा गळा गोड असल्यामुळे एका वेळी भजन कीर्तनाला सुरवात केली कि रात्र कशी सरायची ह्याचे भान दोघांनाही राहत नसे. तसं उमपांचा घराणं हे गुरु घराणं. संतांचे अभंग, लोकगीते, पोवाडे, कीर्तन हे त्यांना मुखोद्गत पाठ होते. हे कुटुंब गाणे बजावणी

करून पोटाची खळगी भरण्यासाठी भिक्षापात्र हातात घेऊन गावोगावी रणरण भटकंती करत असे. वामनराव आणि रेश्माबाई या दाम्पत्त्याच्या ओटीपोटाशी मीरा, कोमल, अनुसया, जनाबाई, सावित्री या पाच बहिणी आणि महावीर, दीपक, नामदेव हे तिघे भाऊ असा अकरा लोकांचा कटुंबकबिला चालवताना आईवडिलांची  दमछाक व्हायची म्हणून मीराबाई यांच्या हातामध्ये वयाच्या सातव्या वर्षी भिक्षापात्र आले. मीरा बाई सर्वात मोठी असल्यामुळे आई वडिलांबरोबर लहान भावंडाची जवाबदारी तिच्यावर पडली त्यामुळे शाळेची पायरी तिला चढता आली नाही. बाबा एकतारी वाजवायचे. धाकटा चुलतादिमडी वाजवायचा आणि मीराबाई गात सुटायची संत परंपरेतलं भजन गाताना मिराबईची तार थेट भगवंताशी जोडले जायचे आणि मीराबाई डोळे बंद करून दिमडीवर थाप टाकत गात सुटायची.

**"माझी गोदडी झालं जुनी**
**तिला  धुवूनी आना कोणी**
**सात ताळाची  मच्छर दाणी**
**त्यात झोपली मैना राणी**
**गोदडी झाली जुनी"** २

अशा पद्धतीने मीराबाईच गाणं सुरु झालं. लहान वयातच पाटीवर पेंसिलीने अक्षर ओढण्याऐवजी दिमडीवर तिची बोटे थिरकायला लागली. जन्म स्त्री चा असल्यामुळे दिमडी, ढोलकी, हलगी. ढोल. ताशा ही रण वाद्य वाजवण्याची मक्तेदारी पुरुषप्रधान संस्कृतीतच आहे असा समज होता ती मक्तेदारी  मिराबईने आधुनिक काळात मोडीत काढली. घरात कोणी दिमडीला  हात लावू देत नसे तेव्हा मीराबाई कधी जर्मनची वाटी तर कधी ताट वाजवत बसायची वय लहान असल्यामुळे तिचे कुणाला कौतुक नसायचे. एकदा घरात वडिलांचे आणि लहाने काका यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. व काकांनी अचानक घर सोडून जाण्याचा निर्णय घेतला. काका आई वडिलांसोबत भजन कीर्तनात उत्तम दिमडीची साथ करायचा. आता दिमडी कोण वाजवणार हा जटील प्रश्न वामनरावा पुढे उभा राहिला. एक दिवस वाटीवर दिमडी वाजवत असताना आईची नजर मीराबाई वर पडली आणि खंजिरी वाजवण्याचा उत्तराधिकारी म्हणून आईच्या सांगण्यावरून माझ्या हाती खंजिरी दिली. मिराबाई चुणूकदार पोरगी

असून चुलत्यापेक्षा चांगली खंजिरी वाजवते त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होऊ लागले तिला घेऊन आई बाबा गावोगावी फिरू लागले. असे मीराबाई पंढरपूर येथे घेतलेल्या मुलाखतीत कथन करू लागली. "एकदा असाच आमचा मुक्काम लातूर जिल्ह्यातील बाभुळगावजवळ म्हैसगाव येथे होता. तिथे राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचा आणि दुनेदास महाराज यांचा कीर्तनाचा सामना गावातल्या मंदिरात रंगणार होता. त्याच गावातल्या पारावर आमचं बिराड उतरलं होतं. रात्रीची वेळ होती कीर्तनाचा सामना उत्तरोत्तर रंगत चालला होता भजनाच्या धुनी हवेच्या अवसाराने माझ्या कानावर आदळत होत्या. आतून मन मंदिराकडे जाण्यासाठी डीवचवत होत. बाबांच्या धाकापाई मी मंदिराकडे जाण्याची परवानगी मागू शकत नव्हते असे असून सुद्धा शेवटी मन घट्ट करून मी  बाबाकडे हट्ट धरला. बाबा मला मंदिरकडे जाऊद्या. तो काळ स्पृश्य अस्पृश्यता माननारा होता. त्याकाळी दलितांना सार्वजनिक पाणवठ्यावर, मंदिरात प्रवेश नाकारला जायचा त्यामुळे  बाबानी मला मंदिरात जाऊ द्यायला नकार दिला. बाबा ओरडले तशीच चुरमळल्या देत एका कुशीवर होऊन मी रडू लागले. अश्यातच तुकडोजी महाराजांचे ग्रामगीतेवरील भजन सुरु होते.

**"मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव**

**देव अशानं भेटायचं नाय रं देव बाजाराचा भाजीपाला नाय रं"** ३

एकतारीचा सूर आणि खंजिराचा गजर वाढतच गेला . तसतशी मी अस्वस्थ होऊ लागले. आई बाबा झोपले याची खात्री केली आणि थेट मंदिरात जाऊन महाराजांच्या कीर्तनाचा आस्वाद घेऊ लागले. महाराज गात असताना महाराजांच्या गीतांचा ठेका हातावरच धरला. तेव्हा तुकडोजी महाराजांची नजर माझ्यावर पडली  आणि मला पुढे बोलवून विचारपूस करायला सुरवात केली. त्यांनी विचारल तुला वाजवायला येत का? तेव्हा मी मानेने होकार देऊन बाजूला असलेली खंजिरी उचलली आणि सडकून वाजवायला सुरवात केली. तुकडोजी महाराज प्रसन्न झाले. त्यांनी खुश होऊन मला कायमची खंजिरी बहाल केली. आजही मी ती खंजिरी जीवापाड जपून ठेवली आहे. तुकडोजी महाराजांच्या आशीर्वादाने माझ्या गावगाड्याबाहेरच्या कलेचा उत्कर्ष झाला. त्यांनी लोकगायकीचे कुबेरासारखे धन माझ्या पदरात टाकले"४.

तेव्हापासून भारूड, आख्यान, पोवाडा हे मीराबाई भराभरा गात सुटली. मीराबाईच कथन ऐकताना आपोआप मला गहिवर येऊ लागला. आजही वयाची ६० (साठी) पार केलेली असूनसुद्धा महाराष्ट्रातल्या खेड्या पाड्यात, गावगाड्यात मीराबाई दिमडीवरचं भजन,भारूड करत फिरते. फक्त पारंपरिक नाही तर आधुनिक काळात समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांना आपल्या गायकीच्या माध्यमातून वाचा फोडते. हुंडाबंदी, दारूबंदी, स्त्रीभ्रूणहत्या या सारख्या समस्यांवर भारूड भजनाच्या माध्यमातून कार्यक्रम करते. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालानालये, भारत सरकारचे सॉंग अँड ड्रामा डिव्हिजन, लोककला महोत्सव, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपुर, भारत सरकारची संगीत नाटक अकादमी या मान्यवर संस्थामधून मीराबाई आपल्या प्रबोधन उद्बोधानाचे कार्यक्रम राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर सदर करतात. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक उत्थानाच्या चळवळीत माणसाला माणूस म्हणून उभे करण्याचा विचार दलित पददलितांना मिळाला. म्हणून तमाम बहुजनांना जगण्याची उर्मी मिळाली. संत परंपरेच्या विचारासोबत मीराबाई बाबासाहेबाना आपलं दैवत मानते आणि म्हणते.

**"खातो तुपात पोळी भीमा तुझ्यामुळे**

**डोईवरची गेली मोळी, भीमा तुझ्यामुळे**

**काखेची गेली झोळी, भीमा तुझ्यामुळे"** ५

मीराबाईच्या या प्रबोधनकारी धाटणीमुळे आणि वैचारिक लोकगायकीमुळे आज ती लोकांच्या गळयातला ताईत बनत चालली आहे. अनेक सभा संमेलनातून मीराबाई चा गौरव होतो आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, लक्ष्मीबाई कोल्हापूरकर पुरस्कार, महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्याचा राज्य पुरस्कार असे या आणि अनेक पुरस्कारांनी मीराबाईंना गौरवण्यात आले आहे. पण एक खंत त्यांनी व्यक्त केली की  पुरस्कारानं पोट कुठं भरतं साहेब ! पोटाची खळगी भरण्यासाठी पोटभर कार्यक्रम तरी पाहिजे. कधी दुष्काळाचा सावट तर कधी आपत्कालीन परिस्थिती यामुळे कुटुंबातील १० ते १२ कलावंतांवर कधीकधी उपासमारीची वेळ येते. मग कधी लोक पार्टी सोडून जातात तर कधी कुटुंबातील लोकच

परकी होतात कोरोनाच्या सावटामुळे मिराबाईवर स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी राहत घर विकण्याची वेळ आली. तो दिवस मला आजही आठवतो मी माझ्या नात्यातील एका लग्नासाठी माझ्या गावी टेंभूर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथे गेलो आणि पहिला लॉकडाऊन झाला कोरोनामुळे सगळीकडे हाहाकार उतलामातला होता. रस्त्यावर कर्फ्यू लागला होता. सगळीकडे शुकशुकाट असल्याने चीट पाखरू ही दिसत नव्हते त्यातच मीराबाईचा मला फोन आला साहेब पंधरा लोकांचा कुटुंबकबिला घेऊन मी घरामध्ये राहते तीन दिवस झालेत माझ्या घरची चूल पेटली नाही आहे. लहान थोर घरातील अन्नासाठी राडारड करत आहेत. कृपया मला काहीतरी मदत करा. हे ऐकून माझा जीव कासावीस झाला. पण पर्याय नव्हता मदत करायची मानसिकता असून सुद्धा गावावरून मी औरंगाबाद पर्यंत पोहोचू शकत नव्हतो. विचार करत असतांना माझ्या लक्ष्यात माझे औरंगाबादचे मित्र राजू खरे समाजसेवक याचं नाव आल मी त्यांना मीराबाईची प्राप्त परिस्थिती सांगितली. त्यांनीही माझ्या विनंतीचा मान राखून मीराबाईना तीन महिन्याचा अन्नधान्य,शिधा आणि औषधोपचारासाठी काही आर्थिक मदत करून सहकार्य केले. कोरोनातर गेला पण आजही मीराबाई  चिखलठाणाच्या आठवडे बाजारात दहा बाय दहा च्या खोली मध्ये आपला संसार चालवत आहे. तुकाराम, अर्चना, कविता, राजू, महावीर, दीपक, साखरबाई, असाराम, कोमल, करण असे १४ ते १५ लोक मीराबाई वर निर्भर आहेत.त्यांचे शिक्षण आणि उपजीविका मीराबाईच्या गाण्यावर चालते. त्यातले काहीजण मीराबाईला गायन वादनात सहकार्य करतात. या सगळयाचा तांडा घेऊन मीराबाई म्हणते.

**" केसारी फणी घे, माय काळी पोत घे**

**आठवभर जोंधळा दे, तुझ्या बाळाला जाईचा काजळ घे "६**

या वैदीनरूपी मीराबाईचा प्रवेश मंचावर झाला की आश्चर्यचकित होऊन टाळ्या वाजवतात. मीराबाई गायनाबरोबर खंजिरी वादनासह एकपात्री अभिनय करून कार्यक्रम सादर करते. मीराबाई साक्षात आपल्या सादरीकरणातून अभिनयाचे चालते बोलते नाट्यशास्त्र उभे करताना दिसते. अलीकडच्या काळात मुलगी कविता, मुलगा आणि जावई साईनाथ हे मीराबाईला व्यावहारिक ज्ञान देताना

दिसतात. मीराबाई म्हणतात लहानपणापासून कलेच्या माध्यमातून समाजाची सेवा केली पण कलेसाठी शिक्षण घेता आले नाही ते तर महत्वाचे असते. ते शिक्षण आज शिकायचे राहून गेले. त्यामुळे मला मिळालेले पुरस्कार, पेपरात आलेल्या बातम्या, माझा झालेला गौरव याचे कधी कौतुकच वाटले नाही. मी जर आज शिकले असते तर माझ्या कलेला एक वेगळी उंची मिळाली असती. अशी खंत त्या व्यक्त करतात.

**निष्कर्ष:-**

१) प्रतिकूल परीस्थीतीत न डगमगता आलेल्या संकटावर मात करण्याची क्षमता मीराबाईच्या एकूण चरित्रावरून दिसते.

२) संत महात्म्याने दिलेल्या आदर्शाचा दृष्टीकोन मिराबाई आयुष्यभर उराशी बाळगून असलेले दिसतात.

३) कलेच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन उद्बोदन करण्याची परंपरा मीराबाईच्या सादरीकरणात दिसते.

४) जगण्यासाठी संघर्ष हा कलावंताच्या नशीबी जन्मोजन्मीचा हा.

**संदर्भ-**


१) पहिले महिला लोककला सम्मेलन रवींद्र नाट्य मंदिर ,मुंबई २००८ येथील सादरीकरणातून.

२) सांस्कृतिक कार्यक्रम राज्य पुरस्कार मुंबई २०१२ येथील सादरीकरणातून.

३) संत तुकडोजी महाराज यांच्या ग्राम गीतेतून

४) दिनांक ०५ जुलै,२०१४ या दिवशी घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखतीतून.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमातून.

६) सांस्कृतिक कार्यक्रम २०२२ औरंगाबाद येथील सादरीकरणातून.


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन

## प्रा. उन्नती संजय चौधरी

**धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर**

**प्रस्तावना**

साठोत्तरी कालखंड हा लोकशाही मूल्यांच्या अनुषंगाने सामाजिक पुनर्रचनेचा काळ आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील सर्व प्रकारची विषमता दूर करण्यासाठी भारतातील जातीधर्म, तळागाळातील शोषित, पिडीत जनसमूह आणि स्त्रिया यांना शिक्षण हा मूलभूत हक्क देण्यात आला. हे सर्व घटक शिक्षण व ज्ञानामुळे लिहूबोलू लागले. त्यांचे अनुभव साहित्यातून मांडत गेले आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रात नवे साहित्यप्रवाह निर्माण होत गेले. दलित, ग्रामीण, आदिवासी, मुस्लिम आणि ख्रिश्चन या साहित्यप्रवाहामध्ये स्त्रीवादी साहित्यानेही त्याच्या वेगळेपणाचा ठसा उमटविला. प्रस्तुत कालखंडात अनेक लेखिकांनी स्त्रीजाणिवांचा धीटपणे आविष्कार केला. अशा लेखिकाच्या कथांचा परिचय या ठिकाणी करून देण्यात आला आहे.

**स्त्रीजीवनातील स्थित्यंतरे**

प्राचीन काळापासून श्रम विभागणीच्या नावाखाली स्त्रीला घराबाहेर पडू दिले जात नव्हते. तिच्यावर अनेक बंधने लादून तिच्या कर्तृत्त्वाच्या दिशा बंद करून ठेवल्या जात होत्या. कारण" गृह्यसूत्रे, धर्मसूत्र, मनुस्मृति आणि याज्ञवल्क्यस्मृती यांसारख्या धर्मशास्त्रांची रचना होऊन धर्मशास्त्रकारांनी स्त्रीविषयक कायद्याची चौकट आखून दिली होती. तिचा वेद अध्ययनाचा अधिकार काढून तिला अधम ठरविले होते. "१त्याचे विपरीत परिणाम स्त्रीजीवनावर झालेले होते, परंतु ब्रिटिश राजवटीत भारतीय स्त्रीजीवनात परिवर्तन घडून यायला सुरुवात झालेली होती.जुन्या अनिष्ट रूढींना टाकून देऊन स्त्रियांना पुरुषाइतकेच समान स्थान मिळत गेले. स्त्रीच्या नैसर्गिक शक्तीला ऊर्जितावस्था निर्माण करून तिला प्रेरणा व प्रोत्साहन देण्याचे काम लोकशाही कायद्याच्या रूपाने केले गेले.स्वातंत्र्य, न्याय आणि समान अधिकार या मूल्यांनी तिच्या जीवनाला नवे परिमाण लाभले. सर्वच क्षेत्रात त्यांनी भरारी घेतली. साठोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन हेही एक त्याचे उत्तम उदाहरण आहे.

## साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन

१९७५ ते १९८५ हे दशक स्त्रीदशक जाहीर झाले होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्रीस्वातंत्र्याचा जाहीरनामा केवळ प्रसिद्धच झाला नाही, तर स्त्रीच्या स्वातंत्र्य व समानतेबाबत समाजप्रबोधन केले गेले. स्त्रियांच्या हक्कासाठी स्त्रीमुक्ती चळवळी अधिक सक्रिय झाल्या. त्यांनी आंदोलने केलीत. परिणामी भारतीय साहित्याच्या क्षेत्रात स्त्रीवादी साहित्यप्रवाह सशक्तपणे खळाळत राहिला. प्रस्तुत कालखंडातील मराठी लेखिकांनीही स्त्रीजीवनातील अनेक विषयांची स्त्रीवादी दृष्टिकोनातून कथानिर्मिती केलेली आहे.काही लेखिकांची नोंद पुढीलप्रमाणे घेतलेली आहे.

### सानिया

सानिया यांचे १९७८ ते १९९७ या कालखंडात 'खिडक्या' 'शोध', 'भूमिका', 'वलय' 'परिमाण' आणि 'प्रयाण' हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांचे भावविश्व रेखाटताना त्यांनी आपल्या कथांमधून स्वतंत्र विचारांच्या, करिअर करणाऱ्या, आत्मविश्वास बाळगणाऱ्या, नायिका रेखांकित केलेले आहेत. नोकरी, स्वावलंबन, नावलौकिक, या गोष्टी प्राप्त करून स्वतःचे अस्तित्व निर्माण करू पाहणाऱ्या या नायिकांना मात्र सहज काही पुढे जाता येत नाही. त्यांना बऱ्याच समस्या भेडसावतात, पण तरीही त्या अनेक अडचणींना सामोरे जाऊन आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात." काही स्त्रिया घर संसार मूल, नवरा यामध्येच गुंतलेल्या असतात. त्यांना जाणीव होते की, आपले जीवन तेवढ्याच करीता आहे का? त्यापेक्षा आपण काही वेगळे करू शकतो. आपण फक्त गृहिणी म्हणून स्वतःला मर्यादित ठेवले, त्यापेक्षा आपण समाजामध्ये आपला स्वतःचा दर्जा प्रस्थापित केला असता तर बरे झाले असते. ही जाणीव उशिरा झाल्यावर त्या स्वतःचे करिअर करण्याचा प्रयत्न करतात."२ अशी समीक्षा शिल्पा देवराज म्हात्रे यांनी केलेली आहे.

एक गृहिणी म्हणून स्वतःला कमीपणाची जाणीव होऊन पश्चाताप करणाऱ्या स्त्रियांचे भावविश्व सानिया यांनी जसे साकार केले तसेच त्यांनी पतीपेक्षा चांगल्या नोकरीवर असलेल्या स्त्रियासुद्धा रेखांकित केलेल्या आहेत. त्यावेळी मात्र पुरुषी अहंकारामुळे पत्नीचे श्रेष्ठत्व पतीला सहन होत नाही, म्हणून त्या दोघांमधील संघर्षावरही सानियांनी प्रकाश टाकलेला आहे.

विधवा, वृद्ध स्त्रिया, सासू सुना, परित्यक्ता स्त्रिया, अशा वेगवेगळ्या वयाच्या व नात्याच्या स्त्रियांचे दर्शन सानिया यांच्या कथांमधून घडते. स्त्रियांनी घर कामाच्या पलीकडे आपले विश्व निर्माण करून पुरुषांच्या समान पातळीवर यावे, अशी एक भूमिका त्यांच्या कथालेखनामागे दिसते.उदा: 'परिमाण' या कथासंग्रहातील 'चित्र' या कथेतील शशी नावाची कर्तुत्ववान व्यावसायिक स्त्री सानियांनी साकार केलेली आहे. ती यशाचे शिखर गाठत असताना तिचा नवरा दुसऱ्या स्त्रीच्या आहारी जातो,त्याबद्दल ती काहीच बोलत नाही व आक्षेपही कधी घेत नाही. एकदम शांत राहते आणि आपले करिअर सांभाळते.

**मेघना पेठे –** 'हंस अकेला' आणि 'आंधळयाच्या गाई' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.स्त्रियांनी परंपरागत, एकसाची जीवन जगण्यापेक्षा पुरुषासमान आपले कर्तुत्व सिद्ध करायला हवे, असा संदेश कथालेखनामधून लेखिका देतात. महानगरीतील विभक्त कुटुंबातील व्यक्तींच्या मनामध्ये निर्माण होणारी जाणीव त्यांनी प्रकट केलेली आहे. शरीरसुखाची आस असलेल्या स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दलचे वाटणारे आकर्षण हे नैसर्गिक असल्याची जाणिव पेठे यांनी करून दिलेली आहे. त्याकडे लेखिका ती एक सहज प्रवृत्ती म्हणून पाहतात. 'कोल्ह्याचं लगीन' या कथेतील मंजुळाबाईचा नवरा अपंग असल्याने वासना शमवण्याची संधी मिळणार नसल्याची जाणीव त्यांना होते, तेव्हा तिची मुलगी व जावई यांचे सुख पाहून मुलीबद्दल तिला असूया वाटते.ती आशुतोष बॅनर्जीकडे धुणीभांड्यांचे काम करते. त्याच्यापासून शरीरसुखाचा आनंद घेते. आशुतोषच्या स्पर्शात तीला पुरुष वासनांचा अनुभव घेता येतो. " असे असले तरी त्यांची कथा लैंगिकतेकडे न झुकता ती शरीराची सहज प्रवृत्ती या दृष्टीने चित्रित होते."३ असे मत प्रगती शहाजीराव पाटील यांनी मांडले आहे.

मेघना पेठे यांनी स्वतःच्या मतानुसार आयुष्य जगणाऱ्या प्रौढ कुमारिकांना दुकटेपणाची आस लागून असते, परिस्थितीने हतबल झालेला तरुण वाममार्गाला लागतो. कुटुंब व समाजात स्त्रीला दुय्यम स्थान मिळते. शिक्षण घेऊन नोकरी करून परंपरागत, चाकोरीबद्ध जीवनातून मुक्त होण्यासाठी स्त्रिया धडपडतात, अशा अनेक व्यक्तिरेखांचे दर्शन त्यांनी घडवलेले आहे.

**गौरी देशपांडे** : यांच्या कथा नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर 'आहे हे असं आहे' हा १९८६ चा कथासंग्रह प्रसिद्ध झाला त्यातील

एकूण चोवीस कथांमधून त्यांनी काही विनोदी तर काही गंभीर विषयांचे मांडणी केलेली आहे. त्यांच्या बहुतेक कथा या स्त्री जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. परदेशातील स्त्री-पुरुष यांच्यातील परस्पर संबंधांचे आकर्षण असलेले पुरुष लग्न करण्यापेक्षा स्त्री पुरुष संबंधांचा पुरस्कार करतात, तेव्हा त्यांच्या कथेतील नायिकांना त्याचा राग येतो अशी मांडणी 'राईट ऑन सिस्टर' या कथेत केलेली आहे. त्यातील स्त्रीला तीन मुली आहेत ती मुलींना शिकवायचं ठरवते, परंतु प्रतिगामी कर्मठ विचारांचे पुरुष स्त्रियांनी शिकू नये, नोकरी करू नये, नवऱ्यावरच अवलंबून राहावे व घर सांभाळावे अशा विचाराचे आहेत. असा आशय लेखिकेचे व्यक्त केलेला आहे. लग्न व कुटुंबामुळे स्त्रीचा कोंडमरा होत असेल तर स्त्री पुरुषांनी लग्न करून एकमेकांच्या बंधनात न राहता परदेशातील स्त्री-पुरुषांप्रमाणे एकत्र राहावे असे 'ओहोटी' या कथेतील नायक नायिकांना वाटते, परंतु या कथेतील राम नावाचा नायक एकीकडे 'लिव्ह अँड रिलेशनशिप' मध्ये राहतो व दुसरीकडे तो चोरून एका स्त्रीशी लग्नही करतो तेव्हा तिचा स्व दुखावला जातो व ती अस्वस्थ होते, असा स्त्रीपुरुषातील नात्यांचा स्त्री मनावर झालेला परिणाम लेखिका दर्शवितात.

'कावळा चिमणीची गोष्ट' या कथेतील कावळा व कावळी चिमणा व चिमणी यांच्या प्रतिमांतून स्त्री-पुरुष संबंधांवर प्रकाश टाकलेला आहे. त्यातून स्त्रीच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा आशय प्रकट केलेला 'मायलेकी' या कथेतील पुरुषप्रधान कुटुंबातील आई व मुलीच्या नातेसंबंधांचे दर्शन लेखिकेने घडविलेले आहे. त्यांच्या कथांच्या संदर्भात पूजा सावजी यांनी लिहिलेले आहे की, "पुरुष निरपेक्ष आयुष्य जगण्याऱ्या स्त्रियांबाबत गौरी स्त्रीवादी विचार मांडताना वा सुचवताना दिसतात, परंतु कोणत्याही विचारसरणीच्या आहारी जाऊन त्या कथानिर्मिती करीत नाहीत. त्या मुक्तमनाने स्त्रीमनाचा शोध घेतात व स्त्रीकेंद्री कथांमधून तो व्यक्त करतात स्त्रीवादात स्त्रीला आपले आयुष्य विवाह बंधनामुळे स्वायत्तपणे जगता येत नसेल, तिचे स्वातंत्र्य नाकारले जात असेल, तर तिने पुरुष निरपेक्ष जीवन जगावे असे म्हटले जाते"४

**अंबिका सरकार** यांचे 'चाहूल', 'प्रतीक्षा' आणि 'प्रचिती' हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या कथांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांचे विश्व साकार करताना त्यांनी लिंगविशिष्टतेची जाणीव प्रकट केलेली आहे.

त्यासाठी विविध वयाच्या स्त्रियांची दुःखे त्यांनी मांडलेली आहेत.विशेषतः "अंबिका सरकार यांच्या कथेत स्त्री महत्त्वाची आहे. त्यामुळे स्त्रीचे जीवनानुभव आणि स्त्रीच्या जीवनातील नाट्य हा त्यांच्या कथांचा मुख्य विषय आहे. अनेकदा स्त्रियांच्या या जीवननाट्याचे स्वरूप करूण, भीषण असते. त्यामुळे मनाने कोसळलेल्या स्त्रिया त्यांच्या कथेत प्रामुख्याने दिसतात."५ असे सविता वढावकर यांनी मूल्यमापन केलेले आहे.

अंबिका सरकार यांच्या 'बीज', 'चुलीतली लाकडं', 'वंचना' या कथांमधून व्यक्तीमनातील द्वंद्व रेखांकित करताना त्यांनी औचित्यपूर्ण घटनांची मांडणी केलेली आहे. स्त्रीजीवनातील व्यथा, वेदना हे तिच्या वाट्याला वैवाहिक बंधनातून येतात. स्त्री नातेसंबंधात अडकून जाताना अपरिहार्यपणेतिला परिस्थितीस शरण जावे लागते. माणसामाणसातील प्रेम, आपुलकी व जिव्हाळा त्यांच्या संबंधातून परस्परांस अनुभवास येत नाही. याकडे लेखिका वाचकांचे लक्ष वेधून घेतात.

**आशा बगे** : यांचे 'मारवा', 'अत्तर', 'पूजा', 'मांडव', 'चंदन', 'अनंत', 'दर्पण', 'ऋतू वेगळे' आणि 'निसटलेले' हे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.त्यांनी आपल्या जीवनानुभवातील घटना, प्रसंग आणि सभोवतीची माणसे यांना कथाबद्ध केलेले आहेत. कथाविषयाची विविधता राखून मानवी नातेसंबंधांचे आशय लेखिका त्यामधून प्रकट करतात. त्यांच्या कथेची चिकित्सा करताना सविता वडावकर लिहितात की, "एकीकडे परंपरेने चालत आलेल्या संस्कारांचा व्यक्ती मनावर असलेला पगडा आणि दुसरीकडे बदलत जाणारी संस्कृती व मानवी मनातील लोप पावणाऱ्या श्रद्धा यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत, परिणामी माणसाच्या वाट्याला येणारी अगतिकता आणि नैराश्य याचे चित्रण आशा बगे यांच्या 'पूजा', 'नवस', 'श्राद्ध', 'नैवेद्य',' ढग' या कथांमधून केलेले आढळते."६

आशा बगे यांच्या कथांचे केवळ शीर्षक जरी पाहिले तरी रूढी, परंपरा, लोकमानस, लोकश्रद्धा, यांची जाणीव त्यातून होते.जुन्या नव्या पिढ्यांमधील संघर्ष त्यांच्या कथेतून अधोरेखित होताना दिसतो. धार्मिक विधी व कृत्यांच्या बाबतीत जुनी पिढी जेवढी श्रद्धेने पाहते तेवढी नवी पिढी श्रद्धेने न पाहता केवळ औपचारिक कर्तव्यपूर्ती म्हणून पाहते. तसेच व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या गुणदोषांमुळे काही काळ

माणसांच्या नातेसंबंधात ताणतणाव निर्माण होतातही, पण त्यांना लेखिका जीव घेण्याइतपत अधोरेखित करीत नाहीत. कारण त्यांना माणूस महत्त्वाचा वाटतो, म्हणून त्या आपल्या कथा माणूसकेंद्री ठेवून त्याच्या स्वभावासह त्याला प्रकट करतात. मात्र रक्ताची नाती असली तरी गरज संपली की माणसे बदलतात व आपला हेतू साध्य करून दुरावतात, अशी मांडणी 'शपथ' या कथेत केलेली आहे. या कथेतील सुपर्णा वडिलांनंतर भावांना आधार देते, परंतु ते मोठे झाल्यानंतर तिच्या कृतज्ञतेची जाणीव न ठेवता केवळ पैशांचे व्यवहार सांभाळणे त्यांना महत्त्वाचे वाटते. प्रेमाची नाती ते सांभाळत नाहीत, म्हणून सुपर्णाला आपलीच माणसे परकी वाटू लागतात. या उलट 'कोन ठगवा' या कथेत रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेल्या नात्यांमधील आपुलकी आणि माणुसकी खरी असल्याचे लेखिका चित्रण करतात. 'चंदन' व 'स्वामी' या कथांमधून वडील आणि मुलगा या नात्यांमधील ताणतणाव प्रकट केलेले आहेत. याचबरोबर पती-पत्नी यांच्यातील प्रेमपूर्वक संबंध त्यांच्या नात्यातील विश्वासहर्ता व्यक्तिचित्रणाच्या मनोदर्शनातून अधोरेखित केलेली आहे. तर पती-पत्नीच्या नातेसंबंधांची दुसरी एक बाजू म्हणजे त्यांच्यातील ताणतणाव, त्यांच्या मनाची होणारी घुसमट व अगतीकता प्रकट केलेली आहे. मात्र त्यांच्या कथांतील विवाहित स्त्रिया कणखर वृत्तीच्या असून परिस्थितीला शरण जात नाहीत. त्या प्रतिकूल परिस्थितीतही टिकून राहून मार्ग काढतात. एकूणच लेखिका स्त्रीपुरुष जीवनाच्या आंतरिक भावविश्वाचे अनुभव कथेच्या माध्यमातून प्रकट करताना जीवनाच्या अनेक तऱ्हा विविध कांगोरे शब्दबद्ध करत जातात.

**अरुणा सबाने :** यांनी 'अनुबंध' या संग्रहात विवाहाशिवाय एकत्र राहणाऱ्यातरुण व तरुणीला समाजाचा होणारा त्रास आणि सामाजिक बदल म्हणून त्या दोघांच्या 'लिव्ह इन रिलेशनशिपला' मान्यता देणे. या दोन विचारांचा संघर्ष प्रकट केला आहे. पतीकडून चारित्र्यहनन होणाऱ्या स्त्रीने घेतलेला घटस्फोट, विवाह बंधनामुळे स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख, स्त्रीपुरुषातील निखळ मैत्री, त्यांच्यातील भावनिक व अनामिक नातेसंबंध, वडील, मुलगा व मुलगी या नात्यांचे कौटुंबिक कलह, प्रेमभंगामुळे आत्महत्या करणारा प्रियकर, स्त्री-पुरुषातील

निर्व्याज मैत्रीचा अभाव, स्त्रीत्वाच्या मर्यादा ओलांडून स्वच्छंदीपणे जगणारी स्त्री अशा प्रकारच्या विषयाची मांडणी केली आहे.

सबाने यांच्या कथांतील स्त्रिया सुशिक्षित नोकरदार मध्यमवर्गीय असून त्या स्त्रीत्वाच्या पलीकडे जाऊन एक व्यक्ती म्हणून स्वातंत्र्य उपभोगतात. सामाजिक मर्यादांचा विचार न करता पुरुषाशी शुद्ध मैत्री करतात. जसे "इतमाम, प्रतिष्ठा, लोक सारे बाजूला ठेवून आपल्याच गावात आपल्याच चौकात चक्क रात्री एक वाजता पानटपरीच्या बाजूला. दहा वर्षात पहिल्यांदाच घडलेली घटना. किती नियम मोडणार आहे?...... का? कोणासाठी? माझ्याच स्वतःच्या आनंदासाठी!"७ अशाप्रकारे मित्राबरोबर रात्रीबेरात्री फिरून पुरुषांप्रमाणे स्वतंत्र व स्वच्छंदी जीवनाचा आनंद घेणारी तरुण स्त्री सबाने यांनी साकार केलेली आहे.

**सुमती वानखेडे :** यांनी 'जाणता अजाणता' या संग्रहातून स्त्रीपुरुषांचे विवाहपूर्वभावसंबंध, प्रेमसंबंध, मैत्री आणित्यामुळे स्त्रीजीवनात निर्माण होणारा संघर्ष, पुरुषी अहंकार आणि विवाहित स्त्रीची होणारी मानसिक घालमेल, चारित्र्याच्या संशयामुळे पतीपत्नीच्या नातेसंबंधात निर्माण होणारे ताणतणाव, नवऱ्याकडून होणारा पत्नीचा अपमान व त्रास, स्वतंत्रपणे आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या परीत्यक्ता स्त्रीचे भावविश्व, विवाहित स्त्रीपुरुषांच्या नात्यात निर्माण होणारा गुंता, विवाहित पुरुष आणि त्याची मैत्रीण यांच्या मैत्रीमुळे त्यांच्या सांसारिक जीवनात पत्नीमुळे निर्माण होणारे संघर्ष, तरुण-तरुणीच्या प्रेमाचा त्रिकोण व प्रेमभंग, असे विविध अनुभव विश्व प्रकट करून लेखिकेने स्त्रीपुरुष नात्यासंबंधी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

पतीचा अहंभाव आणि स्त्रीच्या मनाची होणारी घुसमट 'सल' या कथेतून सांगितली आहे. कथेतील संकेत व समीक्षा यांचा प्रेमविवाह होतो. तो तिला नोकरी सोडून घर सांभाळायला सांगतो. ती त्याचं म्हणणं मान्य करते. ती एक प्रतिभावान लेखिका असते,पण तो तिला प्रोत्साहन देण्याऐवजी म्हणतो की," नोकरीतर करीत नाही ना, घरसुद्धा नीट सांभाळणे जमत नाही तुला"८ त्याच्या या बोलण्याने ती दुखावते.

**माधुरी आशिरगडे :-** यांनी वैवाहिक रूढी परंपरेमुळे स्त्रीचा होणारा कोंडमारा, प्रेमभंगआणि पतीपासून दुभंगलेपण आलेल्या परित्यक्ता स्त्रीचे दुःख, कुटुंबवत्सल पुरुष, मानसिक तोल गेलेल्या सासूला

सांभाळणारी विधवा सून, प्रेमळ, सुस्वभावी व मानवतावादी विचारांची स्त्री, स्त्रीपुरुषांना एकमेकांचे वाटणारे आकर्षण, अत्याचारीत पीडित तरुणी, स्त्रीपुरुष संबंधांमध्ये गुरुशिष्य, पतीपत्नी सासरासून या नात्यांची गुंतागुंतलेखिकेने उलगडून दाखविला आहे.

शारीरिक आकर्षण असणारा प्रियकर, विवाहानंतरच स्त्रीपुरुषांना एकत्र येण्यास समाजाची मान्यता असणे, यांसारख्या गोष्टींवर लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. कुटुंबातील पती व मुलगा यांच्याकडून स्वतःचा छंद जोपासण्यास तिला मर्यादा पडतात, अशा कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या स्त्रीचे मनोविश्व 'पराभूत' कथेत प्रकट केलेले आहे. जसे," ज्याच्यासाठी जीव गाहाण ठेवला होता. त्यानं आपला जीव कस्पटासमान जाणला होता. तिची मानसिक उभारी एखादा तगडा बुलंद बुरुज ढासळावा त्यागत ढासळत होती."९ अर्थात आईमुलगा, पतीपत्नी, आईवडील, मुलगामुलगी, वडील आणि त्याची मैत्रीण, अशाप्रकारच्या स्त्रीपुरुष नातेसंबंधात स्त्रीची होणारी मानसिक कोंडी व तिची दमछाक लेखिकेने प्रकट केलेली आहे.

**सुप्रिया अय्यर:-** यांच्या 'चांदणचुरा' संग्रहात दैनंदिन जीवनात कंटाळलेल्या स्त्रीच्यामनाला चाकोरीबाहेरील विश्व भुरळ घालते व पर्यटन स्थळाच्या निसर्गरम्य वातावरणात ती रमून जाते. समंजस व प्रेमळ पतीपत्नीच्या भावसंबंधांचे दर्शनही घडते. एखाद्या विवाहित स्त्रीला आईशिवाय नातेसंबंधातील कोणीही मायेच्या भावनेने पाहत नाही. हुशार व कला गुण असलेल्या तरुणीला कोणी समजून घेत नाही,की तिचे कौतुकही कोणी करत नाही. आई, वडील भाऊ व मैत्रिणी यांच्यापासून बेदखल झाल्याची भावना तिच्या मनात निर्माण होते. तिचा जीव घुसमटतो आणि एका श्रीमंत दोन मुलांचा बाप असलेल्या विवाहित पुरुषांच्या प्रेमात ती पडते. निराशेच्या वाटेवर कोणीतरी आपल्या भावना समजून घेणारा भेटला, असं तिला वाटतं, परंतु कथेचा शेवट कारूण्यपूर्ण करताना लेखिका लिहितात की, "तिच्या या उंचपुऱ्या सशक्त देहाने मृत्यूशी तीन दिवस दिलेली निकराची झुंज, आणि शेवटी... कानात अजूनही तिची वाक्ये घोळतात. मी एक दिवशी मरून जाणार आहे."१० संवेदनशील व तरल मनाची भावनाप्रधान असलेली तरुणी आपल्या माणसांकडून होणाऱ्या उपेक्षेमुळे नैराश्याच्या पोटी स्वतःचे जीवन संपवते.

**सीमा साखरे** यांच्या 'चार भिंतीच्या आत' या संग्रहातून कुटुंबव्यवस्था, सामाजिकमूल्ये, स्त्रियांमधील स्त्रीत्वाचा वेध घेणारा आणि स्त्रीपुरुष संबंधांवर प्रकाश टाकणारा भावानुभाव त्यांनी प्रकट केलेला आहे. सभोवतीच्या समाजजीवनातील स्त्रीचे व स्त्रीबाबत घडलेल्या घटनांचे त्यांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून कथांची रचना केलेली आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर त्या म्हणतात की, "'घालमेल' सारखी कथा खूप जवळून अनुभवली आणि म्हणून वाचकांच्या मनातही घालमेल निर्माण होईल इतकी मी साकार करू शकले. 'झोपाळा' यासारख्या कथेत एखाद्या पुरुषाने आपले सारे जीवन आपल्या पत्नीच्या भोवतालीच गुंतवून टाकलेले मला व्यक्त करता आले. 'चार भिंतीच्या आत' सारख्या कथेत ग्रामीण भागातील बंदिस्त स्त्रीच्या मनातील विद्रोह व्यक्त करू शकले."११ अर्थातच अनुभवाभिव्यक्तीची विविधता व त्यातून साकार झालेले स्त्रीजीवन प्रत्ययाला येते.

**कुमुद मंडलेकर** यांनी 'जाग' कथासंग्रहातून स्त्रीमनाचा अंतर्वेध घेण्याचा प्रयत्न केलेलाआहे. स्त्री आजही समस्यांच्या चक्रात अडकलेली आहे. तिचे प्रश्न अनंत आहेत. ते प्रश्न समाजासमोर येतात, पण त्याची उत्तरे तिला मिळत नाही, परंतु त्यांच्या कथांतील नायिकांच्या ठिकाणी जागरूकता आहे. स्त्रीमनाला जाण आहे. स्वनिर्णयाचे आत्मभान त्यांच्या ठिकाणी आहे, म्हणून अंगभूत निर्धाराने त्यांच्या कथांतील नायिका जगत आहेत.त्या स्वतःचे अस्तित्व निर्माण करतात. स्त्रीबाबत समाजातील सर्वसामान्य प्रत्ययाला येणारे अनुभव त्यांनी टिपले आहेत.त्यामुळे त्यांच्या कथा वस्तुनिष्ठ वाटतात.

**समारोप**

साठोत्तरी कालखंडातील लेखिका मध्यमवर्गीय सुखवस्तू जीवनाचे अनुभव प्रकट करताना स्त्रीपुरुष नातेसंबंधांच्या पार्श्वभूमीवर कौटुंबिक व सामाजिक जीवनात स्त्रीचीच होणारी घुसमट व उपेक्षा यावर प्रामुख्याने प्रकाश टाकतात. स्त्रीला कुटुंबात जगताना आणि निभावून नेताना स्वतःच्या अस्तित्वाला नेहमीच मुरड घालावी लागते. ज्या स्त्रियांनी तसे न करता एक व्यक्ती म्हणून स्वावलंबी, स्वतंत्र व आत्मनिर्भरतेने जगायचं म्हटलं की, कुटुंब व समाजाच्या ते पचनी पडत नाही, म्हणून त्यांना जीवनामध्ये मोठा संघर्ष करावा लागतो, या संघर्षाचे विविध रूपेही या लेखिकांच्या कथांमधून आपल्याला पाहायला मिळतात.

**संदर्भ**


१) डॉ. सुरवाडे मनोहर : मराठी ग्रामीण कथा : लेखिकांचे योगदान, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ २०१३,पृ.६

२) म्हात्रे शिल्पा देवराज : सानिया यांच्या साहित्याचा स्त्रीवादी भूमिकेतून अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पीएचडी पदवी करीता सादर करण्यात आलेला प्रबंध,मे२००५,पृ.२६५

३) पाटील प्रगती शहाजीराव : मेघना पेठे यांच्या कथा लेखनाचा अभ्यास : शिवाजी विद्यापीठाच्या पदवीपरीक्षेसाठी सादर केलेली प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, फेब्रु २००७,पृ.४६

४) सावजी सौ पूजा मनोज : गौरी देशपांडे यांच्या कथा कादंबऱ्यांची बलस्थाने आणि मर्यादा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्याशाखेतील आचार्य (पी.एच.डी) पदवी करता सादर केलेला शोध प्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, २०१४,पृ.११६

५) वढावकर सविता सुनित : स्त्रियांचे कथालेखन १९७५ ते २००० (कमल देसाई, आशा बगे, गौरी देशपांडे आणि अंबिका सरकार यांच्या विशेष संदर्भात), पुणे विद्यापीठ पीएचडी (मराठी) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ मराठी विभाग पुणे, जुलै २००६,पृ.११८

६) तत्रैव : तत्रैव, पृ.२३६

७) सबाने अरुणा :अनुबंध, आकांक्षा प्रकाशन , नागपूर , प्र. आ.२००५, पृ.१२७

८) सुमती वानखेडे : जाणता ---अजाणता, उन्मेष प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५, पृ.५५

९) माधुरी अशिरगडे :आईशप्पत, उनि, प्र. आ.२०१३, पृ.१०१

१०) सुप्रिया अय्यर : चांदणचुरा, साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, प्र. आ.२००५,पृ.४८

११) सीमा साखरे : चारभिंतीच्या आत , सीमा प्रकाशन, नागपूर, प्र. आ.२००७,मनोगत,पृ ९


***

# साठोत्तरी मराठी साहित्य : संकल्पना व स्वरूप


## प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खारेपाटण**


**प्रस्तावना**:

साठोत्तरी वाङ्मय हा शब्दप्रयोग १९६० नंतरच्या काळात रूढ झाला. तो हिंदी वाङ्मयाच्या प्रभावातून वापरला गेला. नारायण सुर्वे यांनी एका भाषणात त्याचा प्रथमतः उच्चार केला. १९६० नंतरच्या टप्प्यावर मराठी वाङ्मयातमोठे बदल घडले. यामागे विस्तारलेले सामाजिक भान होते. बहुप्रसरणशीलता व बहु सांस्कृतिक प्रसारवहनाचा हा कल होता. या काळात वाङ्मयीन आविष्कारात लक्षणीय बदल झाले. आधुनिकतेच्या नव्या जाणीवेने मराठी वाङ्मयप्रदेश घडला. कलावादाच्या पिछेहाटीनंतर जीवनवादी वाङ्मयाचा पुरस्कार या काळात झाला. वैचारिक लेखन व बदलत्या सामाजिक जीवनाने त्यास बळदिले. या काळातील वाङ्मयीन जाणिवात व रुपात मोठे बदल घडले. अभिरुची स्थित्यतरांच्या अंगानेही तो घडला. या काळात मराठी साहित्याला अनेक फांद्या-उपफांद्या फुटल्या. वाङ्मयीन मनोगताचे इमले धीटपणानेप्रकट झाले. वाङ्मयाच्या अंतरंगाबरोबर बाह्यांगातहीबदल झाला. भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, नारायण सुर्वे, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, अरुण कोल्हटकर, दि. पू. चित्रे या कवी-लेखकांनी त्याचे प्रवर्तन केले. विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर या नाटककारांनी भारतीय रंगभूमीला नवे आयाम दिले. (अर्थात ही नवे प्रतिनिधिक आहेत.)

**उदिष्ट्ये :**

१) साठोत्तरी साहित्याची संकल्पना समजून घेणे.
२)साठोत्तरी साहित्याचे स्वरूप समजून घेणे.
३) साठोत्तरी साहित्याची माहिती संकलित करणे.

**साठोत्तरी साहित्याचे स्वरूप**:

भालचंद्र नेमाडेयांनी त्यांच्या कादंब-यातून शैक्षणिक प्रदेशावकाश निवडून महाराष्ट्रीय समाज वाटचालीचे विहंगदर्शन घडविले. साठोत्तरी दशकात मराठी साहित्यात भरभराटीचा चमचमणारा बहुविद अवकाश होता. लघुनियतकलिक चळवळीने

तुंबलेल्या कोंडीला अधिकमोकळे केले. या चळवळीने अनेक पातळयांवर नवे भान दिले. अस्तित्व भानाचे नवे प्रदेश, विविध समाजदर्शने, आधुनिकतेचे परिप्रेक्ष्य, परिघावरील अस्मिता केंद्राची उभारणी आणि सर्वदूर भाषिक नकाशांचे दर्शन साठनंतरच्या वाङ्मयाने घडविले. सत्तर नंतरच्या वाङ्मयीन चळवळीचा गजबजलेला अवकाशनिर्माण झाला. "चळवळीचे साहित्य शास्त्र मानण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रीय समाज जीवनाच्या परिघावरची स्वरूप दर्शने वाङ्मयातून प्रकटली. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लीम, ख्रिश्चन अशा अस्मिताकेंद्री वाङ्मयरूपांना मुक्त प्रदेश मिळाला. वास्तव वादाच्याउत्कर्षाने मानवी समाजाची सूक्ष्मता मांडली. जात आणि वर्ग संघर्षाची रूपे जोरकसपणे मांडली. पूर्व परंपरेची चिकित्सा केली. तिच्या पुनर्रमुल्यांकन बरोबर नव्याची पुनर्रस्थापना झाली. आधुनिक जाणिवा व बहु सांस्कृतिक अवकाशाची उपलब्धता ही या काव्य वाङ्मयाची वैशिष्ट्ये होत.

येथे आणखी एक बाब लक्षात घ्यायला हवी. वाङ्मयीन बदल हे एकाएकी घडत नसतात. वाङ्मय परिवर्तनाचे धागेदोरे आधीचा काळ तयार करत असतो किंवा आधीच्या काळातही गुंतलेले असतात. पुढच्या भरणपोषणाची पार्श्वभूमी काही प्रमाणात आधीचा काळ तयार करत असतो. आधीच्या काळातील वाङ्मयाचे स्रोत पुढील काळातही पाझरलेले असतात. नव्वद नंतरच्या वाङ्मयावरही साठच्या वाङ्मय दृष्टीची सावली आहे. "नव्वदोत्तरी साहित्यात साठोत्तरी साहित्याचे आनुवंशिक गुणविशेष अपरिहार्यपणे उमटतील" असे रा. ग. जाधव यांनी म्हटले, ते एका अर्थाने खरेच ठरते. साठच्या दशकानंतर जी मोठी खळबळ वाङ्मयविश्वात होती तशी १९९० नंतर दिसत नाही. नव्वद नंतरच्या नव्या अर्थनीतीच्या धृवीकरणाचा मानवी जीवनावर गडद असा परिणाम झाला. जागतिकीकरण आणि नवतंत्रज्ञानाने मानवी संदेशनात प्रचंड बदल झाले. विकासाचा दृश्य पातळीवर वेग आला. दूरचे जवळ आले आणि जवळचे हरवत चालले.या द्विधावस्थेचा परिणाम मानवी जीवनावर झाला. साठ नंतर जे चलरूप होते, तसे ते या काळात आढळत नाही.

**साठोत्तरी चळवळी :**

साठोत्तरी मराठी साहित्यात महत्वाच्या तीन चळवळीचा समावेश होतो. त्यात दलित साहित्य चळवळ महत्वाची आहे. या चळवळीने लोकशाहीकरणाला वेग दिला. दलित साहित्य चळवळ हे मराठी साहित्याचे वैभवशालीपर्व आहे. यामुळे भारतातील दलित

साहित्य प्रस्थापित झाले.ही भारतीय साहित्याला मराठी साहित्याने दिलेली देणगी आहे. आत्मभान, आत्मशोध, नकार व विद्रोह ही दलित साहित्याची आशय सूत्रे होती. जीवनाचे सत्य सांगितले पाहिजे, मानवमुक्ती शोधली पाहिजे ही या साहित्याची भूमिका होती. या चळवळीने मराठी साहित्य समीक्षा, सौंदर्यविचार बदलले हे या साहित्याचे महत्वाचे योगदान आहे. या साहित्य प्रकारांत 'आत्मकथन' आणि 'कविता' या साहित्य प्रकारांत विपुल लेखन झाले. या साहित्याने भारत व जगाला कवी नामदेव ढसाळ यांच्यासह दया पवार, बाबुराव बागुल, यशवंत मनोहर, दत्ता भगत, शरणकुमार लिंबाळे इत्यादी साहित्यिक दिले. नारायण सुर्वेनी दलित कवितेत कामगारांचे दु:ख मांडले.

दलित वर्गाशिवाय शेती व्यवसाय हा जगण्याचा मुख्य आधार असलेला ग्रामीण भागातील बहुजन वर्गाचे प्रश्न साहित्यातून मांडणारा वर्ग होता. यांचे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय. ही साहित्य चवळ सुरु करून आंनंद यादव यांनी या चळवळीला एक निश्चित स्वरूप दिले. यानंतर रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा'या कादंबरीने या चळवळीला बळ दिले. या साहित्यात ग्रामीण जीवनाचे वास्तव, अगतिकता होती. पंचायत राजच्या माध्यमातून नव्या संस्थाची निर्मिती व त्यातून मूठभरांची झालेली समृद्दी व त्या भोवती फिरणारे राजकारण, सत्ताकारण होते. या साहित्याने महात्मा फुले यांना आदर्श मानून लिखाण केले. धर्म व पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे होणारे शोषण, अन्याय होतो तो दूर व्हावा यासाठी स्त्रियांचे स्वावलंबन त्यांचे स्वातंत्र्य, अधिकार याचे पुरस्कार करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. या साहित्याचा उदय झाला. मेघना पेठे, गौरी देशपांडे यांनी वेगळे व वेधक लिखाण केले. पुरुषसत्ताक व्यवस्था व पुरुषी मानसिकता याची उपरोधपूर्ण टिंगलटवाळी, करियरला प्राधान्य देणा-या स्त्रीच्या समस्या व व्यथा यांचे प्रभावी चित्रण ही त्यांच्या स्त्रीवादी साहित्याची ठळक वैशिष्टे होती. शांता गोखले यांच्या 'रिठा वेलणकर' या कादंबरीची मानसशास्त्रीय तसेच समाज शास्त्रीय स्त्रीवादी भूमिकेतून चिकित्सा करता येते. कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी भारतीय व समाजशास्त्रीय अशा द्विविद स्त्रीवादी दृष्टीकोनातून अभ्यासता येते. मेघना पेठे यांच्या लिखाणात मुक्त जीवन पद्धती, बिनधास्त जीवनशैली आढळते. साठोत्तरी कालखंडात, १९७०-८० च्या दशकांत व नंतरच्या काळातही काव्य निर्मिती करणा-या व नंतरच्या काळातही काव्य निर्मिती करणा-या अनेक कवयित्रींनी

स्त्रीवादी काव्याचे दालन समृद्ध केले आहे. बाईतील अपार करुणा, तिची सर्जनशीलता, नवनिर्मितीची क्षमता ही तिची बलस्थाने अनेक कवितांतून व्यक्त झाली आहेत. त्यातील काही प्रमुख कवयित्री म्हणून अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, नीरजा, कविता महाजन आसावरी काकडे इत्यादी नावे सांगता येतील. स्त्रीत्वाचे, स्त्रीवादी जाणिवेचे, स्त्रीच्या विशिष्ट अनुभव विश्वाचे वेगवेगळया पातळयावरचे, भिन्न भिन्न स्वरूपाचे चित्रण त्यांच्या कवितात आढळते. व्यक्तीनिष्ठ तसेच सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचे थेट चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. स्त्रियांच्या आत्मकथनानीही स्त्रीवादी साहित्यात मोलाची भर घातली. उदा. सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' कमल पाध्ये यांचे 'बंध अनुबध' ही आत्मकथने उल्लेखनीय आहेत. दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्त्वाचा दस्त ऐवज आहेत. उदा. बेबी कांबळे-'जिने आमुचे'कुमुद पवाडे 'अंतस्फोट' उर्मिला पवार 'आयदान' सिंधुताई सपकाळ –'मी वनवासी' इत्यादी. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भातील महत्त्वाचे योगदान आहे.भारतीय व समाजशास्त्रीय अशा दुहेरी स्त्रीवादी भूमिकांतून त्यांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. १९७५ हे वर्ष मराठी साहित्यासाठी स्त्रियांसाठी अनेक अर्थाने महत्वाचे ठरले. यावर्षी 'आंतरराष्ट्रीय महिला हक्क दिवस' व 'आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे'आयोजन करण्यात आले होते. येथूनच महाराष्ट्र व देशात स्त्री मुक्तीचे वारे वाहू लागले. या साहित्यात स्त्री-पुरुष संबंध विवाह संस्थेत स्त्रीची होणारी घुसमट व आत्मशोध हे या साहित्याचे विषय होते. पुरुषी अन्यायाला वाचा फोडणा-या या साहित्याने पुरुषांचे आत्मभान जागे केले, हा या साहित्याचा महत्वाचा विशेष होय.

**अनियतकालिकांची चळवळ :**

१९६० नंतरचा काळ हा मराठी साहित्याच्या दृष्टीने साहित्य क्षेत्रात बदल घडविणारा काळ आहे. दुस-या महायुद्धानंतरच्या काळापासून मराठीत हळूहळू प्रतिष्ठित झालेला साहित्य विचार या काळात नव्याने लिहिणा-या पिढीला अपुरा वाटू लागला. त्याचा परिणाम म्हणून कलात्मकता सौदर्यविषयी एक प्रकारची वादग्रस्तता तत्कालीन मराठी साहित्य क्षेत्रात मूळ धरू लागली. या सगळयाचा पाश्यात्य जगातून येणा-या नव्या विचारांशी संबंध होता. मराठीतील अनियतकालिकांची चळवळ हे त्याचे एक ठळक उदाहरण आहे. नव्याने लिहिणा-यांच्या लेखनातून मराठी साहित्यात निर्माण होणारे नवे प्रवाह, नवे नवे प्रश्न उपस्थित होऊ लागले. तोपर्यत प्रस्थापित झालेल्या समीक्षेला त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देणे कठीण होऊ लागले, व

त्यातून हळूहळू साहित्यविषयक नवा विचार आकार घेऊ लागला. या काळापासून मराठी साहित्य विचार कलावादी विचारापासून दूर जाऊन संस्कृतीलक्षी होऊ लागला. मराठी साहित्याचे भाष्यकार म्हणून दोन नावे सांगता येतील डॉ. चंद्रशेखर जहागीरदार व डॉ. रविंद्र किंबहुने. तशी पाहिली तर ही दोन्ही नावे साहित्य क्षेत्रात तशी माहितीची असली तरी प्रसिद्धीच्या झोतात कधीच नव्हती. परंतु १९६० नंतरच्या काळातील मराठी साहित्याच्या संदर्भात या दोघांचेही कार्य अंत्यत महत्त्वाचे आहे. दोघेही त्याकाळातील अनियतकालिकांच्या चळवळीतील मंडळींशी मित्रत्वाचे संबंध ठेवून होते. नव्याने येणा-या लेखनाकडे स्वागतशील वृतीने पाहून त्या लेखनाचे स्वरूप उलगडण्याचा प्रयत्न करीत होते. ते स्व:त ललित लेखक नसल्याने त्यांची नावे प्रसिध्द होत नव्हती, हे स्वाभाविकच आहे. परंतु त्या काळात लेखन करणा-या भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, श्याममनोहर, अरुण कोल्हटकर ना. धो. महानोर सतीश काळसेकर यासारख्या आज प्रसिध्द असणा-या लेखकांशी त्यांचा जवळचा संबंध होता. त्या सर्वाच्या परस्परांशी चर्चा होत असत. डॉ. चंद्रशेखर जहागीरदार हे मूळ हैदराबादचे. महाविध्यालयीन शिक्षणासाठी ते औरंगाबादला आले व तेथेच राहिले. शिक्षण पूर्ण झाल्यावर १९७९ पर्यत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विध्यापीठाच्या इंग्रजी विभागात काम केले. पुढे शिवाजी विद्यापीठात २००५ पर्यत त्यांनी काम केले. इंग्रजीसोबत अमेरिकन साहित्य हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय होता. परंतु मूळ हैदराबाद आणि नंतर औरंगाबाद येथे केलेले वास्तव्य यामुळे उर्दू साहित्याशीही त्यांचा उत्तम संबंध होता. याचा परिणाम त्यांच्या साहित्य अभिरुचीवरही झाला होता. त्यातून तौलनिक साहित्याभ्यासाची दृष्टी त्यांना प्राप्त झाली होती. विविध वाङ्मयीन नियतकालिकातून प्रसिध्द झालेले त्यांचे लेख, चर्चासत्रातील भाषणे व शोधनिबंध यातून जहागीरदारांच्या विचारशीलतेचा प्रत्यय येतो. डॉ. रविंद्र किंबहुने हेही असेच प्रसिध्द नाव. तेही इंग्रजीचे प्राध्यापक. अतिशय बुद्धिमान आणि व्यासंगी व्यक्तिमत्वही अखेरपर्यत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कार्यरत होते. जहागीरदार व किंबहुनेदोघेही समवयस्क. बुद्धिमान आणि व्यासंगी होते. साहित्याचा इतिहास, त्या समाजातील घडामोडी ,वेगवेगळया अभ्यास पद्धती या सर्व बाबींचे उत्तम ज्ञान त्यांना होते. पण त्यांचा अनुवाद करून त्यांचा मोठेपणा सांगण्यापेक्षा या सर्वच आपल्या समाजाच्या संदर्भात विचार करण्याची त्यांची पद्धती होती. म्हणून

त्यांचे लिहिणे, बोलणे, केवळ विद्वत्तादर्शक होत नसे. ते आपल्या समाजाला आपल्या परीने मार्गदर्शन करणारे होत असे. वेगवेगळ्या चर्चासत्रातूनसादर केलेले शोधनिबंध, परिसंवादातून केलेली भाषणे, वाङ्मयीन नियतकालिकातून लेहिलेले लेख हेच त्यांच्या विचारांचे द्योतक होते. त्यांचा 'किंबहुना' या नावाने लेखनसंग्रह प्रसिध्द झाला. अलीकडील मराठी साहित्याविषयी त्यांची जाणकार मते होती. परंतु आज त्यातील काहीच प्रत्यक्षात आलेले नाही. 'तौलनिक साहित्याभ्यास' या प्रा. हातकणंगलेकर गौरवग्रंथाचे संपादन एवढेच आज त्यांच्या नावावर प्रकाशित साहित्य आहे. जहागीरदारांवर एक गौरवग्रंथ इंग्रजीत प्रसिध्द झाला आहे.

**मराठी साहित्यातील साठोत्तरी समीक्षाप्रवाह** :

साठोत्तरी समीक्षाप्रवाहात साहित्यप्रकारांचा, अनेकविध जाणिवांचा विकास झाल्यामुळे समीक्षाविचारांचे काही ठळक प्रवाह दिसून येतात. जीवनवादी, कलावादी, आदर्श मूल्यांवर आधारलेले, नैतिक मूल्यांचा, सत्य, शिव, सौन्दर्याचा पुरस्कार करणारी समीक्षा पद्धती मागे पडली आणि साम्यवादी, ऐतिहासिक, मानसशास्त्रीय, अस्तित्ववादी, ग्रामीण, दलित, प्रतिकवादी, आदिवासी, स्त्रीवादी, चरित्रात्मक व आदिबंधात्मक समीक्षा विचारांचा प्रवाह खळखळू लागला. एक सौदर्यशास्त्रीय समीक्षेचा अपवाद वगळता वरील सर्व लौकीकतावादी समीक्षाप्रवाह कलाकृतीतील सौदर्यनुभूतीचे घटक कसे असावेत याविषयी सतत विचार करताना दिसतात. साम्यवादी महावर्तुळातील एक लहान वर्तुळ म्हणजे समाजवादी समीक्षा. साठोत्तरी कालखंडात मराठी समीक्षाप्रवाहात या समीक्षेने आपली मूळे रुजवली. मार्क्स व एंगल्स यांनी विशिष्ट भौतिक परीस्थितीत विशिष्ट प्रकारची विचारसरणी व त्यानुसार कलाकृती निर्माण होतात असे म्हटले. कलावाद व जीवनवाद यातील द्वद्वच मार्क्सवादी समीक्षेने नष्ट केले. समाजवादी समीक्षेची सुरुवात लालजी पेंडसेंच्या 'साहित्य आणि समाजजीवन'या ग्रंथाने झाली. मराठी समीक्षेत मानसशास्त्रीय समीक्षा युरोपीय समिक्षेप्रमाणे रुजली नाही. या समीक्षेचे नाते काही प्रमाणात चरित्रात्मक समीक्षेशी जुळते पण कलानिर्मितीची प्रक्रिया ही लौकीकभिन्न स्वरुपाची असल्यामुळे कलाकृतीची प्रत व पोतीचा समग्र संरचनात्मक लयबंध ही समीक्षा उलगडून दाखवू शकत नाही.

साठोत्तरी कालखंडात स्त्रीमुक्तीच्या बंडखोर जाणीवेतून पुरुषप्रधान संस्कृतीला विरोध करून स्त्रीमनाच्या अंतसत्वाचा वेध स्त्रीवादी समीक्षा घेते. 'महर्षी ते गार्गी' – मंगला आठलेकर, 'स्त्रीप्रश्नांची

वाटचाल' –विद्युत भागवत, 'स्त्रीसूक्त' – माधवी कुंठेइत्यादी ग्रंथ स्त्रीवादी समीक्षेचे संश्लेषण व विश्लेषणकरणारे आहेत. साठोत्तरी समीक्षेत अस्तित्ववादी समीक्षेच्या प्रवाहाला केंद्रीभूत स्थान आहे. दि. के. बेडेकर, रविंद्र मनोहर, रेखा इनामदार-साने ह्यांच्या ग्रंथातून अस्तित्ववादी समीक्षेची बीजे प्रकट होतात. दलित साहित्य समीक्षा, विद्रोही जाणिवेचे विश्लेषण करते व कलाकृतीला साधन मानून स्वातंत्र, समता, बंधुता या तत्वत्रयीचा पुरस्कार करून, मानवतेची प्रतिस्थापना करणे आपले साध्य मानते.बाबुराव बागुल, डॉ. भालचंद्र फडके, ज्योती लांजेवार, डॉ. यशवंत मनोहर, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, शरणकुमार लिंबाळे इत्यादींची दलित साहित्यावरची समीक्षा येथे नमूद करणे आवश्यक आहे.

प्राचीन इतिहासाला मुळारंभदेणारे साहित्य ही आदिवासी समीक्षेची प्रेरणा आहे.विनायक तूकाराम, विनायक मुनघाटे, गोंविद मोरे, डॉ. रमेश कुबल इत्यादीचे ग्रंथ आदिवासी समीक्षाप्रवाहाची संकल्पना स्पष्ट करणारे आहेत. इतिहासनिष्ठ समीक्षालेखनात काळ, समाज, परिवेश यांनी साहित्यकृतीचे मूल्यमापन होत असल्याने तिचे स्वरूप सांस्कृतिक पुनरुज्जीवनवादी असे आहे. चरित्रात्मक समीक्षा कलाकृतीतील सौदर्यनुभूतीच्या रूपाचा अर्थ प्रक्षेपित करून, प्रतीकातील आशय व प्रतीकरूप वस्तू यातील गुणधर्मसाम्य रचनाबंधातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते. डॉ. सुधीर रसाळ, डॉ. द. भि. कुलकर्णी मालती पाटील, रा. ग. जाधव इत्यादींनी अशा प्रकारची समीक्षा केली आहे. देशीवादी समीक्षेत विशिष्ट भूप्रदेश, भाषा, परंपरा आणि संस्कृती हे महत्वाचे घटक असतात. नेमाडे व चित्रे यांचे तुकारामावरील ग्रंथ हे या समीक्षेचे उदाहरण म्हणून सांगता येईल. अलीकडे साहित्याचा मूळबंध कळण्यासाठी शैलीशास्त्रीय समीक्षेचा उदय झाला. अशोक केळकर, रमेश धोंगडे, कल्याण काळे, म. द. हातकणगलेकर इत्यादींनी अशी समीक्षा केली आहे.समीक्षाविचार हा साहित्यकृतीतील सौदर्यनुभूतीचे घटक कोणते असावेत हे ठरवणारा प्रमुख विचारप्रवाह आहे. नीतीशास्त्री, आदर्शवादी, साम्यवादी, मानसशास्त्रीय, अस्तित्ववादी, देशी, यथार्थवादी, स्त्रीवादी, प्रतिकवादीव आदिबंधात्मक हे सर्व समीक्षाप्रवाह कलाकृतीतील विविध घटकांच्या अस्तित्वाला महत्त्व देतात. फक्त सौदर्यवादी, रुपवादी समीक्षाच कलाकृतीतील सर्व घटक लयबद्ध संघटनतत्वाने किंवा भारतीय साहित्यशास्त्रा नुसार व्यंग्यार्थाने धारणीकरणामुळे आकारास येते. भावानुभवाचे सौदर्यनिष्ठ लयबद्ध संघटन म्हणजे साहित्यकृती, हा

विचार मर्ढेकरांनी दिला. तो कलाकृतीच्या निर्मितीप्रक्रिया व आस्वादप्रक्रिया यांचा विचार करणारा आहे. इतर सर्व समीक्षाप्रवाह कलाकृतीचा साधन म्हणून विचार करतात. सौदर्यवादी / रुपवादी / संरचनावादी समीक्षाच द्रव्य व आकार या दोन्ही घटकांचे रसायन सौदर्यशाशास्त्रीय समीक्षेत होते. कलाकृतीतील द्रव्य व माध्यमभेद सौदर्यवादी समीक्षाच ओळखू शकते, कारण ती कलाकृतीतील भावनानिष्ठ अर्थाचे विश्लेषण व संश्लेषण व संघटन करून कलाकृतीची योग्य प्रतवारी ठरवू शकते.

मराठीच्या संदर्भात १९६० नंतरच बोलीभाषाना साहित्यक्षेत्रात स्थान देण्यात आलेले होते. एकरेषीय भाषा वापरला सर्वार्थाने धक्का देण्याचे काम स्वातंत्र्यउत्तर काळात सर्वप्रथम अनियतकालिकांनी केले. प्रस्थापित माध्यमांमध्ये व्यवहारभाषेला स्थान नव्हते. अलिकडे माध्यमांनीही बोलीभाषेविषयीचे दृष्टीकोन बदलले आहेत. लघुनियतकालिकांच्या चळवळीतून अनेक वाङ्मयीन संकेताप्रमाणे साहित्यातील विशिष्ट वर्गाच्या भाषिक वर्चस्वालाही आव्हान दिले गेले. सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्रातील ही एक महत्त्वाची चळवळ होती. पुढे १९६० नंतरच्या साहित्यप्रवाहामध्ये अतिशय गडद अशी मुद्रा दलित साहित्याच्या चळवळीने उमटवली. गावकुसाबाहेरील उपेक्षित जीवनाचा अविष्कार जिवंतपणे त्यांचा त्यांच्या बोलीत होऊ लागला. या चळवळीची आक्रमकता, झपाटलेपण आणि वेग मराठी साहित्यवर्तुळात हादरे देणारा होता. अनेक अलक्षित समाजाचे जगणे त्यांच्या भाषेसह आविष्कृत झाल्याने मराठी भाषा समृद्ध झाली. मराठीची अनेक रूप समोर येऊ लागली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा उदय झाला.या चळवळीमुळे खेड्यातील बहुजन समाजातील नवशिक्षित तरूण लिहिते झाले. हे लेखक ग्रामीण भागातील विविध जाती-जमातीतील होते. त्यांनी व्यापक असे ग्रामीण जीवन आणि तेथील जीवनजाणीवा ,आपली भाषा आपल्या लेखनाचा विषय केला. त्यांच्या लेखनातून त्या त्या परिसरातील बोलीभाषा प्रकाशात येऊ लागल्या. भाषा वापराचे हे भान लघुनियतकांलीकांच्याचळवळीने बिंबवले होते. या नव्या भाषाभानामुळे विविधांगी अनुभवविश्वत्या त्या प्रदेशातील भाषेतुन व्यक्त होऊ लागले. त्यामुळे या साहित्याला एक नवे परिमाण प्राप्त झाले. विविध जाती-जमातीचे आणि वर्गातील लेखक हे या चळवळीचे विशेष आहे. ही चळवळ सामाजिक आणि सांस्कृतिक या दोन्ही दृष्टीने साहित्यव्यवहाराकडे पहात होती. त्यामुळे ग्रामवास्तवातील अलक्षित

गोष्टी व अनुभव साहित्याचा विषय बनले. हे साहित्य वास्तववादी, नव्या बदलत्या खेड्यांची स्पंदने आणि आपले अनुभव प्रामाणिकपणे मांडू लागले. या साहित्य चळवळीने मराठी साहित्य संस्कृतीचे केंद्र पुण्या-मुंबई बाहेर नेले. हे या चळवळीचे मोठे यश आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र या चळवळीशी जोडला गेला. छोटी छोटी साहित्य संमेलन, कार्यशाळा, या माध्यमातून नवलेखकांना दिशा मिळाली. यातून पुढे आदिवासी चळवळ उदयास आली. आदिवासीपर्यंत शिक्षण पोहचल्यामुळे त्या समाजातून अनेक लेखक निर्माण झाले, त्यांचे साहित्य प्रारंभी ढोल, हाकारा, तारपा या आदिवासी नियतकालिकातून प्रकाशित होऊ लागले. पुढे या चळवळीतून आदिवासी साहित्य संमेलने सुरु झाली. या सर्व गोष्टींचा संबंध आजच्या मराठी साहित्याशी आहे.

**निष्कर्ष** :

प्रत्येक गावची भाषाच आपल्या जगण्याचा भाग असते तीच आपले जीवन अर्थवाही करीत असते. साठोत्तरी साहित्याने हे भान वाचकांना करून दिले. मराठीची दखल म्हणजे मराठी भाषेची दखल होय. साठोत्तरी साहित्याने ही दखल घेतलेली दिसते. कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, इत्यादी माध्यमातून साठोत्तरी साहित्याने मराठीची दखल घेतलेली दिसते. त्या-त्या समाजाची भाषा त्यांच्या त्यांच्या साहित्यातून येऊ लागल्यामुळे भाषेची विविध मनोहारी रूपे अनुभवता येऊ लागली, व भाषा अधिक अधिक समृद्ध होऊ लागल्या. भाषेचा गोडवा, वेगळेपणा सर्वांना अनुभवता येऊ लागला. या साहित्यातून या भाषा टिकतात, वाढतात समृद्ध होतात. साठोत्तरी साहित्य प्रवाहाने मानवी जीवन समृद्ध केले.

**संदर्भग्रंथ :**


१) साठोत्तरी साहित्य प्रवाह. भाग १- प्रल्हाद लुलेकर

२) साठोत्तरी साहित्यप्रवाह. भाग २- प्रल्हाद लुलेकर

३) श्रीस्थानक – कृष्णा चौधरी (२०००)

४) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह.- डॉ. शरण कुमार लिंबाळे


***

# साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधील स्त्री जीवन

डॉ. राहुल भा. पाटील
मराठी विभागप्रमुख, गोखले एज्युकेशन सोसायटीचे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जव्हार, जि. पालघर

भारतीय समाजात पुरुषप्रधान व्यवस्था आहे. स्त्रियांना समाजातदुय्यम दर्जाचे स्थानआहे. स्त्री ही उच्च जातीतील असो की कनिष्ठ, सुशिक्षित असो की अशिक्षित तिची अवस्था अतिशय वाईट असलेली दिसून येते. समाजामध्ये त्यांचे वेगवेगळया प्रकारे शोषण होताना दिसून येते. त्यांना उपभोग्य वस्तू समजले जाते. त्यांच्याकडे वासनेने, कामभावनेने पाहिले जाते. त्यांना निर्णयस्वातंत्र्य नसते. आर्थिक स्वातंत्र्य नसते. कुटुंब व्यवस्था, सामाजिक रूढी-परंपरा, प्रथा, चालीरिती, पुरुषांचा दृष्टिकोन, सामाजिक संघर्ष यामुळे त्यांच्या दु:खात अधिक भर पडलेली दिसून येते. मराठीतीलग्रामीण कादंबऱ्यांमध्ये स्त्रियांचे जे चित्रण आलेले आहे, त्यांचा अभ्यास केला असता आपल्याला स्त्रियांचे पुढीलप्रमाणे चित्रण झालेले दिसून येते.

**नवऱ्यावर प्रचंड प्रेम, भक्तिभाव, जोडीदाराशी एकनिष्ठ स्त्रिया-**

भारतीय स्त्री ही नवऱ्याला परमेश्वर मानते. आपल्या परंपरेत त्यांच्यावर हे बिंबवले गेलेले असते. नवऱ्यामध्ये ती आपले संपूर्ण अस्तित्त्व विलीन करून टाकते. तसेच काही स्त्रिया लग्न न करता एखाद्या पुरुषाला जोडीदार मानतात. त्यासुद्धा आपल्या जोडीदारावर असेच मनापासून प्रेम करतात. कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याशी एकनिष्ठ राहतात. कारण एकनिष्ठता आणि समर्पणशीलता ही भारतीय स्त्रीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

'धग' कादंबरीतील कौतिक ही पतीला आपले सर्वस्व मानणारी आहे. वास्तविक तिचा पती महादेव हा दैववादी, आळशी, कामचोर, दरिद्री, निरुत्साही असूनही तो आयुष्यभर आपल्यासोबत असावा, असे तिला वाटते. तिचे पतीविषयीचे नितांत प्रेम तिच्या "माहा का नाई त

सगया जीव थ्या बुवात आये” (धग, पृ. १७८) या वाक्यातून पूरेपूर व्यक्त होते. शेवटी तो महारोग झाल्याने मिशनऱ्यांसोबत कायमस्वरूपी निघून जातो. त्यानंतर तिचे वागणे हे अनाकलनीय, काहीसे विक्षिप्त होत जाते आणि ती पूर्ण वेडी होते. एके ठिकाणी ती म्हणते की, “ज्याच्या माथं वाजागाजा, त्याच्या जिवाच्या अशा तुटक्या बाजा झाल्यावर कोनाच्या जिवासाठी कराव् मान्सानं हाय हाय!” (धग, पृ. २१५) आयुष्यात अनेक कष्ट उपसून संकटांवर मात करत जगणारी कौतिक नवऱ्याच्या जाण्याने आयुष्यातून उठते.

'पाचोळा' कादंबरीतील पारबती, 'इंधन' मधील नायकाची वहिनी, 'गांधारी' मधील गंगा, 'टारफुला' मधील आबा कुलकर्ण्यांची पत्नी या स्त्रियाही आपल्या नवऱ्यावर असेच नितांत प्रेम करतात. 'गांधारी'मधील हौसा ही महाराजांशी, तमाशात नर्तिका असलेली गुलाबीबाई लालजीशी लग्न करून त्याच्याशी पूर्णपणे प्रामाणिक व एकनिष्ठ राहते.

**कष्टाळू स्त्रिया-**

'धग' कादंबरीतील कौतिक, सकीना, सकीनाची मुलगी बानू आणि 'पाचोळा' मधील पारबती, 'गांधारी' मधील जयवंता, 'झोंबी'मधील तारा, ताराच्या मुली या कष्टाळू स्त्रिया आहेत. कौतिक आयुष्यभर रात्रंदिवस कष्ट उपसते. दुसऱ्यांच्या शेतात निंदणी, खुरपणी, कापूस वेचणे, धसकटे गोळा करणे इ. अनेक कामे ती करते. शेवटी वेडेपणातही ती दिवसभर लोकांकडे काम मागत फिरते. सकीनाचा नवरा लोहारकाम करतो तर सकीना त्याला कामातही मदत करते व मजुरीसाठी शेतातही जाते. त्यांची मुलगी बानू वडिलांना लोहारकामात मदत करते. पार्वती ही सुद्धा कष्टाळू स्त्री आहे. गगांरामचा संसार तिने मोठया कष्टाने सावरलेला आहे. पोटासाठी ती दररोज दुसऱ्याच्या शेतात रोजंदारीवर जाते.

आनंदयादव यांच्या 'झोंबी' कादंबरीतील नायकाची आई तारा, ताराच्या मुली- आनसा, आकणी, हिरा या ग्रामीणशेतकरी कुटुंबातील अतिशय कष्टाळू स्त्रिया आहेत. ताराचे वयाच्या पहिल्या वर्षी पाळण्यात असतानाच लग्न रतनसोबतलग्न लावून दिलेले असते. त्यानंतर वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षी ती सासरी येते व तेव्हापासूनतिला घरात व

शेतात राबावे लागते. ताराला एकूण १२ मुलं होतात. वयाच्या १८व्या वर्षापासून तर ४०व्या वर्षांपर्यंत तिला १२ वेळेस गरोदरावस्था स्वीकारावी लागते.एवढी बाळंतपणे झाल्यामुळे ती दुबळी झालेली असते. तरी तिला आयुष्यभर एवढे मोठे कुटुंब ओढावे लागते. रोजपंचवीस तीस भाकऱ्याटाकणे,दूध काढणे, दूध घालून येणे, घरातील सगळी कामे आवरून मळयात कामाला जाणे, रोजगाराला आलेल्या बायकांसोबत काम करणे, मोलमजुरी करणे, मुलीच्या लग्नाचे बघणे, शेतीकाम, गोवऱ्या थापून विकणे, माळव विकणे, गोधड्या शिवणे, मुलांचेसंगोपन करणे अशी असंख्य कामे तिला आयुष्यभर करावी लागतात. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचे ती एक प्रातिनिधिक उदाहरण आहे.

ताराची मोठी मुलगी आनसा हिच्यावरसुद्धा लहानपणापासूनच भावंडाची देखभाल, शेतीकाम, घरकामइ. जबाबदाऱ्या पडतात. सासरी गेल्यावर पण तिला कष्टाची सर्व कामे करावी लागतात. तिच स्थिती आकणीची आहे.सुंदरा या मुलीला गुरं चरायलाजावे लागते. थोडक्यात, ग्रामीण भागातील स्त्रियांना घरात, शेतात, नवऱ्याच्या व्यवसायात अशी सर्वत्र दिवसरात्र प्रचंड कामे करावी लागतात.

**स्वाभिमानी, विद्रोही व कणखर स्त्रिया-**

'धग' मधील कौतिक अतिशय स्वभिमानी आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच महादेव "देव दाख्वन तिकडे' निघून जायचे ठरवून कौतिकला 'जाय आपल्या भावापासी' असे सांगतो. तेव्हा ती "बाप्पा, भावापासी राहाले लगन केलं काय?" (धग, पृ. ६) असे स्वाभिमानी बाण्याने उत्तर देते.

'गांधारी' मधील हौसा ही त्या गावातील आध्यात्मिक क्षेत्रातील एका महाराजांच्या वासना चाळवल्याने त्यांच्या सहवासात येते. त्यानंतर मात्र त्यांच्याशी पूर्णपणे प्रामाणिक राहते. त्यांचे नाव जगासमोर येऊन त्यांची बदनामी होऊ नये म्हणून कडोबा नावाच्या तिच्यापेक्षा वयाने कमी असलेल्या तरुणाशी संबंध ठेवते. प्रसंग आल्यावर त्याला संपवते. स्वत:वर खुनाचा आरोप घेते. पोलिसांचा मार खाते. परंतु महाराजांशी प्रामाणिक राहते. शेवटी त्यांच्यासोबत कायमची गावातून निघून जाते.

'झोंबी' कादंबरीतील ताराला सुरुवातीला खूप त्रास सहन करावा लागतो. पण ती हळूहळू कणखर होत जाते. आपल्यादोन

मुलींच्या लग्नाचा निर्णय ती स्वतः घेते. हिरा नावाच्या मुलीच्या भांडखोर नणंदेला ठणकावून सांगते व मुलीला नांदण्यास पाठवते. नवऱ्याचा आनंदाच्या शिक्षणाला विरोध असताना त्याचे शिक्षण व्हावे म्हणून प्रयत्न करते. त्यसाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्तींकडे जाऊन त्यांना नवऱ्याला समजवायला सांगते. मुलाचे परीक्षा शुल्क व फॉर्म भरण्यासाठीत्याच्या गुरुजींना विनंती करते. त्या बदल्यात त्यांना दूध पुरविण्याचे मान्य करते. या सर्वांतून तिचे धाडस, कणखरपणा दिसून येतो.

**स्त्रिया- उपभोग्य वस्तू / लैंगिक शोषण-**

भारतीय समाजामध्ये स्त्रीकडे कौटुंबिक व सामाजिक पातळीवर अबला व त्यामुळे उपभोग्य वस्तू म्हणूनच बघितले गेलेले आहे. कुटुंबामध्ये, समाजामध्ये अनेकदा तिचे शारीरिक व मानसिक तसेच लैंगिक शोषण होत असल्याचे दिसून येते. त्यांच्याकडे वासनेने, कामभावनेने बघितले जाते.

'धग'मधील कौतिकला कासम व सकीना या दांपत्याने आश्रय दिलेला असूनही त्यांच्या मुलीवर-बानोवर कौतिकचा मुलगा भीमा अतिप्रसंग करतो. त्याआधी अनेक दिवसांपासून त्याची बानोवर नजर होती. तो तिचे संपूर्ण शरीर न्याहाळायचा. गावातील समवयस्क मुलांना गोळा करून तिच्यावर शेरेबाजी करायचा.

'टारफुला' कादंबरीत गावातील अस्थिरतेच्या काळात धुरपा म्हारणीच्या वयात आलेल्या (पदुर आल्याली) मुलीला गुंडं पळवून नेतात.

हमीद दलवाई यांच्या 'इंधन' या कादंबरीत स्त्रियांच्या लैंगिक शोषणाकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. या कादंबरीतील सुदाम न्हाव्याची सून तारुण्यात विधवा होते. त्यानंतर जवळपास पंधरा वर्षे तिच्यावर खुद्द तिचा सासरा बलात्कार करत राहतो. शेवटी ती विहिरीत जीव देऊन आत्महत्या करते. याच कादंबरीतील नायकाचा भाऊ इसाक त्याची विद्यार्थिनी असलेल्या सुमतीला ती पंधरा-सोळा वर्षाची असतानाच नादी लावतो. त्यानंतर तो तिच्याशी अनेक वर्षे सातत्याने शारीरिक सबंध ठेवतो. तिला त्याची सवय लागते. त्यापुढे ती दीन बनते. तो तिच्या असहायतेचा गैरफायदा घेत राहतो व तिचे लैंगिकशोषण करत राहतो.

'गांधारी' कादंबरीमध्ये गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजनासाठी एक परिचारिका आलेली असते. गावातली काही

तरुण चांडाळ चौकडी तिच्या मागे लागते. रात्री-बेरात्री मुद्दाम तिच्याकडे जाऊन तेगर्भनिरोधकाच्या गोळया मागतात. ती तालुक्याला किंवा ऑफिसला गेल्यास तिच्या मागे जातात. गर्दी करतात. शेवटी ती या सर्व गोष्टींना कंटाळून गाव सोडून चालली जाते. गावात तिची बदनामी केली जाते. ती गरोदर राहिली होती, अशी अफवा उठवली जाते.

'झोंबी' कादंबरीतरतनू बहीण कंबळाचा नवरा तुरुंगात गेल्यावर ती माहेरी भावाकडे येते. काही दिवसांनी ती माहेरीच स्वतंत्र राहू लागते. तेव्हा तिच्याकडे गावातील काही माणसे ये-जा करतात. त्या गावात काही जोगतीणी आहेत. त्यांना गावातील लोकं उपभोग्य वस्तूच समजतात. रतनूचे अशाच एका जोगतीणीशी संबंध आहेत. त्याचे एका माळयाच्या वांझोट्या बायकोशीही संबंध आहेत. पण त्याची बायको काहीच करू शकत नाही. याव्यतिरिक्त गावात एक यल्लू जोगतीण व एक नायकीण आहे. यल्लूला आप्पा डॉक्टरने एक घर बांधून दिलेले आहे. तर एका सावकाराने नायकिणीला घरात आणून स्वत:च्या बायको व मुलांना हाकलूनदिलेले आहे.रतनूच्या कुटुंबाचा थोडा इतिहास आलेला आहे. त्यात गावच्या पाटलाने त्यांच्या घराण्याच्या मूळ पुरुषाच्या विधवा बहिणीला स्वतःच्या जाळयातओढण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तिच्या भावाने त्यामुळे त्या पाटलाचा खून करून टाकला होता.

**स्त्रियांना गौण / दुय्यमस्थान -**

भारतात पुरुष प्रधान समाजव्यवस्था असल्यामुळे कुटुंबात तसेच समाजामध्ये स्त्रियांना गौण, दुय्यम स्थान आहे. नवरा जरी चुकत असला तरी स्त्रीला काहीच करता येत नाही. मुलापुढेसुद्धा तिचे काहीच चालत नसते. 'पाचोळा' मध्ये गगांराम व भाना या नवरा व मुलगा यांच्यामध्ये पारबतीची अवस्था पाचोळयासारखीच झालेली आहे. एका भारतीय स्त्रीचा सोशिकपणा व तिचे दुय्यम स्थान या कादंबरीतून पहावयास मिळते.

'इंधन' कादंबरीतील नायकाच्या वहिनीला आपल्या पतीचे आणि सुमतीचे अनेक वर्षांपासून अनैतिक सबंध असल्याचे माहीत असूनही ती काहीच करू शकत नाही. तो तिच्याशी व्यवस्थित बोलत नाही. तिचा मानसिक छळ होत असूनही ती सोशिकतेने निमूटपणे आयुष्य जगत राहते.

'झोंबी' मध्ये ताराचे लग्न हे वयाच्या पहिल्या वर्षीच करून टाकले जाते. वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षीच म्हणजे खेळण्याच्या वयात तिचा संसार सुरु होतो. तिला व तिच्यासारख्या मुलींना कोणतेच निर्णयस्वातंत्र्य नाही. तिच्या मुलींचे लग्नही अतिशय कमी वयात होतात. मुलगा व मुलगी यांच्या वयात आठ, दहा, पंधरा असे कितीही वर्षांचे अंतर असायचे. ताराला लागोपाठदोनमुलीच होतात. तेव्हा तिचा छळ सुरु होतो. तिची सासू तिला माझ्या एकुलता एकरत्नासारख्या जपलेल्या मुलाचा वंश आता बुडणार,आता माझ्या लेकाच्या पोटाला पोरींचेच लेंढार लागणार, अशा आशयाचे म्हणते. तिच्या दिसण्याबद्दल वाईट बोलते. तिलामुलीच होत आहेत, या धक्क्यानेच तिचे सासू-सासरे मरून जातात. मुलींच्या जन्माला काहीच किंमत नसलेली दिसून येते. तिसरा मुलगा झाल्यावर मात्र सर्वांना खूप आनंद होतो व त्याचे नाव 'आनंदा' ठेवले जाते. ताराची चंद्रा नावाच्या मुलीकडे दुर्लक्ष झाल्याने ती कुपोषित राहून वयाच्यादीड-दोन वर्षांच्या आतच मरते. उपाशीपोटी ती माती खायची.मुलगी झाल्यावर बायकांनाच दोषी मानले जाते व मुलगा व्हावा म्हणून त्यांना त्रास दिला जातो.

ताराला सुरुवातीला घरात कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. घरी आलेल्या बापाला ती वाढू शकत नाही. आई-वडिलांच्या निधनानंतर तिला भावांना खायला भाकरी देण्याचीही परवानगी नव्हती. ती देते, असे माहिती पडल्यास तिचा नवरा तिला मारत असे.तिच्या नवऱ्याला दोन मैत्रिणी आहेत. म्हणजे त्यांच्याशी त्याचे संबंध आहेत, हे माहिती असूनही ती काहीच करू शकत नाही.

**सामाजिक, धार्मिक संघर्षामध्ये स्त्रिया लक्ष्य-**

कौटुंबिक पातळीवर जसे स्त्रियांचे शोषण चालू असते. तसेच सामाजिक पातळीवरही होत असते. दोन वर्ग, जाती किंवा धर्मातील लोकांच्या संघर्षामध्ये स्त्रियांनाच लक्ष्य केले जात असते. "लहानमोठ्या कारणावरून धार्मिक दंगे होतात आणि त्यात पहिला घाला स्त्रियांच्या अब्रूवर घातला जातो" (मराठी कादंबरी, पृ. १३८), हे रवींद्र ठाकूर यांचे विधान या ठिकाणी महत्त्वाचे आहे. 'इंधन' कादंबरीत नवबौद्ध, कुणबी आणि पूर्वीचे खोत असलेले मुसलमान यांच्यातील संघर्षाचे चित्रण आलेले आहे. मुसलमानांचा इसाक हा बौद्ध स्त्री लक्ष्मीला आपल्या घरात ठेवून घेतो. बौद्धांचे तिला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू असतात. तेव्हा बौद्ध मुसलमानांना "आम्हीही तेच करू. तुमच्या

मुली आमच्या घरी आणून ठेवू!" (इंधन, पृ. ८४) असा इशारा देतात. बौद्ध व मुस्लिमांतील हा संघर्ष तीव्र होतो आणि त्याचे पर्यावसान बौद्ध, कुळवाडी, मराठे विरूद्ध मुस्लीम अशा दंग्यात होते. तेव्हा मुस्लीम लोकं हिंदू व बौद्धांच्या अनेक स्त्रियांची त्यांच्या पुरुषांसमोर अब्रू लुटतात. दंग्यात चुकून नायकाच्या वहिनीची ती मुस्लीम असूनही मुसलमानांकडूनच अब्रू लुटली जाते.

'गांधारी' मध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाड्यावर निजामाची सत्ता असताना अनेक हिंदू स्त्रियांची अब्रू लुटली गेली आहे. परभणीजवळच्या तीन खेड्यांवर हल्ला करून "हिंदूंच्या तरण्याबांड बायांना पळवून नेलं... त्यांना नागडं करून बाटवलं... अजिंठ्याच्या अहमद घाउसन नवा आखाडा टाकला .... गावोगावची पैशांची लूट, बायकांची लूट त्यात डांबून ठेवू लागला." (गांधारी, पृ. २, ३) अशा बातम्या गांधारीतल्या लोकांच्या कानावर येतात. तसेच जयसिंह पहेलवानला रझाकांनी ठार केल्यानंतर एक जण दुसऱ्याला, "इस हिजडेका घर ढूँढ निकालो. इसकी रंडी जरूर घरमें है. उसे पकडकर अजंठा ले जाव, और अहमद घाऊससाहब के जनानखानेमे पेश कर दो" (गांधारी, पृ. ५) असा आदेश देतो. यातून स्त्रिया या पुरुषांच्या पाशवी वासनेला, त्यांच्या प्रतिस्पर्धी समुहावर वर्चस्व गाजविण्याच्या महत्वाकांक्षेला बळी पडतात, हेच दिसून येते. याच कादंबरीत पुढे लोकशाही आल्यावरही भागवतवर मात करण्यासाठी जगदेव व त्याची माणसे भागवत व जयवंताची गावात बदनामी करतात व जयवंताचा खून करतात.

**कौटुंबिक छळ, मारहाण –**

'गांधारी' कादंबरीतील संभुच्या एकुलत्या मुलीचे लग्न झाल्यानंतर वर्षभरातच तिचा छळ सुरू होतो. तिचा नवरा छंदी-फंदी असतो. कमवत काहीच नाही. उलट तिला मारठोक करतो. उपाशी ठेवू लागतो. शेवटी तिला मारता मारता मारून टाकतो. याच कादंबरीतील जयवंताचाही सासरी तिच्या नवऱ्याकडून छळ होतो. तिचा नवरा नपुंसक असतो. आपल्याला मूल व्हावे व आपण नपुंसक आहोत हे गावातील लोकांच्या लक्षात येऊ नये, यासाठी तो एके रात्री घरात परक्या पुरुषाला आणतो आणि जयवंताला त्याच्याशी शारीरिक सबंध

करायला सांगतो. ती ऐकत नाही तेव्हा तिला बळजबरीने विवस्त्र करतो. ती आरोळया मारू लागते. त्यामुळे तो पुरुष तसाच निघून जातो. बायकोने आपले म्हणणे ऐकले नाही हे पाहून त्याला प्रचंड चीड, संताप येतो. तो दरवाजा बंद करून जळजळीत चटके तिच्या मांड्यावर, जाघांवर देतो. त्याचप्रमाणे भागवतच्या बायकोचा-गंगाचा सासूकडून प्रचंड छळ होत राहतो. मात्र भागवतही काही करू शकत नाही. तो उलट बायकोची समजूत काढतो व सहन करायला सांगतो. 'पाचोळा'मधील गंगाराम हादेखील पारबतीचा असाच छळ करतो.

'झोंबी' कादंबरीत तारा व तिच्या मुली आनसा, आकणी, हिरा यांच्या वाट्याला अनेकदा प्रचंड कौटुंबिक छळ व मारहाण आलेली आहे. ताराचा बालवयात संसार सुरू झालेला होता. तेव्हा नवऱ्याचा व सासूचा त्रास असह्य झाल्याने ती माहेरी पळून येत असे. तेव्हा तिचा नवरा तिला तेथून मारत मारत सासरी आणत असे. सकाळी न्याहारीला उशीर झाला तर तिचा परकर ओला होईपर्यंत, ती रक्तबंबाळ होईपर्यंत चाबकाने तिला तो मारत असे. उसाच्या मळयात कोल्हे व रानडुक्करं असल्याने काम करायला जायला तिला भीती वाटत असे. तर तेव्हाही तो तिला चाबकाने मारत असे. एकदा तर ती बाळंतीण झालेली असताना खाटेवर असतानाच तो तिला बेदम मारतो. नेहमीचा कौटुंबिक छळ व मारहाण यांना कंटाळून ती दोन-तीनदा आत्महत्येचा प्रयत्न करते. आठ मुलांची आई झाल्यावरही तिचे मार खाणे टळत नसल्याचे वर्णन लेखकाने केलेले आहे.तिच्यानवऱ्याप्रमाणे तिची नणंद कंबळा हीदेखीलमाहेरी राहायला आल्यावर ताराच्या हाती असलेला घराचा कारभार हातात घेऊन तिला त्रास देत राहते. ताराविरुद्ध रतनूचे कान भरून तिला मारहाण करायला लावते.

ताराच्या मुलींच्या वाट्यालाही सासरी छळ, मारहाण, आत्महत्येचा प्रयत्न जवळपास असेच जगणे येते.हिराची नणंद समा ही तर स्वतःच हिराचा छळ करते. तिला मारहाण करते.सासरी सून, बायको किंवा भावजईकडून दिवसरात्रत्यांच्या शारीरिक क्षमतेपेक्षा अधिक काम करून घेणे, त्यांना उपाशी ठेवणे, शिळया भाकरी खायला देणे, मारहाण करणे, अपशब्द-शिव्या वापरणे, अपमान-अवहेलना करणे अशी वागणूक सासुरवाशीण मुली-स्त्रियांना दिली जात असलेली या कादंबरीतील वर्णनावरून दिसून येते.

ग्रामीण जीवनात फक्त सासरीच मुलींचा छळ व्हायचा असे नाही. तर माहेरीसुद्धा त्यांना अमानुषपणे वागणूक दिली जायची, असे

दिसून येते. 'झोंबी'तील रतनूची मुलगी आकणी ही सासरच्या छळाला कंटाळून माहेरी पळून यायची. तेव्हा तो तिला जबरदस्तीने सासरी पाठवायचा. तिने जायला नकार दिला तर तो तिला मारायचा व अनेकदा चटकेही द्यायचा. एकदा तर तो तिला म्हणजे स्वतःच्या पोटच्या मुलीला मोटेच्या दोराला बांधतो व विहिरीतबुडवतो. असे करून तो तिला सासरी नांदायला जाण्यासाठी कबूल करून घेतो. म्हणजे सासरीही छळ, मारहाण व माहेरीही तसेच अशा कात्रीत स्त्रियांचे जगणे अडकलेले होते, असे आढळून येते.

'हाल्या हाल्या दुधू दे' ही बाबाराव मुसळे यांची कादंबरी आहे. या कादंबरीत सोबा हि स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती एका गरीब शेतकऱ्याची मुलगी आहे. लग्नानंतर तिचाही तिच्या सासऱ्याकडून छळ होतो.तो तिला जाळण्याचा प्रयत्न करतो. ती त्यातून जेमतेम वाचते. तेव्हा तो तिच्या चारित्र्याचे कारण सांगून तिला तिच्या माहेरी पाठवून देतो. तिच्या सासऱ्याने तिच्या दोन सुनांना असेच जाळून मारून टाकलेले असते.

**निष्कर्ष-**

वरील विवेचनावरून ग्रामीण भागात स्त्रियांची स्थिती कशी आहे ते दिसून येते. यावरून काही निरीक्षणे नोंदवता येतात. ती पुढील प्रमाणे-

१) प्रस्तुत कालखंडातील कादंबऱ्यांमध्ये चित्रित बहुतांश स्त्रियाया आपल्या पतींवर नितांत प्रेम, भक्तिभाव असणाऱ्या, दारिद्र्यात ही त्यांची सोबत करणाऱ्या आहेत.

२) या कादंबऱ्यांमध्ये चित्रित अनेक स्त्रिया या कष्टाळू आहेत. नवऱ्याच्या कामात, त्याच्या व्यवसायात त्या आपला वाटा उचलताना दिसतात. उदा- 'धग' मधील कौतिक, 'पाचोळा" मधील पारबती, 'गांधारी' मधील जयवंता, 'झोंबी' मधील तारा व तिच्या मुली.

३) समाजात स्त्रियांना उपभोग्य वस्तू समजले जाते. कौटुंबिक व सामाजिक पातळीवर स्त्रियांचे लैंगिक शोषण होताना दिसून येते.

४) ग्रामीण भागात अनेक पुरुषांचे गावातील काही स्त्रियांशी अनैतिक संबंध असतात. परंतुत्यांच्या बायकांना ते सहन करावे लागते. या बाबतीत त्या काहीही करू शकत नाहीत. यातून त्यांचे मानसिक शोषण होताना दिसून येते.

५) भारतीय समाजात स्त्रियांना हीन, शूद्र आणि दुय्यम मानले जाते. यामुळेच मुलाच्या जन्माचे स्वागत तर मुलीच्या जन्माविषयी शोक व्यक्त केला जातो.

६) स्त्रियांसाठी त्यांची इज्जत, अब्रू फार महत्त्वाची असते आणि सामाजिक किंवा धार्मिक स्वरूपाच्या संघर्षात विरूद्ध पक्षाला पूर्ण बेजार करण्यासाठी बरोबर त्यावरच आघात केला जातो.

७) सासरी व क्वचित माहेरीही स्त्रियांना शिव्या देणे, मार देणे, उपाशी ठेवणे अशा प्रकारचा अमानवीय छळ ग्रामीण भागातील जवळपास सर्वच स्त्रियांचा होताना दिसून येतो. तिचे मन, भावना, इच्छा-आकांक्षा, तिच्या गरजा, एक व्यक्ती म्हणून असलेले तिचे अस्तित्त्व यांचा विचार केला जात नाही.

**संदर्भग्रंथ-**


१) ठाकूर, रवींद्र, मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २००१.

२) पाटील, शंकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पु. मु. डिसे. २००९.

३) बोराडे, रा. रं., पाचोळा, मौज प्रकाशन गृह, मुबई, आठवी आवृत्ती, २००७.

४) महानोर, ना. धों., गांधारी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पु. मु. २००७.

५) मुसळे, बाबाराव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५.

६) यादव, आनंद, 'झोंबी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९८७.

७) शेळके, उद्धव ज., धग, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सातवे पु. मु. २०००.


***

# साठोत्तरी साहित्यातील महिलांचे योगदान: दुर्गा भागवत यांच्या 'सिद्धार्थ जातक' या साहित्यकृतीचा अभ्यास

**डॉ. राहुल सदाशिव खरात**

**सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, मु.सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. – पुणे पिन- ४१२३०६.**

**प्रस्तावना:**

दुर्गा भागवत अर्थातच दुर्गा नारायण भागवत या मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा मानबिंदू असून मराठी भाषेतील लोक साहित्य, बौद्ध साहित्य, बालसाहित्य, चरित्र लेखन, ललित लेखन व संशोधनात्मक, समीक्षात्मक आणि वैचारिक लेखन अश्या बहुरंगी आणि बहुढंगी विषयावर लेखन करणाऱ्या बहुआयामी लेखिका आणि विचारवंत अशी त्यांची आपल्याला ओळख आहे. मराठी भाषेबरोबरच त्यांना हिंदी, इंग्रजी, संस्कृत, पाली, फ्रेंच, जर्मन या भाषा फक्त अवगतच होत्या असे नाही तर या सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे त्यांनी मराठीबरोबरच संस्कृत आणि इंग्रजी भाषेमध्ये विपुल लेखन केलेले आहे. त्यांनी लेखन केलेल्या साहित्यामध्ये इतर अवगत भाषांमधून मराठीमध्ये अनुवादित केलेल्या साहित्याचा मोठा वाटा आहे. आपल्या लेखनातून त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि चिकित्सक पद्धतीने आपले विचार विविध साहित्य कृतीतून आपल्यासमोर मांडलेले आहेत.

त्यांचे व्यक्तिमत्व फक्त लेखन या विषयाशी संबंधित नसून हस्तकलांमध्येही त्यांनी सखोल संशोधन केलेले आहे. विविध राज्यातील हस्तकला त्यामध्ये विशेषत: कपड्यांवरील विणकाम हा त्यांचा अभ्यास विषय राहिला असून महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि काश्मिरी हस्तकलांवर त्यांनी सखोल संशोधन केले

असून त्यामधील वैशिष्ट्ये, वेगळेपण आणि त्यांचा उगम यावर त्यांनी विस्तृत लेखन केले आहे. त्यांनी विविध प्रांतातील कपड्यांवर केले जाणारे नक्षीकाम किंवा विणकाम यावर संशोधनपर लेख लिहिला असून तो जर्मनीतील अत्यंत मानांकित अशा **"Review"** या जर्नल मध्ये तो प्रसिद्ध झाला आहे. कृषी आणि कृषी संस्कृती यावरही त्यांचा सखोल अभ्यास असून त्यासाठी त्यांनी स्वतः शेती कसलेली आहे. त्या आधारे शेती आणि शेतकऱ्यांचे कष्ट आणि दुःख यावर त्यांनी सखोल असे विवेचन केलेले आहे. आदिवासी संस्कृती आणि आदिवासी मूळ प्रवाहापासून कसे वेगळे झाले, त्यासाठी कारणीभूत असलेले विविध घटक आणि भारतातील परकीय सत्ता तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारी अनास्था यामुळे आदिवासींचे प्रश्न कायम असल्याचे निष्कर्ष त्यांनी अभ्यासाअंती काढलेले आहेत. स्त्रियांची दुःखे, त्याला असलेले कारणीभूत घटक आणि त्याचे परिणाम यावरही त्यांची स्वतःची अत्यंत परखड मते असून त्यासाठी स्वतः स्त्रियाही काही प्रमाणात जबाबदार असतात असे ते त्या ठामपणे नमूद करतात. त्यामुळेच त्यांना खाष्ट विदुशी असेही बोलले जाते.

हे सर्व कमी म्हणून की काय त्या पाककलेत अत्यंत पारंगत होत्या. त्यामुळे त्यांनी पाककलेतील विविध प्रकार अनुभवलेले असून स्वयंपाक आणि संस्कृती यांचा असलेला सहसंबंध अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला आहे. आदिवासी संस्कृतीचा अभ्यास करत असताना बिनभांड्यांचा स्वयंपाक हा त्यांचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय राहिला आहे. तसेच गरिबी आणि दारिद्र्य यातून बिनभांड्यांचा स्वयंपाक ही पद्धती अस्तित्वात आल्याचे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे.

असा भारतीय समाजाचा सामाजिक-सांस्कृतिक पट संशोधनाअंती मांडत असतानाच त्यांनी वंचित घटकातील स्त्रियांसाठी ही उल्लेखनीय काम केलेले आहे. १९५९ साली त्या तमाशा परिषदेच्या अध्यक्ष असताना त्यांनी समाजातील महिलांचे प्रश्न अत्यंत हिरिरीने मांडले आणि त्यांच्या सुखदुःखात जमेल तितकी साथ दिली. तसेच वेश्या व्यवसायातील महिलांशीही जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित करून त्यांच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडल्याचे दिसून येते. प्रसंगी राजकारण्यांना खडे बोल सुनावण्याची ताकद असलेल्या दुर्गाबाईंनी कराड येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करत असताना यशवंतरावांसारख्या राजकीय नेत्याला सामाजिक

जाणीवांची आठवण करून देण्यात कसलीही भीती बाळगली नव्हती. यावरूनच त्यांचे व्यक्तिमत्व आपल्याला सहज लक्षात येते.

मराठी भाषिक लेखिका म्हणून त्यांची महाराष्ट्राला आणि देशाला ओळख असली तर भारतीय प्रादेशिक भाषांसह इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन भाषा त्यांना अवगत असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची प्रख्यात अनुवादक लेखिका अशीच ओळख आहे. दुर्गा भागवत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९१० रोजी मध्यप्रदेशातील इंदूर येथे झाला होता. त्यांचे मूळ गाव सध्याच्या सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे असले तरी कौटुंबिक कारणामुळे त्यांच्या आईसह दुर्गाबाई लहान असतानाच पंढरपूर सोडून मुंबई येथे स्थायिक झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या शालेय शिक्षणाची सुरुवात मुंबई येथे झाली. मुंबईतील खुल्या वातावरणात अगोदरच शिक्षणाची आवड असलेल्या दुर्गाबाईंना शिक्षणासाठी आणि विचार करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. मुंबईमध्ये राहत असल्या तरी आईचे राहण्याचे ठिकाण स्थिर नसल्याने त्यांना सतत आईबरोबर स्थलांतरित व्हावे लागत होते. त्यामुळे मॅट्रिक पूर्ण होईपर्यंत त्यांचे शालेय शिक्षण मुंबईसह अहमदनगर, नाशिक, धारवाड आणि पुणे येथे झाल्याने त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि मानवीय दृष्टिकोन वैश्विक आणि विस्तारित होण्यास मदतच झाल्याचे दिसून येते.

मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर १९२७ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. १९३२ मध्ये त्या **'संस्कृत'** व **'इंग्रजी'** हे दोन भाषा विषय घेऊन कला शाखेची पदवी उत्तीर्ण झाल्या. याच काळात स्वातंत्र्य चळवळीने जोर धरल्यामुळे त्यांनी थोडे दिवस आपले शिक्षण बाजूला ठेवून १९२९ ते १९३३ या कालावधीत महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी १९३५ मध्ये कला शाखेतील पदवीधर पदवी मिळवली त्यासाठी त्यांनी निवडलेला विषय होता, **'भारतीय संस्कृतीचा इतिहास'** तर त्यासाठी त्यांनी जो प्रबंध सादर केला त्या प्रबंधाचे नाव होते **"अर्ली बुद्धिष्ट ज्युरीसप्रुडन्स"** म्हणजेच **"प्रारंभिक बौद्ध काळातील न्यायशास्त्र"!**

महाविद्यालयीन जीवनातच अश्या वैचारिक परिपूर्णतेकडे वाटचाल करत असताना त्यांच्यावर महात्मा गांधी, टॉलस्टॉय, हेन्री

डेव्हिड थोरो, रॉबर्ट, मिल आणि बाऊनिंग यासारख्या विचारवंतांचे विचार आणि वाचन सतत सोबतीला होते. त्यांचे स्वतःचे वडिलच शास्त्रज्ञ असल्याने त्यांच्यामनामध्ये घरातून आपोआप वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला गेला. त्यातूनच त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेत वैचारिक आणि वास्तववादी श्रेणीतील विपुल लेखन केले.

महाविद्यालयीन जीवनात बहुभाषिक आणि बहुआयामी अभ्यास केल्याने मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत आणि विशेषत: पाली भाषेवर मजबूत पकड निर्माण झाली. साहजिकच संस्कृत आणि पाली या भाषा अवगत असल्याने दोन्ही भाषांमधून संस्कृती, विचार, समाजकारण, अर्थकारण, राजकारण आणि व्यवस्था यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली त्यातूनच त्यांच्यातील चिकित्सक वृत्ती विकसित झाली. पदव्युत्तर पदवीसाठी प्रबंध सादरीकरणासाठी गौतम बुद्धांच्या संबंधित विषयाची निवड केल्याने बौद्ध साहित्य त्यांच्या वाचनात आले. घरातच थोरो यांची पुस्तके असल्याने थेरीगाथा त्यांच्या वाचनात आली. त्यातून त्याविषयी त्यांना आवड निर्माण झाली. बौद्ध काळातील शासन-प्रशासन व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि समाजव्यवस्था याबद्दल त्यांना आकर्षण निर्माण झाले. बौद्ध काळातील सुशासनाची व्यवस्था, कायदे आणि शास्त्र बौद्ध काळानंतर आलेल्या सत्तांनी त्यामध्ये केलेला हस्तक्षेप तसेच कशाप्रकारे ती व्यवस्था संदर्भहीन आणि कालबाह्य बनवून टाकली यावरही त्यांनी विशेष भर दिला. बुद्धकाळातील शासन-प्रशासन आणि साहित्यामध्ये पाली ही भाषा प्राधान्याने वापरली जात होती. पाली भाषेवर विशेष प्रभुत्व असल्याने दुर्गाबाईसारख्या विदुशीला बुद्ध काळातील समाज, शासन-प्रशासन व्यवस्थेचा व साहित्याचा अभ्यास करणे सहज सोपे गेले. कठोर परिश्रम आणि सखोल अभ्यास करून त्यातील अनेक महत्त्वाच्या बाबी सप्रमाण समोर मांडण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यांचा हा सर्वांगीण अभ्यास पुढे त्यांच्या प्रत्येक साहित्य कृतीतून त्यांनी आपल्यासमोर मांडला आणि व्यवस्थेला तो स्वीकारावाही लागला इतकी त्यात अचूकता आणि सत्यता होती. यातील बरेचसे साहित्य अनुवादित असून ते मूळचे पाली, संस्कृत, हिंदी, गुजराती, काश्मिरी, तामिळी, पंजाबी आणि इंग्रजी भाषेतून मराठी भाषेत त्यांनी अनुवादित केलेले आहे.

या अनुवादित साहित्यामध्ये प्रामुख्याने उत्तर प्रदेशच्या लोककथा, कश्मीरच्या लोककथा, गुजरातच्या लोककथा, डांगच्या लोककथा, तमीळच्या लोककथा, दख्खनच्या लोककथा, पंजाबी लोककथा, पाली प्रेमकथा, बंगालच्या लोककथा, बुंदेलखंडच्या लोककथा, मध्यप्रदेशच्या लोककथा, लिचकुर कथा, संथाळ कथा, साष्टीच्या कथा आणि सिद्धार्थ जातक या कथांचा समावेश आहे. त्याचबरोबर **'अँन आऊट लाईन ऑफ इंडियन फोकलोअर'** या माहितीपर इंग्रजी पुस्तकाबरोबरच **'दि रिडल्स ऑफ इंडियन लाईफ, लोअर अँड लिटरेचर'** या वैचारिक इंग्रजी ग्रंथाचाही त्यात समावेश आहे. दुर्गाबाईंचा जन्म १९१० साली झाला असला तरी त्यांनी सुरुवातीला केलेले बहुतांश लेखन हे इंग्रजी भाषेत आहे. १९६० नंतर खऱ्या अर्थाने त्यांनी मराठी साहित्य लेखनाला सुरुवात केल्याचे दिसून येते. त्यानंतर शेवटच्या श्वासापर्यंत म्हणजेच २००२ पर्यंत दुर्गाबाईनीं मराठी भाषेतील वैचारिक मांडणी करणारे विपुल साहित्य आपल्यासाठी उपलब्ध करून दिले.

**सिध्दार्थ जातकच्या दिशेने:**

बालवयात शिकलेल्या बहुतांश गोष्टी माणसाला विचार करायला शिकवतात आणि ते विचार आयुष्यभर त्याची सोबत करतात हे लक्षात घेऊन त्यांनी बाल साहित्य आणि कथा या साहित्य प्रकारात विपुल लेखन केल्याचे दिसून येते. यातीलच बालसाहित्य आणि वैचारिक साहित्य या दोन्हीं बाबींशी संबंध जोडणारी साहित्य कृती म्हणून त्यांच्या **'सिद्धार्थ जातक'** कडे पाहता येते.

बाल साहित्यात विशेष रुची असल्यामुळे म्हणा किंवा बालवयातच मनाला आणि बुद्धीला वेगळा विचार करण्याची सवय लावल्यास भविष्यातील प्रगल्भ माणूस निर्माण होतो. यावर असलेल्या दृढ विश्वासामुळेच दुर्गाबाईंनी बाल साहित्य लेखनावर विशेष भर दिला. अनेक भाषांवर असलेल्या प्रभुत्वामुळे बालसाहित्यातील विविध भाषेतील उपलब्ध साहित्य त्यांच्या वाचनात आले. यामध्ये मराठीतील पंचतंत्रांच्या कथा, हिंदी भाषेतील कथा, रशियन भाषेतील कथा, चिनी कथा, जपानी कथा आणि अरेबियन नाईट्स मधील कथा त्यांच्या वाचनात आल्या. या कथा साहित्याच्या वाचनानंतर एक महत्त्वाची

बाब त्यांच्या लक्षात आली ती म्हणजे या सर्व कथांची भाषा, भाषाशैली आणि कथेमधील विविध पात्रे वेगवेगळया नावांची आणि स्वरूपाची असली तरी या सर्व कथांचे सार आणि त्यापासून मिळणारा बोध किंवा तात्पर्य एकसारखेच आहे किंवा त्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात साधर्म्य आहे. या सर्व कथांच्या बाबतीत त्यांना सापडलेला समान दुवा म्हणजे या सर्व कथा पाली भाषेतील म्हणजेच बौद्धकाळातील कथांमधील तात्पर्यांशी किंवा त्यातून मिळणाऱ्या बोधाशी साधर्म्य साधणाऱ्या आहेत. याचाच अर्थ या कथांपैकी कुठल्यातरी एका भाषेतील किंवा काळातील कथा हे या सर्व भाषातील कथांचे मूळ असले पाहिजे, ही बाब त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी या सर्व कथांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला. हे मूळ शोधत असताना त्यांच्या असे लक्षात आले की, या सर्व कथांमधील सर्वात पुरातन किंवा जुन्या असलेल्या कथा म्हणजेच बौद्ध कथा होत. ज्यामध्ये गौतम बुद्ध यांना केंद्रस्थानी ठेवून या कथा तत्कालीन साहित्यिकांनी आकारास आणलेल्या आहेत. या सर्वांच्या शेवटी त्या या अनुमानापाशी येऊन पोहोचल्या की, सर्व भाषेतील बोधकथा किंवा तात्पर्य कथा या बौद्ध कथांच्या अनुवादित कथा आहेत आणि म्हणूनच त्यांनी या सर्व कथा **"बौद्धकथा"** स्वरूपात पुढे आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले आणि त्यानंतरच त्यांनी या सर्व कथा लिहून त्यांचे सात खंडांमध्ये वर्गीकरण केले. पुढे ते खंड कथासंग्रहाच्या रूपात **"सिद्धार्थ जातक"** म्हणून वाचकांसमोर आले. **'वरदा प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड'** या पुणेस्थित प्रकाशन संस्थेने सात खंडांमध्ये वर्गीकरण केलेला हा कथासंग्रह १९७५ साली प्रकाशित केला असून या कथासंग्रह मध्ये एकत्रितपणे ५५० इतक्या कथा आहेत. या कथा लिहीत असताना दुर्गा भागवत यांनी खालील गृहीतके वापरली आहेत

१) सिद्धार्थ जातक मधील सर्व कथा या ख्रिस्त पूर्व ३०० वर्षांपूर्वीच्या असाव्यात. तर इतर भाषांमधील बोधकथा किंवा तात्पर्य कथा या यानंतरच्या कालावधीत लिहिल्या गेलेल्या असाव्यात.

२) सिद्धार्थ जातक मधील कथा या मूळच्या पाली भाषेतील असून बौद्ध वाङ्मयामध्ये त्या सापडतात.

३) बौद्धदर्शन वाङ्मयातील तिपीटकामध्ये सुत्तपिटक, विनय पिटक व अभिमधम्मपिटक अशी तीन पीटके असून सुक्तपीटकांमध्ये एकूण पाच ग्रंथ आहेत. यातील पाचव्या पिटकांमध्ये म्हणजेच

**'खुद्दकनिकाय'** या पिटकांमध्ये एकूण १५ ग्रंथ असून त्यामध्ये विविध विभागामध्ये या जातक कथांचा समावेश आहे.

४) आज आपल्यासमोर असलेल्या जातक कथा जरी इसवी सनाच्या पाचव्या शतकात पूर्ण झाल्या असल्या तरी त्यांचे मूळचे स्वरूप फार जुने आहे.

५) सुत्त पिटकातील या जातक कथांमध्ये विविध प्राण्यांच्या रूपात किंवा विविध पात्रांच्या स्वरूपात भेटणारा कथासार सांगणारा किंवा बोध देणारा दुसरा तिसरा कोणी नसून बुद्ध आहे.

६) सिद्धार्थ जातक मधील एकूण कथा ह्या ५५० इतक्या असून बुद्धाचे ५४६ जन्म झालेले आहेत. प्रत्येक जन्मात बुद्धांनी एक एक गुण आत्मसात केला असून त्या प्रत्येक गुणाची एक कथा झाल्याचे दुर्गाबाई आपल्या सखोल अभ्यासांती आणि संदर्भासह मांडतात. म्हणजेच बुद्धाने पुनर्जन्माची कल्पना स्वतःहूनच सांगितलेली आहे आणि प्रत्येक जन्मातील गुण पुढच्या जन्मात संक्रमित होऊन चांगल्या गुणांनी माणूस परिपूर्ण होतो असेही बुद्ध आपल्या या सर्व कथांमधून आपल्यासमोर मांडतात.

सिद्धार्थ जातकांमधील या कथा सात खंडात प्रसिद्ध करत असताना प्रत्येक कथेला दुर्गाबाईंनी प्रस्तावना दिली असून या प्रस्तावनेला **'निदान कथा'** असे म्हणतात. या निदान कथांमधून संबंधित कथा कशी अस्तित्वात आली याची थोडक्यात माहिती मिळते. म्हणजेच सध्या अस्तित्वात असलेल्या गोषवाऱ्याला निदान कथा असेही म्हणता येऊ शकेल.

**"सिद्धार्थ जातक"** मधील या ५५० कथांचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे माणसाने प्रेममय आणि विरक्त होणे असले तरी विरक्तपणामध्ये माणसाने सतत हसतमुख आणि करुणाघन कसे असावे याचा वस्तुपाठ बुद्धाने आपल्या प्रत्येक कथेतून घालून दिल्याचे त्या नमूद करतात. प्रेममय आणि विरक्त झाल्याशिवाय त्याला मोक्ष प्राप्त होत नाही असे बुद्ध या कथांमधून आपल्याला सप्रमाण सांगतात.

**"सिद्धार्थ जातक"** मधील प्रत्येक कथेत बुद्ध असून त्याला विविध प्राण्यांची किंवा पात्रांची उपमा दिल्याचे बौद्ध वाङ्मयात दिसून येते. यामध्ये सिंह, हत्ती, बैल, मृग आणि विविध प्राण्यांच्या कळपांचा नेता अशा स्वरूपात प्रत्येक कथेतून बुद्ध आपल्याला भेटतो. त्यामुळे

सिद्धार्थ जातक मधील  कथांमध्ये प्राणी कथा विपुल प्रमाणात असल्याचे दिसून येते.

मूळच्या या बौद्ध जातक कथा सिंहली लिपीत आहेत. बौद्ध भदंत आनंद कौशल्यायन यांना सिंहली भाषा अवगत असल्याने त्यांनी या जातक कथांचे पाली भाषेमध्ये भाषांतर केले. पाली भाषेमध्ये **"जातक"** या शब्दाचा अर्थ "**जन्माची हकीकत"** असा असून जातक कथा लिहिताना जातक या शब्दाचा अर्थ **"पूर्वजन्मीची हकीकत"** असा घेतलेला असून प्रत्येक कथा ही बोधिसत्वाच्या पूर्वजन्मीची कथा आहे. या कथांमध्ये बुद्धत्वाला पोहोचण्यासाठी जे ज्ञान लागते ते ज्ञान फक्त उत्कृष्ट गुण संपादन केल्यानेच प्राप्त होते, यावर भर दिलेला आहे. उत्कृष्ट गुण संपादन केल्याने माणूस परिपक्व होतो परंतु त्यासाठी पंचशील पाळणे आवश्यक आहे असेही या कथांमधून प्रतीत होते. दान, क्षमा, दया, करुणा, मुदिता, उपेक्षा, मैत्री, नैष्कर्म, वैराग्य यासारखे भाव व गुण मनुष्याला आत्मसात करावे लागतात. तेव्हाच त्याला बोधिसत्वासारखी सिद्धी प्राप्त होते, असे जातक कथांचे तात्पर्य आहे. परंतु दुर्गा भागवत यांनी या तात्पर्य कथा असतानाही कोणत्याही कथेच्या शेवटी त्या कथेचे तात्पर्य नमूद केलेले नाही. यामागे प्रत्येक माणसाने कथा वाचल्यानंतर स्वतःच तिचा बोध करून घ्यावा किंवा तो होत नसल्यास तशी क्षमता स्वतःच्या अंगी विकसित करून घ्यावी, असा कयास बांधला असण्याची शक्यता आहे.

सिद्धार्थ जातक मधील ५५० कथा एकूण **निपात, महानिपात व निदान** यामध्ये विभागल्या असून त्यातील प्रत्येक भागाला निपात असे म्हटलेले आहे.  या सर्व कथा २२ भागात विभागल्या असून या भागांना वेगवेगळी नावे दिलेली आहेत. खाली समान वैशिष्ट्ये असलेल्या कथा आणि त्यांची संख्या दिलेली आहे.

**पहिला निपात: ( एकुण १५० कथा)**

अपण्णक  वग्ग १०, सील वग्ग १०, कुरूङ्ग वग्ग १०, कुलावक वग्ग १०, अत्थकाम वग्ग १०, आसिंस वग्ग १०, इत्थी वग्ग १०, वरण वग्ग १०, अपायिम्ह वग्ग १०, लित्त वग्ग १०, परोसत वग्ग १०, हंस वग्ग १०, कुसनाली वग्ग १०, असम्पदान वग्ग १०, ककण्टक वग्ग १०.

**दुसरा निपात: ( एकुण १०० कथा)**

दळ्ह वग्ग १०, संन्थव वग्ग १०, कल्याणधम्म वग्ग १०, असदिस वग्ग १०, रुहक वग्ग १०, नतंदळ्ह वग्ग १०, बीरणत्थभक वग्ग १०, कासाव वग्ग १०, उपाहन वग्ग १०,सिगाल वग्ग १०.

**तिसरा निपात: ( एकुण ५० कथा)**

सङ्कप्प वग्ग १०, कोसिय वग्ग १०, अरत्त्र वग्ग १०, अब्भन्तर वग्ग १०, कुन्भ वग्ग १०.

**चौथा निपात: ( एकुण ५० कथा)**

विवर वग्ग १०, पुचिमन्द वग्ग १०, कुटिदूसक वग्ग १०, कोकिल वग्ग १०, चुल कुणालवग्ग १०.

**पाचवा निपात: ( एकुण २५ कथा)**

मणि कुण्डल वग्ग १०, वण्णारोह वग्ग १०, अड्ढ वग्ग ०५.

**सहावा निपात: ( एकुण २० कथा)**

अवारिय वग्ग १०, सेनक वग्ग १०.

**सातवा निपात: ( एकुण २१ कथा)**

कुक्कु वग्ग १०, गंधार वग्ग ११.

**आठवा निपात: ( एकुण १० कथा)**

कच्चान वग्ग १०.

**नववा निपात: ( एकुण १२ कथा)**

गिज्झ वग्ग १२.

**दहावा निपात : ( एकुण १६ कथा)**
**अकरावा निपात : ( एकुण ०९ कथा)**
**बारावा निपात : ( एकुण १० कथा)**
**तेरावा निपात : ( एकुण १० कथा)**
**चौदा ते एकोणीस प्रकिर्णक निपात : ( एकुण १३ कथा)**
**विसावा निपात : ( एकुण १४ कथा)**
**तिसावा निपात : ( एकुण १० कथा).**
**चाळीसावा निपात : ( एकुण ०५ कथा)**
**पन्नासावा निपात : ( एकुण ०३ कथा)**
**साठावा निपात : ( एकुण ०२ कथा)**
**सत्तरावा निपात : ( एकुण ०२ कथा)**

**ऐंशीवा निपात : ( एकुण ०५ कथा)**

**महानिपात: ( एकुण १० कथा)**

**निदान : ( एकुण ०३ कथा)**

अश्या ५५० सिद्धार्थ जातक कथा दुर्गाबाईंनी सात खंडांमध्ये प्रकाशित केल्या असून खंड-१ मध्ये एकूण १५० कथा, खंड-२ मध्ये १५० कथा, खंड-३ मध्ये १३८ कथा, खंड-४ मध्ये ७२ कथा, खंड-५ मध्ये २७ कथा, खंड-६ मध्ये १० कथा असून शेवटच्या सातव्या खंडात ३ कथा अश्या एकूण ५५० कथा सिध्दार्थ जातक मध्ये आहेत.

**संदर्भ:**

१. सिद्धार्थ जातक खंड १ ते ७.

२. दुर्गाबाईंच्या मुलाखती भाग-१ व भाग-२.

३. दुर्गाबाईंची भाषणे.

४. दुर्गा भागवत यांचे संस्कृती संचित, विचार संचित, भावसंचित – संकलन मीना वैशंपायन.

५. दुर्गा आजीच्या गोष्टी.

***

# सारिका उबाळे यांच्या ‘निष्णात’ कवितेचे विश्लेषण


## डॉ. शिंदे दुष्यंत आनंदराव

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, आझाद महाविद्यालय, औसा, ता. औसा, जि. लातूर.


साठोत्तरी मराठी कविता वेगवेगळ्या अंगाने विकसित झाली आहे. महाराष्ट्राची मराठी भाषिक राज्य म्हणून निर्मिती झाल्यानंतर शिक्षणाचे प्रमाण सर्वदूर पसरले. पहिल्या पिढीतील बहुजन वर्ग शिक्षणाच्या प्रवाहात आला. परिणामी स्वतःचे वास्तव अनुभव तितक्याच वास्तवपणे मांडले जाऊ लागले. साठोत्तरी मराठी कवितेतील अमुलाग्र बदल झालेले दिसून येतात. दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीवादी, महानगरीय असे विविध प्रवाह साठोत्तरी मराठी काव्य क्षेत्रात रूढ झाले. वास्तव महात्मा फुले यांनी आधुनिक काळात स्त्री, शूद्र, बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करून दिली. परिणामी बहुजनांनी लिहिण्यास सुरुवात केली. हाच प्रवाह स्वातंत्र्यानंतर त्यातही 1960 नंतर अधिक जोमात प्रवाहित झाले. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार हेच याचे महत्त्वाचे कारण होते. बदल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. पारंपारिक जीवनशैली बदलून मानवाने सातत्याने सुधारित जीवनशैलीचा स्वीकार आदिम काळापासून केला आहे. जसे त्याचे जीवन बदलत गेले तसेच त्याने लिहिलेल्या साहित्याचे स्वरूपही बदलत गेले. आधुनिक काळात बदलाचा वेग अत्यंत झपाट्याचा राहिला आहे. खासकरून स्त्री जीवन झपाट्याने बदलत गेले. वास्तव जगण्याचे तितक्याच ताकदीने चित्रण

या काळात सुरू झाले. इथे स्त्रीवादी कवितेतील महत्त्वाच्या कवयित्री सारिका उबाळे यांच्या काव्याचा विचार करू.

**गृहितके –**

१) साठोत्तरी कालखंडात मराठी साहित्यात अनेक प्रवाह रूढ झाले आहेत.

२) स्त्रीवादी कविता हा प्रवाह साठोत्तरी कवितेतील अत्यंत महत्त्वाचे प्रवाह आहे.

३) शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार, संविधानाने स्त्री शिक्षणास दिलेले प्रोत्साहन या कारणामुळे स्त्रियांचे शिक्षणाचे तसेच लेखनाचे प्रमाणही वाढले.

४) सारिका उबाळे या साठोत्तरी मराठी कवितेतील महत्त्वाच्या कवयित्री आहेत.

५) स्त्रीभ्रूण हत्या या समकालीन गंभीर समस्येचा विचार निष्णात या कवितेतून आला आहे.

**उद्दिष्टे –**

१) साठोत्तरी मराठी कवितेतील विविध प्रवाह समजून घेणे.

२) साठोत्तरी मराठी कवितेतील महत्त्वाचा कवयित्री अनुराधा पाटील यांच्या काव्यलेखनाचा अभ्यास करणे.

३) समकालीन स्त्रियांच्या वास्तव जगणे आणि कवितेतील अभिव्यक्ती समजून घेणे.

४) सारिका उबाळे लिखित निष्णात कवितेतील स्त्री भ्रूण हत्येचे स्वरूप समजून घेणे.

साठोत्तरी कालखंडात स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाणही खूप वाढले. त्या विविध ठिकाणी नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने स्त्रियांचे वास्तव्य शहरात होऊ लागले. आपले पूर्व आयुष्य आणि शहरातील वातावरण यातील नेमका फरक त्यांनी आपल्या साहित्यातून मांडले. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले अनुभव तिने लिहायला सुरुवात केली. तिच्या

भावभावना वस्तुनिष्ठपणे साहित्यातून व्यक्त होऊ लागल्या. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी म्हटल्याप्रमाणे "साहित्य हे जीवनसापेक्ष आणि समाजसापेक्ष असते. त्याचप्रमाणे कालसापेक्ष असते."[1] आधुनिक काळात स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. विशेष म्हणजे यात खुद्द स्त्री सहभागी असून उच्च शिक्षित डॉक्टर ही सहभागी आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्त्रीला जन्माला येणयापूर्वीच गर्भात मारले जाते याबाबत कवयित्री खंत व्यक्त करते. इथे सारिका उबाळे यांच्या कवितेतील आशयाचा विचार करू.

**सारिका उबाळे : परिचय –**

मराठी साहित्यातील साठोत्तरी कालखंडातील स्त्रीवादी लेखिका म्हणून सारिका उबाळे परळकर यांचा विचार करावा लागतो. त्यांचे कुस, शिर:शाता इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित असून आकाशवाणी नागपूर करिता वऱ्हाडी नाटिकांचे लेखनही त्यांनी केले आहे. विविध नियतकालिके, दिवाळी अंक, वृत्तपत्रामधून त्यांच्या कथा, कविता आदी लेखन प्रकाशित झाले आहे. असे असले तरी एक कवी म्हणून त्यांचे लेखन अधिक दमदारपणे पुढे आले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांच्या एकूण लेखनासाठी विविध पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. ज्यामध्ये शब्दगंध पुरस्कार, साहित्यरत्न पुरस्कार, दक्षिण महाराष्ट्र साहित्यरत्न पुरस्कार, होनाजी पवार स्मृती पुरस्कार, नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, सुर्याश राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, कैलास पगारे विशेष काव्य पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा उल्लेख करावा लागतो, प्रस्तुत 'निष्णात' या कवितेत निसर्गाने स्त्री जन्माला समजून, फुलण्याचे बहरण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. असे असूनही आधुनिक काळात पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्रीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. स्त्रीभ्रूणहत्येचे लक्षणीय प्रमाण हे चिंताजनक असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्त्रीला गर्भात मारले जाते. याबाबत सारिका उबाळे खंत व्यक्त करतात. थोडक्यात स्त्रीभ्रूणहत्येसारख्या

अत्यंत ज्वलंत आणि तितक्याच महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**निष्णात - आशय**

'निष्णात' ही सारिका उबाळे यांची अत्यंत महत्त्वाची कविता आहे. आधुनिक काळात एका बाजूला विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने झाली तर दुसऱ्या बाजूला मानवाने त्याचा गैर वापर करून मानवी जीवनाला अडचणीत आणले आले. मानवी अस्तित्वाला धोका निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यात स्त्री भ्रूण हत्या ही अतिशय गंभीर समस्या असून स्त्रीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याचे स्पष्टपणे सांगता येते.

**एक असते कळी**
**हिरव्यागार श्रावणाची**
**मऊसूत साय**
**तिला असतात**
**डोळे टपोरे**
**आकाशात फिरणारे[2]**

कोणत्याही अभ्रकाचे देखणे रूप वरीलप्रमाणे असते. श्रावणातल्या सुंदर हिरवाईची प्रसन्नता या कळीमध्ये असते. आकाशातील ताऱ्याप्रमाणे देखणेपण घेऊन येणारी मुलगी कोणत्याही आईला हवी हवीशी वाटते. इथे सारिका उबाळे मानवी स्वभावाची दुसरी बाजू मांडतात.

**एक असतं मशीन**
**श्वास मोजणारं**
**त्याला कळतात**
**श्वास तिचे**
**एक असतं इंजेक्शन**
**फक्त कळ्यांनाच**

**निवडून काढणारं**
**आणि**
**आणि एक शस्त्र**
**असतं श्वासांना,**
**रक्तमासांच्या हजार तुकड्यात**
**बदलविणारं[3]**

आधुनिक काळात तंत्रज्ञानाने केलेली प्रगती मानवाला उपकारक ठरणारी असायला हवी होती मात्र काही वाईट प्रवृत्तीच्या लोकांनी त्याचा स्वार्थासाठी अतिशय चुकीच्या पध्दतीने वापर करण्यास सुरुवात केली. ज्या डॉक्टर कडे देवाचा अवतार म्हणून पाहिले जाते तोच मुलीच्या मुळावर उठतो. यंत्राद्वारे त्याला अर्भक स्त्री आहे की पुरुष हे जन्मापूर्वीच कळतं. आणि खेळ सुरू होतो भ्रूण हत्येचा. जगात येऊ पाहणाऱ्या मासाच्या गोळयाचे हजार तुकड्यात रूपांतर होते.

**एक निष्णात**
**डॉक्टर असतो**
**निगरगट्ट काळजाचा**
**तशीच एक**
**डॉक्टरीनही**
**ती**
**अगदी व्यवस्थित**
**सगळं निपटून काढते**
**हातांनी[4]**

इथे सारिका उबाळे महिला डॉक्टर बाबतीत स्पष्टपणे लिहितात. नेहमी करता स्त्री भ्रूण हत्या करणारा डॉक्टर पुरुष असतो असे नाही तर स्त्रीही असते हे वास्तव आपण नाकारू शकत नाही. स्त्रीच एका स्त्रीची वैरी झालेली असते. बरेचदा आईला माहितीही होऊ दिले

जात नाही. तिच्या नकळत तिच्या गर्भातील स्त्री भ्रूण मारून टाकले जाते. अतिशय निष्णातपणे ही प्रक्रिया पूर्ण केली जाते.

सारिका उबाळे प्रस्तुत कवितेतून समाजातील एका ज्वलंत समस्येकडे निर्देश करतात. उच्च शिक्षित लोकही चुकीच्या कामाला मदत आणि प्रोत्साहन करीत असल्याचे वास्तव चित्र आजही लपून नाही.

**समारोप –**

स्त्री आणि पुरुष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्त्री शिवाय समाजाचा विकास शक्य नाही हे माहीत असून स्त्री भ्रूण हत्या मोठ्या प्रमाणात होतात हे वास्तव ही नाकारता येत नाही. 1960 नंतर स्त्रियांच्या विचारत बदल होत गेले. स्त्रियांच्या हक्कासाठी चळवळ उभी राहिली. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली गेली. “सन 1960 नंतर स्त्रियांची चळवळ हळू हळू संघटित होऊ लागली. सन 1975 ते 1985 ह्या आंतर राष्ट्रीय महिला दशकात स्त्रियांच्या हक्क आणि अधिकाराविषयी जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. ह्या दशकात स्त्री मुक्तीचा पाया रोवला गेला.”[5] वरील नमूद केलेला कालखंड स्त्रीच्या सर्वांगीण विकासात गती आलेली आहे. सारिका उबाळे यांचे लेखन त्याचेच प्रतीक आहे. त्यांची निष्णात ही कविता स्त्री भ्रूण हत्येचे गांभीर्य व्यक्त करते. इथे स्त्रीकडून एका स्त्रीचा होणारा असा अमानुष छळ कवितेचा विषय झाला आहे. डॉक्टर असलेल्या स्त्री आणि पुरुष यांच्याकडून होणारा तंत्रज्ञानाचा गैर वापर यावर सारिका उबाळे अतिशय निर्भिडपणे बोलतात. दोष मशीनमध्ये नसून त्या वापरणाऱ्या मानसिकतेमध्ये आहे, हे सारिका उबाळे इथे कथन करतात.

सारिका उबाळे यांची प्रस्तुत कविता स्त्री भ्रूण हत्येची समस्या अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे. त्यांनी वापरलेल्या प्रतिमा दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या आहेत. साठोत्तरी स्त्रीवादी कवितेतील महत्त्वाच्या कवी म्हणून त्यांचा विचार करावा लागतो. आधुनिक

तंत्रज्ञानाचा होणारा गैर वापर ही जागतिक स्तरावरील अत्यंत गंभीर समस्या आहे.

**संदर्भ सूची –**


१) कऱ्हाडे डॉ. सदा – समाज आणि साहित्य – लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई – द्वि. आ. एप्रिल १९९९ – पृ. ११७.

२) जाधव डॉ. जयद्रथ व इतर (संपा.) – आधुनिक मराठी कविता – अथर्व पब्लिकेशन, धुळे – प्र. आ. १२ नोव्हेंबर २०१९ – पृ. ४४.

३) तत्रैव – पृ. ४५.

४) तत्रैव – पृ. ४५.

५) स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक - पृ. १०४.


***

# होरपळलेल्या माणसांची परिवर्तनवादी कथा : तांड्याचे पाय

**प्रा. डॉ. व्यंकटी पावडे**

मराठी विभागप्रमुख, के.आर. एम. महिला कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, वजीराबाद, नांदेड.

वास्तववादी कथा लेखिका अनिता जाधव या संवेदनशील मनाच्या लेखिका आहेत. स्वतःच्या अवतीभोवतीचे जग त्यांनी साहित्याचा विषय बनविला आहे. भूमिहीन असणाऱ्या, दुर्लक्षित, वंचित, दारिद्र्याशी झुंजणाऱ्या, हातावर पोट असणाऱ्या माणसांचे जग त्यांनी उभे केले आहे. त्यांची कथा ही भारतीय समाजातील लमान तांड्यातील शतकांनुशतकापासून अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सुखसोयीसाठी धडपडणाऱ्या लाखो माणसांचा टाहो आहे. तांड्याचे पाय या कथासंग्रहातील कथा ह्या वाचकाला नव्या अपरिचित माणसांच्या जगाकडे घेऊन जातात. कोणताही कलावंत हा भावनाप्रधान असतो. त्याला शोषणाचे आवाज ऐकू येतात. दुःखी मनाची वेदना लक्षात येते. कथालेखिका अनिता जाधव ह्या त्यापैकी एक आहेत. रोजंदारी करणाऱ्या कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाल्यामुळे कृषी संस्कृतीशी त्यांचे अतूट नाते जोडले गेले आहे. कष्टकरी समाजामध्ये जडणघडण झाल्यामुळे मूळ प्रश्नांची जाण त्यांना आहे. साहित्य म्हणजे केवळ शब्दांचा व वाक्यांचा बाजार नसतो तर त्यामध्ये अनेक मानवी मने साकार झालेली असतात. ही मानवी मने लेखकाला नीट वाचता आली पाहिजेत. या मनातील कोलाहल नेमका पकडता यायला हवा. कथा लेखिका अनिता जाधव यांनी या कथासंग्रहाच्या निमित्ताने तो कोलाहल सुयोग्यपणे मांडला आहे.

'शाळाबाह्य मुले' (एकांकिका संग्रह), 'कोरडे आभाळे' (काव्यसंग्रह) व 'सृजन सकाळ' (कथासंग्रह) अशी काही ग्रंथसंपदा त्यांच्या नावे प्रसिद्ध आहे. मराठवाड्यातील विविध दैनिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. आकाशवाणी केंद्रावरून त्यांच्या साहित्याचे प्रसारण झाले आहे. काही नामांकित संस्थांचे पुरस्कारही त्यांना मिळाले. 'सृजनसकाळ' हा पहिला तर 'तांड्याचे पाय' हा त्यांचा दुसरा कथासंग्रह आहे. या दोन्ही कथासंग्रहांमधून त्यांनी नवे विषय मराठी कथेला दिले. कथालेखिका अनिता जाधव यांचे बालपण एका तांड्यावर गेले; त्यामुळे तेथील माणसांचा प्रभाव, त्यांचे जगणे, रीतीरिवाज, प्रथा, परंपरा, लोकसंस्कृती इत्यादीचा परिणाम त्यांच्या बालमनावर झाला. त्यांचे जग हे सुशिक्षित शहरी माणसांचे नाही तर अक्षर ओळख नसलेल्या, पोटासाठी वणवण भटकणाऱ्या, मोलमजुरी करणाऱ्या, काळ्या आईच्या कुशीत राबराब राबणाऱ्या निरागस माणसांचे आहे. ही माणसे निंदण, खुरपण करणारी, ऊसतोड करणारी, शेतावर मंजुरीने जाणारी, मिळेल ती कामे करणारी, मूलभूत गरजांची पूर्तता न झालेली, झोपडीत राहणारी व विकासाच्या वाटेवरून कोसो दूर असणारी अशी आहेत. या निर्वासित माणसांच्या वेदना सुखद करण्यासाठी लेखिका अनिता जाधव यांची लेखणी पुढे सरसावली आहे.

'तांड्याचे पाय' या त्यांच्या दुसऱ्या कथासंग्रहात तांडा, वाडी, वस्तीच्या ग्रामीण भागातील तळागाळातील सामान्य माणसांचे दुःख त्यांनी व्यक्त केले आहे. 'शेतात राबणाऱ्या माझ्या आई-वडिलास...' या व्याकुळ अर्पणपत्रिकेने या कथासंग्रहाची सुरुवात लेखिकेने केली आहे. याद्वारे लेखिका अनिता जाधव यांच्या लेखनाची मूळं शेती – शेतकरी – मजूरदार यांच्याशी बांधलेली आहेत, हे लक्षात येते. कृषी जीवनाशी एकरूप होऊन केलेले हे लेखन बंजारा तांड्यावरील मानवी वस्तीचे

दुःख विदारकपणे मांडणारे आहे. 'कोयता', 'तांड्याचे पाय', 'धुर्‍यावरचे स्वप्न', 'पाणी –पाणी', 'आठवडी बाजार' या कथांद्वारे त्यांनी लमानतांड्यामधील लोकांचा जीवन संघर्ष वास्तवपणे मांडला आहे. 'बॅगेतील बिर्‍हाड', 'हरवलेलं गाव', 'सावली' या कथांमधून माणुसकी कशी हरवत चालली आहे. नात्यागोत्यातील स्वार्थी संबंध अतिशय घनव्याकुळ होऊन लेखिकेने जिवंतपणे मांडले आहेत. 'असीनचे दप्तर', 'शाळा', 'तडजोड', 'अभय' या कथा वाचताना वाचक अंतर्मुख होतोफ माणसं आणि समाज वाचनाची दांडगी शक्ती लेखिका अनिता जाधव यांना लाभली असल्यामुळे त्यांच्या कथेतील विषर्यें प्रसंगनिर्मिती, व्यक्तिरेखा व भाषाशैली जिवंतपणे येते. दुःख, दारिद्र्य, वेदना, अपमान इत्यादीने हलाहल झालेली ही माणसे जी आजवरच्या साहित्यापासून दूर होती ती तांड्यावरची माणसं. त्यांनी कथेचा विषय बनविला आणि या माणसांच्या वेदना मांडण्याचे काम केले म्हणून ही कथा आणि या कथेतील माणसं मराठी कथेच्या विश्वात नव्या भावविश्वाची ओळख करून देणारे आहेत.

'कोयता' या कथेतील इयत्ता नववीमध्ये शिकणारी दुर्गा ही अत्यंत गुणी व प्रतिभावान मुलगी आहे; पण घरच्या दारिद्र्यामुळे तिला शाळा सोडून श्रीपतराव मुकादम यांचे पैसे उचल घेतल्यामुळे ऊस तोडणीला जावे लागते. वडिलांची इच्छा असूनही तिला शेवटी कामासाठी जावे लागते. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा असतात. 'तू त्या शाळेत जा,' असे सांगून दुर्गाला कामावर नेले जाते. परंतु तेथे शाळा फक्त कागदावर असते. त्यामुळे 'बाबा शाळा कतं छ' असे शालेय दप्तर घेऊन विचारणारी मुलगी पाहून वडील भावूक होतात. तेव्हा कथा वाचकांच्या मनामध्ये प्रश्नांचे मोहोळ उठते व वाचक स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या चतुःसूत्रीचा अर्थ शोधत राहतो. ही दुर्गा पुढे 'पीएसआय' होते तेव्हा ती तांड्यावर वर्षानुवर्ष राबणार्‍या, खपणार्‍या माणसांपुढे एक आदर्श होते.

नव्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शेतातील सर्व कामे यंत्र-तंत्राद्वारे होत आहेत. कीटकनाशके, फर्टीलायझर्स, तणनाशक यामुळे माणसांना शेतीत आता काम कमी झाले. त्यामुळे मजूरदार लावण्याची गरज भासत नाही. याचा परिणाम तांड्यावर राबणाऱ्या मजूरदारांवर कसा झाला हे वास्तव सत्य 'तांड्याचे पाय' या कथेमधून लेखिकेने अचूकपणे मांडले आहे. ही कथा भुकेची व्यथा मांडणारी आहे. बा, याडी, आजी-आजोबा, दोन भावंड ही सर्व शेतमजूरदार माणसं आहेत. भाकरी, पिठलं, चटणी, कांदा हा त्यांचा नित्याचा आहार आहे. परंतु याडी आणि वहिनी जेव्हा रात्रीच्या वेळी जेवायला बसतात तेव्हा भाकरीची दुरडी तळ गाठते. तर कधी याडी व वहिनी उपाशी राहू नयेत म्हणून घरातील सदस्य भाकरीच्या दुरडीकडे पाहून कमी जेवतात. तेव्हा याडी वहिनीला म्हणते...

"बाळ जेवायला बसलेल्यांना भाकरीची दुरडी कधी दिसू नये. भाकरी कमी पडल्या तर आपण नंतर करून खाऊ शकतो पण ताटावरून कोणी अर्धपोटी उठू नये ही काळजी घेतली पाहिजे."

हे तांड्यावरील वास्तव लेखिकेने नेमकेपणे पकडले आहे. या कथेतील नायक शेतातील कामांचे गुत्ते घेणारा आहे. पण कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडतो व मजुरी मिळत नाही. तेव्हा तो छोटा मुलगा 'सत्या' या मुलास डॉक्टर करतो व अंधाऱ्या वाटेवर नवी उजेडाची वाट निर्माण करतो.

'धुऱ्यावरचे स्वप्न' या कथेत येणारा शेतकरी बाप हा लहानपणी आई वारल्यामुळे अनाथ होतो. वडील सालगडी असतात त्यामुळे त्याची शाळा तुटते. मिळेल ती मजुरी करून पोट भरणे हा त्याचा व्यवसाय बनतो. मजुरी कामाच्या ओढीने तो मुंबईला जातो. उपाशीपोटी पैसे जमा करून गावाकडे पाच एकर शेती घेतो. हळूहळू कष्टाच्या जोरावर १५ एकर जमीन करतो. राजेश व अनु या मुलांना एम. ए., बी. एड. पर्यंतचे शिक्षण देऊन माध्यमिक शिक्षक बनवतो.

स्वतःचे वय ६० वर्ष असले तरी शेतात राबणे, मुक्या जनावरांची सेवा करणे, वाटेवर असणाऱ्या बाभळीचे काटे वेचणारा पण झाड न तोडणारा हा बाप आहे. कर्म हीच पूजा मानणारा हा कष्टप्रिय माणूस शेतीत राबराब राबणारा आहे. परंतु त्याची डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या शिक्षणाच्या मूलमंत्रावर श्रद्धा आहे. त्यामुळे लेखिका अनिता जाधव यांच्या कथेतील माणसे निरक्षर, अज्ञानी असली तरी या माणसांची शिक्षणावर अपार श्रद्धा आहे. या श्रद्धेपोटी ते जगतात व यश मिळवतात म्हणून ही माणसे दुबळी, असहाय, शासनाच्या भरवशावर राहणारी ऐतखाऊ अशा स्वरूपाची नाहीत. तर ती प्रयत्नवादी, विज्ञानवादी, जिद्दीने, कष्टाने पुढे जाणारी यशाच्या मार्गावर चालणारी ती यशस्वी माणसे आहेत.

कोयता कथेतील 'दुर्गा' ही पीएसआय होते. 'तांड्याचे पाय'मध्ये 'सत्या' नीट च्या परीक्षेत ६४० मार्क घेऊन डॉक्टर बनतो. 'धुऱ्यावरचे स्वप्न' या कथेतील 'अनु' व 'राजेश' ही दोघे भावंड शिक्षक बनतात. अभय या कथेत येणारा अभय हा एका लाकूडतोड्याचा मुलगा आहे; पण तो जिद्दीने शिकतो पुण्यामध्ये कंपनीमध्ये सुपरवायझर बनतो. निर्धार या कथेतील 'नैतिक' हा मुलगा एम ए बी एड आहे. तो आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी घड्याळी तासिका तत्त्वावरील नोकरी सोडतो व शेतामध्ये घाम गाळतो. टरबुजाची शेती करून दहा लाख उत्पन्न काढतो व घर बांधतो. दुर्गा, सत्या, अनु, राजेश, अभय, नैतिक, आर्यन ही सर्व तरुण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून जीवनाचा नवा मार्ग शोधणारी आहेत. ती दारिद्र्याच्या वेदनादग्ध माऱ्याने झोडपलेली आहेत. गरिबीच्या असंख्य चटक्यांनी भाजलेली आहेत. पण अशा काळात कोणतेही आडमार्गाचे, चोरीचे, गुन्हेगारीचे पाऊल ते उचलत नाहीत तर शांत, संयमीपणे, धीरोधातपणे संकटांना सामोरे जाणारी आहेत. म्हणून ही माणसे मला खूप श्रेष्ठ वाटतात. संत सेवालाल, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिकविलेल्या सन्मार्गावर चालणारी ही माणसे आहेत. हे या कथेतील प्रसंगांमधून प्रखरपणे जाणवते.

'पाणी... पाणी' ही कथा दामला तांडा व गणू तांडा या तांड्यावरील भीषण पाणीटंचाईवर आधारलेली कथा. या तांड्यावर दररोज एक पाण्याचे टँकर येते. तेव्हा तांड्यावरील माणसं पाणी भरण्यावरून भांडण करतात यामध्ये कोणास पाणी मिळते तर कोणास मिळत नाही. तेव्हा गावातील जीवा मामा यांच्या विहिरीवर पाणी भरण्यासाठी जावे लागते तेव्हा तो शिव्या हासडतो.

**"तुमच्या माय दादाने विहीर खोदून ठेवली नाही इथे!"**

ही शिवी सुशिक्षित असणारा आर्यन ऐकतो व तांड्यामधील लोकांची जागृती करतो व त्यांना मंदिर बांधण्यापेक्षा श्रमदानातून गाव तळे खोदायला लावतो. पावसाळयात पडणारे पाणी त्या तळयात साठवून गावातील पाणी प्रश्न सोडवतो. "तांड्यात मंदिर बांधण्यासाठी आपण जो निधी जमा करतो तोच निधी तळयाच्या बांधकामाला लावू कारण मंदिराला आणि तळालाही पैसा तांड्यातील लोक देऊ शकत नाहीत. तांड्यात दोन-चार घरे सोडली तर सर्व गरीब आहेत" असे आर्यन म्हणतो. तेव्हा अगोदर सेवालाल महाराजांचे मंदिर बांधा नंतर शेततळे बांधून असे काही लोक म्हणतात. तेव्हा हा आर्यन सेवालाल महाराजांची शिकवण काय आहे ते सांगून पूजा, विधी, कर्मकांड, मंत्र पूजा यापेक्षा माणसांच्या मनामध्ये देव आहे त्याची सेवा करा, असे म्हणतो. तेव्हा मंदिरापेक्षा शेततळे महत्त्वाचे वाटते व तांड्यामधील सर्व लोक श्रमदानासाठी येतात. तळे खोदतात व पाण्याचा प्रश्न सुटतो. या कथेतील कथानक तसे साधे आहे; पण मंदिरापेक्षा शेततळे महत्त्वाचे आहे हा लेखिकेने सांगितलेला विचार अधिक मोलाचा व वाचकांना विचार करायला लावणारा आहे. यातील बहुतांश कथा या विज्ञान वादावर आधारलेल्या असून प्रतिगामी विचारांवर हल्ला करणाऱ्या आहेत म्हणून त्या माणसांचे श्रेष्ठत्व मान्य करणाऱ्या आहेत. खरंतर

साहित्य हे समाजाचे होकायंत्र असते. त्याद्वारे समाजाला दिशा देण्याचे काम लेखक करत असतो. कथा लेखिका अनिता जाधव यांनी या कथासंग्रहाच्या निमित्ताने हे दिशा देण्याचे काम यशस्वीपणे केले आहे.

'आठवडी बाजार' या कथेतील शारदाबाई आजी ही संयुक्त कुटुंबामध्ये काम करणारी कारभारीन आहे. हे लेखिका पुरुषप्रधान असणाऱ्या व्यवस्थेला सहजपणे सांगते. ती दर आठवड्याला बाजारासाठी जाते. संसारउपयोगी सर्व सामान आणते. बंड्या या छोट्या नातवामध्ये तिचा जीव आहे. बाजारच्या दिवशी ती त्याला पाच रुपये, दहा रुपये फ्रुटी खाण्यासाठी देते. चिवडा आणते पण एकदा ती त्याला बाजारला घेऊन जाते. स्वतः अल्पपहार न घेता फक्त चहा पिते व त्याला भजे खाऊ घालते आणि दिवाळी सणासाठी सर्वांना कपडे मिळावेत म्हणून जुन्या कपड्यांच्या बाजारात शेवंतीबाईकडे जाते व आपल्या मुलांना शेजारच्या गावातील मरण पावलेल्या व्यक्तीचे जुने कपडे शेवंताबाईकडून पन्नास रुपयांमध्ये विकत घेते. तेव्हा बंड्या आणि आजी शारदाबाई यांच्यातील संवाद वाचताना वाचक अंतर्मुख होतो.

**"आजी, आपण दुकानावरून कपडे घेऊ"**

तेव्हा आजी म्हणते,

"दुकानांमध्ये एवढ्या पैशात तुझा एक कुडताही येत नाही, तेवढ्याच पैशात अख्खा घर कपडे लेवतो. दुकानावर कपडे घेऊन काय माती खाऊन जगायचं..."

असे आजी रागात बोलते तेव्हा वाचक म्हणून अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. अपार कष्ट झेलूनही अंग झाकण्यासाठी वस्त्र न मिळणे ही या देशातील कष्टकरी माणसांची शोकांतिका आहे. हे येथील वास्तव लेखिकेने अचूकपणे वेधले आहे. पुढे याच कथेत शारदाबाई ऑपरेशनसाठी पैसे मिळत नाहीत तेव्हा छोटा असणारा बंड्या आपला पैशाचा गल्ला फोडून आजीच्या ऑपरेशनसाठी पैसे देतो व आधीचे ऑपरेशन यशस्वी करतो. हा बंड्या अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी,

मंत्रोच्चार यांच्याविरोधात आहे. त्याचा मित्र रोहन जेव्हा आजारी पडतो तेव्हा बुवाबाजी करणारा मंत्री म्हसोबाला बोकड कापा, असे म्हणतो तेव्हा तो अर्ध्या रात्री जाऊन म्हसोबाला उचलून विहिरीत फेकून देतो व रोहनला दवाखान्यात नेण्यास सांगतो. तेव्हा खाऊच्या पैशातून पंधरा हजार आजीच्या ऑपरेशनसाठी देणारा बंड्या रोहनला दवाखान्यात नेण्यासाठी प्रवृत्त करणारा हा बंड्या खूप श्रेष्ठ वाटतो.

'अभय' या कथेतील नथुराम हा लाकूडतोड्या आहे. तो आयुष्यभर रोजंदारीवर काम करणारा एक सद्गृहस्थ आहे. त्याचा मुलगा 'अभय' हा अत्यंत मायाळू आहे. तो सुपरवायझर झाल्यावर वडिलांना नित्य नेमाने पैसे पाठवतो व मजुरीने काम करणे बंद करायला लावतो व बापाला सुखाचे दिवस दाखवतो. सर्वांना मदत करतो. मोठी बहीण अरुणाला मदत करतो. घर बांधतो शेवटी हार्टअटॅकने मृत्यू पावतो. तेव्हा नथुराम व त्यांचे कुटुंब खूप शोकसागरात बुडते. ही कथा वाचताना रसिकांचे डोळे पाणावतात व तो विचार करायला लागतो. 'अभय' या कथेतील नायक अभय आणि 'निर्धार' या कथेतील उच्चशिक्षित तरुण शेतकरी 'नैतिक' व बापूराव मास्तर या सर्व नायकांचे एकच स्वप्न आहे. ते म्हणजे घर बांधणे हे होय. स्वतःच्या हक्काच्या निवाऱ्यासाठी ही माणसे अहोरात्र धडपडताना दिसतात. दिवस-रात्र एक करतात; पण त्यांना हक्काचे घर मिळतेच असे नाही. बापूराव मास्तर हा भाड्याच्या घरामध्ये दिवस काढणारा कायम विनाअनुदानित शाळेवरील शिक्षक आहे. त्यामुळे त्याची वेदना, दुःख विराट आहे. हक्काचा निवारा मिळावा हे या माणसांचे स्वप्न आहे.

कथालेखिका अनिता जाधव यांच्या कथेतील माणसे ही बंडखोर, गुन्हेगारी प्रवृत्तीची, चोरी-लुटमार, खून, दरोडे करणारी अशा स्वरूपाची नाहीत तर ती समंजस वृत्तीची, साधी-सरळमार्गी आहेत. त्यांचा स्वतःचा एक लोकशाही पद्धतीने जीवन जगण्याचा एक मार्ग आहे. ही माणसे सन्मार्गी आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत

गरजांच्या पूर्ततेसाठी ती धडपडणारी आहेत. ती अन्याय सहन करणारी, सोशिक वृत्तीची आहेत. हे जग सुंदर करण्यासाठी अहोरात्र कष्ट वेचणारी, कष्टकरी माणसं आहेत. या कथेतील बहुतांश माणसांच्या हातावर मजुरीचे घट्टे आहेत. कष्ट वेचून पायांच्या तळव्यांना भेगा पडल्या आहेत म्हणून ही माणसे काळवंडलेली, परिस्थितीच्या ओझ्याने दबलेली आहेत. अशा दुर्लक्षित माणसांचे जग या लेखिकेला प्रिय आहे. हीच माणसे त्यांनी साहित्याचा विषय करून या माणसांचे उपेक्षित जग आपल्या कथेतून उभे केले. हे या कथेचे वेगळेपण सांगता येईल.

'तांड्यांचे पाय' या कथासंग्रहात तांड्यावरून शिकून शहरात स्थायिक झालेल्या माणसांचेही दर्शन होते. त्यामुळे या कथेत ग्रामीण आणि शहरी या दोन मानवी समाजाचे चित्रण आहे. 'बॅगेतील बिर्‍हाड', 'हरवलेलं गाव', 'असीनचे दप्तर' या कथा ह्या शहरी जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'बॅगेतील बिर्‍हाड' मधील 'रुखमा' हिचा नवरा व्यसनी होता. त्यामुळे तिने आपले आयुष्य तीन मुलांसह माहेरी काढले. मद्यपी पतीच्या मृत्यूनंतर तिन्ही मुलांना ती अपार कष्ट करून उच्चशिक्षित बनविते. मोठा मुलगा शिक्षक, मधवा ग्रामसेवक व लहान मुलगा डॉक्टर मानव हे तिघे मोठे झाल्यावर शहरांमध्ये मोठे मोठे बंगले बांधतात. मात्र आईला प्रत्येकाकडे आळीपाळीने एका-एका महिन्याने ठेवतात. कुणीही तिला स्वतःकडे ठेवत नाही. तेव्हा रुखमाबाईला मृत्यूचे स्वप्न पडते. हे भयावह वास्तव लेखिकेने नेमकेपणाने मांडले आहे.

'हरवलेलं गाव' या कथेतील श्याम सर व सुनयना हे सेवानिवृत्तीनंतर गावाकडे जातात तेव्हा त्यांना कोणीही बोलत नाही. जिवलग असलेला मित्र जीवबा हादेखील कृत्रिमपणे वागतो. तेव्हा श्याम सरांना या बदललेल्या गावापेक्षा आपले शहर बरे असे वाटू लागते. 'असीनचे दप्तर'मधील संभाजी पाटील हे गर्भश्रीमंत आहेत.

क्षितिज हा त्यांचा मुलगा लाडका असतो. त्याला शिक्षणासाठी शहरात पाठवतात तेव्हा वर्गातील हुशार विद्यार्थिनी असीनही भांडी घासण्यासाठी आत्याकडे येते तेव्हा तो क्षितिज चकित होतो. ती खूप हुशार असूनही गरिबीमुळे तिचे पुढील शिक्षण बंद पडते. हे कळल्यावर तो तिच्या शिक्षणाचा खर्च उचलतो व पुढे दोघेही डॉक्टर होतात. मैत्रीचे रूपांतर नंतर प्रेमामध्ये होते; पण हिंदू – मुस्लिम या धर्माच्या अभेद्य भिंतीमुळे विवाहास विरोध होतो व दोघे वेगळे होऊन आपापल्या ठिकाणी संसार थाटतात या कथांमधून लेखिकेने मानवी जीवनातील कृत्रिमता व नैतिक मूल्यांचा पडलेला विसर व्यक्त केला आहे. शहरी माणूस आपले पूर्वायुष्य विसरून कृत्रिम, फसव्या आणि खोट्या जीवनाकडे कसा आकृष्ट होतो. तो आपल्या आई-वडीलांना विसरून आपल्या पत्नी व मुलांमध्ये कसा गुंतून पडतो हे बागेतील बिऱ्हाडमधील रुखमावरून लक्षात येते.

'लाल गुलाब'मधील उच्चशिक्षित 'रौनक' हा गुलाब शेती करणारा प्रगतिशील शेतकरी बनतो. 'रेडिओ' या कथेतील गीतकार 'दिनेश पाटील' रेडिओसाठी लग्नामध्ये रुसणारा त्यांचा 'मंग्या' मित्र व त्याची मजेशीर कहाणी येते. 'सावली' या कथेतील शेवंतीची होरपळ मन शून्य करणारी आहे. 'शाळा' या कथेतील शाळेतील बालपणीचे निरागस अनुभव वाचकांना बाल विश्वामध्ये घेऊन जातात. 'झाड रोपवाटिका' या नरेंद्र श्रीवास्तव यांच्या रोपवाटिकेतील झाडे चोरीला जातात. प्रो. स्काय हार्ट व सन माईंड ते चोरतात व परग्रहावर झाडे लावण्याचा संकल्प सांगतात. 'तडजोड' या कथेतील 'सायली' ही आपल्यापेक्षा वयाने खूप मोठ्या असणाऱ्या पन्नास वर्षाच्या विदुर दादारावशी केवळ बाबाच्या गरिबीमुळे लग्नाला तयार होते. 'सावली' या कथेतील शेवंतीचाही विवाह हा एका विदुर पुरुषाशी झाला आहे. ज्याला पहिल्या पत्नीचे चार मुलं आहेत तरीही ती नेटाने स्वतःचे चार व सवतीचे चार असे आठ लेकरं वाढवते व घडवते आणि श्याम

नावाच्या मुलाला अधिकारी बनवते. पण श्याम व त्याची पत्नी नंदिनी हे अधिकारी बनतात. त्यांचा प्रेमविवाह होतो. नंदिनीच्या सांगण्यावरून शाम आईला घराबाहेर काढतो. तेव्हा ती गावाकडे जाऊन मुलीकडे राहते व श्याम न्यायला एक दिवस नक्की येईल, या आशेवर दिवस काढते.

ही अशी साधी भोळी निरागस माणसे अनिता जाधव यांच्या कथेत येतात. खरंतर ही माणसे काल्पनिक नाहीत तर लेखिकेला सभोवतालच्या वास्तव जीवनामध्ये कुठे ना कुठे तरी भेटलेली आहेत. ही प्रत्यक्ष अनुभवलेली माणसे त्यांनी साहित्याचा विषय केली आहेत, हे या कथेचे विशेष सांगता येईल. या माणसावरून आपल्या समाजातील भीषण विषमता लेखिकेने पदोपदी दाखवून दिली आहे. रेडिओ या कथेतील दिनेश पाटील यांचा प्रेम विवाह डॉक्टर आरुषी रॉय यांच्याशी होतो. 'सावली' या कथेत शामचा प्रेमविवाह नंदिनीशी होतो पण 'असीनचे दप्तर' या कथेतील हिंदू समाजामध्ये जन्मलेल्या क्षितिजचा प्रेमविवाह मुस्लिम समाजातील असीन या डॉक्टर मुलीशी होत नाही? हे असे का? तर हिंदू – मुस्लिम या दोन धर्मातील दरी आहे, हे लेखिकेने वास्तवपणे मांडले आहे. म्हणून समाजातील व्यंगावर हळुवारपणे बोट ठेवताना लेखिका अनिता जाधव ह्या किंचितही डळमळत नाहीत म्हणून ही कथा वास्तव घटना प्रसंगावर आधारलेली आहे.

'तांड्याचे पाय' या कथासंग्रहातील भाषाशैली ही नागर ग्रामीण व वंजारी बोली भाषेने मिश्रित झालेली आहे. या कथेमध्ये येणारे प्रसंग जिवंत करण्यासाठी ही बोली भाषा महत्त्वाचे माध्यम आहे. प्रसंगानुरूप भाषा वाकवण्याची कला लेखिकेला अवगत असल्याने कथेतील सौंदर्य वाढते व वाचकांना खिळवून ठेवण्याचे कौशल्य ही भाषा करते. ग्रामीण मराठवाडी बोलीतील शब्द, म्हणी, वाक्प्रचाराने ही भाषा अधिक उठावदार बनली आहे. शिकू, गावाला, टोपलंभर, माय, अक्का, लगीन, बघायला, झुमकी, पचायचं, जगवशील, आलोच

इत्यादी असे मराठवाड्यातील ग्रामीण बोलीतील शब्द कथेचे वैभव वाढवतात. या कथेमध्ये अनेकदा संवाद येतात. हे संवाद विषयाची व्याप्ती प्रकट करतात. कधी ग्रामीण बोलीमध्ये, नागरी भाषेत तर कधी बालभावविश्वाशी संबंधित येतात. परंतु यातील जास्तीत जास्त कथा ह्या बंजारा तांड्यावरील माणसांचे जीवन चित्रीत करणारे असल्यामुळे या संवादामध्ये बंजारा बोलीतील वाक्य नकळतपणे येतात.

'मळो काई गुत्ता' (तांड्याचे पाय), 'बाबा शाळा कत छ' (कोयता), 'आदो भांडा जादा छणकच' (पाणी पाणी), 'मारो मास्तर बेटा आयो', 'याडी म शिकणं मास्तर बनूचू' (बापूराव मास्तर) अशा काही बंजारा बोलीतील वाक्याने प्रसंग निर्मितीमध्ये एक रंग भरतो. तो रंग भाषिक शैलीतील इंद्रधनुष्याप्रमाणे वाटतो. हे या भाषेचे विशेष आहे.

निखळ माणसांच्या शोधात निघालेली ही कथा जात, धर्म, पंथ या विचारांच्या पलीकडे जाऊन मानवीय जाणीवेशी सहजपणे भिडते. कोणताही कलावंत हा ही सृष्टी सुंदर करण्यासाठी आपल्या कथेमध्ये प्राण ओतत असतो. साहित्य हेदेखील त्यास अपवाद नाही. लेखिका अनिता जाधव ह्या ही कथा लिहिताना केवळ कथा लिहित नाहीत; तर त्या एका मानवी मनाशी अतूट नाते जोडून समाजाचे दुःख वेदना मांडतात. या कथेमध्ये गरिबीने होरपळलेली, जीवनाचा पालापाचोळा झालेली काही माणसे आहेत तर काही माणसे दारिद्र्यांमध्ये कुढत जगणारी आहेत. पण ती वेगळया वाटेने जाणारी, विध्वंसक विचार करणारी, बंडाचा झेंडा हातात घेणारी नाहीत. आलेले भोग निमूटपणे सहन करून जीवनाचा मार्ग शोधणारी आहेत. या कथासंग्रहातील निवेदनातील काही वाक्य वाचकांना विचार करावयास लावणारी आहेत.

'पाणी पाणी' या कथेतील यशोदाबाई यांचे आर्यनच्या कुटुंबाशी भांडण झालेले असते. ते भांडण पोलीस स्टेशनपर्यंत गेले होते.

पण एके दिवशी अचानक यशोदाबाईला विद्युत शॉक लागतो. तेव्हा दवाखान्यात नेण्यासाठी आर्यन दुचाकी काढत नाही, तेव्हा हे पाहून आर्यनची आई त्याला समजावते व म्हणते,

"बाळ कोणतेही जखम, भांडणे आणि दुश्मनी जिवापेक्षा मोठी नसते." हे एकूण आर्यननेच दुचाकी काढली व यशोदाबाई हॉस्पिटलला नेले व तिचे प्राण वाचवले.

'बागेतील बिऱ्हाड' या कथेतील रुखमाचे दुःख पाहून तिचा भाऊ तिच्या तिघा मुलांवर खेकसतो. तेव्हा वातावरणातील गांभीर्य वाचकांच्या सहज लक्षात येते.

"तुमच्या तिघांच्या घरी पंढरीला वाऱ्या घालावं तसं रकमा वाऱ्या घालीत राहील का? ज्याच्याकडे राहण्याची तिची इच्छा आहे तिथे राहू द्या. नको म्हणत असाल तर तिचा हा भाऊ अजून जिवंत आहे राहील माझ्याकडे!"

'तडजोड' या कथेतील 'सायली' जेव्हा गरिबीला कंटाळते तेव्हा तिच्या तोंडून जे उद्गार येतात त्यामधून गरिबीला वैतागलेल्या तरुणपणाची यातना बाहेर पडते.

"गरिबीने माझ्या शिक्षणाचा बळी घेतला, स्वप्नांचा बळी घेतला, आता जीवनाचा बळी द्यायला मला हिम्मत द्यावी, बस्स..! कृपा होईल या गरिबीची."

ही अशी अनेक वाक्य या कथांमधून येतात. तेव्हा या वाक्यातून लेखिकेने ओसाड, माळरानावरील भनंग झालेल्या आयुष्याचे नवे शोकात्मगीत गायलेले लक्षात येते. आयुष्य घृणास्पद असले तरी टोकाचा संताप, अश्लील भाषा त्यांनी कुठेही वापरलेली नाही. म्हणून या भाषेत सहजता आहे. ती साधी – सरळ, एखाद्या नदीसारखी खळखळत वाहणारी आहे. त्यामुळे ही कथा सर्वसामान्यांना प्रिय आहे.

खरं तर २००० नंतरच्या मराठी कथेचा इतिहास लक्षात घेतला तर वेगवेगळ्या प्रवाहांमधून असंख्य कथाकारांनी वेगवेगळ्या

जाणिवांचे चित्रण करणारी मराठी कथा लिहिली आहे; पण मागील दोन दशकांमध्ये स्त्री कथा लेखिकांनी अल्प प्रमाणात लेखन केले आहे. परंतु या काळात मराठी काव्य प्रांतात कवितेचे महापीक आले आहे. असे असले तरीही ग्रामीण कथेच्या प्रांतात स्त्री लेखिकेचे प्रमाण अत्यल्प आहे. ही जागा भरून काढण्याचे काम लेखिका अनिता जाधव यांच्या या कथेने निश्चितच केले आहे, हे आनंदाने सांगावेसे वाटते. म्हणून भविष्यामध्ये ग्रामीण साहित्याच्या चळवळीमध्ये त्यांचे स्थान एक वास्तववादी कथा लेखिका म्हणून अढळ राहणार आहे. त्यांची ही कथा नव्या समाजाचे दुःख घेऊन व्यक्त झाली. बंजारा तांड्यामधील लोकांचा जीवन संघर्ष या कथेने मांडला. त्यामुळे ही कथा लाखो वाडी-वस्ती-तांड्यावर जीवन जगणाऱ्या माणसांचा टाहो फोडणारी आहे.

हलक्याफुलक्या संवादामधून तळागाळातील माणसांचे भावविश्व उलगडून दाखवणाऱ्या ह्या कथा मानवी जगण्याचे विविध पदर करणाऱ्या आहेत. या कथेत दारिद्र्य आहे, शोक आहे, विलाप आहे, 'नाही रे'चे एक मोठे जग आहे. भूमिहीन माणसांचा टाहो आहे. दोन वेळेच्या भुकेचा प्रश्न आहे. नानाविध समस्यांनी ग्रासलेली माणसे आहेत. मूलभूत प्रश्नांसाठी लढणाऱ्या माणसांचा समूह आहे. सुशिक्षित बेरोजगार आहेत. उजाड माळरानावरील ही माणसं खूप दारिद्र्यामध्ये जीवन जगणारी आहेत. जीवन नकोसे, रुक्ष असले तरी त्यांची मानवी जीवनावर व जगण्यावर गाढ श्रद्धा आहे. ही सकारात्मकता पेरण्यामध्ये लेखिका अनिता जाधव ह्या यशस्वी झाल्या आहेत.

सर्वसामान्यांच्या दैनंदिन बोलीतून फुलणाऱ्या ह्या कथा वाचकांच्या काळजाला भिडणाऱ्या आहेत. मराठी कथासाहित्याला या कथेने काय दिले? हा प्रश्न एक वाचक म्हणून जेव्हा पडायला लागतो तेव्हा या कथेने एका दुर्लक्षित माणसांचे जीवन साहित्याचा विषय बनविले हे लक्षात येते. ही कथा ग्रामीण आणि नागरी या दोहोंच्या मध्ये आहे. या दोन्ही जीवनातील मानवी जीवन समजावून सांगते. या

स्वार्थी जगातील मतलबी माणसांची बुरखे ती टराटरा फाडते. या कथेत गरीबीला कंटाळलेले जसे पुरुष आहेत तसेच जीवन नकोशे झालेल्या असंख्य स्त्रिया आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीच्य ओझ्याने दबलेल्या बायका आहेत. एक माणूस म्हणून अस्तित्व न उरलेल्या काही स्त्रिया आढळतात. त्यामुळे या कथेतील जग वाचकाला अस्वस्थ करते.

खरे साहित्य तेच असते जे वाचकांच्या मनामध्ये प्रश्न उपस्थित करते. 'तांड्याचे पाय'मधील कथा वाचकांना इथल्या विषय व्यवस्थेच्या विरूद्ध प्रश्न विचरायला प्रेरित करतात. कष्टकरी माणसांच्या मानसिक द्वंद्वामागील परिस्थितीचा शोध घ्यायला शिकवितात. या कथा डिजिटल, स्मार्ट आणि अमृत महोत्सवी भारतातील एका उपेक्षित जगाच्या व्यथा मांडणाऱ्या आहेत. तांड्यावरील जीवनच त्या आरसा आहेत. या कथेत दारिद्रयाच्या खायीत होरपळलेली माणसे आहेत; पण कुठेही आक्रस्तळेपण नाही. भाषेचा तोल लेखिकेनले कुठेही जाऊ दिला नाही. पात्र मोठ्या असलेल्या नदीने महाभयंकर महापूरातही संथपणे वाहत राहवे असे ही कथा मानवी जगण्यातील ताणेबाणे घेऊन वाहते. हे तिचे वाहने निरंतर चालो.

**संदर्भ:**

१) अनिता जाधव, तांड्याचे पाय (कथासंग्रह), इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २०२३

***

# साठोत्तरी कालखंडातील अनुवादक : स्वाती दामोदरे

**प्रा. डॉ. बिभीषण कांबळे**
मराठी विभाग, आझाद महाविद्यालय, औसा, ता. औसा, जि. लातूर.

अनुवाद ही प्रक्रिया साहित्याच्या क्षेत्राशी अधिक निगडित आहे. इतर भाषेतील सर्वोत्तम कलाकृतीचा स्व भाषेत अनुवादित करून ती वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जाते. यासाठी अनुवादक निदान दोन भाषेत तरी पारंगत असणे आवश्यक असते. आधुनिक कालखंडात इंग्रजी साहित्याच्या अध्ययन आणि अभ्यासातून भारतीय भाषांमध्ये विविध साहित्याचे प्रवाह रूढ झाले याला मराठी भाषा अपवाद नाही. आज मराठी भाषेत अनुवादकांची मोठी परंपरा आहे. भारतीय तसेच इंग्रजी आणि इतर जागतिक भाषांतून मराठी भाषेत अनुवादाचे काम सदैव सुरू आहे. कविता हा साहित्य प्रकार अनुवाद करण्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे. आशयाची कसलीही तडजोड न करता पर भाषेतील कलाकृती स्व भाषेत आणली जाते. ही प्रक्रिया मूळ साहित्य लेखनाइतकीच महत्त्वाची असते, हे इथे विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे.

भारतीय अन्य भाषेतील उत्तम साहित्याची ओळख अनुवादक आणि त्यांनी केलेल्या अनुवादित साहित्यामुळे होते. एकप्रकारे ही प्रक्रिया स्व भाषेला समृद्ध करणारी असते. आज मराठी भाषेत पर भाषेतील महत्त्वाच्या कलाकृतीचे अनुवाद करणारे उत्तम दर्जाचे अनुवादक सांगता येतात. साठोत्तरी कालखंडात नव्या दमाने अनुवाद करणाऱ्या अनुवादक म्हणून स्वाती दामोदरे यांचा उल्लेख करावा

लागतो. त्या मराठी विषयाच्या अध्यापक असून स्वतः आघाडीच्या कवी आहेत. साहित्याच्या अभ्यासक असल्यामुळे त्या आपोआप अनुवादाच्या क्षेत्रात ओढल्या गेल्या. प्रस्तुत लेखात त्यांनी अनुवादित केलेल्या सुमन केसरी यांच्या 'तिच्या मनात उतरणे' या कवितेचा विचार करू.

**अनुवादाचे स्वरूप –**

'अनुवादक म्हणजे मूळ लेखकाने जे लिहिलेले असते. ते तसेच्या तसे, त्याच्या योग्य आशयासह परभाषिक वाचकांपर्यंत पोहोचवणारे. तर भाषांतरकार म्हणजे मजकूर वेगळया भाषेत आणणारे. भाषांतरकार हे अनुवादकही असू शकतात.'[1]

अनुवादकाची दोन्ही भाषांबरोबर म्हणजे त्याला ज्या भाषेत अनुवाद करायचा आहे त्या व ज्या भाषेतून करायचा आहे त्या जवळीक असली पाहिजे. फक्त म्हणी, वाक्प्रचारच नाहीत, तर दोन्ही भाषांतील रूढी, प्रथा, परंपरा यांचीही अनुवादकाला चांगली माहिती असणे आवश्यक असते. अनुवाद हे केवळ शब्दांचे नसून त्यातील भावना, विचार, कल्पना याचे रूपांतर करणे म्हणजे अनुवाद करणे असते. म्हणून दोन भाषा, दोन संस्कृती, दोन समूह याचा नीट अभ्यास असणे अनुवादकासाठी गरजेचे असते.

**सुमन केशरी : परिचय –**

सुमन केशरी हिंदी भाषेतील सुप्रसिद्ध कवयित्री आहेत. भारत सरकारच्या विज्ञान आणि प्रौद्योगिकी विभागातून निदेशक पदावरून त्या निवृत्त झाल्या. त्यांचे सद्याचे वास्तव्य दिल्ली येथे आहे. 'यज्ञवल्क्य से बहस', 'मोनालिसा की आंखे' आणि 'पिरामीडो की तहो में' हे त्यांचे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. स्त्रीवादी आणि व्यक्तीस्वातंत्र्यवादी स्वर त्यांच्या कवितांमध्ये आढळतो. त्यांचे लेखन विद्रोही स्वरूपाचे नसून ते अधिकाधिक संयमी पद्धतीने व्यक्त होत जाते. समाजात बदल घडवून आणणे यासाठी सत्यात्याने प्रयत्न करणे गरजेचे असते. ही बाब केशरी

यांच्या लिखाणातून जाणवते. केवळ विद्रोह, चीड, नकार यातून शाश्वत सुधारणा घडत नाहीत, हे त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केले आहे.

**स्वाती दामोदरे : परिचय –**

स्वाती दामोदरे या अकोला येथील श्रीमती ल. रा. तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयात मराठी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शब्दमंजिरी हा त्यांचा ललित लेख संग्रह प्रसिद्ध असून 'डोळे मोनालीसाचे' हा त्यांचा अनुवादित कविता संग्रह प्रसिद्ध आहे. प्रस्तुत 'तिच्या मनात उतरणं' ही कविता 'डोळे मोनालीसाचे' या कविता संग्रहातून घेतली आहे. आज आघाडीच्या अनुवादक म्हणून त्या मराठी साहित्य विश्वास परिचित आहेत. मूळ कवितेचा आशय कायम ठेऊन स्वाती दामोदरे यांनी प्रस्तुत कवितेचा अनुवाद केला आहे. असे असले तरी मूळ आशयाशी ही कविता कुठेही उणी नाही, हे इथे मान्य करायला हवे.

**तिच्या मनात उतरणं : आशय –**

सुमन केशरी यांची मूळ हिंदी कविता स्वाती दामोदरे यांनी 'तिच्या मनात उतरणं' या कवितेच्या रुपात मराठीत अनुवादित केली आहे. स्त्रीला दैनंदिन जीवनात असंख्य वेदना सहन कराव्या लागतात. पुरुष प्रधान संस्कृतीच्या असंख्य खुणा तिच्या सर्वांग भर असतात. तरीही तिला सतत आनंदाने त्या सहन करून सतत हसत राहावे लागते असा भाव कवी इथे व्यक्त करते.

**"तिच्या मनात उतरण**
**विहिरीत उतरण्यासारखं होतं**
**ओलसर, दमट, अंधाऱ्या**
**नि भुयारासारख्या !"**[2]

तिच्या मनाचा तळ शोधणं कठीण आहे. या पृथ्वी वरील अर्धी शक्ती असलेली स्त्री पुरुष प्रधान संस्कृतीमुळे तिला कायम दाबून

टाकण्यात आले आहे. हे वास्तव इथे मांडले गेले आहे. तिच्या मनाचा कुणी फारसा विचारच करत नसल्याचे इथे कवीला सुचवायचे आहे.

**"एके दिवशी मीठ विसरले वरणात**
**तर त्या दिवसाच्या या खुणा**
**आणि एकदा**
**आईची आठवण आली म्हणून**
**गेले माहेरी न सांगताच**
**तर त्या दिवसाच्या या खुणा**
**अशा अनेक खुणा होत्या"[3]**

स्त्रीवर सतत होणारे अन्याय अत्याचार केवळ बाहेरच होतात असे नाही तर त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची सुरुवात तिच्या घरातूनच होत जाते. चूल आणि मूल यापेक्षा अधिक अधिकार नसलेल्या स्त्रीला कायम या ना त्या कारणाने अन्याय सहन करावा लागतो. तिच्या सर्वांग भर याच्या खुणा दिसतात. कधी आईला न सांगता भेटायला गेल्याचा राग मनात धरून तिला शारीरिक तसेच मानसिक आणि भावनिक त्रास दिला जातो. तिला स्वतःच्या मर्जीने वागण्याची मुभा नाही हे इथे सुचविले आहे.

**"शरीराच्या या ना त्या भागावर**
**सगळ्या डागण्या दाखवून**
**तिनं स्मित केलं**
**जणू ती पदकं दाखवत होती**
**कोणाला पराभूत करून मिळवलेली"[4]**

इथे एक महत्त्वाची बाब अशी की तिला सर्वांग भर खुणा लपवून चेहऱ्यावर मात्र स्मित हास्य करावेच लागते. एखाद्या स्पर्धेत पदक मिळावे तशी ती त्या जखमा मिरवते असे व्यक्त करून कवी स्त्रीच्या अगतिकता, हतबलतेचा इथे उल्लेख करते. ही स्थिती सर्वत्र

सारखीच आहे. खास करुन बहुजन समाजातील स्त्रियांना या वातावरणातून जावे लागते.

**"तिच्या मनात उतरणं**
**म्हणजे**
**अशा खोल विहिरीत उतरणं होतं**
**जिच्या तळाशी**
**जिवंत झरे होते**
**गोड पाण्याचे!"[5]**

तिचे मन एखाद्या खोल विहिरी सारखे आहे. सतत अनंत दुःख वेदना सहन करूनही ती सतत हसत राहते. याचे कारण तिच्या मनात खोल तळाशी असलेला गोड पाण्याचा झरा होय असे कवीला वाटते. मनात कायम आनंद आणि सकारात्मकता घेऊन स्त्री आपले आयुष्य जगत राहते. आपले स्वतंत्र अस्तित्व विसरून घर आणि घरातील प्रत्येक व्यक्तींसाठी ती झिजते, जगते ही बाब इथे विचारात घेतली पाहिजे.

**समारोप –**

वरीलप्रमाणे स्वाती दामोदरे यांनी अनुवादित केलेल्या 'तिच्या मनात उतरणं' या कवितेचा संक्षेपाने विचार करता येईल. मूळ कवितेचा आशय कायम ठेऊन दामोदरे यांनी अनुवाद केला आहे. स्त्रीच्या जगण्यातील मूलभूत बाबींचा विचार इथे केला आहे. तिच्या अस्तित्वाचा विचार ही कविता मांडते.

स्त्रीच्या वाट्याला नेहमीच दुय्यम वागणूक दिली गेली. तिच्याशिवाय समाजाची निर्मिती शक्य नसते. ती जगातील अर्धी शक्ती आहे. कुटुंबसंस्थेची ती कणा आहे. ती सहनशील आहे. संघर्ष करणारी आहे. सतत कार्यरत असते. असे असूनही तिच्या वाट्याला मात्र कायम दुय्यम वागणुकच येते, हे वास्तव ही नाकारता येत नाही.

स्वाती दामोदरे या साठोत्तरी कालखंडातील त्यातही 2000 सालानंतर लिहिणाऱ्या महत्त्वाच्या कवयित्री आहेत. अनुवादाच्या

क्षेत्रात त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. प्रस्तुत अनुवादित कवितेच्या निमित्ताने विचार करता त्या हिंदी आणि मराठी भाषेच्या उत्तम जाणकार आहेत. तसेच हिंदी आणि मराठी साहित्याच्या त्या सर्वोत्तम वाचक, चोखंदळ अभ्यासक तसेच उत्तम समीक्षक आहेत, हे इथे विचारात घेतले पाहिजे.

कवितेचा अनुवाद करणारा एक उत्तम अनुवादक स्वतः एक चांगला कवी असावा लागतो. कारण पर भाषेतील कविता आणि कवितेतील आशय नीट समजून घेतल्या नंतर तितक्याच समर्थपणे ते अनुवादित कवितेतून मांडावे लागते. एकूण स्वाती दामोदरे या आजच्या पिढीतील एक दमदार कवी आणि उत्तम अनुवादक आहेत, हे इथे मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची –**


१) इनामदार राजू – १६ जानेवारी २०११ – शब्दाला शब्द : अनुवादक हा लेखक असलाच पाहिजे! – लोकसत्ता मधील लेख.

२) मस्के डॉ. राजकुमार – साहित्यशिल्प – प्र. आ. ३ नोव्हेंबर २०१९ – अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे – पृ. ८६.

३) तत्रैव – पृ. 86, 87


***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

**श्रीमती राठोड दैवशाला रामराव**

मिरकले नगर, कॉलेज रोड, अहमदपूर ता.अहमदपूर जि. लातूर.

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार वाढला. अनेक समाजसमूह शिक्षण घेऊ लागले. दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीया, शिक्षण घेऊन पुढे येऊ लागले. त्यातूनच पुढे अनेक साहित्य प्रवाह मराठी साहित्यात उदयास आले. दलित साहित्य, ग्रामीण, जनवादी, आदिवासी, स्त्रीवादी साहित्य प्रवाह, असे अनेक वेगवेगळे साहित्य प्रवाह, साठोत्तरी साहित्याच्या रूपाने मराठी साहित्यात निर्माण झाले. या साहित्य प्रवाहांने दलित, आदिवासी बहुजन, ग्रामीण, शहरी कष्टकरी स्त्रियांचा साहित्यात सहभाग आणला आणि मराठी साहित्याचे विकेंद्रीकारण होऊन खऱ्या अर्थाने मराठी साहित्य लोकशाहीवादी बनले. एका विशिष्ट हेतूने प्रेरित होउन हे सगळेच प्रवाह निर्माण झाले. प्रत्येक प्रवाहाचे स्वतःचे असे एक खास वैशिष्ट्ये आहे.वास्तववादी असे हे साठोत्तरी साहित्य प्रवाह आहेत. या प्रवाहामध्ये प्रामुख्याने स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा अत्यंत महत्त्वाचा प्रवाह असून साठोत्तरी साहित्यामध्ये या प्रवाहाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या प्रवाहाने अंतर्मुख होऊन सर्वांनाच विचार करायला भाग पाडले. स्त्रीवादी साहित्य हे प्रामुख्याने स्त्रीयाच्या प्रश्नांना अधोरेखित करते. हे स्त्रीवादी साहित्य प्रवाह स्त्रीयांच्या जीवनांतील व्यथा, वेदनां समस्या, प्रश्न यांना वाचा फोडण्याचे काम करते. वर्तमानकाळात बहुतेक करून जगातील सर्वच राष्ट्रात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. आपण किती नाही म्हणालो तरी स्त्री –पुरूष विषमता आज ही मोठ्या प्रमाणात सर्वत्र दिसून येते. जन्मापासूनच मुलीपेक्षा मुलाला

जास्त महत्त्व व दर्जा दिला जातो. तेंव्हा हाच भेदभाव मिटावा, स्त्री-पुरूष समानता निर्माण व्हावी यासाठी स्त्रीवादी साहित्य प्रवाहाने जीवन परिवर्तनाची मागणी केली. म्हणून मराठी साहित्यात साठोत्तरी साहित्य प्रवाहात स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची दखल घेणे महत्त्वाचे ठरते.

१९६० ते १९९० म्हणजेच साठोत्तरी साहित्य आणि जागतिक उदारीकरणानंतर सुरू झालेली नव्वदोत्तरी मराठी साहित्य अशा दोन टप्प्यात विषयाची मांडणी करताना साठोत्तरी साहित्यात अनियतकालिकांचे, ग्रामीण, दलित साहित्य चळवळीचा तसेच साहित्यातील स्त्रीमुक्ती प्रारंभाचा काळ याचा समावेश होतो. 1990 नंतर आणि त्यानंतरच्या साहित्य निर्मितीवर देशात झालेल्या आर्थिक बदलाचा आणि जागतिक करणाचा प्रभाव पडला. त्यामुळे या काळात सहकार्य करण्याऐवजी सर्वच क्षेत्रात स्पर्धेचे स्वरूप धारण केलेले दिसते त्याला साहित्य ही अपवाद नाही. साठोत्तरी साहित्य हे बहुजनवादी, स्त्रीवादी, जनवादी असे साहित्य होते व या साहित्य प्रवाहाने अभिजनवादी संस्कृतीवर मात करून मराठी साहित्य लोकशाहीवादी केले. महाराष्ट्राची विकेंद्रीकरण आणि ग्रामीण पातळीपर्यंत पोहोचलेली अहिंसक पद्धतीची लोकशाही आणि मराठी साहित्याची सर्व समावेशकता हे पुरोगामी महाराष्ट्राची वैशिष्ट्ये आहेत. मराठी भाषेत नव साहित्याचे युग १९४० पासून सुरू झाले. पण या साहित्यात प्रामुख्याने कथा कादंबऱ्या प्रतिबिंबित होत होत्या. ते १९६०च्या दशकात ऐन भरात होते. या साहित्यामध्ये बहुजन समाजाची जशी सुखदुःख मांडण्यात आली आहेत. तशीच स्त्रीयांच्या जीवनांतील सुख-दु:ख ही मांडली आहेत. कारण १९६० नंतर भारतात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. त्यामुळे सर्वच घटक शिक्षण घेऊ लागले. त्यामध्ये ज्या भारतीय तरुणांनी आणि स्त्रीयांनी शिक्षण घेतले त्यांनी साहित्य निर्मितीत आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे भारतीय साहित्यात

बदल घडवून येऊ लागले. या काळातच, दलित व नंतरच्या आंबेडकरी साहित्याने नव साहित्याला नाकारत साहित्य निर्मितीला सुरुवात केली. तेव्हापासूनच मराठी साहित्याने लोकशाहीकडे वळण घेतले. या काळात सुरू झालेली अनियत कालिकांची चळवळ प्रत्येक भारतीयांच्या मनापर्यंत पोहोचत होती. साठोत्तरी साहित्याने पुस्तकी भाषेचे अवाजवी महत्त्व कमी करून साहित्यात बोलीभाषेला महत्त्व प्राप्त करून दिले.

साठोत्तरी साहित्य चळवळीत दलित साहित्य चळवळ महत्त्वाची मानली जाते. दलित साहित्य चळवळ ही मराठी साहित्याचे वैभवशाली पर्व मानले जाते. कारण यामुळेच भारतीय मराठी दलित साहित्य प्रस्थापित झाले. आणि हीच मराठी साहित्य आणि भारतीय साहित्याला दिलेली सर्वात मोठी देणगी होय. आत्मभान, नकार, जीवनाचे सत्य सांगणे आणि तणाव मुक्तीचा शोध घेणे ही या साहित्याची भूमिका होती. यासाहित्य चळवळीत साहित्य चळवळीत 'आत्मकथा' आणि 'कविता' या साहित्य प्रकारात भरपूर लेखन झाले. या साहित्यानेच भारताला एक वेगळी ओळख प्राप्त करून दिली. जगाला कवी नामदेव ढसाळ, दया पवार, यशवंत मनोहर, वामन लिंबाळकर, बाबुराव बागुल आणि शरणकुमार लिंबाळे यासारखे साहित्यिक दिले. साठोत्तरी साहित्यात दलित साहित्याबरोबरच ग्रामीण भागातील बहुजन समाजाचे प्रश्न मांडणारे ग्रामीण भागातील अनेक लेखक कवी उदयास आले. त्यांनी आपल्या अनुभवातून ग्रामीण साहित्याची निर्मिती केली. ग्रामीण साहित्याची ही साहित्य चळवळ सुरू करून आनंद यादव यांनी या चळवळीला एक निश्चित रूप दिले. परंतू या चळवळीला रा.र. बोराडे यांच्या पाचोळा या कादंबरीने दिले. या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे वास्तव, अगतिकता तसेच पंचायत राजच्या माध्यमातून नव्या संस्थांची निर्मिती व त्या भोवती फिरणारे ग्रामीण भागातील

राजकारण व सत्ताकारण होते. हे सर्व साहित्य ग्रामीण साहित्याची प्रेरणा म्हणून महात्मा फुले यांना आदर्श मानून लिहिण्यात आले होते.

१९७५ नंतरचे साहित्य हे स्त्रियांसाठी अनेक अर्थाने महत्त्वाचे ठरले. कारण यावर्षी 'महिला' व 'आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते. या साहित्यातून पुरुषप्रधान संस्कृतीद्वारे होणारे स्त्रियांचे शोषण त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याचार दूर होऊन स्त्रिया स्वावलंबी होऊन त्यांना स्वातंत्र्याचा पुरस्कार देणाऱ्या साहित्याचा उदय झाला. या साहित्यात मेघना पेठे व गौरी देशपांडे यांनी स्त्री-पुरुष, विवाह-संबंध, स्त्रियांची होणारी घुसमट व आत्मशोध याविषयी लेखन केले. हे साहित्य पुरुषांचे आत्मवधान जागृत करणारे आहे.

१९४७ ते ते १९९० च्या साहित्यामध्ये भारतीय लोकशाहीचा तोंडवळा हा समाजवादी विचारांनी प्रतिबिंबत होतो. कारण १९९० नंतर देशांमध्ये काही निर्णयाक बदल घडून आले एकीकडे प्रचंड आर्थिक वळण घेतलेला हा काळ होता तर दुसरीकडे माहिती व तंत्रज्ञान हा काळ असल्यामुळे सहकार्या ऐवजी स्पर्धा घेऊन हा काळ आला. ही स्पर्धा मूल्ये हीन व जीवघेणी होती. या सर्वांचा प्रभाव साठोत्तरी साहित्यावर पडत होता. या काळात रंगनाथ पठारे यासारख्या साहित्यिकांनी मराठी साहित्याला वेगळे वळण दिले. त्यांनी त्यांच्या साहित्यातून मराठी संस्कृतीचे आकलन व्यक्त करून मराठी साहित्य समृद्ध केले. तर याच काळात कृषिजनसंस्कृतीचे दर्शन घडवून भांडवलशाहीच्या काळात माणसं व पशु पक्षांना जगण्याचा अधिकार आहे की नाही ? असा प्रश्न राजन गवस यांनी आपल्या साहित्यातून मांडला. तसेच प्रवीण दशरथ बांदेकर यांनी भांडवलशाही धर्मशाही आशी प्रभावशाली ठरत गेली तर ती कशी समाजातक ठरणार आहे. यावर भाष्य केले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे यांचा मराठी साहित्यावर आजही त्यांच्या 'हिंदू' या कादंबरीने या पूर्ण

कालखंडाचे युगपरावर्तक कवी व लेखक म्हणून यांची नाममुद्रा मराठी साहित्यावर कोरली. याच काळात म्हणजे साठोत्तरी साहित्यात स्त्री साहित्याची भरभराट झाली. म्हणजे त्यात स्त्रियांच्या भावना व जाणीवा तसेच स्त्री जिवानुभव केंद्रबिंदू मांडून केलेले लेखन होय. या साहित्यात शिक्षणाचा प्रसार, अन्यायाविरुद्ध चीड, स्वक्षमताची जाणीव व विकास उदारमतवादी धोरण हे स्त्रीवादी साहित्य निर्मितीचे प्रेरक घटक ठरले आणि साठोत्तरी मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य महत्त्वपूर्ण ठरले.

पाश्चात्य स्त्रीमुक्ती चळवळीतून आकाराला आलेली ‘स्त्रीवाद’ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. प्राचीन काळापासून स्त्रीयांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले गेले होते. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे स्थान पुरूषांपेक्षा कमी लेखण्यात आले होते. जाणीव पूर्वक तिच्यावर अनेक बंधने लादण्यात आले म्हणून स्त्रीवादी होते. परंपरेनुसार तिला कमी लेखून तिचे कर्तृत्व, कौशल्य याकडे दुर्लक्ष केले जात होते. ‘चूल आणि मूल’ किंवा ‘रांधे वाढा उष्टी काढा’ असे ठराविक कर्तव्य पार पाडणे एवढ्या पुरतेच तिचे अस्तित्व मान्य केले जात होते. सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रात तिला डावलले जात होते.रूढी परंपरेने चालत आलेली अनेक बंधने लिंगभेद, कर्मकांड, मातृत्व, देवत्व, अशा विविध कल्पना तिच्यावरती लादून तिला प्रत्येक क्षेत्रात दडपण्याचा प्रयत्न केला जात होता. तिच्यावरती या ना त्या कारणाने सतत अन्याय अत्याचार केले जात होते. म्हणून स्त्रीवादी साहित्याचा उगम हा स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारातून झाला आहे. शिक्षणामुळे स्त्रियांना त्यांच्या अपूर्णत्वाची जाणीव होऊ लागली. पुरूषांच्या बरोबरीने व माणूस म्हणून आपणास समाजात स्थान मिळावे असे मनोमन त्यांना वाटू लागले. शिक्षण मिळाल्यावर आधुनिक काळात स्त्रीया आपल्या हक्कासाठी झगडू लागल्या. समाजात आपणास दिली जाणारी जी काही वागणूक आहे. ती मानवी अधिकाराची

पायमल्ली करणारी आहे.अशी तिला जाणीव झाली. पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता तिच्या लक्षात येऊ लागली. मग समान हक्क मिळवण्यासाठी त्या साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागल्या. आपले दुःख त्या लिहून, बोलून दाखवू लागल्या.आपल्या हक्काची, स्वातंत्र्याची त्या मागणी करू लागल्या. स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी त्या चळवळीत त्या सक्रियपणे सहभाग घेऊ लागल्या. आपल्या न्याय हक्कासाठी त्या बंड करून पेटून उठू लागल्या. यातूनच स्त्रीवादाचा जन्म झाला. म्हणून स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या उन्नतीसाठी, तिच्या विकासासाठी, तिला समान हक्क प्राप्त व्हावेत, माणूस म्हणून तिला सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी निर्माण झालेली विचारधारा आहे. पुरूषप्रधानता अधोरेखित करणे, पुरूषी मानसिकतेला शह देणे, पुरूषी वर्चस्वाचा विरोध करणे हा स्त्रीवादाचा मुख्य हेतू आहे. स्त्रियांवरती होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा विरोध करणे. स्त्रीपुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करणे यासाठी स्त्रीवाद प्रयत्नशील असतो. स्त्रीवादात स्त्री मनाची घुसमट, स्त्रियांना केवळ उपभोगाची वस्तू समजून तिचे माणूस म्हणून अस्तित्व नाकारणे, स्त्रीचे वस्तुमूल्य नाकारणे इत्यादी घटकांचा समावेश स्त्रीवादात होतो.

अशाप्रकारे स्त्री –पुरूष विषमता, लिंगभेदाचा मुद्दा हा आज एक वैश्विक मुद्दा बनला आहे.अशा या विषमतेमुळे समाजाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. स्त्रीयांच्या उन्नतीसाठी हजारो कायदे केले गेले असले तरी त्याचा काही फारसा परिणाम समाजावर झालेला दिसत नाही. कारण हजारो वर्षांपासून समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा जो काही दृष्टिकोन आहे तो अजून ही बदललेला दिसत नाही. म्हणून समाजाचे मत परिवर्तन होऊन समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. आज शासनाने स्त्रियांसाठी विविध धोरणे अस्तित्वात आणली असली तरी फार मोठ्या प्रमाणात स्त्रियांचे सामाजिक प्रश्न सुटले गेले आहेत असे म्हणता येणार नाही. बदलत्या आधुनिक समाजात

प्रसारमाध्यमांनी जी काही स्त्रियांची प्रतिमा दाखवली आहे ती चुकीची आहे.म्हणून स्त्रियांनी स्त्री देहाचे प्रदर्शन करणारे चित्रपट, मालिका, जाहिराती, नृत्य याला विरोध केला पाहिजे. स्त्री पुरूष समाज या सर्वांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. शासनाने, कुटुंबाने व समाजाने, राजकीय, समाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाच्या क्षेत्रात स्त्रियांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तरच स्त्री –पुरूष समानता निर्माण होईल. नाही तर स्त्रीवाद हा फक्त साहित्यामध्येच नावालाच अस्तित्वात राहील.

**संदर्भ ग्रंथ**


१) डॉ. शिवाजी दळणर, डॉ. संतोष हंकारे (संपादन)-समकालीन मराठी साहित्य प्रवाह.

२) डॉ. वंदना महाजन-स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन.

३) डॉ. शोभा नाईक-भारतीय संदर्भातून स्त्रीवाद.

४) डॉ. प्रल्हाद लुलेकर-साठोत्तरी मराठी साहित्य प्रवाह भाग २.

५) प्रतिभा रानडे-स्त्री प्रश्नाची चर्चा.


***

# ‘साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद’

संशोधक विद्यार्थी
हानमंत बाबुराव हांडे
संशोधन केंद्र,पीपल्स कॉलेज, नांदेड

**प्रस्तावना:**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने जसे बदल होत होते किंबहूना साहित्यातही मुलगामी अशा स्वरूपाचे बदल होणे स्वाभाविकच होते. याचाच अर्थ साहित्यक्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः प्रजासत्ताकानंतर विविध प्रवाहांना मोकळी वाट मिळून कितीतरी सकस असे प्रवाह मराठी साहित्यात अवतरले. त्यामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य याप्रमाणेच ‘स्त्रीवादी साहित्य’ ही निर्माण झाले.

मराठीत हे जे विविध साहित्यप्रवाह उदयास आले त्यापाठीमागे त्यांचा निश्चित असा हेतु किंवा गरज होती हे नाकारता येत नाही. ‘माणूस’ म्हणून आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी हाती लेखनी घेऊन प्रस्थापित पांढरपेशा व्यवस्थेविरुद्ध बंड करीत असे वास्तव चित्रण करणारे क्रांतिकारी प्रवाह मराठी साहित्यविश्वात साठोत्तरी कालखंडात एकापाठोपाठ एक आलेले आपणास दिसतात. या सर्व प्रवाहात ‘स्त्रीवादी’ साहित्य प्रवाहाने आपली वेगळी अशी छाप उमटवून एकप्रकारे मराठी समीक्षक, अभ्यासक व वाचकांचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करून घेतले आहे.

पिढ्यानपिढ्या पासून अत्यंत सहनशिल असणाऱ्या व पुरुषसत्ताक प्रतिगामी व्यवस्थेपुढे लाचारांसारखे जीवन जगणाऱ्या मात्र त्याविरुद्ध ‘ब्र’ ही न काढणाऱ्या हजारो शोषित, पीडित, वंचित व उपेक्षित स्त्रियांचे प्रश्न आणि समस्या आपल्या साहित्यातून रोखठोक पणे मांडून ते निराकरण करण्याचे काम साठोत्तरी स्त्रीवादी साहित्याच्या विचारसरणीने अथवा प्रवाहाने पहिल्यांदाच जोरदारपणे केले आहे.

संपूर्ण जगभरातील स्त्रियांवरील अत्याचार, त्यांना कुटुंबात आणि सार्वजनिक ठिकाणी मिळणारा दुय्यम दर्जा, स्त्रियांचा होणारा कोंडमारा यांचा तीव्रपणे धिःकार करत 'स्त्री पुरुष समानता' हे संविधानमूल्ये जनमाणसात रुजवण्यासाठी 'स्त्रीवादी साहित्य' समजून घेणे खूप महत्वाचे आहे. यासाठीच माझ्या प्रस्तुत शोधनिबंधाचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

स्त्रीवादाची पार्श्वभूमी कोणत्याही नवीन घटनेच्या, निर्मितीच्या पाठीमागे त्याची पार्श्वभूमी किंवा कारणमीमांसा असतेच. 'स्त्रीवाद' या नवीन चळवळीच्या मागेही ती होतीच. प्रसिध्द स्त्रीवादी लेखिका डॉ.अश्विनी धोंगडे म्हणतात. "कुठल्याही साहित्यकृतीवर समाज व संस्कृतीची छाप पडलेली असते. समाजात वारंवार घडणाऱ्या स्त्रियांच्या चळवळीशीही साहित्याचा निकटचा संबंध असतो. "विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात स्त्रियांच्या चळवळी अधिक जोमाने पसरल्या त्यामध्ये नारी समता मंच, स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद, महिला दक्षता समिती, समाजवादी महिला सभा, या चळवळींनी स्त्रियांवरील अन्याय अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या, ऑनर किलिंग, अश्लील चित्रफिती व जाहिरातीच्या माध्यमातून स्त्रियांच्या बदनामीचे प्रदर्शन, बलात्कार, हुंडाबळी, कुटुंबातील स्त्रियांचे होणारे शोषण अशा अनेक ज्वलंत प्रश्नांवर स्त्रीवादी चळवळींनी अक्षरशः रान उठविले होते.

अशा प्रकारे १९६० नंतर स्त्रीवादी साहित्य निर्माण होण्यासारखे अनुकूल वातावरण तयार झाले. जॉन स्टुअर्ट मिल व पाश्चात्य नाटककार इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' नाटकांचा प्रभाव, अशा पाश्चात्य विचारवंतांच्या प्रभावातूनही स्त्रियांनी मतदानाच्या अधिकारांसाठी एकोणिसाव्या शतकात लढा दिला होता. डॉ. धोंगडे यांनी प्रस्तुत 'स्त्रीवाद' हे आपण पाश्चात्यांकडून आयात केलेली कल्पना असल्याचे म्हटले आहे. १९ वे शतक हे महाराष्ट्राच्या दृष्टीने प्रागतिक विचारांचे शतक म्हणून ओळखले जाते.विशेषत: महात्मा फुले, सुधारक आगरकर, न्या. रानडे, महर्षी कर्वे, महर्षी शिंदे, महात्मा गांधी, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाज सुधारकांनी याकाळात स्त्री-

पुरुष समानता, अस्पृश्यता निवारण, बालविवाह बंदी, केशवपन, विधवा पुनर्विवाह, विधवांसाठी आश्रम व्यवस्था, अंधश्रद्धेचे उच्चाटन, स्त्री शिक्षणाची सुरुवात, सती प्रथेला कडाडून विरोध अशा पद्धतीने क्रांतिकारी कार्य केले होते. त्याचा परिणाम साठोत्तरी कालखंडातील स्त्री मधील आत्मभान जागृत झाले. पुण्यात १८४८ ला महात्मा फुल्यांनी स्त्रियांची पहिली शाळा काढून त्यांना शिक्षण देण्याची प्रथम व्यवस्था केली. सावित्रीबाई फुलेंनीही स्त्रियांच्या हक्कासाठी १९ व्या शतकात भरीव असे योगदान दिले. त्या काळात सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी सर्व बहुजन स्त्रियांसाठी शाळा चालवल्या.

१८८२ ला ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध स्त्रीवादी जाणिवेतून लिहिला. तिने पुरुषसत्ताक व्यवस्था व कर्मठ रूढी –परंपरेला सडेतोड शब्दात आव्हान देऊन दुर्बल स्त्रियांना आपल्या स्वत्वाची जाणीव करून दिली. मुक्त साळवे या दलित स्त्रीने देखील आपल्या निबंधातून तत्कालीन जातीयतेचे भीषण चटके स्त्रीला कसे भोगावे लागतात याचे  वर्णन केले आहे. तर पाश्चात्य देशातील अनेक घटना व स्त्रीवादी चळवळीच्या साहित्य लेखिकांचे योगदान हे भारतीय स्त्रीवादासाठी कारण ठरले १७८९ चा फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेला 'मानवी हक्काचा जाहीरनामा' १९४५ च्या दोन्ही जागतिक महायुद्धाचा संपूर्ण मानव जातीवर झालेला तीव्र परिणाम, १९७० चा 'गुंज' या स्त्री लेखिकेचा स्त्रियांच्या हक्कांविषयीचा जाहीरनामा यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेने इ.स. १९७५ ते ८५ चे दशक हे स्त्रीमुक्तीचे दशक म्हणून जाहीर केले. १९४९ ला 'सिमॉन द बोव्हा' या स्त्रीवादी लेखिकेने जागतिक पातळीवरील स्त्रियांच्या गुलामगिरी व अन्यायाची जाणीव करून देणारा 'द सेकंड सेक्स' हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर 'व्हर्जिनीया उल्फ' यांचा 'अ रुम ऑफ वन्स ओव्हन', १९६३ ला 'बेटी फ्रायडेन' यांनी लिहिलेला 'फेमिनाईन मिस्टेक' ग्रिअर यांचा 'सेक्स अँड डेस्टिनी' तसेच केट मिलिएट,  एलिझाबेथ गॅस्केल, एमील झोला व आदी विदेशी स्त्रीवादी लेखिकेच्या प्रेरणादायक लेखनामुळे व चळवळीमुळे जगभरातील शोषित, पीडित, अधिकार वंचित स्त्रिया जागृत झाल्या.

१९६० पूर्वी व नंतरचे पहिल्या पिढीतील अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकरराव खरात, वामन होवाळ, बंधू माधव, ना. रा. शेंडे इ. दलित साहित्यातील लेखकांनीही स्त्रियांच्या वेदना, दुःख व भावभावनांचे वास्तव पणे आपल्या कथा- कादंबऱ्यातून चित्रण केलेले आहे. ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथातून प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या स्त्रियांच्या जीवनाचा वेध घेतला आहे. का. शरद पाटलांनीही आपल्या वैचारिक ग्रंथातून गणमाता निऋती, मंदोदरी, शूर्पनखा अशा अनेक कर्तबगार स्त्रियांचा इतिहास वस्तुनिष्ठ स्वरूपात पुढे आणला.

स्त्रियांचे उद्धारक, दूरदृष्टीचे नेते डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तर भारतीय स्त्रियांना घटनेद्वारे अनेक प्रकारचे हक्क मिळवून दिले. १९५५च्या हिंदू कोड बिलानूसार बहूपत्नीत्व नष्ट झाले. स्त्रियांना वारसा हक्क, पोटगीचा अधिकार, वडिलांच्या संपत्तीत समान वाटा इ.फायदे मिळाले. (हिंदू कोड बिलाची म्हणावी तशी अंमलबजावणी होत नाही हा भाग वेगळा) राष्ट्रीय पातळीवरील राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती सारख्या नेत्यांनीही स्त्री सुधारणा विषयक मोलाचे कार्य केले आहे. (सतीप्रथा बंदी, विधवा पुनर्विवाहाचा प्रचार व प्रसार इ.)

थोडक्यातच भारतीय आणि जागतिक स्तरावरील विचारवंत व समाजसुधारकांनी केलेल्या परिवर्तन, तसेच १८५० ते १९५० च्या शतकातील सावित्रीबाई फुले, फातिमाबी शेख,मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे,तान्हुबाई बिर्जे, उमाबाई दाभाडे, ताराबाई मोडक, आनंदीबाई शिर्के, बायजा शिंदे, काशीबाई कानिटकर,बाया कर्वे, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, पंडिता रमाबाई, सरोजिनी नायडू, ताराबाई परांजपे, विभावरी शिरूरकर, संजिवनी मराठे आदि स्त्रियांनी केलेले सामाजिक कार्य व लेखन, ब्रिटिशांनी भारतात केलेल्या आधुनिक सुधारणा व शिक्षणप्रसार यामुळे साठोत्तरी कालखंडातील स्त्रियांमध्ये झालेली वैचारिक जडणघडण त्यातूनच स्त्रीवादाचा उदय झाला.

**ब) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना**

'स्त्रीवाद' हा माणूस असल्याची जाणीव सिद्ध करणारी आधुनिक काळातील नवी राजकीय संकल्पना आहे. जगात अनेक प्रकारचे 'वाद'अस्तित्वात आहेत. वादाला इंग्रजीत 'ism' असे म्हणतात.राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्याच्या क्षेत्रात असे 'वाद' भरपूर आहेत. उदा. समाजवाद, साम्यवाद, भांडवलवाद, अस्तित्ववाद, कलावाद, सौंदर्यवादी, अभिजातवाद, वास्तववाद त्याप्रमाणेच 'स्त्रीवाद' ही १९६०च्या दशकात स्त्रियांनी रूढ केलेली विचारप्रणाली आहे. 'स्त्रीवाद' हा शब्द स्त्री + वाद अशा दोन शब्दांनी गुंफलेला आहे. स्त्रीवादाचा अर्थ सष्ट करतांना असे सांगता येईल की, आपल्या न्याय-हक्कासाठी स्त्रियांनीच रूढ केलेला 'प्रतिकात्मक शब्द' अथवा स्त्री चळवळीला दिलेले सार्थ नाव म्हणजे स्त्रीवाद होय. पण ही संकल्पना पाश्चात्यांकडून आपण आयात केली असे काही समीक्षकांना वाटते.

मात्र आपल्या इतिहासात जर आपण डोकावून पाहिले तर असे दिसते की, प्राचीन व मध्ययुगीन काळापासून अनेक स्त्रियांनी धर्माची बंधने, अनिष्ट रूढी परंपरेला न जुमानता आपल्या धाडशी व बाणेदार व्यक्तिमत्वाने अनेक संकटांवर यशस्वीपणे मात करून इतिहासात आपले श्रेष्ठ कर्तृत्व सिद्ध केले आहे. उदा. आक्कानागम्मा, संत कवयित्री जनाबाई, कान्होपात्रा, निर्मळा, सोयराबाई, मुक्ताई इ. पुढे १७ व्या शतकात राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, त्यानंतर सावित्रीबाई फुले, फातिमाबी, ताराबाई शिंदे वगैरे अनेक स्त्रियांची नावे घेता येतील.

सभ्यता आणि संस्कृतीच्या नावाखाली प्राचीन काळापासून स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी लेखण्यात आले. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला चूल आणि मूल इथपर्यंतच सिमित ठेवले. डॉ. सोनल समरे महत्त्व "स्त्री म्हणजे लाज, संकोच, शोषण आणि वर्षानुवर्ष बंधनाने, गुलामगिरीने जखडलेलं मूर्तिमंत प्रतिक आहे." त्या पुढे म्हणाल्या, मनातील भावना व्यक्त करायचे नाही, समाजात मान वर करून चालायचे नाही, स्त्रीचं जगणं म्हणजे स्वयंपाकघर व त्या घरामागचा व्हरांडा एवढंच. तर

स्त्रीवाद या संकल्पनेचा अर्थ सांगताना प्रा. किरण जगदाळे आपल्या "साहित्यातील स्त्रीवादी विचारवैविध्य" या ग्रंथांत म्हणतात, "पुरूषसत्ताक समाजव्यवस्थे विरूद्ध आणि सर्व मनुवादी, धर्मवादी, वर्गवारी, धर्मांध विचारप्रणाली विरूद्ध विषय शोषणाधारित, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध राजकीय भूमिकेतून प्रेरित होऊन स्त्रियांनी केलेले लेखन होय." पाश्चात्य लेखिका 'सिमोन द बोव्हु' आपल्या ग्रंथात "स्त्री ही बाई म्हणून जन्माला येत नाही तर ती घडवली जाते." असे मार्मिक विधान करतात. तर स्त्री ही एक गुण संकल्पना आहे ती कुणालाही पुर्णतः समजणार नाही असे डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात. स्त्रीला देवी, माता, तारक, आदिशक्ती, दुर्गा वगैरे संबोधतांनाच दुसरीकडे तिला वेश्या, कलंकिंनी, व्यभिचारी, पापी ठरवून पुरूषांच्या मक्तेदारीने त्यांना प्रवाहाच्या बाहेर काढले. स्त्री आणि पुरुष या शब्दात अनेक अर्थ प्रचलित आहेत. स्त्री म्हणजे नम्रपणा, लाजाळुपणा, भित्रेपणा, सहनशीलता, कामसू, देखणी, उपभोग्य वस्तू, आज्ञाधारक, दुःखी, कष्टी इ.तर पुरूषांच्या बाबतीत मात्र धाडसी, सामर्थ्यवान, कणखर, रांगडा, सुसंस्कृत वर्चस्ववादी, पराक्रमी, मर्द अशी विशेषणे लावली जातात. लिंगभेदाच्या आधारे असे दोन भिन्न सामाजिक घटक मुद्दाम निर्माण केलेले आहेत. असेही अश्विनी धोंगडे म्हणतात. पण आज या बुरसटलेल्या संकल्पनेला छेद देऊन अनेक स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत.

**१९६०  स्त्रीवादाच्या व्याख्या व उद्दिष्टे.**

स्त्रीवाद म्हणजे काय? स्त्रीवाद समजून घेण्यासाठी आपल्याला स्त्रीवादाच्या काही निवडक पण महत्त्वपूर्ण व्याख्या लक्षात घेणे गरजेचे आहे.

१) स्त्रियांचे, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे 'स्त्रीवादी साहित्य' होय. – मराठी विश्वकोश.

२) स्त्रीला तिच्या गुलामीची जाणीव होणे आणि तिने आपल्या गुलामीविरुद्ध बंड करणे यालाच 'स्त्रीवाद' असे नाव देता येईल. – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३) मानव म्हणजे पुरुष आणि स्त्री हे पुरुषांचे उपांग अशा विचाराला धुडकावणारे याबद्दल प्रश्न निर्माण करणारे साहित्य हे 'स्त्रीवादी साहित्य' म्हणता येईल. – प्रा. किरण जगदाळे.

४) स्त्रियांनी, स्त्रियांच्या प्रश्नांविषयी स्वत्वाचा शोध घेत लिहिलेले साहित्य म्हणजे 'स्त्रीवादी' साहित्य होय.- डॉ. राहुल रजनी.

५) स्त्रीने 'बाईपणाची' कात टाकून माणूसपणाचे नवे रूप धारण करणे म्हणजे 'स्त्रीवाद' होय.- य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

६) स्त्री म्हणून घडतांना आलेल्या विविध अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे 'स्त्रीवाद' होय. – विद्युत भागवत.

व्याख्येप्रमाणेच स्त्रीवादाची काही उद्दिष्ट ही आहेत ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) स्त्रीयांना शोषण व सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्त करणे.

२) स्त्रियांना 'माणूस' म्हणून माणसासारखी वागणूक देणे.

३) स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणे सर्व क्षेत्रात समान संधी व दर्जा मिळवून देणे.

४) भारतीय संविधानातील 'स्त्री –पुरुष समानता' या मुलभूत तत्वाचे पालन करणे.

५) कुटुंब, समाज व राष्ट्राचा खऱ्या अर्थाने विकास करण्यासाठी स्त्रियांना प्रथम प्राधान्य देणे

६) स्त्रित्वाला बाधा आणणाऱ्या कालबाह्य व वाईट प्रथा-परंपरेवर बंदी आणणे.

७) स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन आदर्श व निकोप ठेवणे.

८) महाराष्ट्र व देशाच्या कानाकोपऱ्यात स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरूध्द स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून आवाज उठवणे.इ.

**ड) साठोत्तरी स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप व भूमिका.**

१९६० च्या दशकात मराठीत 'स्त्रीवादी साहित्य' विपूल प्रमाणात लिहिले गेले आहे. डॉ. वंदना महाजन, अश्विनी धोंगडे वगैरैनी म्हटल्याप्रमाणे केवळ स्त्रीनी लिहिलेले साहित्य हे स्त्रीवादी साहित्य

म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे पुरुषांनी स्त्रियांवर केलेले लेखन म्हणजे 'स्त्रीवादी साहित्य' असेही म्हणता येणार नाही. कुमुदिनी रांगणेकर, सुमती क्षेत्रमाडे इ. स्त्रियांनी

जे साहित्य प्रारंभी लिहिले ते केवळ सौंदर्यवादी दृष्टिकोनाचेच आहे. त्यात स्त्रीवादाचा लवलेशही आढळणार नाही असे आहे. स्त्रियांच्या भावभावना, मन व अस्मिता जपणारे, शील व स्वाभीमानाचे संरक्षण करणारे सशक्त अशा प्रकारचे लेखन. साठोत्तरी 'स्त्रीवादी' साहित्याचे स्वरूप व भूमिकांचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

१९६० मध्ये अमेरिकेत स्त्रीवादाचा प्रसार जोमाने होत होता. भारतातही स्वातंत्र्या नंतर सीवादी साहित्याची सुरुवात होऊ लागली. स्त्रीचा म्हणून असलेला खास अनुभव स्त्रीनेच सांगावा लागतो. पुरुषांना ते जमणार नाही. असे मत स्त्रीवादी लेखिका मांडतात. ते एकदम बरोबर आहे. कारण पुरुष लेखक स्त्रीयांविषयी कितीही सहानुभूतीपूर्वक जरी लिहित असेल तरी त्यात अस्सलपणा येत नाही. स्त्रीवादी साहित्याची भूमिकाच प्रस्थापितांविरुद्ध बंड करणारी आहे. परंपरा व धर्मांधतेला नकार देऊन 'स्व'चा शोध घेणाऱ्या शोधकाची भूमिका स्त्रीवादी साहित्य घेते. साठोत्तरी मराठी कवितेच्या स्वरूपाबाबत सांगतांना स्त्रियांकडून या काळात कवितेचे सर्वाधिक लेखन झाले असले तरी ते फक्त रोमँटिक, प्रेमाचे चित्रण, अलंकारिक भाषा, प्रतिमा आणि रूपके वापरूनच लिहिण्यात आले आहे. पद्मा गोळे, इंदिरा संत (शेला, मेंदी, बाहुल्या इ.) यांनी 'स्त्रीजीवनाचे' बदलते रूप सांगीतले. संजिवनी मराठे, अनुराधा पोतदार (आवर्त, मंझधार), शांता शेळके व पुढे अरुणा ढेरे यांची कवितांही पारंपरिक वळणाचीच वाटते.

पुरुष कवींनीही केवळ स्त्रीला बायको, प्रेयसी व माता मानून फक्त प्रेमकाव्येच लिहिली. मात्र स्त्रियांच्या भावना, मन, इच्छा-आकांक्षा याकडे लक्ष दिले नाही. अपवाद म्हणून पहिल्यांदाच मल्लिका अमरशेख' या कवयित्रीने मराठीत 'वाळूचा प्रियकर' (१९७९) हा कवितासंग्रह लिहून स्त्रियांच्या वेदना, दुःख, बकाल आयुष्य आणि दारिद्र्याचे वास्तव चित्रण केले. नीरजा यांच्या कवितेचे स्वरूपही असेच आहे. १९८८ ला कवयित्री अश्विनी धोंगडे यांनी आपल्या

‘स्त्रीसूक्त’ या काव्यसंग्रहात मध्यमवर्गीय स्त्रियांचे जगणे मांडले आहे. स्त्रीला यंत्र समजून राबवून घेणे, उपभोग घेऊन तिला सतत दडपणाखाली ठेवणे यागोष्टींचा त्यांनी उपरोधाने धिक्कार केला. गृहिणी, मोलकरीण म्हणून आयुष्यभर स्त्रिया पुरुषांची निमूटपणे सेवाच करावी. काय? असा प्रश्नही पुरुषसत्ताक व्यवस्थेला विचारणारा पहिला स्त्रीवादी कवितासंग्रह म्हणून ‘स्त्रीसूक्त’ ओळखला जातो. सिसिलिया कार्व्हालो, रजनी परुळेकर, प्रज्ञा लोखंडे, सुहासिनी इर्लेकर, हिरा बनसोडे, प्रतिमा इंगोले, उषा मेहता, ज्योती लांजेवार, प्रज्ञा दया पवार इ. कवयित्रींनीही स्त्रीवादी आशयाच्या कविता पुष्कळ प्रमाणात लिहिल्या. त्यांच्या काव्यातून परंपरेच्या आणि संस्कृतिच्या नावाने स्त्रियांची झालेली घुसमट, त्यांचा एकाकीपणा, त्यांना ‘बाई’ म्हणून दिलेला हिन दर्जा यामूळे त्यांच्या वाट्याला आलेले दुःख आणि निराशा यांचे वर्णन आलेले आहे. मालतीबाई बेडेकरांपासून ते १९७० नंतर गौरी देशपांडे, तारा वनारसे, कविता महाजन, अंबिका सरकार, शांता गोखले, ज्योत्स्ना देवधर, कमल देसाई, रेखा बैजल, प्रतिभा रानडे प्रिया तेंडुलकर, आशा बगे, सानिया इ.स्त्री लेखिकांनी स्त्रियांच्या मानसिकतेचा शोध घेणाऱ्या कादंबऱ्या लिहून स्त्रीवादी साहित्यात मौलिक भर घातली. साठोत्तरी कादबरी विविध प्रश्नांवर भाष्य करतांना दिसते. शांता शेळके यांची ‘ओढ’ प्रतिमा इंगोले यांची ‘बुढाई’ आणि मथू सावंत यांची ‘राहू केतू’ या कादंबऱ्य’ ग्रामीण आणि प्रादेशिक स्त्रीजीवनाचा वेध घेणा-या आहेत. डॉ. मंगला वरखेडे म्हणतात गौरी देशपांडे’ मेघना पेठे ह्या ताराबाई शिंदेंचा विद्रोही स्त्रीवादाचा वारसा पुढे चालवणाऱ्या ‘साठोत्तरी स्त्री लेखिका आहेत. गौरी देशपांडेंनी आपल्या कथा – कादंबऱ्यात पुरुष पात्रांना मुद्याम सर्वनामाचे रूप देऊन स्त्रीपात्रांनाच अधिक प्राधान्य दिले आहे. त्यांच्या कथांतील पुरुष पात्रे हे बिनचेह-यांचे प्रियकर आहेत असे अनेक समीक्षकांनी देखील म्हटले आहे.

सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे इरावती कर्वे, दुर्गा भागवत, बहिणाबाई चौधरी यांच्या संस्कारातून अलिकडच्या काळातील इंदिरा संत, पद्मा गोळे, वंदना विटणकर, शांता शेकडे, शिरिष पै (आचार्य अत्रे

यांची कन्या) इ.नी लेखन केले. १९६० नंतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील स्त्रीवादी चळवळी, स्त्रियांचे हक्क-अधिकार, अवहेलना, स्त्रियांच्या व्यथा, कुटुंबातील मुस्कटदाबी इ. प्रश्न घेऊन रचनात्मक कार्य केले. यातूनच स्त्रियांना एकप्रकारे स्वत्वाचे भान व जाण आली. तसेच व्यवसाय, नोकरी, शिक्षण यामुळेही त्यांच्या जीवनात प्रचंड बदल झाले. यासर्वांचे पडसाद स्त्रीवादी साहित्यावर पडले. १९७५ नंतरच्या काळातील स्त्रीवादी नियतकालिकांचेही कार्य फारच महत्वाचे होते. १९८९ ला विद्या बाळ यांचे 'मिळून साऱ्याजणी' हे स्त्री मासिक, सौदामिनी राव यांचे 'बायजा' (१९७७), शारदा साठे यांचे 'प्रेरक ललकारी', मिनाक्षी मून यांचे 'कान्ही मैतरणी, 'अरुणा सवाणे यांचे 'अनुष्टूभ' व 'आकांक्षा', डॉ. निलम गोऱ्हे यांचे 'आम्ही स्त्रिया' तर १९८७ ला विद्या बाळ यांनी, 'स्त्री उवाच' हा वार्षिक अंक काढला होता. या प्रकारच्या स्त्रीवादी नियतकालिकातून स्त्रियांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. तसेच बौध्दिक विचार मंथन व स्त्रीवादी चळवळीला नवे अधिष्ठान प्राप्त करून दिले. याबद्दल डॉ. सदाशिव सरकटे म्हणतात की, "या नियतकालिकांनी स्त्रियांना समाजाकडे बघण्याची नवी दृष्टी दिली. छाया दातार, विनया खडपेकर, मीनाक्षी साने, मुक्ता मनोहर, मालिनी तुळपुळे, निलीमा गुंडी, सुषमा दातार, उर्मिला पवार, आशा साठे इ. स्त्रियांनीही या नियतकालिकेद्वारे स्त्रियांच्या मनोविश्वाचे यथायोग्य मूल्यमापन करणारे त्यांना न्याय मिळवून देणारे चिंतनशिल लेख लिहिले आहेत.

लोकगीतांचा लोप पावलेला प्रवाह स्त्रीवादी साहित्यानेच संशोधनातून नव्याने शोधला. तारा भवाळकर, सरोजिनी बाबर, कुमुद पावडे, सुहासिनी इर्लेकर, दुर्गा भागवत इ. नी लोकसाहित्याची नव्याने समीक्षा केली आहे. श्री व्यं. केतकरांनी आपल्या 'ब्राम्हणकन्या' या कादंबरीत स्त्रीयांचे सामाजिक प्रश्न मांडले होते. त्यांच्या अगोदर १८५७ ला बाबा पद्मनजीनी 'यमुना पर्यटन' या कादंबरीत हिंदू विधवा स्त्रीला सन्मानाने जगण्यासाठी धर्मातरा शिवाय पर्याय नाही असा नवा मार्ग सूचविला. ह. ना. आपटे, वा. म. जोशी,रा.ग. गडकरी, देवल वैगैरेंनीही काही अंशी स्त्रीप्रश्नांची चर्चा करून साठोत्तरी स्त्रीवादी

साहित्याचा पाया बळकट करण्याचे काम केले आहे. या सर्वांच्या पाठीशी १९ व्या शतकातील फुले, शाहू आंबेडकरी विचार व कार्याची यशोगाथा होतीच. स्त्रीवादी दृष्टिकोन व जाणीवा आत्मकथनातूनच प्रकर्षाने दिसून येतात. विशेषतः दलित स्त्रियांनी लिहिलेली सर्वच आत्मकथने या दृष्टिने महत्वाची आहेत. स्त्रियांच्या एकूणच जगण्याचे प्रतिबिंब त्यांच्या आत्मचरित्रात ठळकपणे दिसतात. १९६० च्या पूर्वीची आत्मचरित्रे मात्र तितकी स्पष्ट नव्हती. साठोत्तरी कालखंडात अनेकांनी आत्मचरित्रे लिहिली. माधवी देसाईचे 'नाच गं घूमा', मल्लिका अमरशेखांचे 'मला उध्वस्त व्हायचे आहे!' कमल पाध्ये यांचे 'बंध-अनुबंध' कुमुद पावडे यांचे "अंतःस्फोट', शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', बेबीताई कांबळे यांचे 'जीणं आमुचं', उर्मीला पवार यांचे 'आयदान', सुनिताबाई देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', सिंधुताई सपकाळ यांचे 'मी वनवासी', गोदावरी परुळेकर यांचे 'जेंव्हा माणूस जागा होतो', स्नेहप्रभा प्रधान यांचे

'स्नेहांकिता', हंसा वाडकरांचे 'सांगत्ये ऐका!', शांता हुबळीकर यांचे 'कशाला "उद्याची बात?'मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे', जनाबाई गिऱ्हे यांचे 'मरणकळा', विमल मोरे यांचे 'तीन दगडाची चूल',दुर्गा खोटे यांचे 'मी दुर्गा खोटे' आणि लीला चिटणीस यांचे 'चंदेरी दुनिया' ही सारी प्रभावी अशी आत्मकथने आहेत. एक कलावंत दलित स्त्री आपल्या "पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची" या गीतातून भांडवली व्यवस्थेमूळे आलेल्या दुःख व दारिद्र्याविषयीची विद्रोही भावना मांडते. आत्मचरित्रे म्हणजेच गतकाळातील अनुभवाचा आलेख होय. या उक्तीप्रमाणे या काळातील अनेक कलावंत, कार्यकर्त्या व दलित चळवळीतील स्त्रियांनी आपल्या आत्मकथनातून भीषण जीवनातील विविध रसरशित अनुभव व आठवणीच व्यक्त केल्या आहेत. "अपमान, तिरस्कार, मानहानी, अत्याचार, छळाविरूद्ध पाढा वाचून या लेखिकेंनी आपल्या आत्मकथनातून प्रतिष्ठित पांढरपेशा समाजाला व पुरुषी वर्चस्वाला प्रचंड धक्काच दिला आहे. साठोत्तरी स्त्रीवादी मराठी साहित्यातील सर्व वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत आत्मकथने मोठ्या प्रमाणात लिहिण्यात आली आहेत. १९६० पूर्वी व नंतरच्या कालखंडातील वास्तववादी लेखक म्हणून अण्णा भाऊ साठेंनी आपल्या

साहित्यात ‘चित्रा’, ‘मंगला’, ‘रूपा’, ‘दुर्गा’ वगैरे स्त्रियांचे बंडखोर नायिका म्हणून प्रभावीपणे चित्रण केले. तर मुंबईतील स्त्रीवादी संघटनेच्या ज्योती म्हापसेकर यांचे ‘मुलगी झाली हो!’ हे नाटकही स्त्रीमुक्तीसाठी प्रेरणादायक आहे. १९७५ नंतर कृष्णाबाई मोटे यांचे ‘काळाची पावले’, ‘स्त्री मुक्ती केंव्हा व कशी झाली?’ हे सुशिला पटेल यांचे पुस्तक ‘तारा भवाळकरांचे’ लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा’, गीता साने यांचे ‘भारतीय ‘स्त्रीजीवन’ हे पुस्तक, तर अलिकडे उत्तम कांबळे यांचे ‘आई समजून घेतांना’ इ. पुस्तकांतून स्त्रियांचे समाजातील असलेले वेगळे स्थान, मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न, त्यांचे राहणीमान, सामाजिक – आर्थिक व मानसिक पिळवणूकीला समर्थपणे तोंडदेणाऱ्या स्त्रियांचा जीवनसंघर्ष इ.चे उत्कट वर्णन आलेले आहे. कमल देसाई यांची ‘ रंग, आशा बगे यांची ‘रुक्मिणी’ छाया दातार यांचा ‘लाराची गोष्ट’ गौरी देशपांडे यांचा ‘एकेक पान गळावया’ (१९८०), सानिया यांचा ‘दिशा’ घराच्या’ (१९९१), प्रिया तेंडूलकरांचा ‘ज्याचा त्याचा प्रश्न’ (१९८७), ‘नवा गडी’, मेघना पेठे यांचा ‘हंस अकेला’ (१९९७) व आंधळयाच्या गाई (२०००) हे कथा- संग्रह. तर सुधा नरवाडे, विजया राज्याध्यक्ष, शांता शेळके, प्रतिमा इंगोले, अंबिका सरकार, सानिया, संध्या रंगारी इ. सर्वच स्त्रियांनी आपल्या कथालेखनातून स्त्रियांच्या मनोविश्वाचे दर्शन घडवले. तर उषाकिरण आत्राम, नजुबाई गावित, प्रतिमा परदेशी, प्रतिभा अहिरे, वृषाली किन्हाळकर,ज्योती लांजेवार, सुषमा अंधारे इ.स्त्रीवादी लेखिकांच्या साहित्यातून आदिवासी, दलित स्त्रियांचे शोषण व उच्च मध्यमवर्गातील  स्त्रियांचे प्रश्न, विवाहबाह्य संबंधांमुळे त्यांचा होणारा मानसिक कोंडमारा, घटस्फोट झालेल्या स्त्रियांचा एकटेपणा, लैंगिक संघर्षातून उद्भवणारे प्रश्न, अशा प्रकारे स्त्री-पुरुषांच्या अंतर्मनाचे बारकाईने शोध घेणारे व पुरूषप्रधानतेला आव्हान देणारे स्त्रीवादी स्वरूपाचे लेखन केले. याबाबतीत डॉ. ईरावती कर्वे यांनी मांडलेले विचारही लक्षात घेण्यासारखे आहेत. त्या म्हणतात. “स्वतःच्या चिमूकल्या संसाराबाहेर समाजाचा जो संसार चालू आहे त्यात प्रत्येक स्त्रीने मन घातले पाहिजे. हेच समाजाचे देणे आहे.”

थोडक्यातच वरील कथा लेखिकेंनी स्त्रीवादी जाणीवेतून आपले लेखन केले व मराठी 'कथा वाङ्मयाचे विश्व' समृद्ध केले.

### इ) उपसंहार / निष्कर्ष

एकंदरीतच सर्व स्त्रीवादाचा, मागोवा घेत असता स्त्रियांनी गतकाळातील आपल्या जीवनाचे सूक्ष्म परिक्षण करुन नव्या शोषणमुक्त समाजाची निर्मिती करण्यासाठी साठोत्तरी कालखंडात विविध साहित्य प्रकार हाताळून त्यातून आपल्या भाव-भावनांना मोकळी वाट करुन दिली आहे असे म्हणता येईल. तरी देखील आधुनिक काळातील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे शहरी स्त्रियांच्या राहणीमानात बदल झाला आहे. राजकीय क्षेत्र साहित्य क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सिनेक्षेत्र, प्रसारमाध्यम, अंतराळ अशा क्षेत्रात आज महिला उंच भरारी घेऊन मनसोक्त जीवन जगत आहेत. भरपूर कमावता पती, अलिशान बंगला, घरात टि.व्ही, फर्निचर, रेफ्रिजरेटर, कुलर, वॉशिंग मशिन, नोकर चाकर, या आत्याधुनिक सोई सुविधा, सौंदर्याचा अतिहव्यास यामुळे प्रचंड खर्च करतांना, मालिका व जाहिरातीतून आपले 'अंगप्रदर्शन' करताना एकीकडे याकाळातील स्त्रिया दिसत आहेत. राजमाता-जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले'मदर टेरेसा, सिंधुताई सपकाळ, बहिणाबाई चौधरी अशा महान स्त्रियांचा त्याग, प्रेरणा व वारसा जपण्याऐवजी आजच्या पांढरपेशा स्त्रिया आधुनिकतेच्या नावाखाली अंधश्रध्देच्या, आहारी जाऊन स्वार्थी, कृतघ्न बनत असल्याचे भेसूर चित्र आहे. तर दुसरीकडे ग्रामीण भागातील व शहरी भागातील गोरगरीब स्त्रिया, निरक्षर स्त्रिया, कामगार स्त्रिया, आदिवासी भागातील, भटक्या विमुक्त, अल्पसंख्यांक स्त्रिया वाघ्या-मुरळी, देवदासी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया अशा सर्व स्तरातील विकासापासून कोसोदूर असणाऱ्या बहुसंख्य स्त्रियांच्या समस्या आजही गंभीर अशा प्रकारच्या आहेत. त्यांना अजूनही खऱ्या अर्थाने 'स्त्रीवाद' म्हणजे काय? ही जाणीव झाली नाही. स्वातंत्र्याची फळे त्यांच्यापर्यंत अजून पोहचायची आहेत. केवळ मूठभर गर्भश्रीमंत स्त्रियां आज सर्व बाबतीत सुखी झाले असले तरी स्त्रियांचे मूलभूत प्रश्न आजही बरेच शिल्लक आहेत. म्हणून डॉ. सोनल भामरे यांच्या आपल्या शब्दांत सांगावेसे वाटते की, "ज्या दिवशी स्त्री मोकळेपणाने श्वास घेऊन पुरुषांइतकेच जीवन जगू शकेल,

त्यावेळी खरी स्त्री-पुरुष समानता निर्माण होऊन स्त्री आपले जगणे आपल्या शब्दांत मोडू शकेल तोच खरा 'स्त्रीवाद' होय.

**संदर्भग्रंथ सूची**


१) भागवत विद्युत — स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती – २००९

२) लिंबाळे शरण कुमार —साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती – २०१४

३) महाजन वंदना —स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २०१

४) धोंगडे डॉ. अश्विनी — स्त्रीवादी समीक्षा – स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे

५) भामरे डॉ. सोनल—स्त्रीवादी साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, मार्च, २०१५

६) खिवसरा मंगल — स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५

७) लांडे सुमती (संपा.) — 'स्त्रीवाद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, (२००७)

८) जगदाळे प्रा. किरण आगतराव — साहित्यातील स्त्रीवादी विचारवैविध्य, गोदावरी प्रकाशन, सावेडी, अहमदनगर, २०१९

९) दीक्षित स्वाती — सेट/ नेट, मराठी (पेपर-२) संदर्भग्रंथ, निराली प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे,(२०१९)

१०)साळुंखे डॉ. आ. ह.— हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौदावी आवृत्ती, २०१


***

# साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य आणि स्त्री जीवन

**प्रा. डॉ. जगताप यु. एस.**
शारदा महाविद्यालय, परभणी

१९६०नंतर मराठी साहित्यात जे अनेक प्रवाहनिर्माण झाले त्यात ग्रामीण मराठी साहित्य हा एक महत्वाचा प्रवाह मानला जातो. तत्पूर्वी १९२० पासून ग्रामीण साहित्य लिखाणाला सुरूवात झाली असली तरी ग्रामीण जीवनाकडे पाहण्याची लेखकाची दृष्टी स्वप्न रंजनात्मक किंवा मनोरंजनात्मक होती असेदिसते. या संदर्भात डॉ. र.बा.मंचरकर म्हणतात,

"१९१० ते १९४० या कालखंडात स्वप्नरम्यतावाद आणि ध्येयवादी आदर्शवाद अशा दोन डोळयांनी ग्रामजीवनाकडे पाहिले गेले त्यात एका स्थिर संस्कृतीचे दर्शन होते. तिच्या परिचयाची नवाई आणि उल्हास होता". १९४० ते १९६० मध्ये मात्र ग्रामीण लेखकांच्या लेखनामधुन वास्तववादी जाणिवा प्रभावी पणे आलेल्या पाहवयास मिळतात. त्यांनी आपल्या साहित्यातून रंजन आणि उद्बोधन या दोन्ही गोष्टींना टाळून ग्रामीण संस्कृतीचे वास्तव चित्रण करण्याचा प्रयत्न केला. यात प्रामुख्याने श्री. म. माटे, व्यंकटेश माडगुळकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर. यांचा उल्लेख करता येईल. यांनी आपआपल्या भागातील लोकजीवनाची चित्रे साहित्यातून साकार केली. यातील बहुतांश लेखक उच्चवर्षीय व मध्यमवर्गीय होते. त्यांनी बालपणी अनुभवलेले ग्रामीण जीवन नागरी वाचकांपुढे मांडले त्यामुळे त्यांच्या लेखनाला परिचयात्मक व वर्णनात्मक स्वरूप आलेले असल्यामुळे त्यांच्या ग्रामीण साहित्यावर नागरी साहित्याचा प्रभाव पडलेला दिसतो. या संदर्भात प्राचार्य रा. रं. बोराडे म्हणतात,

"१९६० पर्यंतच्या काळात जे ग्रामीण साहित्यात लिहिलं गेले आहे. त्या ग्रामीण साहित्यात कृषी व्यावसायाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या, पण ग्रामीण जीवनाचा घटक असलेल्या एखादया ग्रामस्थानं आपल्या गावातल्या एखादया शेतकऱ्याच्या शेताच्या बांधावर उभं राहून आपल्या शहरी मित्राला ते शेत दाखवावं तशा स्वरूपाचं ते चित्रण आहे. त्यांच्या निरिक्षणात बारकावे आहेत. पण हे बारकावे त्यांच्या नजरेने हेरलले आहेत. त्यांच्या साहित्यात कृषी

जीवनाचा तपशील येतो, पण तो तपशील जाता येता त्याच्या मनानं टिपलेला आहे".

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण समाज जीवनात अमुलाग्र बदल होऊ लागला होता. ग्रामविकासाच्या अनेक योजना खेडयापाडयात पोहोचल्या होत्या. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे ग्रामीण माणसांचा शिक्षणाविषयीचा पारंपरिक दृष्टिकोन बदलु लागला आपल्या ही मुलांनी शिकायला हवेअसे त्यांना वाटू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांची, शेतमजुरांची मुले नव्या जोमाने, नव्या उत्सहाने शिकु लागली. खेडयापाडयापर्यंत सर्वदूर पोचलेल्या शिक्षणाने अनेक ग्रामीण तरूणांना लिहिते ठेवले. स्वत:चे अनुभव अविष्कृत करण्याची संधी मिळाली. शिवाय शिक्षण घेऊन नोकरीच्या, व्यावसायाच्या निमित्ताने शहरात स्थायिक झालेल्या मुलांपैकी काही मुले मराठी साहित्याची वाचक होऊ लागली. स्वाभाविकच त्यांना ग्रामीण साहित्य जवळचे वाटू लागले, ग्रामीण साहित्यिकांच्या संख्येतही हळुहळु वाढ होत गेली आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याला सुरूवात झाली. एक नवा आशय, ग्रामीण जीवनातील रूढी, प्रथा, परंपरा, सामाजिक, आर्थिक, संस्कृतीक जीवनाचे वास्तव चित्रण करून मराठी ग्रामीण साहित्य समृध्द करण्याचे कार्य तत्कालीन लेखकांनी केले.

१९६०-१९७५ च्या दरम्यान आनंद यादव, रा. रं. बोराडे, उध्दव शेळके, सखा कलाल, शंकर पाटील, भास्कर चंदनशीव, द. ता. भोसले अशा अनेक लेखकांनी ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. इ.स. १९६० ते इ.स. २०२० पर्यंत अनेक पिढया ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात तयार झाल्या आहे. कादंबरी क्षेत्राचा विचार केला तर उध्दव शेळके, रा. रं. बोराडे, शंकर पाटील पासून ते रंगनाथ पठारे, राजन गवस, सदानंद देशमुख, प्रवीण वांदेकर पर्यंत अनेकांची नावे घेता येतील. कथा प्रवाहातही शंकर पाटील, ग. दी माडगूळकर, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील, उध्दव शेळके, चंद्रकूमार नलगे, महादेव मोरे, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर अशा कितीतरी कथालेखकांची नावे सांगतात येतील तर कवितेच्या क्षेत्रात ना.धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, बहिणाबाई चौधरी, फ.म. शहाजिंदे, जगादिश कदम, नारायण सुमंत, संतोष पवार अशा अनेक उल्लेखनीय कवींचा येथे उल्लेख करता येईल. प्रातिनिधीक स्वरूपात वरील साहित्यिकांचा उल्लेख केला आहे. थोडक्यात काय तर आज मराठी ग्रामीण साहित्याचे क्षेत्र विश्व व्यापक झाले आहे. असे पाहवयास मिळेल.

स्वातंत्र्योत्तर काळात अगदी सुरूवातीच्या कालखंडातील मराठी ग्रामीण साहित्य हे नागरी साहित्याचे अनुकरण करत असल्या ने किंवा नागरी जीवनाचा प्रभाव पडल्यामुळे ग्रामीणी स्त्रीचे वर्णन तितकेसे पाहवयास मिळत नाही. परंतु १९६० नंतर जे ग्रामीण साहित्यिक उदयास आले. त्यांच्या ग्रामीण साहित्यात स्त्रीच्या वास्तव जीवनाचे चित्रण प्रकर्षाने आढळते. याचे महत्वाचे कारण म्हणजे, १९६० नंतर जे ग्रामीण साहित्यिक उदयाला आले. त्यांच्यापैकी बहुतांश ग्रामीण साहित्यिक बहुजन समाजात जन्माला आलेले आहेत. या बहुजन समाजातली स्त्री हीच खरी प्रातिनिधीक ग्रामीण स्त्री आहे. या ग्रामीण स्त्रीच्या वास्तव जीवनाचे यथार्थ चित्रण करण्यात सुरूवातीच्या काही ग्रामीण लेखकांनी नक्कीच यश मिळवले आहे असे म्हणता येईल. उदा. उध्दव शेळके यांच्या 'धग' कादंबरीतील 'कौतिक' असो, रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीतील 'पारबती' असो किंवा आनंद यादव यांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतील 'तारा' असो यांचा प्रातिनिधीक स्वरूपात उल्लेख करता येईल. या लेखकांनी ग्रामीण स्त्रीच्या सर्व समस्यांचा अतिशय बारकाईने अभ्यास करून ती प्रतिमा आपल्या लेखनातुन रेखाटली आहे. विशेषत: या स्त्रीया मुलगी, बहिण, सुन, पत्नी, आई, सासु अशा अनेक नात्यातून ती साकार होते. रा. रं. बोराडे यांच्या ग्रामीण साहित्यातून स्त्रियांची होणारी कुचंबणा, ओढाताण, मुस्कटदाबी, मुकवेदना व सोशिकता यांचे चित्रण आहे. 'पाचोळा' या कादंबरीतून शहरीकरणामुळे ढासळणारा ग्रामीण व्यावसयिक गंगाराम शिंपी आणि त्याचीबायको पारबती यांच्या जीवनातील व्यथा वेदनांचे चित्रण समर्पक आले आहे. हट्टी व तापट नवऱ्याला समजावण्याचा आणि गरडासारख्या उभ्या ठाकलेल्या संकटाला पारबती समर्थपणे तोंड देत राहते. तर 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीतून पती-पत्नीच्या परस्पर संबंधातील वर्चस्व भावनेचा धागा पकडून सत्तासंघर्ष रेखाटला आहे.

आनंद यादव यांनी 'झोंबी', 'नागरणी', 'काचवेल' व 'नटरंग' यासारख्या उत्तम साहित्यकृती निर्माण केल्या. त्यांच्या साहित्यातून भेटणारी स्त्री देखील नात्यागोत्यांच्या गराडयातून तावून सुलाखून निघालेली आहे. 'मुलगी म्हणजे परक्याचे धन' या कौटुंबिक व सामाजिक विचारात वाढलेली तारा वयाच्या सातव्या वर्षीच सासरी नांदायला जाते. नकळत्या वयातच अनेकदा तिला नवऱ्याचा मार खावा लागतो. तेव्हा 'मार खाऊन अंग मोड झालं होतं' (झोंबी पृ. १३) 'अंग वादी गणिक काळ निळं झालं होतं' (झोंबी पृ. १५) हे वाचनू वाचकाचे

मनही सुन्न होत. ताराला पस्तीशीच्या आतच आठ पोरे होतात. त्यामुळे तिची प्रकृती ढासळत जाते. शिवाय काबाड कष्ट करणे तर तिच्या पाचवीलाच पुजलेले आहे. ताराची एक बहिण म्हणून व्यक्तिरेखाही लक्षात राहणारी आहे. ताराला रामा आणिलिंगप्पा असे दोन भाऊ आहेत. आई-वडील वारल्यावर भावाची मोठी परवड होते, तेव्हा तारा दोन्ही भावांचा आधार होते वेळ प्रसंगी तिला कधी कधी नवऱ्याचा मार देखील खावा लागतो. यातच लिंगाप्पाचे वय होते पण त्याला कोणी मुलगी देत नाही. अशावेळी तारा स्वत:ची मुलगी देते. त्याचा संसार सुरळीत व्हावा यासाठी धडपडते. एकुणच अशा नाते संबंधाचे चित्रण साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्यातून प्रभावीपणे आलेले पाहवयास मिळते.

शंकर पाटील हेही ग्रामीण साहित्यातील एक प्रमुख लेखक आहेत. ग्रामीण जीवनातील नात्यागोत्यांचे वर्णन करताना, कौटुंबिक चित्रे रंगविताना त्यांच्या लेखनातून प्रकट होणारी स्त्री ही सुध्दा ग्रामीण माणसाच्या मानसिकतेतून आपले अस्तित्व टिकवणारी आहे. त्याग, कष्ट, सोशिकपणा, भाबडेपणा, मायाममन्ता यातच ती आपल्या जन्माचे सार्थक मानणारी आहे.

१९६० नंतर ग्रामीण साहित्यिकांनी स्त्रियांची आदर्श वास्तववादी चित्रे रंगाविली. त्या प्रमानेच वासनांधतेने बरबटलेल्या पुरूषी अत्याचाराला ढाळी पडलेल्या स्त्रीयांची असहाय्यताही रेखाटली आहे. बाबा कदम यांच्या 'राही' कादंबरीतून मालोजी सारखा विधिनिषेध न बाळगणारा, सुनेवर बलात्कार करणारा सासरा व त्यामुळे मनातून कोसळलेली राही व्यक्त होते. उध्दव शेळके यांनी "बाई विना बुवा" या कादंबरीतून लैंगिक अनुभव दाहकतेने मांडला आहे. कोकणातील भावीणीचा विषय असलेल्या अनेक कादंबऱ्या पाहवयास मिळतात बा. भ. बोरकर यांची 'भावीण', मधमंगेश कणिक यांची "देवकी", जयवंत दळवी यांची "महानंदा" या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा आपली दुखे सामाजिक जाणिवेतून व्यक्त करताना दिसतात तर उत्तम बंडू तुपे यांनी "झुलवा" या कादंबरीतून देवदासींच्या जगण्याचे वास्तव चित्रण केले आहे. पुढे नव्या पिढीनेही या देवदासीं प्रथेच्या बळीची दखल घेतली आहे. राजन गवस यांच्या 'चौंडक' आणि 'भांडारभोग' या कादंबऱ्यातून देवदासीच्या जगण्याचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे.

एकुणच १९६० नंतर नागनाथ कोतापल्ले, बाबाराव मुसळे वासुदे मुलाटे, आनंद पाटील, गो. नि. दांडेकर, विश्वास पाटील असे

किती तरी लेखक आहेत की, त्याच्या साहित्यातून ग्रामीण स्त्री जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे. तसा मराठी ग्रामीण साहित्याचा प्रवाह फार मोठा आहे. तसा मराठी ग्रामीण साहित्याचा प्रवाह फार मोठा आहे. अनेक ग्रामीण साहित्यिकांनी विविध साहित्य प्रकार हताळले आहेत. अशा पार्श्वभूमीवर स्त्री व्यक्तिरेखाचा व स्त्री जीवनाचा शोध घेणे या छोटया लेखातून शक्य होणार नाही. त्यामुळे येथे प्रातिनिधीक स्वरूपात काही साहित्यातून आलेल्या स्त्री जीवनाचा उल्लेख केला आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) संपा. गो. मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२) रा. रं. बोराडे, 'ग्रामीण साहित्य' संस्कृती प्रकाशन पुणे

३) संपा. डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. भरत देशमुख, '१९८० नंतरचे मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा,

४) संपा. दत्तात्रय पुंडे, 'वाड्.मयेतिहासाची संकल्पना', प्रतिमा प्रकाशन पुणे


***

# स्त्री मनाचा अलवार आविष्कार- अलवार क्षण

प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे

प्रमुख, मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद

'अलवार क्षण' हा कवयत्री रोहिणी घोलप यांचा कविता संग्रह भावनांच्या प्रकटीकरणासाठी कविता माध्यम आदिम काळापासून वापरले जाते. आपल्याकडे म्हणजे मराठी मध्ये सामाजिक आशायच्या कवितेने मोठा प्रांत व्यापलेला असला तरी 'भावकाव्याचा' एक जरतारी रेशमी कप्पा देखील मराठी कवितेमध्ये आहे. 'अलवार क्षण' मधील कविता याच जरतारी, रेशमी कप्प्यात समाविष्ट होणारी कविता आहे. या कवितेचे नाते बा. भ. बोरकर, आरती प्रभू या पूर्वासुरींच्या कवितेशी आहे. त्यामुळे या संग्रहाच्या कवयत्री रोहिणी घोलप यांची कविता त्या शिक्षिका असूनही अशोक कातिक कोळी, एकनाथ आव्हाड, कैलास दौंड यांच्या कवितेहून वेगळी आहे. निसर्गातील प्रहर, क्षण, सृष्टींची विविध रुपे. भावव्याकूळ करणारे प्रसंग, पावसाळादी ऋतूंचे विभ्रम अशा घटकांना आपल्या भावात्मक स्पर्शाने कवितारुप लाभलेले 'अलवार क्षण' अनुभवावयास मिळते. यामागे कवयत्रींची भावकोमलता आणि शब्दांची परीपुंजी आहे हे खरेच!

दिवसाच्या प्रहरागणिक सृष्टीचे रुप बदलताना दिसत असते. अशी रुपे कवी मनाला मोहिणी घालतात. आपल्या पूर्वानुभवाशी या रुपांच्या दृष्याने काही घुसळण होते आणि त्या भावस्थितीला काव्यात्मक रुप प्राप्त होते. 'तिन्हीसांज', ' पहाट', 'उषःकाल', 'सांज', व 'थांब भास्करा' या कवितांमधून त्याचा प्रत्यय येतो. 'पहाट' ही आनंदक्षणाची असते तर तिन्हीसांज दुःखाचे प्रतिक बनते.

उदा.

'पहाटतांना पूर्वा अलगद हसली ओटी
किती सांडले केशर तिच्या पावलांसाठी'

(पाहट)

किंवा

'आतूरल्या जीवाने टिपले रानक्षण
मनभर दुःखाचे सरले रंग'

(तिन्हीसांज)

'रानक्षण' हा एक सुंदर नवाशब्द कवयत्रीने मराठीला दिला आहे. रानाच्या सहवासातील क्षण तो 'रानक्षण' तो टिपता आला कि मनाला व्यापून असणाऱ्या दुःखाचे रंगही सरुन जातात, संपतात.

कवीमनाच्या प्रतिभेला कुठल्यातरी क्षणी वाह्य दृष्यांचा, घटकांचा धक्का लागल्या खेरीज कविता शब्दरुप घेणे कठीण असते. असे काव्यक्षण या कवितासंग्रहातील 'कातरक्षण', 'क्षण सावळा' 'दिनरात', 'रजनी', 'सकाळ', 'अनवट क्षण', 'सायंकाळ', 'निशा', 'दुपार', या कवितामधून अनुभवता येतात. ते हळूवारपणे टिपण्याची कवयत्रीची रित लोभस वाटणारी आहे. त्यामुळे या कविता वाचकांना त्या-त्या क्षणांचा सजग अनुभव देतात.
उदा.

'गहिरे नभ सोनरंगात न्हाले
क्षितीजाचे गाल कुसुंबी झाले'

(क्षण सावळा)

इथेही पिवळया रंग छटेसाठी निवडलेला 'सोनरंग' हा शब्द लक्ष वेधून घेणारा आहे. सायंकाळ कवितेतील क्षण प्रत्यक्षावर अप्रत्यक्षाचे आरोपन करणारा असल्याने अधिक काव्यात्म ठरतो. पहा-

'वसुंधरा वक्षी अधीर होतील श्वास काही
नीज नीज शांत रजनीचा हा मधूभास बाई'

(सायंकाळ)

'रजनीचा मधूभास' ही सौंदर्य निर्माण करणारी प्रतिमा सर्वथा नाविण्यपूर्ण म्हणावी अशीच आहे. 'अलवार क्षण' मधील कविता

निर्मितीला कारण ठरणारा आणखी एक काव्यात्म घटक म्हणजे चित्तवेधक मोठी प्रतिके उदा: प्राची, आतुरधरा,धरामाई, सूर्य, प्रभा,चंद्रकोर, सूर्य देवा, सहयाद्री, सरीता या कविता. यातील अनेक घटकांवर याआधी अनेक कविता लिहिलेल्या आहेत. नाही असे नाही. पण कवयित्रिने लिहिलेल्या कविता या नवा अनुभव देणाऱ्या आहेत. उदा:- 'प्रभा' या कवितेतील पुढील ओळी पहा –

'न्हातीधुती होऊनी धरा
ल्यायली ऊन कोवळे
जडावल्या उषेचे सरले
हे गर्भरेशमी सोहळे'

(प्रभा)

तशीच नाविण्यमयता 'सूर्य' कवितेतही अनुभवता येते 'सूर्य' हा सृष्टीचा तारणहार आहे. पण या कवितेतील सूर्य मानवी भावना असणारा कवितेत चितारला आहे, तो असा-

'इथल्या चराचराचा
तुज वाटतो हेवा
त्यास्तवच येतो ना
रोज रोज देवा'

(सूर्य)

निसर्गाची पाऊसमय रुपे कवितांचा विषय बनतात. स्फुर्ती बनतात आणि आशयघन कविता निर्माण होतात. कवीमनाला पावसाच्या थेंबानी साद घातली नाही असे कधीही होत नसते. 'अलवार क्षण' मध्ये 'आषाढ', 'सरीवर सर', 'पाऊस', 'वरुणा', 'श्रावणधारा', 'अवकाळी', 'घना', 'कृष्णमेघा', 'नभास साद', 'सृजन सोहळा' या कविता त्या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. उदाहरणादाखल 'नभास साद' कवितेतील पुढील ओळी अशा कवितेतील भाव सौंदर्य दाखवणाऱ्या आहेत.

'फक्त एक चिंब मिटी बाकी काही नको
हिरव्या ओळी ओळींनी दैन्य सारे झाको'

(नभास साद)

इथे पाऊस हिरव्या रंगानी दैन्य झाकणारा असा सर्जनाचा प्रतिक होतो. तर अवकाळी कवितेमध्ये त्याचे रडवणारे रुप दिसते.

पावसा प्रमाणेच अनेक निसर्ग घटकांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष जीवनाशी संबंध येतो. त्याच्या उत्कट सहवासातून वा अनुभूतीतून कविता निर्माण होतात. अशा कविता आशयाच्या दृष्टीनेही वेगळया ठरतात. त्याचा वाचकांना, आस्वादकांना येणारा अनुभव प्रत्ययकाही असतो. 'अलवार क्षण' कवितासंग्रहात देखील अशा कविता आहेत. 'अंधारबन', 'अभिषेक', 'मंगल सोहळा', 'मोहर', 'शुष्कधरा', 'रानजाई', 'कळी', 'पानगळ', 'फुलपाखरु', 'तारका', 'मृदा', 'किनारा', 'अष्टगंधी रेघा', 'बहावा', 'बिल्वर', 'प्राजक्त', 'वाजरी', 'हिरवी नक्षी', 'वळचण' या त्या कविता होत. यापैकी काही कवितेतील अनुभव सामान्य पातळीवरील असले तरी मांडणीच्या नेटक्या घाटामुळे सुंदर रुप घेतात. उदा.

'भार होण्याआधी धरेला
मिळून जाई पिकलं पान
नवी पालवी फुटण्यासाठी,
उन्हात तापत पुन्हा रान'

(पानगळ)

भावव्याकुळ करणाऱ्या क्षणांची कविता म्हणून ज्या कवितांना ओळखता येईल अशा अनेक कविता या कविता संग्रहात आहेत. वाचक निश्चितच या भावनेशी तादात्म्य पावल्याशिवाय राहणार नाहीत. 'गलबले नभ', 'व्याकुळले शेत', 'आर्जव', 'ऋणानुबंध', 'स्वप्न', 'सलोखा', 'एकांताच्या डोही', 'निरोप', 'आईपण', 'मौन', 'दुःख', 'सती', 'उदासतरु', 'मातृत्वाची झोळी', 'सावली', 'कुलवधू'या कवितांचा त्या संदर्भात उल्लेख करणे उचित ठरेल. 'सती' कवितेतील पुढील ओळी वाचकांना अंतमुर्ख केल्याशिवाय कशा राहतील?

'आमची भरलेली ओटी सात जन्माने पुन्हा
मोक्ष,मुक्ती सांगा अगं पुसायची कुणा'?

तर

'अबोलीस म्हणावे उगा बोल बोल

गुज अंतरीचे वृथा खोल खोल
किती मनवावे वेडया मना जराही भुलेना'

(मौन)

असे कुठेतरी परिमाण असणारी कविता या ठिकाणी पहावयास मिळते. एकूणच 'अलवार क्षण' मधील कविता अलवार तर आहेच त्याच बरोबर निसर्गभान पर्यावरणीय भान जपणारी आणि मनाला समजावणारी देखील आहे. पारंपारिक भावकवितेच्या वाटेवरील हि कविता उत्कट कवितेचा अनुभव देणारी, वाचकांना आपली वाटेल अशी कविता आहे. कवयत्रीचे भाषिक भान शब्दांची नवड आणि भावनांची व अनुभवांची खोली या कवितेतून प्रत्ययास येते. या कवितासंग्रहा बद्दल यांचे अभिनंदन आणि
नवनिर्मितीस शुभेच्छाही!

संदर्भ सूची

१) अलवार क्षण-रोहिणी मच्छिंद्र घोलप, परिस पब्लिकेशन, पुणे. प्रथम आवृत्ती २०२३

***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथा लेखन

प्रा. सारिका देवराव हानवते
ए. ई. व्ही. पी. एम. वुमेन्स कॉलेज औरंगाबाद.

**प्रस्तावना:-**

कथा हा कथनात्मक ललित साहित्याचा एक प्रकार आहे. महाकाव्य यांचा ही साहित्यात अंतर्भाव होतो. कथात्मता हे या तिन्ही साहित्य प्रकारांचे एक व्यवच्छेदक लक्षण होय. या मुळे कथात्म साहित्य हे नाटक व भावकविता यांच्याहून भिन्न करते. कथा हा एक प्राचीन साहित्यप्रकार आहे. कहाणी, लोककथा, परीकथा, नीतीकथा, नक्षत्रकथा, दैवतकथा इत्यादी कथाप्रकार हे आधुनिक लघुकथेची मौखिक परंपरेतील पूर्वरूपे आहेत. त्यांना आधुनिक कथेचे मूलस्रोत असेही म्हणता येते. कथेचे हे मूलस्रोत सर्व समाजात व संस्कृतीत प्राचीन काळापासून दिसून येतात. असे असले तरी आधुनिक साहित्य संस्कृतीत एक कलाप्रकार म्हणून कथेला दीर्घ इतिहास नाही. पो, गोगोल अशा कथाकारांच्या कथालेखनापासूनच कथेचा एक कलातंत्र किवा कलासंकेत असलेला साहित्यप्रकार म्हणून विचार सुरू करता येतो म्हणजेच आधुनिक कथेला शे-दीडशे वर्षांचीच परंपरा असलेली दिसते. आधुनिक कथेने मौखिक लोककथांच्या विविध प्रकारांकडून, कथेच्या मूलस्रोतांकडून पोषण घेतले आहे. मौखिक कथाप्रकारातील विविध संकेत आधुनिक कथेत दिसतात. कथा व कादंबरी हे दोन्ही कथनात्मक साहित्यप्रकार असल्यामुळे कथा ही कादंबरीपेक्षा प्रकृतीत कथा वेगळी आहे हे लक्षात यायला किंवा ही जाणीव साहित्यक्षेत्रात रुजायला बराच काळ लागला आहे. एकविसाव्या शतकाच्या अखेरीस जेव्हा एकूण साहित्य व कला यांच्या भिन्न-भिन्न प्रकारांच्या स्वतंत्र स्वरूपाची जाणीव पक्क होऊ लागली, त्यावेळेस कथेला स्वतःचे असे

कला संकेत, स्वतःची अशी संघटनातत्त्वे असतात, याचे भान प्रस्थापित होऊ लागले, ब्रेडेर मॅथ्यूज यांनी याच सुमारास कथेच्या स्वतंत्र तत्त्व चर्चेचा पाठपुरावा सुरू केला, त्याच बरोबर अन्य साहित्य मीमांसकांनीही या मताचा पाठपुरावा केला तेव्हा कथा हा स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून ओळखला जाऊ लागला. म्हणजेच१९२० पर्यंत कथा ही कादंबरीच्या छायेतच वाढत होती, कारण १९२० पूर्वी कथेचे स्वतंत्र अस्तित्व किंवा स्वरूप नव्हते. मराठी कथेला तर कथेचेरूप प्राप्त करून देण्याचेकाम दिवाक कृष्ण केळकर यांनी केले आहे.

म्हणूनच लघुकथेचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

**कथेच्या व्याख्या:-**

कथा या वांङ्मय प्रकाराचा अभ्यास करत असताना कथेच्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

१) "टाळ, मृदंग, वि णा इत्यादींच्या साह्याने देवादिकांच्या गोष्टी परमार्थ समुदायात सांगणे. म्हणजे कथा होय." ( पृ. क्र. १२६)

२) "कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकण्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकीकत म्हणजेकथा होय." (पृ. क्र.२७).

३) **हडसन ची व्याख्या**:- "A short short story must contio one and only one informing idea and that is the idea must be worked out to its logical conclusion with abosolute singlness aim and differentness of method.". (P.n.54)

४) "कथाकार वाचकाला आपल्या कथेतून जेकाही कथन करीत असतो, त्याला कथा म्हणता येते अशी कथेची ढोबळपणे व्याख्या करता येते." १९६० नंतरच्या कथेचे स्वरूप आणि विवेचनः

नवकथेच्या साहित्य प्रवाहाला बळकटी देण्याचेकाम १९४५ नंतरच्या अनेक साहित्यकांनी केले. यामध्ये गूढकथा लिहिणारे रत्नाकर

मतकरी, घटनाप्रधान-कथानकप्रधान व लक्षणीय कथा लिहिणारे श्री. दा. पानवलकर, दिलीप चि त्रे, जी. ए. कुलकर्णी येतात. याबरोबरच विद्याधर पुडंलक, चि. त्र्यं. खानोलकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, रंगनाथ पठारे, भारत सासणे इ. नी आपल्या कथालेखनाने कथासाहित्याचा आकार, घकलात्मक बनविला. जी.एं.नी आपल्या कथांतून कर्नाटक, महाराष्ट्र यांच्या सीमाभागातील लोकांचे जीवन चित्रित केले आहे. विद्याधर पुडंलकांच्या कथेत मनोविश्लेषण येते. ते आपल्या कथेतनून सूक्ष्म असे अनभुव रेखाटतात. चि.त्र्यं. खानोलकर आपल्या लेखनात कोकणचा परिसर, तिथली माणसे, त्यांच्या भावना, वासना विकार, विकृतीची प्रतिमा व प्रतिकांच्या सहाय्याने लोक विलक्षण आणि झपाटून टाकणारे जीवन चित्रित करतात. त्यांनी लघुकथांबरोबर दीर्घकथा ही लिहिल्या. जास्तीत जास्त दीर्घकथा लिहिणारे ज्ञानेश्वर नाडकर्णी आपल्या कथांतून जगावेगळे अनुभव टिपणे, स्वतंत्र प्रतिमा योजणे, वैचित्र्यपूर्ण आशय या गोष्टी हाताळताना दिसतात. रंगनाथ पठारे व भारत सासणे यांनी देखील वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहिल्या. १९६० च्या आगेमागे निर्माण झालेल्या या नवकथाकारांनी आपल्या लेखन वैशिष्ट्यांनी कथा साहित्याचा अंतर्बाह्य कायापालट केला.

१९६० अगोदर व नंतरच्या काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडींच्या परिवर्तनाचे परिणाम साहित्यामध्ये ही दिसू लागले. आपल्या प्रश्नांना, अनुभवांना, जाणिवांना घेऊन लेखक साहित्यातून लिहू लागले. त्यातूनच साहित्यात नवे प्रवाह निर्माण झाले.त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण, दलित, महानगरीय स्त्रियांचे असे प्रवाह निर्माण झाले. प्रत्येक प्रवाह व त्या प्रवाहाशी संबंधित असलेल्या कथाकारांचा विचार आपण इथे करणार आहोत. प्रथम ग्रामीण साहित्याचा विचार आपण करणार आहोत. स्वातंत्र्योत्तर काळात शि क्षण घेतलेला तरुण ग्रामीण जीवनजाणीवा साहि त्यातून व्यक्त करू लागला. ग्रामीण भागातील प्रश्न, अडचणी, शेतकरी, तिथला निसर्ग या

सर्वांना तो साहित्यातून मांडू लागला. यातूनच निर्माण झालेल्या ग्रामीण प्रवाहाचा विचार आपण करणार आहोत. नव कथाकारानंतरच्या पिढीतील महत्त्वाचे कथाकार म्हणजे जी. ए. कुलकर्णी. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखन सामर्थ्यानि कथा या प्रकाराला समृद्ध करणारे महत्त्वाचे कथालेखन त्यांनी केले. निळासावळा, पारवा, हिरवे रावे, रक्तचदंन, काजळमाया, रमलखणु, सांजशकून, पिगंळावेळ हे कथासग्रंह आहेत. त्यांना आपल्या कथासाठी परंपरागत कथास्वरूपाचा म्हणजे बोधकथा, नीतिकथा, प्राणीकथा, रूपककथा, दृष्टांतकथा यांचा स्वीकार केला. वासना आणि अंधश्रद्धा यातून निर्माण होणारे जगण्याचे आंतरिक पेचाचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून केले. त्यांनी कथेच्या पारंपरिक स्वरूपात बदल केले नाहीत पण आशयाला वेगळी कलाटणी दिली. त्यांनी आपल्या कथांमधून कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या सीमाभागातील खालच्या वर्गातील गरीबांचे जीवन चित्रण केले आहे. मानवी जीवन मृत्यूच्या गूढतेचा शोध ते नेहमी आपल्या कथांमधून घेत असत. त्यांच्या कथेची शैली पूर्णतः वेगळी होती. वातावरण निर्मिती, जीवनचितंन, व्यक्ति चित्रण त्याचबरोबर वेगवेगळया प्रति मा, प्रतिकांचा वापर करुन कथा आशयदृष्ट्या समृद्ध केली. भाषेचा औचित्यपूर्ण वापर, घटना-प्रसंगात न अडकता मानवी मनाचा वेध घेऊन प्रगल्भ नि वेदनाद्वारे वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तीच्या व्यक्तींना कथामधून आणणे अशा वेगवेगळया गुणधर्मांची कथानिर्मिती त्यांनी केली. वैशिष्ट्यपूर्ण असा आशय आणि शैलीमुळे जी. ए. कुलकर्णी मराठीतील एक श्रेष्ठ कथाकार ठरतात. "स्त्री ही जन्मत नाही, तर घडवली जाते." सिमोन. द बोव्हुआर "ऑल आर्टिस्टिक प्रॉडक्शन अँड इस्थेटिक एक्स्पअरिअन्स रिक्वायर अरिव्होल्ट अगेन्स्ट अँड आॅन आयडेंटि फिकेशन विथ, ऑर्थोरटी."- ज्युलि या क्रि स्तेवा" आपल्या परंपरा न सोडताही आपल्याला व्यक्ति स्वातंत्र्य, समानता मि ळवता येते. मुळात तुम्हाला ज्या गोष्टी कराव्याशा वाटतात; त्यावर तुमचा पूर्ण विश्वास असायला हवा. आणि त्याच गोष्टी करीत राहायच्या. आपल्या

कामावर श्रद्धा हवी. आणि वेगळे अनुभव आले, तर ते पत्करायची तयारी असायला हवी. मनाची दारंउघडी ठेवायला हवीत. मग नव्या-जुन्याचा संघर्ष होत नाही".- दुर्गा भागवत

१९६० नंतरची स्त्रीवादी कथा १९७५ ते१९८५ हेदशक अमेरि केतील स्त्रि यांनी 'फेमि नाइन' म्हणून साजरे केले आणि या घटनेचाच परिणाम साऱ्या जगभर झाला. यानंतर स्त्रियांना समाजाकडे व पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली. ती आता स्वतःचा, स्वतःच्या अस्तित्त्वाचा व स्वातंत्र्याचा शोध घेऊ लागली. आपल्यावरील होणाऱ्या अत्याचाराचा वेध घेऊ लागली. त्यातूनच १९६० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचा उगम झाला. त्यात महत्त्वाच्या ठरल्या त्या 'स्त्रीवादी था' या कथांच्या माध्यमातून वेगवेगळया लेखिकांनी तत्कालीन स्त्री वि षयक जाणि वांची वागणूकीची, तिच्या इच्छा, अकांक्षा याची चर्चा केली तसेच स्त्री वि षयक सामाजि क समस्यांचा उहापोह केला. उदा.बालवि वाह, बालविधवा, प्रौढ कुमारि का, घटस्फोटीता, स्त्रीवागणूक इ.... १९६० नंतरच्या स्त्रीवादी कथा लेखनाची आजपर्यंत अनेकदा समीक्षा झाली आहे. संशोधनेही झाली आहे. ते स्त्रीवादी, साहित्याचे सामाजिक, मानसशास्त्रीय, चिकित्सक, मार्क्सवादी, आस्वादक अशा अनेक अंगाने संशोधने करण्यात आले आहे.असे असले तरी काळाबरोबर समाज बदलतो. समाजाबरोबर समस्या बदलतात, परिस्थिती बदलते. त्यामुळे१९६० चा 'स्त्रीवाद' आणि १९९० नंतरचा 'स्त्रीवाद' यात फरक पडलेला दिसून येतो. सामाजिक, आर्थिक, राजकिय, कौटुंबिक, नैतिक बदल झाल्याचेदि सून येते. १९६० च्या कथेतील सर्वच परूषांना आरोपीच्या पिजंऱ्यात उभे केले जाते. परंतु काळानुरूप मानवी वर्तनात बदल होऊन वरील वृत्तीने परीवर्तन होत आहे. या परीवर्तनीय वृत्तीचेचि त्रण नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथेत सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन परंपरेचा प्रभाव आहे. त्यामुळे १९९० नंतरची स्त्री स्त्रीवादीकथेत स्त्रीयांच्या संदर्भात येणाऱ्या समस्या, सुन- दुःख या सर्वच

विषयावर मुक्तपणे संवाद साधणारी दिसते म्हणून नव्वदोत्तरी 'स्त्रीवादी साहित्य' स्त्रीसंवादी आहे असेमला वाटते. साठोत्तर काळातील मराठी स्त्रीवादी कथा लेखिका:- जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रि यांनी अव्याहतपणे आपआपले कार्यकर्तृत्त्व निष्ठेने बजावलेले आहे. त्यांच्या स्वातंत्र्याचे पंख छाटून टाळण्याचा डाव मांडूनही त्यांनी अगदी चूलमूल सांभाळणेपासून तर देश सांभाळण्यापर्यंत मजल मारली आहे.१९६० नंतरच्या कालखंडातील कथात्मक लेखनाचा विचार करता, केवळ स्त्रियांनी लिहिलेल्या नव्हे; तर स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या कथा महत्त्वपूर्ण ठरतात. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना देऊ केलेले कायदेशीर हक्क, परदेशातील स्त्री मुक्तीची चळवळ, या चळवळीचे या देशात विशेषतः महाराष्ट्रात उमटलेले पडसाद, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातले बदललेले समाजजीवन, शहरीकरण, यंत्रयुग, विभक्त कुटुंबपध्दती, स्त्रियांचे उच्चशिक्षण, अर्थार्जन, व्यक्ति स्वातंत्र्यावाद, आधुनिक जीवना बरोबरीने आलेली ऐतिहासिक सुखे आणि मानसिक ताणतणाव, स्पर्धा, संघर्ष हे सर्व समग्र वास्तव जमे सधरून स्त्रियांच्या कथेचा विचार करणे इष्ट ठरते. त्याचबरोबर याच वास्तवाच्या साक्षीने मराठी कथेच्या प्रांतात आरंभी कुसमावती देशपांड, वसुधंरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, वसुधा पाटील, आंबिका सरकार यासारख्या आणि नंतर गौरी देशपांडे, सानिया, उर्मिया पवार, आशा बगे ह्यासारख्या ज्या प्रिया तेंडुलकरांना समकालीन ठरतात अशा अनेक महत्त्वाच्या स्त्री कथाकारांनी मराठी कथेच्या बाबतीत वैविध्यपूर्ण आणि सकस, सक्षम भर घातलेली आहे. याची नोंद घेणे ही कमप्राप्त आहे. सानिया सानि याने आपल्या एकूण लेखनप्रवासात व्यक्तीच्या अंतःकरणान्या गाभ्यातील एकाकीपणा उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. माणसे परस्परांशी जन्मसंबंधाने, प्रेमसंबंधाने जोडली जातात. पण ह्या गोतावळयातही ती स्वतःपुरती एकटी असतात. अशा व्यक्तींसाठी नातीगोती ही देखील एक प्रकारची बंधने ठरतात. अशा मानसिक

स्थितीगतीचा आणि त्यातील भावविचार पूर्ण आंदोलनाचा शोध घेण्यात सानियाच्या प्रति माधर्माला विशेष रूची असलेली दिसते.आधुनिक काळात वेगवेगळया कारणांनी समाजानेवि भक्त कुटुंबपध्दतीचा स्वीकार व अवलंब केलेला दिसतो. सानिया यांच्या कथांमधील निवेदकही या प्रकारचा कुटुंबबंध स्वीकारते. आई-वडील, पती-पत्नी-मुले, विधवा आई व मुलगा-सून, विधुर वडील व मुलगा- सून आईवडील व मुलेअसा कुटुंबाचा आकृति बंध कथांमध्ये उपयोजिलेला दिसतो. उदा. दिशा घराच्या, ‘प्रतीती’, गौरी देशपांडे: गौरी देशपांडेच्या कथांच्या नायिका (स्त्रिया) व्यक्ति स्वातंत्र्याचा अंगीकर करणाऱ्या असल्यामुळे समाजातील आणि वाङ्मयातील स्त्रीप्रतिमां पेक्षा वेगळया आहेत. विवाह संस्थेची बंधनेन पाळणाऱ्या, कधी कधी तर स्त्रीचे अस्तित्त्वच झुगारून देणाऱ्या स्त्रियांचे जीवन विचित्र करणारे आहे. स्त्री-पुरूष प्रेमाचे मोकळेकि वा नेहमीचा शब्द योजायचा तर धीट चित्रण हा गौरी देशपांडेयांच्या साहित्याला वेगळेपणा देणारा एक विशेष आहे. स्वतंत्रपणे जगणाऱ्या, बुद्धि प्रामाण्यवादी, विवेकनिष्ठ, आधुनिक, सुशिक्षित स्त्रीचे स्वप्न गौरी देशपांडे रेखाटतात. त्यांच्या नायिका संवेदनशील, अभिरुची संपन्न आणि बुध्दिमान आहेत. अशी जमेची बाजू असली तरी गौरी देशपांडेयांच्या कथात्मक साहित्याला मर्यादित प्रतिसाद का लाभला याचेउत्तर शोधण्याचा प्रयत्न केला, तर था हाती येते? कथेच्या अगदी प्रारंभकाळापासून स्त्रीवरील अन्याय, अत्याचार, परिस्थितीने तिची केलेली कोंडी आणि मग त्यावि रूध्द उठून उभी राहिलेली, संघर्ष करणारी स्त्री असेचि त्र रंगवले गेले आहे. त्यात तिचा कधी विजय झाला तर कधी ती पराभूत झाली आहे. पण ति चेबंड तिचा संघर्ष हे तिला परिस्थितीने भाग पाडलेले कृत्य आहे. गंभीर प्रकृतीच्या लेखकांनी आविष्कृत केलेला जीवनार्थ पुढे चलनी नाणे बनला आणि आमच्या सवयीचा झाला. या सवयीला धक्का देऊन आपल्या आयुष्याचे निर्णय आपणच घेणारी ‘स्वतत्रं’ स्त्री गौरी देशपांड्यांनी निर्मिली, उदा. ‘कारावासातनू पत्र’ मधील मेरी, ‘मुक्काम’

मधील •लिदं, 'एकेक पान गळवया मधील राधा अशा स्वतंत्र वर्तन करणारी स्त्री पात्र रेखाटली आहे.

प्रिया तेंडुलकर प्रियाच्या कथेचा परिसर आणि वातावरण पूर्णपणेशहरी आहे. बहुतेक कथा मबुंई-पुण्यात घडतात तर काही परदेशात मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय, पांढरपेशा, सुशिक्षित उच्चशिक्षित वर्ग प्रियाच्या कथेत दिसून येतो. मानवी जीवनाच्या नानाविध परी शोधणे, त्यांना कथारूप देणे, एकारलेपणातूनच भिन्नत्त्वाचे बारकावे टिपणे आणि वरवर साध्यासोप्या, सुखी-समृध्द, नेटक्या वाटणाऱ्या जीवनातून व्यथा वेदना, वैफल्य, पराभूतता, एकाकीपणा यांची लपलेली रूपे शोधून शब्दबध्द करणेया सर्वांची प्रचिती प्रिया तेंडुलकरांच्या 'लभ', 'ज्याच्या त्याचा प्रश्न', 'फर्टिलि क्लिनिक' या कथासंग्रहामधून येतो. स्त्री आणि स्त्री, स्त्री आणि पुरूष, नातेसंबंध, त्यातील सच्चेपणा किंवा दांभिकता, लभ, मातृत्त्व, सामाजिक प्रतिष्ठा, व्यक्तिगत आयुष्य, त्यातील उमेद आणि पडझड, परिस्थिती शरणता, मृत्यूयांकडे प्रिया कुतुहलाने पाहताना दिसते.

मेघना पेठे:

मबुंई-पुणे यासारख्या प्रगत नागर वस्तीमधील वेगवान जीवनाचा सदंर्भ मेघना पेठेच्या कथांच्या अनभुव विश्वाचा एक भाग बनलेला दिसतो. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष पात्रे सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेली तसेच वैचारिक दृष्ट्याही स्वातंत्र्याला महत्व देणारी, सामाजिक वास्तवाचे भान असणारी, सामाजिक बदलांना सामोरे जाणारी, अशी पात्रे आहेत. सर्वच पातळयावरील मानवी नातेसंबंधाच्या विविध तऱ्हा मेघना पेठे यांच्या कथेने मांडण्याचा प्रयत्न केला. उदा. 'हंस अकेला', 'आंधळयाच्या गायी' या कथासंग्रहामधून आई-मुलगा, वडील-मुलगी, बहीण-भाऊ, मित्र-मैत्रिणी, वसतीच्या अथवा नोकरीच्या ठिकाणी बरोबर असणारे स्त्रीपुरूष, पती-पत्नी या सर्वांमधून सामाजिक वास्तवता मांडण्याचा

प्रयत्न केला आहे. पुरूष संबंधाचे वर्णन करताना, भाषेचा धिटाईने वापर केलेला दिसतो.

प्रतिमा जोशी:-

(जन्म: २३ नोव्हेंबर १९५९) श्री. कॉम., डिप्लोमा इन जर्नालिझम पत्रकार (दै. महाराष्ट्र टाईम्स) लेखन ॐ निवडक प्रति मा जोशी' या शीर्षकांतर्गत 'जनम' हा कथासग्रंह, "इराण अवेकनि गं ' आणि 'डस्टि नेशन अननोन' या दोन पुस्तकांचा अनुवाद, 'शोध बाईमाणसाच्या जि ण्याचा' या पुस्तकाचेसंपादन, "जोएल आणि तारा' या चरित्रपर पुस्तिकेचे लेखन तसेच विविध पुरस्कार. रोहिणी कुळकर्णी :- (६ डि सेंबर १९३३ – १५ ऑगस्ट २०११) एम. ए. (मराठी), इंदूर वि श्ववि द्यालय. इंदूर विश्वविद्यालयात कार्यालयीन काम.लेखन मान्यवर मराठी नियतकालि कांमधनू लेखन, 'कृतार्थ', 'सातवं दालन', 'तिन्हीसांज', 'गर्भनाळ', 'पिपंळफेरे' अशा पाच कादंबऱ्यांसह 'गर्भफूल', 'बहार', 'स्टारी नाईट' इ. कथासंग्रह प्रसि द्ध पुरस्कार 'भेट आणि फलश्रुती' तसेच 'गर्भनाळ'ला महाराष्ट्र राज्य शासनाचा 2 पुरस्कार, 'भेट' चित्रपट कथेला अल्फा गौरव पुरस्कार, एकूण साहित्य निर्मितीसाठी मध्यप्रदेश मराठी अकादमीचा प्रभाकर माचवे पुरस्कार तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनात दोन वेळा गौरव. मान्यवर नियतकालिकांमधून सातत्याने लेखन 'हम' कथासंग्रहाला मॅजेस्टिक प्रकाशनाचा केशवराव कोठावळे साहित्य पुरस्कार.

आशा बगे:

'मारवा', 'पूजा', 'चंदन', 'मांडव', 'दर्पण', 'अनंत', 'नि सटलेले ऋतू वेगळे, 'पाऊल वाटेवरले गाव', या कथासंग्रहातून आशा बगे यांनी चित्रीत केलेले वि श्व हे प्राध्यान्याने मध्यमवर्गीय, ब्राम्हणी कुटुंबाचे आहे. भारतीय परंपरा, मूल्य, रूढी, व्रतवैकल्ये, आचार-वि चार यांचेचि त्रण त्यांच्या कथांमधून आढळले. तरी त्याहीपेक्षा माणूस त्याचेमन.

नीरजा:-

(जन्म: २३ ऑक्टोबर १९६०) एम. ए. मुबई विद्यापीठ. कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन. लेखन 'जेदर्पणी बिवले', 'ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी 44 माणसं हे कथासंग्रह, 'निरन्वय', 'वैणा', 'स्त्रीगणेशा', 'निरर्थकाचे पक्षी' हे काव्य संग्रह, 'बदलत्या चौकटी' आणि 'चितन शलाका' हेललि त लेखसंग्रह तसेच दोन काव्यसंग्रहांचे संपादन.

कमल देसाई:-

कमल देसाई यांचा 'रंग' हा एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला असला तरी त्यात त्यांनी जी झेप घेतली आहे ती विलक्षण आहे. मराठी नवकथेचे जे सामर्थ्य – आशयाची सूक्ष्माति शयता व अभिव्यकीतील तरलपणा – विलक्षण प्रभावाने जाणवते. 'बाई', 'सर्व्या घंटा झाल्या' ही त्यांची सुरुवातीची हे त्यांच्या कथांतून कथा पाहा. शालेय जगातील एका समूहातील अनेक पात्रांना वेगवेगळा घाट देत, त्याच्या संवेदना साकार करीत एक वेगळे चित्र त्या आपणांपुढे साकार करतात. त्या साऱ्या समूहात नायिका स्वतः हरवली आहे आणि तरी तिची व्यक्ति रेखा संवेदनाक्षम मनाची साक्ष देते. कमल देसाई यांच्या प्रत्येक कथेला असा काही तरल व सूक्ष्म घाट लाभला आहे. संवेदनांच्या व प्रतिमांच्या आधारेत्या आपल्या कथेतील आशय मूर्त करीत जातात. मात्र या साऱ्या निरर्थकतेची, वैफल्याची, निष्क्रियतेची दाट छाया पडली आहे. जीवनातील क्षुद्रता वकिरटेपणा यांची भेदक जाणीव श्राध्द कथा व सुब्बी कथा या कथांना लेखिका ठाम भूमिका येताना दिसते. डॉ. प्रिया जामकर यांनी घेतलेल्या मुलाखतीमध्ये कमल देसाई सांगतात, "धर्मानं सांगितलं, तुला या धर्मातच काही अधिकार नाहीत. धर्म कोण हे सांगणारा? तुला वाचायचा अधिकार नाही ! म्हणजेकाय ? मी सि स्टीमशी भांडले... जग खूप मोठं आहे तिथे फक्त सिस्टीम्सच नाहीत. इतरही काही आहे. "कमल देसाईंच्या नायिकांची बंडखोरी अशी आहे. स्वावलंबन स्वयंपूर्णतेच्या वाटेने जाणारी, बंडखोरी करतानाच नवनिर्मितीची वाट दर्शविणारी, परतत्त्वात्मक- प्रश्नांसह प्रस्थापित

मूल्यव्यवस्थेची चौकट खिळखिळी करणारी गौरी देशपांडे यांच्या साहित्यातही जगण्याविषयीचे, त्याबाबतच्या विविध पर्याय-प्रयोगांचे चित्रण आहे, मात्र त्यांच्या कथा-साहित्यातील स्वप्नरंजनात्मक घटकांमुळे त्यातील मूलगामी प्रश्न झाकोळले गेलेत. कमल देसाई यांचे 'मिथिकल जग' ही काही वेळेस विश्वासार्ह (क्रेडिबल- ऑथेंटिक) वाटतेपण गौरी देशपांडे यांचे वास्तव जग स्वप्नरंजनात्मक वाटते, असे का याचाही शोध अभ्यासकांना घ्यावा लागेल. गेल्या साठ वर्षां पासून कथालेखन करणाऱ्या विजया राजाध्यक्ष यांनी विपुल आणि विविधांगी स्वरूपाचे लेखन केले आहे. खास स्त्रियांचेच अनुभवविश्व साकारणाऱ्या 'विदेही', 'कमळ' यांसारख्या कथा त्यांनी ज्या काळात लिहिल्या, त्या काळात ते नावीन्य पूर्ण होतेच परंतु पुढच्या अधिक धीट अभिव्यक्तीसाठी त्यांनी एक भूमीही तयार केली.

लैंगिक सुखाचा टप्पा ओलांडल्या नंतर, मातृत्वाच्या अनुभवाला सामोरी जाणारी स्त्री, आपल्या देहाकडे निर्मितीसाठीचे साधन-रूप म्हणूनही कशी बघते, याची सखोल जाणीव त्यांच्या अशा कथा वाचकांच्या मनात निर्माण करतात. 'जेहत्ते कालाचे ठायी' सारखी १९६७ साली 'सत्यकथा'मध्ये प्रकाशि त झालेली कथा पारंपरिक हरदासी आख्यानाचा 'फॉर्म' आधुनिक कथेच्या रूपात मांडते, ज्यात सूक्ष्म-उपरोधासह भाष्य मिसळलेले आहे. पारंपरिक कौटुंबिक चौकटीतही मानवी नात्यांमधील सौदर्य कसे उजळून निघते याचे दर्शन त्यांच्या 'वर्तमान' आणि 'निर्वाण' या कथांमध्ये घडते.

**विजया राजाध्यक्ष:-**

१९६०या खंडातील विजया राजाध्यक्ष यांची 'संधि काल' ही कथा स्त्री-पुरुषांच्या सहजीवनाचे आधुनिक रूप दाखवितानाच, त्यांतील कंगोरे, चढउतार, परस्परांमध्ये गुतंवणे, एकमेकांपासून दरु अवल्यानतंर परस्परांमधील नाते समजून घेण्याची ओढ आणि मग स्वच्छ पाणी जाणवलेले सत्य स्वीकारण्याची तयारी याचा मनोज्ञ आलेख मांडते. प्रामुख्याने साम्यवादी विचारसरणीने प्रभावित तारा अजित त्यांची चळवळीच्या पार्श्व भूमीवर जीवनाची कार्यक्रम

कार्यकर्त्यां मध्ये वर्षात असलेल्या पुरुष मनोवृत्ती ठेवताना स्त्रीवादी छोटा आहे करते मी नेहमी संरक्षण नाकारले तुला ठाऊक आहे पिता पाटीपुत्र म्हणून सांगितले नाही तीन स्त्रीचे संरक्षक ना हाडा माणसाचा पुत्र नाही हेबरं आहे हा मानलेला ही नको अशी एकमेकांपासून दूर जाताना सांगते. त्यांच्या प्रत्येक कथेतून होते. त्यांची कथा एका सरळ मार्गा ने कधी जात नाही- ती सारखा मार्ग बदलते. कधी विरोधी मार्गन, कधी संवादी मार्गाने, तर कधी समांतर मागनि वळनेघेत घेत आपलेउद्दिष्ट ती साधते. कमल देसाई यांच्या कथेचे हेच वेगळेपण डोळयांत भरते.

विजया राजाध्यक्ष यांच्या कथेचे स्वरूप काही वेगळेच आहे. त्यांच्या कथा वाचू लागलो म्हणजे काही तरी अस्पष्ट, धूसर व स्वप्नाळू जगाचे दर्शन आपणाला घडू लागते. त्यांच्या कक्षेतील व्यक्ती स्वतःभोवती गिरक्या घेणाऱ्या वास्तवापासून दूर सरकून अधांतरी झेप घेणाऱ्या किंवा स्वतःच्या भावविश्वातः स्वतःच हरवून बसलेल्या दिसतात. त्यांच्या कथांतील व्यक्तीच नाही तर वातावरणही तरल, धूसर व काव्यात्म असे दिसते. कुठे 'एक संध्याकाळ काही तरी गमावून बसलेली दिसते' तर कुठे रस्तेसंथ वाटू लागतात. एखाद्या आठवणीत विसरल्या सारखे. या कथांतून वारंवार येणारा प्रति मांचा शिडकावा त्या कथेतील वातावरणाला अधिक काव्यात्म करतो. त्याच्या उलट तारा वनारसे यांची कथा आशयाची संपन्नता आणि अभिव्यक्तीची विविधता या दृष्टीने अगदी निराळी वाटते. स्त्री-जीवनातील व्यथांचे अत्यंत सूक्ष्म चित्रण त्यांच्या कथांतून घडते आणि त्यातून त्यांच्या कथेतील स्त्री तिचे स्वतंत्र रूपरंग घेऊनच साकार होते. 'विजेचे दिवे', 'पशू', किंवा 'सहस्त्राक्ष' यांसारख्या कथांतून घडलेले स्त्रीमनांचे दर्शन स्त्रीजीवनाचे अनेक वेगवेगळे पैलू उजळून दाखवितेच; पण त्यातील नायिकांच्या व्यथा त्या त्या स्त्रीच्या काही विशेष प्रकारच्या संवेदनाक्षम मनातून निर्माण झाली आहे. याचीही जाणीव होते. ज्यांनी स्वतःसंबंधी काही अपेक्षा निर्माण केल्या पण अकाली मृत्यूमुळे ज्या साकार होऊ शकल्या नाहीत अशा इंदू साक्रीकर यांच्या कथाही त्यांच्या भावोत्कट वृत्तीमुळे नजरेत भरतात. त्यांच्या कथांतून भावुकता आहे आणि तरल

कल्पना आहे. जीवनातील विविध दृश्ये कधी त्या चित्रकाराच्या ऐटीने रंगवतील तर कधी कवी प्रमाणेती ती भावदृश्ये सूचित करतील.

**सरिता पदकी:-**

कविता, ललित लेखन, बालसाहित्य, नाटक, कथा असे साहित्याचे निरनिराळे आकृतिबंध लीलया हाताळणाऱ्या सरिता पदकी यांची 'एक्झिट' जुन्या पिढीतील वाचकांना निश्चितच चुटपूट लावणारी आहे.कविता, ललित लेखन, बालसाहित्य, नाटक, कथा असे साहित्याचे निरनिराळे आकृतिबंध लीलया हाताळणाऱ्या सरिता पदकी यांची 'एक्झिट' जुन्या पिढीतील वाचकांना निश्चितच चुटपूट लावणारी आहे. त्यांची साधी भाषा वाचकांना आवडायची. निसर्ग, मलुकांचे भावविश्व हा त्यांच्या निरंतर चिंतनाचा विषय होता. त्याची प्रचिती त्यांच्या कलाकृतींतून  सहजयेते. त्यांच्या बालकवि ता वाचून मोठ्या झालेल्या पि ढीनेनंतर त्यांच्या 'अंगणात माझ्या', 'चैत्रपुष्प', 'लग्नगंधार' हे काव्यसग्रंह, 'बारा रामाचं देऊळ' आणि 'घमघुमट' हे कथासग्रंहांनाही चांगली दाद दिली. 'गटुर्रूगंगटुर्रगू आणि 'नाच पोरी नाच' 'छोटू हत्तीची गोष्ट', 'गर्गुश्का', 'सुळूक' आदी बालकवता संग्रह आणि 'जंमत टंपूटि ल्लूची' हा कथासंग्रहही त्यांच्या नावावर आहे. करोलीना मारियाडी जीझस यांच्या 'चाइल्ड ऑफ डार्क' यांचे आत्म निवेदन (काळोखाची लेक), यूजीन ओनील यांचेनाटक (पांथस्थ), वेस्टिंग हाउसचे चरित्र (संशोधक जादूगार) हेत्यांचे अनुवाद ही लक्षणीय ठरले. 'बाधा', 'खून पाहावा करून' 'सीता' ही त्यांची नाटकेही चर्चेत राहिली. विविध प्रकार त्यांनी हाताळले असले, तरी त्या रमल्या. मात्र, कवितांमध्ये. 'सात रंगांची कमान माझ्या पापण्यांवर' हा जपानी भाषेतील काव्याचा अनुवादही त्यांनी केला. दिवंगत कवयीत्री शांता शेळके यांनी यांच्या 'संस्मरणे' ललित लेखसंग्रहात सरिता पदकी व मंगेश पदकी यांच्या सहवासात पुण्यात रंगणाऱ्या साहित्यिक गप्पांबद्दल आवर्जून लिहिले आहे. पुण्यात त्यावेळी असलेल्या 'कथाकार मंडळा'त पंडि त महादेव शास्त्री जोशी, श्री. ज. जोशी दि. बा. मोकाशी, अरविदं गोखले, वसुधंरा

पटवर्धन, मंगेश पदकी व सरिता पदकी, कमला फडके असे कथालेखक आठ-पंधरा दिवसांतून एकदा एकमेकांच्या घरी गप्पांचा अड्डा जमवायवचे. त्यातून कथाबीजांवर व एकूणच साहित्यावर चर्चा होत असे, अशा आठवणी शांताबाईंनी लिहिल्या आहेत. 'डरांव डरांव' या बालगीतातील, 'आभाळ वाजलं धडामधमू , वारा सटुला सू, सूं, सूं वीज चमकली चक चक चक, जिकडे तिकडे लख लख लख' यांसारख्या ओळी असो की, 'घाटातील वाट' या कवितेतील 'घाटातील वाट, काय तिचा थाट, मुरक तेगिर कतेल व ते पाठोपाठ, निळी निळी परडी, कोणी केली पालथी, पान फुलंसांडली, वर आणि खालती' या ओळी आठवताना आजही गंमत वाटते. या ओळी सरिता पदकी यांच्या 'बालभारती'तील कवितेच्या होत्या, हे आठवलं तरी, त्यांनी आपलं बालपण कसं समृद्ध केलं, हे जाणवल्या शिवाय राहणार नाही.

**ज्योत्स्ना केशव देवधर :-**

पूर्वा श्रमीच्या कुसुम थत्तेयांचा जन्म राजस्थानातील जोधपूर येथेझाला. त्यांनी एम.ए. (हिंदी) पुणे विद्यापीठातून केले. विवाहपूर्व वास्तव्य महाराष्ट्राबाहेर झाल्याने प्रारंभी हिंदी भाषेतून कथा-लेखन केले. १९६० ते१९७० या दशकाच्या उत्तरार्धात मराठीत ज्या स्त्री लेखिका पुढे आल्या त्यांमध्ये ज्योत्स्ना देवधर हेनाव महत्त्वाचेआहे. 'तरुण भारत' (पुणे) ह्या दिवाळी अंकात ज्योत्स्नाबाईंची 'घर गंगेच्या काठी' ही पहिली मराठी कादंबरी आली. पुढे लगेचच (१९६७) ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आणि कादंबरीकार म्हणून त्यांची स्वतंत्र नाममुद्रा उमटली. पुढच्याच वर्षी १९६८मध्ये त्यांची 'कल्याणी' ही कादंबरी प्रसिद्धीच्या झोतात आली. त्यांच्या अन्य लेखना प्रमाणेच या दोन्ही कादंबरी यांचे विषय कौटुंबिक विशेषतः एकत्र कुटुंब पद्धती आणि तिच्या मधील स्त्री हेच होते. या कुटुंब पद्धतीचे गुण-दोष आणि मर्या दाही त्यांच्या लेखनातून स्पष्ट होतात. आपल्या कादंबर् या व कथा लेखनाच्या विषयांसंदर्भात लिहिताना त्या स्वतः म्हणतात, "कोवळया, अजाण, अपरि पक्व अशा वयात कौटुंबिक कारणांनी मी करपून गेले.

काळजी, जागरण, आजारपण, कष्ट यांत आयुष्याची सोनेरी वर्षे खर्ची पडली. मला वाटते, माझ्या लेखणीला करुणेचा घास मिळाला व त्याची रुजवात या कठीण परीक्षेच्या, मनस्तापाच्या, दुःख-यातनांच्या, कष्टाच्या काळात झाली असावी. एकत्र कुटुंबातील ऊन-पाऊस अंगावर घेत असल्यामुळे माझ्या लेखनाला कौटुंबिक चौकट आपोआप मिळाली."

'कल्याणी' ही एक दुःखी, दुर्दैवी विधवा. तिच्या जीवनाची झालेली फरफट याच शीर्षकाच्या कादंबरीतून ज्योत्स्नाबाईंनी रेखाटली आहे. ही कादंबरी जास्त गाजली. तिचे चित्रपट-नाटकात जसे रूपांतर झाले, तशी मालिकेच्या रूपानेही ती घराघरात पोचली. जुन्या काळातली उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंब-व्यवस्था जोत्स्नाबाईंच्या मनाला टोचते, पण त्याच बरोबर कालानुरूप बदलायलाही हवे, असे वाटणे अशा कालद्वंद्वात त्यांची कादंबरी वा कथा घुसमटल्या सारखी वाटते.

**चित्रमय शैली-**

ज्योत्स्नाबाईंची भाषा साधी, सोपी, घराघरात वापरली जाणारी आहे. त्यामुळे शब्दांच्या जंजाळात फारशी अडकत नाही. डॉ. विनया डोंगरे त्यांचा गौरव 'चित्रमय शैलीच्या कादंबरीकार' असा करतात तर डॉ. कल्याणी हर्डीकर, त्यांच्या एकूणच लेखनाचा आढावा घेताना त्यांना 'स्वयंप्रज्ञ लेखिका' म्हणतात. त्यांची वर्णनेसाधी पण ती वाचकांच्या नजरेसमोर उभी राहणारी असतात. व्यक्ति चित्रणात्मक कादंबरी  यांतही ज्योत्स्नाबाई वेगळेपण राखून आहेत. दोन भिन्न व्यक्ति मत्त्वांच्या जीवनावरच्या दोन कादंबरी या त्या तितक्याच ताकदीने सादर करतात. महायोगी अरविदं आणि पडिंता रमाबाई काहीशी समकालीन व्यक्ति मत्त्वे. भाषा-प्रांत-पार्श्व भमी वेगळी पण या दोन्ही व्यक्ति मत्त्वांचा भावपूर्ण आणि तरीही साक्षेपी वेध त्यांनी अनुक्रमे 'उत्तरयोगी' (१९७३) आणि 'रमाबाई'(१९८९) या कादंबर् यांमधून घेतला आहे. त्यांच्या अनेक कादंबर् यांबरोबर वीस कथासंग्रह प्रसि द्ध झालेअसून त्यात 'गार् या-गार् या भिगंरया' (१९६९) ते 'याचि जन्मी'

(१९९९) या प्रदीर्घ काळखडंतील त्यांचा कथा विषयक लेखनप्रवास समोर येतो. त्यांच्या पुस्तकांचे अन्य भाषांत अनुवाद झाले असून त्यांनी स्वतः हिंदीतून विपुल लेखन केले आहे. अनेक पुरस्कार विजेत्या ठरलेल्या ज्योत्स्ना बाईंना केंद्र सरकारचा 'अ हिंदी भाषा-भाषी लेखक' पुरस्कारही मिळाला आहे. 'एरियल' या अन्वर्थक नावाचे त्यांचे आत्मकथनात्मक पुस्तक आहे. 'आकाशवाणी' मधील दोन तपांच्या वाटचालीचा तो प्रवास व्यक्ति गत त्यांच्या बरोबर मराठी समाजजीवन आणि साहित्य जीवनाचाही प्रवास आहे. हे ही जोडून घेता येऊ शकेल.

**डॉ. मंगला वरखडे:-**

यांनी 'स्त्रि यांचे कथालेखन नवी दृष्टी, नवी शैली प पुस्तकामधून स्वलिखित साहित्याचा वेध घेतला आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी स्त्रियांच्या विकासाविषयी काही महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख केला आहे. साठोतरी काळातील मराठी कथा लेखिका-

सारांश :-

१९६० नंतर कथेतून ग्रामीण स्वी जीवन, दलि त स्वीजीवन, आदिवासी स्त्री जीवन, शहरातील उच्चवर्णीय सुशिक्षित तसेच झोपडपट्टीत राहणाऱ्या स्वी जीवनाचे कक्षेतून वास्तव चित्रण होऊ लागले. ज्योत्स्ना देवधर यांनी गाऱ्यागाऱ्या भिगंऱ्या (१९६९) गजगे (१९७०) काळजी (१९९६) पांघरुण (२००१) या कथासग्रं हातनू स्वी केंद्रस्थानी मानून नायिका प्रधान कथा लिहिल्या. विजया राजाध्यक्ष यांच्या हुकार (१९८४) अखेरचे पर्व (१९८८) अनामिका (१९९०) समांतर (२०००) हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्याच्या कथेतून स्वी शरीरकेंद्री अनुभवांचे चित्रण येते. आशा बगे यांच्या मारवा (१९८४) अत्तर (१९८६) पूजा (१९८९) ऋतूवेगळे (१९९९) या कथासंग्रहातून मध्यमवर्गीय कटुंबातील स्त्री जीवन, कुटुंबातील नातेसंबंध, रीतिरिवाज यांचे चित्रण केले आहे. वसुधा पाटील पुरुष (१९९४), वेगळी (१९७७) अश्रद्ध (१९८८) नामर्द (२०००) कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या कथेतून शारीरिक संबंध, स्त्रीचे समस्या चित्रण केले आहे. अरुणा

ढेरेयांच्या अज्ञात झन्यावर रात्री. कृष्णकि नारा, भगव्या वाटा. उंच वाढलेल्या गवताखाली मन केलेग्वाही, या कथासंग्रहातून आध्यात्माची रुढ चौकट मोडली, स्त्रीशक्ती प्रत्यय त्याच्या कथेतून येतो. स्वीजीवनाच्या स्वीशाच्या उच्चवर्णी य स्वी मध्यस्मानि या यांनी शोध, परिमाण, प्रतीती, खिडक्या, प्रयाण हे कथासंग्रह तर प्रिया तेंडुलकर यांच्या ज्याचा त्याचा प्रश्न असंही जन्मलेल्या प्रत्येकाला जावेति च्या वंशा या कथासंग्रहातून त्यांनी शहरात नोकरी करणारी स्वीयांचे सुख दुःख कथेतून व्यक्त केले आहे. मेघना पेठे हंस अकेला, आंधळ्या गायी, या कथासंग्रहातील कथेतून स्त्री मनाचा वेध घेतला आहे. स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोण त्यांच्या कथेतून व्यक्त होतो. उर्मिला सिरुर यांचा कवडसा हा एक कथा संग्रह आहे. त्यांच्या कलेतून स्वि यामधील समान आंतरिक नाते, शरीरकेंद्री सौंदर्या नुभव हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्ये आहेत. अबिका सरकार याच्या चाहूल आणि प्रतिज्ञा हे कथासंग्रह प्रकाशि त आहेत. त्यांच्या कथेतून स्त्रीचे दुःख, स्वी समस्या यांचा वेध घेणाऱ्या आहेत. उर्मिला पवार या दलि त कथा लेखिका यांचे शीमित साट बोट हातचा एक या कथा संग्रहातून त्यांनी दलित स्त्री शोषण, जाति व्यवस्था, पितृप्रधान कुटुंबव्यवस्थेने केलेले शोषण त्याच्या कथेतून व्यक्त होते. तर प्रतिमा इंगोले यांच्या लेक भुईनी, हिरवे स्वप्न हजारी बेलपान, सुगरनचा खोपा, जावयाचंपोर या कथासंग्रहातून त्यांनी वऱ्हाडी भागातील ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे त्यांच्या कथेतून ग्रामीण स्त्रीयांचे दुःख, त्याचेभोग, त्यांचा सासूरवास, त्याच्या हालअपेष्टा काबाडकष्ट चित्रित होते. एकूणच ग्रामीण स्त्रीयांचे दुःख कथेचा मुख्य विषय दिसतो.

गौरी देशपाडे यांच्या कथेचा विषय आहे आणि विदेशवारी पात्रे त्यांच्या जीवन विषयक स्वातंत्र्यात्मक दृष्टिकोन त्याच्या कथेत दिसतो आहे हे असे आहे. एकेक पान हे दोन आहेत. त्याच्या कथेत छि मानून स्वतः ही प्रमाणिक असणे, हा तिचा जीवन विषयक दृष्टिकोण असतो त्याच्या कथेतील नायिकेला नीतीच्या कल्पना समाज तिला नाही आणि भाकडे तिची दृष्टि निखळ पारदर्शी असल्याचेजाते. कथेतील

नायिकेला स्त्री-पुरुष संबंधातील ओढ आकर्षण तिला जाणवते. वासना तृमीसाठी पुढाकार घेणारी बीटी देशातील मानसिक भावनिक व मानसिक संघर्ष गौरी देशपांडे यांच्या कथेतून व्यक्त होतो. त्याच्या समकालीन कथा लेखिका गौरी देशपांडे यांच्या कथेतील नायिकाला जीवन स्वरुप आहे.

लेखन मान्यवर मराठी नियतकांलीका मधून लेखन, 'कृतार्थ', 'सातवंदालन', 'तिन्हीसांज', 'गर्भनाळ', 'पिपंळफेरे' अशा पाच कादंबऱ्यांसह 'गर्भफूल', 'बहार', 'स्टारी नाईट' इ. कथासंग्रह प्रसिद्ध पुरस्कार 'भेट आणि फलश्रुती' तसेच 'गर्भनाळ'ला महाराष्ट्र राज्य शासनाचा 2 पुरस्कार, 'भेट' चित्रपट कथेला अल्फा गौरव पुरस्कार, एकूण साहित्य निर्मितीसाठी मध्यप्रदेश मराठी अकादमीचा प्रभाकर माचवे पुरस्कार तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनात दोन वेळा गौरव. लेखन मान्यवर मराठी नियतकालिकांमधनू लेखन, 'कृतार्थ', 'सातवं दालन', 'तिन्हीसांज', 'गर्भनाळ', 'पिपंळफेरे' अशा पाच कादंबऱ्यांसह 'गर्भफूल', 'बहार', 'स्टारी नाईट' इ. कथासंग्रह प्रसि द्ध पुरस्कार 'भेट आणि फलश्रुती' तसेच 'गर्भनाळ'ला महाराष्ट्र राज्य शासनाचा 2 पुरस्कार, 'भेट' चित्रपट कथेला अल्फा गौरव पुरस्कार, एकूण साहित्य निर्मितीसाठी मध्यप्रदेश मराठी अकादमीचा प्रभाकर माचवे पुरस्कार तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनात दोन वेळा गौरव.? लेखन हेव्रत ?समर्पण? सचिन हत्यार? कथा हाच वाङ्मयप्रकार लेखनासाठी का निवडला? -. तुमच्या लेखनाचे स्वागत कसे झाले? कुटुंबाकडून, वाचकांकडून, - समीक्षकांकडून ? कुटुंबाचा पाठिंबा महत्त्वाचा वाटतो? कथालेखनाच्या संदर्भा त त्याचा वि चार कसा करतात? –समीक्षा आणि सन्मान यांच्या विषयी तुमच्या प्रतिक्रिया ? काळानुसार तुमची कथा बदलत गेली का? कशी? – एखादी कथा आज पुन्हा लि हावी असे वाटते का? आज लिहिली असती –तर ती वेगळी लिहिली असती असे वाटते का? असेल तर का? कथेचा व्यक्तिगत आयुष्याशी सांधा आहे? असेल तर कसा? – कथालेखनाला

स्वतःची मदत होते की अडथळा ? कथा माध्यम कधी अपुरे वाटते का? वाटत असेल तर कसे? –दलित कथाकार म्हणून दबाव, दडपण, घुसमट यांचा वेगळा विचार करावा असे वाटते का? स्त्रीची घुसमट आणि दलित स्त्रीची घुसमट यांत फरक असतो का? अधिक निषेधार्थ काय वाटते? – स्त्रियांच्या कथेत जग मर्यादित आहे हा आरोप खरा आहे का? बंडखोरीची व्याख्या लेखनाच्या संदर्भात कशी करता ? लेखनाच्या तुमच्या लेखिकांचा म्हणून एक दबावगट वाङमय व्यवहारात तयार व्हायला हवा असे वाटते का? तसे वाटत असेल तर त्यांने काय साध्य होईल असे वाटते?

निष्कर्ष:-

साठ वर्षांच्या समृद्धीची गोष्ट आहे, असे म्हणत असतानाच, सामाजिक जीवनात स्त्रीने मिळवलेले स्थान, लेखिकांच्या कथावाङ्मयात परुसे प्रतिबिबिंत झाल्याचेदिसत नाही.

- तंत्रज्ञान, पत्रकारि ता, संशोधन, बँकिंग, व्यवस्थापन, कलाक्षेत्र, संवाद, व्यवस्थापन, भाषा यांसह अनेक क्षेत्रांत स्त्रियांच्या वैयक्तिक यशकथा, पुरुषांइतक्याच तुल्यबळ वा त्यांच्या ही पुढे जाणाऱ्या आहेत पण त्याची नीटशी दखल स्त्री-लिखित कथेमध्ये दिसत नाही. पूर्वीच्या तुलनेत वास्तव अधिक गुंतागुंतीचे झालेले असतानाही केवळ जाणि वेच्या अगांने मराठी स्त्रीलिखित कथा पुढे सरकल्याचे दिसते. मात्र नेणिवेच्या अंगाने कमल देसाई यांच्या कथेच्या पलीकडे कोणत्याही लेखिकेने पाऊल टाकल्याचे आढळत नाही.
- आपल्या देशात आणि परदेशातही, पूर्वीच्या तुलनेत सांस्कृतिक विनिमयाच्या अनेक संधी उपलब्ध होऊनही वैश्विक पातळीवरचा भव्य आशय व्यक्त करणारे कथासंग्रह स्त्रीलिखित साहित्यामध्ये दिसत नाहीत. एक कथेमध्ये असे विश्वभान प्रगट होणे शक्य नसते. पण कथासंग्रह अशा प्रकारचा अनुभव देऊ शकतो.

- आंतरजातीय विवाह, भारतातील विविध भाषकांमध्ये होणाऱ्या विवाहाचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत कितीतरी वाढले असूनही अशी दोन कुटुंबे जोडली गेल्यानंतर प्रत्यक्ष जीवन जगताना, संबंधित स्त्री-पुरुषांचा जीवनानुभवही स्वीलिखित साहि त्यामध्ये अपवादानेच आढळून येतो. * वैचारिक दृष्टीने कमल देसाई यांच्या कार्यापलीकडे,स्त्रीलिखित कथासाहित्य पुढेसरकल्याचे दिसत नाही. कदाचित खीले खनाच्या या साऱ्या आणि यापेक्षाही व्यापक, उन्नत भविष्यातील वाटा असतील.

सिमोन द बोहुआर यांच्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकात निष्कर्षरूपात एक महत्त्वाचे विधान आहे. स्त्रीला मुक्त करणे याचा अर्थ तिला पुरुषाबरोबर एकाच नात्यात जखडून न ठेवता तिला बहुरंगी नाती प्रस्थापित करण्याचे स्वातंत्र्य देणे. स्त्रीला तिचे स्वतंत्र अस्तित्व मिळूद्या. तसे झाल्यास तो स्वतःसाठी तर जगेलच, पण पुरुषासाठी ही जगणेबंद करणार नाही. स्त्री- पुरुष दोघेही एकमेकांना क्रि याशील अस्ति त्व मानूलागतील व त्याचवेळी एकमेकांसाठीही उरतील. सिमोन द बोहुआर यांच्या प्रति पादनातील हा जगण्याचा अर्थ, भारतीय अवकाशात साकारला का, तिथपर्यंत पोचण्याचा प्रवास कसा होता, याचे चित्रण हेही स्त्रीलिखित साहित्याचे महत्त्वाचे वळण ठरू शकेल, ज्याचे काही पडसाद सहजीवना विषयक मराठी स्त्रीलिखित कथांमध्ये आढळतात. याच निकषांवर अन्य भारतीय भाषांमधील स्त्रीलिखित कथांच्या तुलनेत मराठी कथा कुठे आहे, याचेही मूल्यमापन करता येईल. शेवटी मुक्तीचा – अभि व्यक्तीचा प्रत्येक मार्ग आपल्या पासून सुरू होते. जसे मुक्ताबाई सांगतात "आपण आपणा शोधुन घ्यावे। विवेक नांदेत्यांच्या सवे।। २०१० मध्ये महिला सक्षमीकरणासाठी 'राष्ट्रीय मिशन'ची स्थापना, सामाजिक कार्यासाठी स्त्रियांना दिले जाणारे देवी अहिल्याबाई होळकर, माता जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई यांसह एकूण सहा राष्ट्रीय पुरस्कार, पौगंडावस्थेतील मुलींसाठी 'सबला' योजना, गर्भवती महिलांसाठी मातृत्व योजना, महिलांसाठी प्रशिक्षण

आणि रोजगारासाठी 'स्टेप' ही योजना, 'प्रि यदर्शनी' स्वाधार अशांसारख्या अनेक कल्याणकारी योजना केंद्र सरकार तर्फे सुरू करण्यात आल्या आहेत. "स्वी विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या कर्त्या आणि लिहित्या प्रागतिकांची एकोणि साव्या शतकाच्या उत्तरार्धातील परंपरा (श्री.ताराबाई शिदं पडिंता रमाबाई, आगरकर ते थेट काशीबाई कानिटकर, हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशीपर्यंत येते, ती) आणि स्त्री-पुरुष समानतेचा संवि धानात्मक पाया रचणारी १९५० ची राज्यघटना, यांचा हात धरून स्वी वि कासाची क्षितिजे रुंदावत चालली आणि गेल्या साठ वर्षां त हळूहळू चित्र बदलत गेले आहे. लेखिकांचे लेखिकापण ही आता सर्जनशील माणूस म्हणून त्यांची अस्तित्व खूण ठरली आहे. लेखिका म्हणून त्यांची आपला वाङ्मयीन अनुवंश शोधण्याची, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन वारशाला विचारपूर्वक होकार किवा नकार देण्याची, समाजदत्त दडपणांची जाणीव होण्याची आणि स्वतंत्रपणे, सजगपण सर्जनशील व्यक्ती म्हणून वाङ्मयीन पर्यावरणात उभेराहण्याची प्रक्रियाही आता पुरी होत आली आहे.

संदर्भसूची:-


१) स्त्री लिखित मराठी कथा-अरुणा ढेरे,पद्मगंधा प्रकाशन.

२) स्त्रि यांचेकथालेखन – मंगला वरखडे- साकेत प्रकाशन औरंगाबाद. २००५

३) स्त्रीवाद-सुमती लांडे- शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर २००७

४) स्त्री प्रश्नांची वाटचाल - प्रतिमा प्रकाशन पुणे २००४

५) स्त्री परुष तलु ना – ताराबाई शिदं – कैलास पब्लिकेशन औरंगाबाद २०१०

६) स्वातंत्र्योत्तर मराठी कथा – नि शि कांत ठकार-नॅशनल बुक ट्रस्ट नवी दि ल्ली २००८.


***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

डॉ. पद्माकर डिगांबर वानखडे
नेवजाबाई महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (महाराष्ट्र राज्य)

**सारांश :-**

साहित्य समाजाचा आरसा आहे. साहित्यात कालानुरूप बदल होत असतो. १९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, त्याचबरोबर स्त्रीवादी साहित्याने जोम धरला व प्रभावी ठरला. भक्तीमार्गातील संत मुक्ताबाई, जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई तसेच १९ व्या शतकातील लक्ष्मीबाई टिळक, ताराबाई शिंदे व बहिणाबाई चौधरी तसेच पुढच्या काळात कवयित्री अनुराधा पाटील, कविता महाजन, इंदिरा संत, रजनी परुळेकर, प्रभा गणोरकर, मल्लिका अमरशेख, ज्योती लांजेवार, कवयित्री नीरजा, शिरीष पै, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार व प्रज्ञा पवार यासारख्या अनेक दर्जेदार कवयित्रींनी आपल्या वेदनेला, खडतर जगण्याला काव्यातून वाट दिली. १९ व्या शतकात स्त्री शिक्षणामुळे ज्ञानाच्या वाटा खुल्या झाल्याने स्त्रिया सुशिक्षित व सुज्ञ झाल्यात. तिला आपल्यावरील बंधनाची जाणीव झाल्याने आत्मभान आले, त्यामुळे मराठी काव्यप्रांतात कवयित्रीने स्त्री यातनाची टोकदार अभिव्यक्ती काव्यातून व्यक्त केली. आजच्या काळात समाजाने नव्या अंगाने स्त्री मुक्तीविषयक स्वीकारशील वृत्तीने बघितले, असे असले तरी समाजात सतत शोषण करणाऱ्यांची संख्या आजही कमी नाही. स्वातंत्र्योत्तर काळात देखील काहीसा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दुय्यम व दुर्लक्षित राहिल्याचे जागोजागी दिसते. उत्तरोत्तर ही परिस्थिती बदलून स्त्रियांना मानाचा दर्जा मिळणे गरजेचे आहे. आज मराठी साहित्यात आधुनिक स्त्री काव्याचा समृद्ध पाया कवयित्रीने स्वबळावर निर्माण केल्याचे दिसून येते. त्यात अधिकाधिक प्रगल्भ विचाराची व प्रत्यक्ष कृतीची भर पडणे गरजेचे आहे. सदर संशोधन

पेपरमध्ये मराठी साहित्यातील केवळ स्त्री कवयित्रींच्या काव्याचा विचार करण्यात आलेला आहे.

**बीजशब्द :-**

स्त्री जाणिवा, स्त्रीपुरुष समानता, स्त्रीवाद, स्त्रीची विविध रूपे, स्त्रीवादी चळवळ, साठोत्तरी मराठी साहित्य, इत्यादी.

**प्रस्तावना :-**

'फेमिनिझम' या इंग्रजी शब्दाचा 'स्त्रीवाद' हा मराठी पर्यायी शब्द आहे. 'फेमिनिझम' या शब्दाची उत्पत्ती लॅटीन शब्द 'फेमिना' पासून झाली. स्त्रीवाद या संकल्पनेचा उदय पाश्चिमात्य देशात झाला असला तरी जगातील भारतासारख्या विविध राष्ट्रांमधून स्त्रीवाद उत्तरोत्तर विकसित होऊ लागला. व्हर्जिनिया वुल्फ, बार्बरा स्मिथ, सीमो द बोव्हा, केप मिलेट या लेखिकेंनी स्त्रीप्रश्नाच्या मुळावरच घाव केला. सुरुवातीच्या काळात स्त्रीवादाबद्दल बऱ्याच उलट-सुलट चर्चा झाल्या. मात्र नंतरच्या काळात स्त्रीवाद मानवी जीवनाला उन्नत करणारी विचारधारा आहे, असे लक्षात आले. स्त्रीवाद म्हणजे नेमके काय? हे पुढीलप्रमाणे सांगता येईल, डॉ. मंगला आठलेकर यांच्या मतानुसार "स्त्रीवाद याचा अर्थ आत्मभान आलेली स्त्री आपण आणि आपला भोवताल यात संबंध कसा प्रस्थापित करते, स्त्री म्हणून अत्याचार, स्त्री म्हणून अवहेलना, उपेक्षा या साऱ्यांना नकार देऊ शकते का हे पाहाणं"[1] तर अश्विनी धोंगडे स्त्रीवादाबाबत आपले मत मांडतात, "स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेऊन स्वतःचा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून हिला जी पशुतल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाच्या तीव्र निषेधातून स्त्रीवादी चळवळीची निर्मिती झाली, या चळवळीतून स्त्रीने तिच्यावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराला झुगारून देऊन माणूसपणाचे जिने जगण्याचा प्रयत्न केला."[2] पुढच्या काळात पाश्चात्य स्त्रीवादाचा प्रभाव मराठी साहित्यावर पडल्याचे प्रामुख्याने दिसून येते.

**प्राचीन व मध्य काळातील स्त्रीवाद :-**

आपल्या साहित्यातून संत कवयित्रीने अभंगातून, महानुभव विदूषींनी भावनांचा आक्रोश व्यक्त केला. दहाव्या शतकात महदंबा, बोनेबाई, आबाईसा यासारख्या अनेक महानुभव विदूषींनी संप्रदायाच्या वाढीस विशेष योगदान दिल्याचे दिसते. आद्य कवयित्री महदंबेने 'धवळे' लिहून स्त्रीमुक्तीच्या चळवळीत ती मैलाचा दगड ठरली. संत मुक्ताबाईंनी आपल्या स्पष्टवक्तेपणातून तत्कालीन समाज व्यवस्थेतील शोषितेला प्रखर विरोध केला. आपल्या कूटरचनेतून समाजव्यवस्थेवर पुरुषी जुलमी सत्तेवर अप्रत्यक्षपणे ताशेरे ओढल्याचे दिसते. बाराव्या शतकात 'नामयाची जनी' म्हणून घेणाऱ्या जनाबाईने समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपल्या अभंगातून व्यक्त केला आहे. समाजाचा स्त्रीकडे आणि स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा प्रगल्भ नसावा असे त्यांच्या अभंगातून, कूटरचनेतून दिसून येते. 'स्त्री जन्म झाला म्हणून उदास न होता'....स्त्रीयत्त्वाची जाणीव ओझे म्हणून मनी न धरता मुक्तपणे जीवन जगावे असे त्यांना वाटते. स्त्रीला भोगवस्तू मानणाऱ्या पुरुषी वर्चस्वाला ते "डोईचा पदर आला खांद्यावरी" या ओळीतून प्रखर विरोध करतात. स्त्री संतावळमधील संत कान्होपात्रा ही एक गणिका. तिच्याकडे केवळ भोगवस्तू म्हणून पाहील्या गेले. त्यामुळे स्त्री असण्याच्या यातना तिच्या अभंगातून जागोजागी दिसतात. संत तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई शिऊरकर यांच्या काही अभंगांमध्ये स्त्रीमुक्तीचे, स्त्रीविषयक दुःखाचे विचार आलेले दिसून येतात. आपल्या अभंगांमध्ये स्त्री बंधने झुगारून देताना, त्या शब्दातून उद्वेग व्यक्त करतात. तर पेशवाई काळात लावणीच्या माध्यमातून स्त्री भावनांचा विचार न करता केवळ देहाचे वर्णन करून तिची अवहेलना झालेली आहे. स्त्रियांचे नटून-थटून वागणे, नाचणे लावणीमध्ये जास्त तर तिच्या अंतर्मनाचा, दुःखाचा, भावनांचा परिपोष फारच कमी लावणीमध्ये दिसून येतो. लावणी लिहिण्यामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या अधिक असल्याने कदाचित असे झाले असेल.

**स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यकाळातील स्त्रीवाद :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे, गो.ग.आगरकर, रमाबाई रानडे, महादेव गोविंद रानडे, र. धों. कर्वे, पंडिता रमाबाई यासारख्या अनेक कृतीप्रवण समाजसुधारकांनी जुन्या रूढी परंपरांना, जातीभेदांना, चालीरीतींना फाटा देऊन सार्वजनिक क्षेत्रात, समाजजीवनात स्त्रीजीवन सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न केला. स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध सतत लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला. कवयित्री लक्ष्मीबाई टिळक व बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातील स्त्रीवाद पाहण्यासारखा आहे. लक्ष्मीबाई टिळक यांनी 'भरली घागर' या कवितासंग्रहातून स्त्री जाणिवा, स्त्रीमन व तिची संवेदनशीलता व्यक्त केली आहे तर बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या सुभाषितवजा रचनेतून ग्रामीण भागातील स्त्री जीवनातील वेदना, त्यांचे दुःख, मध्यमवर्गीय स्त्रीमनाची संवेदना अत्यंत प्रकर्षाने व्यक्त केली आहे.

"रडू नको माझ्या जीवा
तुला रड्याची र सव
रडू हासव रे जरा
त्यात संसाराची चव"

वरील काव्यओळीत संसारात पिचून गेलेल्या स्त्रीमनाची वेदना व्यक्त झाली असून आपला संसार सुखी करण्यासाठी धडपणारी स्त्री येथे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर ते साठोत्तरी या 12-13 वर्षाच्या कालावधीत अनेक कवयित्रीने आपल्या काव्यातून स्त्रीचे भावविश्व रेखाटण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये इंदिरा संत, कवयित्री पद्मा गोळे, कवयित्री संजीवनी मराठे, शांता शेळके यासारख्या कवयित्रींचा उल्लेख करता येईल.

**साठोत्तरी मराठी साहित्यातील स्त्रीवाद** :-

१९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यात आमुलाग्र बदल झाला. कवयित्रींनी आपल्या भावविश्वातून काव्यात बहर आणला. जाणीवा समाजासमोर मांडल्या जाऊ लागल्या. घरासाठी राबराबणारी, नोकरी सांभाळून घर सांभाळणारी, दमून भागून आलेली सर्वस्वाचा त्याग करणारी, आधुनिक स्त्री काव्यातून व्यक्त होऊ लागली. कवयित्री इंदिरा संत यांच्या 'रंगबावरी', 'मेंदी', 'सहवास' यासारख्या

अनेक काव्यसंग्रहामध्ये विविध प्रतिमाच्या साहाय्याने आधुनिक स्त्रीच्या जीवनातील पेच व्यक्त केला. मला भावना आहेत, मन आहे, असा आक्रोश करणारी आधुनिक स्त्री त्यांच्या काव्याचा विषय झाल्याचे दिसून येते. 'शिजवणारी तीच आणि शिजणारी तीच' अशी तिची गत झाली आहे. स्त्रीवादाचा हुंकार त्यांच्या कवितातून जागोजागी जाणवतो. कवयित्री पद्मा गोळे यांची कविता स्त्रीत्वाचा शोध घेणारी आहे. त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झालेली आहे. त्यांनी आपल्या काव्यातून स्त्री जीवनाचा खडतर प्रवास रेखाटलेला आहे. स्त्रीमनाचे विविध पैलू व आधुनिक स्त्रीचे चित्र हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्या आपल्या काव्यातून म्हणतात,

"नाही मी नुसती मादी
मी माणूस माणूस आधी"

वरील काव्यओळीतून स्त्रीला केवळ वासनापुर्तीची मादी न समजता तिला माणूस म्हणून जगण्यास मिळावे, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. कवयित्री शांता शेळके यांनी आपल्या 'वर्षा' 'गोंदण' 'पूर्वसंध्या' यासारख्या अनेक काव्यसंग्रह मधून स्त्री जीवनाची फरफट, अवहेलना व्यक्त केली आहे. त्या आपल्या काव्यप्रवासातून स्वत्वाबद्दल विचार व्यक्त करताना म्हणतात, "माझे अनुभव, माझ्या व्यथा वेदना, माझे एकाकीपण कधीतरी ईश्वरी वरदानासारखा आभाळभर पसरणारा आणि माझ्यावर बरसून ओलाचिंब करून टाकणारा निर्भय आनंद हे सारे केवळ अनुभवून, भोगून मला पुरेसे वाटत नाही....कुठेतरी फरफटत जाणाऱ्या 'मी'ला धुंडाळावेसे वाटते, यासाठी मी कविता लिहिते."[3] ही स्त्री जीवनाची समर्पक प्रतिक्रिया आहे.

कवयित्री प्रभा गणोरकरानी आपल्या काव्यातून स्त्रीला केवळ दासी म्हणून न पाहता मनुष्यत्वाची जाण करून दिली. तिचा एकाकीपणा, तुटलेपणा अत्यंत वेधकपणे आपल्या 'विवर्त', 'व्यतीत', 'व्यामोह' या काव्यसंग्रहातून व्यक्त केला आहे. स्त्री-पुरुष संबंधाचे नवे संदर्भ, स्त्रीपुरुष यांच्या नात्यातील व्यामीश्रता, समाजव्यवस्थेत स्त्रीच्या वाट्याला आलेला सनातन संघर्ष, समाजाने दिलेले दुबळेपण प्रकर्षाने व्यक्त केले आहे.

"त्वचेखाली वाढणाऱ्या एखाद्या दुर्धर रोगमुळाप्रमाणे
आपल्या मनामध्ये दबा धरून आहेत अपरिचयाचे दुखःकण"

कवयित्री निरजा यांनी आपल्या अनेक कवितांमधून स्त्री समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्यांनी आपल्या काव्यातून शोषणाचा कडाडून विरोध केला आहे. स्त्री जीवनाच्या विविध अवस्थांचा शोध त्यांच्या काव्यातून घेतल्याचे दिसते, तर कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यातून स्त्री सन्मानाचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते, स्त्री केवळ अनंत काळाची माता न राहता ती अनंत काळाची माणूस म्हणून राहणे गरजेचे आहे. त्या आपल्या काव्यात म्हणतात,

"हे असं क्षणाची पत्नी आणि
अनंत काळची माता वगैरे असण्यापेक्षा
स्त्रीने अनंतकाळी माणूस असावं"

महानगरीय स्त्रीच्या विदारक संवेदना, समाजव्यवस्थेने त्यांचे केलेले बकाल व विद्रूप जीवन त्यांच्या काव्यातून प्रखरतेने आलेले आहे. कवयित्री अश्विनी धोंगडे यांनी आपल्या 'स्त्रीसूक्त' या काव्यसंग्रहातून स्त्रीमुक्तीचा मार्ग सांगितला आहे. त्या आपल्या कवितेविषयी म्हणतात, "आजची आधुनिक स्त्री व स्वतःचे स्वतंत्र व्यक्तित्व प्रस्थापित तिची चाललेली धडपड आणि संघर्ष यांचे अनोखे काव्यरूप स्त्रीसूक्त काव्यसंग्रहात प्रभावानं व्यक्त झालं."[4] कवयित्री अनुराधा पाटील यांनी स्त्रीला गुलामगिरीमध्ये ठेवलेल्या समाजव्यवस्थेचे चित्रण आपल्या काव्यातून व्यक्त केले आहे. स्त्रियांनी या दुःखातून मुक्त व्हायला हवे, असे त्यांना मनापासून वाटते. कवयित्री ज्योती लांजेवार यांनी आधुनिक युगातील स्त्रियांच्या अंतर्मनाचा अचूक वेध घेतला.

"वाटतं हातात घ्यावं कोलीत
अन लावावी आग
या अमानुष्याच्या वस्तीला
तिथं आपल्या सर्वस्वाची होळी"

स्त्रीच्या मनातील उद्रेक वरील ओळीतून येथे व्यक्त झाला आहे. ग्रामीण जीवनाच्या चक्रात पिळल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या दुःखाचा संदर्भ कवयित्री अत्यंत तपशीलवारपणे मांडतात. आज स्त्रीवादाच्या जाणिवेमुळे नव्या पद्धतीची समाजरचना उदयास येत आहे. या संदर्भात 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' या समीक्षात्मक ग्रंथात आपले विचार

व्यक्त करताना अंजली सोमण म्हणतात, "स्त्रीवाद ही सामाजिक परिस्थितीतून उद्भवलेली विचारसरणी आहे. स्त्रीवादाच्या मूलभूत संकल्पना आता तत्वतः मान्य झालेल्या आहेत. सामाजिक परिस्थिती जसजशी बदलेल तसतसा स्त्रीवादाच्या संकल्पना बदलत जाण्याची विशेषता त्यांच्या कक्षा बदलत जाण्याची शक्यता आहे. या बदलत्या कक्षानुसार उद्या कदाचित स्त्रीवादाची मराठी साहित्यातील प्रतिबिंबेही बदलत जातील."[5] असा आशावाद नक्कीच आहे. स्त्रीयत्त्वाचा नेमका अर्थ लावण्याचा पुरेपूर प्रयत्न मराठी साहित्यात कवयित्रीने केल्याची दिसून येते.

मराठी कवयित्रींच्या काव्यातील स्त्रीवाद बघता असे दिसून येते की, प्राचीन काळातील संत कवयित्रींनी ईश्वर भक्तीत लीन झालेल्या स्त्री मनाच्या भावना, समाजाचे दुखणे या प्रकारच्या सर्व अंगांना आपल्या कवितेत सामावून घेण्याचे सामर्थ्य दाखविले आहे. तर पुढच्या 19 व्या शतकात पाश्चात्य व भारतीय स्त्रीवादी विचारांचा समाजजीवनावर परिणाम होऊ लागल्याचे दिसू लागले. साठोत्तरी मराठी साहित्यात तर आपल्या जाज्वल्य काव्याविचाराने प्रत्येक कवयित्रींने आपापल्या परीने स्त्रीच्या भावनेला वाचा फोडण्याचे कार्य केले. स्त्री ही केवळ 'चुल व मूल' सांभाळणारी साधन नसून सर्वप्रथम ती एक माणूस आहे. याची जाणीव वाचक वर्गापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न साठोत्तरी मराठी कवयित्रींनी आपल्या काव्यातून जोरकसपणे केल्याचे दिसते. त्याचाच परिणाम आजच्या काळात स्त्री जीवनमान उंचावलेले दिसून येत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही.

**निष्कर्ष :-**

१) स्त्रीवाद ही व्यापक संकल्पना आहे. स्त्रियांच्या हिताची, हक्काची व उन्नयनाची भूमिका घेणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद स्त्रीच्या अंतर्मनाचा आक्रोश असून त्यात वर्षानुवर्ष तिचा दडपलेला आवाज आहे.

२) शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रीवादी चळवळीला व साहित्याला बळ मिळाले. त्याचाच परिणाम सर्वसामान्य घरातील स्त्रिया सुशिक्षित होऊन त्यांना त्यांच्या हक्काची जाण निर्माण होऊन त्यांचे आत्मभान जागृत झाले.

३) स्त्री जीवनातील अटळ दुःख नष्ट करणे. तिच्या आशा – आकांक्षा स्वप्नांना आकार देणे हा स्त्रीवादाचा मुख्य हेतू आहे. साठोत्तरी कवयित्रींच्या काव्यामध्ये स्त्रीचे विश्व व तिच्या जाणिवा व्यक्त झाल्या आहेत.

४) स्त्रीवादी साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य असून यातील वैचारिकतेला प्रत्यक्ष कृतीची जोड असणे गरजेचे असते. स्त्रीवादी चळवळीला यामुळेच बळ मिळते.

५) स्त्रीवादी विचारामुळे साठोत्तरी मराठी कवितेत आशय-विषय रुपात आमुलाग्र बदल झाल्याने या काळात कवितेने नवे वळण घेतले. त्याचाच परिपाक दलित प्रखर काव्याचा उदय झाला.

६) एकूणच साठोत्तरी कवितेत मराठी कवयित्रीने आपल्या काव्यात स्त्री जीवनाची फरफट, अवहेलना, आक्रोश व्यक्त केला असला तरी आजच्या नव्या काळात, नव्या अंगानेनव्या विचारातून समाजाकडून स्त्री मुक्तीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

**संदर्भग्रंथ :-**


१) डॉ. आठलेकर, मंगला (२०१५) 'स्त्री-लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा' पाटील, आशुतोष (संपादक) श्रीरामपूर शब्दालय प्रकाशन, प्र.आ. २०१५, पृ.क्र. ९३

२) धोंगडे अश्विनी (१९९३) स्त्रीवादी समीक्षा संकल्पना आणि : स्वरूप, दिलीपराज प्रकाशन, पुणे पृ.क्र.१३

३) अरुणा ढेरे (संपा.) (१९९३) स्त्रीवादी समीक्षा संकल्पना : आणि स्वरूप, प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ .क्र.४५६

४) धोंगडे अश्विनी (१९९३) स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजना ,दिलीपराज प्रकाशन, पुणे पृ.क्र.१

५) अंजली सोमण (१९८९) साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ.क्र.१९९


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन

विलास सिंदगीकर
मुख्याध्यापक, क्रांती माध्यमिक विद्यालय, केकत सिंदगी.
ता.जळकोट, जि.लातूर -४१३५३२.

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळालं. अख्ख्या जगानेही भारताचं स्वतंत्र लोकशाही राष्ट्र म्हणून स्वागत केलं, आणि देशात लोकशाही मूल्यधिष्ठित स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या सामाजिक नैतिक  मानवतावादी मूल्ये तत्वावर अधारित शासन पध्दती सुरू झाली. विषमतावादी विचारांना मूठमाती दिली गेली. प्राचीन काळापासून परंपरेने शिक्षण नाकारलेले समूह ज्ञानसूर्यात प्रकाशमान झाले. देशातील शहर, गाव, वाडी, तांडा व पाड्यावर शिक्षणाची गंगा पोचली. त्यामुळे आपल्या देशात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्यामुळे समाजात जागृती निर्माण झाली. दलित, आदिवासी या प्रमाणेच स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. पण स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात विविध समाज घटक शिक्षणाच्या प्रवाहात ओढले गेले. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनही शिक्षण घेऊन शिक्षित होऊ लागल्या. शिक्षण घेतलेल्या स्त्रियांसाठी विविध ज्ञान शाखांची  दारे खुली झाल्यामुळे त्यांचे जग बदलून गेले, आणि त्यांच्या जाणिवाचे विकसन होत गेले. मग त्यांनी स्वतःच्या मूलभूत हक्कासाठी, प्रश्नासाठी विविध चळवळी सुरू केल्या. उभारल्या. शिक्षणाच्या बदलामुळे शिक्षण घेऊन त्या स्वतःच्या पायावर उभा राहू लागल्या. त्यातून त्यांनी स्वतःचे प्रश्न सोडवण्यासाठी, आपलं दुःख जगाच्या वेदीवर मांडण्यासाठीच त्यांनी स्त्रीवादी साहित्य चळवळ सुरू केल्या. शिक्षित झालेल्या माहिलांनी हाती लेखणी घेऊन अज्ञानाचा आणि दारिद्रयाला नायनाट करण्यासाठी प्रकाशयात्री बनल्या. म्हणून पुरुषसत्ताकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला. स्त्री ही 'चूल आणि मूल' या पलीकडे जाऊन तिने घराचा उंबरठा ओलांडला. त्यामुळे स्त्री ही शिक्षण, अर्थजन आणि स्वतःच्या व्यवसायाचा विचार करताना या प्रवासात स्त्रीला स्त्रीही अनेक रूपात भेटली. विभक्त कुटुंब

पद्धतीने, स्त्री-पुरुष संबंधात येणारा मोकळेपणा, आधुनिक पोशाख वापरातील हटवलेले निर्बंध, कुटुंब नियोजनाचा स्वतःला घेण्याच्या निर्णयाचे स्वातंत्र्य, वैचारिक आयुष्यात स्त्री स्वातंत्र्याच्या मिळालेल्या स्वतंत्र कल्पना, एकट्याने करावे लागणारे प्रवास, आधुनिक राहणीमानातील सुखसोयी व एकटीने राहण्याची सवय, त्यांच्या जीवनाच्या अर्थशून्यतेची, वैफल्याची, नोकरीच्या निमित्ताने तसेच एकाकीपणाची सवय या जाणिवेने नैराश्याचे एक सावट इत्यादी. घटनेचा परिणाम या काळातील महिला कथालेखिकावर पडला. त्यामुळे अनेक घटनांनी स्त्रीला एक सामर्थ्य आणि आत्मविश्वास दिला गेला. मिळाला म्हणून साठोत्तरी शिक्षण घेतलेल्या स्त्रिया पुरुषाप्रमाणेच लेखन चळवळीशीही जोडल्या गेल्या. त्यांचे अनुभवविश्व विस्तारले. शिक्षित स्त्रीवादी लेखिकांना स्वतःला त्यांना अभिव्यक्त होण्याची गरज भासू लागली. म्हणून साठोत्तरी काळात अनेक महिला लेखिका तयार झाल्या. मोठ्या उमे६ीने लिहू लागल्या. आपले भले बुरे अनुभव मोठया ताकदीने मांडू लागल्या. साठोत्तरी महिला कथा लेखिकामध्ये नवनिर्मिती एक नवी लाट निर्माण झाली. त्या कथालेखिकांनी मराठी स्त्रीवादी कथेला चिंतनशील बनविले. कथेला तत्त्वज्ञानाची दृष्टी दिली. म्हणूनच नवीन कथा लेखिकांची एक सशक्त लिहिती पिढी पुढे आली. त्यांची कथा एका व्यक्तीच्या भोवती न फिरता समूह मनाचे दर्शन घडवून त्यातून स्त्रीत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागली. साठोत्तरपूर्व काळातही मोठ्या प्रमाणात कथालेखक पुरुषच करीत होते आणि साठोत्तरी काळातही बहुतेक कथा लेखक पुरुषच होते. पुरुष लेखकांच्या मनाने महिला कथालेखिका नगण्य होत्या. पण साठोत्तरी मराठी महिला स्त्रीवादी कथा लेखिकांच्या स्वरूपात झपाट्याने बदल होत गेला. नव्या जाणिवा घेऊन स्त्री कथा लेखकांनी जुन्या कथेची चौकट तोडली. मोडली आणि त्याच जाणिवांनी एक नवी चौकट स्त्रीवादी लेखकांच्या भोवती उभी केली. माणसाच्या मनात खोलवर जाऊन त्यांच्या अंतरिक संवेदनांचे चित्रण करताना ते त्या व्यक्तीचे सर्व अंतरंग ढवळून काढू लागल्या. त्या स्त्रियांच्या अथांग दुःखाचा वेध घेऊ लागल्या. त्यांच्या विविध चळवळीमुळे कलावाद्यांचा प्रभाव आपोआप कमी होत गेला. जीवनाचे कलात्मक चित्रण करण्यापेक्षा जीवनाचे अर्थपूर्ण चित्रण लेखिका करू लागल्या. त्यामुळे प्रस्थापितांच्या लेखनामुळे मराठी साहित्याला काही अंशी साचलेपणाची जी कळा आली होती. जी कोंडी निर्माण केली होती. ती

कोंडी फोडण्याचे ऐतिहासिक कार्य साठोत्तरी मराठी कथा लेखिकांना जाते. स्त्री जीवनातील समस्या रंगविण्यासाठी बऱ्याच लेखीकाही या काळात पुढे आल्या. साठोत्तरीपूर्व काळात मराठीत काही कथा लेखिकांचा उदय झाला होता. त्यांनी स्त्री जीवनातील समस्या कथेतून मांडल्या. त्याचबरोबर स्त्री मनाचे विश्लेषणही केले. त्यात विभावरी शिरूरकर ह्या प्रथम श्रेणीच्या लेखिका आहेत. याशिवाय या काळात मुक्ताबाई दीक्षित उर्फ कृष्णाबाई, सौ. कमलाबाई टिळक, आनंदीबाई किर्लोस्कर, शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, मालतीबाई बेडेकर, सौ. कुसुमावती देशपांडे, कमला फडके, शांता शेळके, सुमती क्षेत्रमाडे, वि. म. गीताली, वंदना भागवत, आदी. स्त्री कथा लेखिकांनी बहुमोल कथालेखन केलेले आहे. त्यांनी आपल्या कथांतून स्त्री मनाचे काही पदर अतिशय हळुवार रीतीने उकलून दाखविले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून साठोत्तर काळापर्यंत यांनी विपुल लेखन केलेले दिसून येते. या सर्व लेखिकांच्या कथा मराठी साहित्याच्या क्षितिजावर तळपू लागल्या. तसेच या साठोत्तर काळात अनेक महिला लेखिकांनी कथावाङ्मयाचा प्रवाह अधिक समृद्ध केलेला आहे. या काळातील महत्त्वाचे नाव आपल्या डोळ्यासमोर येते ते काशीबाई कानिटकर आणि आनंदीबाई शिर्के या दोघींचे. सौ. काशीबाई कानिटकर या मराठीतील आद्यकथा लेखिका आहेत असे दिवा अमोनकर म्हणतात. (मराठी लघुकथा अंक ६ वा. रत्नाकर,ऑक्टोबर १९३०). या हरिभाऊ आपटे कालखंडातील कथा लेखिका आहेत. त्या काळाच्या पार्श्वभूमीवर या दोन लेखिकांनी दाखविलेले वाङ:मयीन कर्तत्व उल्लेखनीय होते. यानंतर खऱ्या अर्थाने विभावरी शिरूरकर, कमलाबाई टिळक, वसुधा पटवर्धन, शिरीष पै, विजया राज्याध्यक्ष, हिरा बनसोडे, उर्मिला पवार, कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, नीलम गोऱ्हे, प्रिया तेंडुलकर, तारा वनारसे, वसुधा पाटील, इत्यादी. स्त्री कथाकारांनी एक संपन्न परंपरा मराठी वाङ्मयात विकसित केली. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता ते सामाजिक प्रश्नांचे विचारमंच बनला पाहिजे, ह्या भूमिकेतून सा ठोत्तर काळातील कथालेखिका कथा लिहू लागल्या. साठोत्तर काळातील अनेक सामाजिक स्तर आपल्या वेदना आणि सुखदुःख आपल्या साहित्यातून व्यक्त करू लागल्या. स्त्रीयांनीही आपल्या व्यथा, वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेल्या दिसतील.

सुरुवातीच्या काळात लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखनावर पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेचा पगडा असलेला आपणास जाणवतो. पुरुषांच्या वाङ्मयाचे अनुनय करण्याचाही प्रयत्न काही लेखिकांच्या लेखनातून केलेला जाणवतो. आपले शरीर आणि सौंदर्य हे पुरुषासाठीच आहे अशा भावना काही लेखिकांनी आपल्या कथातून मांडलेल्या आहेत. पुरुषाच्या प्रेमासाठी त्याची आराधना करणे त्या अनुरोधाने होणारी आपली देहिक तडफड आणि प्रणय भावना व्यक्त करणे अशा स्वरूपाचे रंजन प्रधान लेखनही काही लेखिकांनी केलेले दिसेल. पण साठोत्तर काळात स्त्रियांच्या संघटनांनी आपल्या हक्कासाठी संघर्ष सुरू केला. स्त्रियांच्या अधिकाराची बाजू घेणाऱ्या भूमिका मांडल्या. मग हळूहळू समाजात उदारमतवादी वातावरण निर्माण होऊ लागले. त्यामुळे सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या लेखनात जाणवणारी समन्वयवादी दृष्टी मागे पडली, आणि स्त्रिया ही आपल्या समग्र अनुभवांना शब्दरूप देऊ लागल्या. स्त्रियांच्या पारंपरिक मानसिकतेतून अमुलाग्र बदल होऊ लागला, आणि त्याचे पडसाद स्त्रियांच्या लेखनात उमटू लागले. विवाह संस्थेमुळे स्त्रियांचे होणारे शोषण आणि समाजातील तिचे दुय्यम स्थान याविषयी समाजमनात हलचल सुरू झाली. पुरुषांनी स्त्री रूपाचे गोडवे गाणाऱ्या तथाकथित उदात्त प्रतिमा निर्माण केलेल्या होत्या. देवता, सती, पतिव्रता, माता, अबला, अर्धांगिनी, सौभाग्यवती अशा तथाकथित रूपांना तडे जाऊ लागले. जोडीदार, मैत्रीण, सहकारी आणि कार्यकर्ता अशा नव्या रूपात जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्री अग्रेसर होऊ लागली. तिने अर्धांगी होण्यापेक्षा पूर्ण होणे पसंत केले. 'चूल आणि मूल 'हे तिचे कार्यक्षेत्र मागे पडून पारंपरिक रूपही पालटले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवी चेतना निर्माण झाली. त्यामुळे साठोत्तरी काळातील स्त्री लेखिकांनी कथेचा प्रांत समृद्ध केला आहे. पुरुष लेखकांनी स्त्रीला केवळ विनोद, शृंगार आणि प्रणयासाठी वाङ्मयातून वापरलेले दिसते. स्त्रीचे खरे प्रतिबिंब व्यक्त व्हायचे असेल तर स्त्रीनेच लिहिले पाहिजे. या भूमिकेतून स्त्रियांनी आपल्या व्यथा, वेदना आणि हक्क अधिकाराच्या विषयांना घेऊन कथा लिहिल्या. म्हणूनच स्त्री स्वातंत्र्य, स्त्री मुक्तीचा घोष, ह्या कथामधून निनादतांना दिसतो. यात कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, उर्मिला पवार, हिरा बनसोडे, प्रिया तेंडुलकर, विजया राजाध्यक्ष, आशा बगे अंबिका सरकार ह्या

साठोत्तरी काळातील स्त्रीवादी लेखिका आहेत. ज्यांनी आपल्या भावना कथांमधून स्त्रियांच्या प्रश्नाविषयी एक भूमिका घेऊन लेखन केले आहे.

कमल देसाई :-

कमल देसाई ह्या साठोत्तरी मराठी महिला कथा लेखिकामध्ये आघाडीच्या कथा लेखिकाआहेत. त्यांच्या 'महादेव वाडी', 'तिळा', 'बंद', 'भुलावण' आणि रंग १,२' आदी. कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. कमल देसाईच्या सर्वच कथा स्त्री केंद्रित आहेत. त्यांच्या कथेतील बहुतांश कथा नायका प्रधान कथा आहेत. त्यांच्या कथातील नायिका प्रौढ, नोकरी करणारी व जीवन व्यवहाराच्या बाबतीत उदासीन असतात. स्त्री जीवनाचे विविध पदर आणि परिणामाचे सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक, तात्विक अशा विविध पातळयावरून धटीपणे उलगडून दाखविले आहेत. जानीवेकडून नेनिवेकडे झेपावण्याचे सामर्थ्य अधिक आहे. कौटुंबिक कथांतून अस्तित्वाच्या चिरंतन आणि मूलभूत प्रश्नांना तळ गाठल्याचे प्रतीत होते. माणसाला छेदणाऱ्या सर्वव्यापी दुःखाचा शोध घेत मुख्य म्हणजे या सर्व मूलभूत शोधाच्या केंद्रस्थानी स्त्री आहे. कमल देसाईची कथा आशयाची सूक्ष्मतीसूक्ष्मता व अभिव्यक्तीचा तरलपणा यामुळे एक वेगळीच झेप घेते. कारण त्यांच्या कथेचा घाटच वेगळा आहे. संवेदनांच्या व प्रतितांच्या आधारे त्या आपल्या कथेचा आशयमूर्थ करत जातात. मात्र या साऱ्यातून निरर्थकतेची, वैफल्याची व निशक्रीयतेची छाया पडली आहे. जीवनाची शूद्रता व किरटेपणा यांची भेदक जाणीव त्यांच्या प्रत्येक कथेतून होते. त्यांची कथा एका सरळ मार्गाने कधी जात नाही, ती सारखा मार्ग बदलते. कधी विरोधी मार्गाने, कधी संवादी मार्गाने, तर कधी समांतर वळणे घेत आपले उद्दिष्ट साधते.

कमल देसाईच्या कथानायिका जगात जीवन जगत असताना जीवनापासून अलिप्त राहणारे हे व्यक्तिमत्व व जाणीव नेणिवेच्या पातळीवर फिरणारे तिचे मनोव्यापार हेच त्यांचा कथेच्या केंद्रस्थानी असतात. त्यांच्या कथेतील पात्रे स्वतःभोवती एक कवच निर्माण करतात व कोशात गुरफटल्याप्रमाणे एकांडेपणाने स्वतःचे जीवन व्यवहार चालू ठेवतात. अतिरेकी व्यक्ती केंद्रत्वामुळे त्यांच्या नायिका कोणाशीही जवळीक साधत नाही. त्यांच्या कथेतील निवेदकाला सगळेजण उफारतटे, परके, कंटाळवाणे व अर्थशून्य वाटते. आपण सगळी माणसे आहोत म्हणजे इकडून तिकडे हलविले जाणारी प्यादी

आहोत याची त्याला सतत जाणीव असते. तरीही हे कंटाळवाने जीवन सक्तीचे जगावे लागते. सज्ञाप्रवाहाच्या आधारे व्यक्तीमनाचे विविध स्तर उकलून काढण्याचे कमल देसाई यांचे सामर्थ्य त्यांच्या कथेत विशेषत्वाने प्रत्ययास येते.

गौरी देशपांडे:-

साठोत्तरी काळातील ख्यातनाम, बंडखोर, स्त्रीवादी लेखिका म्हणून परिचित.त्या लेखणीच्या धटीपणामुळे महाराष्ट्रात त्या विशेष गाजल्या. त्याचबरोबर त्या चौकटी बाहेर जाऊन कथा लिहिणाऱ्या मराठीतील खास लेखिका म्हणून नावलौकिक मिळविला. गौरी देशपांडे यांनी साहित्यातील सर्व प्रकार हाताळले. मराठी साहित्याला स्त्री लेखिकांची मोठी परंपरा लाभली आहे. त्यांनी असंख्य स्त्रियांचे निरनिराळया पातळीवर स्त्री आयुष्याचे चित्र वाचकापुढे उभा केलं. ह्या सगळया प्रभावळीत गौरी देशपांडे यांनी केलेल्या लिखाणाचे वेगळेपण, हे विशेष आहे. गौरी देशपांडे यांनी सहा कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांचा स्पष्ट स्त्रीवादी दृष्टिकोन, धर्म आणि लैंगिकता यासारख्या पुरुषी वर्चस्व असलेल्या संकल्पनावर त्यांनी व्यंगात्मक लिखाण केले. त्याआधीच्या बऱ्याचशा साहित्यात स्त्रियांचे कौटुंबिक प्रश्न किंवा पुरुषी वर्चस्वामुळे निर्माण झालेले प्रश्न चर्चिले गेले होते.

गौरी देशपांडे यांची पिढी ही स्वातंत्र्योत्तर पिढी आहे. या काळात स्त्री पुढचे प्रश्न बदलले होते; पण संपले नव्हते. स्त्री शिक्षण आणि नोकरीसाठी घराचा उंबरठा ओलांडण्याची सवय समाजाला झाली होती. गौरी देशपांडे यांची पिढी प्रश्नापासूनच पुढे आली होती. समाजाने स्त्रीकडे व्यक्ती म्हणून बघावं अशा विचाराच्या प्रभावात लेखन केलं होतं. गौरी देशपांडे यांच्या लेखनात तिच्या मुक्त विचाराचे प्रतिबिंब अगदी स्पष्ट दिसते. तिचं लेखन स्त्रीवादी असल्यापलीकडे जाऊन स्वातंत्र्यवादी व व्यक्तीवादी होते. वेगवेगळया पातळीवरचे प्रेम, त्या प्रेमाची मोजावी लागणारी किंमत आणि त्या प्रेमाच्या मर्यादा याबद्दलचे विचार तिच्या लेखनात दिसतात. स्त्रीवादाच्या वाटेवरून जाणाऱ्या कोणत्याही परिवर्तनवादी लेखकाला त्यांचे नाव टाळून पुढे जाता येत नाही.गौरी देशपांडे यांनी प्रेम, वात्सल्य या गोष्टी नैसर्गिक असल्याने स्त्री-पुरुष संबंधातील त्यांचे मते टोकाची असायची. वि.म. गीताली म्हणतात,'गौरीने माणसाच्या देहाकडे स्त्रीदेह आणि पुरुषदेह या द्वैतभावनेने न बघता निखळ मानवी देह म्हणून बघितलं जावं' ते

असं म्हणतात. म्हणून त्यांनी स्त्रीच्याच देहाभोवती बांधलेले नैतिकतेचे निकष तोडायला सुरुवात केली. गौरी देशपांडे यांच्या कथा रोखठोक असतात. तसेच त्यांचे पाय वास्तवांच्या भूमीत पक्के रुतलेले असतात. इंग्रजी मिश्रित मराठीचे वेगळेच रूप गौरी देशपांडे यांच्या कथातून आलेले असते. गौरी देशपांडे यांच्या कथेला स्त्री कथाकारांच्या पुढील पिढीची प्रतिनिधी कथा म्हणता येईल. आपल्या सर्व कथांत व्यक्ती स्वातंत्र्य हे मूल्य अत्यंत जबाबदारीने त्या प्रक्षेपित करतात.

सानिया :-

सानिया म्हणजे सुनंदा कुलकर्णी-बलरामन या वेगवेगळ्या टोपन नावाने लेखन करणाऱ्या एक मराठीतील महत्त्वाच्या कथा लेखिका आहेत. सानियाने १९७५ पासून कथा लेखनाला सुरुवात केली. आजपर्यंत आशयघन आणि प्रयोगाशील असे लेखन त्यांनी केले आहे. आधुनिक स्त्रीचे दुःख मांडणारी सानिया यांचे कथालेखन 'मी' ला केंद्रस्थानी मानून केलेले दिसून येते. त्यांच्या 'अशीवेळ', 'ओमियागे', 'खिडक्या', 'दिशा' 'घरांच्यापरिणाम','पुन्हा एकदा', 'प्रणिती ,' 'भूमिका 'वलय', 'शोध' असे त्यांचे विविध अंगी कथासंग्रह वाचत असतना आपल्याला सतत जाणवत राहतं की, त्यांच्या कथा पुस्तकातील पात्र विचारी आहेत. त्यांना प्रश्न पडत असतात. ते कसला ना कसला शोध घेत आहेत. आत्तापर्यंत सानीयांच्या प्रसिद्ध झालेल्या सर्व कथासंग्रहातून त्यांनी आधुनिक वळणाच्या उच्चभ्रू स्त्रियांची दुःखे सूक्ष्मपणे मांडली आहेत. त्यांच्या नायिका हळव्या, कल्पनाविश्वात रमणाऱ्या आणि आत्ममग्न असतात. या स्त्रियांच्या तरल दुःखाच्या छटा बारकाईने टिपत सानिया यांची संत लयित उलगडत जाणारी कथा वाचकांच्या मनात प्रवेश करते. स्त्री नायिकांच्या दुःखा मागील सामाजिक संदर्भ त्यांच्या कथेत व्यक्त होत नाहीत. त्यांच्या बऱ्याच कथा आकाराने दीर्घ असतात. सूक्ष्मतेच्या नावाखाली येणारा अनावश्यक तपशील व त्याच आशयाची पुनरुक्ती यामुळे त्यांच्या अलीकडील कथा उथळ वाटतात. त्यांच्या कथा वाचकांना आता फारसे नवे सांगत नसल्यामुळे त्यांच्या कथांतील पसरटपणा वाचकांना खटकतो.

साठोत्तरी मराठी कथेच्या परिघात सानिया यांनी स्वतःचा एक अमिट असा ठसा उमटविला असून, स्त्री विषयक कथा लिहूनही त्यांच्या साहित्यावर स्त्रीवादी साहित्य असा शिक्का बसलेला नाही,हे त्यांच्या कथा लेखणाचे विशेष! त्यांची कथा प्रामुख्याने आधुनिक

स्त्रीच्या सुखदुःखाच्या जाणिवांचा शोध घेणारी आहे. याशिवाय स्त्री-पुरुष संबंधातील अनेक पदरी व विविध परिमाने असलेल्या सहसंबंधाचा शोध त्यांच्या कथातून घेतलेला आढळतो. मानवी नात्यांतील निरर्थकता, दुरावा, अकारण निर्माण होणारे गैरसमज व त्यातून व्यक्तीच्या वाट्याला येणारा एकाकीपणा, कटुता इत्यादी, विशेष त्यांच्या कथालेखनात आढळतात. माणसांच्या, समाजाच्या, नात्यांच्या या परिघात वावरणाऱ्या स्त्रीला पडणारे प्रश्न, तिचा खडतर प्रवास यांची भावपूर्ण उत्कट गुंफण त्यांच्या कथांतून दिसते. सानियांची कथा लेखनशैली काहीशी त्रोटक, संदीग्ध आहे. जीवंत व्यक्ती चित्रे,तरल काव्यात्मक भाषा आणि जीवनाविषयीची प्रगल्भ दृष्टिकोन यांमुळे हे लेखन एक वेगळीच उंची गाठते. साठोत्तर लेखिका मध्ये सानिया बरोबरच आशा बगे यांचे नाव अग्रेसर आहे.

आशा बगे :-

मराठी साहित्य विश्वातील कथावाङ्मयात आशा बगे यांचे नाव एका वेगळया परिणामाच्या कथा लेखिका म्हणून स्थिर झाले आहे. आशा बगे यांनी विपुल लेखन केले असून त्यांचे एकूण १२कथासंग्रह प्रकाशित आहेत. मारवा (१९८४) या पहिल्याच कथासंग्रहांनी त्यांनी अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष आकर्षित करून घेतले आहे. १९६० नंतरची कथाही नवकथेच्या वाटेने जाणारी होती. याच काळात नवे सामर्थ्य घेऊन आशा बगे यांची कथा पुढे आली. समकालीन लेखिकांपेक्षा आशा बगे यांचे लेखन निराळे आहे. त्यांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन आधुनिक आहे. परंपरंपरेशी असलेले नाते त्यांनी तोडलेले नाही. त्यामुळे त्यांच्या कथांमधून परंपरा आणि नवता यांच्यातील ताण सूक्ष्मतेने जाणवत राहतो. आशा बगे यांची कथा मुळात मनोविश्लेषण प्रधान आहे. ती संगितासारखी संथ लयीत उलगडत जाते. त्यांची कथा आकाराने लहान मोठी कशीही असली तरी अनुभूतीने तीव्र असते. अतिरंजक, एकटेपणा, प्रचारकी भाषा, अगदी स्त्रियांचे दुःख मांडताना सुद्धा अशा बगे यांच्या कथेत दिसत नाही. त्यांच्या कथेचे हे एक सामर्थ्य सांगता येईल.

आशा बगे यांच्या कथा वाचकाला अस्वस्थ करतात. एका नव्या अस्तित्वाचे वाचकाला भान देतात. 'मारवा', 'अत्तर', 'पूजा', 'चंदन', 'मांडव','अनंत', 'पाणी' आदी कथासंग्रहात भारतीय परंपरेचे निकोप रूप ताजेतवाने व नूतन होऊन कसे अवतरू शकते, याची

प्रचिती आशा बगे यांची कथा देते. त्यांच्या कथेतील स्त्री प्रतिमा या पारंपरिक वाटल्या, तरी त्यांनी नायिका जाणीवपूर्वक बुद्धिमान, बंडखोर व खंभीर पण स्त्रीत्वाच्या मर्यादा न ओलांडणाऱ्या दिसतात. जनाबाईंच्या अभंगासारखी सहज निर्मळ शैलीने कथा गर्भश्रीमंत झाली आहे, असेही डॉ. सुलभा हेरलेकरनी म्हटले आहे. त्यांच्या कथा मराठी कथेवर वेगळी मुद्रा उमटवून जातात.

विजया राजाध्यक्ष:-

मराठी नव कथेच्या नवीन वाङ्मयातील प्रभाव पडलेल्या वातावरणात लिहू लागलेल्या लेखिकांपैकी एक प्रमुख महिला कथा लेखिका म्हणजे विजया राज्याध्यक्ष होय. त्यांनी १९५० पासून कथा लेखनाला सुरुवात केली. त्यामुळे 'कथा' या वाङ्मय प्रकाराची विजयाबाईची प्रधान निष्ठा होती. 'अधांतर 'या पहिल्या कथासंग्रहा नंतर त्यांनी 'विदेही', 'अनोळखी', अकल्पित', 'हुंकार' 'अखेरचे पर्व', 'उत्तरार्ध 'आदी. नंतर असे एकूण १९ कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कथा प्रामुख्याने मध्यमवर्गीय परिवेशातील स्त्री जीवन चित्रित करण्यावर त्या भर देतात. विजयाबाईच्या कथेत वेगवेगळया पिढ्यातील बद्धमुक्त स्त्रीची जीवन कहाणी आहे. त्यांच्या कथा वाचताना काहीतरी उत्साह धुसर आणि स्वप्नाळू जगाचे दर्शन आपल्याला घडते. त्यांच्या कथेतील व्यक्ती स्वतःभोवती गिरक्या घेणाऱ्या वास्तवापासून दूर सरकून अधांतरी झेप घेणाऱ्या व स्वतःच्या भावविश्वात स्वतःच हरवून बसलेल्या दिसतात. ज्या नवकथेचा प्रभाव काळात त्यांच्या कथालेखनाला आरंभ झाला, त्यातील नवतेच्या जाणिवेत काल्पनिक परंपरेला छेद हा एक त्यांच्या कथेचा ठळक विशेष होता. तसेच विजयाबाईंची कथा प्रामुख्याने मध्यमवर्गीय परिवेशातील स्त्री जीवनचित्रित करण्यावर भर देते. तरल, काव्यात्म शैलीने त्यांची कथा वैशिष्टयपूर्ण ठरते. अशा बगे, अंबिका सरकार आणि सानिया या कथा लेखिकांनी त्यांच्या कथालेखिका म्हणून आलेल्या घडणीत विजया राजाध्यक्ष यांचा कथांचा वाटा मोठा आहे, असे कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेले आढळतात.

अंबिका सरकार:-

स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रगतीची चाहूल लागलेली असताना आधुनिकतेची कास धरून जाणाऱ्या सुशिक्षित व सुसंस्कृत

स्त्रियांना तसेच स्वतःच्या भावविश्वाबाबत सजग असलेल्या नायिका केंद्रस्थानी ठेवून अंबिका सरकार यांनी प्रामुख्याने अनेक कथा लिहिल्या आहेत. त्या 'चाहूल', 'प्रतीक्षा,' 'एकाश्वासाचं अंतर', 'शांतवन' अशी कथाग्रंथ त्यांनी लिहिलेली आहेत. मोजकया शब्दांमध्ये अधिकाधिक आशय मांडण्याची कथालेखनाचा आकृतीबंध त्यांनी आत्मसाथ केला होता. मानवी नात्याच्या पारंपरिक प्रतिमांना छेद देत जगण्याचा प्रयत्न करणारी त्यांची नायिका वाचकांनाही भावली आहे.

साठोत्तरी काळात अनेक स्त्री लेखिकांनी कथालेखन केलेले दिसून येत आहे. त्यात सरिता पदकी, तारा वनारसे, दुर्गा भागवत व वसुधा पाटील यांचीही कथा नवं तोंडवळा घेऊन येते. त्याच काळात कथालेखनात आपले वेगळे असे व्यक्तिमत्व प्रकट करणाऱ्या सुधा नरवघे, ज्योत्सना देवधर, इंद्रायणी सावकार, शकुंतला गोगाटे,शैलजा राजे, प्रिया तेंडुलकर, इत्यादी कितीतरी लेखिका कथा लिहिताना दिसून येतात. मात्र पुढे चालून त्याअधिक मोकळेपणाने समर्थ आविष्कार करू लागल्या आहेत. त्यात सरोजिनी सारंगपाणी, माधवी देसाई, सुनीता देशपांडे, ताराबाई परांजपे(भावगंगा), शैला लोहिया (कथाली), अनुराधा वैद्य (जोगवा, गारूड, काजळ , अत्तर ), सुहासिनी इर्लेकर (आई, माझी आई), डॉ. मंगला वैष्णव (वासंतीक), सुनेत्रा ओक (मोहीम), डॉ. भारती जाधव, प्रतिभा जोशी, शारदा तुंगार, प्रा. रसिका देशमुख, सौ. वृंदा दिवाण आदी. कथा लेखिकांनी स्त्री जीवनाची आणि मध्यमवर्गीय जीवनाची गुंतागुंत आपल्या कथेतून समर्थपणे आविकृत केले आहेत.

आंबेडकरांच्या प्रेरणेने काही दलित लेखिकाही लिहित्या झाल्या. त्यात हिरा बनसोडे, उर्मिला पवार, प्रतिभा अहिरे, छाया बेले, छाया कोरेगावकर आदी. कथा लेखिकांनी दलित स्त्रियांचे अनुभव विश्व कथावाङ्मयात आले नव्हते ते त्यांनी आणले. वेदना, विद्रोह व नकार या सूत्रानुसार त्यांनी कथालेखन केले आहे. त्यानंतर कथात्म साहित्यात अत्यंत गांभीर्याने लेखन करणाऱ्या रेखा बैजल या महत्त्वाच्या कथा लिहित आहेत. (पक्षी जाय दिगंतरा, शिवार), छाया महाजन (स्पर्श, वळणावर नकळत, ओढ), इंदुमती जोंधळे, ललिता गादगे, शांता जोशी, मथू सावंत, नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, प्रतिभा घारे,कुसुम आत्राम,

उषाकिरण आत्राम, डॉ. तसनिक पटेल, नर्गिस बानो शेख आदींनी स्त्री जीवनाच्या समस्या, त्यांची सुखदुःखे त्यांच्या भावभावना रंगविण्यासाठी अनेक कथा लेखिका लिहित्या झालेल्या पाहायला मिळते. ललिता गादगे यांच्या कथामधून मध्यमवर्गीय ग्रामीण जीवनाचे चित्र बारकाव्यानिशी येते. तर मथुताई सावंतांच्या कथांमधून ग्रामीण जीवन, राजकारण, निवडणुका आणि विस्कटलेली ग्रामघडी यांचे चित्रण येते. (पाण्यातील पायवाट, तिची वाटच वेगळी, पानबळी), यानंतर नांदेडच्या सौ. छाया बेले यांनी अल्पावधित एक सशक्त कथालेखिका म्हणून मराठी वाङ्मयात आपली वेगळी मुद्रा उमटवली आहे. डॉ. प्रतिमा इंगोले ह्यासारख्या कथालेखिकांचा अपवाद वगळता ग्रामीण स्त्रियांचे अनुभव विश्व क्वचित मराठी कथा लेखिकांनी कथाविषय बनविलेले दिसत नाही. प्रतिमा इंगोली यांनी माहिला कथा लेखिका मध्ये ग्रामीण स्त्री दुःखाचे चित्रण मोठया ताकदीने मांडले आहे . त्या सध्याच्या या मराठातील मान्यवर लेखिका आहेत. त्यांनी वऱ्हाडी बोलीच्या कथा लिहिल्या आहेत. त्यांचे 'हजारी बेलपान', 'जावयाचं पोर', लेक भूईची', 'हिरवे पान' आदी. कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. अगोदरच्या साहित्यात स्त्रीच्या वेदनेचे चित्रण आले होते. पण साठोत्तरी कथा लेखिकांच्या लेखनात स्त्री जाणिवेची तीव्रता अधिक जाणवते.

साठोत्तरी मराठी महिला कथालेखन विश्वात आणि समाज जीवनात प्रभावी ठरलेल्या स्त्रीवादी विचारसरणीमुळे मराठीतील स्त्री साहित्यात परिवर्तन झालेले दिसून येते. त्यात नवी संवेदनशीलता, नव्या जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत. या कथांमधून व्यक्त होणारे व्यक्तित्व कधी प्रतिनायकाचे रूप घेते, तर कधी वीरनायकाची घेते. त्यांच्या कथांमधून सर्वच स्तरांवरील बंडखोर विद्रोहाची जाणीव स्पष्ट दिसते. वसाहतवादी मनोवृत्ती, हिंदू जातीयवादी मनोवृत्ती, मध्यमवर्गीय पोंढरपेशी मनोवृत्ती यांचा उपहास या कथांतून आढळतो. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर फोफावलेला सत्तापीपासू मनोवृत्तीचा धिक्कार येथे आढळतो. ही कथा तळागाळातील उपेक्षितांच्या, बहिष्कृतांच्या आकांताचे स्वर वाचकापर्यंत पोहोचवणारी आहे. तसेच नव समाज निर्मितीची सुंदर स्वप्ने पाहायला लावणारी आहे. तसेच या काळातील स्त्री लेखिकांची कथाही भाऊक आणि कल्पना विलासी नाही. त्या मागील भावना, भूमिका दूर व:स्विकारणारी नाही. या कथेत स्वतःला

शोधणारी, स्वतःचे मूल्यमापन करणारी, आपल्या अवस्थेला कारणीभूत असणाऱ्या व्यवस्थेला नकार देण्याचे आणि त्यामुळे वाट्याला आलेले एकाकीपण स्वीकारण्याचे ध्येय बाळगणारी अशी स्त्री प्रतिमा आढळते. ही वेगळी स्त्री प्रतिमा हे जसे या काळातील स्त्रीवादी कथेचे वैशिष्ट्य आहे. या कथेमधून व्यक्त होणारे स्त्रीवादी आशयसुत्रे आणि त्यांचे प्रकटीकरण करताना पात्रचित्रण कथन आणि भाषा यांत जाणीवपूर्वक केलेले बदल हे ही स्त्रीवादी कथेच्या स्वरूपाचे लक्षणीय विशेष आहेत. कथेच्या आकृतीबंधाच्या दृष्टीनेही या कथा लेखिकांच्या लेखनात विविधता आढळते.

साठोत्तरी काळातील स्त्री कथा लेखिका भाषेचा आणि आकृतीबंधाचा जाणीवपूर्वक विचार कथा करतात, असे जाणवते. या कथा लेखिकांच्या लेखणातून नवी भाषा घडविणे, बोलीभाषेचा उपयोग करणे, लोककथेतील प्रतिबंधाच्या आणि लयीचा अवलंब या गोष्टी करतात. त्या सर्व लेखिकांचा एकत्रित विचार करताना असे जाणवते की, समाजदर्शनपरता हा त्यांच्या कथेचा विशेष आहे. त्यांचे कथाअनुभव अस्सल आहेत. दहाक वास्तवाचे त्यांचे भान पक्के आहे . रंजनपरतेचे मोह त्यांनी टाळले आहेत. त्या लेखिकांच्या कथा वास्तववादी जीवनाचा आणि समस्यांचा शोध घेणाऱ्या आहेत. साठोत्तरी माहिलाच्या ह्या कथामधून समकालीण जाणिवा व्यक्त झालेले आहेत. त्यांच्या या कथा लेखनाला गुंतागुंतीचा, अनुभवांचा अंत:शोध घेऊन केल्या जाणाऱ्या नवार्थ प्रकटीकरणाची जोड मिळाली, तर त्यांचे कथालेखन मराठी साहित्य सृष्टीत मानाचे स्थान प्राप्त करेल, यात शंका नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील महिला कथा लेखिकांची कथाही अधिक वास्तववादी आणि जीवनसन्मुख बनलेली दिसते. तरीही खऱ्या अर्थाने स्त्री कथा लेखिकांनी मराठी कथाविश्व समृद्ध केलेले आहे. त्यांनी आपल्या व्यथा आणि वेदना आपल्या कथेतून पोटतिडकीने मांडल्या आहेत. आपल्या दुय्यमपणावर आसूड ओढत स्त्रीमुक्तीचा विचार आपल्या कथातून  मांडला. अशाप्रकारे आपणास साठोत्तरी कथा लेखिकांच्या कथा वाङ्मयाचा, त्यातील बदललेला व बदलत जाणाऱ्या प्रवृत्ती – प्रवाहाचा आढावा घेता येईल!!

संदर्भ सूची :

१) यादव, श्री. आनंद 'स्वातंत्र्योत्तर वाड़मय प्रवाह' प्र. आ.ऑगष्ट-२००१ य.च.म. मु.वि, नाशिक .पृष्ठे -२०,२१, ६८, ७१.

२) जाधव ,रा .ग . (संपादन ) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड -७, प्र.आ-२०१०, पुणे. ०३). कदम, डॉ. जगदीश 'साहित्य : आकलन आणि आस्वाद प्र.आ-२०१३ संगत प्रकाशन, नांदेड. पृष्ठे -८६.

३) कसाब, प्रा. डॉ. मारोती 'समकालीन साहित्य आणि समीक्षा' प्र आ.१७ फेब्रुवारी२००९ साद प्रकाशन, नांदेड पृष्ठे -५३ते ६६.

४) गौरी देशपांडे यांची साहित्यसूची, कथा गौरीची मौज प्रकाशन, मुंबई .पृष्ठे -३२६ ते ३३६.

५) डॉ .रा. भा . पाटणकर , सौंदर्यमीमांसा, मौज प्रकाशन , मुंबई.

६) लुलेकर, प्रा. डॉ. प्रल्हाद जी. मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास प्र.आ.१७ सप्टेंबर २०२१. कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृष्ठे- २३६ ते २४४.

७) गोरे, डॉ. दादा, अक्षरयात्रा (संपादक) प्र.आ.२०१९-२० कार्यवाह, अ.भा.म.सा. महामंडळ ,औरंगाबाद .पृष्ठे -२९.

८) गायकवाड, डॉ दिलीप. साहित्यदर्शन प्र.आ. जून – २०१० प्रगती बुक्स प्रा.लि. पुणे .पृष्ठे -२.८७-२.९५, १४.१- १४.७०.

***

# साठोत्तरी काळातील मराठवाड्यातील स्त्रियांचे कथालेखन विशेष संदर्भ: तिची वाटच वेगळी

**डॉ. मारोती बालासाहेब भोसले**
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा. जि.परभणी-४३१५११

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. ज्ञानगंगा खेडोपाडी पोहोचली. शिक्षणामुळे आत्मभान प्राप्त झालेले नव साहित्यिक त्यांनी जगलेले भोगलेले जीवन शब्दबद्ध करू लागले. त्यामध्ये स्त्रिया देखील मागे नाहीत. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे होणारे शोषण, त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार यांना वाचा फोडण्यासाठी स्त्रियांनी लेखणी हाती घेतली. कौटुंबिक जीवनात त्यांची होणारे घुसमट त्यांच्या लेखनातून चित्रित होऊ लागली. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांचा राजकारणातील सहभाग देखील नगण्य म्हणावा असाच आहे.त्यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग तसा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मा. श्रीमती इंदिरा गांधी, मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील,मा. श्रीमती सुषमा स्वराज, मा. श्रीमती वसुंधराराजे शिंदे, मा. श्रीमती ममता बॅनर्जी असे काही बोटावर मोजण्याएवढे नावे आपणास पाहावयास मिळतील. ज्यांनी स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले आहे आणि आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.

अलीकडे गाव पातळीवर देखील स्त्रिया हळूहळू स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशा निवडणुका लढवून निवडून येत आहेत. उत्तमप्रकारे कार्यभार सांभाळीत आहेत. त्यांना बऱ्याचदा पुरूषप्रधान विचारधारेचा सामना करावा लागतो. ज्या महिला राखीव गटातून निवडून येतात त्यांचा कारभार मात्र प्रत्यक्षात त्याचे पती किंवा त्यांचा मुलगा पाहतो. गावपातळीवर आज आठ वर्षाच्या शेंबड्या पोरापासून ते साठ वर्षाच्या म्हाताऱ्या माणसांपर्यंत राजकारण हा अतिशय आवडीचा चर्चेचाविषय ठरला

आहे.खेड्यात पार, शिवार, ओटे, आखाडे, रस्ते अशा प्रत्येक ठिकाणी रात्री उशिरापर्यंत तहानभूक विसरून राजकारणावर चर्चांचे गुराळ सुरू असते. त्या तुलनेने राजकारण विषयक चर्चा करताना महिला कमी आढळतात. त्यामुळेच की काय राजकारणातही महिलांचे प्रमाण तुलनेने कमी असावे. साहित्य लेखनातही स्त्रिया कमी प्रमाणात लेखन करताना दिसून येतात.

जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून भारताची ओळख आहे. १९९० ते १९९६ या काळात भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून मा. टी. एन. शेषन हे कार्यरत होते. त्यांनीनिवडणूक प्रक्रियेत अवलंबिले जाणारे गैरमार्ग आणि दोष दूर करण्यासाठी आदर्श आचारसंहिता लागू केली. निवडणुकीत होणारी पैशांची उधळपट्टी कमी करण्यासाठी उमेदवारांच्या खर्चावर मर्यादा आणल्या. परंतु मा. टी. एन. शेषन पदावरून गेले आणि आचारसंहिता नावालाच उरली. शाळा खिळखिळया झाल्या त्याचा विचार नेते करणार नाहीत. मतदारांना आकर्षित करण्यासाठी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या निवडणुकीत मात्र खोटी आश्वासने आणि ओल्या पार्ट्या देऊन मंदिरं बांधण्यासाठी अमाप पैसा वाटतात. पुढाऱ्यांच्या धादांत खोट्या आश्वासनांना बळी पडून भोळाभाबडा मतदार मतदान करतो. सध्याची तरुण पिढी स्वत:च्या भवितव्याचा विचार न करत नाही. कामधंदा सोडून चार दिवसांच्या मौजमजेसाठी नेत्यांच्यामागे गोंडाघोळीत फिरण्यात धन्यता मानत आहे. याचे चित्रण 'तिची वाटच वेगळी' या कथासंग्रहातून आले आहे.

पूर्वी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण केल्या जायचे. आता उलट आहे. २० टक्के समाजकारण आणि ८० टक्के राजकारण पुढारी करीत आहेत.मथु सावंत यांनी मराठवाड्यातील गाव पातळीवर चालणारे राजकारण, राजकीय नेत्यांचे शह-कटशह, एकमेकांवरील कुरघोडी करणे, एकमेकांचा बदला घेण्याची वृत्ती, आपसातील वर्चस्ववाद, कार्यकर्त्यांचे होणारे भ्रमनिरास, मतदारांचे होणारे विश्वासघात, नेत्यांची विकृत मनोवृत्ती, सामान्य माणसाच्या आयुष्याची होळी करून स्वतःची पोळी भाजून घेण्याची पुढाऱ्यांची स्वार्थी वृत्ती, महिलांना दिले जाणारे राजकारणातील दुय्यम स्थान, महिलांना नेहमी डावलणे, महिलांना कमी लेखणे, अशा अनेक राजकीय वृत्ती-प्रवृत्तींचा वेध त्यांनी आपल्या कथालेखनातून घेतलेला आहे,

'तिची वाटच वेगळी' या कथासंग्रहातून त्यांनी राजकारणातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे.

'तिची वाटच वेगळी' या कथासंग्रहातील पहिल्या कथेमध्ये चंद्रकला ही कथेची नायिका आहे. ती सुशिक्षित आहे. तिचा पती गंगाधर मुरब्बी राजकारणी होता. गावची ग्रामपंचायतची निवडणूक जाहीर झाली. सरपंच पद महिलाप्रवर्गासाठीराखीव सुटल्यामुळे गंगाधरने आपली पत्नी चंद्रकलाला निवडणुकीसाठी उभे केले. ती निवडून देखील आली. दुसऱ्या प्रभागातून गंगाधरचा मित्र श्रीपती उभा होता तोही निवडून आला. श्रीपतीला सरपंच व्हायचे होते. सरपंच पद महिला प्रवर्गाला राखीव असूनही म्हणून श्रीपतीने गंगाधरला सांगून चंद्रकलाला सरपंच पदासाठी अर्ज करू दिला नाही. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये वाढलेल्या श्रीपतीला चंद्रकला सारख्या महिलेच्या हाताखाली काम करणे कमीपणाचे वाटत होते. गंगाधरलाही आपली पत्नी चंद्रकलापेक्षा मित्र श्रीपतीच सरपंच व्हावा असे मनोमन वाटत होते. श्रीपती गंगाधरला बायकोच्या विरोधात भडकवून देत होता. श्रीपती गंगाधरला म्हणाला, "आरं मी उपसरपंच म्हणून राहीन. वहिनी सरपंच व्हईल. पण बाईच्या हाताखाली काम करणं मनाला पटत नाही बघ. त्यापेक्षा कुठलंच पद नको वाटतं. बाईसमोर बसून मीटिंगमध्ये भाग घेण्यापरीस घरात काकणं घालून बसणं परवडलं." असं म्हणून श्रीपती अशा प्रकारे गंगाधरला डिवचत होता.

गंगाधरने चंद्रकलेला लाथा बुक्क्यांनी मारण्यास सुरूवात केली. गंगाधर पत्नीला म्हणाला, "च्या आईला, म्हणं सरपंचव्हणार. निवडून आली म्हणून मुखत्यार झाल्यागत वाटलं की काय तुला? आली मोठी गावचा कारभार करणारी. गावचा कारभार करणं भाकरी थापण्या इतकं सोपं काम वाटतं की काय तुला? ऑं? व्हतूस काय सरपंच? व्हतूस?" गंगाधर चंद्रकला मारहाण करून माहेरी नेऊन सोडतो. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होतो. चंद्रकला माहेरी असल्यामुळे तिला निवडणुकीविषयी काहीही माहिती नसते. गंगाधरचा चुलता रामजी पाटील श्रीपतीला वठणीवर आणण्यासाठी सायाळला जाऊन चंद्रकलाची अर्जावर सही आणून तिचा अर्ज भरणार होता. गंगाधर चुलत्यावर नजर ठेवूनच होता. गंगाधरने रामजी पाटलांना रस्त्यात अडवून मारहाण केली. चंद्रकलाने सही केलेला अर्ज फाडून टाकला.

सरपंच पदासाठी एकही अर्ज आला नसल्यामुळे सरपंच पद रिकामे राहिले. साम-दाम-दंड-भेद नीतीचा वापर करून श्रीपती

गावचा सरपंच बनला. उघड्या जीपमधून मोठ्या थाटात गावात विजयी मिरवणूक निघाली. श्रीपती आणि गंगाधर जीपमध्ये उभे होते. अचानक पोलीसची गाडी आली. गंगाधर आणि श्रीपतीला अटक करून घेऊन गेली. खिडकीतून मिरवणूक पाहणाऱ्या बायका रस्त्यावर आल्या. त्या चंद्रकला म्हणू लागल्या, “तू खरी वाघीण निघालीस!” समाज परिवर्तन व्हावे यासाठी महिलांना राजकारणात आरक्षण देण्यात आले. सुरूवातीला केवळ महिलांना निवडणुकीमध्ये उभे केले जायचे. निवडून आलेल्या महिलांचे पती अथवा मुलं प्रत्यक्ष कारभार पाहायचे. परंतु हळूहळू महिलांचा राजकारणातील सहभाग वाढू लागला. त्यांना काही गोष्टी आवडल्या नाहीत तर महिला हस्तक्षेप करू लागल्या. ही बाब पुरूषांना खटकते. त्यामुळेच महिला आणि पुरूषांमध्ये संघर्ष घडतआहेत. याचे चित्रण ‘तिची वाटच वेगळी’ या कथेतून आले आहे.

‘कार्यकर्ता’ या कथेतून पुढाऱ्यांकडून कार्यकर्त्यांची राजकीय होणारी परवड रेखाटली आहे. निवडणुका जवळ आल्या की नेते आपल्या कार्यकर्त्यांना गोड बोलून कामाला लावतात. कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनतेला मोठमोठी आश्वासनं देतात. नेत्यांच्या खोट्या आश्वासनांना बळी पडून कार्यकर्ते गावा-गावात, समाजा-समाजात, धर्मा-धर्मात गटतट निर्माण करतात. वेळप्रसंगी मारामाऱ्या करतात. भांडण पोलीस स्टेशनला गेले तर त्यांना अटकही होते. कार्यकर्ते जमानत करण्यासाठी नेत्यांकडे चकरा मारतात. त्यावेळी नेते उलट कार्यकर्त्यांना विचारतात. ‘आम्ही तुम्हाला भांडण करा असे म्हणालो होतो काय? आता तुमचे भांडण तुम्ही निपटा!’ कार्यकर्ते कामं करतात आणि नेते मलाई खातात. थोडक्यात सांगायचे झाले तर, कार्यकर्ते केवळ लष्कराच्या भाकरी भाजण्याचे काम करतात. हे ‘कार्यकर्ता’ या कथेतून रेखाटले आहे. राजकारणामध्ये सध्याच्या प्रामाणिकपणे कामं करणाऱ्या कार्यकर्त्यांना काहीच किंमत उरली नाही. त्या उलट सतत पक्षांतर करणारे कार्यकर्ते अधिक कमाई करीत आहे. त्यांनाच अधिक महत्त्व आले आहे. त्यांच्यावर नेत्यांचे विशेष लक्ष असते. त्यांचे कामंही लवकर होतात. निवडणुकीचे तिकीटही त्यांनाच अगोदर मिळते. भ्रष्टाचारी कार्यकर्त्यांचा झपाट्याने विकास होतो. निष्ठावंत कुठेही जाणार नाहीत हे नेत्यांना पक्की खात्री आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना गृहीत धरल्या जाते. नेत्यांच्या पाठीमागे जे कार्यकर्ते सतत गोंडाघोळीत फिरतात. तेच त्यांचे आवडते कार्यकर्ते म्हणून त्यांच्या सोबत असतात. राजकारणामध्ये भावनेला कवडीचीही किंमत नसते. हे ‘कानमंत्र’ या कथेतून स्पष्ट होते.

आप्पासाहेब देशमुख ‘प्राण जाय पर वचन न जाय’ या तत्त्वाने पक्षाचे कार्य करणारे निष्ठावंत कार्यकर्ते होते. सरळ स्वभाव, निर्मळ मन असल्यामुळे ते गावातील सोयरीकीपासून ते अंत्यविधीपर्यंत सर्वांच्या मदतीला धावून जायचे. त्यांच्या वाड्यात नेहमी लोकांचा राबता असायचा. वीस वर्षे सत्तेत असूनही ते साधी जीप देखील खरेदी करू शकले नव्हते. जळबा कांबळे त्यांच्या शेतावर काम करणारा सालगडी होता. तो दसऱ्याला घराची साफसफाई करत होता. बंदूक साफ करतेवेळी त्याचे बोट बंदुकीच्या खटकल्यावर पडले. बंदुकीची गोळी सुटली आणि जळबाच्याच्या डोक्यात शिरली. जळबा जागीच गतप्राण झाला. आप्पा साहेबांच्या पक्षातील विरोधी गटाने संधी साधली आणि जळबा कांबळेच्या मुलाला हाताशी धरून जळबाच्या मृत्यूचे राजकीय भांडवल बनविले. मुलाने पोलिसात तक्रार दिली. गावातील दलितांनी आप्पासाहेबांच्या घरावर मोर्चा काढला. येथूनच त्यांच्या मागे साडेसाती सुरू झाली.

आप्पासाहेबांच्याच जीवावर आमदार झालेले रामराव घोरबांड यांनी त्यांना या केसमध्ये मदत केली नाही. नि:स्वार्थीपणे गावाला मदत करणारे आप्पासाहेबावर कुटुंबासह फरार होण्याची वेळ आली. पंचायत समितीचे सभापती पद भूषविणारे आप्पासाहेब राजकीय षडयंत्रचे बळी ठरले. आप्पासाहेबांचा प्रामाणिकपणा आमदार घोरबांड यांना मुळीच आवडत नव्हता. आमदारांनी आप्पासाहेबांना खूनी ठरविले. ते अप्पासाहेबांसोबत नेहमी धूर्त खेळी खेळत असत. आमदार घोरबांड यांनी अप्पासाहेबांचा वापर केवळ शिडी म्हणून केला होता. आमदारांची खूप भरभराट झाली. अप्पासाहेब मात्र गरीबच राहिले. याचे चित्रण ‘शिडी’ कथेतून आले आहे.राजकारणात सरळमार्गी माणूस असून चालत नाही. हे आप्पासाहेबांकडे पाहून लक्षात येते.

सावित्रीचा जन्म खेड्यामध्ये एका सर्वसामान्य कुटुंबात झाला होता. शिक्षणही फारसे झाले नव्हते. चळवळीत काम करणाऱ्या संभा सोनवणे या कार्यकर्त्याबरोबर तिचा विवाह झाला. संभा हळूहळू राजकारणात जम बसवत होता. संभाचे गाव मागासवर्गीय स्त्री राखीव सर्कलमध्ये असल्यामुळे आमदार पवारांनी संभाची पत्नी सावित्रीला त्या सर्कलमध्ये निवडून आणून समाजकल्याण सभापती बनविले. निवडून आल्यानंतर सावित्रीच्या वागण्यात, बोलण्यात आमुलाग्र बदल झाला होता. ती हळूहळू कामांमध्येही जम बसवीत होती. सावित्री लोकांचे कामं करू लागली. दिवसेंदिवस तिचे गावात, लोकात वजन वाढू लागले. ही गोष्ट आमदारांना खटकू लागली. नेत्याला आपला कार्यकर्ता मोठा झालेला राजकारणात कधीच आवडत नाही. आमदार पवार यांनी

सावित्रीचे सभापती पद घालविण्यासाठी अविश्वासाचा ठराव आणला. आमदाराने संभाचा पण खूप वापर करून घेतला. कढीपत्त्यासारखा वापरून त्याला आता फेकून देण्याचे आमदारने ठरविले. वटसावित्री पौर्णिमेच्या दिवशी सावित्रीचे सभापती पद गेले. पुराणामध्ये आपण सावित्रीने आपल्या पतीचे प्राण वाचविल्याचे ऐकले आहे. परंतु सावित्री स्वतःचे सभापती पद वाचविण्यात असमर्थ ठरली होती. हे 'पुन्हा एकदा सावित्री' या कथेतून रेखाटले आहे.

रामराव शिंदे राजकारणातील मोठे प्रस्थ होतं. त्यांनी मोठ्या कष्टाने साखर कारखाना उभा केला होता. त्यांच्यामुळे शेतकऱ्यांना आधार आणि तरूणांना रोजगार मिळाला होता. लोकांच्या अडीनडीला ते धावून जात. त्यामुळे लोक त्यांच्याकडे एक तारणहार म्हणून पाहत होते. ते कारखान्याचे चेअरमन झाले. आमदार शंकरराव मोरे आपल्या भावाला कारखान्याचा चेअरमन करू इच्छित होते. त्यामुळे कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा सुरू असताना आमदार मोरे यांनी भाडोत्री माणसे आणून सभेत बसविली. त्यां भाडोत्री लोकांनी सभेत गोंधळ घातला. लोक एकमेकावर चप्पल-बुट फेकत होते. हे सर्व पाहून रामराव शिंदे यांना तणावामुळे हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने औरंगाबाद येथे घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टर त्यांना वाचवू शकले नाहीत.

शिवाजी हा रामराव शिंदे यांचा मुलगा जिल्हा परिषदेची निवडणूक लढवीत होता. आमदार मोरे यांनी शिवाजीला पक्षाचे तिकीट मिळू नाही म्हणून सर्व वजन वापरले. सहानुभूतीची लाट शिवाजीच्या बाजूने होती. पक्षश्रेष्ठींनी तिकीट शेवटी शिवाजीलाच दिले. आमदार मोरे यांनी शिवाजीच्या चुलत्याला बोलावून घेतले. आणि त्याला म्हणाले, "आताच्या निवडणुकीत आमच्या उमेदवाराला मदत करा. मतदान करा. त्या बदल्यात मी तुम्हाला कारखान्याचा डायरेक्टर करतो. नाही तरी शिवाजी असेपर्यंत तुम्हाला त्याच्याच पाठीशी उभं राहावं लागणार आहे. आता स्वतःचं बघा. भावाबरोबर भावाचं प्रेम विसरा. आमच्याकडे या. आम्ही तुम्हाला पद देऊ. मोठं करू." आमदाराने टाकलेला डाव सफल झाला. शिवाजीचा चुलता आणि भावकी विरोधात गेली. अनपेक्षितपणे शिवाजीचा पराभव झाला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. अलिकडच्या काळात राजकारणात नीतिमत्ता, इमानदारी, प्रामाणिकता उरलेली नाही. मतदार पैसे घेऊन, दारू पिऊन, पार्ट्या खाऊन स्वतःची विवेकबुद्धी पाच वर्षासाठी गहान ठेवून आपले मत विकून टाकीतात. 'मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे' असे म्हणण्याचे दिवस उरले नाहीत. हे 'पोरका' या कथेतून दिसून येते.

सोमनाथ बी. एस्सी. पास झाला होता. त्याच वर्षी त्याचे वडील शेतात साप चावून वारले. त्याला ४० एकर बागायती जमीन होती. तो एक आदर्श शेतकरी होता. तो शेतकरी संघटनेच्या विचाराने भारावला होता. शेतमाला योग्य भाव मिळावा असे त्याला वाटायचे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तो नेहमी चेअरम सोबत  भांडायचा. प्रेरणानगर साखर कारखान्याच्या वार्षिक सभेत तो बसला होता. मागच्या वर्षी ऊसाला ६५०/ रुपये भाव देण्याचे आश्वासन देणारे कारखान्याचे चेअरमन भिसे बोलण्यासाठी उभे राहिले. सोमनाथ त्यांना मागीलवर्षीच्या आश्वासनाचा जाब विचारत होता. ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. रागाने त्याने भिसे साहेबांना चप्पल फेकून मारली. तरीही भिसे साहेबांनी सोमनाथला स्टेजवर बोलावून शाल पांघरून त्याचा सत्कार केला.

सोमनाथ गावामध्ये टुरिंग टॉकीज चालवीत होता. भिसे साहेबांनी सोमनाथलाती टुरिंग टॉकीज कारखान्यावर आणून सुरू करण्याची विनंती केली. भिसे साहेब सोमनाथला दरमहा १०,००/ रुपये मदत करीत होते. सखा आणि तुका हे दोन त्यांचे कार्यकर्ते सोमनाथची कामं करीत होते. त्याला दारू, मटण पूरवीत होते. हळूहळू सोमनाथ व्यसनी बनला. त्याने कामधंदा करणे बंद केले. त्याला पैसा कमी पडू लागला. भिसे साहेबांनी त्याची १०,०००/ रुपये प्रतिमहिना मदतही बंद केली. त्याने शेती विकली. त्याला टुरिंग टॉकीजचे तिकीट वाढवायला सांगितले. त्याने तिकीट वाढविले. लोकांनी त्याची टॉकीज जाळून टाकली. तो पुरता कंगाल झाला. तो बिथरला. त्याच्या डोक्यावर परिणाम झाला. तो वेड्यासारखे रस्त्याने फिरू लागला. भिसे पाटलांनी सोमनाथला 'स्लो पॉइझन'  देऊन त्याच्यावर असा भयानक सूड उगवला होता. राजकारणी नेते त्यांच्या मार्गात आडवे येणारांना कधीही सोडत नाहीत. अशाप्रकारे भिसे साहेबांनी सोमनाथवर भयानक सूड उगवला होता. त्याची संपूर्ण आयुष्य उध्वस्त केले होते. याचे सविस्तर चित्रण 'स्लो-पॉयझन' या कथेतून आले आहे.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला तर महाराष्ट्राचे अनेक मुख्यमंत्री हे मराठवाड्यातील होऊन गेले आहेत. तरीही विकासाच्या दृष्टीने मराठवाड्याचे मागासलेपण हे डोळेझाक करण्यासारखे नक्कीच नाही. याला कारणीभूत आहेया ठिकाणच्या पुढाऱ्यांचीविकृत मनोवृत्ती, एकमेकांचे हेवेदावे, वर्चस्ववादी वृत्ती,

एकमेकांशी संघर्ष, बदला घेण्याचीवृत्ती, नेत्यांच्या स्वार्थीपणामुळे मराठवाड्याचा विकास खुंटला आहे. मराठवाड्यातील नेत्यांनी राजकारणात स्त्रियांना प्रोत्साहन देण्याऐवजी डावलले दिसते. आरक्षणामुळे काही स्त्रिया राजकारणात आल्या. परंतु त्यांना सन्मान देण्याऐवजी टाळण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

एकदा एखाद्यानेत्याचा राजकारणात जम बसला की तो कार्यकर्त्यांना मोठे होऊ देत नाही. त्याच्या स्वार्थी वृत्तीमुळेत्याला वाटतेकार्यकर्त्यांनी आयुष्यभर कार्यकर्ता म्हणूनच आपल्या मागेपुढे फिरावे. सध्याच्या राजकारणात भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना गृहीत धरले जाते.त्यांना सतत डावलले जाते. त्यांच्याविरुद्ध काहीतरी षडयंत्र रचूनत्यांना बदनाम करून बाजूला सारले जाते. सध्या राजकारणात घराणेशाहीचा उत आला आहे. एकदा सत्तेची लालूच लागली की ती खुर्ची सोडू वाटत नाही. सामदाम दंड भेद नीतीचा अवलंब करून कुठल्याही स्तराला जाऊन सत्ता हडपण्याचे प्रकार वाढले आहेत.

राजकारण्यांच्या शब्दकोशातून नीतिमत्ता, प्रामाणिकपणा, विश्वास, इमानदारी हे शब्द बाद होतात की काय? अशी शक्यता निर्माण झाली आहे. एखादा प्रामाणिक कार्यकर्ता स्वकर्तुत्वाने पुढे येत असेल तर त्याला व्यसनी बनवून अथवा त्याचा सूड उगवून संपविले जात आहे. जनतेचा आणि सामान्य कार्यकर्त्यांचा शिडी म्हणून वापर होत आहे. सत्ताधारी आणि विरोधी मिळून जनतेच्या पैशावर मजा मारीत आहेत. स्वतःची जहागीर समजून ते मनमानी पद्धतीने शासन हाकीत आहेत. जनतेचा विचार कोणीही करीत नाही. लोकशाहीत हळूहळू हुकूमशाहीकडे वाटचाल करते आहे. जनतेने वेळीच सावध झाले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१) सावंत मथु तिची वाटच वेगळी संगत प्रकाशन, नांदेड.

२) लुलेकर प्रल्हाद साठोत्तरी साहित्य प्रवाह सायन पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड.

३) जाधव रा. ग. मराठी वाङ्मय स्वातंत्र्योत्तर संदर्भ प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४) लिंबाळे शरणकुमार साठोत्तरी वाङ्मयातील प्रवाह दिलीपराज प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड

५) सावरकर सुभाष अक्षरवैदर्भी (मासिक) ०१ जुलै २०२४ (कार्यकारी संपादक)


***

# पार्टटाईम काम करणाऱ्या स्त्रियांची करूण कहानी

**संदीप भुजंग शेकडे**
संधोधक विद्यार्थी,
डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

`पार्टटाइम` ही प्रतिमा इंगोले यांची महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. ही कादंबरी २००२ साली प्रसिद्ध झाली. पार्टटाइम नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मानसिक कुचंबनेचा वेध ही कादंबरी घेते. ग्रामीण महाविद्यालयातील पुरुषप्रधान वृत्तीचा सामना करताना स्त्रीची होणारी मानसिक आणि शारीरिक ओढाताण या कादंबरीतून आलेली आहे. पुरुष प्रधान संस्कृतीचा पगडा असणारी ही व्यवस्था स्त्रियांच्या भावविश्वाला कधीही समजून घेण्याची मानसिकता ठेवत नाही. ही शोकांतिका या कादंबरीत मांडली आहे. महाविद्यालया सारख्या उच्च शिक्षणाचे केंद्र असणाऱ्या ठिकाणी सुद्धा स्त्रीची होणारी घुसमट वऱ्हाड प्रांताच्या बदलत्या मानसिकतेचे दर्शन घडवते. ही वऱ्हाड प्रांतातील स्त्री एकूणच स्त्री-विश्वाच्या वाट्याला आलेल्या पार्टटाइम नोकरीची व महाविद्यालयातील पुरुषी विचाराने भरडल्या गेलेल्या स्त्रित्वाचे प्रातिनिधिक रूप आहे.

अनुराधा ही या कादंबरीची नायिका असून तिच्या वाट्याला आलेल्या अर्धवेळ नोकरीतील अनुभवाचे बोलके वास्तव ही कांदबरी साकारते. हे स्त्री अनुभव एकूणच स्त्रीयांचं प्रतिनिधित्व करतात. महाविद्यालयीन पातळीवर नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे अनुभव कमी – अधिक फरकाने सारख्याच स्वरूपाचे असतात. त्यांच्या एकूणच व्यथा – वेदनांची सल या कादंबरीतून आविष्कृत होते. स्त्रीच्या वाट्याला आलेली ही घुसमट कादंबरीकाराच्या दृष्टिकोनातून व अनुराधाच्या अंतर्मनातील स्वगतातून प्रकट होते – “पराकोटीचा अन्याय पाहून प्रवाहच ऐकेनासा व्हावा असे झाले. एकदम फुसांडत पाणी आले. उलट त्यातून काय घ्यावे, काय सोडावे असे तिला वाटू लागले. प्रवाहाचा आवेग आवाक्याबाहेर जाऊ लागला. तसं पुन्हा दुसरं मन म्हणलं, बघ

कसा गुदमर दाटतो आहे ते! म्हणूनच तुला म्हणते, हा पिच्छा सोड."[1] ही स्त्री मनातील कुचंबना येथे व्यक्त होते. अर्धवेळ प्राध्यापिका ही महाविद्यालयातील पुरुष प्राध्यापकांना कशी किरकोळ वाटते व प्राचार्यांनाही तिच्या प्रश्नाविषयी गांभीर्य वाटत नाही. तिच्या वाट्याला आलेली कुचंबना ही पुरुषी अहंकारातून आहे की, अर्धवेळ नोकरीमुळे आहे. याचा तिला बऱ्याचदा शोध लागत नाही; पण ती शेवटी एका निकषावर येऊन पोहोचते की, आपली कुचंबना ही आपल्या वाट्याला आलेल्या स्त्रित्वामुळेच आहे. स्त्री मनातील घालमेल अनुभवाच्या विविध पातळ्यांवरून या कादंबरीने प्रकट केली आहे.

पार्टटाइम नोकरी करणारी अनुराधा सक्षम प्राध्यापिका व साहित्यिक आहे, परंतु तिच्या गुणांची कदर करण्याचे औदार्य नसणारा तिचा सहकारी प्राध्यापक वर्ग तिची सातत्याने कोंडी करतानाच दिसतो. पार्टटाईम नोकरी असल्यामुळे अनिश्चिततेची तलवार कायम तिच्यावर टांगलेली असते. त्यामुळे तिला प्राचार्यापासून शिपायांपर्यंत सर्वांची मर्जी राखून नोकरी करावी लागते. स्त्रीमनातील प्रखरता व तिच्या वाट्याला आलेले जीवघेणे अनुभव ही कादंबरी साकारते. शिक्षण क्षेत्रातील उथळ विचारसरणीमुळे अनुराधाला प्राध्यापिका असतानाही असंख्य कटू अनुभवांना तोंड द्यावे लागते. हे अनुभव पचवताना तिला बऱ्याचदा जीवनातील लढाईतील अनुभव कल्पनेपेक्षाही विषारी वाटतात. या अवस्थेतही ती आपली धडपड थांबवत नाही. तिला तिच्या पतीची साथ असते. ही साथ या नायिकेला हिमालयापेक्षाही मोठी वाटते. आपला साथीदार पुरुष आपल्याला साथ देतो; पण महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक व प्राचार्य तिचे अस्तित्व संपवण्यासाठी सज्ज असलेले दिसतात. याविषयी डॉ. किशोर सानप म्हणतात – "तिच्या प्राचार्यांचा आणि अन्य सहकाऱ्यांचा प्रारंभीचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. परंतु तिच्या शिकविण्याच्या लोकप्रियतेची ख्याती जस-जशी वाढत जाते तस-तसे तिच्यावर अनेक दुर्धर प्रसंग ओढवतात. तिच्या भोवतालचे सहकारी असूयेने पेटून उठतात आणि तिच्या विषयी प्राचार्यांचे मन कलुषित करतात."[2] ही पुरुषी मानसिकता किती भयंकर असते याचा प्रत्यय डॉ. किशोर सानप यांच्या विवेचनावरून येतो. स्त्रीविषयक दृष्टिकोन नकारात्मक पद्धतीने स्वीकारणाऱ्या पुरुषी मानसिकतेविषयी या कादंबरीतून विवेचन आलेले आहे. अनुराधाच्या मनातील स्त्री सुलभ भाव या कादंबरीने अलगदपणे टिपले आहेत.

स्त्रीचा चढता आलेख कदापिही पचवू न शकणाऱ्या पुरुषप्रधान मानसिकतेतील बदलांचा वेध ही कांदबरी सहजपणाने घेते. अनुराधाचे साहित्य क्षेत्रातील योगदान पाहून बाहेरच्या महाविद्यालयातून सन्मानाने तिला बोलावले जायचे, पण स्वत:च्या महाविद्यालयातील पुरुषांची विखारी विचारसरणी तिला या सन्मानापासून जाणीपूर्वक पारखे करते. या हिडीस विचाराने तिच्या मनातील शिक्षण क्षेत्राविषयीची आस्था झडून जाते. प्राध्यापकीला लाजवेल अशा खालच्या स्तरातील विचार या क्षेत्रात घुसल्यामुळे हे उच्च शिक्षण क्षेत्रच तिला शापित वाटायला लागते. शिक्षण क्षेत्राविषयीची तिच्या मनातील खदखद या कादंबरीने व्यक्त केली आहे. अर्धवेळ प्राध्यापिका म्हणून नोकरी करताना पचवाव्या लागणाऱ्या असंख्य कडूगोड अनुभवांनी अनुराधाचे भावविश्व घडले गेले होते. प्रत्येक आघाड्यांवर सहन करावा लागलेला अन्याय तिच्या मनात ऊफाळून येतो. एकदा तिचा सहकारी तिच्यासाठी शिपायाला पाणी देण्यास सांगतो. परंतु तिच्या मनातील सल टोकाला गेलेली असते. त्यावेळेस ती म्हणते, "नको, कोणाला पाणी सांगू नका. मला इथे ह्या कॉलेजमध्ये हाताने पाणी घेऊन पिण्याची सवय लागली आहे. तेव्हा तुम्ही माझ्यासाठी तरी कोणाला चुकूनही पाणी सांगू नका. कारण त्याला सांगायची तुमची हिंमत नाही. तो चपराशी असून राजा आहे आणि आम्ही प्राध्यापक असूनही चपराश्यापेक्षाही निपट्टर आहोत."[3] ही शिक्षणक्षेत्रातील अर्धवेळ प्राध्यापिका असणाऱ्या स्त्रीच्या मनातील घुसमट या कादंबरीतून चित्रित झालेली आहे. स्त्रीला समजून घेण्याची इच्छा नसताना पुरुषप्रधान सहकारी वर्ग पावलोपावली तिची कशी आवहेलना करतो. याचे प्रत्ययकारी चित्रण लेखिकेने केले आहे. पाच वर्ष तिने ज्या ग्रामीण महाविद्यालयात पार्टटाइम प्राध्यापिका म्हणून नोकरी केली त्याच महाविद्यालयातील पुरुषप्रधान पगडा असलेली विचारसरणी तिला डावलते. अशा असंख्य स्त्री दु:खाच्या छटा या कादंबरीतून प्रतिमा इंगोले यांनी वास्तवाच्या पातळीवरून रेखाटल्या आहेत. एका सुशिक्षित स्त्रीची होणारी कुचंबना चित्रित करून प्रतिमा इंगोले यांनी पुरुषी मानसिकतेचे दर्शन घडविले आहे.

**संदर्भग्रंथ**


१) इंगोले प्रतिमा, पार्टटाइम, ग्रंथविशेष प्रतिष्ठान, पुणे, पहिली आवृत्ती, ११ जून २००२, पृ.क्र. ३३

२) सानप किशोर, मराठी कादंबरी : नव्या दिशा, पृ.क्र. १२७

३) उनि, इंगोले प्रतिमा, पार्टटाइम, पृ.क्र. १६२

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

**प्राचार्य डॉ. अंजली आर. मस्करेन्हस**
डॉ. ाशिकला पोतनीलस कला आणि वाणिज्य महाविध्यालयए कोसबाड हिल, ता. डहाणू जि. ठाणे

**प्रस्तावना :**

भारतामध्ये इंग्रज राजवटीच्या आगमनानंतर एकोणिसाव्या शतकात स्त्री सुधारणांना सुरुवात झाली असे दिसते. इंग्रजी विद्येमुळे मिळालेल्या नवीन ज्ञानाने नवशिक्षितांना स्वसमाजातील, स्वधर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरातील क्रौर्य जाणवले. यातून सुधारणावादी कृतीकार्यक्रम सुधारकांनी हाती घेतले. सुधारकांनी स्त्री प्रश्नांकडे लक्ष वेधले. यामध्ये महात्मा फुले यांनी १९४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. यानंतर स्त्री सुधारणेच्या संदर्भात मोठी चळवळ उभी राहिली. लोकहितवादी, रानडे, आगरकर यांनी स्त्री सुधारण्याचे समर्थन केले, तर महर्षी वि.रा.शिंदे, महर्षी धोंडो कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रत्यक्ष चळवळी चालवल्या. पुढे गांधी युगात स्वातंत्र्यचळवळीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना सहभागी करून घेतले. परंतु खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यानंतर पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीचे विचार भारतात आले; त्यामधून स्त्रियांचे आत्मभान हळूहळू जागे झाले.

**१.स्त्रीवादाचा उगम :**

१९७५ वर्ष हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित झाले होते. त्यामुळे संपूर्ण जगाबरोबरच भारतातील एकूण स्त्री प्रश्नाकडे दृष्टी वळली. या काळात स्त्रियांच्या संघटना, अत्याचार विरोधी संघटना वेगाने निर्माण झाल्या. स्त्रीमुक्ती आंदोलनाने जोर पकडला. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता व समान प्रतिष्ठा, स्त्रियांचे आरोग्य, वारसा व संपत्तीचा हक्क, पोटगी, विवाह, घटस्फोट, स्त्री हक्क, हुंडाविरोधी जनजागृती असे अनेक मुद्दे या आंदोलनातून पुढे आले. या स्त्रीमुक्ती आंदोलनाला पाश्चात्य स्त्रीवादाची जोड मिळाली; यामधून स्त्रीवादी साहित्य लेखनाला सुरुवात झाली.

**२.स्त्रीवाद :**

१९६० ते १९७० मध्ये स्त्रीवादी वाङ्मय विचाराचे स्वरूप हे काहीसे राजकीय व वाद विवादात्मक होते. १९७५ मध्ये एक संघटित

विचारधारा म्हणून स्त्रीवादी विचार पुढे आला. स्त्रीवादाचे ध्येय पुरुषी वर्चस्वापासून मुक्ती हे असल्यामुळे या विचारधारेचा पुरुष संस्कृतीवर टीकेचा भर राहिला. स्त्रीला आपल्या स्त्रीत्वहरणाची व स्त्रीशोषणाची जाणीव तीव्रपणे झाली. ती पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्धचे बंड व तिच्या जाणिवेचे आविष्कार लेखणीतून करू लागली. पुरुषप्रधान संस्कृतीमधील पत्नी, सती, दासी, देवदासी, रखेली, वेश्या, अस्पर्शा, परित्यक्ता, हुंडाबळी, बलात्कार बळी आदि असंख्य स्त्रियांचे भोग, मनोवेदना याला वाचा फोडण्याचे कार्य स्त्रीवादी साहित्याने केले आहे. अशाप्रकारे स्त्रीच्या बंडखोर, स्वतंत्र कृतीतून, स्त्रीच्या अस्तित्वभानातून स्त्रीमुक्ती आंदोलनाचा, स्त्रीवादाचा जन्म झाला. या लेखनातून स्त्रीवादी समीक्षेचा जन्म झाला.

**३.पाश्चात्य स्त्रीवादाचे स्वरूप :**

सिमॉन द बुवा यांचे 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक म्हणजे 'फेमिनिस्ट बायबल' होय. ती म्हणते "No one is born woman, one becomes one" कोणीही बाई म्हणून जन्माला येत नाही, पण नंतर ती बाई बनवली जाते. पुरुष हा सत्वाचा केंद्रबिंदू असतो तर स्त्रीला परिघावरचे स्थान असते. पुरुषांच्या लेखी ती वस्तुमात्र असते, तिला व्यक्ती म्हणून अस्तित्व नसते. परंपरेत, संस्कृतीमध्ये 'बायकी' 'पुरुषी' या दोन विशेषणांना शरीर भेदाव्यतिरिक्त सांस्कृतिक अर्थ चिकटलेला असतो. असा विचार मांडला."[१] या विचाराच्या पायावर पुढची स्त्रीवादी विचारसरणी विकसित झालेली दिसते.

स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याचा हक्क मिळालाच पाहिजे यासाठी लढा देणारी स्त्रीवादी विचारसरणी जगात विश्वास देणारी वाटली आणि तिचा उद्गार स्त्रियांच्या साहित्यात प्रतिध्वनीत झाला.

**४.साठोत्तरी मराठी साहित्यातील स्त्रीवाद :**

१९६० नंतरच्या पन्नास वर्षातील प्रदीर्घ काळामध्ये अनेक लेखकांनी कथा या साहित्य प्रकारात मोठ्या संख्येने भर घातली. पुढे त्या कादंबरी लेखनाकडे वळल्या. यामध्ये कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, आशा बागे, प्रिया तेंडुलकर, विजया राजाध्यक्ष, सुनिती आफळे, शांता गोखले, मेघना पेठे, कविता महाजन वगैरे. यामध्ये कमल देसाई, गौरी देशपांडे या दोघी स्त्रीवादाच्या संदर्भात जहाल स्त्रीवादी भूमिका घेतात.

कमल देसाई यांच्या लेखनात महत्त्वाची सूत्रे प्रकटलेली दिसतात – 'स्त्रीने आपले शरीर, प्रेरणा नैसर्गिक (जीवशास्त्रीय) भूमिकेवरून

स्वीकारले पाहिजे. स्त्रीची सर्व अंगाने गळचेपी करणाऱ्या सर्व संस्था, व्यवस्था मोडून, तोडून टाकल्या पाहिजेत.

**१९६० साठोत्तर कादंबरी लेखन :**

गौरी देशपांडे यांच्या लेखनातील महत्त्वपूर्ण सूत्रे – "पती-पत्नी नातेसंबंधात पत्नीला कायम दुय्यम स्थान, अवहेलना केली जाते. पतीकडून मैत्रीचे, प्रेमाचे वर्तन होत नाही म्हणून हे नाते तोडून टाकावे. पत्नीची बुद्धी, सर्जनशीलता, कल्पकता, विचारशक्ती, स्वतंत्र निर्णयशक्ती यांवर पती हक्क दाखवू शकत नाही. याच त्यांच्या गुणावर त्या स्वतःचे अवकाश निर्माण करू शकतात. तसेच आपल्या मुलांच्या मनातील स्त्रीची वात्सल्य मूर्ती जाणीवपूर्वक दूर ठेवतात. आत्मभान आलेली स्त्री पतिसहित इतरही कोणत्या पुरुषाशी शरीरसंबंध ठेवण्यास स्वतःच्या मूल्यविवेकाचा वापर करते. पुरुषाचा स्त्री शरीरावरील हक्क, जबरदस्ती मोडीत काढून आपल्या शरीरावर केवळ आपलाच हक्क शाबीत करताना दिसते. स्त्री-पुरुष जवळीकेमध्ये केवळ कामप्रेरणा नसून स्त्रीला भावनिक, मानसिक, नैतिक आधार देण्याघेण्याची भूमिका निखळ असू शकते. ती जीवशास्त्रीय प्रेरणा ही असू शकते. स्त्री स्वतंत्र घर करून पुरुषाबरोबर सहजीवन जगू शकते. संसारापलीकडच्या मैत्रभावाचे, मुक्तमैत्रीचे चित्र येते."[२] याच सूत्रांना धरून कथांमधून चित्रण करताना या लेखिका दिसतात.

**ब) साठोत्तरी कथालेखन :**

गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर यांच्या कथांमधून लग्नसंस्थेची चौकट अधिक लवचिक झाल्याची जाणीव दिसते. पुरुषांच्या स्थानाला गौणत्व देवून स्त्रियांना मुक्त आचारणाचे स्वातंत्र्य गौरी देशपांडे आपल्या कथांमधून देतात. प्रिया तेंडुलकर, उर्मिला शिरूर, छाया दातर, लीला, श्रीवास्तव, विजया राज्याध्यक्ष यांच्या कथांमधून कामाच्या ठिकाणी होणारे तिचे शोषण, आर्थिक स्वातंत्र्याने प्रश्न सुटतात का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

एकूणच कथा कादंबऱ्यांमधून लग्नसंस्थेसंबंधी पायाभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. लग्नसंस्था म्हणजे कारावास, लग्न संस्थेच्या बंधनातून मुक्तीच्या वाटा शोधणाऱ्या नायिका निर्माण केल्या आहेत. स्त्रीमुक्ती आंदोलनाचे स्पष्ट पडसाद कथामधून दिसून येतात. शरीरकेंद्री अनुभवविश्व, स्त्रियांच्या अनुभवातील शरीरविशिष्टता, गर्भारपणाचे अनुभव, गर्भपात, स्त्रियांचे वयात येणे, लैंगिक जीवनानुभव, चाळीशीनंतरचे गर्भारपण, मातृत्वाचे अनुभवविश्व, अपत्य-संगोपणाने

जीवनाला येणारी अर्थपूर्णता, स्त्री ही केवळ शोभेची वस्तू नाही, स्त्रियांची लैंगिक ओढ. अशाप्रकारे स्त्री केंद्री अनुभवाचे चित्रण साठोत्तरी कथांमधून आणले आहे.

**१९६० साठोत्तरी कविता :**

१९७०-७५ पर्यंतच्या स्त्रियांची कविता स्वच्छंदवादाच्या, व्याज स्वच्छंदवादाच्या प्रभावाखाली निर्माण होत कुटुंब, प्रपंचाच्या मर्यादित वर्तुळात सीमित कक्षेत प्रकट होत राहिली.

१९८० च्या दशकात रूपकुंवर व शहाबानो ही सतीप्रथा, पोटगीचा प्रश्न, आधुनिक दृष्टिकोनाचा परिचय, परिणाम, प्रभाव, संस्कार झालेल्या संवेदनशील विचार मनाच्या नवीन कवयित्रींच्या निर्मितीवर कळत नकळत, प्रत्यक्ष जाणीवपूर्वक अथवा अप्रत्यक्ष परिणाम झाला. व या काव्याने नवीन वळण घेतले. काव्यातून आत्मशोध स्त्री-पुरुष नातेसंबंधातील जैवप्रेरणा, लैंगिक वासनासक्त पुरुषदृष्टी, मुखवट्यातील खरे रूप, पुरुषसत्ताक व्यवस्थेतील कोंडलेले अवकाश, संघर्ष, मालक-नोकर व्यवस्थेला नकार, ग्रामीण स्त्री वास्तव, हिस्त्रता, वेदना, कारुण्य, एकाकीपणा, तुटलेपणा या आधुनिक आशयसूत्रामधून, स्वानुभूतीतून स्त्रियांच्या कविता सत्वाचा आत्मशोध घेताना दिसतात. या कवयित्रींमध्ये प्रामुख्याने अरुणा ढेरे, प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, अश्विनी धोंडगे, अंजली कुलकर्णी, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, कविता महाजन, मल्लिका उमर शेख, निरजा, प्रज्ञा पवार, अनुराधा पाटील यांच्या कवितेने स्त्रीत्वाचे नवे भान दिले. विद्रोह, बंडोखोरी, आग्रह वा समाजव्यवस्थेला दिलेला हादरा हे दिसत नसले तरी, पुरुष सत्तेतील राजकीय नीती त्या उघड करतात.

मल्लिका उमर शेख म्हणतात, “नाक्यावर, बसमध्ये, ऑफिसमध्ये / पुरुष उभे कंबर वाकडी करीत डोळा मारीत / तरी त्यांना कोणी वेश्या म्हणत नाही”[३] असे वास्तव व्यवस्था मांडतात.

कविता महाजन ‘शिक्कामोर्तब’ या कवितेतून स्त्री-पुरुष संबंधातील तीक्ष्ण उपरोध व्यक्त करतात.

“कुणाच्याच मालकीची नसलेली बाई / पाहत नाही कोणत्याच मालकाला / वस्तू आहे, तिचा वापर व्हायला हवा / पडून गंजून सडून कुजून वाया जायची ..../ आणि मालक नसलेल्या बाईवर / शिक्का मोर्तब केले जाते / सार्वजनिक मालमत्ता म्हणून ....... /”[४]

**ड) साठोत्तरी आत्मचरित्र :**

स्त्रियांनी आपल्या आत्मकथनातून सहजीवनाची, परस्पर विकासाची, ताणतणावाची, अपेक्षाभंगाची चित्रे रेखाटली आहेत. पतीशी मित्रत्वाचे नाते प्रस्थापित होत नसल्याबद्दलची खंत व्यक्त केली आहे. तसेच स्त्रीपुरुष नातेसंबंधातील कठोरपणा दूर होऊन नात्यात सहसंवेदनेचा ओलावा टिकून कसा राहिल याकडे लक्ष वेधतात. यामध्ये सुनीता देशपांडे, माधवी देसाई, कमल पाध्ये, मलिका अमर शेख, उर्मिला पवार, यशोदा पाडगावकर अशा अनेक जणींची नावे घेता येतील.

"काही आत्मचरित्रे स्त्रीविशिष्ट जैविक अनुभव विश्व मांडताना मोकळेपणातून व्यक्त होत नाहीत. काहीजणींनी स्पर्शसंवेदनेचे कडूगोड अनुभव, वासनेचे, बलात्काराचे, प्रेमविवाहाचे, वास्तल्याचे अनुभव व्यक्त केले आहेत.

**सारांश :**

साठोत्तरी स्त्रीवादी साहित्यातून ग्रामीण स्त्री, दलित स्त्री, नागरी स्त्री आपल्या लेखनातून स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेताना दिसते. पारंपरिक चौकटीला छेद देते. स्त्री-पुरुषसंबंधांवर, लग्नव्यवस्थेतील फोलपणावर प्रहार करताना दिसते. आजच्या प्रसारमाध्यमातून हाताळली जाणारी स्त्रीची वस्तुरूप प्रतिमा मांडते. स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र स्वीकारते. परंतु राजकीय वादळे, धर्मव्यवस्था, आजची सामाजिक स्थिती यातील स्त्री समस्या व्यापकपणे मांडत नाहीत. आज तंत्रज्ञानाचे जाळे, कृत्रिम बुद्धिमत्ता, चंगळवाद, जागतिकीकरण यामधून स्त्रियांचा जीवनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शोध सखोलपणे घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) स्त्री लिखित साहित्य – संपादक – आशुतोष पाटील, पहिल्या आवृत्ती २०१५, शब्दालय प्रकाशन, पृ.५५

२) समीक्षा संहिता – प्रा.डॉ.भारती निरगुडकर, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती २०१२, पृ.११, पृ.४०

३) स्त्रियांचे कथालेखन नवीदृष्टी, नवीशैली – डॉ.मंगला वरखेडे, साकेत प्रकाशन, दुसरी आवृत्ती २००५, पृ.५३

४) तत्रैव – पृ.१०४


***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

## डॉ. शाम रामनाथ निर्मळ

मराठी विभाग, राजमाता जिजाऊ कला व विज्ञान महाविद्यालय,

मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यविश्वात वेगवेगळे साहित्य प्रवाह उदयास आले. त्यात दलित साहित्य, ग्रामिण साहित्य. जनवादी साहित्य आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य हे काही नवे प्रवाह उदयाला आले एका विशिष्ट हेतूने गरजेपोटी हे साहित्यप्रवाह उदयास आले प्रत्येक प्रवाहाचे स्वतःचे खास वैशिष्ट्य आहे. वास्तववादी असे हे साहित्यप्रवाह आहेत. या प्रवाहामध्ये स्त्रीवादी साहित्याने सर्वांचेच लक्ष आपल्याकडे वेधुन घेतले. स्त्रीवादी साहित्याने अनेकांना विचार प्रवृत्त केले. स्त्रीवादी साहित्य हे प्रामुख्यानेस्त्री प्रश्नांसंदर्भात आहे. स्त्रियांचे दुःख स्त्रियांच्या समस्या यांना वाचा फोडण्याचे कार्य स्त्रीवादी साहीत्याने केले जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांत स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. स्त्री पुरुष विषमता सर्वत्र दिसून येते. मुलाला मुलीपेक्षा जास्त महत्व व दर्जा दिला जातो. स्त्री पुरुष समानता निर्माण व्हावी म्हणून स्त्रीवादी साहित्याने जीवन परिवर्तनाची मागणी केली. म्हणून स्त्रीवादाची दखल घेणे अपरिहार्य ठरते.

पारंपरिक समाजव्यवस्थेत स्त्रीला असलेल्या स्थानाचा विचार करता असे दिसते की, पुरूषप्रधान संस्कृतीने, स्त्रीचे विविध पातळयांवर शोषण केले आहे. परंपरेने तिला ‘अबला’ हे विशेषण लावले आहे. ‘चूल आणि मूल’ हेच तिचे आयुष्यभराचे कार्यक्षेत्र. तिच्याकडे पाहत असताना न्यूनत्वाच्या दृष्टिकोणातून पाहिले आहे. ‘पुरूषाशिवाय तिला पूर्णत्व येऊच शकत नाही’ हे तिच्या मनावर वारंवार बिंबवले गेले. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीने धार्मिक ग्रंथांचा आधार घेतला. त्याचे लेखनही पुरूषांनी त्यांच्या सोयीप्रमाणेच केले. त्यात विविध युक्त्या वापरण्यात आल्या. धार्मिक ग्रंथांमध्ये स्त्रीचे चित्रण सहनशील, सोशिक, ममतेचा सागर अशारितीने केले गेले. पुरूषप्रधान संस्कृतीच्या जोखडात स्त्री दबतच गेली आणि स्वतःचा आवाज तिचे स्वतंत्र अस्तित्व हरवून

बसली. आपण जे त्यागाचे, कष्टाचे जीवन जगत आहोत हेच आपले खरे जीवन आहे. या निर्णयाप्रत तिला आणले गेले. स्त्रीच्या अगतिकतेचे एक अबला म्हणून समाजातील हेच स्थान लक्षात घेऊन स्त्रीवादाचा विचार करू लागले तर सध्याच्या परिस्थितीत यात बदल होत असल्याचे दिसते

मानव जातीच्या इतिहासाइतका स्त्री जातीवरील अत्याचार सनातन आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक स्त्रीला जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, सासू अशा वेगवेगळया भूमिका पार पाडाव्या लागतात. स्त्रीला लहानपणी वडिलांच्या छायेत, तरुणपणी पतीच्या छायेत आणि म्हातारपणी मुलाच्या छायेत आपले आयुष्य घालावे लागते. पुरुषसत्ताक समाजाने स्त्रीला कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्र्य दिलेले नाही. स्त्रीने स्वतःचे अस्तित्व विसरून दुसऱ्याची सेवाकरणे, त्याग करणे यात आपले आयुष्य खर्च केले. जगातील जवळजवळ अर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. त्यामुळे ह्या अर्ध्या लोकसंख्येचे प्रश्न डोळसपणे जाणून घेणे आवश्यक ठरते. 'स्त्रियांची गुलामी' आणि 'स्त्री मुक्ती' ह्याचा सखोल अभ्यास केल्याशिवाय 'स्त्रीवाद' म्हणजे काय हे कळणार नाही.

मराठी साहित्यात साधारणत १९६० नंतरच्या दशकांत स्त्रीवादी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले आणि सत्तर-ऐंशीच्या व नंतरच्या दशकांतही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कथा, कादंबरी अशा प्रकारांत जोमाने विकसित होऊ लागला. मात्र तत्पूर्वीही स्त्रीकेंद्री साहित्याची निर्मिती अगदी प्राचीन काळापासून मौखिक वा लिखित स्वरूपात होत होती, असे दिसून येते.

स्त्रियांच्या साहित्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत जाऊन पोहोचते. स्त्री आपल्याशीच किंवा आपल्यासारख्याच दुसरीशी चाललेल्या संवादातून' बाई असण्याचा', 'बाईपणाचा' अर्थ व्यक्त करीत आली आहे. मराठी लोकगीतांतहा स्त्रीत्वाचास्वर सतत ऐकूयेतो. अन्याय, बंधने, शिक्षा, दंड, तक्रार, शोषण, पुरुषांकडून मिळणारी अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक, सततची अवहेलना व उपेक्षा, अपाय, इजा, आपल्याकडून चूक वा अपराध घडेल का ह्याची स्त्रीला वाटणारी धास्ती इ. स्त्रियांच्या अनु-भवविश्वाच्या कक्षेतील अशा अनेक

भावना आणि तथ्ये त्यांनी लोकवाङ्मयातून शब्दांकित केलेली दिसतात. समाजाने दुर्लक्षित केलेले हे वाङ्मय स्त्रीवादी समीक्षकांनी शोधून त्यावर नवा प्रकाश टाकला आहे. मराठीत तारा भवाळकर, कुमुद पावडे, सरोजिनी बाबर इत्यादींनी लोकगीतांचे संशोधन केले आहे.

महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादींनी तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इ. लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे, तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम, शोषण व त्यांतून स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ताराबाई शिंदे यांनी स्त्रीपुरुषतुलना ह्या ग्रंथात पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या होत असलेल्या शोषणाविरुद्ध लिहून, स्त्रीशोषणाचे विश्लेषण करणारी सैद्धांतिक मांडणी केली. मालतीबाई बेडेकर म्हणजेच विभावरी शिरूरकर यांच्या लिखाणातही पुरुषाकडून स्त्रीच्या शारीरिक व मानसिक पातळीवर होत असलेल्या शोषणाची जाणीव व्यक्त झाली आहे. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'भरली घागर' कवितेत स्त्री-पुरुष भेदावर भाष्य आहे, तर स्मृतिचित्रे मध्ये विनोदाच्या, उपरोधाच्या अंगाने स्त्री-पुरुष विषमतेचे चित्रण आहे. व्हर्जिनिया वुल्फचा सिद्धांत –स्त्रियांनी उपरोध, विनोद ही शस्त्रे वापरून आपल्या व्यथा, शोषण, अन्याय यांना वाचा फोडावी – इथे मराठीत प्रत्यक्षात आला आहे. अलीकडच्या काळात मंगला गोडबोले यांच्या लिखाणातही पुरुषप्रधान व्यवस्थेतील रूढी, परंपरांचा निषेध करताना विनोद, उपरोध यांचा वापर केला आहे.

विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, गौरी देशपांडे, शांता गोखले, कविता महाजन, प्रिया तेंडुलकर, सानिया, मेघना पेठे, नीरजा यांच्या कथा कादंबऱ्यांनी मोलाची भर घातली आहे. कमल देसाईंच्या काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई या कादंबरीत प्राचीन मिथ्यकथांना नवे स्त्रीवादी अर्थ दिले आहेत. काळा सूर्य या कादंबरीची नायिका शेवटी गावातील पुरातन मंदिर तोडून

टाकते आणि स्वतःही मरते. हे गिल्बर्ट-ग्यूबरच्या 'मॅडवुमन' प्रतिमेचे मराठीतील उदाहरण म्हणता येईल. अरुणा ढेरे, गौरी देशपांडे, श्यामला वनारसे यांनी त्यांच्या साहित्यकृतींतही प्राचीन पुराणकथांचे स्त्रीवादी दृष्टि-कोणातून नवे अन्वयार्थ लावले आहेत. गौरी देशपांडे यांच्या कथा-कादंबऱ्यांत स्वतंत्र, मुक्त, प्रगल्भ स्त्रीची अनेक रूपे आढळतात. स्त्रीवादी दृष्टिकोणातून स्त्रियांचे अनेक प्रश्न व जाणिवा यांची अभिव्यक्ती, पुरुषसत्ताक व्यवस्था व पुरुषी मानसिकता यांची उपरोधपूर्ण टिंगलटवाळी, करिअरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रीच्या समस्या व व्यथा यांचे प्रभावी चित्रण ही त्यांच्या स्त्रीवादी साहित्याची ठळक वैशिष्ट्ये होत.

शांता गोखले यांच्या रीटा वेलिणकर या कादंबरीची मानसशास्त्रीय तसेच समाजशास्त्रीय स्त्रीवादी भूमिकेतून चिकित्सा करता येते. स्त्रीवादातील 'भगिनीभाव' या संकल्पनेचा पुरस्कार करणारी ही कादंबरी आहे. आशा बगे यांची भूमी ही कादंबरी, तसेच प्रिया तेंडुलकरांच्या कथा यांचे मूल्यमापन भारतीय स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून करता येते. कविता महाजन यांची ब्र ही कादंबरी भारतीय व समाजशास्त्रीय अशा द्विविध स्त्रीवादी दृष्टिकोणांतून अभ्यासता येते. मेघना पेठे यांच्या लिखाणात मुक्त जीवनपद्धती, बिनधास्त जीवनशैली यांचा पुरस्कार आढळतो. नीरजा ह्या अलीकडच्या स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील एक प्रमुख व महत्त्वाच्या कवयित्री व कथाकार असून, स्त्रीवादी जाणिवांचे विविध पैलू त्यांनी वास्तववादी, चिंतनशील पद्धतीने व्यक्त केले आहेत.

साठोत्तरी कालखंडात, १९७०-८० च्या दशकांत व नंतरच्या काळातही काव्यनिर्मिती करणाऱ्या अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी काव्याचे दालन समृद्ध केले आहे. त्यांतील काही प्रमुख कवयित्री अशा : अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, कविता महाजन, आसावरी काकडे, सिसिलिया कार्व्हालो इत्यादी. स्त्रीत्वाचे, स्त्रीवादी जाणिवेचे, स्त्रीच्या विशिष्ट अनुभव-विश्वाचे वेगवेगळया पातळ्यांवरचे, भिन्न भिन्न स्वरूपाचे चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. व्यक्तिनिष्ठ तसेच सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाचे थेट चित्रण करणाऱ्या या कविता

स्त्रीत्वाचा आत्मभानयुक्त स्वर आळवणाऱ्या आहेत. बाईचे सामर्थ्य व अनेकविध क्षमतांच्या शक्यता सूचित करणाऱ्या भविष्यवेधी कविता काही कवयित्रींनी लिहिल्या आहेत. बाईतील अपार करुणा, तिची सर्जनशीलता, नवनिर्मितीची क्षमता ही तिची बलस्थाने अनेक कवितांतून व्यक्त झाली आहेत. १९८०-९० च्या दशकांत स्त्रीवादी जाणिवेच्या काव्याचा प्रवाह लक्षणीय होता. स्त्रीकेंद्री काव्यलेखनाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच गेले.

स्त्रियांच्या आत्मकथनांनी स्त्रीवादी साहित्यात मोलाची भर घातली आहे. उदा., सुनीता देशपांडे यांचे आहे मनोहर तरी, कमल पाध्ये यांचे बंध अनुबंध ही आत्मकथने उल्लेखनीय आहेत.दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्त्वाचा दस्तावेजआहे. बेबी कांबळे (जिणे आमचे), कुमुद पावडे (अंतःस्फोट), शांताबाई कांबळे (माज्या जलमाची चित्तरकथा), मुक्ता सर्वगौड (मिटलेली कवाडे), ऊर्मिला पवार (आयदान), सिंधुताई सपकाळ (मी वनवासी) इत्यादींचे स्त्रीवादी आत्मकथनांनी स्त्रीवादी साहित्यात मोलाची भर घेतलेली आहे

**'स्त्रीवाद' म्हणजे काय ?**

'स्त्रीवाद' ही एक व्यापक संकल्पना आहे. स्त्रीवादाचा विकास हा स्त्रियांचे हक्क व त्यांच्यावरील अन्याया, अत्याचार यांना विरोध करणाऱ्या चळवळीतून झाला आहे. म्हणून 'स्त्रीवाद' ही संकल्पना पुस्तकी नसून जीवनातील प्रत्यक्ष घटनांचा तिला आधार आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. १९६० नंतर स्त्रीवादी चळवळींचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. मंगला वरखेडे म्हणतात, "पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळालेल्या दुय्यम स्थानाचा प्रतिवाद करणे आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त होण्यासाठीची चळवळ हे स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आहे."[१] समाजव्यवस्थेत पुरुषाकडे समाजातील एक महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा घटक म्हणून पाहिले जाते. तर 'स्त्री' कडे मात्र न्यूनतावादी व दुय्यम दृष्टिकोणातून पाहिले जाते. तिची कार्यक्षेत्रे ही परंपरेने नेमून दिलेली असतात. त्या व्यतिरिक्त कोणत्याही क्षेत्रात तिने हस्तक्षेप करू नये असा एक अलिखित नियम असतो. ती परंपरेने नेमून

दिलेली कार्य करत नसेल तर साम, दाम, दंड या नीतीचा वापर केला जातो.

'स्त्री' वर लादलेले स्त्रीत्व हे नैसर्गिक लिंगभेदामुळे कार्य विभाजन किंवा श्रम विभाजन घडते, असे वर वर पाहता दिसते. परंतु नैसर्गिकतेची संकल्पनाच संस्कृतिजन्य असते, असे स्त्रीवादाचे एक महत्त्वाचे प्रमेय आहे. "स्त्री म्हणून आपण जन्म घेत नसतो, तर आपण स्त्री बनत असतो."[२] हे सीमॉन द बोव्हाचे विधान सकृतदर्शनी धक्कादायक वाटले तरी या संदर्भात अगदी सार्थ ठरतो. अर्थात आपण 'स्त्री' किंवा 'पुरूष' देह घेऊन जन्माला येतो, हे येथे नाकारावयाचेनाही. परंतु या देहाबरोबर लाजाळूपणा, नाजुकपणा, भावनाप्रधानता, ममता, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे गुणही जन्मजात असतात हे येथे नाकारायचे आहे हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात. तेव्हा लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे हे स्त्रीवादाने स्पष्ट केले आहे.

**स्त्रीवादी चळवळ**

'स्त्रीवादी' या संकल्पनेचा उदय व विकास स्त्रियांच्या क्रियाशील चलनघून झालेला दिसतो. पुरुषांनी स्त्रियांकडे अभाववादी दृष्टिकोणातून पाहिले, तिचे माणूसपण नाकारले, निसर्गाने दिलेली समता नाकारली. स्त्रीवाद पुरूषी काव्याला विरोध करतो. स्त्रीवाद ही संकल्पना थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. "अभावमूलक विचारसरणीला नकार देणे, स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यहरचना करणे ही स्त्रीवादाची थोडक्यात भूमिका आहे."[३] स्त्रीवादी केवळ बौद्धिक चर्चा करत नाही. समाजातील विविध घडामोडीतून त्याचा विकास होत आला आहे. स्त्रीवादी सिद्धांताच्या पाठीमागे अनुभवांची शिदोरी आहे. ही विचारसरणी पुस्तकी नसून त्यात सिद्धांताचा खरेखोटेपणा सत्याच्या पातळीवर पारखून घेतला आहे.

स्त्रीवादी विचारसरणीचा उदय आणि विकास पाश्चिमात्य देशात झाला. स्त्रीवादाविषयी अनेक गैरसमज असलेले दिसतात. या चळवळीसंबंधी फार उथळपणे मते मांडली जातात. उदा. पुरूषांसारखे कपडे परिधान करणे, त्यांच्यासारखी सिगारेट, दारू यांची व्यसने असणे इत्यादी. परंतु हा स्त्रीवादाचा अर्थ होऊ शकत नाही. आजपर्यंत

पुरूष समीक्षकांनी स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीवादी विचारसरणीतून निर्माण झालेले साहित्य यांची गांभीर्याने नोंद घेतलेली दिसत नाही. अशी स्त्रीवादी चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची व लेखकांची खंत आहे."स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेऊन स्वतःचा सवतासुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे 'मानवपण' नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेली ही चळवळ आहे."[४]

स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारांच्या विरोधात आवाज उठविणे, तिचे 'माणूसपण' तितला सन्मानाने बहाल करणे, समाजाने निर्माण केलेल्या एकांगी भूमिकेतून तिची सुटका करून समतावादी आणि अधिक स्वतंत्र जीवनाचा निर्भेळ आणि निर्मळ आनंद देणे ही स्त्रीवादी विचारसरणीची वैचारिक भूमिका आहे. "मुळात 'स्त्रीवाद' ही संकल्पना एक सत्वावर उभी राहिलेलीनाही. ही बहुपेडी आहे. अनेक संकल्पना दृष्टिकोन व तत्त्वप्रणाली यांचा तीत समावेश होतो. स्त्रीवादी सिद्धांत केवळ तत्वविचारांवर अधिष्ठित नाहीत. वर्तमान काळातील स्त्रीजीवनाचा त्यांना आधार आहे. तसेच ते स्त्रीच्या वर्तमानकालीन स्थितीला पाहतात आहेत. स्त्रीवादी सिद्धांत हे स्त्रियांच्या चळवळीतून उदय पावलेले आहे"[५] 'स्त्रीवाद' ही संकल्पना फक्त बौद्धिक चर्चा करत नाही, चळवळ म्हणून प्रत्यक्ष स्त्रीप्रश्नांवर काम करत असताना जे अनुभव आले त्या अनुभवांमधून स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी झाली आहे. 'स्त्रीवाद' ही संकल्पना व्यापक आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. स्त्रीजीवनातील विविध समस्यांचा ती गांभीर्याने विचार करते.

'स्त्री' आणि 'पुरूष' या संकल्पना फक्त बौथद्धक चर्चा करत नाही. 'स्त्री' आणि 'पुरूष' या संकल्पना निसर्गाने निर्माण केलेल्या नाहीत तर त्या मानवनिर्मित आहेत किंवा समाजनिर्मित आहेत. निसर्ग 'नर' किंवा 'मादी' जन्माला घालत असतो म्हणजे दोघेही जन्मतः समान असतात. त्यांच्या 'लिंग' ही संकल्पना सोडीली तर भेदभाव नसतो. स्त्रीला बुद्धी नसते, म्हणून ती विचार करू शकत नाही. तिने आपली परंपरेने सांगितलेली कामे अर्थात ती पुरूषांच्या सोयीचीच असणार ती तिने निमूटपणे कोणताही प्रतिप्रश्न न विचारता करावीत हा विचार

तिच्या डोक्यावर बिंबवला गेला. तिची एक सनातन प्रतिमा तयार करण्यात आली. "स्त्रीची ही सनातन प्रतिमा पुसून टाकणे हे स्त्रीवादी चळवळीपुढचे एक महत्त्वाचे आव्हान आहे. पुरुषाला समाजरचनेत जसे महत्त्वपूर्ण स्थान आहे तसे स्त्रीलाही प्राप्तव्हावे यासाठी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात संघर्षशील राहणारी स्त्रीवाद ही एक विचारप्रणाली आहे."[६] कृषीसारख्या क्रांतिकारक व्यवस्थेचा शोध स्त्रीने लावला परंतु नंतर तिला बालसंगोपनात आणि स्वयंपाकघरात गुंतवण्यात आले. त्यातून तिच्या वाट्याला गुलामगिरीचे जगणे आले. घरातील महत्त्वपूर्ण विषयांवरील निर्णय प्रक्रियेत तितला कोणतेही स्थान राहिले नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत तिला मर्यादित आणि परिघावरचे स्थान प्राप्त झाले.

स्त्रीवादी जाणिवांची लिखित अभिव्यक्ती सर्व प्रथम भारतात झाली हे सत्य आपणास नाकारता येणार नाही. १९८२ साली ताराबाई शिंदे या म. फुले यांच्या सहवासातील स्त्रीने 'स्त्री-पुरुष तुलना' हा दीर्घ निबंध लिहिला. या लेखनात त्यांनी परंपरेने चालत आलेला पुरूषी कावा ठिकठिकाणी उघडा पाडला आहे. 'स्त्री' आणि 'पुरूष' यांच्यात 'लिंग' या संकल्पनेतून निर्माण झालेली विषमता व त्यांचे परिणाम त्या व्यक्त करतात. पुरूषप्रधानसंस्कृतीने निर्माण केलेल्या लिंगभावामुळे स्त्री व पुरूष यांची जीवनपद्धती कशी वेगळी आहे या विषयीचे पायाभूत चिंतन त्यांच्या निबंधात पहावयास मिळते. युरोपातील सिमॉन द बोव्हा यांचे 'The Second Sex' हे पुस्तक ताराबाई शिंदे यांच्यानंतर कित्येक वर्षांनी प्रकाशित झाले. म्हणजेच बोव्हाच्या अगोदरही भारतात 'स्त्रीवाद' या विचारसरणीसंबंधी मूलगामी विचारमंथन चालू होते. स्त्रीवादी विचारसरणीचा मुळात शोध घेतला ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष 'तुलना' या दीर्घ निबंधाने हे विसरून चालणार नाही.

**संदर्भग्रंथ**


१) मंगला वरखेडे, :-'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स. वाणी प्रगत अध्ययन संस्था,धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र. १.

२) सिमॉन द बोव्हा:- 'द सेकंड सेक्स', पृष्ठ क्र. ७.

३) मंगला वरखेडे:- 'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन' का.स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र. ११.

४) आश्विनी धोंगडे:-'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना आणि स्वरूप', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र. १३.


***

# स्त्रियांच्या वेदना सशक्तपणे मांडणारी कवयित्री : अश्विनी धोंडगे

**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर.

आज स्वतंत्र भारताची पंचाहत्तरी साजरी करताना विविध क्षेत्राचे मूल्यमापन होणे स्वाभाविक आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण, संरक्षण, तसेच कला क्षेत्रात अनेक बदल या काळात झाले. त्यातही महाराष्ट्राच्या दृष्टीने झालेली बदल १९६० नंतर प्रामुख्याने मोजता येतात. मराठी भाषिक राज्याची निर्मिती आणि सर्वदूर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार यामुळे शहरी तसेच ग्रामीण जीवन अंतर्बाह्य बदलले. याचा विशेष परिणाम या काळातील साहित्यावर झाला. १९६० नंतर मराठी साहित्यात अनेकविध प्रवाह रूढ झाले. दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय जाणिवेचे साहित्य मोठ्या जोमाने लिहिले जाऊ लागले. स्त्रीवादी साहित्य प्रवाह यापैकीच एक अत्यंत महत्त्वाचा साहित्य प्रवाह होय. निसर्गाने सर्व शक्ती देऊनही केवळ पुरुषी अहंकारामुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक जीवनात कायम दुय्यमपणाची वागणूक तिच्या वाट्याला येत गेली. स्त्री आणि पुरुष या दोघांशिवाय समाजाचे चक्र प्रवाही राहत नाही, असे असूनही केवळ स्त्री म्हणून तिच्या सर्व न्याय हक्काचे दमन अनेक वर्ष केले गेले. कधी उपभोग्य वस्तू म्हणून तर कधी पूजनीय देवता स्वरूप म्हणून तिला पायाखाली दाबल्या गेले. स्त्रीचे असे दमन साठोत्तरी कालखंडातील सुरूच होते. काही अंशी शिक्षणाने जागृती निर्माण झालेली असली तरी सर्व समस्या मुळातून नष्ट झाल्या नव्हत्या.

साठोत्तरी काळातील स्त्रीवादी कवितेवर याचा विशेष प्रभाव दिसून येतो. अश्विनी धोंगडे या कालखंडातील महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून विशेषतः आपल्या काव्यातून समकालीन स्त्रियांच्या वास्तव वेदना मांडल्या आहेत. पुढीलप्रमाणे त्याचा विचार करू.

**उद्दिष्टे –**

१) साठोत्तरी मराठी कवितेतील विविध प्रवाह समजून घेणे.
२) स्त्रीवादी कवितेच्या प्रेरणा, स्वरूप व वेगळेपणाचा मागोवा घेणे.
३) अश्विनी धोंगडे यांच्या लेखनातील आशय आणि अभिव्यक्तीचा विचार करणे.
४) अश्विनी धोंगडे यांच्या लेखनातील समकालीन. संदर्भ शोधणे.

**गृहितके –**

१) साठोत्तरी कालखंडात स्त्रियांचे आत्मभान वाढले आहे.
२) स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह वैविध्यपूर्ण आहे.
३) अश्विनी धोंगडे या साठोत्तरी मराठी कवितेतील महत्त्वपूर्ण लेखिका आहेत.
४) साठोत्तरी स्त्रीवादी कवितेच्या प्रेरणा सत्यशोधकी विचारधारेत शोधता येतात.

**स्त्री शिक्षण आणि स्त्रियांची प्रगती –**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा आलेख मोजताना १९६० हे साल महत्त्वपूर्ण आहे. मराठी भाषिक राज्य म्हणून महाराष्ट्राची पुनर्रचना झाल्यानंतर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार मोठ्याप्रमाणात झाला. स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढेल. सत्यशोधक 'शिक्षणाने माणसातील पशुत्व नष्ट होते असा विचार त्या मांडतात.'[1] परिणामी १९ व्या शतकात शिक्षणाचा प्रवाह महात्मा फुले यांनी सुरू करून दिला. सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने स्त्री शिक्षण सुरू झाले. पुढे

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय संविधानाने स्त्रियांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला. कायद्याने शिक्षणाचे दार सर्वांसाठी खुले करून दिल्याचा परिणाम म्हणून प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

शिक्षणामुळे आत्मभान प्राप्त झालेल्या स्त्रियांनी साहित्याच्या क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. साठोत्तरी कालखंडात स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह जोमाने सुरू झाला. कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन अशा विविध प्रवाहात विपुल लेखन केले आहे. अश्विनी धोंगडे त्यापैकीच एक महत्त्वाचा लेखिका आहेत. समकालीन समाजातील विविध समस्यांचे तितकेच समर्थपणे लेखन केले आहे. स्त्रियांच्या वाट्याला आलेले जिणे त्या अत्यंत प्रभावीपणे मांडतात.

**साठोत्तरी मराठी साहित्यातील महत्त्वाच्या लेखिका : अश्विनी धोंगडे –**

अश्विनी धोंगडे या आजच्या पिढीतील अत्यंत महत्त्वाच्या लेखिका आहेत. अत्यंत साधी, सरळ, स्पष्ट आणि रोखठोक निवेदनशैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'स्त्रीसुक्त', 'पाषाणपुरुष', 'जस्मिन', 'स्पर्श', 'होरपळ' आदि त्यांची साहित्य संपदा. त्यांनी आपल्या या कवितेतून पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे असणारे दुय्यम स्थान, उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि स्त्री जीवनाची दारुण अवस्था याचा समाचार उपहास, उपरोध, विनोद आणि विडंबनाच्या पातळीवरून घेतला आहे.

समकाळातील विविध समस्यांचा शोध आणि वेध त्यांनी आपल्या कवितेतून घेतला आहे. त्यांच्या साहित्यकृतीचे शीर्षक पाहिले तरी त्यांच्या लेखनाचे वेगळेपण सहज लक्षात येते. पुरुषी संस्कृतीत स्त्रियांना कायम दुय्यम स्थान दिले गेले आहे. कायद्याचे राज्य आले तरी प्रत्यक्ष जीवनात स्त्रीला अजून दुय्यम वागणूक होती. हे समकालीन वास्तव त्यांनी आपल्या लेखनातून चित्रित केले आहे.

**भारतीय संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम स्थान –**

अश्विनी धोंगडे यांनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्या वास्तव जगण्याचे चित्र रेखाटले आहे. स्त्रियांनी प्रत्यक्ष संसारात खूप मोठी जबाबदारी पाडली आहे. "स्त्रिया निरंतर या संसारात नानाप्रकारचे कष्ट, हाल, तहान भूक, जाच, हाणमार सोसून, फक्त एका तुमच्या गोड शब्दाच्या भुकेल्या असतात."[2] स्त्रियांना केवळ प्रेमाची गरज असते. त्याबदल्यात ती सर्व जबाबदाऱ्या पार पाडणारी स्त्री कौटुंबिक जीवनात महत्त्वाची घटक आहे. मात्र प्रत्यक्ष जीवनात तिची किंमत एका वास्तूपेक्षा जास्त नाही.

**'विकणे आहे**
**एक उत्साही कामसू देखणे**
**जिवंत तरुण यंत्र**
**स्वैपाक करते**
**कपडे धुते**
**नोकरी करून**
**पैसा मिळवित'[3]**

वरीलप्रमाणे अश्विनी धोंगडे यांनी स्त्रीला एका यंत्राप्रमाणे वागविले जात असल्याची खंत व्यक्त केली आहे. त्यांनी अतिशय उपरोधिकपणे समाजाचा दुटप्पीपणा व्यक्त करते. तिच्या नित्य नैमित्तिक कामाची जाणीव करून देऊन तिला एक माणूस म्हणून किंमत दिली जावी हा विचार इथे कवियत्री व्यक्त करते.

**हुंडापध्दती आणि स्त्रीजीवन –**

हुंडापध्दती हा भारतीय समाजाला लागलेली कीड आहे. मुलींच्या लग्नाचा खर्च हुंड्यामुळया अधिक असतो. बऱ्याच मुलींचे लग्नाचे वय उलटून गेले असले तरी त्यांचे लग्न होत नाहीत कारण वडिलांना लग्नाचा खर्च परवडत नाही. हुंडा, मानपान, व्रत विधी अशा

कितीतरी गोष्टीमुळे स्त्रीचे जीवन पराधीन झाले आहे. अश्विनी धोंगडे यांनी वरील स्थितीचे नेमके वर्णन केले आहे.

'हुंडापद्धती' ही आजच्या समाजास लागलेली कीड आहे. वर दक्षिणेच्या नावाखाली पूर्वीही मुलीच्या वडिलांनी घर – दार विकले आहे आजही मुलीचे बाप कर्जबाजारी होत आहे. गरीब घरातील मुलीचे लग्नाचे वय वरचेवर वाढत आहे. कैक मुली या जीवघेण्या शर्यतीतून स्वतःची सोडवणूक करण्यासाठी आत्महत्या करणे पसंत करतात. वास्तविक विवाहासाठी एक समजदार, अनुरूप, योग्य वयाचे जोडपे लागते. परंतु विवाहातील फाजील डामडौल, मानपान, पोकळ प्रतिष्ठा जपण्यासाठी दाखविला जाणारा भपकेबाजपणा या अशा कितीतरी अतार्किक बाबींचा अतिरिक्त भार मुलीच्या वडिलांना सोसावा लागतो. लग्नाचा घोडेबाजारात अक्षरशः वरांना बोली लावून विकत घ्यावे लागते. या वास्तव परिस्थितीमुळे उद्विग्न झालेल्या स्थितीचे अतिशय दाहक, भेदक आणि उपरोधिक चित्रण कवयित्री अश्विनी धोंगडे यांनी केले आहे.

**'पाहुण्यांची सरबराई करते**
**घरसुध्दा झकपक ठेवते**
**आल्या आल्या हसून स्वागत करते**
**चहा पोह्याच्या डिशेस तयार ठेवते**
**शरीराची गरज भागवते**
**वंशाला दिवा देते**
**कधी बिघडलेच तर बडबड करते**
**चार दोन थपडात जागेवर येते**
**खर्चसुध्दा फार नाही**
**रोजच्या जेवणात भागून जाई**
**पन्नास हजारासहित सालंकृत घरपोच**
**त्वरा करा**

आपली आर्डर आजच नोंदवा '4

दाग दागिने, पैसा शिवाय नोकरी अशा कितीतरी जमेच्या गोष्टी घेऊन स्त्री विवाहाच्या बाजारात उभी आहे. क्षमता असूनही तिला जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य नाही. वरील कवितेतून अश्विनी धोंगडे यांनी उच्च कोटीचा उपरोध व्यक्त केला आहे. सकाळपासून ते सायंकाळपर्यंतचा एका स्त्रीचा कुटुंबातील आणि कामाच्या ठिकाणचा दिनक्रम कवयित्री चित्रित करते. खास करून घरातील कोणतेही काम तिच्याशिवाय पूर्ण होत नाही. असे असले तरी तिचे स्थान एका यंत्रापेक्षा अधिक नाही. ही खरी शोकांतिका आहे. एक स्त्री कुटुंबाचा कणा असते. घरातील नित्य नैमित्तिक कामे तीच पूर्ण करते. घराचा वंश पुढे चालवते. शिवाय प्रसंगी नोकरी ही करते. घर सांभाळून नोकरी करताना तिची तारांबळ उडत असली तरी ती त्याबद्दल तक्रार करत नाही. स्वत:च्या दुखण्या खुपण्याबद्दल तोंडून एक अक्षरही काढत नाही. या बदल्यात तिला दोन वेळचे जेवण मात्र दिले जाते. त्यातही बहुतेक वेळी ते शिळेच असते. कुटुंब शहरी असो वा ग्रामीण स्त्रीच्या ताटलीत मात्र बहुतेककरून शिळेच पदार्थ असतात. यामुळे तिच्या आरोग्यावर किती दुष्परिणाम होत असतील याबाबत कोणी विचारही करायला तयार नाही. ही वस्तुस्थिती पाहिल्यानंतर कवयित्री टोकाचा उपरोध का व्यक्त करते याचा अंदाज येतो. स्त्रीचे जगणे पूर्वीही यंत्रवत होते ते आजही आहे.

सहानुभूतीशून्य, कमालीचा आत्मकेंद्री, माणूसपण हरवत चाललेला समाज ही आजची गंभीर समस्या आहे. त्यातल्या त्यात स्त्रीच्या बाबतीत हा समज अधिकच सहानुभूतीशून्य होतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कायद्याने स्त्रीला अधिकार मिळाले असले तरी एक माणूस म्हणून समाज मनाच्या कोपऱ्यात तिला अजूनही स्थान मिळाले नाही, ही वस्तुस्थिती आजही नाकारता येत नाही. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात काही

बोटावर मोजता येणाऱ्या बायकांनी स्वत:चं वेगळेपण सिद्ध केलं आहे हे खरे असले तरी ही अपवादात्मक उदाहरणे आहेत. त्यांनी स्वतःचे वेगळेपण सिद्ध केलेले असले तरी यावरून सर्व स्त्रियांचे जीवनमान सुधारले असे मात्र म्हणता येत नाही. बोटांवर मोजता येतील इतक्याच स्त्रिया परंपरेने चालत आलेल्या दुय्यम वागणुकीच्या अंध:कारात काजव्याप्रमाणे चमकत आहेत. बाकी सगळीकडे तोच अंधार अधिक गडद होऊन आपली पाळंमुळं घट्ट करतोय हे वास्तवही नाकारता येत नाही.

**समारोप –**

अश्विनी धोंगडे यांच्या कविता समकालीन वास्तवाचे भान पुरवितात. स्त्रीच्या विचार, भावना, कल्पना, मानसिकतेचा सर्वांगीण शोध त्यांची कविता घेते. समकालीन स्त्रियांची नेमकी स्थिती त्यांच्या कवितेतून समर्थपणे उभी केली आहे. पुढीलप्रमाणे काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवता येतील.

१) साठोत्तरी मराठी कवितेतील महत्त्वाच्या लेखिका म्हणून अश्विनी धोंगडे यांचा उल्लेख आदराने करावा लागतो.

२) समकालीन स्त्री पुरुष यांच्यातील वैचारिक भेदांचे चित्र त्यांनी आपल्या कवितेतून रेखाटले आहे.

३) त्यांच्या कवितेतील उपरोधिक अत्यंतिक मार्मिक असून वास्तवाचे भान पुरविते.

४) त्यांच्या कवितेतील प्रतिमा आणि प्रतीके दैनंदिन जीवनातील आहेत.

५) त्यांच्या कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती समर्पक, वैशिष्टपूर्ण आहे.

६) आधुनिक काळातील स्त्री त्यांच्या साहित्यातून चित्रित झाली आहे.

अश्विनी धोंगडे या मराठीतील साठोत्तरी कालखंडातील अत्यंत महत्त्वाच्या लेखिका आहेत. १९६० नंतर स्त्रीवादी साहित्यात निर्माण झालेल्या आणि अधिक जोमाने प्रवाहित झालेल्या विविध प्रवाहाची पाळेमुळे १९ व्या शतकातील सत्यशोधकी विचारधारेत शोधाव्या लागतात. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने स्त्री शिक्षणाचा दिलेला अधिकार स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वाचा आहे. अश्विनी धोंगडे यांचे लेखन आजही प्रेरणादायी आहे. समकालीन. जीवनाचे विविध संदर्भ त्यांच्या कवितेतून अभ्यासता येतात. स्त्रीवादी कवितेतील त्यांचे स्थान जितके महत्त्वाचे आहे तितकेच अखिल मराठी साहित्यात त्यांचे स्थान अढळ आहे, हे नाकारता येत नाही.

दैनंदिन जीवनातील प्रतिमा, प्रतीकांचा प्रभावी वापर हे त्यांचे लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीवादी जाणीवा व्यक्त करणाऱ्या महत्त्वाच्या लेखिका म्हणून अश्विनी धोंगडे यांच्या व्यक्तित्व आणि कवितेचे मूल्य अधिक आहे, हे इथे मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची –**


१) आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक – प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ – कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद – प्र. आ. जुलै २०१८. – पृ. ६६.

२) स्त्री पुरुष तुलना – ताराबाई शिंदे – रघुवंशी प्रकाशन, पुणे – पृ. १५.

३) मध्ययुगीन व आधुनिक कविता - (संपा.) डॉ. मा. मा. जाधव व इतर – कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद – प्र. आ. जून २००८ – पृ. १६६.

४) तत्रैव – पृ. १६६.


***

# छाया बेले यांच्या ‘घर याच्या हृदयी माझ्या’ कवितासंग्रहातील स्त्री जीवन

मेघा भास्करराव ढवळे
संशोधक विद्यार्थीनी, श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

प्रस्तावना

साठोत्तरी कालखंडामध्ये अनेक वांग्मयीन प्रवाह पहावयास मिळतात त्यामध्ये ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनसाहित्य दलित साहित्य हे प्रवाह अस्तित्वात आहेत यातील साठोत्तरी कालखंडामध्ये आंबेडकरी विचारातून उदयास आलेला दलित साहित्य हा वांग्मयीन प्रवाह खूप महत्त्वाचा प्रवाह आहे.

दलित साहित्य म्हणजे दलितांचे जीवन जाणिवा स्पष्ट करणारे, दलितांचे मन प्रकट करणारे साहित्य आहे दलित साहित्य हे दलित जाणीवेतून निर्माण झालेले साहित्य आहे “दलितांचे जीवन त्यांची सुखदुःखे याविषयी कोणत्याही लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.”

बाबुराव बागुल यांच्या मते – “मानवी मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान मानणारे वंश वर्ण व जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य आहे त्यास दलित साहित्य असे मत व्यक्त केले आहे.”

अशा या दलित साहित्याच्या उगमाचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली केलेल्या लक्षावधी  अनुयानसह धर्मांतरण हे दलित साहित्याची मुख्य प्रेरणा दिसते त्यानंतर आंबेडकरी विचाराचे अनेक लेखकांनी दलित साहित्य लेखन केले त्यामध्ये बाबुराव बागुल, दया पवार इत्यादी लेखकाने दलित साहित्य निर्माण केले आहे.

दलित साहित्यात दलित स्त्रियांनी आपल्या जीवनातील सुखदुःख, कोंडी, अत्याचार, अन्याय, रूढी, परंपरा इत्यादी आपल्या कविताच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये प्रज्ञा पवार, हिराबाई बनसोडे, रंजना गायकवाड, छाया बेले या कवयित्री दलित कविता घेऊन साठोत्तरी कालखंडात उदयास आल्या.

छाया बेले यांनी २०१८ मध्ये "घर याचे हृदयी माझ्या" हा कवितासंग्रह प्रकाशित केला. या कवितासंग्रहाचा केंद्रबिंदू दलित स्त्री जीवन हा आहे. दलित स्त्री वरील होणारे अन्याय अत्याचार समाज व पुरुषी सत्तेकडून होणारी अवहेलना याचा विचार त्यांनी आपल्या या कवितासंग्रहातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

छाया बेले यांची "कुठेही नाहीत नोंदीच्या फायली" या कवितेमध्ये पुरुषी वर्चस्वामुळे एका पत्नीने पतीने केलेल्या अन्याय, अत्याचार, दडपण या गोष्टी जन्मभर सहन केल्या या गोष्टीची कोणत्याही फायली मध्ये नोंद करायची गरज पडली नाही. ते जिवंत माझ्या मनात कोरून राहिल्या पण पती निराधार  झाल्यावर पत्नीच्या आश्रयाला आल्यावर ती सर्व काही विसरून आपले कर्तव्य समजून त्याची सेवा करते. हा स्त्रीचा निस्वार्थ भावया कवितेतून कवयित्रीने व्यक्त केला आहे. तसेच "वळकटी" या कवितेतून कवयित्रीने क्रूर रूप असलेल्या पतीच्या भीतीने स्त्रीच्या मनाची अवस्था व त्याने केलेल्या क्रुरतेची व्यथा व्यक्त केलेली आहे.

छाया बेले यांनी "घर याचे हृदय माझ्या" या कवितेमध्ये एका स्त्रीने असे सांगितले आहे की, दुःख माझ्याच नशिबी का येते, आगीसारखे पेटून माझे ह्रदय जळते, का? या दुःखाचे घर माझ्या हृदयात असल्यामुळे माझ्या वारंवार नशिबी दुःख राहते असे दुःख त्यांनी मांडलेले आहे. तसेच त्यांनी "मी तुला साथ देईन" या कवितेतून एखाद्या स्त्रीला जर पुरुषाने साथ दिली तर तिच्यामध्ये सर्व काही सामावून घेण्याचे व आकाश सुद्धा पेलण्याची ताकद असते असे स्त्री सामर्थ्य व्यक्त केले आहे. छाया बेले यांच्या "तू फक्त" या कवितेतून पतीने व समाजाने रूढी परंपरेच्या नावाखाली कशा प्रकारचे स्त्रीवर अन्याय अत्याचार होतात हे तिच्या सर्व वेदना चुडा, पैंजण, सौभाग्यच लेन यातून स्पष्ट केल्या आहेत. तसेच "संस्कृती" या कवितेतून संस्कृतीच्या नावाखाली स्त्रीवर समाज व पुरुषाकडून कसा अन्याय अत्याचार होतो हे पहावयास मिळते. "छळ येथे जगताना" या कवितेतून एक विवाहित स्त्री संसार करत असताना किती छळांना सामोरे जाते व ते छळ निमूटपणे कसे सहन करते याचे वर्णन केले आहे व "बेचीराख" या कवितेतून पत्नी ची वेगवेगळया पद्धतीने फसवणूक करणाऱ्या पुरुषाची फितूर वृत्ती पाहायला मिळते "भेद" या कवितेतून स्त्री-पुरुषातील भेदाचे वर्णन केले आहे.

छाया बेले यांच्या काही कविता अन्याय, अत्याचाराला विरोध करणाऱ्या स्त्रियांचे वर्णन करणाऱ्या आहेत त्यामध्ये 'स्वप्नातील आकाश' या कवितेतून एक स्त्री अन्याय, अत्याचाराला विरोध करणारे भन्नाट स्वप्ने पाहत असल्याचे दिसते आणि 'प्रेम केले' या कवितेतून एक स्त्री असे मत व्यक्त करते की, स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला पुरुष जेव्हा प्रेमाची उपमा देतो तेव्हा ती सुशिक्षित स्त्री असे व्यक्त करते की मी फक्त आता फक्त स्वतःवर प्रेम करणार तसेच "घे निरोप" आता या कवितेतून स्त्री पुरुषी वर्चस्वाला निरोप घेण्यास सांगते कारण आजची स्त्री या अन्याय अत्याचाराला लढा देणारी आहे असा उपदेश एका स्त्रीने केलेला आहे. "शोध घेतल्याशिवाय" या कवितेतून स्त्रिया दुःखाने भरलेल्या जीवनात आता स्वतःचा शोध घेतल्याशिवाय राहणार नाही असे स्पष्ट करते.

लेखिका छाया बेले यांच्या काही कविता या स्त्री अस्तित्वावर आधारित पहावयास मिळतात त्यातील 'बाईपण' या कवितेतून स्त्री जातीवर किती बंधने असतात हे स्पष्ट केले आहे. तसेच 'गृहदेवता' या कवितेतून ग्रहदेवता उपमा देऊन स्त्रीची कशी अवहेलना केली जाते हे स्पष्ट केले आहे. तसेच'घे निरोप' आता या कवितेतून स्त्री पुरुषी वर्चस्वाला निरोप घेण्यास सांगते, कारण आजची स्त्री या अन्याय अत्याचाराला लढा देणारी आहे. असा उपदेश एका स्त्रीने केलेला आहे 'शोध घेतल्याशिवाय' या कवितेतून स्त्रिया दुःखाने भरलेल्या जीवनात आता स्वतःचा शोध घेतल्याशिवाय राहणार नाही असे स्पष्ट करते.

तसेच 'मुलगी' या कवितेतून मुलीच्या जन्माचे महत्त्व स्पष्ट केले आहे. 'प्रवास' या कवितेतून स्त्रीच्या जन्म ते मृत्यूपर्यंच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. असे वेगवेगळया प्रकारचे स्त्रीजीवन छाया बेले यांनी आपल्या 'घर याच्या हृदयी माझ्या' या कवितासंग्रहातील कवितेतून समर्पकपणे विश्वाच्या निदर्शनास आणण्याचे मोलाचे कार्य केले आहे.

निष्कर्ष :

स्त्रियांच्या अशिक्षित व भाऊक वृत्तीमुळे समाजाने तिच्यावर किती अन्याय, अत्याचार केले आहे. मात्र आता ती स्त्री सुशिक्षित व स्वावलंबी झाल्यामुळे ते अन्यायाविरुद्ध कशी पेटून उठलेली आहे हे या कवितासंग्रहातून छाया बेले यांनी विश्वाला पटवून देण्याचे मोलाचे

कार्य केलेले आहे. अशा या 'घर याच्या हृदयी माझ्या' या कवितासंग्रहातून असे साठोत्तरी कालखंडातील स्त्री जीवन स्पष्ट केले आहे.

संदर्भसूची-


१) बेले छाया,'घर याच्या हृदयी माझ्या', प्रकाशन मुक्तरंग प्रकाशन, 118, यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल, मेन रोड, लातूर-413212, प्रथम आवृत्ती,०१जानेवारी 2018.

२) ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य, दत्ता भगत व इतर, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

३) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे,2007.

४) https://www.marathisampurn.com


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन


## श्रीमती. स्वाती शिवाजी चौधरी

संशोधक विद्यार्थिनी


**प्रस्तावना**

सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या विविध अशा प्रश्नांवर हरिभाऊंनी कथा लिहिल्या. त्यानंतर गिरीजाबाई केळकर, काशीबाई कानेटकर, कमलाबाई टिळक यांनी कथालेखन करताना पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये असलेले स्त्रियांचे स्थान मातृत्व यासारख्या संकल्पनांचा शोध घेतला. पुढील काळात विभावरी शिरूरकर यांनी स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडून स्त्रियांच्या अस्तित्वाचा शोध घेतला. साहित्य क्षेत्रात एक बंडखोर लेखिका म्हणून त्यांनी काम केले. अवतीभोवती असलेल्या स्त्रियांच्या समस्या, कुटुंब, स्वयंपाक घर बाळंतपण, संसार यामध्ये अडकलेली संसारी स्त्री बाहेरचे विश्व बघू लागली. खेळ ,गायन, चित्रकला, वाचन असे स्वतःचे आवडीचे वेगवेगळे छंद ती जोपासू लागली. म्हणूनच असंख्य कथा कादंबऱ्यांमधील  नायिका ही वाचक वर्गाला भुरळ पाडू लागली. कथा ही आकाराने लहान असते तर कथेचे स्वरूप हे अनुभव केंद्री असते. कथेमधून स्वतःचे अनुभव कल्पना भावना यातून स्त्रियांची कथा जन्म घेताना दिसते.

1) **गिरिजा कीर**

'गिरीजा घर,' गिरकी' १९७७ 'गिरीबन' १९७८, 'थोडी मौज थोडी मजा १९९० 'गिरीजा कथा' १९९१ हे गिरीजा किर यांनी लिहिलेले कथासंग्रह. त्यांनी लिहिलेल्या कथा म्हणजे वि.स. खांडेकरांशी नाते सांगणाऱ्या कथा आहेत. या कथांमध्ये स्त्रियांच्या आणि मध्यमवर्गीयांच्या व्यथांचे चित्रण आहे. त्यांच्या कथा पारंपरिक वळणाच्या असल्या तरी कुटुंबा रक्षणासाठी त्याग हा साचा नाही.

त्यांच्या कथालेखनावर वि. स. खांडेकर आणि साने गुरुजींचे संस्कार झाले आहेत. त्यांच्या कथा वाचकांना खेळून ठेवतात. तसेच गिरीजा कीर यांचा वास्तववादी चित्रणावर भर आहे. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून कामगार वस्ती, कुष्ठरोगी, आदिवासी यांच्या प्रश्नांची दखल घेऊन वास्तव लेखन केले आहे. त्यांनी तुरुंगातील कैद्यांसाठी दहा वर्ष त्यांनी काम केले. चांगलं ते स्मराव आणि वाईट ते मनावेगळे करावं अशा संस्कारांनी त्यांच्या कथा वळण घेताना दिसतात.

**2) कमल देसाई**

मराठी साहित्यातील एक प्रयोगशील लेखिका म्हणजे कमल देसाई आहेत. तसेच समाजवादी चळवळीच्या कार्यकर्ता व समाजसेविका म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. त्यांनी अस्तित्ववादी कथालेखन केलेले आहे. १९६० नंतर त्यांनी 'काळा सूर्य 'आणि 'हॅट घालणारी बाई' या कथांचे लेखन केले आहे. या कथांमधून स्रीत्वाचा खऱ्या अर्थाने शोध कमल देसाई यांनी घेतला आहे. निसर्ग स्रीशी न्यायाने वागला नाही ही त्यांची भूमिका असून या कथेत स्त्रियांनी बाईपणाविरुद्ध केलेले बंड आहे.

कमल देसाई यांच्या हॅट घालणारी बाई मधील नायिका प्रौढ, नोकरी करणाऱ्या, जीवन व्यवहारांच्या बाबतीत उदासीन आहेत. यामधील नायिका एक प्रकल्प उभारून जीवनाचा अर्थ शोधू पाहते. परंतु दोघींचाही शेवट आत्मनाशात होतो. त्यांच्या कथेतून असे दिसते की कमल देसाई निर्धाराची भूमिका घेत नाही. एक बंडखोर भूमिका त्या टाळतात परंतु त्यांच्या मुकेपणात गुढतेचे रहस्य आहे असे समीक्षकांना वाटते.

'श्राद्ध' ही १९९४ साली कमल देसाई यांनी लिहिलेली कथा. या कथेतून त्यांनी स्रीच्या जीवनाचा अर्थ नव्या मार्गाने शोधण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजेच त्यांच्या मते परंपरा नाकारणारी स्री

निसर्गतः एक शक्ती असे आहे असा विचार त्यांनी आपल्या 'श्राद्ध' या कथेतून मांडला आहे.

### 3) गौरी देशपांडे

कमल देसाई नंतरच्या मुख्य स्त्रीवादी लेखिका म्हणून गौरी देशपांडे यांचा उल्लेख करावा लागतो. एक प्रमुख कथा लेखिका म्हणून नाही त्या परिचित आहे . स्त्रीस्वातंत्र्याचा शोध त्या आपल्या कथांमधून घेताना दिसून येतात. म्हणजेच त्यांच्या कथा स्त्री केंद्रीआहे. 'आहे हे असं आहे' या कथांमधून स्वयंभू स्वाभिमानी स्त्री येते. स्वतःशी प्रामाणिक राहून ती जीवन जगते. अतिशय उत्कटपणे ती जीवन जगते. आधुनिक उद्योग प्रधान जीवनातून येणारी जी जीवनमूल्य आहेत त्यानुसार ती स्वतःला घडवते. तसेच वेगवेगळया क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करते. त्यांच्या कथेतील स्त्रीला वाटते की स्वतःच्या आयुष्याचा प्रत्येक निर्णय तिला स्वतः घेण्याचा अधिकार आहे. आधुनिक स्त्रीच्या जगण्याचे विविध अनुभव गौरी देशपांडे यांच्या कथेतून दिसून येतात. त्यांच्या 'एकेक पान गळावया' या कथेमध्ये एकाच घरामध्ये राहणारे पती-पत्नी आणि मुलं यांच्याकडे आई आणि वडील म्हणून फक्त नात्याच्या चौकटीत पाहू नये त्यांच्याकडे स्वतंत्र व्यक्ती म्हणून पहावे असा त्यांचा नवीन दृष्टिकोन आहे. 'दुस्तर हा घाट'या कथेमधून नमू नवऱ्याच्या बाहेरख्याली वागणुकीचा जाब विचारत नाही. तर स्वतःची जगण्याची रीतच ती बदलून टाकते याचे चित्र गौरी देशपांडे करताना दिसून येतात.

### ४) छाया दातार

स्त्रीवादी कथाकार म्हणून छाया दातार सर्वांना परिचित आहे. स्त्रीमुक्ती संघटनांमध्ये अतिशय क्रियाशील पणे काम करून पर्यावरणवादी भूमिकेतून त्यांनी स्त्रियांच्या मानसिकतेची मांडणी केली आहे. प्रेम म्हणजे काय? याचा आपल्या कथेत शोध घेताना स्त्री-पुरुषांच्या नात्यातील असमान पातळीमुळे येणारे संघर्ष त्यांनी चित्रित

केले आहे. ‘घरचा माणूस’ या कथेमधून त्यांनी स्वतःच्या व्यक्तीत्वाचा चेहरा गमावून बसलेल्या लक्ष्मीबाई नावाच्या मोलकरणीला तिच्या व्यक्तीत्वाचा शोध लागेपर्यंतचा प्रवास आलेला दिसून येतो. ‘एका श्वासाचा अंतर’ या कथेमधून अंबिका सरकार घटस्फोट पुनर्विवाह आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या वेगवेगळया पद्धतीने हाताळताना दिसतात. घरात राहू नये घरपण नसलेली एकमेकांपासून दुरावलेली माणसाच्या दातार यांच्या कथांमधून दिसतात.

**५) मेघना पेठे**

एकदम बिनधास्त आणि मोकळया शैलीत कथाकार म्हणून मेघना पेठे सर्वांना परिचित आहे. चांगल्या आणि वाईट गुणांचे पारदर्शक वर्णन हे मेघना पेठे यांच्या व्यक्तिचित्रणाचे वैशिष्ट्य आहे. ‘आंधळयाच्या गाई’ या कथासंग्रहात लग्न संस्था, कुटुंब संस्थेची चिकित्सा, पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्थेत भाऊ-बहीण यांच्यात केला जाणारा भेदभाव दिसून येतो. त्यांच्या कथांमधून पारंपरिक पद्धतीने लग्न ठरवितांना स्त्री मनाचा होणारा कोडंमारा व्यक्त होतो. मेघना पेठे येथे यांच्या कथेच्या नायिका कुटुंब आणि लग्न संस्थेची चिकित्सा करतात. पुरुषप्रधान व्यवस्था असलेल्या समाजातील ढोंग, कौर्य ,दुःख यांचे त्या चित्रण करतात. स्त्री- पुरुषातील नात्याचा शोध घेत असताना स्त्रीचा जवळचा मित्र होऊ शकणारा पुरुषसुध्दा मेघना पेठे रेखाटतात. त्यांच्या बऱ्याच कथा स्त्रीकेंद्रीअसूनही पुरुषांना दुय्यम स्थान न देता वस्तुस्थितीवर आधारित वेगवेगळया मनोवृत्तीचे स्त्री पुरुष त्या समर्थपणे रेखाटताना दिसून येतात.

**६) विजया राजाध्यक्ष**

मराठी भाषेतील स्त्रीवादी लेखिका व समीक्षक तसेच नवकथेने निर्माण केलेल्या नव्या वाङ्मयीन वातावरणात कथा लिहिणाऱ्या म्हणून विजया राजाध्यक्ष यांची ओळख आहे. सर्वसामान्य रसिक वर्गाला आस्वादाची प्रेरणा त्यांच्या कथेतून मिळते. ‘अधांतर, ‘टिंबे’ विदेही,

पारंब्या, कमान, 'हुंकार' 'अनामिक', 'समांतर' इत्यादी तेरा कथासंग्रहाचे त्यांनी लेखन केले. 'विदेही' या कथेत लेबर रूममध्ये बाळंत होणाऱ्या स्त्रीचा शारीर अनुभव व्यक्त होतो. तर गर्भधारणेपासून मुले मोठी होईपर्यंत आई वात्सल्याने मुलांना वाढवते. मुले मोठी झाल्यानंतर त्यांचे विचार त्यांच्या आवडीनवडी जपू लागतात. मोठी झाल्यावर मुले त्यांचे स्वतंत्र असे अनुभव विश्व साकारताना दिसून येतात. मुलांवर लहानपणापासून प्रेम करणाऱ्या आई पासून मुले कशी लांब आणि तुटत जातात याचे चित्रण या कथेतून आले आहे.

'जानकी देसाईचा प्रश्न,'या कथेमध्ये विवाह बंधने झुगारली तरी स्त्री पुरुष नात्याचा प्रश्न सुटत नाही. हा विचार विजया राजाध्यक्ष यांनी मांडला आहे. तसेच स्त्री शक्ती बद्दल स्वाभिमान सुद्धा त्यांच्या कथांमधून व्यक्त झालेला आपल्याला दिसून येतो.

**७) उर्मिला पवार**

दलित आणि स्त्रीवादी लेखिका म्हणून सर्वांना उर्मिला पवार परिचित आहेत. कष्टकरी,दलित स्त्रीचे चित्रण उर्मिला पवार यांच्या कथांमधून येते. 'सहाव बोट', 'चौथी भिंत 'हे उर्मिला पवार यांचे दोन कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथांमधून दलित स्त्रियांचे वर्ण व जाती व्यवस्थेने केलेले शोषण तसेच पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्थेने केलेले शोषण याचे वर्णन उर्मिला पवार यांच्या कथांमधून येते. उर्मिला पवार यांच्या कथांमधून स्त्रीप्रश्न आणि समूहजीवन यांचा आविष्कार झालेला दिसतो. 'गोष्ट शैशवाची' या कथेतून शाळकरी मुलीच्या नजरेतून ही कथा आकार घेते. या शाळकरी मुलीला तिचे वडील शिस्तप्रिय असल्यामुळे खवीस वाटतात. वडिलांच्या मृत्यूनंतर सुप, रोवळया विकणारी आई मरकुटे मास्तर यांच्या आठवणी मधून ही कथा साकार होताना आपल्याला दिसते. या कथेत दलित कष्टकरी कुटुंबातील आयेचे वर्णन येते. रस्त्यावर सुप रोवळया विणणारी शिक्षणाचे महत्त्व जाणणारी आये या कथेत आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर कष्टाने कुटुंब सावरणारी आहे

या कथेमध्ये दिसते या कथेतील मास्तर शाळकळी मुलीला व्हरंड्यातील शेण काढायला सांगायचे या मुलीने एक दिवस नकार दिल्यावर मास्तर तिच्या मुस्कटात मरतात मुलीच्या सुजलेल्या गालाबद्दल आई तिला विचारपूस करते व तिला कारण विचारते तेव्हा मुलगी आईला सांगते लगेच संध्याकाळी घरी परतणाऱ्या मास्तरला याबद्दल भर रस्त्यात आई विचारते 'पुन्हा माझ्या मुलीला बोट जरी लावलं तरी या रस्त्याने जाऊ देणार नाही' अशी धमकीआये गुरुजींना देते. तिथून अन्याया विरुद्ध आवाज उठवणाऱ्या दलित स्त्रीची प्रतिमा दिसून येते. वर्ण व्यवस्थेने व जातीव्यवस्थेने केलेले शोषण तसेच पितृ प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीचे झालेले शोषण चौथी भिंत या कथासंग्रहातून मांडताना दिसून येते.

**८) इंगोले प्रतिमा**

वैचारिक लेखन करणाऱ्या बाल साहित्यकार, कवयित्री म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांचे 'लेक भुईची' 'हिरवे स्वप्न' 'हजारी बेलपान' 'सुगरणीचा खोपा' 'जावयाचे पोर' इत्यादी कथासंग्रह आहेत. प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधून ग्रामीण स्त्री आणि पुरुषांचे वास्तव जीवन येते. ग्रामीण भागातील विविध समस्या तेथील जीवघेणा संघर्ष त्यांच्या कथांमधून आलेला दिसून येतो. 'जावयाच पोर' हा पहिला कथासंग्रह आहे. वऱ्हाडी बोली भाषेतून ग्रामीण जीवनातील स्त्रिया त्यांचा सुरुवात कष्ट नवऱ्याचा धाक इत्यादीचे चित्रण आलेले आहे हजारी बेल पाणी या कथेत चार पानाची त्रिगुणी म्हणजेच हजारी वेळ पण एक त्रिगुणी वाहिली की हजार तीर गुण्या देवाला वाहिल्याचे पुण्य मिळतं या लोक तिच्या आधारे वऱ्हाडातील व्यवहार रीती माती नातीगोती मानवी संबंध प्रतिमा इंगोले काढतात म्हणजे तीन तरुण मित्र निवेदकाच्या लग्नानंतर आलेली बायको हे चौथे पान या मित्रांमुळे महादेवाची होणारे पंचायत हा कथा विषय आहे मित्र प्रेम आणि बायको बद्दल वाटणारी ओढ अशा दिव्या मनस्थितीत सापडलेला

महादेव याचे वर्णन प्रतिमा इंगोले यांच्या कथेमधून आलेले आहेत म्हणजे एक ग्रामीण साहित्यिक म्हणून त्यांची ओळख आहे ग्रामीण जीवनाचा मानवी मनाचा ठाव त्यांनी आपल्या कथांमधून घेतला आहे.

**समारोप**

साठोत्तर काळातील स्त्रियांचे कथालेखन हे अनुभव केंद्री आहे. बहुतांशी स्त्रियांचे अनुभवी विश्व हे मनोविश्लेषक आहे. अस्तित्ववादी स्वरूपाच्या त्यांच्या कथा आहेत. साठोत्तरी स्त्रियांच्या या कथा कायमच घटना प्रधान असलेल्या दिसून येतात. मेघना पेठे यांच्या कथेतही प्रौढ कुमारिकांचे चित्रण येते. साठोत्तरी कथामधून अन्याय, अत्याचार, स्त्रियांचे जगणे, स्त्रियांना आधुनिकतेचा आलेला संदर्भ येतो.कुटुंब स्वयंपाक घर बाळंतपण अडकलेली संसारी स्त्री यांचे चित्र आलेले दिसून येते. स्त्रियांचा हा संघर्ष कधी नियती शी तर कधी समाजव्यवस्थेशी चाललेला आहे. महत्त्वाचे सामाजिक प्रश्न सुद्धा साठोत्तरी कथेतून पुढे आलेले दिसतात.

**संदर्भ ग्रंथ**


१) स्त्री साहित्याचा मागोवा खंड दोन- संपादन डॉ. मंदा खांडगे डॉ. लीला दीक्षित डॉ. अरुणा ढेरे डॉ. विनया खडपेकर

२) प्रदक्षिणा खंड दुसरा संपादन- अनिरुद्ध कुलकर्णी

३) मराठी वाङ्मयाचा इतिहास ,खंड सातवा भाग- पहिला, मराठी साहित्य परिषद पुणे

४) मराठी लेखिका चिंता आणि चिंतन- भालचंद्र फडके

५) गिरीजा घर, गिरकी –गिरिजा कीर

६) काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई –कमल देसाई

७) एकेक पान गळावया- गौरी देशपांडे

८) विदेही, अधांतर,कमान, हुंकार –विजया राजाध्यक्ष

९) चौथी भिंत –उर्मिला पवार


***

# काळानुरूप ओढवलेल्या परिस्थितीवर सक्षमपणे मात करणारी नायिकाप्रधान कादंबरी : ‘घार’

**प्रा. डॉ. कल्याण गोपनर**

मराठी विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

‘घार’ या नायिकाप्रदान प्रदान कादंबरीच्या लेखिका कल्पना मंजू शिंदे आहे. ही कादंबरी नागपूर येथील ऋचा प्रकाशनकडून १५ ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रकाशित झालेली आहे. पाहताक्षणीच वाचकांच्या मनात अनेक अर्थांचे व आशय विचारांचे कल्लोळ निर्माण व्हावेत इतके बोलके व आकर्षक मुखपृष्ठ संतुक गोळेगावकर यांचे लाभलेले आहे. तासनतास कादंबरीच्या मुखपृष्ठाकडे टक लावून पाहतच राहावे असे कुतुहलजन्य व देखणे आशयगन अर्थबोधपूर्ण मुखपृष्ठांची निर्मिती झालेली आहे. लेखिकेने कादंबरीला जे नाव दिलेले आहे. ते अर्थातच यथार्थ असेच आहे. कादंबरीच्या नामनिर्देश शीर्षकातच खूप काही असे दडलेले आहे. लेखिकेने कादंबरीत काय सांगितले आहे? काय सूचित केले आहे? हे प्रथमदर्शनी शीर्षक पाहाताच वाचकांच्या लक्षात येते. कल्पना शिंदे यांनी कादंबरीला दिलेले ‘घार’ हे नांव आतील आशयाची समर्पक असेच आहे. कल्पना शिंदे यांचे वाङ्मय विश्वात त्यातही कादंबरी वाङ्मयात ‘घार’ रूपाने दमदार पदार्पण झालेले आहे. ‘घार’ कादंबरी पाहताक्षणीच संत जनाबाईच्या ‘घार हिंडे आकाशी, झाप घाली पिल्लापाशी, माता गुंतली कामाशी| चित्त तिचे बाळापाशी’ या अभंगरुपी काव्यपंक्तीचे निश्चितपणे स्मरण करून देणारे आहे. त्यामुळेच कल्पना शिंदे यांच्या प्रस्तुत कादंबरीस एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

सध्याचे युग प्रचंड धकाधकीचे युग आहे. यात कोणासही शांत जगता येणार नाही. माणूस कामानिमित्त शरीराने बाहेर फिरतो आहे; परंतु तो मनाने मात्र घारीसारखाच जीवन जगत आहे. काळ मात्र प्रचंड गतिमान झालेला आहे. काहींच्या बाबतीत काळानुरूप परिस्थिती निर्माण होत आहे. ओढवलेल्या परिस्थितीमुळे रडत ओरडत बसण्यापेक्षा त्याच्याशी दोन हात करत करत ताठ मानेने उभे राहणे हाच एक उत्तम व सक्षम मार्ग आहे. अशीच संघर्षमय हृदयद्रावक जीवन गाथा कल्पना शिंदे यांच्या 'घार' कादंबरीतून वाचायला मिळते. प्रस्तुत कादंबरीत जवळपास तीन-चार पिढ्यांचा जीवन संघर्ष प्रवास जिवंतपणे लेखिकेने मांडलेला आहे. नागपूर महानगराच्या सभोवतालीच या कादंबरीचे कथानक बीज फुललेले आहे. म्हणून कादंबरीचे मुख्य केंद्रस्थानच नागपूर आहे. ही कादंबरी वड विहिरा दातेवाडी येथील एका गरीब सामान्य कुटुंबात जन्माला आलेली सुलभामाने या नायकेपासून प्रवास सुरू होऊन पुढे नागपूर आणि सातनवरी सातनवरी धामना, तसेच काही काळानंतर कोंढाणा प्रिया-श्रीधर यांचा विवाह असे चक्राकार गतीने कथानक पुढे पुढे जाताना दिसते. 'घार' कादंबरीत 'सुलभा' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. याच नायिके भोवती ही कादंबरी गुंजी घालताना दिसते. आपण स्त्रीला नेहमी दुय्यम स्थान देतो; परंतु या कादंबरीत पुरुषी मानसिकतेला या परंपरेला सुरुंग लावलेला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा वरचष्मा 'घार' कादंबरीच्या माध्यमातून लेखिकेने खोटा ठरवलेला आहे. पुरुषाशिवाय घरादारात शेत शिवारात काडी हालत नाही. हा विचार 'घार' कादंबरीत सुलभाने पूर्णपणे फोल ठरविलेला आहे. स्त्री असलं म्हणून काय झालं? आम्ही पण माणूसच आहोत येणाऱ्या प्रसंगाला फुंकत बसण्यापेक्षा आम्हालाही सक्षमपणे लढता येते आणि आदर्श संसाररुपी जगता येते. हे या कादंबरीतून सुलभाने समाजाला दाखवून दिलेले आहे.

आता आम्ही आबला नाही, तर आम्ही सबला आहोत. हेच कादंबरीतून विशद झालेले आहे.

सुलभाचा अगदी बालपणापासून सुरू झालेला कष्टप्रद व संघर्षमय प्रवास आजच्या महिलांना निश्चितपणे आदर्श व विचारप्रवर्त करणारा आहे. माणसाच्या आयुष्यात कधी केव्हा कशी परिस्थिती उद्भवू शकेल? हे कोणालाच सांगता येत नाही. आजचा काळ पूर्णपणे बदलत चाललेला आहे. 'सुलभा'प्रमाणे येणाऱ्या काळावर आजच्या प्रत्येक स्त्रीने सज्ज होणे आवश्यक आहे. तेव्हाच आजच्या स्त्रीला जगता येते. अन्यथा जगणे कठीण होऊन जाते. सुलभाच्या वडीलाचे नाव राजाराम शिर्के आहे. तर आईचे नाव हिरा शिर्के आहे, दोन बहिणी आहेत तर धर्मराज नावाचा एक मोठा भाऊ आहे. हा मध्यप्रदेशात कोलमाईन्स मध्ये नोकरीला आहे. धर्मराज पेक्षा सुलभाच कादंबरीत राजाराम चा मुलाधार आहे. ही मुलगी असुन सुद्धा मुलाप्रमाणे काम करताना दिसते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. याला राजारामही काही अपवाद नाही. राजाराम मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसावर जिरायती या कोरडवाहू शेती करणारा व्यक्ती आहे. अनिश्चित स्वरूपाच्या पावसामुळे सतत दुष्काळजन्य परिस्थितीला सामोरे जावे लागते. अशातही घरात मोठी असल्यामुळे शेतशिवारातही सुलभालाच मदत करावी लागते. सुलभा सारखीच एक मुलगी आई-वडिलांच्या पोटी जन्माला येते आणि माहेरी आणि सासरी आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकविते. 'सुलभा' दिसायला साधारण; परंतु गुणांनी मात्र गोजिरवाणी आहे. आजच्या बऱ्याच महिला दिसायला सुंदर; परंतु कर्तृत्वाने शून्य दिसून येतात. अशा महिलां व माणसाच्या जीवनाला काहीच अर्थ राहत नाही. दुष्काळदृश्य परिस्थितीत गाव ते नागपूर सातनवरी धामना येथे वडिलांबरोबर रोड रस्त्याची काम करते. कारण माझ्या बहिणी व आई वडील सुखाने व आनंदाने जगले पाहिजे. ही मनापासूनची इच्छा कादंबरीत दिसून येते. जे मला प्राप्त झाले नाही. ते

माझ्या बहिणीला शिक्षण रुपाने मिळाले पाहिजे. ही मनोमन इच्छा व्यक्त करणारी ‘सुलभा’ एकमेव स्त्री जगतात दिसून येते. यासारख्या स्त्रिया आज दुर्लभ होत चाललेले आहेत. सुलभाच्या विचाराला प्रगल्भलतेला आणि प्रत्यक्षकृती व कर्तृत्वाला नतमस्तक होणे हाच एक मार्ग आहे. स्वतः मुलगी असुन सुद्धा गडयासारखं राबराब राबायचं कष्ट करायचं कुटुंबाला जगवायचं ही विश्वात्मक भावना सुलभाच्या ठिकाणी पाहायला मिळते. ‘कुटुंबाच्या कल्याणा| संतांच्या विभुती’ हा विचार सुलभाच्या अंगी प्रकर्षाने जाणवतो. ‘घार’ कादंबरीतील सुलभाचे विचार तिचे जगणे आणि कुटुंबातील इतर सदस्यांना जगण्यासाठी रात्रंदिवस समर्पित होणे हा मनाचा मोठेपणाच समग्र मानवी जीवनात बोध देणार आहे. ‘सुलभा’ ही कादंबरीतील कणखर खंबीर अशी नायिका आहे. लेखिकेने ‘सुलभा’ या नायिकेला कपोलकल्पित रंगवलेले नसून, ती उपजत स्त्री आहे. ती समग्र कादंबरीत कुठेच हार मानताना, भयभीत व डगमगताना दिसत नाही, सुलभला सासरी वैधव्य प्राप्त झाल्यानंतरही आर्थिक स्थैर्याच्या प्राप्तीसाठी मिळेल ते काम, मोलमजुरी, मेस चालविणे आणि भांडी धुण्याचे काम वाचकांना आत्मचिंतन करायला लावणारे आहे. ‘सुलभा’ सारखी गुणी व संघर्षशील कन्यारत्न आजच्या प्रत्येक आई-वडिलांच्या पोटी जन्माला यायला पाहिजे. तेव्हाच घर कुटुंब व समाजात शांतीमय जीवन सुखकर होईल. ही आज काळाची नितांत गरज आहे. स्त्री आणि पुरुष संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके पुढे पुढे सुरळीत सातत्याने चालत राहिली, तर कुटुंबात कधीच अडचणी व कलहनिर्माण होणार नाहीत. तसेच पुरुषसंस्कृतीवर महिलांच्या ऐतखऊपणाचा भार पडणार नाही. ही मानसिक हतबलता बदलण्याची प्रेरणा ‘घार’ मधून वाचकाला प्राप्त होते. हेच लेखिकेच्या कादंबरी लेखनाचे सामर्थ्य आहे. शासनाचे घर मिळण्यापूर्वी सुलभा व वडील राजाराम दोघेच नागपुरात ठेकेदार गुत्तेदाराच्या हाताखाली काम करत होते. त्या

ठिकाणी व्यवस्थित काम व निवाऱ्याची सोय लागल्यानंतर राजाराम पत्नी हिरा व सुमी-सुनीस घेऊन येतो. पावसाळयात सुविधायुक्त मिळालेले कॉटर आणि तेथील भिंतीवरील विद्युत हे आकर्षणाचा विषय होऊन जातो. अशातच संजय गांधी निराधार योजनेखाली घर मिळते. तेव्हा मात्र सुलभा व वडील राजारामास आभाळ ठेंवणे होते. शासनाकडून प्राप्त झालेल्या घराणे सुलभा व वडील राजाराम यांना आयुष्यात आजपर्यंत केलेल्या कष्टाचे फलित झाले असे वाटते. असे वाटणे स्वाभाविक होते. नागपुरात राजाराम मात्र खुर्चीवर बसून चौकीदाराचे काम करत असे. अशा प्रकारचे वडीलास मिळालेले काम पाहून सुलभास आनंद वाटे. कारण राजारामचे वय बरेच झाले होते. सुलभा व  वडील राजाराम काही काळ सुलभाची आई हिरा एवढेच ठेकेदार गुत्तेदाराकडे कष्टाचे काम करतात. सुमी-सुनी या काम न करता शाळा शिकल्या पाहिजेत. ही मनोमन इच्छा सुलभाची कादंबरीत दिसून येते. माझे आयुष्य अडाणीपणा व कष्टात गेले; परंतु माझ्या बहिणी साक्षर झाल्या पाहिजेत. बहिणीच्या प्रगतीत स्वतःची उन्नती आनंद शोधणाऱ्या आगळयावेगळया सुलभाचे दर्शन घडते. पुढे चालून 'सुलभा' वयात आलेली होती. बरोबरीच्या मुलीचे लग्न होत होते राजारामच्या डोक्यात सुलभाच्या लग्नाचा विचार घुमत होता. त्यामुळे काही दिवसातच राजारामनी सुलभा व तिच्या आईचे काम बंद केले. शासनाने मिळालेल्या घरात चहा व किराणा दुकान व मेसला प्रारंभ केला. तिथेच देवरावची ओळख झालेली आहे. हा नागपूर परिसरातील कोंढाण्याचा आहे. तशी राजाराम व देवरावची दोन वर्षापासूनची ओळख होती. देवराव, राजारामला अडीअडचणी दवाखान्याच्या वेळी स्वतःहून मदत, सहकार्य करणारा मुलगा आहे. देवरावचे बोलणे, वागणे आणि सहकार्य वृत्ती राजारामच्या मनात घर करून बसलेली होती. अशातच राजारामचे सुलभासाठी स्थळ शोधणे सुरू होते. पाऊणे येत जात होते. काही पसंत, तर काही नापासंत करत होते. कारण सुलभा

दिसायला साधारण होती. त्याचवेळी देवराव चे लग्न झाले नाही हे राजारामला समजते. देवराव मुलींचा शोध घेत होता. याची शहानिशा राजाराम करतो. मात्र राजारामच्या मनात देवराव सुलभासाठी सुयोग्य मुलगा आहे. अशी खात्री होते. तो नागपुरातच सरकारी फॅक्टरीत नोकरीला होता. वयाने थोडा मोठा होता. परंतु स्वभाव व गुणांनी मात्र श्रेष्ठ होता हीच हुलकावणी राजारामच्या मनाला पुन्हा पुन्हा मोहित करत होती. राजारामचा मुलगा धर्मराजकडून देवराव समोर सुलभाच्या लग्नाचा प्रस्ताव ठेवला जातो तो लगेच होकार देतो आणि आई-वडिलांस मुलगी पाहण्यासाठी बोलावून घेतो. सुलभाला सर्व नात्यागोत्याकडून पसंती दिली जाते. काही दिवसांनी सुलभा देवरावचे लग्न होते. सुलभाच्या विवाह राजारामच्या मनाला आनंद देऊन जातो. सुलभा अगदी बालपणापासून ते लग्नपर्यंत जे कष्ट केले, त्याचे फलित म्हणजे गुणी देवराव सोबत लग्न होणे. 'सुलभा-देवराव' या उभयंताचा संसार अगदी आनंदात सुरू होता. नागपुरातच देवरावची नोकरी व सुलभाचे माहेरीही होते आणि दोघेही नागपुरातच चांगल्या वस्तीत राहत होते. हळूहळू दोघांच्या नव्या संसारात प्रेमाचा अधिकाधिक रंग भरत होता. सासर-माहेराकडून आता बाळाची अपेक्षा बोलून दाखवली जात होती. काही दिवसातच सुलभाला दिवस गेले होते. दोन्ही कुटुंबात आनंद ओसंडून वाहत होता. सुलभाचा लाड देवराव खूप करत होता. त्याच्या प्रेमातच सुलभा अखंड बुडालेली होती. शेजारी साने कुटुंब मदतीला होते. अधून मधून सुलभाचा सोबत संवाद होत होता. पुढे काही दिवसातच सुलभाच्या पोटी मूल जन्माला आले. मूल पाहून देवराव आनंदाने 'प्रिया' हा शब्द उच्चारतो. देवरावला मुलगा की मुलगी असा भेद अपेक्षित नव्हता. फक्त बाप झाल्याचा आनंद मात्र सर्वश्रेष्ठ होता. नोकरी करत करत देवराव मात्र प्रिया व सुलभावर अमाप प्रेम व जीव लावायचा. बऱ्याच वयोमानानंतर देवराला कन्या प्राप्ती झाली होती. सासर व माहेरच्या कुटुंबात चैतन्याचे वातावरण वाहत होते.

सुलभाच्या सासरी जवळपास वीस एकर जमीन होती. सुलभाचा दीर अर्थात देवराचा भाऊ विनायक रिकामटेकडाच होता. खूप सांगूणपण काहीच कामधंदा करत नव्हता. त्यांची काळजी देवराव करत होता. आपल्याप्रमाणे भाऊपण कामधंदयाला लागला पाहिजे. मोठा भाऊ म्हणून देवरावला जबाबदारी वाटत होती. इतरांना घरची, आई-वडीलांची जबाबदारी झटकून टाकता येते; परंतु आपण मोठे म्हणून आपल्याला घरापासून प्रश्नापासून दूर राहता येणार नाही. ही पुन्हा पुन्हा सुलभाला देवराव जाणीव करून देत होता. इतका सालस मुलगा देवराव होता. सुलभाला नशीबानेच चोवीस नंबरी सोन प्राप्त झाल होतं. याचा मनस्वी आनंद सुलभा व तिच्या वडीलास नेहमीच होता. तशी देवरावची सर्वत्र खुप चांगला व माणुसकीचा माणूस म्हणून प्रतिमा होती. एके दिवशी नौकरीला गेल्यानंतर रस्त्यातच देवरावचा अपघात होतो. त्यातच त्याचा प्राण जातो. ही बातमी देवरावच्या घरी पोहचते. तेंव्हा सुलभाच्या मनाला प्रचंड मोठा धक्का बसतो. सुलभा, देवरावला शोधत रस्त्याने सैरभिर फिरते. दोघांच्या घरचेही कोमातच गेले होते. सुलभा व प्रिया यांच्या आयुष्याचा खडतर प्रवास सुरू झाला होता. लग्नापर्यंत तर सुलभा कष्टातच जीवन जगत होती. आता कुठे तरी चांगले दिवस आले होते. त्यातच नियतीने पुन्हा सुलभाला उध्दवस्त केले होते. या दु:खमय आघातातच सुलभाचा दीर विनायक मयत भाऊ देवराची नौकरी व पश्चात मिळालेला पैसा व चुकीची माहिती व खोटे आश्वासन देवून आपल्या नावावर करून घेतो. शेतीचे पुढे काय झाले? याचा संदर्भ कांदबरीत पुढे कुठेच आलेला नाही. सुलभाच्या अडाणी व निरक्षपणाचा तसेच भोळया-भाबडया स्वभावाचा विनायक फायदा घेवून आपली मात्र पोळी छान भाजून घेतो. आपली भावजय सुलभा व पुतणी प्रियाचा थोडासुध्दा विचार करत नाही हे कसे जगतील? काय खातील याचा विचार थोडाही केलेला नाही. हे मात्र माणुसकी व नात्याला काळीमा फासणारा विचार आहे. आपलीच माणसे आपले

रक्षक होण्याऐवजी भक्षक कसे होतात? याचा विचार कादंबरीतून गडदपणे आलेला आहे. दु:खाच्या प्रसंगी असेही घडू शकते. याची शक्यता किंचितही नाकारता येत नाही. हेच कादंबरीतून अधोरेखित झालेले आहे.

'आयुष्याच्या पुन्हा पेटवा मशाली' या काव्यपंक्तीची प्रचिती 'सुलभा' व प्रियाच्या जीवनात सुरू झालेली आहे. सुलभा आता सासर सोडून माहेरी वडीलांकडे आलेली होती. फक्त वडील राजाराम सोडले, तर सुलभाला कोणाचाच आधार नव्हता. का नव्हाता? याची कारणे काय आहेत? याचा शोध वाचकांनी घ्यावा असे अपेक्षित असावे. असे वाटते. आई, दोन बहिणी सुलभाला या संकटसमयी थोडाही आधार का देत नाहीत? याची उकल शेवटपर्यंत कादंबरीत होत नाही. फक्त सुलभाचा भाऊ धर्मराजला देवराव बदल दु:ख सतत वाटत राहते. पुढे पुढे भावाचा ही काही संदर्भ येत नाही. धर्मराज कुठे आहे ? काय करतो याची माहिती मात्र कादंबरीत कुठेच येत नाही. सुलभा मात्र कोणाला दोष न देता आपले जगणे स्वयंपाक, धुणीभांडी करत करत पुढे घेवून जाते. अशाही परिस्थितीत सुलभा स्वत:च्या अंगावरील दागिणे सुमीच्या लग्नाला देते. मध्येच शेती सरकारी रस्त्यात गेल्यामुळे वडील राजारामला पैसे येतात. सुमीच्या लग्नात सुलभाच्या दागिण्याची आपण मोडतोड केली होती. ती आठवण देवून वडील तिचे पैसे देण्याचा प्रयत्न करतात. परंतु बहिणीचे सुमीच्या लग्नाला मिळालेले सहकार्य आई, सुमी विसरून जातात. सुमी आलेल्या पैशाची विभागणी करते. इथे मात्र विसंगी दिसून येते. अशातच सुलभाला तिच्या स्वभाव कार्यगुणामुळे बँकेत सफाईकामगार म्हणून तात्पुरत्या स्वरूपाची नौकरी मिळते. पुढे काही दिवसानंतर पूर्णवेळ नौकरीची शक्यता होती; परंतु सुलभाच्या जास्त वयाच्या दाखल्यामुळे पुर्ण होत नाही. तिच्या आयुष्यातील महत्वाची संधी वैरीण असणाऱ्या बहिण सुमीला आपल्या जागी बँकेत नौकरीला लावते. हाच मनाचा मोठेपणा कादंबरीत सुलभाच्या ठिकाणी

पाहायला मिळते. पुढे सुमीचे सुलभाशी कृतघ्न होणे नात्याला कलंक लावणारी गोष्ट आहे.

'घार' कादंबरी स्वत:च्या जीवनातील व नात्यातील संघर्ष मानवी जीवनात कसे निर्माण होतात. याचा विचार वाचकापर्यंत पोहचविणारी आहे. 'सख्या बहिणी पक्या वैरीणी' वास्तव जीवनात कशा निर्माण होतात? याचा संदेश देणारी ही कादंबरी आहे. सुलभाला वेगळ राहण्यासाठी मजबूर करणे आणि सर्व झोपी गेल्यानंतर चांगला स्वयंपाक करून खाणारी सुमी या कृत्याला आई हिराची साथ दिसून येते. हे अशा का वागतात? कांदबरीत शेवटपर्यंत कोडं उकलत नाही. सुलभा पुन्हा एकदा वडीलांच्या मदतीने एका शाळेत सेविका म्हणून नौकरीत रूजू होते. त्यानंतर नवीन घराची बांधणी होते. हेही आई, बहिणीला देखवत नाही. आता मात्र सुलभा व प्रियाचा प्रवास आनंदात सुरू होता. वडील राजाराम च्या निधनाने सुलभाचा आधार नाहीसा झालेला आहे. सुन्नी सुलभाची छोटी बहिण आई व सुम्मीच्या सोबत राहायची तिच्या लग्नाचा शोध सुरू होता. त्याचबरोबर 'प्रिया' ही मोठी झालेली होती. सुन्नीला पाहायला आलेले पाहुणे तिला पसंत न करता प्रियाला मागणी घालत होते. तसी सुन्नी प्रियापेक्षा दहा एक वर्षांनी मोठी होती. यावरून सुलभा, आई आणि सुमी सतत भांडणाच्या फैरी झडत होत्या. पुन्हा पुन्हा पाहुणे प्रियाच्या लग्नाला मागणी घालत होते. अशातच शेवटी प्रियाच्या लग्नाची संमती दिली जाते. पुढे प्रिया श्रीधरचे लग्न आई सुलभा धुमधडाक्यात लावून दिले जाते. या शुभकार्याला सुध्दा सुलभाची आई हिरा व बहीण सुमी येत नाहीत. कुठले सहकार्य मिळत नाही इतरांच्या मदतीने प्रियाचे लग्न होते. प्रिया श्रीधर गाडीत बसून सासरी जातात. सुलभाप्रमाणे प्रियाही तेवढीच समजुतदार आहे. म्हणतात ना परिस्थिती माणसाला प्रगलभ बनवते. सुलभाला वडील राजाराम प्रियाच्या लग्नाला हयात नाहीत ही खंत, दु:ख कादंबरीत लपवता येत नाही.

'घार' कादंबरी काही ऐकत ऐकत, तर काही प्रत्यक्ष जगण्यातून जन्माला आलेली आहे. रक्तातील नाते रक्तातील माणसाशी इतक्या वाईटपध्दतीने वागू शकतात. दुसऱ्या बाजुला कादंबरीत सुलभासारखी स्त्री कुटुंबातील लोकांसाठी प्रचंड मोठा त्याग करू शकते. परंतु तिच्याच साठीच नाते दीर, आई व बहिण सुमी मात्र बेईमान या कृतघ्न होताना दिसतात. हे चित्र मात्र भयानक व भयावह असेच वाचकांना वाटते. 'घार' कादंबदरीची रचना, संरचना आणि निर्मिती लेखिकेने कसदारपणे केलेली आहे. वाचकाला कादंबरी वाचताना पुढे काय घडणार या होणार आहे? याची उत्सकुता सतत निर्माण होते. प्रभावी व परिणामकारक अशी कादंबरी लेखनाची जादू लेखिकेला प्राप्त झाली आहे. जे पाहिलं व झालेली अनुभवलं तेच ओघवत्या रूपबंधात, तसेच लालित्यपूर्ण शब्दात मनात साचलेली बऱ्याच दिवसापासुनची खदखदरूपी कल्लोळ कादंबरीरूपाने व्यक्त झालेली आहे. 'घार' कादंबरीला वेगळेपण भाषेमुळे प्राप्त झाले आहे. कादंबरीतून आलेली मिश्रभाषाच वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते. नरखेड काटोलच्या परिसरातील बोलीच 'घार' कादंबरीला एका उंचीवर घेऊन जाते. 'मंग, म्या लेहंग्याचा काष्टा कमरेले खोचला आनं वासराले साऱ्या शिवाराला पाआले लागली' (पृ.०४) अशा वऱ्हाडी वैदर्भीय नरखेड बोलीमुळे कादंबरीला भाषिक सौंदर्य लाभले आहे. मध्ये मध्ये मराठी हिंदी संमिश्र भाषा धर्मदाराजच्या तोंडी लेखिकेने वदवलेली आहे. 'देखो देवराव!' मी सरळ आणि स्पष्ट बोलतो. देवराव, मै यहा और तीन चार दिवस आहे' (पृ ६७) अशा भाषेमुळे कादंबरीत बहुभाषिकता प्राप्त झालेली आहे. मुळातच लेखिका बहुआयामी व बहुभाषिक असल्यामुळे नावीण्यपूर्ण प्रयोग कादंबरीत यशस्वी झालेला आहे. काही ठिकाणी अधून मधून इंग्रजी शब्द या वाक्य कादंबरीत आलेले आहेत. 'Don't Worry, young Lady' (पृ,.१६६) तसेच I like your simple nature' (पृ.१०८) यामुळे कादंबरीच्या यशात अधिकच भर पडलेली

दिसून येते. बहुभाषिकता हेच त्या त्या कलाकृतीचे भाषिक वैभव असते. कोणत्याही कलाकृतीतून एकच एक भाषा, या बोली येत असेल तर ती कलाकृती वाचनीय होऊ शकत नाही. मात्र तसे 'घार' मधून दिसून येत नाही. म्हणुनच 'घार' कादंबरीतील भाषिक लेखनाचा प्रयोग हा इतर कादंबरीच्या तुलनेत अभिनव असाच आहे. कादंबरी म्हणून जे लेखन तंत्र आत्मसात असायला पाहिजे ते लेखिकेने जोखिमिने पेरलले आहे. लेखिकेने उत्तम असे शिवधनुष्य कादंबरीत अचूक अशा दिशेने वाङ्मयात पेरलेले आहे. त्याचा सुगंध 'घार' रूपाने साहित्यात मोलाची भर घालणारा आहे.

**संदर्भ** :

१) कल्पना मंजू शिंदे : 'घार' ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २०२१

***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्यविचार

**नादरगे चंद्रदीप बालाजी**

श्री. पांडूरंग विद्यालय, कल्लूर ता.उदगीर जि. लातूर

**प्रस्तावना :-**

साठोत्तरीत पूर्वार्धात भारतातील स्त्रिया चूल आणि मुल या बंधनात जखडून गेल्या होत्या.कौटुंबिक परिवारात स्त्रिया निराशाने दुःखी होऊन अश्रू ढाळीत होत्या. भारतातील अनेक स्त्रिया निरक्षर असल्यामुळे त्यांना कोणत्याही क्षेत्रात निश्चित स्थान दिले जात नव्हते. शिक्षण, आरोग्य, नोकरी या सर्वच क्षेत्रात त्यांना जाणून-बुजून मागे ठेवले जात होते.स्त्रियांना फक्त कुटुंबामध्ये नाही तर एकूण समाजातच दुय्यम स्थान होते.आपल्या सामाजिक जडणघडणीमध्ये स्त्रीची भूमिका ही एकाच टाकीच्या घाव पद्धतीने कोरलेली आढळते. स्त्री ही स्वतः दुःख सोसून कुटुंबातील सदस्यांच्या उन्नतीसाठी त्याग करणारी, इतरांसाठी स्वतःच्या गरजा बाजूला सारणारी आणि कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीच्या अडचणींना सामोरी जाणारी अशीच असावी ही अपेक्षा केली जाते. या सर्वांची सुरुवात तिच्या जन्मापासून झालेली आढळते.

स्वातंत्र्याच्या अगोदरपासून व नंतरही अनेकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी खूप प्रयत्न केल्याचे दिसून येतात. राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महादेव गोविंद रानडे, महर्षी डॉ. धोंडो केशव कर्वे या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणा यासारख्या शुभ कामाला प्राधान्य दिले. तरीसुद्धा स्त्रियांचे शिक्षण पाहिजे तेवढ्या प्रमाणात वाढलेले नव्हते असे दिसून येते. साठोत्तरीच्या मध्य काळात स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्यविचार मांडताना या काळातील सामाजिक रुढी-परंपरा/चाली रीती यांतून जी बंधनं स्त्रियांना काळजात

खोलवर बोचत / काचत होती त्यावरचत्यांचं लेखन झालेलं दिसूनआलं. मधल्या काळात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर शिक्षित झाल्या परंतु या काळात मोजक्याच स्त्रिया लिहायला लागल्या, तेव्हा त्यांची संख्या हळू-हळू वाढू लागली संवादातून विषयाची उकल होऊन एकाच विषयाच्या अनंत बाजूवर भाष्य रचना होऊ लागल्या आणि स्त्रियांच्या लिखाणाची शैली बदललीआणि त्यांच्या लिखाणातील खऱ्या अर्थाने मानवी मूल्य विचार प्रकट होऊ लागल्याचे दिसून आले.

घर, संसार, प्रेम, सुख-दुःख या गोष्टीसोबतच त्या समाजात आपलं काय स्थान आहे? या गहन विचारत रमून गेल्या आणि त्या पुढे उत्तरार्धत मानवी मूल्य विचारात खऱ्या अर्थाने व्यक्त झाल्या आणि साहित्यिक जगात आपल्या लेखनातून एक स्त्री म्हणून स्वतःच स्थान / अस्तित्व त्यांनी निर्माण केलं आणि त्या पुढे साहित्य संमेलनात त्यांचे मानवी मूल्य विचार प्रकट होऊ लागले तसेच अभ्यासक्रमातही कवयत्री म्हणून मानाचे स्थान ही त्यांना मिळू लागले.

**उद्दिष्टे:-**

साठोतररीच्या काळातील स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्य विचार या विषयावर शोधनिबंध सादर करत असताना खलील उद्दिष्टे दिसून आली.

१) स्त्रियांचे लेखनातील सामर्थ्य वाढलेले समजून घेणे.
२) स्त्री साक्षरतेचे वाढलेले प्रमाण समजून घेणे.
३) साठोत्तरी च्या पूर्वार्धात आणि उत्तरार्धाच्या काळात स्त्रियांचे योगदान समजून घेणे.
४) साठोत्तरीच्या काळात स्त्रियांनी संविधानातील तरतुदी समजून घेणे व महिलाविषयक कायद्यांची जागरूकता होणे.
५) स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्य विचारावर अभ्यास करून उपाय योजना सुचविणे.

**संशोधनपद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच शोधनिबंधाच्या संदर्भात तथ्य संकलनासाठी

मासिके, विविध संशोधनपर लेख, पुस्तके यासारख्या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**अभ्युपगम:-**

१) कालानुरूप महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे.
२) महिला साक्षरतेचे प्रमाण वाढल्यामुळे महिला लेखनातील सहभागात वाढ दिसत आहे.
३) विविध क्षेत्रातील विविध पदावर महिला कार्यरत दिसून येत आहेत.
४) दिवसेंदिवस महिलांचा लेखनात सहभाग वाढत आहे.
५) महिलांचा लेखनातील सहभागामुळे त्यांना अभ्यासक्रमात स्थान मिळत आहे.

**महिला सक्षमीकरण:-**

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांचे अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक सामर्थ्य वाढविणे होय. त्यांना त्यांच्या क्षमता संबंधी आत्मविश्वास विकसित करणे होय. आर्थिक दृष्ट्या त्या संपूर्ण होतील यासाठी मदत करणे. महिलांना आत्मनिर्भर बनविणे, महिला संघटना सशक्त करणे आणि स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे होय. या सर्व गोष्टी महिला टप्याटप्याने आत्मसात करत गेलेल्या आपणास दिसून येतात.

**लेखनातील महिलांचा सहभाग:-**

इतिहासातील पानात महिलांचा राजकीय सहभाग सक्रिय दिसून येतो ही बाब सर्वप्रथम महिलांनी जाणून घेतली. महिला राजकारणात नुसत्या सक्रिय नव्हत्या तर त्या राजकीय, सामाजिक आणि निर्णयप्रक्रियेमध्येत्यांचे खूप मोलाचे योगदान आहे ही बाब आपण सर्वांनी मान्य केली पाहिजे. साठोत्तरीच्या पूर्वार्ध काळात व स्वातंत्र्याच्या उत्तरार्ध काळात अनेक भारतीय स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटविला आहे.भारताच्या इतिहासात महिलांचा राजसत्तेत जसा सहभाग होता. तसा तो स्वातंत्र्याच्या लढाईतही त्यांचा सहभाग होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर अनेक

महिलांनी राजकारणातील अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. इतिहातील पानात जिजाऊंचे नाव आपण पाहतोच, झाशीची राणी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतील.

त्या काळातील सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रात खूप प्रयत्न करून मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यात ज्योतिबा फुलेंच्या मदतीने पहिली शाळा काढली. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. मुलींच्या शिक्षणासाठी खूप कष्ट सावित्रीबाई फुले यांनी घेतली. त्यांच्या शिक्षणात महिलांनी स्वतःच अस्तित्व शोधलं. चौकसपणा चा त्यांनी विचार केला. त्यांच्या शिक्षणामुळेच महिला आज प्रत्येक क्षेत्रात मुली आपणास पुढे दिसून येत आहेत. भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील महिला मुख्याध्यापिका सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांचं काम खूप मोठ आहे हे विसरता कामा नये. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रातही काम करणे गरजेचे आहे. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे. हे सावित्रीबाईंनी ओळखले त्यानंतर महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती ज्योतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला संस्कारी आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीर विक्री करणाऱ्या बाया बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे स्त्रिया खंबीर होऊन समाजामध्ये नांदू लागल्या. त्यांनी हुंडाबंदी, सती हत्या, बालविवाह अशा अनेक प्रश्न समस्यावर आवाज उठविला त्यामुळे आज प्रत्येक क्षेत्रात अनेक महिला आपणास पुढे दिसत आहेत. हीच एकता महिलांनी पुढील काळात जपली. साठोत्तरीच्या मध्यात त्यांनी या सर्व गोष्टीचा विचार केला आणि अभ्यास करून त्या लेखनातही प्रगल्भ बनल्या. साठोत्तरीच्या उत्तरार्धात चूल आणि मूल ही संकल्पना त्यांनी मोडीत काढली आणि त्या स्वतः समाजात वावरू लागल्या

ज्ञानाच्या कक्षा उंचावत त्या साहित्य लेखनातून पुढे सरसावू लागल्या. केवळ साहित्यच नव्हे तर सर्व क्षेत्रात स्वतःच अस्तित्व निर्माण करून आपले पाय खंबीरपणे रोवलेले हे आपणास महिला साहित्य लेखाणातून दिसून येतच आहे. महिला आत्मनिर्भर बनल्यामुळे त्या साहित्य संमेलनात भाग घेऊ लागल्या आणि त्या अनेक विषयात पारंगत झाल्या अनेक समस्या विषयी त्या आवाज उठवु लागल्या, स्त्री हक्कासाठी त्या लढू लागल्या साठोत्तरीच्या काळात आम्ही पण कुठे कमी नाही हे साहित्यातील महिलांनी आपल्या लिखाणातून दाखवून दिले आहे. स्त्री-पुरुष समान हक्क हा फक्त कायदा कागदावरच न ठेवता तो अमलात आणला आणि प्रत्यक्षात स्त्री-पुरुष समान ही संकल्पना त्यांनी सिद्ध करून दाखविले आणि खऱ्या अर्थाने या समाजात स्त्रीला पुरुषाबरोबर मान सन्मान मिळू लागला. महिला साहित्य संमेलनातून त्यांचे विचार व्यक्त केला. कथा, कविता, कादंबरी, नाटक, ललित लेख यातून त्या प्रकट झाल्या आणि त्यांनी अभ्यासक्रमातही कवियत्री, लेखिका म्हणून प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत.

गेल्या वीस वर्षात अनेक सुविधा, स्वच्छता, बचत गट, महिला सुरक्षितता, लिंगनिदान करून स्त्रीभ्रूणहत्या, व्यसनाधीनता, हुंडाबंधी, बालकामगार, अंधश्रद्धा, यासारख्या अनेक प्रश्नांवर लक्ष वेधले गेले. साहित्यातील महिलांनी कथा, कविता, कादंबऱ्यातून हेच विचार खंबीरपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शहरासोबतच गेल्या दहा वर्षात ग्रामीण भागातही महिला लिहित्या झालेल्या आपण पहात आहोत. साहित्यात त्यांचा वावर वाढल्यानंतर महिला आत्मविश्वासाने बोलताहेत. काहीतरी करून दाखवण्याची महिलांमध्ये जिद्द वाढली आहे. स्त्रियांनी नकारात्मकता न बाळगता त्या हिररीने साहित्य क्षेत्रात भाग घेत आहेत. महिला चळवळीने केवळ समाजकारण न करता राजकीय आरक्षणासाठी लढले पाहिजे. स्त्रियांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी समाजभान असलेल्या चांगल्या महिला दर्जेदार साहित्य लेखनातून आवाज उठवत आहेत. महिला साहित्य क्षेत्रात सक्रिय होत आहेत हे अत्यंत महत्त्वाचे असून त्यातून येणारा काळ नक्कीच बदललेला

असेल. शेवटी साहित्यातून चांगलं समाजकारण करता येतं. शिक्षणाच्या अनेक दर्जेदार सोयीमुळे भविष्यात खूप मोठ्या प्रमाणात महिला साहित्यिक दिसून येतील.

भारतीय संविधानामध्ये सर्व भारतीय स्त्रियांना समान अधिकार द्वेष व राज्याकडून होणाऱ्या भेदभावापासून संरक्षण समान संधी समान कामासाठी समान वेतन याची हमी दिली आहे तसेच स्त्रिया व मुले यासाठी विशेष कायदे करण्याचा अधिकार राज्य सरकारला देण्यात आला आहे स्त्री हक्क संबंधी अनेक कायदे झाले असले तरी गरीब कष्टकरी स्त्री वर्गाची प्रामुख्याने कौटुंबिक व आर्थिक उच्च मना अजूनही होताना दिसते आहे.आणि हे जसेच्या तसे चित्रण महिलांनी कथा कादंबऱ्यातून मांडलेले आहे.

**साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्य विचार:-**

ज्या काळात स्त्रीने शिकणे हा गुन्हा मानला जात होता त्या काळात मनोरमा बाईंनी शिक्षणाबरोबरच नोकरी आणि काव्य लेखन केले. मनोरमाबाईंच्या कवितेतून उत्कट पती प्रेम व्यक्त झाले आहे. त्या त्या काळानुसार पुन्हा साहित्य लेखनातील विषयात बदल झाला3ला आपणास दिसून येतो. त्याचबरोबर बहिणाबाई चौधरी म्हणजे खानदेशातील एका शेतकरी कुटुंबातील निरक्षर स्त्री जात्यावर दळता-दळता शेतावर काम करता- करता तिने आपल्या बोलीभाषेत संसाराची गाणी गायली. ती गाणी यमकबद्द आहेतच एवढेच काय पण तीच गाणी, कविता आज जगप्रसिद्ध आहेत. बहिणाबाईंच्या कविता म्हणजे त्यांच्या मनाने स्वतःशीच केलेला संवाद होय. मानवी जीवनातील विविध अंगी छटा त्यांनी आपल्या लेखनातून मांडले आहेत. त्याचबरोबर पक्षी प्राणी याविषयीही त्यांच्या वर्णन दिसते आहे. अनेक कार्यक्रमाच्या प्रसंगातून या महिला एकत्र येऊ लागल्या. त्याच्यात विचाराची देवाणघेवाण सुरू झाल्याने अनेक महिला एकमेकींच्या सहवासात येऊन दहित्य लेखनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. स्वातंत्र्याबरोबरच माणूसपणाचा हक्क स्त्रीला मिळालाच पाहिजे. कांही स्त्रियांनी आपल्या लेखनातून त्यांनी अवघ्या स्त्री जगताची व्यथा

मांडली आहे. माणसाचच्या वागण्या-बोलण्यातील विसंगती व सामाजिक वास्तव्य त्यांच्या कथा, कविता, लेख कादंबरीतून व्यक्त होतो. स्त्रीला माणूस म्हणून जेव्हा वागणूक मिळेल तेव्हा त्यातून खरे सुख निर्माण होईल. असे अनेक कवी, लेखकांनी आपल्या कथा, कादंबरी, कविता नाटकातून व्यक्त केले आहेत.

१९६० पूर्व काळात अनेक साहित्य लेखनामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त दिसते. मात्र शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुले झाल्यामुळे तसेच लोकशाहीचा पुरस्कार या प्रमुख दोन कारणामुळे अनेक समाज घटक जागृत झाले आणि आपल्या प्रश्नासाठी त्यांनी चळवळी सुरू केल्या. त्या चळवळींच्या अंतर्गत विचारांची देवाण –घेवाण सुरू करण्यात आली. ह्या उपेक्षित घटकांनी चळवळी बरोबर आपले प्रश्न आपल्या कथेतून, कवितेतून, नाटकातून, कादंबरीतून, विविध लेख साहित्यातून मांडले. साहित्य केवळ मनोरंजनाचे साधन न राहता हे सामाजिक प्रश्नांचे व्यासपीठ बनले पाहिजे. या भूमिकेतून या सर्व साहित्य घटकांनी जोमाने लेखन सुरू केले. अनेक सामाजिक स्थर आपल्या वेदना आणि आपले प्रश्न आपल्या साहित्यातून अनेक महिलांनी व्यक्त केले. स्त्रियांनीही या व्यथा वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेला दिसतात. साठ पूर्व साहित्याच्या तुलनेत काव्यसंग्रह मोठ्या प्रमाणात दिसून येतात. साठोत्तरी कालखंडात शिक्षण, नोकरी, पारंपारिक व्यवसायामुळे स्त्रियांच्या पारंपारिक मानसिकतेत अमुलाग्र बदल होऊ लागला आणि त्याचे पडसाद स्त्रियांच्या लेखनातून उमटू लागले. स्त्री जीवनाचे सर्व संदर्भ स्त्री जीवनातील वाढते व नवनवीन ताणतणाव यांचे चित्र साठोत्तरी मराठी महिलांच्या कथा कविता कादंबऱ्यातून पहायला मिळते मराठी साहित्याचे दालन समृद्ध करण्यात अनेक साहित्यिकांचा फार मोठा वाटा आहे.

१९६० नंतरचे बदललेले स्त्री जीवन हा साठोत्तरी काळातील एक महत्त्वाचा भाग आहे.केवळ स्त्री पुरुष संबंधापुरत्या मर्यादित नाही तर समाज, संस्कृती, मनुष्य जीवन व साहित्य अशा अनेक विषयाच्या संबंधातील व्यापक प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या आहेत. काही कथा

कविता मध्ये स्त्रीवादी विचाराविषयी जाणीव अत्यंत सखोल आहे. स्त्रीच्या वाटेला आलेले अपमानित करणारे दुय्यमत्व हा कविता कथा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. भारतीय संस्कृतीने स्त्रीला आदर्श ठरविण्यासाठी जी मूल्य सांगितली ती मूल्य नसून स्त्रीच्या स्वातंत्र्यावर घाव घालणारी हत्यारे आहेत. स्त्रीच्या स्वतंत्र विकासाला व विचाराला अडसर ठराव्यात म्हणून घातलेल्या बेड्या आहेत. अशा आशयाच्या कथा कविता आणि त्यातून ही मूल्य प्रकट होताना आपणास दिसत आहेत कथा कविता मधून चिंतनशीलता जाणवते. सौंदर्यवादी मनाचे अतिशय हळुवारपणे चित्रण करीत मनाचे अनेक सूक्ष्म पदर उलगडून दाखवलेले आहेत स्त्रीवादी विचारांच्या दिशा शोधण्याचा प्रयत्न काही कथा कविता मधून दिसतोय स्त्री शरीराच्या जाणीव खणखणीत स्पष्ट शब्दात व्यक्त करणाऱ्या काही कथा कविताही आपणास पाहायला मिळतात प्रचंड वेगाने फरफट चाललेले स्त्री-पुरुषाचे आयुष्य अनिष्ट प्रथा अस्तित्व टिकवण्यासाठी द्यावा लागणारा झगडा यांचे चित्र कथा कविता कादंबरी यातून मोठ्या ताकदीने व्यक्त झाले आहे अत्यंत हळवेपणा व तीव्र संवेदना हे गुण काही कथा कविता मधून आपणास दिसून येतात प्रेम व्यक्त करणारे गुण त्याचबरोबर उपेक्षित समाजकंटकाकडून येणारे अनुभव ही काही कथा कविता कादंबऱ्या मधून दिसून येतात एका अपेक्षित अनुभवाला मोठ्या ताकदीने उत्कटपणे मांडण्याचाही प्रयत्न महिला साहित्यिकांनी केलेला आहे.

समस्त स्त्री जीवनासंबंधी विषयी जातीयता, जुलूम, अन्याय, अत्याचार, लुटालुट, जाळपोळ, बलात्कार अशा अनेकांच्या विरुद्ध बंड उभारायला कथा कविताही या काळात पुढे डोकावून पाहत आहेत. काही कथा कविता मधून विफल प्रेमाचे भाविश्वही व्यक्त झाले आहे. विफल प्रेमाचे जीवघेणे दुःख काही कथा कवितेमधून आपणास दिसते आहे. काही कथा कविता कादंबऱ्यातून घरातील स्त्री-पुरुष संबंध दर्शविण्यात आले आहे. स्मृती जीवनाचे संवेदन देशव देशाविषयीचे भान, १९६० नंतरच्या स्त्री जीवनाचे बदलते स्वरूप स्त्री, जीवनाचे विविध अंगी जीवन अनुभव, प्रामुख्याने प्रेमानुभव, विवाह संस्थेतून

येणाऱ्या अनुभव, कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभव, उपेक्षित समाजकंटकाकडून येणारे अनुभव, स्त्रीवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत कथा, कविता, कादंबऱ्या यातून स्त्री जीवन अविस्कृत झालेले दिसते आहे. कथा, कविता, बालसाहित्य, कादंबरी, आत्मचरित्र, ललीतलेखन लिहणाऱ्या अनेक स्त्रिया या साठोत्तरीच्या काळात लिहत्या झालेल्या आहेत आणि मराठी साहित्यातील महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे त्यात कुमारी आंबा, बहिणाबाई चौधरी, नेमादे माधवी, विजय तेंडुलकर, अनुपमा राजेंद्रन, अरुणा देशपांडे, एन. स. फडके, विमलादेवी, गौरी देशपांडे, अनुराधा गोखले, इ. अशा अनेक साहित्यिक महिलांनी दर्जेदार साहित्य निर्माण केले आणि त्यांच्या लेखनातून खऱ्या अर्थाने कथा, कविता, कादंबरी, नाटक, लेख यात मानवी मूल्यविचार प्रकट होताना दिसून येतात.

**निष्कर्ष:-**

साठोत्तरी काळातील स्त्रियांच्या लेखनातील मानवी मूल्यविचार या संकल्पनेचा थोडक्यात आढावा घेतला असता आपणास खालील निष्कर्ष काढता येतील .

१) विविध कालखंडानुसार महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असून स्त्री-पुरुषांमधील विषमता कमी होत असल्याचे दिसून येते.

२) महिला साक्षरतेचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

३) विविध क्षेत्रातील नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे.

४) स्त्रिया स्वतंत्रपणे लेखन करताना दिसून येत आहेत.

५) लेखनातही महिलांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

**उपाय:-**

१) महिलांमध्ये साहित्यासम्मेलनाविषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

२) महिलांचे उच्च शिक्षणातील, लेखनातील प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

३) स्त्री-पुरुष समानता त्यांचे अधिकार व हक्क याविषयी जागरूकता पसरविणे आवश्यक.

४) महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनले पाहिजे व अनेक महिला लिहत्या झाल्या पाहिजेत.

५) स्त्रियांनी महिलांविषयक कायदे जाणून घेतले पाहिजेत.

**संदर्भग्रंथ:-**


१) मी वनवासी- सिंधुताई सकपाळ

२) डॉ. गोट गव्हाणे शुभांगी: महिला सबलीकरण स्वरूप व समस्या – वरद पब्लिकेशन औरंगाबाद.

३) भीमराव रामजी आंबेडकर : क्रांती आणि प्रतिक्रांती

४) ताराबाई शिंदे: स्त्री पुरुष तुलना

५) डॉ. ओ.पी.वर्मा भारतीय सामाजिक समस्या.


***

# मथु सावंत यांचे ग्रामीण स्त्रीवादी साहित्यलेखन व वर्तमान

डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे
विभाग प्रमुख मराठी, कै सौ शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड. जिल्हा: परभणी-४३१५१४

१९६० नंतर ग्रामीण स्वीवादी, स्वीसंवादी, दलित, संज्ञाप्रवाही, मनोविश्लेषणात्मक, प्रादेशिक, महानगरीय इ. साहित्य प्रवाह उदयास आले. त्यातील स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा अभ्यास महत्त्वपूर्ण विचार करायला लावतो. जागतिक स्तरावर स्त्रिया साहित्यलेखन करू लागल्या त्यातून आपले मन, भावना, मानसिक आंदोलने, इच्छा, आकांक्षा व्यक्त करू लागल्या. त्यातच १९७५ ते ८५ हे दशक युनोने 'स्त्री दशक' म्हणून जाहिर केले आणि स्त्रियांना समाजाकडे व पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली. ती स्वतःचा स्वतःच्या आयुष्याचा व स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊ लागली. त्यामुळे प्रस्थापित समाजव्यवस्थेस आव्हान देऊ पाहणारी, स्वतंत्रपण जगणारी, स्वतःच्या पायावर उभी असलेली स्त्री नव्वदोत्तरी साहित्यातून दिसते.

१९८० नंतर मराठवाड्यात अनेक लेखकांचा उदय झाला. अअनुभवाशी प्रामाणिक राहून जीवनाला साहित्यातून साक्षात करणारी एक सृजनशील पिढीच ग्रामीण भागातून पुढे आली. कृषिसापेक्ष जीवन य संस्कृती पचवून जीवनाचा शोध घेत अनेक साहित्यिकांनी अक्षर साहित्याची निर्मिती केली. कविता, कथा, कादंबरी लघुनिबंध, नाटकातून ग्रामीण जीवन वृत्तीप्रवृत्तीसह प्रकट होऊ लागले. ग्रामीण जीवनाला कवेत घेऊन स्त्रियांच्या आयुष्याला मुखरित करणे फार कभी लेखक व लेखिकांना जमले त्यातीलच एक बिनीच्या ग्रामीण लेखिका म्हणून मयु सावंत यांचा परिचय संपूर्ण महाराष्ट्राला आहे.

पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या वरवंट्याखाली ग्रामीण भागातील स्वी कशी दबलेली आहे, याचे जिवंत चित्रण मधु सावंत यांनी केले आहे. विविध वैशिष्ट्यांनी नटलेल्या सावंत यांच्या लेखनाला मोठ्या संख्येने

वांचकवर्ग लाभला. विशेष म्हणजे तो सामान्य व असामान्यही आहे. मराठी ग्रामीण साहित्य प्रवाहात आपल्या अभिजात लेखणाचे योगदान देणाऱ्या ग्रामीण लेखिकांमध्ये मधु सावंत यांचे नांव अग्रभागी आहे. मधु सावंत यांनी समकालीन लेखकांपेक्षा वैविध्यपूर्ण आशय व अभिव्यक्तीने ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक, बालनाटिका, चरित्र, समीक्षा लेखन आदि वाङ्मय प्रकाराला समृध्द करून मराठी साहित्यावर अमिट ठसा उमटविला आहे.

एका सामान्य शेतकरी कुटूंबात जन्म घेऊन अपार कष्ट व जिद्दीच्या बळावर यशस्वी शिक्षिका, समाजकारणी, राजकारणी कार्यकर्ती, ते पुन्हा प्राध्यापक अशा विविध भूमिका सावंत यांनी लीलया पार पाडून आपले एक मोठे वर्तुळ तयार केले, ही त्यांच्या सेवावृत्त व सुशील स्वभावाची फलश्रुतीच आहे.

प्रत्येक लेखक एक असामान्य कलावंत दडलेला असतो. कलावंताचे जगणे कलासक्त असले, तरी विविध खाच-खळग्यानी भरलेले असते. सावंत यांचे आयुष्य विविध अनुभवांनी समृध्द झाले असून त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या कलाकृतीमधून उमटलेले आहे. प्रस्तुत लेखामध्ये वैयक्तिक चरित्राचा मागोवा घेत त्यांचे चरित्र त्यांचा साहित्यातील असलेला अनुबंध शोधून काढणे, हे मुख्य प्रयोजन आहे.

बंडखोरीचा वारसा वंशपरंपरेनेच त्यांना मिळाला, त्याचा त्यांनी आपल्या जीवनात एक व्यवछेदक लक्षण म्हणून उपयोग केला. शालेय शिक्षण, महाविद्यालयीन व डी. एड. कॉलेजमधील अध्ययन, प्रेमविवाह, वडिलांचा मृत्यू, वाढत्या वयानुसार बदलत जाणाऱ्या रक्ताच्या व जिवाच्या नात्यांचे संदर्भ, राजकारणातील प्रवेश, नोकरी, समाजसेवा, एका लेखिकेचा प्रवास म्हणून या विविध भूमिकांतून सावंत यांनी आपल्या लेखनाला व व्यक्तिमत्त्वाला वैशिष्टयपूर्ण असा आकार दिला. जीवनातील विविधरंगी, विविध भावानुभवाला मधु सावंत यांनी आपल्या कलाकृतींमधून कलात्मकपणे सरूप केले आहे .

सावंत यांचा डायरी व कविता लेखनापासून सुरू झालेला लेखन प्रयास आजही थांलेला नाही. ग्रामीण स्त्रीच्या मूक वेदनेला आपल्या शब्दाने मुखर करण्याचे कार्य त्यानी कथात्म साहित्याच्या माध्यमातून केले आहे. चार कथासंग्रह (एक बालकथासंग्रह) दोन कादंबरी तीन

चरित्रे दोन नाटक, दोन समीक्षा त्यांच्या नावावर आहेत. गुणवत्तेच्या दृष्टीने त्यांचे लेखन महत्वाचे आहे.

विविध साहित्य समेलनात महत्वपूर्ण सहभाग, भाषणे, राजकीय व सामाजिक संस्थेत भूषविलेली विविध पदे, स्त्री वी उत्थानासाठी व सकस वाण्गमयीन कार्यासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविले आहे. पुरस्कारांमुळे त्यांना आनंद झाला; पण नवनिर्मितीचा आनंदच त्यांना श्रेष्ठदर्जाचा वाटतो. त्यामुळे त्यांनी नवनिर्मितीचा आनंद घेतला आहे.

१९९० नंतर देश पातळीवरील राजकारणात विविध क्रांतिकारी घटना घडामोडी घडत होत्या. मुक्त अर्थव्यवस्था, गॅट करार, मंडल आयोग, बाबरी मशिद प्रकरण, मुंबई बॉम्बस्फोट या ठळक घडामोडींनी समाजाच्या सर्व स्तरातील माणूस ढवळून निघाला होता. १९९२ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण आलं. या घटनेने लेखिकेचं आयुष्यच बदलून गेले. मूळची समाजकार्यायाची व रक्तातील बंडखोर वृत्तीने नवी राजकीय आकांक्षा जागृत झाली. अन् 'गोरठा' सर्कलमधून जिल्हा परिषद, नांदेड मध्ये अपक्ष जि.प.सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. राजकारणातील विविध अनुभव, बाबूशाही, भ्रष्टाचार, गुंडगिरी, कार्यकर्त्याची अगतिकता, सामान्यांचे व स्त्रियांचे दुष्यम स्थान आदी बाबी सावंत यांना जवळून पाहता व अनुभवता आल्या. विविध शासकीय, निमशासकीय, सहकारी व साहित्य संस्थांमध्ये काम करून आपले सामाजिक ऋण फेडण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

'प्रा. भास्कर चंदनशिव याच्या साहित्याचा विवेचक अभ्यास या विषयावर विद्यावाचस्पती ही पदवी प्राप्त करून आपली ज्ञानाची भूक भागवत अध्ययन व संशोधनातील सर्वोच्च स्थान प्राप्त केले

समाजसेविका, राजकारणी कार्यकर्ती, आदर्शगृहिणी, चिकित्सक अभ्यासक, कला, आदर्श पत्नी अशा विविध अष्टपैलू भूमिका यशस्वीपणे पार पाडणाचा वर्तमान पतील पहिल्या मराठी ग्रामीण कादंबरीकार तथा मराठी साहित्यक्षेत्रातील आघाडीच्या लेखिका म्हणून त्यांच्या विविध साहित्यकृतींचा अनेक दृष्टिकोणातून चिकित्सक अम्बास प्रस्तुत प्रबंधात करण्यात येणार असून लेखिकेच्या जीवनचरित्राचा, तिच्या लेखनावर झालेला परिणाम शोधणे, लेखनाच्या प्रवृत्ती व प्रेरणांचा अभ्यास करणे, लेखिकेयनील प्रभावांचा विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार असून मधु सावंत यांचे लौकिक जीवन आपणांस उपरोक्त काही ठळक घडामोडीच्या माध्यमातून अभ्यासता येईल. प्रस्तुत लेखिकेवरील हे पहिलेच संशोधन आहे. लेखिकेच्या चरित्रात्मक जीवनाचा सूक्ष्मपणे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कथा, कादंबरी, बालनाट्य, चरित्रे, समीक्षा इत्यादी वाङ्मय प्रकारात वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचे लेखन करणाऱ्या व्यासंगी लेखिका

म्हणून मधु सावंत मराठी वाचकांस सुपरिचित आहेत. त्यांचे लेखन सामान्य वाचकांबरोबर अभ्यासू समीक्षकांच्या पसंतीला उतरले आहे. आज मराठवाडयात व मराठवाड्याबाहेर मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रांतात ग्रामीण स्वी जीवनावर व राजकारणावर भाष्य करणाया कसदार लेखिका आहेत. त्यात सावंत यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल इतके त्यांचे वाङ्मयीन कार्य महत्त्वपूर्ण आहे. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे, १९९० च्या दशकात मथु सावंत यांच्या कथा-कादंबरी लेखांनानी आपली स्वतंत्र ओळख हळूहळू पण ठळकपणे निर्माण केली आहे. एक समाजाभिमुख सर्जनशील मानुषी चैतन्यस्त्रोत, असेच या लेखिकेचे वर्णन करावे लागेल. मधु सावंत यांच्या वाङ्मयीन सामर्थ्याला रा. ग. जाधव यांनी मान्यता दिली आहे.

१७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा हैदराबादच्या निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. अनेक क्षेत्रात त्यामुळे स्थित्यंतरे होऊ लागली; पण प्रामुख्याने मराठवाडयातील सरंजामी मनोवृत्तीमध्ये म्हणावा तसा बदल झाला नाही. याचे चित्रण १९६० नंतर ग्रामीण साहित्यात योगदान देणाऱ्या रा.र .बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंडेकर, शेषेराव मोहिते या लेखकांनी चित्रण केले परंतु स्त्री जीवनाचे चित्रण करताना उदारमतवादी दृष्टी या पिढीतील लेखकांनी ठेवली होती.

१९९० नंतर खऱ्याअर्थाने ग्रामीण भागात मोठे मन्वंतर सुरू झाले आधीच खिळखिळा झालेला गावगाडा पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर आला. खेडयातील माणसे आपली पोटाची खळगी भरण्यासाठी शहराकडे धावू लागली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मूल्यहीन राजकारणाचा प्रभाव वाढू लागला. सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता असे नवे राजकीय समीकरण तयार झाले. त्यामुळे विकासासाठी राजकारण, माणसांच्या उद्धारासाठी राजकारण ही संकल्पनाच मोडीत निघाली.

१९९० नंतर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे वादळ गाव गावाच्या शिवेवर रोरावत होतं. अशा परिस्थितित खेडयातील शेतीवर उपजिविका असणारा माणूस पूर्णपणे पिचला होता. अशा परिस्थितित स्त्रियांची अवस्था काय झाली असेल ? त्यांचे भौतिक व मानसिक विश्व अनुभवाच्या पातळीवर पचवून मधु सावंत यांनी कथात्म लेखन केले, त्यामुळेच त्यांचे लेखन वास्तयाभिमुख झाले आहे.

ग्रामीण भागातील स्वी व त्यातल्या त्यात मराठवाड्यासारख्या सरंजामी मनोवृत्ती प्रबळ असलेल्या प्रदेशात स्त्री ही मोठया प्रमाणात

दबलेली होती. आर्थिक परावलंबन, संसारासाठी खाव्या लागणाऱ्या खस्ता, नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून शेतीत राबणारी, पण पूर्णपणे संसाराच्या धबडग्यात अस्तित्व गमावलेल्या स्त्रीची जाणीव सावंत यांना आहे. हे त्यांच्या साहित्यावरून आपल्या लक्षात येते.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही शासनाच्या सार्वत्रिक प्रक्रियेतून ग्रामीण राजकीय नेतृत्व उदयाला येवून विकसित होत गेले. हे खरे असले तरी या नेतृत्वाच्या मानसिकतेचा विकास झाला नाही. राजकारण हे समाजपरिवर्तनाचे असणारे माध्यम पुढे उपजिविकेचे साधन बनले. कृषी, सहकार, शिक्षण, समाजकल्याण, जलसिंचन आदि माध्यमांतून समाज विकास करता येतो. ही दृष्टी बाजूला पडून शिक्षणसम्राट, साखर सम्राट, बिल्डर व भेसळ माफियांनी राजकारणाचा ताबा घेतला .

स्त्रियांच्या जीवनात नवे परिवर्तन घडवून आणणारी एक महत्वपूर्ण १९९२ संस्थेत महिलांना ३३% आरक्षण लागू झाल्यामुळे स्त्रियांचा राजकारणात प्रवेश झाला. परंतु अनेक वर्षाच्या सत्तांध पुरुषी मानसिकतेशी टक्कर देत अनेक स्त्रिया कोलमडून पडल्या. परिवर्तनाची व सुखाची स्वप्ने क्षणिक ठरली. स्त्री पदाधिकारी ही रबरी शिक्का ठरून त्यांच्या आडून तिचा  जवळचा नातलग असणारा पुरुषच धोरण ठरवून सत्तेची अंमलबजावणी करू लागला. काही “ठिकाणी मात्र शिक्षणाने जागृत महिला पदाधिकायांनी एक वेगळी समाजसापेक्ष भूमिका घेऊन राजकारण केले. त्यात त्या घरच्यांच्या मानसिक पाठींब्यावर यशस्वीही ठरल्या.

मूलतः हळव्या भावूक असणाया स्त्रियांना राजकारणातील बेरकीपणा, दगलबाजी, खोटी आश्वासने, बाबुगिरीचा प्रभाव, गुंडगिरी, जातीयता, भ्रष्टाचार पचवणे किती कठिण गेले असेल याची कल्पना न केलेलीच बरी; परंतु अशा या राजकारणातील स्त्री म्हणावे तसे चित्रण काही अपवाद वगळता आले नव्हते. मराठवाडयाच्या पटावर मथू सावंत यांनी आपल्या कादंबरी व कथा लेखनाने या स्थितीला वाचा फोडून शब्दबध्द केले, हे त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

आजपर्यंत मराठी कथेत व कादंबरीत स्त्रीवादी लेखिकांनी पुरुषी अहंकारात कमावत्या व नोकरी करणाया आधुनिक जीवनाचा परिचय झालेल्या स्त्रीचा संघर्ष रेखाटला, परंतु कौर्याची परिसीमा असणाऱ्या राजकारणात स्त्रीचा होत असलेला कोंडमारा जसा रा. रं. बोराडे यांनी आमदार सौभाग्यवती या कादंबरीत चित्रित केला तसा सावंत यांनी स्वानुभावावर आधारित लेखन कृतीतून स्त्रीजीवन  सरुप केले.

राजकारणात राहून विविध समित्यांवर कार्य करताना मधु सावंत यांनी आपल्यातील लेखिका जाणीवपूर्वक आणि काळजीपूर्वक जोपासली आहे. म्हणूनच त्यांनी विविध वाङ्मयीन प्रकारात गांभीर्यपूर्वक सकस लेखन केले आहे, ते त्यांच्या स्वभावातील मूळ संवेदनशील वृत्तीमुळेच.

मधु सावंत यांनी ग्रामीण भागातील विविध प्रश्नांना भिडणाऱ्या व पायाला मुखरीत करणाऱ्या अनेक कथा लिहिल्या पाण्यातील पाणी तिची वाटचणाचा ताबा घेतला. देणाऱ्या रा.रं.बोराडे, नागनाथ कोतापल्ले, वासुदेव मुलाटे, भास्कर "

अशा प्रकारे राजकारण, समाजकारण आणि संसार सांभाळून सावंत यांनी ललित लेखन आणि समीक्षालेखन या दोन्ही आघाडया यशस्वीपणे सांभाळून मराठी साहित्यात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. एकूणच स्त्रियांच्या नाजुक भावविश्वाचा तरलतेने शोध लेखिकेने आपल्या कथात्म साहित्यातून घेतला आहे.

**संधर्भ** :


१) गोडबोले न. वा., जोगळेकर गं. ना. साहित्य समीक्षा स्वारूप आणि विकास.

२) कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ.

३) यादव अनंद, ग्रामीण साहित्य : स्वारूप आणि समस्या.

४) जाधव रा, ग. अश्वत्थाची सळसळ.

५) माथु सावंत, जिनगानी (कादंबरी)

६) www. Mathu sawant wiki pedia .com


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन

**डॉ. राजाराम तुकाराम सोनटक्के**
बी. डी. हंबर्डे महविद्यालय, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड.

**प्रस्तावना**

साठोत्तरी कालखंडामध्ये अस्तित्ववादी, प्रादेशिक, चरित्रात्मक, ऐतिहासिक असे कादंबरीचे विविध प्रवाह निर्माण झाले. नवनवीन मार्ग स्वीकारून मराठी कादंबरी पुढे जाऊ लागली. स्त्रियांनी बहुतेक करून कौटुंबिक, ऐतिहासिक, सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. साठोत्तरी कालखंडात स्त्रियांनी कादंबरीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केलेले दिसून येते. कादंबरी लेखनात व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. साठोत्तरी ऐतिहासिक कादंबरी भूतकाळातून प्रेरणा घेऊन निर्माण झालेली दिसून येते. कुठलीही ऐतिहासिक कादंबरी असू द्या कादंबरीतून इतिहासाचे वास्तव जिवंत चित्र साकार करण्याच्या क्षमतेवर लेखकाचा किंवा लेखिकेचा भर असतो. इतिहास हा फक्त घडून गेलेल्या घटना पुरवण्याचे काम कादंबरी करायला करत असतो. संतांवर लिहिलेल्या कादंबऱ्या या भावपूर्ण स्वरूपाच्या असलेल्या दिसून येतात. सामाजिक कादंबरी मधून दीर-जाऊ, सासू-सासरे असे अनेक नातेसंबंध स्त्री हा केंद्रबिंदू मानून कौटुंबिक विषय गुंफलेले दिसून येतात. तसेच अस्वस्थ असणाऱ्या स्त्री मनाचे दर्शन यातून होते.

**मृणालिनी देसाई**

यांनी १९६९ साली 'पुत्र मानवाचा'ही कादंबरी लिहिली. या कादंबरी मधून चंपारण्यातील निळ कामगारांच्या उठावापासून सुरू झालेल्या राजकीय चळवळींचा आलेख आलेला दिसून येतो. हा तपशील थोडासा कंटाळवाणा वाटतो. परंतु महात्मा गांधीजींची जीवन कथा सांगण्यासाठी म्हणून 'मी' या निवेदकाची योजना लेखिकेने केलेली दिसून येते. त्यामुळे गांधीजी आणि त्यांचे जीवन चरित्र थोडे प्रभावी असलेले वाटत नाही.

**लीला दीक्षित**

चंदनवेल ही १९८५ यावर्षी लिहिलेली संत कान्होपात्रा यांच्या जीवनाचा वेध घेणारी कादंबरी आहे कानोपात्रेला पंढरपूरच्या पांडुरंगा बद्दल वाटणारी आंतरिक तळमळ तसेच वेश्या असूनही विठ्ठलमय झालेली कान्होपात्रा आणि कान्होपात्रेचे भक्तिमहात्म्य लेखिकेने उलगडून दाखवले आहे. अतिशय खडतर कष्टप्रद जीवन कानोपात्राच्या वाटेला आलेले असून असून नात्याचा कुठलाच आधार तिला उरलेला नसताना फक्त पंढरपूरच्या विठ्ठलावर निष्ठा ठेवून ही कान्होपात्रा पंढरपूरला जाते. भक्ती रसामध्ये न्हावून निघते आणि पांडुरंगा चरणी लीन होते. हे सर्व तेवढ्याच तन्मयतेने लीला दीक्षित यांनी स्पष्ट केले. इतर संत कवयित्रींकडे जर पाहिलं तर त्यांना कोणाचा ना कोणाचा मानसिक आधार होता. पण कान्होपात्रेचा जन्मच वेश्याकुळी झाल्याने मानहानीचे जीवन तिच्या वाट्याला आले होते, परंतु आपल्या अमृतमय वाणीने कान्होपात्रा भावभक्तीने कळसाला कशी पोहोचते त्याचे वर्णन चंदनवेल या कादंबरीतून लीला दीक्षित यांनी केले आहे.

**शुभदा गोगटे**

खंडाळयाच्या घाटासाठी हे १९९२ यावर्षी शुभदा गोगटे यांनी लिहिलेली एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरी मधून आशिया खंडातील धावलेली पहिली रेल्वे म्हणजेच ठाणे ते बोरीबंदर हा ब्रिटिश सत्तेचा कालखंड लेखिकेने कादंबरी लेखनासाठी निवडलेला आहे. रेल्वे सुरू करण्या पाठीमागचा ब्रिटिश सरकारचा मुख्य उद्देश जो होता तो म्हणजेच भारतीय समाज जीवनाचा विचार न करता त्यांना आपल्या मालाला भारतातील बाजारपेठ खुली व्हावी आणि कच्चामाल मोठ्या प्रमाणात इंग्लंड पर्यंत लवकरात लवकर पोहोचला जावा आहे तो ब्रिटिशांनी लोहमार्ग बनवण्याबाबत ठेवलेला दिसून येतो तसेच युद्ध किंवा लढायांमध्ये सैनिकांच्या तुकड्या पोहोचवण्यासाठी किंवा रसत पोहोचवण्यासाठी या रेल्वे मार्गाचा एक जलद साधन म्हणून वापर होईल उद्देश होता. या कादंबरीचा नायक नारायण असून नारायण आणि त्याचे कुटुंब हे सर्व काल्पनिक पात्रे आणि त्या संदर्भात घडणाऱ्या घटना सुद्धा काल्पनिक असलेल्या दिसून येतात. खरंतर नारायण हा मराठी असून त्याला थोडी इंग्रजी भाषा बोलता येत असते तो इंग्रज अधिकारी आणि खलाशी कामगार यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा आहे. नवीन गोष्टी करण्याकडे त्याचा कल आहे आणि ब्रिटिशांकडून नवीन गोष्टी जाणून घेणे हा त्याचा स्वभाव आहे. त्यामुळे मोडकं तोडकं इंग्रजी बोलून तो ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून नोकरी मिळवतो. खूप कष्ट करतो मेहनत करतो पैसे मिळवतो परंतु घरासाठी नारायण एवढे पैसे मिळवतो तरी त्याच्या कर्तबगारीचे घरातील कोणालाही काहीच विशेष वाटत नाही. घरातली माणसे त्याला तुच्छतेने वागवतात. खरंतर पहिली रेल्वे ठाणे ते बोरीबंदर धावणार आहे ही बातमी घरच्यांना कळते ती नारायण मुळेच. सर्वसामान्य लोकांना या आगगाडी विषयी

काय वाटत होते त्यांच्या जीवनावर या आगगाडीचा सुरू होण्याचा काय परिणाम होणार होता  हे दाखवण्याचा प्रयत्न या कादंबरीतून शुभदा गोगटे यांनी केला आहे. "ठाण्याकडे निघालेली गाडी वाटेत थांबलेल्या लोकांना ओलांडून पुढे गेली की कित्येक लोक त्या गाडीला लावून नमस्कार करत होते ज्या अर्थी कुठल्याही जनावराशिवाय इंजिन एवढी मोठी गाड्यांची रांग ओढून नेते ना त्या अर्थी या इंजिनाच्या अंगी काहीतरी दैवी शक्ती असली पाहिजे असं त्यांना वाटत होतं"

**विभावरी शिरूरकर/ मालतीबाई बेडेकर**

'खरे मास्तर' ही १९९३ यावर्षी विभावरी शिरूरकर यांनी लिहिलेली कादंबरी म्हणजे त्यांच्या वडिलांची जीवन कथाच आहे. विभावरी शिरूरकर म्हणजेच मालतीबाई बेडेकर होय. आपल्या वडिलांबद्दल लिहावे म्हणून त्यांनी ही कादंबरी लिहिली  कादंबरी मध्ये विभावरी शिरुरकर असं म्हणतात की, माझ्या आणि माझ्या बहिणींच्या वाट्याला जगावेगळे वडील आले. हे वडील म्हणजेच खरे मास्तर. मराठी साहित्यात मानाचे पान बनले. सगळया मुलींना डबल ग्रॅज्युएट करीन अशी जिद्द बाळगून खरे मास्तरांनी हा शब्द खरा करून दाखवला जवळपास ७० ते ८० वर्षांपूर्वी एका छोट्या गावात राहून मुलींना शिकवणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती परंतु खरे मास्तरांनी खूप मोठा धाडस केलं आणि मुलींना शाळेत घातलं. शिक्षणाच्या बाबतीत खरे मास्तर सुधारक विचारांचे होते जातीभेद नको असे ते अट्टहासाने सांगत होते जसा विचार तसाच त्यांचं जगणं होतं. जवळपास ८०, ९० वर्षांपूर्वीचा काळ जिवंतपणे उभा करून लेखिकेने ही कादंबरी अतिशय हृदयस्पर्शी आणि वाचकांना अंतर्मुख बनविणारी लिहिलेले आपल्याला दिसून येते. तिचे भाषेवर प्रभुत्व असलेले आपल्याला दिसून येते. जेव्हा खरे मास्तरांना दोन मुली होतात तेव्हा आपल्या सासुरवाडीला ते

कळवतात, “दुसरी मुलगी झाल्याचा मला आनंद झाला मी माझ्या मुलींना खूप शिकवणार आहे. आता बरं झालं एकीच्या जोडीला दुसरी बी.ए एम.ए.पर्यंत शिकतील.”

**समारोप**

साठोत्तरी मराठी कादंबरीने ग्रामीण पौराणिक ऐतिहासिक चरित्रात्मक असा नवा मार्ग स्वीकारलेला दिसून येतो. मराठी कादंबरीच्या विकासाचा हा महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून साठोत्तरी कालखंड ओळखला जातो. ‘खरे मास्तर’ ही विभावरी शिरूरकरांची एक सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण असलेली कादंबरी म्हणून ओळखली जाते. ग्रामीण कादंबरी लेखनाकडे स्त्रिया जास्त वळलेल्या दिसून येत नाहीत. म्हणूनच प्रतिमा इंगोले यांची ‘बुढाई’ ही कादंबरी सर्वांच्या नजरेत भरते आणि लोकप्रिय सुद्धा होते. कौटुंबिक कादंबऱ्यांमधून कुटुंबातील स्त्रियांच्या नात्यातील गुंफण गुंतागुंत लेखिकेने चित्रित केलेली आहे. कादंबऱ्यांचा विचार करता मोठ्या प्रमाणावर लेखन साठोत्तरी कालखंडामध्ये झालेले दिसून येते. अशा कौटुंबिक कादंबऱ्यांचा वाचक वर्ग सुद्धा मोठा आहे. वेगवेगळे विषय हाताळताना लेखिकांनी खूप कष्ट घेतले आहेत आणि वास्तवाचे भान ठेवले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) खरे मास्तर-विभावरी शिरुरकर

२) बुढाई-प्रतिमा इंगोले

३) स्त्री साहित्याचा मागोवा खंड दोन- संपादन डॉ. मंदा खांडगे डॉ. लीला दीक्षित डॉ. अरुणा ढेरे डॉ.विनया खडपेकर।

४) प्रदक्षिणा खंड दुसरा संपादन- अनिरुद्ध कुलकर्णी

५) मराठी वाङ्मयाचा इतिहास ,खंड सातवा भाग- पहिला, मराठी साहित्य परिषद पुणे

६) मराठी लेखिका चिंता आणि चिंतन- भालचंद्र फडके

७) खंडाळयाच्या घाटासाठी-शुभदा गोगटे

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथालेखन

प्रा. निकिता शेंडगे
सहायक प्राध्यापक, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, कर्वेरोड, पुणे
डॉ. प्रताप गायकवाड
सहयोगी प्राध्यापक, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, कर्वेरोड, पुणे.

१९६० च्या सुमारास अनेक साहित्य प्रवाहाचा उदय झालेला आहे. यामध्ये प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, महानगरीय साहित्य, स्त्रीवादी साहित्य आदी प्रवाह १९६० च्या सुमारास आले. १९६० नंतर प्रत्येक साहित्य प्रवाहामध्ये बदल घडून आलेले दिसून येतात. त्यात स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचा विचार करत असताना 'स्त्रीवाद'ही संकल्पना १९७५ नंतर साहित्यात उदयास आली. पण या संकल्पनेचे मुळ मात्र आपल्याला, मनुस्मृती व ताराबाई शिंदे लिखितस्त्री – पुरुष तुलना या दोन्ही ग्रंथात पाहावयास मिळते. १९६० च्या काळात 'स्त्री'साहित्यात अनेकबदल पाहावयास मिळतात. १९६०च्या आधीच्या साहित्यात कादबरी, आत्मचरित्र,नियतकालिक आदी मधून स्त्रिया लेखन करत होत्या, त्या साहित्य प्रकारामधून आपल्या भावना, सुख-दुखाचे वर्णन त्याकरित होत्या. साठोत्तरी काळात स्त्रिया आपल्या साहित्यातून प्रखर करू लागल्या. आतापर्यंत दबले गेलेल्या भावनांचा उद्रेक त्या आपल्या साहित्या त्यातून मांडू लागल्या.

या आधीचे साहित्याचा विचार करत असता ते साहित्य पुरुषकेंद्री, पुरुष लिखित होते. पुरुष स्त्री ज्या साच्यात बसवत असे, त्या साच्यात तिची घडकून होत होती. असे पांरपारिक स्त्री- प्रतिमा पुरुषी साहित्यातून येत होती. याला काही अपवाद ही असू शकतात. यानंतर स्त्रियांचे साहित्य आले. स्त्रिया आपल्यादुःख, वेदना, सुख आपल्या भाषेतून व्यक्त करून लागल्या हाच बदल स्त्री साहित्यात आपल्याला साठोत्तरी कथालेखनामध्ये पाहावयाचा आहे. यात प्रामुखाने जागतीकीकरणाचा प्रभाव, नव-नव शहराची निर्मिती (महानगर) तेथील संस्कृती बदलती सामाजिक पर्यावरण आदीचे चित्रण

आपल्याला साठोत्तरी कथालेखन मध्ये पाहायला मिळते. मी माझ्या निबंधाची मांडणी खालील मुद्याच्या आधारे करणार आहे.

१ स्त्रीवादी काळातील स्त्रियांचे कथा लेखन
२ पुरुषी दृष्टिकोनातून स्त्री साहित्य
३ जागतिकीकरणाचा प्रभाव एकूण साहित्यावर
४ स्त्रियांचे कथा लेखन मधील समस्या

**स्त्रीवादी काळातील स्त्रियांचे कथा लेखन**

'स्त्रीवाद' ही संकल्पना सामाजपरिवर्तन समाजात बदल घडवून आणारा विचार प्रवाह आहे. स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना स्त्री –पुरुष समाजातील समान पातळीवर वास्तव करणारे आहे. यामध्ये ही समाजात स्त्री – पुरुषामध्ये सत्तासंघर्ष पाहायला मिळतो. यातून स्त्रीवादही संकल्पना उदयास आली आहे. स्त्रीवादी साहित्याचे लेखन स्त्रीवादी साहित्याचे लेखन हे खुप पूर्वीपासून होत आहे. असे दिसून येते. कदाचित तेव्हा त्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल असे नसेल किंवा स्त्रीवादी साहित्यअसाही शब्द रूढ नसेल यांचे उत्तम उदाहरण आपल्याला पाश्चात्य लेखिका बी. सी.टू 'द प्रेझेंट विमेन रायरिंग इन इंडिया, या ग्रंथात १९९२,९३ मध्ये मांडली आहे. " तेरा भारतीय भाषातील १४० साहित्यिक त्यात आहेत. त्यातूनचअगदी बुध्दकालीन थेरीगाथा पासून भक्ती काळातील सियांचे लेखक, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्र, आत्मचरित्र व वर्तमानकालीन बंडखोर लेखन एकत्र सापडते, महाराष्ट्रातील महादंबा, मुक्ताबाई, जनाबाईपासून तसेच ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई आणि लक्ष्मीबाई टिळकांपासून स्त्रियांची अलीकडची आत्मचरित्र, तसेच कथा, कादंबऱ्या असा स्त्रीवादी लेखनाचा मोठा पैस आहे. प्रस्थापित पुरुषप्रधान मुल्यव्यवथेचा प्रतिकार करणारी वाटी उलथून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखूवून देणारे अमाप स्त्री साहित्य भारतीय भाषांमध्ये दिसते "[१]

भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहासात निर्माण करत असताना पाश्चात्य लेखिकेच्या हाती हे मुख्य आले आहे. म्हणजेच भारतीय स्त्रियांना लेखनकला अवगत नव्हती तेव्हा ते आपली सुख-दुखाचे वर्णन ओवी, अभंग यातून करत होते. उदा. संत जनाबाई, बहिणाबाई मुक्तबाई यानंतर ही इतिहासामध्ये अनेक स्त्रीयांनी आपल्या साहित्यातून कळत- नकळतपणे साहित्याची निर्मिती केली. यालाच

आपण 'स्त्रीवादी' साहित्य म्हणता येते. पुरुषी साहित्याचा विचार करत असता पुरुषांनी स्त्रियांला नेहमी एका चौकटीतील जीवन जगताना पाहिले. तर कधी लादले. असेच स्त्री जीवनाचे चित्रण आपल्याला पुरुषी साहित्यातून आलेली पहावयास मिळते. पुरुषी साहित्यातून 'स्त्री' प्रतिमा ही परंपरेच्या चौकटीत असणारी होती. साहित्यातून घेणारी चित्रण हे नेहमी स्त्रीने कशाप्रकारे वारवरले पाहिजे उदा. कुटुंबात, समाजात जगले  पाहिजे असे अनेक नियम तिझ्यावर लादले गेले होते. हे सर्व आपल्याला पुरुषी साहित्याच्या स्त्री-प्रतिमेमधून पहावयास मिळाले.

एकूणच  साहित्याचा विचार करतानास्त्री साहित्य व पुरुषा लिखीत साहित्य यामध्येतफावत असल्याचे जाणवले, त्याचे कारण म्हणजे. पुरुषी साहित्यातात तिच्या बाहय सौदर्याचा वेध घेतलेला दिसतो. तर स्त्री साहित्यात स्त्रीला आपल्या 'स्व'ची जाणीव होते. त्या जाणीवा ती आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रत्यत्न करतात. आपल्यावर होणा-या अन्यायाचे, दुखाचे, दुय्यम समजल्या जाणा-या समाजाचे चित्रणतिने आपल्या साहित्यातून मांडले. या विचारसरणीतून आपल्याला 'स्त्रीवाद'ही संकल्पना उदयास आलेली दिसून येत. जसे की स्त्रीवाद ही संकल्पना खूप आधीपासून म्हणजेच मनुस्मृतीच्या काळापासून आतापर्यंत अस्तित्वात आहे. भारतीय स्त्रीवादाचे मूळ हे आपल्याला मनुस्मृती, स्त्री-पुरुष तुलना आदी साहित्य ग्रंथाच्या आधारे शोधता येते. नंतरचा काही काळ लोटल्यानंतर म्हणजेच १९७५ नंतर संपूर्ण जगभरात स्त्रीवादाची लाट उसळली. यामध्येही भारतीय स्त्रीवाद व पाश्चात्य स्त्रीवादामध्ये थोडयाफार प्रमाणात तफावत आहे. पण दोन्ही स्त्रीवादाचे मूळहे एकच आहे ते म्हणजे समाजात स्त्रीला समान हक्क मिळवून देणे. उदा. मतदान, शिक्षण, आर्थिक, सामाजिक पातळीवर जेवढे हक्क पुरुषांना समाजव्यवस्थेत आहेत. तेवढे सर्व हक्क स्त्रियांना समाज व्यवस्थेत मिळाला हवे. या सर्व जाणीवांतूनच स्त्रीवाद साहित्य उदयास आले. स्त्रियांनी  आपले  सुख-दु:ख, अन्याय, परंपरेच्या चौकटीतुन स्व:ताला मुक्त करणे, आपले शरीर आपला हक्क अशा एक ना अनेक विषय साहित्यातून मांडू लागल्या.

१९६० च्या आसपास अनेक साहित्य प्रवाहांची नव्याने निर्मिती झालेली आहे. त्यामध्ये स्त्रीलेखकांही मोठ्याप्रमाणात साहित्यनिर्मितीकेली आहे.उदा. दलित, ग्रामीण, आदिवासी अशा अनेक

साहित्यप्रवाहामधून त्यांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, आत्मकथन अशा साहित्य प्रकारातून साहित्याची निर्मिती केली. तसेच पुरुषी साहित्याच्या बरोबरीचे आपले विचार, भावना, दु:ख, अन्यायाविरुध झगडा साहित्यातून मांडला. **कविता** – कुमुद पावडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भागत

**कथा** – काशिबाई कानिटकर, विभावरी शिरुरकर, सानिया, अनुराधा पाटील, गौरी देशपांडे, सुनिता देशपांडे आदी.

**कांदब**री – कमल देसाई, गौरी देशपांडो, नीरजा, प्रज्ञा पवार, कविता महाजन आदी साहित्य प्रकारातून त्यांनी आपले लेखन केले. अशा प्रकार स्त्रीवादी साहित्याची निर्मिती कशी टप्याटप्याने झाली आहे. यांची थोडक्यात मांडणी केली आहे. त्याची साहित्य निर्मितीचा मुख्य हेतू म्हणजे 'स्व' जाणीवेतून त्याची निर्मिती झाली आहे. आता पर्यंतच्या पुरुषी दृष्टिकोन समाजव्यवस्था यांना छेद देणारी 'स्त्रीवादी'साहित्य आले आहे.

२ **पुरुषी दृष्टिकोनातून स्त्री साहित्य**

पुरुषानी स्त्रियायासंबंधी लिहिलेल्या साहित्याचा विचार करताना, प्रथम पितृसत्ताक व्यवस्था, पुरुषा व्याकरण (म्हणजेच भाषिक दृष्ट्या पुरुषांना आदर देणे) आदर वाचक शब्दांची निर्मिती. अशा एक ना अनेक विचारातून विचार सरणीतून पुरुषी साहित्य घेताना दिसते. पितृसत्ताक संस्कृतीचा खुप मोठा प्रभाव आपल्याला पुरुष केंद्री साहित्यात पहावयास मिळता. या संदर्भात सॅणडा गिलबर्ट यांच्या मते, 'पितृसताक मुल्य स्त्रीच्या सर्व कृती नियंत्रित करतात बंडखोर व सर्जनशील म्हणवणाऱ्या स्त्रीयांवरही पितृसताक मूल्यांची अप्रत्यक्ष बंधने असतात. कारण स्त्री जी मातृभाषा वापरते ती स्त्रीला पितृसतेसमोर वाकविणारीच असते"[२] वरील विवेचना वरून पाश्चात्य लेखिका ही पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रीवर पुरुषाचीसत्ता ही कायम आहे. मग ती मातृभाषा, वडीलांची सत्ता, नंतर पतीची आणि मुलांची अशी कायमची तिझ्यावर कोणाची ची सत्ता हवी. याविचारातूनच पुरुषांचे लेखन आणि स्त्रियांचे लेखन यांची तुलना करून सिझू म्हणते, "एखाद्या गोष्टीबद्दल शोक करणे म्हणजे ती गेलेली गोष्ट परत मिळविण्याचा प्रयन्त करण्यासारखे होईल. असा शोक पुरुष करतो. स्त्री मात्र हा शोक पचून पुढे जात असते. म्हणजेच निर्माण झालेली उणीव किवां तोटा

उगाळत न  बसता ती पुढे जाते."३ याचे  कारणपुरुषाला त्या वेदनाचा अनुभव प्रत्येक्षरित्या नाही. तसे स्त्री साहित्यातून येणारा स्त्रीचा अनुभवप्रत्यक्ष आहे. असा फरक आपल्याला साहित्यातून दिसतो.

पुरुषी साहित्यात यात विचार करत असतांना अजून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे पुरुषानी स्त्रीला नेहमी, अबला, माता, दासी, किंवा देवता अशी रूपे दिली. ती साहित्यात येताना ती पुरुषप्रधान संस्कृतीचा अविष्कार असतात. दासी आणि देवता या दोन्ही प्रतिमा स्त्रीत्त्वाचा, तिच्या स्वत्वाचा बळी घेणारी असतात. यातून पुरुष केंद्री की साहित्य ची निर्मिती होते. पुरुषकेंद्री पुरुषांनी लिहिलेल्या स्त्री साहित्याचा मागोवा होत असताना असे नाही अनेक मुद्दे हाती येता. उदा. **पुरुषी साहित्यातील स्त्री –प्रतिमा**

पुरुष साहित्याचे वाचन करताना पुरुष लेखकांचे साहित्य वाचताना स्त्रीला पुरुषाची भूमिका घ्यावी लागते. यामुळे स्त्रिच्या साहित्यकडे बघण्याची मोकळीक राहत नाही. पुरुषी मनोवृत्तीचे चित्रण त्या साहित्यात पाहावयास मिळते. पुरुषी साहित्या हे व्यक्तिनिष्ट असल्याचे लक्षात येते. तर स्त्रियांचे साहित्य हे पुरुष व स्त्री याच्या परस्परसंबधाचे चित्रण  येताना दिसते. पुरुषी साहित्यात आशय, संदर्भ, परपंरा याचा वेध घेऊन स्त्रीला दुय्यम ठरवताना दिसतात. पुरुषी साहित्याचे वाचन करताना समाजातील लिंगभेच्या प्रभावाचे, मानसिकतेचे चित्रण ही दिसते. पुरुष प्रधान संस्कृतीत लेखक निर्माता कार्य करत असतो." पुरुषकेंद्री समाजातील विद्यमान भाषा सुद्धा स्त्रियांच्या वास्तवाचे भान न राखणारी, जीवन संघर्षात निसर्ग-अन्य माणसे स्त्रिया यावर वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेली आहे. पुरुषांनी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी जीभाषा निर्माण केली, त्यातून स्वता:च्या भावना व्यक्त  करणे यांना कठीण जातो"[४] भाषांसंबंधीचा विचार करताना स्त्रिया  व पुरूष भाषेचा वेगळा वापर करतात. भाषेचे शब्दसंग्रह वेगवेगळे असतात. म्हणून पुरुषी साहित्याचे वाचन करताना अशा प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. असे साहित्यातील चिजण दिसून येते. अशा प्रकारपुरुषानी लिहिलेल्या स्त्रिया संबंधी साहित्याचा विचार करताना स्त्री पुरुषाचेसाहित्य एक वाचक म्हणून जेव्हा पाहते तेव्हा पुरुष साहित्यातील काही उणीवा तिला भासताता. याविषयी ती चिकित्सक दृष्टीकोनातून आपले विचार व्यक्त करते. दुसरे असे की, पुरुषी साहित्यातून आपल्याला स्त्री प्रश्नाची

चर्चा फार दिसून येत नाही. याला काही अपवाद आहे की, आपल्या साहित्यातून त्यांनी स्त्री जाणीवा, स्त्री प्रश्न त्याच्या समस्या यावर प्रकाश टाकला आहे. मुळे पाहता असे लक्षातयेते की, पुरुषानी स्त्रीयाचे प्रश्नांची चर्चा केली. त्यांना योग्य न्याय देता आला नाही. अशी काही उदाहरण पाहावयास मिळतात. गंगाधर गाडगीळ यांनी व्यंकटेश माडगुळकर च्या कथेविषय विवेचन करताना म्हणतात, खरे म्हणजे स्त्री हा त्याच्या साहित्याचा केद्रबिंदू कधीच झालाच नाही आणि स्त्री पुरुषाच्या परपस्परकर्षणालाही त्यात तसे महत्वाचे स्थान नाही''[५]

अशा अनेक कथाकारांनी आपल्या आपल्या काथांधून स्त्रीचे वर्णन लेखांच्या कल्पनेतून स्त्री प्रतिमा रेखाटली आहे. वाचकाच्या मनाला रिझवेल अशा स्वरूपाची स्त्री चित्रे येतात. त्याच बरोबर कथाकारनी स्त्रियांच्या विविध रूपांचा, नात्यांचा, वयाचा, स्वभावाचा सामाजिक, अर्थिक दर्जा आदी चा विचार व्यक्त केला आहे. असे अनेक विषय कथाकारांनी माडले आहे.

**जागतिकीकरणाचा प्रभाव**

१९६० नंतरच्या साहित्या जागतिकीकरणाचा प्रभाव साहित्यप्रकारावर झालेला दिसून येतो. प्रत्येक साहित्यात हा बदल दिसतो. जागतिकीकरणामुळे शहर, गाव, तालुका, जिल्हे हे मोठ मोठ्या शहराला जोडली गेली त्याचा परिणाम असा झाला की, त्या शहरी किंवा महानगरीय संस्कृतीचा पूर्ण प्रभाव यावर पडला. यामुळे नवीन जुनी संस्कृती आपल्याला जागतिकिरणामुळे पाहायला मिळेले. उदा मोठमोठे मॉल, गगनचुंबी इमारती आदी.

या काळात भाऊ पाध्ये, प्रभाकर पाध्ये, समर खडस, गंगाधर गाडगीळ कथाकारानी आपल्या कथेच्या माध्यमातून जागातीकरण, उदातीकर, राजकारण आदी विषय कथेत पाहता येते. याचा प्रभाव साहित्यावर कशाप्रकार आहे. हे दिसून येते.यामधून गुन्हेगारी , गुंड, वेशा,आदीचे चित्रण कथेमधून येते. याच काळात लिहिणा-या स्त्री कथाकार, मेहना पेठे, वासंती मजुमदार, नीरजा, माधुरी शानबाग, मनस्विनी लता अशा अनेक स्त्रियांनी आपल्या कथेमधून जागतिकीकरणा नंतरच्या साहित्यातील बदलाचे प्रश्यांची चर्चा केली. कथा या साहित्यप्रकारचा चेहरा मोहरा बदला आहे. यांचे चित्रण

त्यांनी केले. जागतीकीकरणामुळे स्त्रीचे बदललेली जीवनचित्रण पहायला मिळते. बदली संस्कृतीचा स्वीकार करताना दिसतात .

**स्त्रीचे कथा लेखन**

एक स्वतंत्र वाङ् मय प्रकार म्हणून कथालेखनला प्रतिष्ठा आहे. मराठी कथा साहित्याला दीर्घ अशी परंपरा असल्यामुळे तिच्यातून व्यक्त होणारा मूल्यात्मक आशायाने निश्चित असा तिचा वाचकवर्ग तयार झाला आहे. यामुळे कथा है वामप्रकार लोकप्रिय झाला. कथामधून आधीच्या काळाचा विचार करता कथा ही बोधपर, मनोरंजन अशा हेतुने लिहिली जात होती. नंतरच्या काळात अनेक बदल कथेने स्वीकारले आहे. स्त्रियांचे कथेतील स्थानाचा विचार करताना तिच्याकडे भोगवस्तू, मादी, अन्याय सहन करणारी, शोषित, नियतीमुळे आपल्या वाटलेली आलेले दुःख उपभोगणारी असे चित्रण येत होत. असे विषय आधीच्या कथा लेखनामधून येत होते. नंतरच्या काळात स्त्री कथा लेखन अमुलग्रह बदल झाले. परंपरेच्या बंधनातून मुक्त होऊन ती जीवन जगू लागली. ते जीवन ती कथा वाडमयातून व्यक्त करु लागली.

स्त्री कथानी एकूणच मराठी साहित्यात् मोलाची भर घातली. यामध्ये प्रमुख्याने प्रिया तेंडुलकर, आशा बगे, नीरजा, गौरी देशपांडे, विभावरी शिरूरकर, विद्या बाळ, सानिया, सरिता पदकी, विजया राजाध्यक्ष आदी कथा लेखिक विचार करता येतो. त्यांनी आपल्या कथामधून स्त्री प्रश्नांची चर्चा केली. आतापर्यंत कथेमध्ये असे विषयाची मांडणी केली नाही ती मांडणी कथेमध्येपहावयास मिळते.

**प्रिया तेंडुलकर** यांच्या कथेमधून येणारे स्त्री चित्रण ही गृहिणी, नोकरी व व्यवसाय क्षेत्रात आपले भकम अस्तित्व निर्माण करणारी त्याचबरोबर त्यांच्या कथेतून स्त्री जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या, दु:ख, तिथे वैचारिक ताण-तणाव लग्न घटस्पोट आदीचे चित्रण केले. त्याची 'घासरण' या कथेतून लग्नसंस्थ संबंधी अनेक प्रश्नाची चर्चा केली. घटस्पोटित स्त्री चिजण त्यांनी रेखाटले आहे. उदा.'लग्न संपल्या नंतर' या कथेमधून त्यांनी व्यक्त केले. अशा अनेक कथानमधून त्यांनी चाकोरी बाहेरील जीवन जगणारी स्त्री चित्रणे रेखाटले त्याचबरोबर

'एअर होस्टेस'या कथेमधून हवाई सुंदरच्या पुरुषसत्ताक संस्कृतीमध्ये तिचे खच्चीकरण कशा प्रकार होते. याचे चित्रण केले आहे.

**विभावरी शिरुरकर** याच्या कथामधून त्यांनी प्रौठ कुमारिकांचे जीवनविषयक वास्तवा आणि यातून त्यांचा मानसिक कोंडमारा याचे चित्रण केले. विवाहिक जीवनात त्यांना कोणकोणत्या समस्याना तोंड द्यावे लागते यांचे चित्रण त्या करतात. त्याची दास्यमुक्तीतून वैचारिक बैठक त्याच्या कथेत पाहावयास मिळते. "विभावरीबाई क्षेत्राच्या काळात तंत्राची चौकट मोडण्याचा जाणीवपूर्वक प्रत्यत्न करीत आहेत हे मान्य करावे लागले. आपल्या कथालेखनातून सातत्याने व जाणीवपूर्वक असा प्रत्यत्न केल्यामुळे विभावरीबाईच्या 'कळयाचे निश्वास'मधील कथा मराठी कथेच्या विकासक्रमातील महत्वाचा टप्पाठरतात"[६] अशाप्रकारे त्यच्या कथेचा आशय लक्षात येतो.

**आशा बगे** यांच्या कथा या समकालीन लेखिकांच्य स्वतंत्र प्रवृत्तीचे कथा विश्व निर्माण केली आहे. त्यांनी आपल्या कथामधून पंरपारिक संस्कृतिक व्यूहाशी, नौतिक आदर्शशी जाडले आहे. त्याचबरोबर आपली आत्मभान ही जागृत ठेवले आहे. आशा बगे यांचा स्त्रीकडे बघण्याचा द्रष्टिकोन आधुनिक आहे. पण परंपरेशी असलेली नाते त्यांनी तोडलेले नाही. त्याच्या कथा, मारवा, अतर, पुजा, आदी कथासंग्रहामधून त्यांनी स्त्री प्रतिमाचे चित्रण केले आहे. त्यांची 'रुक्मिणी' ही कथेत त्यांनी पांरपारिक कौटुंबिक वातावरण उभे केले. त्यंच्या कथेमधून परंपरा व आधुनिकता असा संघर्षाचे चित्रण येते,पुरुष प्रधान संस्कृतीत पिचलेल स्त्री जीवन येत, एकुण त्याच्या कथेमधून संयमित शैली, अनुभवाची उत्कटता, कौटुबिक प्रतिमा विश्व अदी. विषय त्यांनी हाताळले त्याच्या कथेचे वैशिष्ये म्हणता येते.

**गौरी देशपांडे** याच्या कथेमधून येणारी ती ही बंडखोर वृत्तीची आहे. लग्न सस्थां, यांना जुगारून आपले आयुष्य आपल्या मनमर्जीने जगणारी आहे. लग्नापेक्षा 'लिव्हिंग टुगेदर'कल्पना मांडणारी आहे. त्यांच्या कथेमधूनआंतरजातीय व अंतरधर्मीय लग्नां संबधीचे विचार व्यक्त केले आहे. पुरुषी वर्चस्वापासून ती मुक्त आहे 'मी' वर प्रेम करणारी आहे. समाजातील अनिष्ट रूढी परंपरा ती मान्य न करता आपले स्वतंत्र्य जीवन जगणारी ही प्रतिमा तिच्या कथेत येते उदा. 'आहे अस आहे' आदी कथासंग्रहातून अशा प्रतिमा पाहायला मिळतात. **कमल देसाई** यांच्या कथेत शरीरकेंद्री अनुभावातून कथेची निर्मिती झालेली

आहे. पुरुषी दृष्टीकोनातू स्त्री सौदर्याचे  चित्रण  येत त्याच्या कथा, रंग, दु:ख या कथेतून  चित्रत  होते. कमल देसाईच्या कथाविषयीपाटणकर म्हणतात, “कमल देसाई यांची कथा वेगळयावळणाची, निराळया तोडवळयाची आणि खऱ्या अर्थाने ‘स्व’ला शोधणारी ही कथा दु:ख स्वप्नासाठी आहे ”७कमल देसाई यांच्या कथेचे वेगळेपण लक्षात येते.

याच कालखंडात लिहिणाऱ्या नीरजा, सानिया, विद्या बाळ, ज्योत्सना देवधर, अबिका  सरदार, प्रतिमा इंगोले, सरिता पदकी यांनी आपल्या अनुभव विश्वासाचे  चित्रण त्यांनी केले आहे. पंरपरा च्या बंधनातून मुक्त करून आधुनिक स्त्री प्रतिमाचा शोध घेतला आहे. हा शोध निबंध लिहिताना काही निकर्ष हाती आले. ते पुढील प्रमाणे

१ स्त्री चा ‘माणूस’म्हणून विचार करण्याची भूमिका समोर आली.

२ आतापर्यंत दडपले गेल्येल्या दास्ततून मुक्ती

३ आधुनिक स्त्री चित्रण

४ बंडखोरी प्रतिमेचे चित्रण

५ आपले शरीर आपला अधिकार, सामाजिक, आर्थिक,  कौटोबिक पातळीवर आपले ‘स्व’चे अस्तित्वासाठी आवाज उठवणे.

**संदर्भग्रंथ**


१) ‘मराठी वाडमय कोश’ विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती. मुंबई,प्रथमा.  नोहेंबर २००२ पृ .४१२

२) ‘स्त्रियांचे कथालेखन’ मंगला वरखेडे, संकेत प्रकाशन दुसरी आ. २००५ पृ. २

३) ‘स्त्रियांचे कथालेखन’ मंगला वरखेडे उ.नि. पृ.५

४) ‘स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा’ डॉ. शोभा पाटील वर्धन प्रकाशान पुणे आवृती प्रथम २००७ पृ. ११९

५) ‘स्त्री’ अभ्यासाच्या विविध दिशा ’सेवा डॉ. शिवाजीराव मोहिते, यशोदीप पब्लिकेशन्स पुणे, आवृती २०२० प्र.१०१

६) ‘कथाकार विजया राजध्क्ष’ (सं) शिरीष गोपाळ देशपांडे, पदव्युत्तर विभाग एस.एन.डी.टी. मुबई आ. प्रथम १० आक्टोबर १९९५ पृ.२७

७) ‘मराठी लेखिका चिंता आणि चिंतन’ भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन पुणे.प्रथम.आ. २०१७ पृ.९१


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. गणेश गोपाळराव मालटे**

मराठी विभाग प्रमुख, श्री शिवाजी विज्ञान, कला महाविद्यालय चिखली, जि. बुलढाणा

**स्मिता संदेशराव मांडेकर (नागपूरकर)**

संशोधक विद्यार्थीनी, श्री शिवाजी विज्ञान, कला महाविद्यालय चिखली, जि. बुलढाणा

**प्रस्तावना:**

भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय राज्यघटनेचे धर्म, वर्ण, जात, लिंग, विहिन समानतेचा पुरस्कार केला. पण स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षातही अशा प्रकारची समानता भारतात अस्तित्वात येऊ शकली नाही. स्त्रिया शिकल्या, मिळवत्या झाल्या तरीही स्त्रियांचे आर्थिक प्रश्न सुटले नाहीत. स्त्रियांकडे बघण्याचा पुरूषी दृष्टिकोन बदलला नाही. जागतिकीकरण आणि खागीकरणाच्या आजच्या युगात स्त्री जीवना संदर्भात अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. स्त्री प्रश्नांची गुंतागुंत वाढत गेली. स्त्री चळवळ हुंडाबळी, हत्या, बलात्कार, स्त्रीभ्रूणहत्या, मानसिक-शारीरिक अत्याचार अशा मूलभूत प्रश्नांभोवती फिरत राहिली. ही सगळी पार्श्वभूमी १९६० नंतर स्त्रियांनी आपल्या साहित्यातून कशी चित्रित केली याचा गांभिर्याने विचार होणे आवश्यक आहे. याविषयी मत मांडताना भालचंद्र फडके आपल्या ‘मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन या पुस्तकात म्हणतात, “या अनेक प्रश्नांचे भान बहुजन समाजातील स्त्रीला नाही. ते भान ज्या उच्च व मध्यमवर्गीय सुखवस्तू स्त्रीला आहे. त्याच वर्गातून प्रामुख्याने ललित लेखन करणारी स्त्री पुढे येत आहे.”[1]

आजही भारतातील बहुसंख्य स्त्रियांमध्ये माणूस म्हणून जगण्याची आच निर्माण झालेली नाही. पारंपारिक मध्ययुगीन परिप्रेक्ष्यात त्या आपले आयुष्य कंठीत आहेत. या सगळया स्त्रियांचे

चित्रण स्त्री लिखित साहित्यात कसे झाले. स्त्रीवादी चळवळीने निर्माण केलेल्या आशा आकांक्षा लेखिकांनी साहित्यातून कशा मांडल्या? स्त्री म्हणून होणारी कुचंबणा, समाजव्यवस्थेत भोगावी लागणारी दुय्यमता ते मानवतावादाचे सजग भाग, स्त्री-पुरूष समतेचा पुरस्कार, स्त्री म्हणून आपल्या हक्कांची झालेली प्रखर जाणीव स्त्रियांच्या साहित्यात कशा प्रकारे अभिव्यक्त झाली याचा लेखाजोगा मांडणे आवश्यक आहे. अशा या साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी लेखन प्रस्तुत शोधनिबंधामधून करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**उद्दिष्टये:**

१) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील भाषेचे स्थान विशद करणे.

२) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील भाषेचे विश्लेषण करणे.

३) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील लोकभाषेचे विश्लेषण करणे.

४) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील भाषाशैलीचे विश्लेषण करणे.

५) विविध अभ्यासकांच्या आधारे साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील भाशेचा आढावा घेणे.

**गृहितके:**

१) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी मधील मराठी साहित्यात ठसा दिसून येतो.

२) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरीचा प्रभाव भारतीय जनमानसावर कायम टिकून आहे.

३) साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कादंबरी दैनंदिन जगण्याशी निगडीत असल्याचे दिसून येते.

४) साठोत्तरी काळातील स्त्रिया ह्या पुरूषांना पुरक भूमिका वठवितांना दिसून येते.

५) साठोत्तरी काळातील स्त्रियांचा स्त्रीवादी जाणीव मूल्यांचा संघर्ष मराठी साहित्य क्षेत्रात उमटल्याचा दिसून येतो.

**स्त्री साहित्याची पार्श्वभूमी:**

स्त्रिया जेव्हापासून लिहायला लागल्या तेव्हापासूनचा इतिहास जरी तपासून पाहिला तरी स्त्रियांची बंडखोरी दडपण्यावर किंवा त्याचे

उदात्तीकरण करण्यावरच पुरूशी वर्चस्वाचा भर दिसतो. मध्ययुगीन कालखंडातील स्त्री संतापासून याचा विचार करता येईल. महानुभावपंथात असलेली कवयित्री महदंबा हिच्यापासून हा विचार करता येईल. महादंबेने धवळे निर्माण केले ही तिची निर्मिती उत्स्फुर्त मानली गेली नाही. मराठीतील आद्य कवयित्री म्हणून महदंबेचा उलेख केला जातो. त्याचप्रमाणे धवळयांचा दुसरा भाग म्हाइंमभट्ट आणि इतरांच्या सांगण्यावरून महदंबेने रचला असे सांगितले जाते. आणि वाङ्मयीन इतिहासात ही मांडणी अशीच केली जाते. त्यावरून स्त्रियांना फक्त पुरूषांना पूरक अशी भूमिका वठवायची असते हेच सिध्द होते.[2]

हयाच पध्दतीने वारकरी संप्रदायात नावलौकीक मिळविणाऱ्या कवयित्रीविषयी म्हणता येईल. की, मुक्तामाई आणि जनाबाई ही ज्ञानेश्वरांची बहिण आध्यात्मिक क्षेत्रात तिचा अधिकार मोठा होता पण समाजाने वाळीत टाकलेले हे कुटूंब आई-वडीलांच्या आत्महत्येनंतर निर्वासिताचे आयुष्य जगत होते. त्यामुळे मुक्ताबाईच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी समाजाला काहीही घेणेदेणे नव्हते. उपेक्षितांचे आयुष्य तिच्या वाटयाला आले होते. अर्थात तिच्याबरोबर निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान हे तिचे बंधूही होते. पण एक स्त्री म्हणून मुक्ताबाईंची काय अवहेलना झाली असेल हा संषोधनाचा विषय आहे. त्याचप्रमाणे पेशवाईत स्त्रियांची झालेली अवहेलना तत्कालीन साहित्यातही उमटली. लावणीमधून स्त्री देहाचे रसभरित वर्णन करण्यात आले. स्त्री म्हणजे केवळ उपभोग्य वस्तू हे लावण्यामधून प्रकर्षाने मांडले गेले. स्त्रीची मादकता हा लावण्यांचा वर्ण्य विषय होता. पुरूषांनी पराक्रम गाजवायचे आणि स्त्रियांनी नटून-थटून त्यांना रिझवायचे हा विरोधाभास या काळात निर्माण झालेला दिसतो. या काळात स्त्रियांचे सामाजिक स्थान प्रचंड खालावले त्याचेच प्रतिबिंब साहित्यात उमटलेले दिसते.

ब्रिटीश कालखंडात सुधारणावादी चळवळीचे फलित म्हणून स्त्रियांना शिक्षणाचे द्वार खुले झाले. सावित्रीबाई फुले या आद्य शिक्षिकेने शिक्षण देण्याबरोबर साहित्यनिर्मिती देखील केली. सावित्रीबाई फुले या आधुनिक कालखंडातील आद्य कवयित्री आहेत. पण दुर्दैवाने याची नोंद वाङ्मयीन इतिहासाने घेतली नाही. केशवसुतांच्या जवळजवळ तीस वर्षाआधी सावित्रीईंनी काव्यरचना केली.

**साठोत्तरी मराठी साहित्य:**

साहित्यप्रकारांच्या संकल्पनेबाबत मराठी प्राध्यापक डॉ. मिलिंद मानसे, प्रा. डॉ. र.बा. मंचरकर या समिक्षकांनी नव्या दृष्टीकोनातून चर्चालेखन केलेले आहे. या संबंधीच्या जुन्या-नव्या विचारांचा त्यांनी शोध घेतलेला आहे असे दिसते.[3] १९६० नंतर मराठी साहित्य विश्वात अनेक बदल झाले. १९६० ते ८० या वीस वर्षाच्या कालखंडात लघू-अनियतकालिकांची चळवळ, दलित साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ, स्त्रीवादी चळवळ यासारख्या चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी साहित्यविषयक मूल्यभान बदलवून टाकले. १९५५ साली 'शब्द' ही मराठीतील पहिली लघुपत्रिका प्रकाशित झाली. १९६० साली 'अथर्व' १९६२ साली 'असो' हे लघुअनियतकालिक प्रकाशित झाले. प्रस्थापित वाङ्मयीन संकेतांच्या विरूध्दची प्रतिक्रिया म्हणून मराठीत लघू अनियतकालिकांची चळवळ सुरू झाली. दलित साहित्य चळवळ व ग्रामिण साहित्य चळवळीने मराठी साहित्याचे दालन समृध्द केले. या तिन्ही चळवळींनी प्रस्थापित साहित्यमूल्यांना धक्के दिले. लघूअनियतकालिकांची चळवळ केवळ वाङ्मयीन क्षेत्रातील साचलेपणाच्या विरूध्द होते. दलित चळवळ मात्र समाजाच्या मूल्यव्यवस्थेविरोधात होते. त्यामुळे दलित साहित्याने आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह यांना महत्व देवून प्रस्थापित समाज व्यवस्था आणि प्रस्थापित साहित्याला प्रचंड धक्के दिले. माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा जगतांना त्याच्या विरोधी असलेल्या सगळया घटकांविरूध्द प्राणपणाने लढले पाहिजे याचे भान दलित साहित्यातून निर्माण झाले. दलित लेखकांनी तथा आत्मकथांनी कविता या साहित्य प्रकारामध्ये मोलाची भर टाकली. ग्रामिण साहित्याच्या क्षेत्रात महादेव मोरे, सखा कलाल, राजन गवस, सदानंद देशमुख, कवितेच्या क्षेत्रात इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख इत्यादी लेखक कवींची नावे घेता येतील. पण या तिन्ही चळवळी पुरूष सत्ताक व्यवस्थेच्या फलित होत्या. अर्थात दलित लेखिका कवयित्रींनी मोठया प्रमाणात साहित्याची निर्मिती करून दलित स्त्रीची व्यथा-वेदना प्रभावीपणे मांडली. पण तरीही दलित चळवळीवर पुरूष प्रधानच राहीली. लघू अनियतकालिकांच्या चळवळीला स्त्रियांशी फारसे देणे घेणे नव्हते.

ग्रामिण साहित्य चळवळ फारशी फोफावली नाही. तिच्यात अनेक उणिवा राहिल्या. प्रतिमा इंगोले सारखी ग्रामिण लेखिका पुढे आली.[4]

**साठोत्तरी लेखिका:**

१९६० हा मराठी साहित्याच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण टप्पा मानला जातो. नवसाहित्याच्या दिशा १९६० नंतर स्पश्टपणे लक्षात यायला लागल्या. १९४५ नंतर होवू लागलेले साहित्यिक बदल १९६० नंतर साहित्य क्षेत्रात सर्वमान्य झालेले दिसतात. १९६० नंतर अनेक लेखिका नव्या मूल्यांचा स्विकार करून आपल्या प्रकृती धर्मानुसार लिहिल्या जात होत्या. वैचारिक लेखन तथा कादंबरी, कविता आणि आत्मचरित्राच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविली. १९६० ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालखंडात स्त्रियांच्या साहित्यात बदल होत गेले. या बदलांचा मागोवा घेत असतांना पारंपारिक साहित्य निर्मितीची मूल्ये आणि स्त्रीवादी नव्या जाणिवेची मूल्ये यांचा संघर्ष स्त्रियांच्या साहित्यात उमटलेला दिसतो.[6]

लेखिकांची जडणघडण पुरूषसत्ताक व्यवस्थेच्या परिप्रेक्षात झालेली असते. व्यवस्थेचे संस्कार लेखिकांच्या मनावरही पक्के असतात आणि त्यांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. त्यामुळे नव्या जाणिवा पचवून त्यांची अभिव्यक्ती करणे वाटते तेवढी सोपी बाब नाही. सगळयाच लेखिकांना ते जमेल असेही नाही. १९७५ नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांच्या साहित्यातून काही स्त्रीवादी मूल्ये प्रखरपणे समोर आलेली दिसतात. गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन यासारख्या लेखिकांच्या कथा कादंबऱ्यांमधून हा दृष्टिकोन काही प्रमाणात प्रकट झालेला दिसतो. पण मुद्दाम ठरवून या लेखिकांनी हे लेखन स्त्रीवादी दृष्टिकोन अंगीकारून केले असे म्हणणे योग्य ठरणार नाही, तर माणूस म्हणून जगतांना समाजाने लादलेली बाई म्हणून जगण्याची मूल्ये नाकारून जो नवा अवकाश समोर आला तो या लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडला. १९७५ नंतर स्त्रीची माणूस म्हणून जगण्याची गरज स्पष्टपणे पुढे आली. पुरूषसत्ताक व्यवस्थेत होणारी शारीरिक आणि मानसिक घुसमट तिला असह्य व्हायला लागली. या अस्वस्थतेचा स्वर या लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडला. कथा कादंबरीप्रमाणेच कवितेच्या क्षेत्रातही मलिका अमरशेख, रजनी परूळेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर ते आत्ताच्या संध्या रंगारी पर्यंत अनेक कवयित्रींनी माणूस म्हणून

जगण्याची आपली आस स्पष्ट केली. आत्मचरित्राच्या क्षेत्रात मलिका अमरशेख, सुनिता देशपांडे, उर्मिला पवार यांनी ही जाणीव मांडण्याचा प्रयत्न केला. अशा मोजक्या काही लेखक-कवयित्री सोडून दिल्या म्हणजे लेखक कवयित्रींचा मोठा वर्ग पारंपारिक परिप्रेक्ष्यातून लेखन करीत राहिला.

**साठोत्तरी स्त्री कादंबरी:**

कथा आणि कवितेप्रमाणे कादंबरीच्या क्षेत्रातही स्त्रियांनी आपली महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. १९६० नंतर जे नवे प्रवाह मराठी कादंबरी विश्वात निर्माण झाले त्याचे प्रतिबिंब स्त्रिलीखित कादंबऱ्यांमधूनही उमटले. ऐतिहासिक, पौराणिक, अस्तित्ववादी, ग्रामिण, प्रादेशिक अशा विविध प्रवाहामध्ये स्त्रियांनी कादंबऱ्यांची निर्मिती केलेली दिसते. यातील बरीच कादंबरी वाङ्मय अनुकरणातून प्रस्थापित पुरूषी व्यवस्थेने निर्माण केलेल्या कादंबऱ्यांचे अनुकरण दिसते. फडके-खांडेकरी प्रभावातून मनोरंजात्मक कादंबऱ्यांची निर्मिती करणारा स्त्रियांचा एक मोठा गट १९९० पर्यंत मराठी कादंबरी विश्वात कार्यरत होता. १९६० नंतर स्त्रीवादी चळवळीच्या अनुषंगाने जागृत झालेल्या स्त्रीजाणीवांचे चित्रण करण्याचा प्रयत्न स्त्री कादंबरीकरांनी केला. स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देवून प्रभावीपणे साहित्य निर्मिती करणाऱ्या लेखिका म्हणून विभावरी शिरूळकर यांचा गौरव केला जातो.[7]

साठोत्तरी कादंबरीच्या प्रवाहात ज्योत्सना देवधर यांचे योगदन लक्षात घ्यावे लागते. 'घर गंगेच्या काठी', 'कल्याणी' या कादंबरीमधून ज्योत्सना देवधर यांनी तत्कालीन स्त्रियांचे सामाजिक स्थान शोधण्याचा प्रयत्न केला. एकत्र कुटुंब पध्दतीत स्त्रियांची होणारी अवहेलना त्यातून होणारा संघर्ष याचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. १९८६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'कल्याणी' या कादंबरीत वैधव्याच्या शापामुळे कुटुंबाची होणारी वाताहत स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर पडझड, चिमणीचं घर मेणाचं, एक अध्याय, ऐलतीर पैलतीर, एक श्वास यासारख्या कादंबरीमधून देवधरांनी स्त्री प्रश्नांचा वेध घेतला आहे. अर्थात ज्योत्सना देवधर यांचा भर कटुंब पध्दतीवर आहे. याविषयी मत व्यक्त करताना त्या म्हणतात, "एकत्र कुटुंब पध्दतीतील ऊन-पाऊस अंगावर घेत असल्यामुळे माझ्या लेखनाला कौटुंबिक चौकट आपोआप मिळाली."[8]

अर्थात साठोत्तरी कादंबरीच्या प्रवाहात पुरूषांनी जे वेगवेगळे प्रकार हाताळले ते प्रकार स्त्रियांनी देखील हाताळले. १९६० नंतर पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. सुमती क्षेत्रमाडे, रेखा बैजल, सुमती इनामदार, आषा बगे, अरूणा ढेरे, लीला दिक्षित, सारख्या लेखिकांनी पौराणिक कादंबरीची निर्मिती केली. महाभारताच्या कथानकावर आधारीत कादंबरी लिहिल्या गेल्या. सुमती इनामदार यांची अश्वत्थामा, सुमती क्षेत्रमाडे यांची 'गांधारी', आशा बगे यांची 'कुरूक्षेत्रे', अरूण ढेरे यांची 'उर्वशी' आणि मैत्रेयी यासारख्या कादंबरीची उदाहरणे या संदर्भात देता येतील. आशा बगे यांनी 'कुरूक्षेत्र' या कादंबरीतून द्राणाचार्याच्या आयुष्याचे चित्रण केले आहे. विविध व्यक्तिरेखांचे मनोविश्लेषण ही या कादंबरीची जमेची बाजू आहे. पौराणिक कादंबरीप्रमाणेच ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती झालेली दिसते. इंदूमती केळकर यांची सुलताना रझिया, मालती दांडेकरांची चक्रवर्ती यासारख्या कादंबरीची उदाहरणे देता येतील. चरित्रात्मक कादंबरीमध्ये मृणालिनी देसाई यांची 'पुत्र मानवाचा' शांता गोखले यांची 'वृंदावन' अशा काही कादंबरी निर्माण झालेल्या दिसतात.[१]

अशा प्रकारे साठोत्तरी साहित्यात कथा, कविता आणि कादंबरीच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपले महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसते. या कालखंडातील साहित्याचे कालखंडानुसार दोन टप्पे मानता येतील. १९६० ते ७५ तसेच १९७५ ते आजतागायत. १९६० ते ७५ या कालखंडातील बरेच स्त्री लिखित साहित्य पारंपरिक प्रेक्ष्यातून निर्माण झालेले दिसते. कथा आणि कादंबरीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात पुरूषी साहित्याचे अनुकरण झाले आहे. काही तुरळक लेखिका स्त्रियांच्या प्रश्नांविषयी आणि एकंदरीत सामाजिक प्रश्नांविषयी गांभिर्याने लेखन करताना दिसतात. बहुतेक लेखिकांनी मनोरंजनवादी दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून सर्वसामान्य वाचकांच्या मनोरंजनासाठी कथा आणि कादंबरीची निर्मिती केलेली दिसते. १९७५ नंतर मात्र युनोने जाहीर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी सजग भान निर्माण झाले याला भारत ही अपवाद नव्हता. १९७५ नंतर भारतात स्त्रिया संघर्ष करून आपले अधिकार मिळविण्यासाठी सिध्द झाल्या. महाराश्ट्रात स्त्रिवादी चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जागृती निर्माण केली. याचा परिणाम साहित्यावर झाला. स्त्रिया

आपल्या अस्मितेचा शोध साहित्यावर घेवू लागल्या. मराठी स्त्री लिखित साहित्यात १९७५ नंतर झालेले बदल स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध घेणारे आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) महाजन, डॉ. वंदना, 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य', विजय प्रकाषन नागपूर, द्वितीय आवृत्ती १५ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ४७.

२) तत्रैव पृ.क्र. ४८

३) कुळकर्णी, प्रा. अरविंद वामन, 'साहित्य विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १५ जुलै १९९७, पृ.क्र. १७१

४) उ.नि. महाजन, डॉ. वंदना, 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य', पृ.क्र. ५२

५) तत्रैव पृ.क्र. ५३

६) तत्रैव पृ. क्र. ६५.

७) तत्रैव पृ.क्र. ६६.

८) तत्रैव पृ.क्र. ६७

९) तत्रैव पृ.क्र. ६९


***

# बहिणाबाईची लेक : सीताबाई भोजने

डॉ. नम्रता बागडे
मराठी विभाग प्रमुख, उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद

पृथ्वीवर मानव निर्मिती झाली असेल त्या सुरुवातीच्या काळात जो या देशाच्या भूमीवर मातीवर राहत होता व ज्याची ओळख इतिहास आणि पूर्व मानव म्हणून केलेली आहे खऱ्या अर्थाने आदिवासी हाच या भूमीच्या मालक होय. तोच या परिसराचा खरा वारसदार आहे. आदिवासी हा शस्त्र शास्त्रांचा उगम कर्ता मानला गेला आहे. तो निसर्ग जीवनातच आनंद मानणारा आहे आदिवासीकडे लिहिण्या वाचण्याची कमतरता असली संपत्ती व इतर वस्तू कमी असल्या तरी तो असंस्कृत नाही. आदिवासींची संस्कृती ही स्वतंत्र विलक्षण स्वरूपाची असून बोलण्याच्या भाषा पद्धती ही वेगळया स्वरूपाच्या आहेत. आदिवासी किंवा अगोदरच्या काळापासून जंगलात दऱ्याखोऱ्यात राहणारे लोक म्हणजे आदिवासी होय. त्यामुळेच रानावनात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे म्हटले जाते.

आदिवासी सुरुवातीपासूनच या भूमीवर वास्तव्यास आहेत. म्हणून त्यांना मूळचे निवासी, मूळनिवासी म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आदिवासी म्हणजे नक्की काय? हे समजण्याकरता या संदर्भात शीलॉंग येते १९६२ मध्ये जनजाती समिती परिषदेने आदिवासींची केलेली व्याख्या, “आदिवासी हा एक समान भाषा बोलणारा,एका पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा, तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा ऐतद्देशीय एकजिनशी समूह आहे.”[१] त्याच प्रमाणे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, “नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय.”[२]

वरील व्याख्या व स्पष्टीकरणावरून असे लक्षात येते की समाजातील एक विशिष्ट समाज हा जंगलामध्ये वास्तव्य करत होता.

जल, जंगल आणि जमीन ज्यांची अस्मिता होती तो आदिवासी समाज आज वेळेची नजाकत पाहता नागरी समूहा बरोबर राहायला लागला आहे. उदरनिर्वाहासाठी आपल्या परंपरागत कला प्रदर्शना बरोबर तो शेती, मासेमारी, कुक्कुटपालन, शेळी पालन करतो. प्रत्येक आदिवासी कुटुंबामध्ये एक तरी पाळीव प्राणी असतेच. आपली वनसंस्कृती अद्याप सोडली नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे तुकाराम महाराजांनी त्यांना पाहूनच म्हटले की काय असे वाटते.

लोकगीते आदिम संस्कृतीचा आत्मा आहे. त्यांनी आपली संस्कृती लोकगीतांच्या माध्यमातून परंपरागत जपली आहे. काव्यनिर्मिती आदिवासी समाजाच्या रक्तातच भिणली आहे, असे म्हटले तरी चालेल आज या शोधनिबंधात आदिवासी कवयित्री सीता भोजने यांच्या काव्यातून त्यांचे जीवनदर्शन मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सीता भोजने ही एक शेतकरी आदिवासी कवयित्री आहे. परंपरागत आदिवासींचे जंगलातील जीवन जसे कष्टप्रद होते, तीच परंपरा नागर समाजात राहत असली तरी निसर्गाने तिला सोडू दिली नाही. भारतीय शेती तशीही पावसाच्या दयेवरच अवलंबलेली.त्यामुळे दुःख, दारिद्र्य, कष्ट, वेदना, अंधश्रद्धा यांची साडेसाती शेतकऱ्याला कायम लागलेली असते मग सीता भोजने त्यातून कशी सुटणार! आपल्या वेदनादायी जीवनाचे वास्तव दर्शन ती शेतात राबता राबता, घरात काम करत असताना सूचतील तसे शब्दबद्द करते. यासंदर्भात डॉ. संजय लोहकरे म्हणतात, "जगणं भोगणं आणि कवितेत विलीन होणं हा कवयत्री सीता भोजने यांच्या कवितेचा ध्यास. बहिणाबाईची लेक म्हणून महाराष्ट्राला ओळख असलेली सीताबाई आपल्या जगण्याचे प्रतिबिंब कागदावर रेखाटते रांगोळी रेखाटावी तसं!"[३] एका बाजूला कविता आणि एका बाजूला तिचं जगणं सारख्याच मोलाचं. 'रात्रंदिना आम्हा युद्धाचा प्रसंग' तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे शेतकरी कष्टात जन्मतो, कष्टातच मरतो. कष्ट त्याला जीवनभर साथ- संगत करत असतात. 'शेतकऱ्याच्या दुःखाची जात' निराळीच आहे.

निसर्गातील ऋतुचक्राप्रमाणे शेतकऱ्यांच्या जीवनात ऋतुचक्रामुळे फेरबदल होतात. त्यांचे जीवन निसर्गातील ऋतुचक्रावरच अवलंबून असते. शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख-दुःख, हसू –आसू ऋतुचक्रावर कसे अवलंबून असतात याचे चित्रण 'गरिबा घरी जन्मा यावे'या कवितेतून कवयित्री मांडताना लिहिते,

"गरिबा घरी जन्मा यावे
तिन्ही ऋतूंना सामोरे जाण्यास
ऊन वारा पाऊसधारा
निधड्या छातीवरती झेलण्यास"४

शेतकऱ्याच्या जीवनात पावसाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे विशेषतः मृग नक्षत्राचे चे पाणी. मृगाच्या पावसापासून शेतकऱ्यांच्या कामाला सुरुवात होते.याच नक्षत्रात बी पेरले जाते. विशेषतः भाताच्या पिकासाठी या नक्षत्राचा पाऊस अतिशय महत्त्वाचा आहे. हा नक्षत्र पडला तर भाताचे पीक वेळेवर व उत्तम येते. पेरणी केल्यावर जर मृग नक्षत्राचा पाऊस पडला तर शेत कसे दिसायला लागते ते 'आवणीच्या दिसात' या कवितेत सीताबाई लिहितात,

"आला मिरगाचा पाणी
उता टाकला टाकला
असा तरारला रॉप
वाऱ्यावर झळाळला
आवणीच्या दिसामंधी
लगीन लागं माणसांचा
खोती ठरवाया रोज
घरोघर म्या जायाचा"५

रोप वाढले की त्याची रोवणी वेळेवर व्हायला पाहिजे. खेड्यापाड्यांमध्ये अशा वेळी मजुरांची फार टंचाई भासते. आपल्या शेतातील रोवणी लवकर व्हावी म्हणून मजुरांची मनधरणी, गयावया करण्यासाठी घरोघर फिरावे लागते. याचे वास्तव दर्शन सीताबाई देतात.

आदिवासी जरी नागर समाजात राहायला आला असला तरी त्याने निसर्गाची साथ सोडलेली नाही. त्यांची शेतं डोंगरावर किंवा डोंगराच्या पायथ्याशी असलेली दिसतात. याचे प्रतिबिंब 'शेती' या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

"शेता गं मध्ये शेत, माझे डोंगराचे आड
शेत माझा पाणमळा, बांधोबांध उभे झाड
शेता गं मध्ये शेत, माझे गावाहून दूर
शेतात पिकतातमठ, मूग, चवळी, तूर"६

अशा दुर्गम भागामध्ये हा आदिवासी शेतकरी जिवापाड कष्ट करतो आणि पिकातील अनेक रंगांमध्ये आपल्या जीवनातील नानाविध समस्यांचे नानाविध दुःख विसरतो.

शेतकरी हा अशिक्षित भोळा, गरीब आणि अतिशय श्रद्धाळू प्राणी. त्यामुळे त्याच्यावर अन्याय करणं सहज सोपं असतं. कोणतीही जमिनीशी संबंधित योजना असेल तर गरीब शेतकऱ्यांच्या जमिनीवर डोळा ठेवला जातो त्यातल्या त्यात आदिवासी शेतकरी असेल तर मग ती जमीन सरकारच्या राजनेत्याच्या हक्काची समजावी! त्यांच्या जमिनी कारखान्यासाठी, एखाद्या प्रोजेक्टसाठी किंवा धरणासाठी सर्रास वापरात आणल्या जातात. हा एक प्रकारचा आदिवासी शेतकऱ्यांवर किंवा शेतकऱ्यांवर अन्याय असतो. शेतकऱ्यांचा शेताचा तुकडा त्याच्या उदरनिर्वाचे एकमेव साधन असते. त्यांच्या कुटुंबाचे भविष्य, भूक – तहान, आनंद त्या शेताच्या तुकड्याशी जोडलेले असते. त्याची शेती म्हणजे केवळ शेतातील माती नसून त्यांची 'जीवनदायीनी माता' असते. तो आपल्या प्राणापेक्षा आपल्या शेतावर प्रेम करत असतो. धरण बांधणे म्हणजे लोकांच्या विकासाला हातभार लावणे अशी व्याख्या केली जाते परंतु ज्या धरणाच्या खाली शेतकऱ्यांची जमीन जाते ते धरण त्यांच्यासाठी मरण घेऊन आलेलं असते. याचे वास्तववादी चित्रण 'धरणा' या कवितेतून रेखाटताना कवयित्री म्हणते

"मया शेतात, बाई धरण बांधला
या ग सरकाराना, घास त्वांडातला ओढीला
सारा नदीचा नय्यार, बाई पाण्यात बुडाला
मया जीवाचा आधार, शॅत तळयात गाडला
मया शेतात बाई, धरण बांधला"७

ह्या पृथ्वीचा मूळ धनी, जंगलाचा राजा असेलेला आदिवासी अशिक्षित आणि भोळा असल्यामुळे तो प्रस्थापितांचा उपहासाचा, चेष्टेचा विषय झाला आहे. हे दुःख मांडताना सीताबाई प्रश्न विचारतात,

“झाडाझुडपात रमलो म्हणून काय झाला?
आम्ही सुदा हाडामासाची माणसा आहोत,
जगण्यासाठी रानावनात हिंडलो म्हणून काय झाला?
कोणापुढे लाचार होऊन भीक त नहीं ना मांगती आम्ही?”८

आदिवासी माणूस हा इतर माणसांप्रमाणे हाडमास असलेला, लाल रक्ताचा आहे. निर्धन आहे पण लाचार किंवा भीक मागणारा नसून निष्ठेने श्रम करणारा, जंगलातील फळे, फुले, रानमेवा विकून आपला प्रपंच सांभाळणारा आदिपुत्र आहे. त्यामुळे कवयित्री आदिवासींची अवहेलना करणाऱ्यांना आदिवासींच्या कष्टाची, मेहनतीची आठवण करून देताना निर्भीडपणे सत्य पटवून देतात. जाती, धर्म व प्रांताच्या चौकटी मोडीत काढून आपण माणूस म्हणून जगलो पाहिजे हा कवयित्रीचा संदेश वैश्विक समतेचा असून कल्याणकारी आहे.

आदिवासी कष्ट करत करत जगत असतो. अज्ञान, निरक्षरतेमुळे त्याच्या कष्टाचे फळही मिळत नाही. प्रमाणापेक्षा जास्त कष्ट त्याला सहन करावे लागते. घड़ा' या कवितेत भोजने म्हणतात :

“तुझ्या काबाडाचा मॉल सांगाया
महयाकं काहीच नई
दिसभर राब उन्हात
रात चिंता काळजीत जाई
तुझ्या काबाडाचा हिशेब ठिवाया
येळ कोणालाच नई
तुह्या घामाचा दाम बुडवणारा
धनीक हारामखोर लई “९

आदिवासी हा भोळा भाबडा असून काही भामटे लोक त्याच्या अज्ञानाचा, गरिबीचा फायदा घेत असतात. श्रीमंत लोक कष्ट करून घेतात; पण त्याला त्याच्या घामाचे दामही देत नाही. त्यामुळे कवयित्री धनिकांना, गरिबांचे लुटमार करणाऱ्यांना शब्दांच्या धारेने फटकारत

आहेत. गरीब व श्रीमंत यांच्यातील अन्यायी दरी त्या कवितेतून अधोरेखित करून सद्य: परिस्थितीचे वास्तव त्या समोर आणतात.

दिवासी कष्ट करत जगतो. त्याला कुणाचेही फुकटचे नको आहे. कवयित्री आदिवासींना नशिबावर विसंबून न राहता स्वकर्तृत्त्वाला महत्त्व देऊन जगावे असा संदेश देते. परिश्रम, मेहनतीने सर्वच साध्य करता येईल. आदिवासींनी आपल्या भविष्याचे शिल्पकार व्हावे, असा संदेश 'माझे कष्टाळू हात' या कवितेतून देताना कवयित्री म्हणतात :

"माझ्या कष्टाळू हातांना
नाही फुकाची कामना
मोल कष्टाच्या घामाचे
हेच ठावं माझ्या मना"१०

कष्टकरी आदिवासींना त्यांच्या घामाचे दाम मिळणे आवश्यक आहे. त्यांना फुकटचे घेण्याची सवय नसून ते जे मिळवतात ते कष्ट करूनच मिळवत असतात. आदिवासी हे श्रमजीवी असल्याचे कवितेतून प्रत्ययास येते. कवयित्री सीता भोजने यांच्या कवितेतून आदिवासींमधील श्रमप्रतिष्ठा हे मूल्य प्रकर्षाने जाणवते.

**सीता भोजने यांच्या कवितेतून व्यक्त होणारे स्त्रीचित्रण**

कवयित्री श्रमप्रतिष्ठा या मूल्याबरोबरच समाजात स्त्री-पुरुष समानता है। मूल्य रुजविण्यासाठी प्रयत्नरत आहे.

स्त्रीचे शोषण, तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार, तिची होणारी कुचबणा, दुय्यमत्वाचा वागणूक यावर कवयित्री भोजने प्रखर भाष्य करते. त्याचबरोबर स्त्रीचे जीवनातील महत्त्व पटवून देतानाच आई, आजी, पत्नी, कन्या या विविध रूपांचा कवयित्री आविष्कार करते. एक स्त्री जन्म घेते. स्त्री ही स्त्रीसाठी धावून येणारी असून स्त्रीच स्त्रीचा आधार असते, हे 'स्त्री'चाच जन्म या कवितेतून पटवून देतात:

"स्त्रीचाच जन्म, सोशीकता ठेवा
जन्मोजन्मी हेवा तुझा, जन्मोजन्मी हेवा
'स्त्री' म्हणून जन्मा आली, स्त्रीच्याच पोटी
जन्मतःच बाई म्हणुनी, उपेक्षिली बेटी
जागतिक महिला दिन, आचरणात ठेवा
हुंडाबंदीसाठी आवाज उठवावा"११

आजही प्रस्थापित समाजात स्त्रीला दुय्यमपणाची वागणूक दिली जाते. मुलगा हा वंशाचा दिवा मानला जातो. परंतु मुलगी जन्माला यायच्या आधीच तिची हत्या केली जाते. जन्माला आलीच तर तिची हेळसांड केली जाते. आज महिलादिन मोठ्या उत्साहात साजरा करतात; पण एकच दिवस, इतर दिवशी मात्र महिलांचे हुडाबळी, अन्याय, अत्याचार चालूच असतात. त्यामुळे कवयित्री या सारख्या अन्यायी रूढी-परंपरांना छेद देत हुंडाबंदीसाठी आवाज उठविण्याचे आवाहन करतात.

स्त्रीजीवनातील अनेक समस्यांचा पाढाच कवयित्री सीता यांनी कवितेच्या रूपाने वाचलेला आहे. स्त्रीचा होणारा छळ, कोंडमारा 'कोंडमारा' या कवितेतून व्यक्त झाला आहे :

"त्याग सोसला सोसला
जीवाचा हा कोंडमारा
तुझ्या जीवाला नव्हता
सासऱ्या मय्याराचा थारा ...
त्याग सासऱ्या सोसला
समद्या माणसांचा सल
बाई माणूस म्हणून
लई सोसलंत हाल"१२

एका स्त्रीला लहानपणापासून ते काळाच्या आड जाईपर्यंत स्त्री म्हणून आपले दुःख गिळत, सहन करत आयुष्य व्यतीत करावे लागते. सासरी-माहेरी स्त्री म्हणून सर्वांचा त्रास सहन करावा लागतो. स्त्रीजीवनातील ही सल कवयित्री शब्दबद्ध करते. त्याचबरोबर जीवनातील स्त्रीचे महत्वही ती अधोरेखित करते. आदिवासी संस्कृती ही मातृसत्तासक संस्कृती आहे. कुटुंबात आईचे स्थान महत्त्वपूर्ण असते. मुलांना घडवण्यामध्ये आईचे संस्कार, तिची प्रेरणा अतिशय महत्त्वपूर्ण असते. कवयित्री 'माहेरचा गंध' या कवितेतून 'आई'ची महती पटवून देताना म्हणतात :

"आई, तुझं आईपण
आई झाल्यावर कळे,
माझ्या हृदयी पेरले
तूच वात्सल्याचे मळे

आई, तुझ्या आठवणी
माझ्या जीवनाचा ठेवा
आई, पुढच्या पिढीत
तुझा संस्कार मुरावा"[१३]

आईची महती थोर असते, आई ही आईच असते. कवयित्री आईचे महत्त्व विशद करताना पुढील पिढीतही संस्कार रुजले पाहिजे, अशी आशा व्यक्त करते. स्त्रीचे जीवनातील महत्त्व हे अनन्यसाधारण असूनही तिला समाजात, कुटुंबात अन्यायी वागणूक देतात. त्यामुळे शोषण, अत्याचाराला ती सहन करत कंटाळवाणे जीवन जगत आहे. 'तिची मूक वेदना' या कवितेत कवयित्री म्हणतात:

"तिला डांबले – डांबले
चार भिंतींच्या घरात,
मूक वेदनेचा सल
रोज सलतो उरात
तिला छळले पिळले
रोज टोमणे मारले
जितेपणी यातनेचे
जसे मरण मरले"[१४]

स्त्रीला होणाऱ्या वेदना, यातना या मरणापेक्षाही त्रासदायक आहेत. पुरुषांनी लावलेली बंधने झुगारुन देऊन तिने पुरुषी दास्यातून मुक्त व्हावे. स्त्रीच्या अन्यायाविरुद्ध स्त्रीयांनीच एकत्र येऊन लढा द्यावा असे आवाहन करते.

कवयित्री सीता भोजने यांनी स्त्री वास्तव जवळून पाहिलेले असून अनुभवलेही आहे. आदिवासी स्त्री रानावनातून अनवाणी फिरत लाकडे, जमा करते. हे सर्व ती अनेक संकटे डोळयांसमोर असूनही जीवावर उदार होऊन मत असते. आदिवासी स्त्रीचा हा कष्टमार्गी प्रवास कवयित्री 'चुकले न कधी या कवितेतून व्यक्त करते

"चुकला न कधी
मला लाकडांचा भारा,
रोजच चटका देई

चुलीचा निखारा
चुकले न कधी
मला घर आवरणे
दुबळवाडीतून सदा
स्वतःला सावरणे"१५

या जीवघेण्या प्रवासात स्त्रीला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर घरातील अनेक कामेही करून गरिबी व अठराविश्वे असणाऱ्या दारिद्र्याशी सामना करत आपले कुटुंब सांभाळत कराव्या लागणाऱ्या कसरतीचे वास्तव चित्रण कवयित्रीने शब्दबद्ध केलेले आहे. कवयित्रीने स्त्रीच्या जीवनातील आर्त वेदना भावस्पर्शीपणे कवितेतून मांडलेल्या आहेत.

'डोंगरमाथा' कवितासंग्रहातून 'स्त्री'च्या अनुषंगाने अनेक कविता आलेल्या आहेत. 'स्त्रीचाच जन्म', 'तूच', 'स्त्रीशक्ती', 'सवित्रीबाईची कृपा', 'नारी', 'लक्ष्मीची रूपे', 'माहेरचा गंध', 'पाळण्यात प्राण माझा', 'बाळाचा रुसवा', 'तूच जगत जननी', 'माझी सखी' इत्यादी कवितांतून 'स्त्री'च्या भावविश्वाचे वेगवेगळे पदर उलगडून दाखविण्याचे कार्य कवयित्री सीता भोजने यांची कविता करते.

प्रसिद्ध साहित्यिक, कवी, लेखक डॉ. संजय लोहकरे कवयित्री सीता भोजनंविषयी म्हणतात, "कवयित्री सीता भोजने या कष्टकरी स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवयित्री आहेत. श्रमप्रतिष्ठेचे अनेक कंगोरे त्यांच्या कवितेने व्यापले आहेत. श्रमाला देवता मानून त्याची पूजा करत जगणारी स्त्री कवयित्रीने उभी केली आहे."१६ अर्थातच कवयित्री सीता भोजनेंची स्त्रियांविषयीची तळमळ दिसून येते. त्या आपल्या काव्यातून स्त्रियांना लढण्याचे बळ देतात.

**सीता भोजने यांच्या कवितेतील शिक्षणाचे महत्त्व**

आदिवासींच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य करतानाच शिक्षणाचे १. महत्त्वही कवयित्री सांगायला विसरत नाहीत. सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी शिक्षणाची गंगा आणून आदिवासींसाठी महत्कार्य केलेले आहे. म्हणून कवयित्री 'सावित्रीबाईची कृपा या कवितेत म्हणतात :

"सावित्रीबाईची कृपा, दृष्टी न्यारी,

‘स्त्री’ शिक्षणाने ‘उद्धरली’ नारी
शिकलेली आई बाळा अभिमान
भारतमातेची कन्यारत्ने शान
...सावित्रीबाईना माझा दंडवत,
त्यांच्या विचारांचे स्वीकारले व्रत”१७

स्त्रियांना शिक्षणाने दिशा मिळालेली असून त्यांचा विकास घडवण्याचे कार्य केलेले आहे. शिक्षण ही काळाची गरज असल्याचे कवयित्रीने व्यक्त केलेले आहे. शिक्षणाबरोबरच कवयित्री श्रमालाही महत्त्व देते. विद्या हे अनमोल रत्न असून जानाचा वसा घेऊन संघर्षरूपी जीवनात आपले ध्येय प्राप्त करण्याचे, नवपरिवर्तन घडविण्याचा सल्ला कवयित्री आदिवासी बांधव-भगिनींना देतात.

कवयित्री सीता भोजने यांची कविता आदिम जाणिवेचे अनेक पदर उलगडते. आदिवासींच्या कृषिनिष्ठ जीवनसृष्टीचा आशय चितारणारी त्यांची कविता आहे. कवयित्री जे जीवन जगल्या त्या जीवनाचे विविध पदर आणि निसर्ग सान्निध्यातील विविध जाणिवा, संवेदना कवितेत मांडतात. आदिवासी जीवनदृष्टी, कृषिनिष्ठ समस्या, स्त्रियांच्या समस्या, राजकीय दृष्टिकोन, प्रस्थापितांची अन्यायी वागणूक या सर्व आशयमूल्यांना कवेत घेत ही कविता आदिम जीवनजाणिवा व्यक्त करते.

सभोवतालच्या निसर्गाचे निरीक्षण, अभ्यास आणि चिंतन या सगळ्यांतून एक विवक्षित काव्यविषयक जीवनदृष्टीतून भोजने यांची कविता निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांची कविता नव्या मूल्यजाणिवा व्यक्त करणारी आहे.

**निष्कर्ष :**

१) आदिवासी हा धरतीचा आदी पुत्र आहे.
२) प्रस्थापितांच्या साहित्यातील आदिवासी बद्दलच्याअनास्थेतून आदिवासी साहित्याची सुरुवात झाली.
३) आदिवासींची एक स्वतंत्र सांस्कृतिक अस्मिता आहे.
४) जल, जंगल आणि जमीन आदिवासींचा आत्मा आहे.
५) आदिवासी अशिक्षित आणि भोळा असला तरी प्रामाणिक व कष्टाळू आहे.
६) आदिवासींच्या भोळेपणाचा फायदा समाज, सरकार व राजनेते घेताना दिसतात.

७) शिक्षणाची महती कळल्यामुळे आदिवासी आज शिक्षण घेत आहेत.

८) आदिवासी समाज स्त्रीप्रधान असला तरी नागर संस्कृतीच्या संपर्काने स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे.

९) आदिवासी स्त्री शोषित दिसते.

**संदर्भ:**


१) प्रदीप आगलावे, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, २००७, पृष्ठ क्र.२

२) लक्ष्मणशास्त्री जोशी,' मराठी विश्वकोश', खंड दुसरा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, नोव्हेंबर१९८६, पृष्ठ क्र.२८

३) संजय लोहकरे, 'रानफुलांच्या कविता', (निवडक आदिवासी कविता), मारुती आढळ (संपादक), अक्षता प्रकाशन, पुणे२०१४, पृष्ठ क्र.१५,१६

४) सीता भोजने, 'डोंगर माथा', प्रकाशक, कांचनताई थोरात, संगमनेर,२०१३, पृष्ठ क्र.३३

५) सीता भोजने,'डांगर गाणा', मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती,२०१७, पृष्ठ क्र.१७

६) तत्रैव, पृष्ठ क्र.४०

७) सीता भोजने, 'डोंगरमाथा' उनि. पृष्ठ क्र.२३

८) सीता भोजने, 'डांगर गाणा', उनि पृष्ठ क्र.३०

९) तत्रैव पृष्ठ क्र.३७

१०) सीता भोजने, 'डोंगर माथा' उनि पान नं.६६

११) तत्रैव पान.नं.१८

१२) सीता भोजने, 'डांगर गाणा', उनि, पान नं. २३

१३) सीता भोजने 'डोंगर माथा', उनिपान.नं.५०

१४) तत्रैव, पान. नं.७९

१५) तत्रैव पाननं३४

१६) संजय लोहकरे, 'डांगर गाणा', (प्रस्तावना) सीता भोजने, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, २०१७, पान नं.०५

१७) सीता भोजने, 'डोंगर माथा', उनि. पान नं.३१


***

# समकालीन स्त्रीसंवेदनांची अलवार गुंफण

## मयुरी शरद पवार

'कविता हे शारदेचं देणं, भाषेच्या सौभाग्याचे लेणं, पहाटेच्या वेळी आपण प्राजक्ताच्या झाडाखाली उभे रहावे, अचानक झाड कुणीतरी गद्‌दा हलवावे आणि अंगावर टपटपणाऱ्या ओलसर शुभ्र फुलांच्या सुगंधी कोमल वर्षावाने आपण सुखावून जावे. तशी काहीशी अवस्था या अलवार क्षणातील कविता वाचताना होते.

या कविता संग्रहामधल्या प्रत्येक कवितेत जिवंतपणा, ताजेपणा व लोभनियता हे गुण ओतप्रोत भरलेले क्षणोक्षणी जाणवतात. भाषा निवेदन पद्धती, प्रतिमासृष्टी, आशय यामध्ये विविधता पाहायला मिळते. कवयित्रीचा मनोभाव हा आनंदी, आशावादी असावा. त्यातूनच भोवतालच्या निसर्गाचे दर्शन घेताना प्रसन्न रुपाचेच ठसे कवयित्रीच्या मनावर अधिक तीव्रतेने उमटलेले दिसतात. तोच प्रसन्नतेचा आलेख तितक्याच प्रसन्न शब्दकळेसह त्यांच्या काव्यात साकार होतो. त्या दृष्टीने पुढील शब्दचित्रे वाखाणण्याजोगी आहेत.

"पूर्वा पाहटताना साखर झोपेत पक्षी
उंबऱ्यात नभाच्या कोण रेखिते गं नक्षी" (प्राची)

किंवा

"नाजूक कशिद्यावरी अलवार रंगरेषा
हलक्या हातांनी भरते गं उषा" (उषःकाल)

प्रस्तूत ओळी वाचताना कवयित्रीच्या तरल मनाचेच घडोघडी दर्शन होते. तसेच सूर्य मावळताना पश्चिमेचं वर्णन करताना त्या म्हणतात,

"पश्चिमेला रंगला आरसपाणी विडा
कांचनी न्हाल्या गं बिल्वर कडा" (कातरक्षण)

किंवा

"गहिरे नभ सोनरंगात न्हाले

क्षितिजाचे गाल कुसुंबी झाले " (क्षण सावळा)

अशा प्रकारे विविध प्रतिमांच्या साहाय्याने निसर्गाची विविध रुपे लाघवीपणे रेखाटताना कधी-कधी कवयित्रीचा मनोभाव हा उदास असल्याचेही जाणवते उदा.

"गढुळल्या डोहापरी गोऱ्या नभाचा रंग

का गं सुने सुने आज चांदण्याचे अंग?"

असा अनामिक प्रश्नही तेवढयाच लोभसपणे विचारुन जाते. 'व्याकुळले शेत' या कवितेत कवयित्री पावसालाच आर्जव करते.

"मांडलेला यज्ञी शिंप हलकासा सडा

भर सुवासिन ओटी जाण्याआधी तडा"

इथे भूई भेगळण्याआधी पावसाच्या सरी येवू दे हि विनंती करताना वापरलेली प्रतिमा मनाला आनंद देवून जाते. तसेच 'नभास साद' या कवितेत रुसलेल्या मेघाची समजूत काढण्यासाठी कवयित्री म्हणते,

"तव नयनी दिसे भरलेला कृष्णकाठ

सांत्वनास तुझ्या घ्यावी म्हणते रे गाठ"

अशा प्रकारे मेघांचे सांत्वन कवयित्री साध्या, सरळ, सोप्या भाषेत करताना दिसून येते. त्याचप्रमाने अगदी आर्त साद घालून वरुणाला विनवणी करते की,

"मांडल्या पाटावरी ठेव पाऊल घना

ये झडकरी ताट केलय औक्षणा"

या ओळी साक्षात डोळयासमोर वरुणाच्या औक्षणाचे चित्र उभे करतात. आणि त्यानंतर पाऊस पडल्यावर

"ओलेत्याने नेसेल धरा पाचू माखला शालू

कालीदासी स्तब्ध मेघदूत लागेल चालू"

असे भावगर्भ वर्णन करतात. पाऊस पडून धरा, डोंगर चिंब ओले झाल्यानंतर कवयित्री खट्याळपणे विचारते,

"मृगनक्षत्री न्हाल्या सह्याद्रीच्या रांगा

थेंबाने पाहिल्या कोण शहारल्या रांगा ? " (सह्याद्री)

याच कवितेत अखेरच्या कडव्यात,

"अभिसरितांच्या समर्पणाचा हाच गं मधुमास

मेघ आलिंगिती पर्वता भेटीचा क्षण खास"

असे पर्वत आणि मेघाच्या भेटीचं प्रसन्न वर्णन करतात. बळीराजाचं जीवन सुखी करणाऱ्या या पावसाबरोबरच जेव्हा अवकाळी पाऊस थैमान घालतो. त्याच्या रौद्ररुपाचे दर्शन झाल्यावर कवयित्री वरुण राजाचा मुलगा पुष्करच्या रुपानेच त्याला साद घालतेय हे विशेष.

"सुख बरसावे

व्हावे वाऱ्याचा श्वास चिरंजीव पुष्कराने

इथे मांडावी रास"

मात्र हाच पर्जन्य वेळेवर आल्यावर कवयित्री आनंदून जाते. त्यावेळी लिहिते,

"अंगणात माझ्या चिंब आषाढ घन

कसे आवरु सावरु हे वेल्हाळ मन" (सृजन सोहळा)

याच कवितेत पुढे

'आता फिटली हळद नवे लुगडे चोळी

वेलबुट्टीत सरसावल्या हिरव्या ओळी"

छान प्रतिमांचा वापर करुन लिहिलेली प्रतिभासंपन्न कविता असेच या कवितेला म्हणावे लागेल.सूर्योदय,सूर्यास्त, पावसाची विविध रुपे त्याचबरोबर निसर्गाची इतर विलोभनिय रुपे कवयित्रीनी मांडली आहेत. उदा.

"सत्यभामेसी मुळे अन् रुक्मिणीस फुले

कुसुमकांती राधेचे अंग अंग उले" (प्राजक्त)

तसेच

"रुप्याचा वर्ख लावूनी जाहली साजरी गोजरी

गोरज चरणांवरी दांडादांडात हसली बाजरी" (बाजरी)

निसर्गाच्याच मात्र जरा वेगळ्या रुपाचे उदाहरण म्हणजे गायी वासराची ताटातूट ही कविता दूध देणारी गाय गोठ्यात राहते मात्र वासरु कसायाला दिले जाते. हा मन हेलावून टाकणारा प्रसंग म्हणजे 'मातृत्वाची झोळी' ही कविता.

"हा तुटता धागा जर सांधता आला

तिच्या नेत्रातील कृतार्थ नीर येथे ढळेल जेंव्हा

स्वर्ग झाला धरेचा कळेल देवा देवा"..

अशा प्रकारे गोदेवतेचा महिमा सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'सती' या कवितेत कवयित्री आहिल्या, द्रौपदी सीतेलाच सडेतोड प्रश्न विचारते कि,

"आमची भरलेली ओटी सातजन्माने पुन्हा

मोक्ष मुक्ती सांगा अगं पुसायची कुणा ?"

तेव्हा मन भारावून जाते. 'फुलपाखरु' कवितेत कवयित्री खट्याळपणे फुलपाखरालाच प्रश्न करते की,

"गिरक्या घेता घेता मान अवटाळते का?

मधूघट सेवताना फुलराणी कवटाळते का ?"

या ओळी निसर्गातील चित्र चक्क डोळयासमोर उभे करतात. 'बळी' या कवितेत शेतकऱ्याच्या विवेचनेसाठी निसर्गाला विनवणी करणारी कवयित्री त्या बळीराजाचं संवेदनशिल मन साकारताना म्हणते,

"बांधाबांधावर फुलल्या भोपळयाच्या वेली

सरी वरंब्यावरी गर्भारल्या लेकीपरी केळी"

निसर्गातील विविध रुपकांच्या प्रती असलेली केवढी ही तरल भावना.

अशा प्रकारे निसर्गाची प्रसन्न रुपे कवयित्रीच्या मनावर विशेष तीव्रतेने ठसतात. त्याप्रमाने दैनंदिन जीवनातील साधीसुधी निर्मळता त्या उत्कटतेने मांडतात. उसवलेल्या दुःखालाही 'टाके' घालणारे मन त्यांनी ऋणानुबंधात जपून ठेवले आहे. सर्वत्र वैफल्य, विकृती, निराशा,

बेफिकिरी, निःसंगपणा याचेच प्रदर्शन आज आपल्याला बाहेरच्या जगात दिसत असले तरी आपल्या प्रसन्न, भावूक, हळव्या आणि आशादायी मनाची जपणूक कवयित्रीने केलेली घडोघडी जाणवते. इतकेच नव्हे तर आपल्या कवितेतून हे मन त्यांनी निःसंकोचपणे प्रकट होउ दिले आहे. हा त्यांचा प्रमाणिकपणा मला फार मोलाचा वाटतो.

निसर्गाबद्दल वाटणारा जिव्हाळा हे या कवितांचे आणखी एक लक्षणीय वैशिष्टे. हा त्यांचा उमाळा वरवरचा,निव्वळ कवितेपूरता दिसून येत नाही तर शेती, शेतकरी, माती, पाणी, झाडे आणि बदलता ऋतू यांच्याशी असलेले रक्ताचे नाते जीवंतपणाने त्यातून जाणवते. निसर्गाशी जडलेली ही कवीमनाची सोयरीक त्यांच्या कवितेला वेगळे परिमाण देते.

कवयित्रीने वर्णन केलेल्या निसर्गाच्या या विविध अलवार रुपात कुठेही उपरेपणा नाही ते जीवंत व प्रत्ययकारी असेच आहे. या कवयित्रीचे मला जाणवलेले आणखी एक विशेष हे की कवितेत जे येते ते प्राजंलपणे, मोकळेपणाने येते. साध्यासुध्या परिचित शब्दकेळेचा आश्रय घेवून येते. विक्षिप्त प्रतिमा, दुर्बोध क्लिष्ट शब्दसमूह,अट्टाहासाने बनविलेली अवजड प्रतिमाने या कवितेत कुठेच आढळत नाहीत. तर मनाची व्याकुळता सहजगत्या व्यक्त झालेली दिसून येते. त्यामुळे सर्व कवितांना एक घरगुती, मनमोकळे आणि जिव्हाळयाचे स्वरुप आपोआप लाभले आहे. ज्या निसर्गाशी कवयित्री नाते सांगते त्याचेच घरदांज, कुलीन, स्वागतशील आणि जिव्हाळयाने ओतप्रोत भरलेले असे मन त्यांच्या कवितेतून प्रकट झाले आहे. हे मन माझ्याप्रमाने इतर वाचकांशीही संबाद साधील, आयुष्यातील काही क्षण अलवार आनंदाचे होतील अशी मला खात्री वाटते.

**संदर्भ सूची**

१) अलवार क्षण-रोहिणी मच्छिंद्र घोलप,परिस पब्लिकेशन, पुणे. प्रथम आवृत्ती २०२३

***

# साठोत्तरी काळातील तृतीयपंथीयांचे काव्य लेखन

(विशेष संदर्भ : कुरूप)

**कांचन रामदास मुखेडकर**

संशोधक विद्यार्थी, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रवाहावर मोठ्या प्रमाणात चर्चा व संशोधन झालेले आहे. पण ज्यांची आजही समाजाने 'माणूस' म्हणून ओळख करून घेतली नाही अशा तृतीयपंथीयांनी लिहिलेल्या वाङ्मय प्रकारावर चर्चा झालेली दिसत नाही. जेथे तृतीयपंथीयांना समाज माणूस म्हणून मान्यता देत नाही तेथे त्यांच्या साहित्यावर विचारमंथन होणे तर दूरच...! आपल्यापेक्षा इतरांना तुच्छ लेखणे ही मानवाची सहज प्रवृत्ती. खरे तर कोणत्या जातीत, कोणत्या धर्मात किंवा कोणत्या लिंगात जन्म घ्यावा हे माणसाच्या हातात नसतेच.

मानवी समुदाय प्राचीन काळापासून स्त्री आणि पुरुष अशा दोन वर्गात विभागला गेला आहे. यापेक्षा तिसऱ्या वर्गाचा म्हणजे तृतीयपंथीयांचा समाजाला विसरच पडलेला आहे. तृतीयपंथीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने विविध योजना निर्माण केल्या पण त्या कागदावरच आहेत. प्रत्यक्ष तृतीयपंथीयांपर्यंत त्या योजना पोहोचताना दिसत नाहीत. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यापासून ते आजही दूर आहेत. बाजारात, रस्त्यावर, बसस्थानकात, रेल्वे स्थानकात, रेल्वेत डोक्यावर मायेचा हात फिरवत चार-दोन पैसे मागणारा हा समुदाय. टाळी नाही तर थाळी नाही अशी त्यांची अवस्था. असंख्य प्रश्नांना तोंड देत त्यांना जगण्याच्या वाटा शोधाव्या लागतात. त्यांना सतत अपमानास्पद वागणूक दिली जाते. माणूस

म्हणून जगण्यासाठी ते धडपडत आहेत पण इथल्या व्यवस्थेकडून त्यांची सतत हेटाळणी केली जाते.

खरे तर बहुसंख्य तृतीयपंथी हे अशिक्षित आहेत. समाजाच्या त्रासापोटी, भीतीपोटी शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत ते पोहोचतच नाहीत. अनेक तृतीयपंथीयांच्या वेदना, दुःख हे शब्दात न मांडण्यासारखेच आहे. अशा परिस्थितीतही अलीकडे काही तृतीयपंथी कार्यकर्ते जुन्या वाटेने जगण्यापेक्षा जगण्याच्या नव्या वाटा शोधत आहेत. आपल्या साहित्याद्वारे तृतीयपंथी समुदायाला नवी दिशा दाखवत आहेत. तृतीयपंथीयांना सन्मानाने जगता यावे, त्यांनाही सर्वसामान्य माणसांसारखाच न्याय मिळावा या हेतूने काही तृतीयपंथी कार्यकर्ते समाजाशी, शासनाशी संघर्ष करीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी कवयित्री दिशा पिंकी शेख, गौरी सावंत, शमिभा पाटील, सारंग पुणेकर, लक्ष्मी त्रिपाठी यांचा उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत शोधनिबंधातून दिशा पिंकी शेख यांच्या कुरुप या बहुचर्चित कवितासंग्रहातील विद्रोही भूमिकेवर चर्चा करण्यात आली आहे.

**तृतीयपंथी म्हणजे काय ?**

तृतीयपंथी समुदायाबद्दल समाजात बरेच गैरसमज पसरले आहेत. तृतीयपंथीयांना समजून घेण्यापेक्षा त्यांचा तिरस्कार करणारे लोक समाजात जास्त आहेत. म्हणून तृतीयपंथी म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे. “प्रत्यक्षात ज्या व्यक्तीचे शरीर पुरुषाचे, मात्र मानसिकता, हावभाव, वर्तणूक, बोलणे-चालणे पूर्णपणे स्त्रीचे आहे, अशा व्यक्तीला तृतीयपंथी म्हणतात. सर्वसाधारणपणे जन्मतःच ज्यांच्या लिंगात विकृती निर्माण झालेली असते किंवा ज्यांच्या शरीरात संप्रेरकाचे (हार्मोन्स) असंतुलन निर्माण झालेले असते किंवा ज्याची वाढच पूर्णपणे मुली व स्त्रियांच्या प्रभावाखाली आल्याने वर्तणूक स्त्रियांसाठी होते किंवा जे विविध कारणांसाठी लिंग विच्छेदनाचा मार्ग

स्वीकारतात. अशा सर्व व्यक्तींचा तृतीयपंथीयांमध्ये समावेश होतो. तृतीयपंथीयांना हिजडा, पवय्ये, खोजे, बंदे, देवडा, फालक्या, फातडा, मंगलमुखी आदी संबोधनांनी ओळखले जाते."[१]

तृतीयपंथी समुदायाचे अभ्यासक डॉ. मारोती कसाब तृतीयपंथीयांची ओळख करून देताना लिहितात, "लिंगाधारित भेदभावाचा बळी ठरलेल्या एल.जी.बी.टी.क्यू. (लेस्बिअन,गे, बाय सेक्सुअल, ट्रान्स जेंडर आदी) व्यक्ती समूहातील पारलिंगी स्त्रियांचा एक मोठा वर्ग आपल्या देशामध्ये आहे. 'तृतीयपंथी', 'हिजडा', 'मिठ्ठा', 'छक्का' आणि 'किन्नर' आदी नावांनी तो ओळखला जातो आणि याच नावांनी हिणवलाही जातो. ह्या वर्गातील स्त्रिया वयाच्या १० व्या, १२ व्या वर्षापर्यंत पुरुष म्हणूनच आपल्या घरात आणि समाजात वावरतात. नैसर्गिक लिंग वाढीच्या काळात त्यांच्यामध्ये हा बदल जाणवतो आणि पुरुषाची स्त्री झाल्याचा वरकरणी भास होतो. यालाच इंग्रजीत 'ट्रान्स जेंडर' आणि मराठीत पार लिंगी असा शब्द वापरला जातो.

गर्भात राहिलेल्या बाळाला स्त्री, पुरुष किंवा पार लिंगी अशा स्वरूपाची ओळख ही निसर्गतःच लाभलेली असते. यातील काही बाळं पूर्णपणे पुरुष असतात, काही पूर्ण स्त्रिया असतात तर काही दोन्ही असतात म्हणजेच उभयलिंगी असतात. म्हणजेच बाह्य रूपावरून जरी एखादे मूल पुरुषासारखे दिसत, बोलत असले तरी त्याची अंतर्गत जाणीव ही स्त्रीत्वाची असू शकते. पुरुष असूनही ज्याला आपण स्त्री आहोत असे वाटते किंवा आपल्या भावना या स्त्रियांसारख्या आहेत अशी जाणीव होते, अशा स्त्रियांना पार लिंगी स्त्रिया असे म्हणता येईल."२

**दिशा पिंकी शेख यांचा परिचय :**

दिशा पिंकी शेख या तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्त्या आहेत. नाशिक जवळ येवले हे त्यांचे गाव. विषमतावादी व्यवस्था नाकारत

तृतीयपंथीयांना सन्मानाने जगता यावे यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात. 'शब्दवेडी दिशा' या नावाने फेसबुकवर त्या सामाजिक विषयावर लेखन करीत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांची 'तृतीयपंथी विकास महामंडळाच्या' सदस्यपदी निवड केली आहे. 'वंचित बहुजन आघाडी'च्या त्या प्रवक्त्या आहेत. राजकीय पक्षाच्या प्रवक्तेपदी निवड होणाऱ्या त्या पहिल्याच तृतीयपंथी आहेत. आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे.

तृतीयपंथीयांच्या दुःखाला, वेदनेला शब्दात मांडत त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. साहित्य अकादमीच्या मंचावरून मराठी कविता सादर करणाऱ्या त्या पहिल्या तृतीयपंथी आहेत. मुंबईच्या 'शब्द पब्लिकेशन'या नामांकित प्रकाशन संस्थेतर्फे त्यांचा 'कुरूप' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. या कवितासंग्रहातून त्यांनी इथल्या विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध चीड व्यक्त केली आहे. 'कुरूप' या शीर्षकाविषयी शर्मिष्ठा भोसले लिहितात, "पायात रुतलेले काटे तिथेच राहिल्याने ठसठसणारं जे काही उमटतं, ते असतं कुरूप. हा शब्द आजही ग्रामजीवनात वापरतात. स्वतःच्या कवितेला दिशा 'कुरूप' म्हणते. ते अनेकार्थाने खरं असल्याचं संग्रहभर जाणवतं."[३] तृतीयपंथीयांच्या व्यथा, वेदनेचा जाहीरनामा मांडणारा मराठी भाषेतील हा पहिलाच कवितासंग्रह असून या कवितासंग्रहातील निवडक कवितेवर जमीर कांबळे यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रभर नाट्यप्रयोग होत असतात.

**कुरूप कवितासंग्रहातील विद्रोही भूमिका :**

विद्रोह ही संकल्पना प्राचीन आहे. जेव्हा जेव्हा अन्याय, जुलूम, छळ यांचा अतिरेक होतो तेव्हाच विद्रोहाचा जन्म होतो. आपल्यावर होत असलेली गुलामगिरी झुगारून देणे म्हणजेच विद्रोह. फ्रेंच तत्त्वज्ञ अल्बेर काम्पू म्हणतात, 'आज विद्रोहाची संकल्पना खूपच व्यापक

बनली आहे. तो केवळ गुलामाचा मालकाविरुद्ध, गरीबाचा श्रीमंताविरुद्ध, व्यक्तीचा समाजाविरुद्ध असा विद्रोह नसून व्यक्तीचा विश्वाविरुद्ध विद्रोह असे व्यापक स्वरूप त्याला प्राप्त झाले आहे.'[४] असा विद्रोह तृतीयपंथीयांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. तृतीयपंथी हा शब्द उच्चारला की अनेकांच्या भुवया उंचावल्या जातात. नानाविध दुषने लावून तृतीयपंथीयांना अपमानित केलं जातं. बहुसंख्य तृतीयपंथी हे अशिक्षित असतात. त्यामुळे त्यांच्या व्यथा, वेदना त्यांना शब्दात मांडता येत नाहीत. 'कुरूप' या कवितासंग्रहातून दिशा पिंकी शेख यांनी विद्रोही भूमिका मांडल्या आहेत. कवितासंग्रह वाचण्यापूर्वी त्यांनी लिहिलेली अर्पण पत्रिका वाचल्यानंतर त्यांच्या कवितेची भूमिका लक्षात येते. 'माझ्या समुदायातील ज्या मैत्रिणींना त्यांच्या व्यथा शब्दात मांडता आल्या नाहीत त्या सगळयाजणींना...' अशा शब्दात त्यांनी अर्पण पत्रिका लिहिली आहे. दिशा पिंकी शेख यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या एकाही कवितेला शीर्षक नाही. शीर्षक वाचल्यानंतर कवितेचा सारांश लक्षात येतो कवितेच्या या पारंपरिकतेला बाजूला सारत कवितेलाही त्यांनी योग्य दिशा दिली आहे. अगदी निर्भीड, रोखठोक भाषेत त्यांनी तृतीयपंथीयांच्या वेदना मांडलेल्या आहेत. दिशाताई यांची कविता सहज, सोपी व अनुभवनिष्ठ आहे. एक तृतीयपंथी म्हणून समाजात वावरत असताना आलेले अनुभव त्यांनी स्पष्टपणे नोंदवले आहेत.

'कुरूप' या कवितासंग्रहात एकूण ७६ कविता आहेत. पुस्तक हातात घेतले की वाचल्याशिवाय सोडूच नये असे वाचकांना वाटते. तृतीयपंथीयांच्या भावभावनांचे, समाजाने त्यांच्यावर लादलेल्या दुःखाचे, वेदनेचे कटू अनुभव टिपण्यात त्यांची कविता मग्न होते. त्यांच्यावर निसर्गाने लादलेल्या जगण्याचा त्यांनी स्वीकार केलाय. पण समाज त्यांना स्वीकारत नाही. समाज त्यांना वाकडा म्हणून हिणवत असतो. मी वाकडी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. पण तुमचा

वाकडा असलेला  सरळपणा तुम्ही का झाकता ? असा प्रश्न दिशाताई सरळ माणसांना विचारताना लिहितात,

**'मी विचारलं तू सरळ, की वाकडा?**
**तू म्हणालास**
**मी सरळ.**
**मी स्वीकारलं,**
**अगदी सहजतेने.**
**तूही विचारलं,**
**मी सांगितलं,**
**मी वाकडी.**
**तू उडालाच,**
**मग बसलास,**
**सरळ लोकांमध्ये,**
**आणि रंगली**
**चर्चा माझ्यावर.' (पृ. १४)**

दिशा ताईंची कविता सहज जन्माला आलेली नाही. प्रचंड वेदनेतून त्यांच्या कवितेने जन्म घेतलेला आहे. प्रत्येक कविता त्यांनी जगलेली आहे, भोगलेली आहे. म्हणून तर ती उत्कटतेने बाहेर येताना दिसते. निसर्गावर, पाना- फुलावर केलेलं लिखाण दिशा ताईंच्या कवितेत औषधालाही सापडत नाही. त्यांच्या कवितेची निर्मितीप्रक्रिया ही त्यांच्या आणि तृतीयपंथी समुदायाच्या डोळयांतून ओघळणाऱ्या आसवांपासून सुरू होते. त्यांच्या जगण्यासमोर असंख्य प्रश्न तोंड आ वासून उभे आहेत. प्रश्नांची योग्य उत्तरं त्यांना मिळत नाहीत. प्रत्येक प्रश्नाचं एक ठरलेलं उत्तर त्यांच्याकडे असतं. ते म्हणजे...कारण मी हिजडा आहे. तृतीयपंथी म्हणजे लोकांच्या मनोरंजनाचं साधन. त्यांना स्वतःचे हक्क, अधिकार गाजवता येत नाहीत. एवढेच काय तर दुःख झाल्यावर रडण्याचाही अधिकार त्यांना नाही याबाबत त्या लिहितात,

**'माय मरो नाहीतर मावशी**
**दुःख कवटाळून रडण्याचा**
**अधिकार मला नाही**
**तोंडावरचं हासू आणि**
**हातातली टाळी सतत**
**खिदळत राहिली पाहिजे**
**कुठलीच शिकांतिका गाण्याचा**
**अधिकार मला नाही**
**कारण मी हिजडा आहे.' (पृ.२०)**

इथल्या व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराबाबत कवयित्री चिंता व्यक्त करतात. व्यवस्थेच्या विरोधात, पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात, शोषणाच्या विरोधात त्या त्यांच्या समुदायासह पेटून उठल्या आहेत. त्या विद्रोह करू इच्छितात. संतापाने त्यांच्याही मुठी आवळल्या जातात. पण इथल्या हुकूमशाहीपुढे त्यांना हार मानावीच लागते. इथे फक्त नावालाच लोकशाही आहे. अजूनही मनासारखे बोलण्याचा, जगण्याचा अधिकार त्यांना नाही. म्हणून व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराबाबत त्या लिहितात,

**'मादक पुरुषांच्या मनोरंजनात**
**स्वतःला धन्य मानणाऱ्या**
**माद्या पाहून स्वतःवरच हसले**
**आवळलेल्या मुठी सैल सोडल्या**
**निपचित पडले अंथरुणात**
**व्यवस्थेचा भोंगळा कारभार पाहत' (पृ.५६)**

माणसांनी जगताना इतरांना मदतीचा हात दिला पाहिजे. पण असे न घडता तृतियपंथियांच्या नावाचा वापर करून जगणारी बांडगुळंच समाजात खूप वाढली आहेत. तुमचे आशीर्वाद चांगले असतात म्हणत लोक त्यांना आशीर्वाद दया म्हणून विनवणी करतात

आणि तेच लोक पुन्हा त्यांची टिंगळ-टवाळी करतात. भीक मागताना अपमान करतात. तुम्हाला काम करायला काय झालं असे विचारतात. पण प्रत्यक्षात मात्र कोणीही काम देत नाही. काम मागायला गेलेल्या तृतियपंथियांना लोकांचे अनपेक्षित बोलणे सहन करावे लागते. लोकांच्या बोलण्याच्या पद्धतीचा पुरावा देताना त्या लिहितात,

**'काय करणार हायेस गं काम करून?**
**२०० रुपये कमवशील**
**बाजूला चाल थोडं**
**दोन मिनिटांचं काम हाय**
**लगेच २०० रुपये देतो**
**आक्का देवमाणूस तुम्ही...' (पृ.५७)**

अशा नीच मानसिकतेच्या लोकांकडून चांगुलपणाची अपेक्षा करावी तरी कशी? अशा लोकांच्या ढोंगीपणावर दिशाताईंनी अचूकतेने बोट ठेवलेले आहे. विषमतावादी व्यवस्थेचा वारसा चालवणारी माणसं कवयित्रीला गिधाडंच वाटतात. अशा गिधाडांना परिवर्तनवादी विचारांद्वारे, संघर्षाद्वारे कवयित्री धडा शिकवण्याचा प्रयत्न करतात. तरीही समाजाकडून त्यांना सतत डागण्या देण्याचा प्रयत्न केला जातो. तुम्ही वर्तुळातच राहावं, वर्तुळाबाहेर येऊन जगण्याचा प्रयत्न करू नये. असं तृतीयपंथीयांना नेहमी सांगण्याचा प्रयत्न केला जातो. सीमारेषेत जगण्याचा सल्ला देणाऱ्यांची कानउघाडणी करताना दिशाताई लिहितात,

**'मी अशीच आहे बघ...**
**बाई काळजी करू नका**
**मी अशीच राहीन**
**आपटतील जेव्हा इथली गिधाडं**
**तरी विझणार नाही**
**माझ्या शब्दांतली धग...' (पृ.६७)**

बहुसंख्य तृतीयपंथी अशिक्षित असल्यामुळे 'शिकूण काय होणार?' हा नैरास्यजनक प्रश्न त्यांच्या मनात असतो. शिक्षण नाही म्हणून त्यांना नोकरी मिळत नाही. नोकरी नाही म्हणून किंवा त्यांच्या नावे शेती नाही म्हणून त्यांना कर्जही मिळत नाही. मग त्यांनी उद्योगधंदा तरी कसा करावा? महिलांना, पुरुषांना नोकरीत राखीव जागा असतात. तशा राखीव जागा तृतीयपंथीयांना नसतात. सार्वजनिक ठिकाणी तृतीयपंथीयांसाठी वेगळे शौचालय नसते. जर ते स्त्रियांच्या शौचालयात गेले तर गोंधळ निर्माण होतो. स्त्रियांचा आरडाओरडा पाहायला मिळतो. जर ते पुरुषांच्या शौचालयात गेले तर त्यांना लैंगिक शोषणाचे बळी व्हावे लागते. राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान हक्क दिलेला आहे. पण तृतीयपंथीयांचा राज्यघटनेत उल्लेखच नाही याबाबत सतीश सोनक लिहितात, "स्वतंत्र भारताच्या भाग्यविधात्या संविधानात हिजड्यांचा उल्लेख नाही. जनरल क्लॉज अँक्ट या कायद्यानुसार 'व्यक्ती' या शब्दाची व्याप्ती 'तो' किंवा 'ती' इतकीच मर्यादित असते. त्यातही तृतीयपंथीयांचा समावेश नाही, म्हणजे आपल्या अवतीभवती वावरणारे हजारो लाखो तृतीयपंथी जणू अस्तित्वातच नाही. त्यांना अदृश्य करण्याची जादुई करामत आपल्या राज्यघटनेने केली आहे.'५ राज्यघटनेपासूनच वंचित राहिलेल्या या समुदायाचे ज्वलंत प्रश्न मांडणारी दिशाताईंची कविता आहे. त्यांची प्रत्येक कविता मला क्रांतीची हाक देणारी वाटते. कितीही क्रांती करण्याचा प्रयत्न केला तर शोषणचक्र कालच्यासारखे आजही चालू राहील याबाबत कवियत्री लिहितात,

**'क्रांती होईल म्हणून**
**त्याच्या विद्रोह ओकण्यानं**
**काही बदलणार नाही**
**जास्तीत जास्त डिझाईन बदलेल**

**या शोषणचक्राचं**

**जे होतं काल आणि आजही...' (पृ.६९)**

बाजारात, रेल्वेत पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांना अनेक वाईट अनुभव येत असतात. असंख्य वासनांध नजरेचा त्यांना सामना करावा लागतो. त्यांची छेडछाड केली जाते. अनेक तृतीयपंथीयांवर बलात्कारही होतात. अशावेळी न्याय मागण्यासाठी ते पोलीस स्टेशनला जातात. तेव्हा रक्षक असणारे पोलीसही भक्षक होतात. असे अनुभव अनेक तृतीयपंथीयांना आलेले आहेत. टाळी वाजवून पोट भरणाऱ्यांनाही पोलीस सोडत नाहीत. त्यांच्या भिकेतला काही वाटा हप्ता म्हणून वसूल केला जातो. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले जातात. ज्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा करावी तेच अन्याय करत असतील तर न्याय कोणाकडे मागवा? लैंगिक सुखाची अपेक्षा करणाऱ्या रेल्वे पोलिसाचा प्रसंग मोठ्या ताकतीने कवियत्रीने मांडला आहे.

**'भेनचोद लय नाटक झाले तुमचे,**

**चल साइडला**

**त्यानं असं म्हणत**

**रपकान् दांडा ठेवून दिला पायावर तिला...**

**लोकं तोंडाकडं पाहत होती**

**पण कुणी काही बोललं नाही**

**रडत हातबल होऊन**

**साहेबांच्या मागं गेली ती...**

**त्यानं रेल्वेतल्या स्वच्छालयात कोंबलं तिला**

**आणि तोही आत गेला' (पृ.७७)**

कानाने ऐकू नयेत आणि डोळ्यांनी वाचू नयेत अशा कितीतरी भयानक प्रसंगांना तृतीयपंथीयांना तोंड द्यावे लागते. आत्मसन्मानाचे प्रेत पदरात लपवत एकेक दिवस त्यांना ढकलावा लागतो. जगण्यासाठी पुन्हा ओठावर हसू आणत लिपस्टिकचा रंग डार्क करावा लागतो.

संवेदनशीलतेचा आव आणणाऱ्या निर्लज्ज व्यवस्थेला अशा भयानक प्रसंगाची चीड येईल का कधी? बाजार मागताना तृतीयपंथीयांचा गर्दीतून अपमान केला जातो. त्यांच्यासोबत विनाकारण भांडण काढली जातात. तृतीयपंथीयांना विवस्त्र करून त्यांना मारत फोटो, व्हिडिओ काढल्याच्या घटनाही अनेक बाजारात घडल्या आहेत. अशावेळी घटनेची शहानिशा न करता तृतीयपंथीयांचा लोकांना त्रास अशा आशयाची पत्रकार बातमी देतात. पत्रकारांनी लेखणीचं भान ठेवावं यासाठी कवयित्री लिहितात,

**'बाजार समदा गोळा झाला**
**पोरं फोटु काढाया लागली...**
**ती तशीच नागवी रडत निघाली**
**तिच्या रडण्याला कोण खातंया**
**लोकास्नी वाटण्यासाठी किलीप**
**अन् तृतीयपंथीयांचा बाजारात लोकांना तरास**
**अशी पत्रकाराला बातमी मिळाली...' (पृ.८३)**

कवयित्रीला स्वतःबद्दल आणि तृतीयपंथी समुदायाबद्दल अनेक प्रश्न पडतात. मी काय आहे? का आहे? आणि मीच का? अशा असंख्य प्रश्नांपासून त्यांचा समूह दिवसभर तोंड लपवून फिरतो. तरी प्रश्न त्यांचा पिच्छा सोडत नाहीत. अशावेळी कवयित्री समाजवास्तव अधोरेखित करताना लिहितात,

**'पण सारे माझ्याकडेच असं का पाहतात**
**उपहासक**
**विनोदी**
**विक्षिप्त**
**कामूक**
**दया**
**तिरस्कारयुक्त नजरेने**

**या नजरा झोपू देत नव्हत्या**
**तेव्हा या सगळयांच्या**
**उत्तरासाठीकरायचे मी जागरण रातभर...' (पृ.९२)**

खरेतर रात्रभर जागरण करून, चिंतन करून प्रश्न मिटणार नाहीत. जागरण आणि चिंतनाशिवाय त्या स्वतःच्या न्यायासाठी अजून कोणते प्रयत्न करतील? इथली व्यवस्था दिवसेंदिवस त्यांच्या जगण्याला लाजिरवाणे करत आहे. व्यवस्थेमुळे झालेल्या वेदना त्यांना ढसाढसा रडवतात. त्यांच्या मनातली स्वप्न पावला पावलाला ढासाळतात. त्यांच्या स्वप्नांना जागोजागी सुरुंग लावला जातोय. म्हणूनच दिशाताईंची कविता चीड, संताप आणि विद्रोहाने तुडुंब भरलेली आहे. कधी साध्या भाषेत तर कधी चक्क शिव्या हसडत त्यांनी मनातला संताप व्यक्त केला आहे. मेल्या मुडद्यायहो, ढोंगी साले, तुम्हाला गड्डा उठो फुकनळयांनो, फुकट माराल चुत्यानो, वैतागवाडी साला अशा गावरान शिव्यांचा वापर दिशाताईंच्या लेखनशैलीत केलेला दिसतो.

तृतीयपंथीयांच्या दुःख, वेदनेचा प्रवास सुरू होतो तो स्वतःच्या घरातूनच. स्वतःच्या अशा संततीची आई वडिलांना चीड येते. समाज काय बोलेल या भीतीपोटी ते आपल्या मुलाला दडपणात ठेवतात. त्याच्यात सुधारणा होईल म्हणून ढोंगी बाबाकडे जातात, दवाखान्यात घेऊन जातात. पण मुलाच्या शरीरात कसलेही अपेक्षित बदल घडून येत नाहीत. घरी कोणी नसल्यावर अशी मुले मुलीसारखे वागण्याचा प्रयत्न करतात. मुलाचे शरीर असले तरी आपल्याला मुलीसारखे राहायला आवडते अशी त्यांना जाणीव होते. काही मुलांचे पालक त्यांना स्वातंत्र्य देऊन तृतीयपंथी समुदायात पाठवतात तर काही पालक आपल्या घराण्याची लाज राखण्यासाठी मुलाला कुटुंबातच ठेवून घेतात. मुलासारखे त्याचे लग्नही लावून देतात. अशा मुलांच्या मनातील विद्रोही भावना दिशाताई मांडताना लिहितात,

**‘हळदीच्या अंगाने**
**तो बसला होता**
**मांडवाच्या कोपऱ्यात**
**रात्रभर रडून लाल झालेल्या**
**डोळयांवर काळा चष्मा लावून**
**प्रत्येक काही मिनिटांत**
**त्याला असं वाटायचं**
**मरु दे साल्यांना**
**जावं पळून मांडवातून**
**परत स्वतःला सावरायचा**
**आईच्या डोळयात काठावर**
**थांबलेलं पाणी**
**त्याला जाऊ देत नव्हतं वाहवून...’ (पृ.१०६)**

अशा मुलांवर पालकांनी आणि समाजाने अपमानाचा शिक्का न मारता त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दिशाताईंच्या कवितेतून तृतीयपंथीयांचे अनेक प्रश्न जगासमोर आलेले आहेत.

**समारोप** :

एकंदरीत साठोत्तरी काळातील कवयित्री दिशा पिंकी शेख यांच्या कविता त्यांच्या अनुभवातून, चिंतनातून तावून-सुलाखून निघालेल्या आहेत. तृतीयपंथीयांच्या विद्रोही भावना सूक्ष्मपणे मांडणाऱ्या मराठी भाषेतील पहिल्या कवयित्री म्हणून दिशाताईंची ओळख निर्माण झाली आहे. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणाऱ्या आजच्या आधुनिक काळात तृतीयपंथीयांनाही समानतेचा हक्क मिळाला पाहिजे हा मुख्य विचार कविता संग्रहातून वाचावयास मिळतो. प्रत्येकाच्या संग्रही असावा असाच हा कवितासंग्रह मराठी कवितेत मोलाची भर घालणारा आहे. तृतीयपंथीयांच्या विद्रोही भूमिकेचा

समाजाने विचार केला पाहिजे व त्यांनाही समानतेची वागणूक दिली पाहिजे.

**संदर्भ :**


१) https://maharashtratimes.com/editorial/ravivarmata/gay/articleshow/30868570.cms

२) https://kolaj.in/published_article.php?v=Disha-Pinky-Shaikh-collection-of-poems-KurupDF0020393

३) https://www.tv9marathi.com/opinion/international-transgender-day-special-article-on-poetry-book-by-transgender-disha-shaikh-kurup-by-freelance-journalist-sharmishta-bhosle-674129.html

४) https://maharashtratimes.com/editorial/column/revolt/articleshow/65057650.cms

५) https://web.bookstruck.in/book/chapter/35580


***

# साठोत्तरी मराठी साहित्याने समाजाला काय दिले ?


## प्रा. मिलिंद ठोकळे

एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय बिडकीन ता.पैठण जि. औरंगाबाद


महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून गेल्या साठ वर्षात मराठी साहित्याचे किती प्रमाणात लोकशाहीकरण झाले आणि ते कितपत योग्य होते. तसेच लोकशाही मूल्याची पूजा राखणारे होते किंवा नव्हते. या प्रतीक्षेत १९६० ते १९९० साठोत्तरी साहित्य आणि जागतिक उदारीकरणानंतर सुरू झालेले नव्वदोत्तरी मराठी साहित्य अशा दोन टप्प्यात विषयाची मांडणी करणे गरजेचे ठरते. साठोत्तरी चळवळीत अनियतकालिकांची दलित साहित्याची, ग्रामीण साहित्याची चळवळ आणि साहित्यातील स्त्रीमुक्तीचा प्रारंभाचा काळ तसेच १९९० नंतर देशात झालेला आर्थिक बदलामुळे साहित्यावर त्याचे पडलेले प्रतिबिंब तसेच सापुत्री साहित्य हे बहुजनवादी साहित्य होते व या साहित्याने अभिजनवादी संस्कृतीवर मात करून मराठी साहित्य लोकशाहीवादी केले महाराष्ट्राचे विकेंद्री आणि ग्रामपंचायत पोहोचवलेली अहिंसक पद्धतीची लोकशाही आणि मराठी साहित्याची सर्वसमावेशकता ही पुरोगामी महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे.

१९४० पासून मराठी भाषेत नवं साहित्याचे युग सुरू झाले होते. मात्र ते प्रामुख्याने कथा कादंबरीत प्रतिबिंबित होत होते आणि १९६० च्या दशकात ते ऐनभरात होते. हे साहित्य उच्चवर्णीय एतदेशीय होते. साहित्य हे प्रयोगशील असले तरी अशाच अंगाने जुनीच राहिले. त्यात बहुजनांचे सुख दुःख होते. १९६० नंतर लोकांकडून ज्ञानगंगा पोचली होती. साहित्यात बदल होऊ लागले. याच काळात बहुजन दलित आंबेडकरी साहित्याने नऊ साहित्याला नाकारत साहित्य निर्मितीला प्रारंभ केला व इथूनच साहित्याने लोकशाही करण्याकडे वळण घेतले याच काळातील सुरू असलेली नियतकालिकांची चळवळ मनामनापर्यंत पोहोचली व चर्चा सुरू झाली. या चळवळीने साठोत्तरी साहित्याला नवे वळण मिळाले, नवीन प्रयोगशील जीवनवादी संवेदना दिली. पुस्तके भाषेचे आवाजाचे महत्त्व कमी करून बोलीभाषेला महत्त्व

प्राप्त करून दिले देश विदेशातील अन्य साहित्याचे वाचन व्हावे अशी भूमिका या चळवळीने मांडली.

**दलित साहित्याने समाजाचे लोकशाहीकरण केले.**

साठोत्तरी काळात फुले शाहू आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलित साहित्याने उसळी घेवून समाजातील सर्व वंचित समूहांना अभिव्यक्त होण्याची प्रेरणा दिली. हजारो वर्षाची स्त्रीयांची दु:खंही या निमित्ताने बाहेर पडली. स्त्रिवादी साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाला. हा निर्माण होणेही काळाची गरज होती. स्त्रियांचा फार मोठा वर्ग अजूनही मानसन्मानापासून वंचित असून रुढीपरंपरेच्या व अंधश्रध्देच्या गर्तेत अडकलेला होता. या वर्गाला बाहेर काढण्यासाठी स्त्रियांनी विपुल प्रमाणात साहित्य निर्माण केले पाहिजे. समाजाची दु:खे वेशीवर टांगली पाहिजेत. अजूनही स्त्रियांचे शोषण विविध पातळ्यावर होत असून या शोषणाविरुध्द स्त्रियांनी आपल्या साहित्यातून एल्गार पुकारलेला पाहावयास मिळातो.

दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असून दलित साहित्य निर्मिती हा सामाजिक राजकीय व सांस्कृतिक परिणाम आहे दलित या संज्ञेचा उल्लेख पाठीमागील काळापासून आढळतो एका अस्पृश्य पुढाऱ्याने १९२८ रोजी पक्षिकाला दलितबंधू नाव दिले १९०६ साली विठ्ठल रामजी शिंदे depress classes mission नावाची संस्था स्थापन केली होती तेथील Dipresd या संज्ञेवरून दलित ही संज्ञा मराठीत आली असावी असा अंदाज आहे.

डॉ. आंबेडकरांनी मात्र Disresd या शब्दाचा कधीच वापर केला नाही यासंदर्भात ते नॉनकास्ट हिंदूज किंवा प्रोटेस्टंट हिंदूज असा शब्दप्रयोग करीत ज्याला आपण आज दलित साहित्य म्हणतो त्यात प्रस्थापित चातुर्णाला मुख्यता विरोध असतो आणि स्वतःच्या माणुसकीच्या व स्वतंत्र भारतीय नागरिकत्वाच्या संदर्भातील सर्व हक्क शाबीक करण्याची जिद्द असते या प्रकारची जिद्द प्रकर्षाने आणि सातत्याने प्रकट करणारी व जन्माने अस्पृश्य असलेल्यांनी लिहिलेले हे साहित्य असा सर्वसामान्य समज रुढ आहे.

समता, स्वातंत्र्य, बंधुता व लोकशाही चतुवर्णीय विरोध तळागाळातील लोकांचा विचार, स्वतःच्या हक्काबद्दलची जाणीव, प्रचलित व्यवस्थेचा विद्रोह इत्यादी घटकांचा व जाणिवेचा समावेश दलित साहित्यात होतो पण त्यातील कोणत्या घटकांचा समावेश होतो व कोणत्या घटकांना या जाणिवेत किती महत्त्व आहे याबद्दल दलित

साहित्यात मतमतांतरे आहेत ज्या दलित जाणवेच्या पायावर हे साहित्य आज उभे आहे ती जाणीव म्हणजे काय? या जाणिवेत डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्सवाद यांचा अंश किती? नवबौध्द जीवनविषयक जाणीव म्हणायची का? यासारखे काही प्रश्न या निमित्ताने उपस्थित झालेले आहेत दलित साहित्यातील दलित्व आहे तरी काय ? एक प्रश्न उपस्थित करून प्रसिद्ध लेखक विचारवंत म्हणतात की, साहित्यातील दलित ही एक वैचारिकता आहे कला साहित्याकडे बघण्याचा व तो निर्माण करण्याचा एक दृष्टिकोन आहे हा दृष्टिकोन कोणीही स्वीकारू शकतो त्याला जातीचे धर्माचे प्रमाणपत्र लागत नाही त्याचे विचार हेच त्याचे प्रमाणपत्र असावे लागते जे स्वराज्य लोकशाही कामगार सत्तेतही सर्व मान्य जनतेच्या बाजूने असते त्यासाठी संघटित असते माणसाचे महात्म्य मुक्ती आणि माणूस म्हणून असलेली त्याची महान प्रतिष्ठा त्याला प्राप्त करून देण्यासाठी जे राहते ते म्हणजे दलितत्व दलित साहित्य निर्मितीला ज्यांनी विशेष प्रोत्साहन दिले त्या डॉ.वानखेडे यांनी दलित साहित्याची व्याख्या करताना दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध किंवा मागासवर्गीय नव्हे जे जे श्रमजीवी आहेत हे दलित वर्गात मोडतात असे दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहून 1967 मध्ये अध्यक्ष पदावरील भाषणात त्यांनी स्पष्ट केले आहे.

दलित साहित्य मुख्यतः दलित समाजातील नवशिक्षित व्यक्तींनी सुशिक्षित दलितांना उद्देशून त्यांच्याच भाषेत लिहिले आहे दलित समाजावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडणे हे या साहित्याचे प्रमुख प्रयोजन आहे या साहित्याचा केंद्रबिंदू वास्तवपूर्ण दलित जीवनदर्शन हा आहे या साहित्यातून दलित समाजावर झालेल्या अन्यायाची तीव्र, तिखट, विद्रोही जाणीव प्रकट होते भूतकालीन अन्यायांबरोबर वर्तमानातील अन्यायाचाही समावेश दलित साहित्यात होतो यामध्ये हिरोशिमा व नागासाकी वर झालेला हल्ला, नामांतराच्या निमित्ताने मराठवाड्यात झालेल्या दंगली, अलीकडच्या काळातील खैरलांजी सारखे हत्याकांड या सर्व गोष्टींचा विशेष करून उच्चार दलित साहित्यात करावा लागतो या सर्वातून व्यक्त झालेल्या भावना केवळ व्यक्तीनिष्ठ नसून त्या समाजनिष्ठ आहेत हे साहित्य म्हणजे जागृत दलित मनाचा एक आत्मप्रत्यय व एक हुंकार आहे हजारो वर्षे झालेल्या अन्यायाचे निर्मूलन करण्याचा निर्धार या साहित्यातून

प्रकट होतो परंपरेचा विद्रोह, समतेचा पुरस्कार, भौतिकवादी दृष्टिकोन ही वैशिष्ट्ये या साहित्यात सामावलेली पहावयास मिळतात दलित साहित्य हे बांधिलकी मानणारे साहित्य आहे याचा जर विचार केला तर महात्मा फुले ,महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, महर्ष शिंदे, सयाजीराव गायकवाड ,छत्रपती शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, डॉ. म. ना. वानखेडे संत चोखामेळा या सर्वांच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याचा परामर्श घेतल्यानंतर खऱ्या अर्थाने दलित साहित्याची ओळख होताना दिसते व त्यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती होताना दिसते.

दलित साहित्य शिवाय शेती व्यवसाय हा जगण्याचा मुख्य आधार असलेला ग्रामीण भागातील बहुजन वर्गाचे प्रश्न इतर साहित्यातुन  मांडणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय ही साहित्य चळवळ सुरू करून आनंद यादव यांनी या चळवळीला एक निश्चित स्वरूप दिले यानंतर रा.र. बोराडे यांच्या  पाचोळा कादंबरीने या ग्रामीण चळवळीला बळ दिले या कादंबरीत ग्रामीण जीवनाची वास्तवता आलेली आहे पंचायत राजच्या  माध्यमातून नव्या संस्थांची निर्मिती व त्यातून मूठभर लोकांची झालेली समृद्धी आणि याभोवती फिरणारे राजकारण, सत्ता कारण होते या साहित्याने महात्मा फुले यांना आदर्श मानून लिखाण करत नवे अब्राह्मणी साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र निर्माण केले आहे.

मराठी संस्कृतीचा अविष्कार ग्रामीण साहित्यातून होतो समाज जीवनातील स्थित्यंतराचे प्रामाणिकपणे प्राथमिक रूप चित्रित करणारा हा प्रवाह आहे माणूस आणि निसर्ग, माणूस आणि सामाजिक स्थिती, माणूस आणि त्याचे दैव याच्यातील परस्पर नात्यांचा शोध घेणारा हा प्रवाह आहे. वास्तव वादाला समर्थन आणि एकूण साहित्याचे अनुभव विश्व व्यापक करणारा असा हा वांङ:मय प्रवाह आहे .

हरिभाऊ आपटे, ग.ल. ठोकळ, र.वा.दिघे, वि .स .खांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, यांच्या नंतर खऱ्या अर्थाने १९५० -५१ ला द. मा. मिराजदारांनी ग्रामीण कथा लिहिण्यास सुरुवात केली दमानी ग्रामीण शुद्ध विनोदी कथा लिहिल्या द.मा. मिरासदार जीवनातील विसंगती विरोध वैचित्र्य, अद्भैतता, इत्यादी विषयातून त्यांनी

कथालेखन केले अज्ञान, अंधश्रद्धा, आचार विचारातील विसंगती नव्या जुन्यांचा ताळमेळ घालताना निर्माण होणारा गोंधळ ग्रामीण माणसाच्या हाडामासात रुजलेल्या  काही सवयी खोडी या मधून विनोद निर्मिती होऊ शकते हे जाणून घेऊन र.रा.बोराडे, विश्वास पाटील, आनंद यादव, द. ता. भोसले यांच्या विनोदी लेखनातून विनोदाचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडताना दिसते.

लोकशाही, निवडणुका, राजसत्ता, अर्थसत्ता, बहुजन समाजाला  नवीन शिक्षण, नवीन दिशा, नव्या सुधारणा, नवी ध्येय मनासमोर ठेवून त्यांच्या पूर्ततेथेसाठी नवीन कायदे निर्माण केले यांच्या परिणामाने नवीन क्षेत्र निर्माण झाली दुसऱ्या बाजूने साहित्यात अनुभवनिष्ठ आत्मनिष्ठ यांना विशेष स्थान प्राप्त झाले या लाटेतील लोकांचे बहुसंख्य लोकांनी प्रेरणा प्रामुख्याने आपला परिसर आपापल्या साहित्यातून रेखाटलेला दिसतो. शिक्षण, औद्योगीकरण, नवजीवन , सामाजिक सुधारणा, सुख उपभोगाची नवनवीन साधने, दळणवळणाच्या सुख सोयी व राजकारणाचे बदलते स्वरूप या बदलत्या खेड्याच्या चेहरा मोरा झपाट्याने बदलला यामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडत आहे त्याचबरोबर नवनवे प्रश्न उपस्थित राहतात बदलत्या कृषी औद्योगिक समस्या शब्दांकित करण्याचे आव्हान काही लेखकांनी स्वीकारले आहे आनंद यादव, रा.र.बोराडे बाबूराव मुसळे, रंगनाथ पठारे या लेखकांनी चळवळीला हातभार लावण्याचे काम खऱ्या अर्थाने साठोत्तरी साहित्यामध्ये केलेले पाहाव्यास मिळते.

साठोत्तरी साहित्याच्या माध्यमातून आपण खऱ्या अर्थाने विचार जर  केला तर १९४५ नंतर साहित्यामध्ये नवनवीन वाङ:यीन प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये प्रामुख्याने आपण वरती पाहिल्याप्रमाणे दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, विज्ञानवादी साहित्य, आदिवासी साहित्य यांचा अंतर्भाव होतो आणि या साहित्यामुळेच मराठी साहित्यामध्ये किंबहुना साठोत्तरी साहित्याची मानसिकता बदलताना आपणास पहावयास मिळते.

स्त्रीवाद ही एक समाज परिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव आहे या स्त्रीवादी जाणिवेचा विविध दृष्टिकोनातून भिन्न भिन्न पातळयावरचा अविष्कार स्त्रीवादी साहित्यातुन आढळून येतो उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी उत्तर आधुनिक अशा अनेक

विचारप्रणालीमध्ये स्वतःची भर घालून स्त्रीवादी साहित्याचे भान स्त्री पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मिमांसा करते. म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रूपे तर दिसतातच परंतु त्याच्यात अनेकदा परस्परविरोधही  आढळून येतो याचेच प्रतिबिंब वेगवेगळया काळात लिहिल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यात  दिसते या  भिन्नभिन्न स्त्रीवादी जाणीवेतून  व्यक्तहोणारे  साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमा इतकीच माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून जगताना आलेल्या विविध अनुभवांचे  साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य मग ते पुरुषांनी लिहिले असले तरी ते साहित्य स्त्रीवादी ठरेल कारण तत्वतः स्त्रीवादी जाणीव स्त्री व पुरुष दोघांमध्येही विकसित होऊ शकते परंतु स्त्री  वर्चस्वाला अनुभव बाई होऊन घेणे स्त्रीला अधिक समर्थपणे करता येते असेही मानले जाते त्यामुळे स्त्रियांचे लेखन अधिक नेमके धारदार व प्रखर होते व  झाले स्त्रीवाद्यांच्या मते स्त्रियांची बाईपणाच्या भावणातून निर्माण झालेली भाषा प्रतिकृती, प्रतिमा खऱ्या अर्थाने विकसित होण्यासाठी काही काळ तरी जाणीवपूर्वक अलगतावादी भूमिका घेणे इष्ट ठरेल.

पाश्चात्य देशात स्त्रीवादाचा उदय साधारणपणे १९६० च्या आसपास झाला परंतु भारतात स्त्रीवादाची सुरुवात १९७५ नंतरच्या आपणास झालेली पहावयास मिळते.

स्त्रीवादी जाणीव कशाला म्हणायचे हे आधी स्पष्ट करणे गरजेचे आहे जगभरात काही  काळ जी पितृसत्ताक समाजाची व्यवस्था अस्तित्वात आहे त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेताला (सेक्स) सांस्कृतिक लिंगभेदाचे जेंडर रूप दिले आपले हित  सबंध जपण्यासाठी स्त्री-पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्ता संबंध रचला सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरवले गेले स्त्रीचा स्वभाव लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्य या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादली या गोष्टींची जाणीव स्त्रीवादी साहित्यात  होईल स्त्री ही स्त्री म्हणून जन्मता नाही तर ती घडवली जाते हे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सीमाॅन द बोव्हारचे विधान म्हणजे स्त्रीवादी जानीवेचे महत्वाचे प्रमेय होय . स्त्रीवादी जाणीव ही स्त्री पुरुष या दोघात उदित होऊ शकते पुरंतु जाणिवेचा अनुभव मात्र स्त्रीच घेत असते  स्त्री पुरुष विषमतेचे भान येणे ही या जाणिवेची पहिली अवस्था होय पुरुषरचित स्त्रीत्वाच्या  कल्पनेला नकार देणे ही जाणिवेची दुसरी अवस्था तर एक व्यक्ती म्हणून स्वतःचा शोध घेता घेता स्त्रीत्वाचा शोध घेणे ही स्त्रीवादी जाणिवेची पुढील अंतिम अवस्था म्हणता येईल.

आपल्याकडे स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान तंत्रज्ञानाला जसजसे महत्व यायला लागले. तसा त्याचा प्रसार ही वेगाने व्हायला लागला. विज्ञान जीवनाला सर्व अंगाने भिडायला लागले आणि त्यानंतर आधुनिक विज्ञान कथांचा उदयकाल १९७५ पासून झाला असे मानले जाते.

जयंत नारळीकर यांच्या कृष्णविवर या कथेपासून विज्ञान कथेकडे गंभीरपणे पाहिले जायला लागलं अर्थात जयंत नारळीकर यांच्या आधीही निरंजन घाटे विज्ञान कथा लेखन करत होतेच निरंजन घाटे १९७१ पासून विज्ञान कथा स्पर्धेत बक्षीस मिळवणारे विज्ञानवादी साहित्य लेखक आहेत १९७५  नंतरच्या साहित्य संमेलनात दुर्गाबाई भागवत यांनी जयंत नारळीकर यांच्या विज्ञान कथांची आणि ते करत असलेल्या प्रयत्नांची दखल घेतली आणि त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तेव्हापासून विज्ञान कथा या प्रकाराला समीक्षकांनी गंभीरपणे घेतले आणि मग तिची दिवसेंदिवस प्रगती होतच राहिली त्याच काळात ललित कथांशी जवळीक साधून ललित कथांच्या निकषाला अनुसरून विज्ञान कथा लिहायला सुरुवात केली. ती विज्ञान कथा लेखक बाळ फडके यांनी विज्ञान कथा लेखन या प्रकारला बाळ फुंडके यांचे योगदान फार मोलाचे आहे. विज्ञानातल्या नव्या शोधामुळे मानवी नातेसंबंधाचा विचित्र गुंता होतो. याचे चित्रण त्यांच्या विज्ञान कथा मधून दिसून येते. लक्ष्मण लोंढे यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय विज्ञान कथाकारांची यादी अपुर्णच राहील. त्यानंतर विज्ञान कथा लेखकात श्री सुबोध जावडेकर यांनी लिहिलेल्या विज्ञानकथांची शैली विशेष उल्लेखनीय अशी आहे. त्यांच्या कथेतील काल्पनिकता श्वास रोखून ठेवणारी असून कथाही उल्लेखनीय अशा आहेत. या व्यतिरिक्त अरुण साधू अरुण हेबळेकर, अरुण मांडे, संजय ढोले, शुभदा गोगटे यांच्या विज्ञान कथातून त्यांनी माणसांचा वेध घेण्याचे काम केलेले पाहावयास मिळते.

इतर साहित्याच्या तुलनेत विज्ञान साहित्य कडे जास्त मूलभूत पातळीवर जीवनदर्शन घडविण्याची क्षमता असते मराठी विज्ञान कथेने गेल्या पन्नासाठ वर्षात गाठलेला पल्ला प्रशासनीय आहे आणि आता पुढे तशीच वाटचाल कायम चालू राहील अशी आशा आहे  जयंत नारळीकर आणि इतर लेखकाकडून सातत्याने  विज्ञानवादी साहित्याचे लेखन होताना दिसते हे आपणास विसरून चालणार नाही.

आपण शेवटच्या टप्प्यात साठत्तरीसाहित्यातून व्यक्त होणारी मानसिकता या विषयाच्या अनुषंगाने आदिवासी साहित्याचा आढावा घेतल्याशिवाय हा विषय पूर्ण होऊ शकत नाही महाराष्ट्रातील

आदिवासी त्यांची राहणीमान त्यांची भाषा शेवटी आदिवासींची समाज संघटना अर्थव्यवस्था धर्मविधी कला या इतर भारतातील आदिवासी प्रमाणेच आहेत परंतु  त्याचा मुख्य व्यवसाय शेती असून ते मूलनिवासी आहेत हे विसरून चालणार नाही याशिवाय त्यांचे अनेक जगण्याचे प्रश्न निर्माण होताना दिसतात त्याच प्रामुख्याने अन्न संकलन मासेमारी शिकार व इतर व्यवसाय शेतमजूर व जंगल कामगार म्हणून ही बरीच आदिवासी राबतात तात्कारी कोळशाच्या पट्ट्यावर काम करतात त्यांच्या राहण्याच्या झोपड्या अंगावरचे कपडे त्यांची दागिने अशी इतर प्रश्न सातत्याने साहित्यातून आदिवासीचे वास्तवादी चित्र आलेले आहे प्रामुख्याने वारू सोनवणे यांनी त्यांच्या कवितेतून आपल्या समाजाच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे

आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावले ही नाही
बोटाच्या इशारानी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली
आम्ही तिथेच बसलो
आम्हाला शाबासकी मिळाली
आणि ते स्टेजवर उभे राहून
आमचे दुःख आम्हालाच सांगत राहिले

वरील कवितेतून वास्तववादी भावना प्रकट करताना या व्यवस्थेविषयी कवीची मानसिकता दिसून येते महाराष्ट्रातील भिल्ल महादेव कोळी, ठाकूर, कातकरी, गोंड, वारली जमातीतील नृत्य गीते विवाह गीते शिकारीची गाणी शोक गीते शेतकऱ्याची गाणी अंगाई गीते इत्यादी लोकगीतांचे प्रकार याशिवाय पौराणिक दंतकथा उखाणे म्हणी त्यांचे अलिखित लोकसाहित्य बरेच आहे व त्याची दखल घेताना मराठी साहित्य दिसत नाही ज्यावेळेस या साहित्याची दखल मराठी साहित्य घेईल त्यावेळेस मराठी साहित्याला एक एक वेगळी उंची प्राप्त होईल असा विश्वास आदिवासी साहित्यातून दिवंगत कवी भुजंग मेश्राम यांनी व्यक्त केला आहे त्यांनी अस्मितावेध या पुस्तकातुन आदिवासीच्या प्रश्नाची मांडणी केलेली दिसते त्याचबरोबर त्यांनी यापूर्वी नियतकालिकांमधून आदिवासी साहित्याविषयी केलेली लिखाण आदिवासी साहित्य संमेलनातून केलेली भाषणे इत्यादी साहित्य या पुस्तकात एकत्रितपणे एकत्रितपणे वाचायला मिळते आदिवासींच्या सांस्कृतिक सामाजिक आणि भाषिक प्रश्नांची मांडणी त्यांनी केलेली पाहावयास मिळते त्याचबरोबर आदिवासी साहित्यिक डॉक्टर पुष्पा

गावित ज्येष्ठ विचारवंत बाळकृष्ण रेणके यांच्या साहित्यातूनही आदिवासी समाजाचे भिम प्रतिबिंब उमटते हीच साठोत्तरी साहित्यातून व्यक्त होणारी मानसिकता म्हणावी लागेल.

**संदर्भ :**

१. ग्रामीण व दलित स्त्रीवादी साहित्य : दत्ता भगत व इतर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक .

२. दलित साहित्य उदगम आणि विकास : डॉ. योगेंद्र मेश्राम

३. दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी : डॉ.जनार्दन वाघमारे

४. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या : डॉ.आनंद यादव

५. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह : डॉ. शरणकुमार लिंबाळे

६. आदिवासी साहित्य आणि नियतकालिक : तुकाराम रोंगटे

७. आदिवासी अस्मितेचा शोध : माधव सरकुंडे

८. Aadivasi moments in India : waharu sonave

९. आदिवासी लोककथा : डॉ.गोविंद गारे

***

# साठोत्तरी काळातील भटक्या विमुक्त स्त्रीची दाहक आत्मकथा : तीन दगडाची चूल

**डॉ. दिलीप साहेबराव सावंत**

मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महा. कंधार जि. नांदेड.

**प्रस्तावना**:

साठोत्तर काळाच्या नंतर अनेक आत्मकथने लिहिली गेली परंतु स्त्री आत्मकथने फारशी लिहिली गेली नाहीत. त्यामध्ये भटके विमुक्त स्त्रीची आत्मकथने तर फार कमी आहेत. तीन दगडाची चूल हे आत्मकथन विमल दादासाहेब मोरे यांनी लिहिलेले, हे पहिलेच असून भटक्या विमुक्त स्त्रीची ही आत्मकथा आहे. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, यामध्ये अडकलेल्या भटक्या गोंधळी समाजात जन्मलेल्या शिक्षणाचा कुठलाच वारसा घरात नसताना आपले पती दादासाहेब मोरे यांनी आपल्या पत्नीला शिकवले. समाज व्यवस्थेत अनेक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सांगितले. अनेक साहित्यिक, विचारवंत, समीक्षक, लेखक, हरी नरके, नारायण सुर्वे, नागनाथ कोत्तापल्ले, प्राध्यापक रणसूभे, जनार्दन वाघमारे तसेच सकाळ पेपरचे संपादक उत्तम कांबळे अशा मोठ्या व्यक्तींच्या सहवासात राहण्याची, व अनेक कार्यक्रमात सहभागी होण्याची व अनेक मान्यवर साहित्यिकाची त्यांच्या सोबत राहण्याची संधी मला माझ्या पतीने दादासाहेब मोरे, सासू-सासऱ्याने दिली. सासू-सासऱ्याने मला मुलीसारखे प्रेम केले. म्हणूनच मी हे आत्मकथन लिहू शकले. महात्मा फुले सावित्रीबाई यांची प्रेरणा घेऊन शिक्षण घेऊ शकल्या म्हणून त्यांच्या कार्यास आपले आत्मकथन अर्पण केले आहे.या आत्मकथनातून पालावरचं अभावग्रस्त अस्थीर जगणं शिक्षणासाठी

पराकोटीचा संघर्ष, फुले शाहू आंबेडकर चळवळीतून अस्मिता जागृत आणि आत्मभान लेखिकेला मिळाले आहे. आंबेडकरी विचारधारा ही लेखन प्रेरणा घेऊन शिक्षण घेऊन आपण लहानपणी जीवन कसं जगलो, दारिद्र्याचे चटके कसे सहन केले. चार दोन पालाची घर, कोल्हापूरच्या पोलीस स्टेशनच्या जवळ राहत होती. आई वडील पोटासाठी भीक मागत होते. आज इथं तर उद्या तिथं असे आई-वडिलांचे जीवन होते. वडील भावा मुळे विमल मोरे या लेखिकेला शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. जन्मतारीख माहीत नसताना शाळेत नाव वहिनी मुळे घातले. नाहीतर वडील लहानपणीच लग्न करायला तयार होते. दादासाहेब मोरे यांच्या सहवासात गेल्यामुळेच त्यांना त्यांचे शिक्षण, समाजकारण, राजकारण करता आले.जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यामध्ये कसे ग्रुरफटले हे शिक्षणातून लेखिकेला कळाले. म्हणूनच तीन दगडाची चूल हे आत्मकथन लिहिले आहे. हे आत्मकथन समाजाला प्रेरणादायी आहे. हे आत्मकथन लिहीत असताना प्राध्यापक हातकलंगेकर यांनी मार्गदर्शन केले. नव्हे तर त्यामध्ये काही सूचना दुरुस्त्याही सांगितल्या त्यामुळे हे आत्मकथन फार उंचीचे झाले आहे.

लेखिकेच्या घरात कुठलाही शिक्षणाचा वारसा नसताना आई वडील पालात राहून भिक मागून जीवन जगत आहे. भारत देशाला स्वतंत्र मिळून ७५ वर्ष झाली असून अमृत महोत्सवी वर्ष म्हणून सर्व देशभर साजरा करीत असून सुद्धा सर्व सामान्य जातींना आजही हक्काचे घर नाही. आजही पाला मध्येच जीवन जगावे लागत आहे. स्वतःच्या हक्काचे गाव नाही, नागरिकत्व नाही, राशन कार्ड नाही, श्रमाची कष्टाची सवय नसल्यामुळे भीक मागूनच आपले पूर्ण आयुष्य जीवन जगत आहेत. आजही अनेक लोक भटक्या विमुक्त जातीचे पालातच राहतात व पालातच मरतात. यांच्याकडे कोणीही कोणतेही सरकार आले तरी लक्ष द्यायला तयार नाहीत. ही आपल्या देशाची शोकांतिका आहे. निवडणूक लागल्या की, अनेक पक्षाचे जाहीरनामे आश्वासने दिले

जातात परंतु सत्ता आल्यानंतर आपला स्वतःचाच विचार करून राजकारणी लोक सर्वसामान्य लोकांचा मतासाठीच वापर करतात.

फुले शाहू आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात आजही गरीब गरीबच होत चालले आहेत आणि श्रीमंत श्रीमंत होत चालले आहेत. समाज सुधारक, राजे, महाराजे यांची नावे घेण्यापुरते उरले आहेत. हे आत्मकथन वाचल्यानंतर हृदय पिळवटून टाकणारे सत्यवास्तववादी जगणं यामधून रेखाटलेले आहेत. कुण्या एका जातीत जन्म घेणं हे कुणाच्याही हातात नसतं ते विमल मोरे यांच्या वाट्याला भटक्या विमुक्ताचे जीनं आले आहे. तीन दगडाची चूल हे आत्मकथन लिहिताना लेखिकेने कोणाचाही द्वेष, दुष्टपणा, व कोणावरही राग व्यक्त केला नाही. गरिबीचे, जातीव्यवस्थेचे, वर्णव्यवस्थेचे चटके सहन करत परिस्थितीला सामोरे जाऊन आपल्या आत्मकथनातून आपल्या व्यथा, वेदना, दुःख, लाचारी प्रमाणिकपणे रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हे आत्मकथन अनेक मान्यवर लेखक,समीक्षक, विचारवंत यांच्या बरोबरीचे झालेले आहे.

भटक्या विमुक्त जातीमध्ये आजही स्त्रियांची अवहेलना, शिक्षणाचा अभाव,बालविवाह प्रथा आहेत. हे आत्मकथन भटक्या विमुक्ताची अवहेलना कथन करीत आहे. या लेखिकेला ज्यांनी मदत केली त्यांचे ऋण देखील व्यक्त केलेले आहेत. एवढेच नाही तर ज्यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात करून माझ्यासारख्या असंख्य स्त्रियांना आत्मसन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखविला त्या सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांच्या पवित्र स्मृतीस लेखिका विमल मोरे हे आत्मकथन अर्पण केले आहे.

आपले पती दादासाहेब मोरेशी लग्न झाले आणि लेखिकेचे जीवनच बदलून गेले. त्यांच्यामुळेच अनेक साहित्य क्षेत्राशी आणि सामाजिक चळवळीची संबंध आला. व मराठी साहित्यातील नामवंत साहित्यिकापासून नवोदित लेखकापर्यंत आणि चळवळीतील मान्यवर

विचारवंता पासून सामान्य कार्यकर्त्या पर्यंत सर्वांसी लेखिकेचा परिचय होत गेला. तसेच भटक्या, विमुक्ताच्या त्यांच्या चळवळी बरोबरच दलित, शोषित, उपेक्षित समाजाच्या चळवळीमध्ये वावरत असताना अनेक कार्यकर्त्याशी विचारवंताशी संबंध आला. आणि त्यातूनच लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. एवढेच नव्हे तर माझे सासरे आणि सासूबाई यांनी मला आपल्या मुलीसारखे मानले, मला मोकळीक दिली व इतर पुरुषाबरोबर मिळून मिसळून राहताना देखील त्यांनी मला रोकले नाही. वेळ प्रसंगी आमच्या जमाती मधील लोकांसी त्यांनी बोलून घेतले म्हणून मी स्वतःला घडू शकले हे पुस्तक मेहता पब्लिकेशन हाऊसचे अनिल आणि सुनील मेहता यांनी वाचकापर्यंत पोहोचण्याचे कार्य केले. त्यांचे देखील ऋण व्यक्त केले आहेत. गोंधळी आणि कुरमुडे जोशी या भटक्या जमातीमधील स्त्रियांचे जीवन मला जसे भावले,मी जे अनुभवले आणि भोगले तसेच इथे शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला आहे.

साठोत्तरी कालखंडामध्ये अनेक उपेक्षित वंचित मानवीय स्तर शिक्षणाच्या प्रवाहात येऊन आत्मसन्मानाने आपले जीवन जगण्यास तयार झाले. शिक्षणातून आत्मभान आलेला माणूस आपल्या मागासलेपणाची कारणे शोधतो. आपले मागासले पण हे दैवआधिष्ठित किंवा दैवी नसून ते मानवनिर्मित विषमताग्रस्त व्यवस्थेने तयार केलेले आहे त्यामुळे शोषणाधिष्ठित मानवनिर्मित व्यवस्थेच्या विरोधातला संघर्ष संविधानिक पद्धतीने करत असताना त्याला शिक्षणाची जोड आवश्यक असते. या जाणिवेतूनच मराठीमध्ये अनेक आत्मकथने लिहिली गेली त्यामध्ये स्त्रियांची आत्मकथने विशेष उल्लेख करण्यासारखे आहेत. विमल मोरे यांचे तीन दगडाची चूल हे आत्मकथन अनेक भटक्या विमुक्त वंचित उपेक्षित स्त्रियांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी प्रेरित करणारे आहे. या संदर्भाने मलपृष्ठावरचा मजकूर महत्त्वाचा आहे. "अज्ञान अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या आणि

रूढी परंपरांच्या चक्रात गुरफटलेल्या भटक्या विमुक्त जमातींपैकी गोंधळी या जातीत जन्माला आलेल्या विमल मोरे यांनी लिहिलेल्या तीन दगडाची चूल या आत्मकथनानं दलित साहित्यातील व पर्यायाने मराठी साहित्यातील आत्मकथनांचं दालन अधिक समृद्ध झालं आहे, या आत्मकथनात भोगलेल्या आणि भोगाव लागणाऱ्या जीवनाबद्दल कुठेही कडवटपणा प्रकट झालेला नाही. चिड, तुच्छता, सूड यांसारख्या अत्यंत स्वाभाविकपणे प्रकट होणाऱ्या भावनात्मक प्रतिक्रिया ही व्यक्त झालेल्या नाहीत जीवनाकडे पाहण्याची दृष्टीने कुठे गढूळ झालेली नाही. "सदरील मलपृष्ठाच्या मजकुरावरून हे स्पष्ट होते की प्रचंड उपेक्षा आणि वेदना भोगून सुद्धा व्यवस्थेबद्दलची चीड अत्यत संयतपणे व्यक्त झाली आहे.

मी स्त्री असूनही इतर कार्यकर्त्यांमध्ये फिरते त्यांच्याशी बोलते, स्त्रीमुक्तीची भूमिका मांडते म्हणून आमच्या जमातीमधील माणसं नाक मुरडत होती. त्याचा त्रास लेखिकेला होत नव्हता परंतु आई आणि भावंडांना मात्र लोकांचे बोलून घ्यावे लागत होते.

**सारांश:-**

पालामध्ये भटकत्या अवस्थेमध्ये सातत्याने फिरस्तीच्या माध्यमातून भीक मागून जीवन जगणाऱ्या भटक्या जमातींची अवस्था सांगताना लेखिका आपल्या जमाती बद्दल म्हणते, "आमच्या गोंधळी जमातीची माणसं असाच पोशाख करून भीक मागायला जातात. अंबाबाईचा पुजारी आहोत म्हणून लोकांना भंडारा लावतात आणि भीक मागतात. मुलंही हातात ताट किंवा परडी घेतात, त्यात अंबाबाईचा टाक ठेवून भाकरीचे तुकडे मागत फिरतात. काही माणसं आणि मुलं सटवाई करूनही मागायला जातात. "उपरोक्त संदर्भावरून हे लक्षात येते की भटक्या जमातीची अवस्था जनावराच्या पलीकडेही होती. शिक्षणाच्या माध्यमातून या समूहांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये आत्मभान आले. फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीमुळे हे लोक हक्कांची

अधिकारांची भाषा बोलायला लागले. या सर्व गोष्टींचा परिचय सदरील आत्मकथनातून होतो. लेखिकेचे पती चळवळीमध्ये काम करत असताना आपल्या जात बांधवांना समजून सांगताना म्हणतात, “मुलांना शाळेत पाठवायची जबाबदारी आपल्यालाच घ्यावी लागेल. प्रत्येक कार्यकर्त्यांनि आपल्या जातीतल्या चार-पाच मुलांना शाळेत पाठवायची जबाबदारी घ्यावी. मला शक्य होईल तेवढी मी मदत करीन.” सदरील संदर्भांवरून ते स्पष्ट होते की, भटक्या विमुक्तांच्या जीवनात स्थैर्य आणून विकासाची पायवाट निर्माण करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशभर साजरा होत असताना अजूनही या देशातील आदिम समूह म्हणून ओळखले जाणारे भटके विमुक्त यांच्या जीवनामध्ये म्हणावे तसे परिवर्तन झालेले नाही. अजूनही हा समूह मूलभूत गरजांपासून वंचित राहिलेला आहे. घर नाही, गाव नाही, राशन कार्ड नाही, शिक्षण नाही. अशा सगळ्या उपेक्षित काळात अंधश्रद्धा, अज्ञान, रूढी, परंपरा यामध्ये गुरफटलेला हा वंचित समूह खाजगीकरणाच्या व्यवस्थेत मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित आहे. याची जाणीव इथल्या शासनकर्त्यांना नाही असेच खेदाने म्हणावे लागते.

**संदर्भ :**

१ मोरे विमल, तीन दगडांची चूल

***

# साठोत्तरी मराठी बालकवितेत स्त्रियांचे योगदान

प्रा. सदाशिव गंगाधर चुकेवाड

मार्गदर्शक, बॅ.बाळासाहेब खंडेकर महाविद्यालय

प्रा. डॉ. उज्वला शिवराम जगताप

वेंगुर्ला तालुका वेंगुर्ला जिल्हा सिंधुदुर्ग संशोधक मार्गदर्शक व मराठी प्रमुख, शारदा महाविद्यालय परभणी.

प्रस्तावना :

बालवाडमयात बालकवितेला खूप महत्त्व आहे. बालसाहित्याचे विविध प्रकारपैकी कविता हा मुलांना खूप आवडणारा साहित्यप्रकार आहे. बालकवितेची आवड सर्वच वयोगटातील मुलांना असते. कवितेची आवड मुलांना जन्मताच असते. मूल रागायला लागल्यापासून गाणी ऐकायला लागतात. पाळण्यात झोपून मुलं आईची अंगाई गीते ऐकतात. तिच्या तालावर हाताची हालचाल करतात. बालकविता हा प्रकार सर्व साहित्य प्रकारापेक्षा मुलांना खूप जवळचा साहित्य प्रकार वाटतो.

बाल कविता म्हणजे बालांसाठी असलेली कधीही बालांवर रचलेली तर कधी बालांना उद्देशून लिहिलेली कविता होय.मराठी बालसाहित्य निर्माण करण्यात जसा पुरुषांचा वाटा आहे. तसाच स्त्रियांचा सुद्धा खूप मोठे योगदान आहे.सुंदर चित्रांची,भावपूर्ण आशयाची दर्जेदार बालकवितांची पुस्तके पुष्कळ प्रमाणात प्रकाशित होऊ लागले.

साठोतरी कालखंडात स्त्रीयाचे बालकवीतेत खूप मोठे योगदान आहे बाल कवितेतून लहान मुलांना मिळणारा आनंद निर्मळ व खोलपर्यंत जाणारा असतो. बडबडगीते, अंगाईगीतेवर छोट्या छोट्या म्हणीयुक्त वाक्याची माळ, चारोळया मुलांना मोहून टाकतात. बालकविता मुलांच्या गोष्टीतून भूमिकेतून लिहिलेली असेल तर ती कविता मुलांना खूप आवडते.

बालकवीतेत यमक व अनुप्रास असल्यास मुलं त्याकडे आकर्षिली जातात. बालगाण्यात जो रस असतो तो इतर कोणत्याही

बाल साहित्यात दिसत नाही. बालगीताची रचनाही खूपच अवघड कला आहे. कविना बालमनाचा अंतर्भाव घ्यावा लागतो. तसेच बालभावनेशी समरस व्हावे लागते.

१९६० ते १९८० या कालखंडातील बालकवीता

या कालखंडात अनेक कवयित्रीनी बाल कविता लिहून मोलाची भर घातलेली आहे. त्यामध्ये खालील लेखिकेचा उल्लेख करता येईल.

लक्ष्मीबाई टिळक :

लक्ष्मीबाई टिळक यांच्या बालकविता मुलांचे उद्बोधन करणाय्रा आहेत. खऱ्या अर्थाने कल्पनारम्य व भावनागर्भ कविता टिळक यांच्या आहेत. त्यांना बालमनोवृतीची जाण आहे. मुलांच्या नाजूक भावनेतून लक्ष्मीबाई टिळक यांनी बालकविता लिहिल्या आहेत. त्यांच्या कवितेत प्राण्यांचे चित्र आहे. त्यांची ओळख करून देण्यासाठी कवयित्रीने 'अगबाई हे काय' ही कविता लिहिली आहे.

काय गडे डोंगर चालत येत पुढे
काय कसे? इमारतीचे खांब जसे
कानाचा आकार माझ्या सुपलीचा
इवलाले डोळे जणू झोपी गेले सुपाएवढे कान

इमारतीच्या खांबाएवढा हत्तीचा पाय जरी असला तरी डोळे मात्र एवढीशी आहेत. असे सुंदर हत्तीचे वर्णन कवयित्री या कवितेत करतात. टिळक यांच्या कवितेतून बाल विश्व दिसते. त्यांच्या कविता लहान मुलांना खूप आवडतात.

काशीताई नाटेकर :

मुलांच्या कल्पना मुलांचे विचार काशीताईने आत्मसात केलेले दिसतात. त्यांच्या गीतातील भाव मुलांना सहज समजणारा आहे. त्यांच्या कवितेत प्राण्यांचे विश्व आहे. त्यांच्या चिऊताई,फुलाचा कुरकुला, रूसका चांदोबा, गुणी सोनुली, हिरवे पोपटआदी कविता प्रसिद्ध आहेत. चांदोबा चांदोबा भागलास का? ही कविता काशीताई नाटेकर यांची खूपच प्रसिद्ध आहे.

शांता शेळके :

शांता शेळके यांचा 'चिमण' हा (१९६०) पहिला कविता संग्रह आहे. या कवितासंग्रहांमध्ये त्यांनी चिमणी, कोंबडा, राघू, ससा, मनी या पशु-पक्षी व प्राण्यावर कविता लिहिले आहेत. 'थुई थुई नाच मोरा'

हा त्यांचा दुसऱ्या कविता संग्रह आहे. या कविता संग्रहात 18 कविता आहेत. शांत शेळके लहान मुलांना आवडेल असाच कवितांचा विषय निवडतात. मुलांचे मन जिंकले आहे. त्यांच्या 'मोर' या कवितेतून मोराचे चित्रण रेखाडले या कवितेत मुलगा मोराला म्हणतो तुझा सुंदर पिसारा फुलव.

थुई थुई नाच मोरा अंगणात माझ्या
भव्य तुझ्या पिसाऱ्यांचा फुलव फुलोरा

लहान मुलांना मोरांचा पिसारा खूप आवडतो. थुई थुई नाचणारा मोर मुलांचे मन वेधून घेतो अशा मोराचे वर्णन कवयित्री या कवितेत करतात. अशा सुंदर बालकविता शांता शेळके यानी लिहून बालसाहित्यात मोलाचे कार्य केले आहे .

संजीवनी मराठे :

बालकाव्यात संजीवनी मराठे यांनी मोठी कामगिरी केली आहे. बालमनाचे सूक्ष्म निरीक्षण करून बालभावना बाल कवितेतून त्यांनी प्रकट केल्या आहेत. 'इच्छा मार्ग आणि इतर गोष्टी', 'बर का ग आई', 'गंमत'या कवितासंग्रहातून संजीवनी मराठे यांनी मुलांचे मन जिंकले आहे. लहान मुलं आपल्या आई-वडिलांचे अनुकरण करतात 'बर का ग आई' या कवितेत आईचे अनुकरण केले आहे.बालकाना मोठ्यासारख वागावे वाटते त्यांचे अनुकरण "बर का ग आई' या कवितेत केले आहे.

तू आहेस बेबी मी आहे आई
बर का ग आई हे विसरायचं नाही
सकाळ होतोय मी तुला उठवीत
मीच तूझे दात घासून घईन

या कवितेत एका छोट्या मुलीचे विचार आहेत आईची दिवसभरांची धडपड पाहून मुलं आई सारखे वागण्याचा प्रयत्न करतात. याचे वर्णन या कवितेत आहे. राष्ट्रभक्तीपर कविता संजीवनी मराठी यांनी लिहिल्या आहेत.

लिलावती भागवत :

त्यांच्या बालगीतानी बालकाव्यात मोलाची भर घातली आहे. 'आला विदूषक आला', 'अंग अग मुली', 'नकलाकार हा घोडा गाडीवाला', 'खेळू चला खेळू' आदी बालगीते त्यांचे प्रसिद्ध आहेत.

त्यांच्या ‘बनवाला चालला’ व ‘घोडा चाललाच या पुस्तकाला राज्य सरकारचा सर्वोत्कृष्ट शिशुसाहित्य पारितोषिक मिळाले लीलावतीबाई या आला विदूषक आला हा कवितासंग्रह प्रशंसनीय आहे. त्यांची कविता मुलांना आवडणारी साधी, सोपी आहे. लिलावती भागवत यांनी पशु पक्षी व प्राण्याच्या कविता लिहील्या आहेत. नाविन्यपूर्ण व कल्पकतेने लिहिलेल्या कविता खूपच उठावदार आहेत.

सुमती पायगावकर :

यांच्या बालकविता खूपच लोकप्रिय आहेत. त्यांच्या कवितेचा विषय नाविन्यपूर्ण असले तरी वेगळ्या कल्पकतेने नटलेला आहे. त्यांच्या बालकविता कायम स्मरणात राहतील अशा आहेत. ‘पोपटदादाचं लग्न’, ‘लकलक नी सुनंदा, ‘रान गांवचीआगगाडी’ आणि ‘चाफ्याची फुले’ आदी कविता संग्रह खूपच प्रसिद्ध आहेत. ‘आई जरा माझं ऐक’ ही कविता लहान मुलांना खूप आवडते.

आई जरा ऐक माझं
नवे कपडे देऊन टाक
नाहीतर ते लहान होतील
मग म्हणशील वापरून टाक

लहान मुलं आपले काम साधण्यासाठी आईशी गोड बोलतात. आईचे सर्व काम करतात. या कवितेत मुलगा आपल्या आईला पटवून देण्याचा प्रयत्न करतो.

वृंदा निमये :

वृंदा निमये यांचे ‘लॉलीपॉप’, ‘जंतर-मंतर’, ‘धमाल आणि धमाल’, ‘चिकू टिकू अटकमटक’, ‘जंगलजत्रा’, ’बेटावरचे बहादर’, ’तीन कलंदर’, इत्यादी कविता संग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या कविता बालमनाला मोहून टाकणाऱ्या आहेत. त्यांची कवितेत हळूहळू विनोद आहे. कवितेची भाषा मुलांना समजणारी व सहज, सोपी, साधी, आहे.

सरिता पदकी :

सरिता पदकी यांचे’छोटू हतीची गोष्ट,’ ‘सुळूक’, ‘गुटर्र गु गुटर्र गु’ नाच पोरी नाचे’ हे कवितासंग्रह प्रकार झाले असले तरी त्यांनी जंमत टपू टिलू हा  पहिला बालकथा संग्रह लिहिला आहे.

पदकी यांची लिखाणाची शैली वेगळीच आहे. मोजक्या शब्दात त्या माडणी करतात. त्याच्या लहान मुलांना आवडतील अशा कविता आहेत. टांगा, सायकल, मोटार, बस याचबरोबर अनेक वेगवेगळे पशुपक्षी प्राणी त्यांच्या कवितेत आहेत. 'त्यांची पाऊस ही कविता मुलांना खूपच आवडते. डराव डराव या बालगीतातील.

आभाळ वाजलं धडाम धूम
वारा सुटला सू सू सुम्म
वीज चमकली चक चक चक
जिकडे तिकडे लख लख लख

यासारख्या ओळी मुलांना खूप आवडतात पावसाचे सुंदर वर्णन या कवितेत केले आहे.

अपर्णा देशपांडे :

देशपांडे यांचा 'खिरापत 'हा बालगीत संग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या कवितेत खुसखुशीत विनोद असून त्यांच्या कवितेचे विषय मुलांना खूप आवडणारे आहेत. मनी, घड्याळ, सातवार, तुळस असे चटकदार विषय त्यांच्या कवितेचे आहे. 'बाहुलीशी समजूत' या कवितेतील मुलगी मोठ्याचे अनुकरण करते मोठे माणसं कशी रुसणाय्राची समजूत काढतात अशी ती तिच्या बाहुलीची समजूत काढते अशा चटकदार कवितेतून अपर्णा देशपांडे मुलांचे मनोरंजन करतात.

निर्मला देशपांडे:

यांची 'मातीची गाय', चिवचिव' हे दोन बालगीत संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कवितेत तालबद्धता आहे. त्यांची बालगीते लहान मुलांवर सुसंस्कार करण्याचा प्रयत्न करतात. 'चिवचिव चिमणी' या बालगीत संग्रहातील गीते मुलांना तालावर म्हणता येतील असेच आहेत. तर देशपांडे यांची 'बालसंगोपन' ही कविता कल्पना रम्यतेवर आधारलेली आहे. ही कविता मुलांना खूप आवडते.

कडी घालून पुढच्या दारी
कोंबडी गेली बदकाच्या घरी
बदकु ताई ठेवा पोरावर नजर
अंडी ही उबवा जमत नसेल तर

भगिनी मंडळात माझं आहे भाषण

विषय बालसंगोपन

ही कविता मुलांना कल्पनेच्या विश्वात नेते या कवितेतून प्राणी सुद्धा विचार करीत असतील असे वाटते.

**१९८० ते २००५ या कालखंडातील बाल कविता**

या कालावधीत बाल कवितेत स्त्रियांचे खूप मोठे योगदान आहे. बालसाहित्यात स्त्री कवयित्री कडून जी अपेक्षा केली जाते त्यापेक्षा कितीतरी पटीने स्त्री कवयित्रीने बालकविता लिहिल्या आहेत.

सरिता वैद्य :

सरिता वैद्य याचा 'पिंकीचे मनोराज्य' (१९९६) 'खाऊच झाड', 'अजबनगरी' (१९८९) आदी बाल कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. जाणकारांचे लक्ष वेधून घेण्याची कामगिरी त्यांनी केली आहे. त्यांच्या बालकविता खुसखुशीत, गमतीशीर व कल्पनारम्य आहेत. 'सखेसोबती' ही बालकविता मुलांना भावनारी आहे.

झाड पशु पक्षी हे
माझे सखे सोबती
फार फार प्रेम आहे
माझं त्यांच्या वरती

या कवितेतून निसर्गाची ओळख मुलांना करून दिली आहे. तसेच पशुपक्षी, प्राणी, झाड लहान मुलांना खूप आवडतात प्राण्यावर मुलांचे खूप प्रेम असते. सरिता वैद्य यांच्या अजब नगरी पुस्तकाला बालकुमार साहित्य संमेलनाचा पुरस्कार मिळाला आहे. बालकविता लिहून सरिता वैद्य यांनी बाल साहित्यात खूप मोठी भर घातली आहे.

सुधा नरवाडकर :

यांचा 'डॉली चा वाढदिवस', हा कविता संग्रह लहान मुलांना खूपच आवडणार आहे. या कवितासंग्रहात वेगवेगळया विषयांच्या कविता आहेत. 'टिनूचा हट्ट' या कवितेतून टिनूहट्टी असून आजीच्या हातचे तूप साखर खाणारा आहे. मुलांना रुसून बसावे वाटते.

टिटू ने केला हट्ट
मामा बरोबर जाण्याचा
आजीबाईच्या हाताच्या
तूप साखर पोळीचा

लहान मुलं बंदिस्त एका ठिकाणी राहत नाहीत मुलांसोबत बाहेर खेळावे वाटते त्याचे सुंदर वर्णन या कवितेत केले आहे. त्यांच्या कवितेतील भाषाशैली साधी, सोपी, सरळ आहे.

मीना खोड :

यांची 'हॅप्पी बर्थडे' हा कवितासंग्रह (२०००) साली प्रकाशित झाला त्यांच्या या कवितासंग्रहात २८ कविता आहेत. त्यांच्या कवितेची भाषाशैली साधी, सोपी, मुलांना समजणारी व छोटी छोटी शब्दरचना आहे.

वर्षातला एक दिवस
फार फार आवडीचा
वाढदिवस लाख मोलाचा
असतो मज्जा मजेचा

मुलांना खूप मज्जा करावी वाटते वाढदिवस हा लहान मुलांच्या खूपच जवळचा विषय आहे. गोड गोड पदार्थ खाण्यासाठी लहान मुलं झोपेतून उठतात. वाढदिवस म्हटलं की मुलांना खूप मोज मज्जा करावी वाटते. मीना खोड यांच्या कवितेतून मुलांचे खूप मनोरंजन होते.

सुहासिनी हर्लेकर :

यांचा 'मी भारतीय आहे', 'आजी आणि सेलवाॅर्न 'हा कवितासंग्रह २००१ साली प्रकाशित झाला. या कवितासंग्रहात २४ कविता आहे. या करितासंग्रहातील कविता एका वेगळया वळणावरून जाणाय्रा आहेत. तर आजी आजोबा नातवंडावर किती प्रेम करतात याचे वर्णन या कवितासंग्रह आहे. भावनिक आनंद सुहासिनी हर्लेकर यांच्या कवितेत जानवतो. 'चिमण्यांनो' या कवितातून कवी मुलांना सांगतात.

गाडी दारात आली
आणि पाखरांची धांदल उडाली
कागद रंगकाड्या पेन्सिली
जिभल्या तिथे टाकून
उडून गेली पाखर भुर्रकन हा केसरशी

या कवितेत पक्षांचे वर्णन आहे पशू पक्षी व प्राणी म्हटले की लहान मुलं खूप आनंदी होतात. 'मी भारतीय आहे' हा हर्लेकर यांचा संस्कार गीत संग्रह आहे. २००१ साली प्रकाशित झाला असून त्यांच्या या संस्कारगीत संग्रहात २१ संस्कारगित आहेत. 'मी भारतीय आहे' या संस्कारगीतात प्रखर देशभक्ती, मातृभूमीचा अभिमान, थोरदेशभक्त,

समाजपुरुष या विषयावर हर्लेकर यांच्या कविता आहेत. त्यांच्या या कवितेतून लहान मुलांच्या बालमनावर राष्ट्र प्रेमाचे संस्कार होण्यास मोठी मदत होते सुहासिनी हर्लेकर यांचे बालसाहित्यात खूप मोठे मोलाचे योगदान आहे.

सुवर्णा ढोबळे :

यांचा 'गानपाऊस' हा २००५ साली पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहात ३३ कविता आहेत. त्यांच्या कविता वेगवेगळया विषयावर असल्या तरी त्यात वेगळेपणा जानवतो. उदा. सुगरणबाईचे घर, सागर किनारी, ताईचे बाळ, सुट्टी, इत्यादी.

१९८० ते २००५ या कालावधीत बाल कविता लिहिणाऱ्या अनेक कवयित्री आहेत. लीला धनपालवार यांचे 'वर्षा हसली' आणि 'जादूची छडी' हे दोन बालकविता संग्रह आहेत. यांच्या कवितेत भावविश्व, कल्पना आणि चमत्कृतीतून निर्माण होणारी गंमत त्यांच्या कवितेत आढळते तर प्रा. ललिता शिंदे यांचा छान छकुली हा कवितासंग्रह या संग्रहात 'बाहुलीच लग्न' या कवितेत बाहुलीच लग्नाच्या गंमती जमती अभिनयातून सादर केल्या आहेत.

साठोत्तरी कालखंडात अशा अनेक बालकवयित्री यांनी बालकविता लिहून बालसाहित्यात त्यांचे एक मोलाचे योगदान आहे. या शोधनिबंधात साठोत्तरी बालकवयित्रीच्या कवितांचा अभ्यास केलेला करण्यात आला आहे.

समारोप:

लहान मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी बालकविता महत्त्वपूर्ण आहे. मुलांचे मनोरंजन करीत त्यांचे मन संस्कारित करण्यासाठी बालकवितेची नितांत आवश्यकता आहे. बालकवितेची सुरुवात प्राचीन काळी झाली असली तरी, आधुनिक काळातील स्त्रियांचे बालकवीतेत मोठे योगदान आहे. बालकवितेत बालमनाचे प्रतिबिंब असते. मुलांच्या आवडीनिवडी त्यांचे भाव विश्व जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. १९६० पासून मराठी बालकवीतेत पुरुषा बरोबर स्त्रियांनी बालकविता मोठ्या प्रमाणात लिहिल्या आहेत.

१९६० ते १९८० या कालखंडातील लक्ष्मीबाई टिळक, काशीताई नाटेकर, शांता शेळके, संजीवनी मराठे, लीलावती भागवत, सुमती पायगावकर, वृंदा निमये, सरिता पदकी, अपर्णा देशपांडे अशा अनेक स्त्रियांनी मुलांना भावतील अशा बालकविता लिहिल्या आहेत.

१९८० ते २००५ च्या कालखंडातील सरिता वैद्य, सुद्धा नरवाडकर, मीना खोड, सुहासिनी हर्लेकर, सुवर्णा ढोबळे या लेखिकेनी बालकविता लिहून मोलाचे कार्य केले आहे. स्त्रिलेखिकेच्या बाल कवितेत पशु पक्षी, प्राणी, निसर्ग, शाळा, विविध चित्रे, यांचे वर्णन अधिक प्रमाणात आले आहे. तसेच यमक, अनुप्रास, लयबद्धता तालबध्दता यामुळे त्यांची कविता खूपच सुंदर फुलते आहे.

साठोत्तरी मराठी बालकविता लिहिणाऱ्या कवयित्रीच्या कवितेची भाषा साधी, सोपी, सरळ, मुलांना सहज समजणारी आहे. स्त्रियांच्या मनात मुलांबद्दल असलेल्या भावना त्यांनी खूप सुंदर पद्धतीने त्यांच्या बालकवीतेत चित्रित केले आहे. या शोधनिबंधात साठोत्तरी मराठी बालकवितेत स्त्रियांचे असलेले योगदान या विषयी अभ्यास केला आहे.

ग्रंथ सूची


१) बालवांङ्मय: देविदास बागूल

२) बालसाहित्य स्वरूप आणि वाटचाल : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पुणे

३) मराठी बालवांङ्मय स्वरूप आणि अपेक्षा: डॉ. सुलभा शाह


***

# गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीवादी विचार

**प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे**

मराठी विभाग प्रमुख शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

मराठी साहित्यातील प्रमुख चार प्रवाहात स्त्रीवादी साहित्य हा एक प्रमुख प्रवाह आहे. १९६० नंतर  उदयाला आलेल्या या प्रवाहात अनेक स्त्रियांनी साहित्य लेखन केले आहे. स्त्रीवादी साहित्यात प्रामुख्याने कविता हा साहित्य प्रकार मोठ्या प्रमाणात हाताळला गेला आहे. अनेक कवयत्रिनी स्त्री जीवनातील सुखदुःखे, समाजातील स्त्रियांचा दर्जा. यांचे आंतरिक दुःख आपल्या कवितेच्या माध्यमातून मांडले आहे. अनेक दलित स्त्रियांनी त्यांच्या जीवनात आलेल्या अनेक घटना प्रसंगाची नोंद कवितेच्या माध्यमातून प्रकट केली आहे. दलित साहित्यातील आत्मकथन या साहित्य प्रकारात अनेक स्त्री लेखिकांनी लेखन केले आहे.

महाराष्ट्रमध्ये महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांनी समाजाचा रोज पत्करून स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षणामुळे त्यांच्या जाणीव निर्माण झाली. स्त्रियांमध्ये जागृती होऊ लागली. या काळातच स्त्रीवादी विचारांची बिजे पेरली गेली.

जागतिकीकरणामुळे सगळे देश एकमेकां जवळ येऊ लागले. त्यामुळे साहित्य संस्कृती कला यांच्या मध्ये देवघेव होऊ लागली. संसाराची अनेक कामे घराबाहेर जाऊन करू लागल्या. स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने अनेक कामे करू लागल्या. त्या आपली शारीरिक मानसिक गरज ही स्पष्ट बोलून दाखवू लागल्या आपल्या वर होणाऱ्या

अन्याय अत्याचाराचा निषेध करू लागल्या परंपरा संकेत यांना झुगारून देऊ लागल्या हे सर्व त्यांच्या लेखनातून व्यक्त होऊ लागले.

नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यामुळे आलेले अनुभव त्या साहित्यातून मांडल्या. घरातील सर्व कामे करत असताना त्यांना नोकरी करू लागल्या त्यामुळे त्यांची कोंडी होऊ लागली आणि त्यांच्या तोंडी स्त्री मुक्तीच्या लढ्याची भाषा येऊ लागली स्वतःच्या क्षमताची व्यक्तिमत्त्वाची ओळख पटलेली स्त्री आपल्या भावना कादंबरीतून व्यक्त करू लागले स्त्री पुरुषाच्या दृष्टिकोनामध्ये आणि विवाहाच्या संकल्पनेमध्ये बदल होणे आवश्यक असल्याचे विचार कादंबरीतून लिहू लागल्या.

गौरी देशपांडे, प्रतिभा इंगोले, अनुराधा वैद्य, कमल देसाई, प्रतिभा रानडे, सुशीला सपकाळ, रेखा बैजल, वैजयंती काळे, मालती बेडेकर, अंबिका सरकार, मलिका अमर शेख, आशा बगे आदी स्त्री लेखिकांनी आपल्या कादंबरी लेखनातून स्त्रीवादी विचारसरणी साकारलेली आहे.

१९६०  एकेक पान गळावया.

गौरी देशपांडे यांची ही कादंबरी १९८० साली प्रकाशित झाली. या कादंबरीत राधा – माधव यांच्यातील सहजीवनाची कथा सांगितली आहे. राधा माधवचा मृत्यू झाल्यावर आपल्या जीवनाचे जगण्याची संदर्भ हरवत नाही. माधवच्या निधना नंतर त्याची मुले दुःखाचा आव आणतात. याची राधा माधवच्या मृत्यू नंतर राधा देह दानासाठी तयार होते. त्या पत्रावर सह्या करते. फरहदहा राधा व माधव यांचा मित्र असतो. त्यांच्या जवळ राधा आपला शोक व्यक्त करते. राधाचे मुंबईला घर घेणे त्यामुळे आई – मुले एकमेकांपासून दूरावतात. “कॉस्मो पॉलीटन आई आणि पारंपारिक मुलगी यांच्यातला संघर्ष गौरी देशपांडे यांनी चित्रित केला आहे”[१]

राधा आणि तिची बहिण रुक्मिणी यांच्यात फरक आहे. कादंबरीतील राधा ही पात्र बुद्धिवादी प्रत्येक घटनेला समजून घेणारे आहे तर रुक्मिणी हे पात्र पैशाच्या भोगाच्या वाटेने धावणारे आहे. पैशासाठी वाटेलते करणारे आहे. या कादंबरीत व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार अंगीकारणाऱ्या आई –वडिलांची मुले प्रतिगामी असल्याची कबुली पटते. “मुले आणि आई – वडील यांच्यातले नाते, गुदमरून टाकणारी माया? चढत्या आवाजात लावलेली शिस्त, हुतात्म्यांचा आव आणून केलेले आणि मग जन्मभर तोंडावर फेकलेले स्वार्थ त्याग”[२] ही पारंपारिक राधा मान्य करत नाही.

राधा – माधव आपल्या परिने जगणारे आहेत. चार लोक काय म्हणतील याचा त्यांनी विचार केलेला नाही. राधाच्या वागण्या वरून वाटते, तिन “हिंदू समाजातल्या परंपरांनी युक्त असलेलं स्त्रीचं जग तिनं केव्हाच मागे टाकलेले आहे.”[३]

माधव हे व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे आहे. परंतु त्यांची मुले पारंपरिक आहेत व पति निधना नंतर राधा सर्व संकटाला तोंड देत खंबिरपणे स्वतंत्र जीवन जगणारी आहे.

कारावासातून पत्रे :

या कादंबरीत आधुनिक स्त्रियांची घुसमट आणि त्यातून बाहेर येण्याची त्यांची धडपड, आपल्या मनातील प्रत्येक मानसिक, शारीरिक भावना स्पष्टपणे मांडणे, पुरुषांशी केलेली मैत्री यांची मांडणी अत्यंत आत्मियतेने केलेली आहे. “पुरुषा सारखे स्वातंत्र्य मिळावे अशी इच्छा बाळगणारी स्त्री पुरुषाला पत्नी किंवा प्रेयसी म्हणून चालत नाही”४ हे वास्तव त्यांनी यातून मांडलेले आहे. या कादंबरीतील नायिका उच्च मध्यम वर्गात वाढल्या मुळे आई – वडिलांची तत्त्व निष्ठा तिला मिळाली. त्यामुळे समाजातील पुरूषपणांच्या कुबड्यामुळे पोचणारी झळ तिला फारशी मिळाली नाही. आपल्या आयुष्यातील प्रियकराचे सोडून जाणे, परत येणे याकडे ती तटस्थतेने पाहते व म्हणते, “आपल्या

जे बुद्धीला पटलते करायला लागणारा आत्मविश्वास, मग लोक गेले खड्यात !"[५] अशी स्वतंत्र्य, मना प्रमाणे वागण्याची वृत्ती जोपासणारी स्त्री आहे. माझ्यातील माणूस या व्यक्ती बद्दल जो पर्यंत तुझ्यातील माणूस या व्यक्तीस मैत्रीभाव, दयाभाव, सहानुभूती, प्रेमभाव निर्माण होत नाही. तो पर्यंत त्यांनी प्रेमाच्या भानगडीत पडण्याचा अट्टहास धरु नये. असा गौरी देशपांडे यांचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो.

मध्य लटपटीत :

या कादंबरीतून उच्च मध्यम वर्गातल्या विवाहीत स्त्रीची लटपटणारी अवस्था लेखिकेने चित्रबद्ध केलेली आहे. समाजाच्या चौकटीत बंदिस्त असणाऱ्या स्त्रीच्या मनाची अस्वस्थता, दुःख हे बाहेर येत ते डोळयातील अश्रु रूपाने. लेखिका लग्न व्यवस्थेतील प्रश्न या मधून मांडतात. नवऱ्याच्या पाठीमागे परदेशात जाणं, चार भिंतीच्या आतील जीवनाची घुसमट, चाळीशी नंतर जीवनाला आलेला रूक्ष पणा, पुरूषांच्या दृष्टीकोनातून स्त्री चाळीशीत पोचल्यावर उपभोग शून्य होते ही मानसिकता, अशा विविध भावना नायिकेच्या मनात येतात. हे वास्तव तिला पाहयला मिळते. महेरोत्रा हा आपल्या पत्नीला सोडून परदेशात दुसऱ्या बाई बरोबर राहतो. व त्याचे समर्थन करतो. याचा नायिकेला राग येतो त्यावेळी ती म्हणते, "स्त्री संभोग म्हणजे काय गाडीचा अपघात आहे? डोळयाचं पात लवतनलवतं तोच थडबुम! आणि संपल सगळं "६

केवळ देहाच्या लालसेने संभोग करणाऱ्या पुरूषी प्रवृत्ती विरूद्धचा राग यातून व्यक्त झालेला आहे. निर्मला ही हुशार असून ती माणसांच्या गोतावळयात वावरते. एकमेकांत संवाद असलेली, संवाद नसलेली, विसंवाद असलेली जोडपी यामध्ये भेटतात. रती व कांचनचे एकमेकांवर प्रेम नाही हे त्यांना माहीत असूनही ते आपसात संबंध ठेवून आहेत. अशी लग्न व्यवस्थेत अडकलेल्या जोडप्यांची फरफट लेखिका यातून मांडतात.

**गोफ**

गोफ ही लघु कादंबरी नाते संबंधाचा शोध घेणारी आहे. या कादंबरीत सासू-सून यांच्यातील नाते संबंध उलगडून दाखविलेले आहे. वसुमती ह्या आपल्या सुनेने पती निधनानंतर गावाकडे यावे आणि शेती, घर, व्यवसाय सांभाळावा असे सासूला म्हणजेच माँला वाटते. पण वसुमती मुलाला घेऊन आपल्या माहेरी जाते आणि तेथे धर्मकिर्ती नावाच्या व्यक्तिकडे आणि एका कॉलेजात काम करते. वसुमती आपली हकीकत धर्मकिर्तीस सांगते. आतून तुटलेली वसुमती बाहेर जगताना ठामपणे जगते. “कोरडेराहा नाहीतर धडगत नाही, माझी ही नाही आणि आदित्याची ही नाही !”७ असे ती स्वतःला बजावते. आईच्या घरावर वहिनीची सत्ता त्यामुळे घर काम व नोकरी करून ती जीवन जगते. माँ धर्मकीतींना माय-लेकराला घरी पाठविण्याची विनंती करते. धर्मकीर्ती मान्य करतात. वसुमती आणि वारलेला पती सुलक्षण त्याचा मित्र जसपाल यांच्या लग्नाला ही माँचा विरोध नसतो व ही सारी हकीकत पत्राने कळविण्याची जबाबदारी ही धर्मकीर्ती स्वत:वर घेतो. वसुमती सुलक्षणच वर्णन करताना म्हणते, “त्याची तुलना मी शनिवार वाड्याशी करत असे. बाहेरून भले बुरूज आणि तटबंद्या आणि कुणावर ही छाप पडेल असे रूप आतमध्ये भग्न अवशेष आणि रिकामे औदासिन्य”८ व सुमती, माँ, आदित्या हे एकमेकात रूळतात. एका उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या कुटुंबाची घडी धर्मकीर्ती या व्यक्तीमुळे बसते. हे कुटुंब शेती करू लागते. जसपाल हा वसुमतीचा चांगला मित्र आहे. सुलक्षणच्या व्यसनाधीनते मध्ये जसपालचा वसुमतीला मोठा आधार वाटतो. धर्मकिर्ती व वसुमतीची आई गिरीजाबाई यांचे निधन होते. आदित्य, माँ, आनंद जो वसुमतीची आई आणि धर्मकीर्ती यांच्या प्रयत्नामुळे पोलीस म्हणून गावात बदली करून घेतो. या तिघांच्या सहमतीने व सुमती व जसपाल लग्न करतात. सासू आणि सुनेच्या संवादातून गौरी देशपांडे यांनी ही कादंबरी साकारलेली आहे. त्या दोघी परिस्थितीशी संघर्ष करतात. यशस्वी ही होतात.

मुक्काम :

मुक्काम या कादंबरीतील कालिंदी जगण्यासाठी संघर्ष करणारी आहे. अनेकांशी ती सावधपणाने मैत्री करते. ती कोणताही निर्णय ठरवून घेते. नवऱ्याला सोडून भारतात परत आल्यावर नोकरीची शोधा शोध करते. आई – वडिलांना याचा त्रास होईल. ही जाणिव ही मनामध्ये बाळगते. तिच्या बहिणी परदेशातील मैत्रिणी पेक्षाही तिला

अपरिचित होत्या. मोठी बहीण कष्ट करून घर कुटुंब, शेती पाहणारी आहे. तिच्या नवऱ्याला तिची थोडी ही जाणिव नाही. दुसरी ताई लग्नात झालेल्या कुरबुरीमुळे माहेरला पारखी झालेली. तिसरी माई कमर्शिअल आर्टचा कोर्स करून जाहिरात कंपनीत नोकरी करणारी आहे. तिने बॉसच्या प्रेमात पडून लग्न केले. माई आणि मिलोन ह्या दोघीही नव्या युगाच्या प्रतिनिधी वाटतात. कालिंदी पुढे माईच्या मदतीने तळेगावला नोकरी मिळविते. घर बांधते, तिथे तरूण स्त्रियांना नोकरी देण्यास कंपन्याना पसंती दर्शवितात, कारण गरोदर पणा, बाळंतपणातील रजेचा प्रश्न निर्माण होतो. यावर कालिंदी टीका करते. कालिंदी अंध, अपंग, मतिमंद मुलांची देखभाल करणाऱ्या संस्थेत नोकरी मिळविते. कालिंदीची मुलगी मंदा ही मंतिमंद असल्यामुळे ती या संस्थेत मनापासून सेवा करते. ट्रस्टच्या प्रमुख सुनेत्राबाई, त्यांचे पती अरविंद, दत्तक मुलगा डॉ. यशवंत यांच्याशी कार्य मग्न होऊन काम करते. मात्र शेजारी मंडळी, कामा निमित्त भेटणारी माणसे यांच्याशीच ती संपर्क ठेवते. इयन तिला भेटण्यासाठी तळेगावला येतो आणि आपले प्रेम व्यक्त करतो. माईने जेव्हा इयन बद्दल कालिंदीला विचारते. तेव्हा ती म्हणते, “वाटा कितीही वाकड्या असल्या तरी शक्य तेव्हा त्या तुडवून आम्ही एकमेकांना भेटूच भेटू”९ कालिंदी आपल्या पुढील प्रत्येक आव्हान दिन मित्रीच्या प्रेमामुळे पेलत होती. ती त्याला भेटण्यासाठी ग्रीसला जाते. पाणबुडीचा अपघात होऊन त्यात दिमित्रीला अपंगत्व येते. त्यामुळे तो कालिंदीवर जीवापाड प्रेम असूनही स्वत:ला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. कालिंदी त्याचे प्रेम हस्तगत करते व नंतर ती भारतात परतून नोकरीत मन रमविण्याचा प्रयत्न करते. कालिंदीत झालेल्या बदलाचा नंदन स्वीकार करतो. तो कालिंदीची भेट घेतो. हा बदल मात्र कालिंदी जडपणाने स्वीकारते. “कालिंदीच्या या मुक्कामाला केवळ शारीरिक वास्तव्याचा संदर्भ नसून वाहत्या उसळत्या जीवनाला सदैव सन्मुख राहणाच्या तिच्या स्वावलंबी, निकोप जीवनदृष्टीचा आहे

!'१० यातून कालिंदीचा निर्धार, तिला खडतर आयुष्यातून झालेली आत्म जाणिव गौरी देशपांडे कांदबरीतून मांडतात.

दूस्तर हा घाट आणि थांग :

१९८९ साली ही लघुकांदबरी प्रकाशित झाली. यातील नायिका नमू पोरकी आहे. ती मावशीच्या सान्निध्यात मोठी होते. इंग्रजी शिकताना ती त्या प्राध्यापकांशी एकरूप होते. त्यांच्या प्रेमात पडते. त्यांच्या सोबत ती शेतावरील घरी जाते. त्या ठिकाणी वनमाळी या प्राध्यापकांच्या मुलाशी तिचा परिचय होतो. नमू मावशी आजारी पडल्यावर तिच्या सोबत मुंबईला जाते तेव्हा तिची वनमाळीशी गाठ पडते. वनमाळीच्या आलीशान बंगल्यातील सौंदर्य, वस्तू, पुस्तके, चित्रे, नोकर-चाकर, रूचकर जेवण पाहून तिचे मन आनंदी होते. पोरकी नमू आणि वनमाळी यांचा विवाह होतो. मात्र वनमाळी परदेश दौऱ्या निमित्ताने इतर स्त्रियांशी संबंध ठेवतो. ही गोष्ट नमूला पटत नाही. याचा नमूला राग येतो. आपले आयुष्य तिला पराभव झल्या प्रमाणे वाटू लागते. "आपण नमू होतो ते वनमाळीची चकचकीत, तुकतुकीत बायको कधी झालो?"११ असा प्रश्न तिला पडतो. वनमाळी हा शरीराचे चोचले पुरविणारा आहे. नमू एम. ए. करण्यासाठी मुंबईला येते मात्र ती नमू नसते तर एक दुःखी, कष्टी आणि वेगळं काहीतरी करू पाहणारी नमू असते.

थांगया लघु कादंबरीतील नायिका कालिंदी आपला पती नंदन बरोबर परदेशात व ते दोघे विविध देशातून आलेल्या लोकांच्या वसाहतीत राहतात. कामावर जाणारे पुरुष आणि त्यांच्या मागे, कुचाळक्या आणि पाटर्या करणाऱ्या त्या बायका,  त्यांच्या सारखे कालिंदी मार्गक्रमन करते, फिरायला जाणे, पोहण्यासाठी तलावावर जाणे, घरकाम, जेवण, नाष्टा बनवणे, लिहिणे, शॉपिंग, सहल अशा पद्धतीने कालिंदी वावरू लागली. नकळत दिन मित्री आणि इयन या पर पुरूषांकडे ती खेचली जाते. त्यांच्या तोंडून कालिंदीच्या सौंदर्याचे वर्णन

केले जाते. नंदन मात्र भारतीय संस्कृतीत वाढलेला तो कालिंदीवर जास्त बंधने ठेवू शकत नाही. नवरा बायकोचे एकमेकांना स्वीकारणे, चालवून घेणे, माया लावणे, तिरस्कार करणे याची उत्तरे वेगवेगळी व इतरांना समजून शकणारी असतात असा विचार गौरी | देशपांडे यातून मांडतात. नंदनला कालिंदीने हमी बावळट वाटते. व्यवहार, शारीरिक गरज म्हणून कालिंदीशी त्याने लग्न केले. इकडे दिन मित्रीला सुंदर, देखणी बायको आहे पण ती तिच्यात विश्वात रमलेली असते. कालिंदीला इयनची गरज तात्पुरती तर दिमित्रीची गरज सनातन वाटते. दिनमित्रीला पोहताना जखम झाल्यामुळे. कालिंदी त्याची सेवा करते. पुढे दिनमित्री गावाकडे जातो. कालिंदीला ही तिच्या गावी जावे असे वाटू लागते. दिनमित्री बरोबर जावे असे ही तिला वाटते. नंदन कालिदिंच्या थोबाडीत मारतो. "मला किती ही मारले तरी कशात काही ही फरक पडणार नाही"१२ असे ती निर्धाराने म्हणते. नंदन पासून मुक्तीचा निर्णय घेते. तेव्हा तिला मंदाही मतिमंद मैत्रिण भेटते. पुढे ती लवकर निधन पावते. कालिंदीच्या मनात नंदन विषयी घृणा असते. दिनमित्री तिला सोडून गेला तो परत भेटेल याची शाश्वती नाही. तरीही तिचा त्याच्याशी मुकसंवाद चालूच असतो. हा संवाद मुक्तीचा आहे. तो संवाद आत्म संवाद आहे. इयन कडून मिळालेले शारीरिक सुख आणि दिनमित्रीवरील अपरंपार प्रेम एवढ्याच कालिंदीच्या सुखाच्या बाजू असल्याचे जाणवते. हे चित्र गौरी देशपांडे या कादंबरीतून उभे करतात.

निष्कर्ष:-

स्त्री आणि पुरुष यांना समाजात सर्व क्षेत्रात समान दर्जा मिळाला पाहिजे.. पुरुषा पेक्षा तिला कमी दर्जा नको आहे. स्त्रीवादी लेखिका या समाजामध्ये असलेल्या स्वतःच्या स्थानाचा शोध घेतात. समाजाने जे अधिकार स्त्रियांसाठी नाकारलेले आहेत . त्या विरोधात लेखन करतात. स्त्रियांनी नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडल्यानंतर

आलेले अनुभव विशद केलेले आहेत. एका बाजूला नोकरी तर दुसऱ्या बाजूला घर यामुळे तिची कोंडी होऊ लागली व त्यातूनच तिच्या तोंडी समतेची, स्त्रीमुक्ती, न्यायाची व बंडखोरीची भाषा येऊ लागली. स्वतःच्या क्षमतांची, व्यक्तिमत्त्वाची ओळख पटलेली आपल्या भावना कादंबरी रूपाने व्यक्त करताना दिसते. गौरी देशपांडे यांनी स्त्रीची पुरुष प्रधान व्यवस्थेमध्ये होणारी फरफट व त्यातून तिच्या मनाची झालेली कोंडी त्याच प्रमाणे संकटातून स्वहीत, कुटुंबहीत जपण्यासाठी तिने अवलंबलेला मार्ग दाखविलेले धाडस या गोष्टी कादंबरीतून व्यक्त झालेल्या दिसून येतात.

संदर्भ टिपा:-


१) महाजन वंदना, स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती, 2013,पृ.८५

२) तत्रैव,उ.नि.पृ.८७

३) आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. ११५

४) महाजन वंदना, स्त्रीवाद आणि मराठी साहित्य,उ.नि.पृ.७४

५) तत्रैव,उ.नि.पृ.७५

६) तत्रैव,उ.नि.पृ.८०

७) तत्रैव,उ.नि.पृ.१०८

८) तत्रैव,उ.नि.पृ. १०९

९) तत्रैव,उ.नि.पृ.१०८

१०)देशपांडे गौरी, मुक्काम, मौज प्रकाशन, मुंबई, चवथी आवृत्ती २००८ (मलपृष्ठ)

११)तत्रैव,उ.नि.पृ. १०१

१२)तत्रैव,उ.नि.पृ.१०३


***

# साठोत्तरी काळातील निवडक स्त्रियांची प्रवासवर्णने

**डॉ. मनिषा जगन्नाथ झोंबाडे**

मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, मुरुड, ता, जि.लातूर

स्वातंत्र्यपूर्व कालखंडा पासून म्हणजे इ.स. 18 व्या शतकापासून मराठी साहित्य इतिहासामध्ये प्रवासवर्णन लेखन परंपरा अखंडपणे चालत आलेली आहे. त्यामध्ये काही स्त्रीयांनी ही जगभर प्रवास करुन प्रवासातील अनुभव प्रवासवर्णनाच्या रुपात शब्दबद्ध केले आहेत. हे पंडिता रमाबाई यांच्या 'इंग्लंडचा प्रवास भाग-१(१८८३) व 'युनाएटेड स्टेटसची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त' भाग-१ (१८८३) या प्रवासवर्णनावरून दिसून येते. इंग्लंड व अमेरिका या दोन देशामध्ये विद्याजर्नासाठी पंडिता रमाबाई यांनी काही काळ वास्तव्य केले होते. त्या वास्तव्यादरम्यान तेथील सामाजिक, राजकीय, धार्मिक बाबी जवळून अनुभवल्या आणि त्या आपल्या प्रवासवर्णनात बिनधास्तपणे मांडल्या. त्यांचे 'इंग्लडचा प्रवास' भाग-१ हे प्रवासवर्णन अस्सल मराठी प्रवासवर्णनाचा उत्कृष्ट नमुना ठरते. रमाबाईंनी इंग्लंवरुन ३००० मैलाचा प्रवास करुन येथील माहिती मिळवून ती माहिती प्रवासवर्णाच्या रुपात मांडली आहे. विशेष म्हणजे मराठीतील परदेश जीवन चित्रणावरील लेखन करणाऱ्या पहिल्या स्त्री प्रवासवर्णनकार म्हणून पंडिता रमाबाई यांचा उल्लेख महत्वपूर्ण ठरतो. हे पहिले स्त्रीलिखित प्रवासवर्णन असल्याचे दिसून येते. इ.स. १९१५ मध्ये पार्वतीबाई चिटणवीस लिखित 'आमचा जगाचा प्रवास' (१९१५) हे प्रवासवर्णन म्हणजे सौ. चिटणवीस यांनी युरोप, अमेरिका, कोलंबो, मलाया, जपान इत्यादी प्रदेशात केलेल्या प्रवासाचे वर्णन आहे.

माणसांच्या स्वभावाच्या विविध छटा तसेच नयनरम्य ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे यांचे अगदी उत्कठतेने चित्रण केले आहे. याच कालखंडात गोडसे भटजी यांनी 'माझा प्रवास' (१९०७) हे प्रवासवर्णन लिहीले होते. पार्वतीबाई यांनी याच काळामध्ये गोडसे भटजी यांच्या बरोबरीने प्रवासवर्णन लिहिण्याचा विक्रम केला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्य इतिहासामध्ये अनेक स्त्री प्रवास वर्णनकारांनी प्रवासवर्णन वाडमय प्रकार प्रगतीच्या पथावर नेला. या काळात सर्वप्रथम प्रकाशित झालेले श्रीमती कमला फडके यांचे 'त्रिवेदूमची सफर' (१९४७) हे प्रवासवर्णन होय. सुमारे ८३ पानांच्या या प्रवासवर्णनामधून कमला फडके यांनी वृंदावनची जादू, म्हैसूर, निलगिरीची राणी, उटी, इ. स्थळ दर्शन उत्कृष्टरितीने घडविले आहे. त्यानंतर १९५६ मध्ये प्रकाशित झालेले 'बर्फाच्या दुनियेत' (१९५६) या चारु शिला गुप्ते लिखित या प्रवासवर्णनास वि. स खांडेकराची प्रस्तावना लाभलेली आहे. या प्रवासवर्णनाचे वैशिष्टये म्हणजे यामधील प्रवासाचे निवेदन पत्र रुपाने केले आहे. व्यक्ती आणि निर्सग याबद्दल अतिशय मनमोकळया गप्पा गोष्टी करत चारुशिल गुप्ते यांनी प्रवासातील अनुभव शब्दबद्ध केला आहे.

इ.स. १९६० नंतर मराठी साहित्य क्षेत्रात फार मोठे स्थित्यंतर घडून आले. या काळात मराठी कथा, कादंबरी, कविता, चरित्र-आत्मचरित्र, नाटक, निबंध-लघुनिबंध इ. वाडमय प्रकारांबरोबरच प्रवासवर्णन या वाडमय प्रकाराने ही अनेक नवीन वळणे घेतल्याचे दिसून येते. प्रवासवर्णन लेखनाच्या झालेल्या या स्थित्यंतरा मागे नव्या जाणीवा, नव्या प्रेरणा होत्या. १९६० साली स्वातंत्र्याला १५ वर्षे झालेली असल्याने प्रवासवर्णनकारांचा भूतकाळाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. बहुजन समाजात झालेल्या शिक्षणाच्या प्रचारामुळे प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. रुढी परंपरेच्या बंधनांना झुगारुन स्त्री याही प्रवास करु लागल्या. केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर आपापल्या प्रयोजनास्तव प्रवास करणाऱ्या स्त्रायांची

संख्या वाढली. या स्त्री या प्रवासात आलेले अनुभव प्रवासवर्णनाच्या रुपाने साकारु लागल्या. १९६० सालाच्या प्रारंभी प्रकाशित झालेले विजया जोशी लिखित् 'आठवणींची कोरीव लेणी' (१९६०) या प्रवासवर्णनामध्ये मुंबई ते लंडन प्रवासाचे वर्णन आलेले आहे. विजया जोशी यांनी मुंबई ते लंडन हा प्रवास बोटीने केला होता. याच प्रवासातील अनुभव त्यांनी अनेक अविष्कार, विविध प्रवृत्तीसकट दर्शविला आहे. तर इंदुमती शेवडे लिखित् 'इथे साहेबाचिया नगरी' (१९६६) या प्रवासवर्णनामधे चित्र, वास्तु, शिल्प अशा ललित कलांचे दर्शन उत्तमरितीन घडविले आहे. प्रवासातील स्थळांचे हुबेहुब वर्णन इंदुमती शेवडे यांनी केल्याने ही सर्वस्थळे वाचकांना ऐतिहासिक-सांस्कृतिक महत्त्व पटवून देतात. १९६७ मध्ये प्रकाशित झालेले मुणालिनी देसाई यांचे 'विराणी' (१९६७) हे प्रवासवर्णन म्हणजे संपूर्ण भारत भ्रमंती होय. भारतभर प्रवास करताना मृणालिनी देसाई यांना प्रवासात दृष्टीस आलेल्या स्थळांचे रेखाटन करते वेळी त्यांनी त्याला अनुरुप दंतकथा, ऐतिहासिक प्रसंग पौराणिक आरव्याने इ. चा उपयोग केला आहे. भारतातील विविध स्थळांची ऐतिहासिक पार्श्वभूमी वाचंकापुढे मांडण्याच्या उद्देशाने हे प्रवासवर्णन लिहिल्याचे दिसून येते. कमला फडके यांनी १९४७ साली लिहिलेले 'त्रिवेंद्रमची सफर' या प्रवासवर्णन लेखना नंतर तब्बल २० वर्षांनी आणखीन एक प्रवासवर्णन लिहिण्याचा विक्रम केला. ते प्रवासवर्णन म्हणजे 'उटकमंडची यात्रा' (१९६७) हे होय. कमला फडके यांनी आपले पती ना. सी फडके यांच्या सोबत केलेल्या सुखद प्रवासाचे वर्णन यामध्ये चित्रीत केले आहे. मुक्ता केणेकर लिखित् 'झेपावे दक्षिणाकडे' (१९६९) हे प्रवासवर्णन प्रौढ संस्कृत प्रचुर भाषेत लिहिले आहे. यामध्ये मुक्ता केणेकरांनी दक्षिणेकडील देशाचे चित्रण करताना तेथिल निसर्ग, व्यक्ती, समाज-संस्कृती भाषा शैली इ. बाबीवर प्रकाश टाकला आहे. इंदू साक्रीकर लिखित 'पूर्वीच्या प्रदेशात' (१९६९) या प्रवासवर्णनामध्ये इंदू साक्रीकर यांनी दोन देशांमधील स्त्री यांचा वेगळेपणा दर्शविला आहे. जपानी स्त्री व भारतीय

स्त्री या दोहोंमधील आचार विचार, राहणीमान, स्वभाव विशेष इत्यादी बाबी गुणदोषासकट स्पष्ट केल्या आहेत. मंगला दास्ताने लिखित् 'रम्यते सिंगापूर' (१९८९) हे सिंगापूर या देशावर आधारित माहितीपर असे हे प्रवासवर्णन आहे. यामध्ये मंगला दास्ताने यांनी सूक्ष्म निरीक्षण शक्तीने सिंगापूर मधील समाजाप्रचलित विविध संस्कृती – परंपरा, व्यक्तिस्वभाव स्थळे व निर्सगाचे रुपवैभव तसेच विवीधता, पशुपक्ष्यांचे सजीव अस्तित्व आदि बाबी अतिशय तन्मयतेने रेखाटलेल्या दिसतात. म्हणूनच या प्रवासवर्णना विषयी प्रकाशक प्र. न. देवळाणकर म्हणतात, "सौ. मंगला दास्ताने यांचे हे आणखी एक देश ओळखपर प्रवासवर्णन प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. तेवीस रेखाचित्र व एकतीस कलापत्रकावरील बहुरंगी छायाचित्रे घालून आजचे रम्य सिंगापूर डोळ्यापुढे उभे केले आहे." (दास्ताने मंगला – रम्यते सिंगापूर, पृ.क्र. ५) मंगला दास्ताने यांनी सिंगापूर वास्तव्यामध्ये तेथील लोकजीवन, समाज – संस्कृती, विवीध स्थळांचे निसर्ग सौंदर्य हे सारे अनुभवून त्यास प्रवासवर्णनाचे स्वरुप दिले आहे. रसाळ भाषाशैली, योग्य रसांचा परिपोष, उत्कृष्ट निवेदन इ. वैशिष्टयांमुळे हे प्रवासवर्णन वाचकाच्या पसंतीचे ठरते. क्षमा लिमये यांचे 'डॉलरच्या देशात' (२००१) हे प्रवासवर्णन मुखपृष्ठावर असलेली अमेरिकन स्वातंत्र्य देवता व अमेरिकन डॉलर या चित्रामुळे प्रथम दर्शनी वाचकांची उत्कंठता वाढविते. विशेष म्हणजे या काळात अमेरिका जीवन चित्रणावर बरीच प्रवासवर्णने निर्माण झाली असली तरी प्रत्येक लेखकाची प्रवासाची प्रयोजने, अनुभव घेण्याची दृष्टी व प्रवासवर्णन लेखनाची शैली भिन्न होती त्यामुळे ही सर्व प्रवासवर्णने परस्पराहून वेगळी वाटतात. क्षमा लिमये यांनी 'डॉलर च्या देशात' या प्रवासवर्णनामध्ये वर्णनात्मक पद्धतीने अमेरिकेतील व्यक्ती, निर्सग, समाज-संस्कृती, स्थळे आदि महत्वपूर्ण घटकांचे लेखन केले आहे. त्यामुळे या प्रवासवर्णनास त्याचे खास रुप लाभले आहे. एक उत्कृष्ट स्थळ वर्णन म्हणून हे प्रवासवर्णन सरस ठरते. या प्रवास वर्णनामध्ये लिमये यांनी 'नायगारा धबधब्याचे

अप्रतिम निसर्ग सौदंर्य आपल्या खास शैलीमध्ये मांडले आहे. ज्यावेळी क्षमा लिमये ह्या नायगारा धबधबा पाहतात. त्यावेळी त्यांच्या एक बाब दृष्टीस आलेली आहे. ती म्हणजे या धबधब्यास अनेक रुपे असल्याचे दिसून येते. म्हणूनच क्षमा लिमये यांनी अप्रतिम सौदंर्य लाभलेल्या या धबधब्याचे सुदंररीतीने वर्णन केलेले आहे. त्या म्हणतात की, “धबधब्याच्या एका बाजूला कठडा होता. तिथून आम्ही तो धबधबा लाईटध्ये कसा दिसतो ते पाहिल. इथ नेहमीच बरेच लाईटिंग केलेले असते. रात्रीची शोभा काही औरच असते. रात्रीच्या दिव्यांच्या प्रकाशात धबधब्याचे फेसाळ पांढरे शुभ्र पाणी खाली पडताना फारच सुंदर दिसत होते. जगातील मोठ्या आश्‍र्ययां पैकी हे एक आर्श्चय” (लिमसे क्षमा - डॉलरच्या देशात पृ.क्र.५) अशा अप्रतिम वर्णनामधून नायगारा धबधब्याच्या रुपांची विविधता लिमये यांनी दर्शविली आहे.

इ.स. १९९० ते २००६ या १५ वर्षाच्या कालखंडामध्ये मीना प्रभू यांची तब्बल दहा प्रवास वर्णने प्रकाशित झालेली दिसतात. त्यामध्ये माझ लंडन (१९९१) दक्षिणरंग (१९९९), मेक्सिको पर्व (२००१), चिनीमाती (२००३), गाथाइरानी (२००८), रोमराज्य – १, मस्टरडॅमने रोम, रोम राज्य-२ नेपल्सतेव्हेनिस (२००९) एइजिप्तायन (२००५), ग्रिकांजली (२००६), आणि तुर्कनाम (२००६) ही सर्व प्रवासवर्णने मीना प्रभू यांनी लिहिल्याने प्रवास वर्णन वाडमय प्रकारात संख्यात्मक वाढ झालेली दिसून येते. रोमराज्य भाग – २ (नेपल्सतेव्हेनिस). हे मीना प्रभू यांचे इटली प्रवासावर आधारित प्रवासवर्णन श्रेष्ठ ठरते. संपूर्ण इटली देशामध्ये प्रवास करुन तेथील लोक जीवन, स्थळे, निसर्ग व्यक्ती यांची माहिती वाचकांपुढे मांडणे हा मीना प्रभु यांचा उद्देश असल्याचे स्पष्ट दिसून येते. नेपल्सतेव्हेनिस प्रवासा दरम्यान घडणाऱ्या अदभूत रम्य निसर्ग सौंदर्याच्या दर्शनाने मीना प्रभू यांच्या व्यक्तिमत्वात झालेला बदल या प्रवासवर्णना मधून दिसून येतो. निसर्गाची विविध रुपे त्या मन:पूर्वक न्हाळतात. निसर्ग सान्निध्यात अधिक रममाण होतात. म्हणूनच त्यांनी या प्रवास वर्णनामध्ये जे निसर्ग चित्रण केले आहे ते

इतके प्रभावी व अप्रतिम असून अभिजात साहित्याकाच्या लेखनाला ही मागे सारेल असे आहे त्या सांगतात की, “नापोली, नेपल्स, इटली या महत्तम रत्नहारातला एक अनमोल हिरा “सीनेपल्स, देनडाय” असा वाकप्रचार रुढ व्हावा इतका सुंदर अनमोल हिराते आता दिसणार या कल्पनेनं देखील बहरुन यायला होतं, बाहेर निसर्ग ही तसाच उत्फुल्ल. मानवाच्या सौंदर्य निर्मितीला सृष्टीनं साथ दिली होती. लगेचच सुरु झालेला देखणा समुद्र किनारा म्हणजेच इटालियन रिव्हिएरा अखिल मानव जातीला प्रिय. एकीकडे नील समुद्राची संगत आणि दुसरी कडे हिरवा निसर्ग निळया हिरव्या गोडव्यातून गाडी धावत होती”. (प्रभू मीना, रोम राज्य भाग – २, पृ.क्र.७०) अशा अलंकारिक भाषेमध्ये नेपल्सच्या निसर्ग सृष्टीचे वर्णन करुन नेपल्समधील निसर्गाच्या विविध छटा आपल्या लेखनीद्वारे टिकल्या आहेत. प्रवास वर्णन या वाडमय प्रकारात संख्यात्मक व गुणात्मक वाढ करुन प्रवासवर्णन या वाडमय प्रकाराला अतिउच्च शिखरापर्यंत पोहोचविणात्या मीना प्रभू या काळातील महत्त्वाच्या स्त्री प्रवासवर्णनकार आहेत. इ.स. २००५ नंतर मराठी साहित्यामध्ये लघु प्रवासवर्णन हा साहित्याप्रकार ही उदयास आल्याचे दिसून येते. यामध्ये सविता ओगारील यांचे ‘सफर मलेशियाची’ (२००७) हे लघु प्रवासवर्णन प्रकाशित झाले. जेमतेम ५० पृष्टांचे असे प्रवासवर्णन. मलेशिया या देशामध्ये सविता ओगीराल यांनी काही दिवस वास्तव्य केले होते. त्याच वास्तव्या दरम्यान मलेशियात जो निसर्ग पाहिला, अनुभवला त्याचे अप्रतिम वर्णन या प्रवासवर्णनामध्ये दिसून येते. सविता ओगीराल यांच्या लेखनाचा एक गुणविशेष येथे प्रकर्षाने जाणवतो. तो म्हणजे त्यांनी मलेशिया देशास ‘श्रीमंत देश’ अशी दिलेली उपमा. त्यांच्यामते समृद्ध निसर्ग लाभलेले देश हे श्रीमंत असतात. मलेशिया या देशाला तर अगदी अमाप व अतुलनिय असे निसर्ग सौंदर्य लाभलेले आहे. त्यामुळे त्याची गणना श्रीमंत देशांमध्ये करणे सविता ओगीराल यांना उचित वाटते. मलेशिया सारख्या वैभव संपन्न देशामध्ये जंगले अबाधित ठेवून मधून रस्ते व उड्डाण पूल बांधून संपूर्ण शहरांच्या रचना करण्यात आलेली दिसते. ही

सुबक व कलात्मक शहररचना खरोखर नेत्र दिपक अशी आहे. लांबलचक परिसरातील इमारतींच्या आत व बाहेर आढळणारे लहान मोठे वृक्ष हवेचा पुरवठा करुन त्या परिसरास आरोग्यदायी बनवतात. म्हणून या वृक्षांच्या निसर्ग सौंदर्यचे वर्णन सविता ओगीराल यांनी अतिशय समर्पक शब्दांत केले आहे. त्या लिहितात की, "इथली हिरवळ झाडे, सुरेख सजलेल्या बागा, प्रत्येक रस्त्याच्या दुतर्फा लावलेली झाडे, त्यांचे आकार, रंग, त्यातील कलर पूर्ण दृष्टी महत्वाच्या चौरस्त्यावर किंवा ठिकठिकाणी फुलांचे गालिचे घालावेत, अशा तऱ्हेतऱ्हेने सजविलेली पिवळी, लाल, जांभळी अशी विविध रंगबेरंगी फुलझाडे व त्यांची घनदाट हिरवी पान पाहिली की डोळयाचे पारणे फिटते." (ओगीराल सविता – सफर मलेशियाची पृ.क्र.९२) वरील वर्णनामध्ये सविता ओगीराल यांनी मलेशियातील मनमोहित करणारा निसर्ग रेखाटला आहे. त्यानंतर शोभा पाटील लिखित् 'बावीस सोनेरी दिवस' (२०१२) हे प्रवासवर्णन युरोपमधील इटली, ऑस्ट्रीया, लिस्टनस्टाईन, स्वित्झर्लंड, जर्मनी, बेल्जियम, हॉलंड, फ्रान्स, लंडन इ. शहरांच्या ठिकाणी केलेल्या प्रवासाचे वर्णन आहे. विशेषत: हे प्रवासवर्णन रोजनिशी स्वरुपाचे आहे. युरोपमधील नयनरम्य अशा निसर्गाचे, दर्जेदार स्थळांचे, चांगल्या वाईट प्रवृत्तींच्या व्यक्तींचे तसेच विविध रुढी परंपरा इ. चे दर्शन या प्रवासवर्णनामधून घडते. युरोप प्रवासामध्ये भेटलेल्या विविध व्यक्तींची अप्रतिम शब्द चित्र शोभा पाटील यांनी अतिशय तन्मयतेने रेखाटलेली दिसतात. पॅरिस येथे कॅबेरेशो पाहण्यासाठी शोभा पाटील जातात त्यावेळी तेथील रंगमंचावर आपल्या लग्नाचा चोपन्नावा वाढ दिवस आनंदाने साजरे करणारे 'वृद्ध दांम्पत्य' ही व्यक्तीरेखा मनाला स्पर्श करणारी व्यक्तिरेखा आहे. उतरत्या वयात ही ऐकमेकांशी एकनिष्ठ असलेल्या या 'वृद्ध जोडप्याची' ही व्यक्तिरेखा शोभा पाटील यांनी येथे आवर्जुन रेखाटली आहे. पाश्चात्य देशात ही एक पत्नीत्वाची पद्धत आज ही प्रचलित असल्याचे या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून शोभा पाटील यांनी दर्शविले आहे. या प्रवासवर्णनाचा आणखीन एक विशेष म्हणजे यातून व्यक्त होणारे

सांस्कृतिक दर्शन, अनेक ऐतिहासिक संदर्भ, विविध व्यक्तिमत्वाची येणारी चित्रणे हे अगदी वैशिष्टपूर्ण असे आहे. शोभा पाटील यांचे हे प्रवासवर्णन उत्कृष्ट व्यक्तिरेखां सोबतच त्या देशातील ऐतिहासिक चित्र, वास्तू, शिल्प अशा ललित कलांचे दर्शन घडविते त्यामुळे एक उत्कृष्ट स्थळ वर्णन म्हणून या प्रवासवर्णना कडे पाहणे उचित ठरते. संपूर्ण युरोप प्रवासामध्ये शोभा पाटील यांनी तब्बल पन्नास साठ स्थळांना भेटी दिल्या आहेत त्यामुळे त्या स्थळांची माहिती ही त्यांनी तितक्याच तन्मयतेने या प्रवास वर्णनामध्ये रेखाटली आहे. हे त्यांच्या पुढील स्थळ वर्णनातून दिसून येते. पिसाच्या मनोऱ्याच्या भव्य प्रांगणामध्ये असलेले 'बॅपिस्ट्री' हे इटलीतील धार्मिक स्थळ म्हणजे बाप्तिस्मा देण्याची भव्य गोल इमारत होय. बाप्तिस्मा देण्यासाठी तयार केलेल्या एका मोठ्या अष्टकोनी हौदावरील झोके घेतानाचा मोठा दिवा लक्षवेधक असल्याचे शोभा पाटील यांनी येथे सांगितली आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध शास्त्रज्ञ गॅलिलिओ हा पिसाचा पुत्र असून त्याने जो लंबकाचा शोध लावला तो याच दिव्या पासून लावल्याची महत्त्वपूर्ण वैज्ञानिक माहिती या प्रवासवर्णनातून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच बेल्जीयमधील 'मानेकन पीस' हे प्रेक्षणीय स्थळ शोभा पाटील यांनी अतिशय उत्कृष्टतेने चित्रित केले आहे. अतिशय गोंडस असे हे मानेकन पीस शिल्प आहे. विशेष म्हणजे एका लहान मुलाचा 'शू' करतानाचा हा पुतळा आहे. या शिल्पाचे वर्णन वाचताना वाचकाची जिज्ञासकता वाढते. या पुतळ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगण्याच्या दृष्टीकोनातूनच शोभा पाटील यांनी या प्रवासवर्णनामध्ये या पुतळ्याचे आवर्जुन वर्णन केले आहे. त्या म्हणतात, "हा एक दिगंबरावस्थेतील छोट्या मुलाचा चक्क 'शू' करतानाचा पुतळा आहे. याबद्दल दोन कथा प्रचलित आहेत. एक म्हणजे ब्रुसेल्सधील एका श्रीमंत सरदाराचा छोटा मुलगा हरवला होता. तो या ठिकाणी शू करताना सापडला होता. तेव्हा त्या सरदारने तसाच पुतळा येथे उभारला दुसरे एका कथे नुसार चौदाव्या शतकात ब्रुसेल्स शहराला शत्रू सैन्याने वेढा घातला होता. शहरा भोवतीची तटबंदी सुरुंग लावून उडवून द्यायचा त्यांचा बेत होता. तसा त्यांनी सुरुंग सुद्धा पेरुन ठेवला.

ही गोष्ट एका छोट्या मुलाने ऐकली आणि शत्रूने सुरुंगाची वात पेटवताच त्या मुलाने त्यावर शू करून ती वात विझवली आणि शहराचे रक्षण केले म्हणून त्याचा त्या अवस्थेतील असा पुतळा उभारला गेला..” (पाटील शोभा, बावीस सोनेरी दिवस, पृ.क्र.५५) या वर्णनातून शोभा पाटील यांनी बेल्जियम मधील ऐतिहासिक घटना प्रसंग वाचकांपुढे समर्थपणे उभे केले आहेत.

अशा रितीने १९६० नंतर मराठी साहित्य इतिहासामध्ये इतर साहित्य प्रकाराप्रमाणेच प्रवासवर्णन लिहिणाऱ्या स्त्री लेखिकांच्या लेखनाला बहर आला. या काळात लहानमोठी अशी मिळून सुमारे २०-२५ अशी स्त्रीलिखित प्रवासवर्णने लिहील्याचे दिसून येते. या काळातील काही निवडक प्रवासवर्णनांच्या अभ्यास मी केला आहे. या स्त्री प्रवासवर्णनांच्या अभ्यासाअंती पुढील निष्कर्ष दिसून येतात. मराठी साहित्यातील १९६० हा काळ साहित्य निर्मितीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्याने या काळात अनेक स्त्री लेखितांनी प्रवासवर्णन या साहित्य प्रकाराची निर्मिती मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते. या कालखंडात प्रवासवर्णनात एक नवे वळण, नवा बहर आल्याचे दिसून येते. बहुतांशी लेखिकांचा प्रवास हा स्वदेशातच नव्हे तर परदेशातंर्गत घडल्याचा दिसतो. त्यामुळे परदेशातील लोकजीवन, संस्कृती, निसर्ग, व्यक्ती व स्थळे यांचे दर्शन वैशिष्टयपूर्ण रितीने प्रवासवर्णनांमधून घडते. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री लेखिकांचा दृष्टीकोन हा अस्तित्ववादाकडे चुकल्याचा दिसून येतो. त्यामुळे लेखिकांच्या आत्मविष्काराची जाणीव प्रवासवर्णनांमधून प्रतिबिंबित झालेली दिसते. या काळातील प्रवासवर्णनांमधून ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय तसेच काही प्रेक्षणिय स्थळांमुळे तसेच इतिहासामुळे मानवी मनाला जगण्याची उत्तुंग प्रेरणा या प्रवासवर्णनांमधून मिळते.

संदर्भग्रंथ

१) प्रा. जाधव, रा. ग., देशपांडे, वि. भा. 'मराठी वाडमयाचा इतिहास खंड सातवा- विभाग पहिला (१९९५-२०००) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. प्रथमावृत्ती – २००९

२) दास्ताने मंगला' रम्यते सिंगापूर', नवभारत प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९८९, मनोगत... ' माझे ही दोन शब्द', पृ.क्र.५.

३) प्रभू मीना, 'रोमराज्य – २ ''नेपल्सतेव्हेनिस', मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००६, पृ.क्र.१-२.

४) ओगीराल सविता, 'सफर मलेशियाची', श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती – २००७, पृ.क्र.१८.

५) पाटील शोभा, 'बावीस सोनेरी दिवस', आरती प्रकाशन, डोंबिवली, मुंबई, प्रथमावृत्ती – २०१२, पृ.क्र. ५५.

६) रसाळ सुधीर, 'सत्यकथा' नोव्हेंबर १९७१ 'शिबा राणीच्या शोधात', परीक्षण, पृ.क्र.४.

७) नाहटा विजय, 'लोकराज्य मासिक', पर्यटन विशेषांक, एप्रिल २०११, मनोगत, पृ.क्र.३.

८) लिमये क्षमा, 'डॉलरच्या देशात', साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्रथमावृत्ती २००१, पृ.क्र.५.

***

# साठोत्तरी मराठी नाटकातील स्त्री चित्रण

**डॉ. शरद वाघोळे**

मराठी विभाग प्रमुख, स्व. यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर

साठोत्तरी कालखंड हा नवनवीन जाणिवांनी साहित्य विस्तृत होणारा कालखंड होय. पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सुद्धा लिखाणात आपली छाप सोडलेली दिसते विषयाच्या दृश्टीने विचार करता मानवी जीवनाला स्पर्श करणारे विविध विषय यायला लागले. आता पर्यंत साहित्यात न आलेले किंवा अस्पर्षीत विषयाकडे लेखक, कवी वळत होते यातून विविध प्रश्न साहित्यातून निर्माण होत गेले. अशा या साठोत्तरी काळात स्त्रियांच्या विविध प्रष्नांना समोर आणण्याचे कार्य मराठी साहित्याने केलेले दिसते. काळा बरोबर बदलत गेलेला स्त्री जीवनाचा प्रवास यातून समोर येतो.

साठोत्तरी काळात ग. ल. ठोकळ यांचे 'कशासाठी पोटासाठी' हे नाटक लिहिले. पोटासाठी माणसाला कशा पद्धतीची सोंग वठवावी लागतात यावर आधारित हे नाटक आहे. व्यंकटेश माडगुळकर यांचे 'तु वेडा कुंभार या नाटकात परंपरागत विचारसरणीतील वडील व व्यावसायिक विचारांचा मुलगा यांच्यातील संघर्ष दर्षविला आहे. श्री. ना. पेंडसे यांनी आपल्या कादंबरीवरून नाटके लिहिली. 'राजे मास्तर' या नाटकातील राजे मास्तर स्वकतृत्व मोठे मानणारे दाखविले आहे तर त्यांच्या यशोदा, गरिबीचा बापू अशा नाटकातून व्यक्ति चित्रे साकार केली आहे. मधू मंगेश कर्णिक यांनी देवकी नाटक लिहिले. यात भाविणीची जीवन व्यथा दर्शविली आहे. चंद्रकांत शेट्टी यांच्या 'आली जवानीला जाग' या नाट्यातून तमास गिराच्या जीवनाला कंटाळलेल्या स्त्रीचे वर्णन आहे. त्याच प्रमाणे 'अंगार' या नाटकात खाशा नावाचा

दरोडे खोर व त्याच्या आईची कथा यात आहे. रा. र. बोराडे यांनी वेगवेगळया विषयावर नाटके लिहिली. त्यांचे 'पिकलं पान' हे नाटक इरसाल मानवी वृत्तीवर आधारित आहे. 'विहिर' या नाटकातून जाती-जातीतील संघर्ष रेखाटला आहे. 'आमदार सौभाग्यवती' हे नाटक वर्तमानातील गावगाडा उभा करते. सुंदर तळाशीकर यांचे चाकर मानी नाटक गावात राहत असलेल्या पांढर पेशा वर्गाचे चित्रण यात केले आहे. अशा नाटकातून स्यियांच्या जीवनाचा मुख्यत्वे विचार केलेला नाही तर कथानकाच्या ओघाने आलेले ते स्त्री पात्र होय. या नाट्य प्रवासाचे अवलोकन केले असता ग्रामीण जीवनातील समकालीन वास्तवावर नाटक रचल्या गेले 'या नाटकांत सांस्कृतिक जीवनापेक्षा सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी दर्शन, कर्जबाजारी शेतकरी, चाकरमानी, रंगेलपुढारी, बाई, बाटली, तमाशा, ईर्षा, सूड, प्रेमप्रकरण, अंधश्रद्धा, नव्या सुधारणा, संकुचित वृत्ती, कलाकारांचे राहणीमान इत्यादी समस्या, आशय, विषयसातत्याने आलेले आहेत. कथा – कादंबरीपेक्षा नाटकाला बंधन येत असल्यमुळे येथे ग्रामीण जीवनाचे हुबेहूब जीवन दर्शन घडत नाही'[1] आधुनिक काळातील नाटकांनी मात्र स्त्री प्रश्नांना ठळकपणे मांडलेले आहे.

श्रीनिवास भणगे यांच्या 'सुनमुख' या नाटकात शेखरच्या मुलाने एका निग्रो मुलीसोबत लग्न केल्या मुळे शेखरला आपली सून काळी आहे याची लाज वाटते. आपल्याला समाजात तोंड दाखवायची जागा राहली नाही अशा विचाराने शेखर चिंताग्रस्त राहतो. ही चिंता जर ती सून गोरी असती तर राहली नसती. रंगावरून मुलीबाबत भेद करणे ही भारतीय समाज मानसिकता आहे. संस्कार हे वर्णावरून नाही तर कर्मा वरून लक्षात यायला हवे, परंतु आपली मानसिकता स्त्रियांकडे रंगावरून वेगळया नजरेने बघण्याची आहे. स्त्रीचा रंग हा लग्नात पसंती करिता सर्वात महत्त्वाचा ठरतो. ही पुरूषी मानसिकता स्त्रीला एक साधन समजते. अशा या समस्येचा परामर्ष या नाटकातून लेखकाने

घेतला आहे. पु. भा. भावे यांच्या 'अकुलीना' नाटकात सुरंगा या वारंगणेचा व्यवसाय करणारी परंतु मनापासून या व्यवसायाचा तिरस्कार करणारी दर्शविली आहे. यानाटकातून वारांगणेच्या पोटी जन्माला आलेल्या मुलीला त्याच दृष्टचक्रात कसे अडकवून राहवे लागते याचे चित्रण करते. पोटासाठी या वाईट चक्रात अडकलेल्या स्त्रियांची घुसमट यातून लेखकाने समोर आणली आहे.

या एक विसाव्या शतकात माणूस हा यंत्राने गुरफटलेला आहे. यंत्र हे साध्य नसून ते साधन आहे याचा विसर त्याला पडला आणि तो त्याचा गुलाम झाला. 'याच वेळी याच दिवशी' या नाटकातून अभिराम भडकमकर यांनी वर्तमानातील आधुनिक समजल्या जाणारी स्त्री अशा यंत्राच्या गुलामीमुळे परस्पर संवाद गमावून, नाते दुरावून कशी राहत आहे याचे चित्रण आलेले आहे. या नाटकातील अनघा व सुरेंद्र या जोडप्या द्वारे आधुनिक स्वतंत्र जीवन प्रणालीतील समस्या साकार केल्या आहेत. स्त्रीला आलेले एकाकीपण्ण आणि त्यामुळे ती मोबाईल, टी. व्ही. इंटरनेटच्या जाळयात अडकत कशी चालली आणि त्यामुळे निर्माण होत गेलेल्या मानसिक समस्यायातून समोर येतात. डाॅ. शिरीष आठवले यांचे मित्र नाटक स्त्री पुरूषात निखळ मैत्री राहू शकते काय? याचे उत्तर शोधणारे आहे. दादासाहेबांच्या सेवेसाठी आलेली नर्स पुढे त्यांची मैत्रिण बनते अशा आशयाच्या या नाटकातून वर्तमान समाज व्यवस्थेतील स्त्री पुरूष संबंधावर प्रकाश टाकला आहे. अशा मैत्रीपूर्ण संबंधात ही पुरूषापेक्षा स्त्रीवर जास्त आरोप होतात हे सर्वश्रृत आहे. समाज आपल्याच नजरेने या संबंधाकडे बघतो आणि त्यातून स्त्रीची होत जाणारी मानसिकता यातून समोर येते. महेंद्र सुके यांच्या कु. सौ. कांबळे या नाटकातून आंतर जातीय विवाहाचा प्रष्न मांडला आहे. दंगलीतून आपला जीव वाचवत एक दलित तरूण ब्राह्मण कुटुंबाचवा आश्रय घेतो. तिथे भेटीचे रूपांतर प्रेमात होते व दोघे लग्न करतात. दोन

वेगवेगळ्या संस्कृती एकत्र आल्यावर कसे प्रश्न निर्माण होतात. यावर प्रकाश टाकणारे हे नाटक आहे.

संजय पवार यांच्या 'ठष्ठ' नाटकातून विवाह संदर्भात स्त्रीचे स्थान कसे असते. याचे विवेचन करणारे हे नाटक आहे. सात गुणीला सात बरोबर पन्नास या काल्पनिक नाटकातून भविष्य काळात जर स्त्री राज्य आले तर काय होईल याचा आढावा घेतला आहे. अशोक पाटोळे यांचे आई रिटायर होते या नाटकातून सुधा या पात्राद्वारे आईला सुद्धा निवृत्ती मिळून मना प्रमाणे आयुष्य जगायला मिळेल काय याचा विचार केला आहे. गाईच्या शापानं या नाटकातून कुमारी नावाची मुलगी जेव्हा लग्न न करता ईच्छीत पुरूषा पासून पुत्र प्राप्तीची अपेक्षा ठेवते तेव्हा समाज मानसिकता कषी प्रतक्रीया देते यावर आधारित हे नाटक आहे. पुरूषी समाज व्यवस्था नैतिकतेच्या नावा खाली स्त्रीला कसा दाबून ठेवतो याचे उदा. म्हणजे हे नाटक होय.

'नदिले लानकार' हे संजय पवार यांचे नाटक पुरूषी मानसिकता, त्याचा अहंकार कसा असतो याचे दर्शन घडविते. एखाद्या पुरूषाने एखाद्या स्त्रीला नकार दिला तर फरक पडत नाही परंतु एखाद्या स्त्रीने पुरूषास नकार दिला तर पुरूषी अहंकार कसा जागृत होतो यावर हे नाटक गुंफले आहे. 'सातच्या आत घरात' या नाटकातून कुटुंबातील स्त्रियां बाबत असलेली बंधने यावर भाष्य करण्यात आले आहे. 'फ्लाईंग क्वींस' या नाटकातून तीन वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील स्त्रियांच्या वाट्याला येणारे भोग दर्शविले आहे. स्त्रीचा फक्त उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याचा पुरूषी दृश्टीकोन आणि त्यात भरडली जाणारी स्त्री अशा कथानकातून स्त्री समस्या मांडलेली आहे. प्रशांत दळवी यांनी चार चैघी या नाटकातून स्त्री प्रश्नांना वाचा फोडली आहे. या नाटकातील आईने आपल्याला आवडलेल्या पुरूषां पासून मुलींना जन्म दिलेला आहे. व आई यश मुलींमागे खंबीरपणे उभी असलेली दिसते. काळाबरोबर बदलत चाललेली स्त्री विचारसरणी यातून दिसते. 'ध्यानी

मनी' या नाटकातून प्रशांत दळवी यांनी मुलं नसलेल्या स्त्रीची घुसमट साकार केली आहे.

साठ पूर्वीच्या नाटकात येणारी स्त्री ही कथानकाच्या अनुशंगाने यायची. प्रामुख्याने तिचा विचार होत नव्हता. साठोत्तरी कालखंडातील शिक्षणाचा वाढता प्रसार, स्त्रियांचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वैचारिक प्रभाव वाढत गेला. पुरूषांच्या बरोबरीने स्त्री कार्यरत झाली. तिच्या मनातील प्रश्नांना, घुसमटीला व्यासपीठ मिळू लागले. या सर्वांचा प्रभाव साहित्यावर होणे अपरिहार्यंच होते. यातून तिच्या जीवनाचे विविधांग, तिची मानसिकता मराठी नाटकातून साकार व्हायला लागली. वरील नाटकांतून समकालीन स्त्री समस्यांना या नाटकाकारांनी मांडून अव्यक्त किंवा अस्पर्षीत विषयांवर लेखन केलेले दिसते. स्त्रीवादाला यातून निश्चितच बळ मिळाले आहे.

निष्कर्ष –

१) वर्तमान मराठी नाटकांतून स्त्रीच्या मनातील अव्यक्त समस्यांना निर्भिडपणे मांडलेले दिसते.

२) मराठी नाटकातील स्त्रियांचे मानसिक प्रश्न मोठ्या प्रमाणात मांडलेले आहे. हे प्रश्न मांडताना पुरूष प्रधान संस्कृतीतील चुका समोर आणण्याचे कार्य नाटकाने केले असे म्हणता येईल.

३) मराठी नाटकातील स्त्री आता सोशिक राहली नाही तर ती तिच्या मनातील प्रश्न मांडायला लागली असे वाटते.

४) मराठी नाटककारांनी स्त्रियांच्या बाबतीत काळाच्या पुढील विचार करून ही लेखन केलेले दिसते.

**संदर्भ –**

१) साहित्य: ग्रामीण आणि दलित, संपादक – डाॅ. ईश्वर नंदपुरे, विजय प्रकाशन, आवृत्ती प्रथम 2002 पान 156

***

# इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील ग्रामीण स्त्री

**प्रा. शशिकांत काळे**

मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, जरूड ता. वरूड
जि.अमरावती

साठोत्तरी मराठी ग्रामीण कविता बाह्य वर्णनातून, खेड्यातील सौदर्यांतून बाहेर पडून ग्रामीण माणसांच्या अंतरंगाचा शोध घेण्यास प्रारंभ करणारी आहे. आनंद यादव, विठ्ठल वाघ सारखे कवी ग्रामीण जीपनातील वास्तव मांडायला लागले होते. ग्रामीण जीवनात अवकळा येण्या मागील कारणांचा शोध ग्रामीण कविता घ्यायला लागली. वाचकांना अंतर्मुख करण्याचे सामथ्र्य तिच्या मध्ये आले होते. साठोत्तरी काळातील वाढती साक्षरता ग्रामीण भागावर परिणाम करू लागली होती. ग्रामीण भागातील युवा पिढी आपलं भोगलेलं दुःख, आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव आपल्या शब्दांतून द्यायला लागली. अषाच काळात मराठवाड्यातील इंद्रजित भालेराव यांची कविता पुढे आली. ग्रामीण भागातील सस्कारांनी संपृक्त असलेली त्यांची कविता ग्रामीण स्त्रीच्या अंतरंगाचा सखोल परामर्ष घेत होती. लोकगीत, ओवी अशा लोक संस्कृतीचा प्रभाव असलेली ही कविता लोकभाषेतून येत आहे. त्यातून व्यक्त होणारे स्त्रीमन अस्सल आहे, त्यातील घुसमट सकारण वाचकां समोर येते.

लोकजीवनाच्या अनेक प्रथा, परंपरांनी तसेच विचारानी स्त्रीला जखडून ठेवले आहे. ग्रामीण स्त्रीया सर्व बाबी परंपरेच्या

नावाखाली निमूटपणे झेलते. तिच्या जीवनातील ही काळी बाजू पुढील ओळीतून कवी मांडतात.

अंघोळीच्या पाण्यावरून कावळा उडाला म्हणून आजीला मारणारा आजोबा अशा विविध आठवणीतून कवीच्या मनावर जे स्त्रियांच्या जीवनाचे, तिचा घुसमटीचे जे परिणाम झाले त्यातूनच त्यांच्या काव्यातील ग्रामीण स्त्री उभी होत गेली.

**अंघोळीला काढलेल्या पाण्यावरून**
**कावळा उडत गेला म्हणून**
**आजीला मारणारा आजा.... [1]**

आपल्या परंपरेतील काही रूढी, विधी, प्रथा, परंपरांनी स्त्रीला मानसिक पद्धतीने जखडून टाकले आहे. ती त्याचा त्रास मुकाट्याने सहन करत जगत राहते. त्याचे प्रश्नही विचारण्याची हिंमत तिच्यात नाही. अशा ग्रामीण भागातील परिस्थितीला, स्त्री – पुरूष मानसिकतेला कवीने मांडून समाजातील स्त्री अवस्था समोर आणली आहे.

या एकविसाव्या शतकात ही मुलीच्या जन्माचा आनंद सर्वत्र होत नाही. मुलगा हा वंशाचा दिवा तर मुलगी हे परक्या घरचे धन ही मानसिकता असलेली समाज व्यवस्था मुलीला दुय्यम मानते. तिच्या जन्माचा आनंदोत्सव मुलाच्या जन्मा प्रमाणे साजरा केल्या जात नाही. ही मानसिकता अजूनही कायम असलेली दिसते. ग्रामीण जीवनातील स्त्रियांच्या जन्मापासूनचा प्रवास कवीने आपल्या काव्यातून मांडला आहे. यातच समाजातील पुरूषी मानसिकता दिसून येते.

**मह्या जल्माचा आनंद**
**नही कोणालाच झाला**
**एक पहार उशिरा**
**सूर्य आभाळात आला[2]**

लहानपणा पासून स्त्री स्वतंत्र जगू शकत नाही अशी पुरूषी मानसिकता असलेला हा काळ होय. तिच्या जीवनाचे निर्णय ती घेत

नाही तर पुरूषच घेतात. तिच्या मनाचा कोणताही विचार केला जात नाही. प्रत्येक ठिकाणी तिला बरोबरीने वागविले जात नाही. तिच्या मानसिकतेला समजावून न घेता तिच्यावर मत लादले जातात. लग्न करताना ही तिला तिच्या अपेक्षा विचारल्या जात नाही त्यातून तिच्या नशिबी जे भोग येतात ते पुढील शब्दांतून व्यक्त होते.

**काळीज फाटलं बाई**
**काळवाटला संसार**
**काय पाहिलं वाटलं**
**बापानं या घरदार३**

कवी इंद्रजित भालेराव यांची कविता स्त्रियांच्या विविध भावभावना रेखाटणारी आहे. ग्रामीण भागाचे संस्कार झालेले, अनुभव असलेले कवी मन शब्दांतून अनुभव, वास्तव प्रसवत असते. 'माझ्या 'पीक पाणी' मधील सर्वच कवितांचा जन्म अशा अवस्थेत त्या टेकडीवर झाला असला तरी ते अर्थातच तात्कालीक कारण होतं. त्यापाठी मागे तो पर्यंत मी जगलेलं आयुष्य, माझ्यावर झालेले संस्कार आणि माझ्या वाचनाची पार्श्वभूमी. याच गोष्टी खया अर्थाने कारणीभूत झाल्या होत्या.'[4] या त्यांच्या मतातून त्यांच्या काव्य निर्मिती मागील पार्श्वभूमी समोर येते. कवीच्या जीवन प्रवासात त्यांच्या बालमनावर झालेले संस्कार, परिणाम याचे प्रतिबींब त्यांच्या लेखणीतून उमटते. गावगाड्यात जगत असताना विविध वयोगटातील स्त्रियांचे, वर्तन, मानसिकता त्यांनी अनुभवली होती आणि आपल्या चिंतनशील लेखणीतून या अनुभवांना त्यांनी शब्दरूप दिले. हे अनुभव मांडताना जात्यावरच्या ओव्या, लोकगीतांची लय या सगळ्यांचा प्रभाव कवितेवर पडत गेला. यातूनच त्यांची कविता गेय होत गेली. आपल्या अवती भवती असलेल्या गावगाड्यातील स्त्रियांच्या मुखातून ऐकलेल्या ओव्या, त्याचे अर्थ, संदर्भ या सर्वांचा वापर करत कवीने ग्रामीण स्त्री उभी केली आहे. कवी स्त्री सौदर्यांत रमत नाही तर तिच्या अंतरंगात

असलेली खळबळ टिपत समोर जातात. त्यांची कविता स्त्री सौदर्यांची नाही तर स्त्री घुसमटीची, तिच्या वेदनेची आहे. मुलगी हे परक्या घरचं धन ठरविल्या जाते, लग्नानंतर तिचं माहेर जवळ पास तुटल्यातच जमा असते. अशा मानसिकतेची खंत कवीने पुढील स्त्री व्यथेतून व्यक्त केली आहे.

**माझं तुटलं माहेर सख्खे भाउ पक्के वैरी**
**थाटल्यात आंबराया माझी नाही एक कैरी[5]**

स्त्री मनाचा विस्तृत विचार कवी इंद्रजित भालेराव करतात. त्यांच्या काव्यातून स्त्रीचे विविध रूपं उदा. आई, आजी, बहीण, वहिणी साकार होतात. अशीच एक वहिणी जी दिरामध्ये आपल्या भावाला बघते. अशा तरल मनोवस्थेचे चित्रण करत स्त्री जीवन ही कविता साकार करते. यातील शब्द हे स्त्रियांच्या मनातील भावभावना टिपणारे असते.

**आली नवीन वहिणी**
**बोले याद राहून राहून**
**याद लहान भावाची येते तुम्हाला पाहून[6]**

मातृत्व हे त्यागमय असते. तिच्या मनात असलेली वात्सल्य भावना काव्यातून समोर येत असते. अशाच एका आईच्या मनातील वात्सल्य पुढील शब्दांतून समोर येते.

**आम्हा वाढुनिया ताजं, माय खाते षिळंपाकं**
**आम्हा देते दुध तूप, स्वता खाते फक्त ताकं**
**आम्ही देताचं ढेकर तिला तृप्ती येते छानं[7]**

कवी इंद्रजित भालेराव यांनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्या विविध भूमिका दर्शविल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांची घुसमट यातून साकार होते. त्याच बरोबर अशा अवस्थेला कारणीभूत असलेल्या बाबींचा परामर्श कवी घेतात. कवी घटना मांडून थांबत नाही तर त्याची मीमांसा ही करतात.

निष्कर्ष-

१) इंद्रजित भालेराव यांनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्या मनोभूमिका व्यक्त केल्या आहेत. स्त्रियांना वरवर रेखाटणारी कविता खंडित करून तिचे अंतरंग साकारणारी कविता त्यांनी निर्माण केली.

२) लोक संस्कृतीतील स्त्री व तिची सामाजिक, सांस्कृतिक जडणघडण यातून समोर येते.

३) या कवितेतून स्त्री संस्कृतीच्या लुप्त होत चाललेल्या बाबी जतन करण्याचे कार्य कवीने केले आहे.

४) ओवी, स्त्रियांचे गीते यांचाच पखलपणे वापर यात झालेला दिसतो

५) स्त्रियांच्या समस्या व त्यावरील उपाय योजना असे या कवितेचे स्वरूप दिसते.

**संदर्भ –**


१) भालेराव इंद्रजित, दूर राहिला गाव, प्रतिभास प्रकाशन, परभणी आवृत्ती तिसरी 2009 पान 11

२) भालेराव इंद्रजित, कुळंबिणिची कहानी, प्रतिभास प्रकाशन, परभणी आवृत्ती पहिली 1996,पृश्ठ क्रमांक 7, 44

३) भालेराव इंद्रजित, 'पीक पाणी', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती चैथी 2001, पृष्ठ क्रमांक27, 47

४) गावाकडं, इंद्रजित भालेराव, मनोविकास प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी 2014 पान 10, 42


***

# अनुराधा पाटील यांच्या 'दिवसें दिवस' मधील स्त्री जीवनातील दुःखाचे चित्रण

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे

मराठी विभाग, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर.

स्त्रियांनी लिहिलेलं साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि कोणत्याही प्रकारच्या किंवा कोणी ही लिहिलेल्या साहित्याचे स्त्रीवादी वाचन वेगवेगळया गोष्टी आहेत. स्त्रियांनी लिहिलेलं साहित्य हे स्त्रीवादी असेलच असे नाही. ते स्त्री विषयक जाणीवेचे आणि स्त्रीच्या अनुभव विश्वाशी निगडित असलेलं असेल; पण त्यातून स्त्रीवाद व्यक्त होत असेल असं म्हणता येणार नाही. त्याच प्रमाणे स्त्रीवादी साहित्य हे केवळ स्त्रियाच लिहू शकतात. असे म्हणणे चुकीचे होईल. पुरुषही स्त्रीवादी दृष्टिकोन असणारे साहित्य निर्माण करू शकतात. मराठी साहित्यात विशेषतः कवितेच्या क्षेत्रात आपल्याला अशी अनेक उदाहरणं सापडतील. स्त्रीवादी ही खरंतर एक चळवळ आहे. या चळवळीचा मुख्य हेतू आहे की, या समाज व्यवस्थेत शतकानूशतके शोषित म्हणून जगणाऱ्या स्त्रीला तिचं अनेकदा वर्ण, वर्ग, धर्म आणि लिंगभेदावर आधारित विषम समाज रचनेत शोषण होत आहे. याची जाणीव करून देणे. याच जाणिवेतून समकालीन मराठवाड्याच्या काव्य प्रवाहात अनेक कवी उदयास आले. त्यांनी ही बरेच मौलिक लेखन केले आहे. मराठवाड्यातील साहित्य लेखनाचा झेंडा फडकवला आहे. त्यात चंद्रकांत पाटील, गोविंद कुलकर्णी, वामन निंबाळकर, भ. मा. परसवाळे, नरेंद्र मारवाडे, अनुराधा पाटील यांच्या कविता मराठवाड्यातील कवितेच्या ताकदीचा अंदाज करून देतात. तरी पण साठोत्तरी मराठी कवितेत मराठवाड्यातून जे कवी पुढे आले आहेत.

त्यांनी आपले स्वस्थान निर्माण केले आहे. सत्तरच्या दशकात लिहिणाऱ्या आणि पुढे ऐंशीच्या दशकवर आपला ठसा उमटवणाऱ्या या कवयित्री आता स्वतःविषयी आणि स्त्रियांच्या वेदने विषयी, कोंडमऱ्या विषयी बोलता-बोलता त्या समाजातील साऱ्या स्त्रियांच्या वेदनेला वाट मोकळी करून देऊ लागल्या.

अनुराधा पाटील यांच्या कवितेची जात कुळी मराठी कवितेच्या सशक्त परंपरेशी नाते सांगणारी कोणत्या ही चांगल्या कविते इतकीच 'अस्सल' आहे, प्रामाणिक आहे. कवितेच्या सर्वच घटकांचे सुनियोजित संघटन तिच्यात आढळून येते. तिच्या आशयाचा गतिमान प्रवाहच हे संघटन आपोआप घडवून आणत असतो. नेहमीचेच परिचित शब्द अशा संघटनामुळे एकाच वेळी स्थिरता आणि तरलता, निश्चित, अर्थता आणि अनेकार्थता, लयबद्धता आणि लयहिनता अशा द्वंद्वातून सर्जनक्षम होत असतात. शब्द आपले स्वयंभू व लय निर्माण करीत शेजारच्या शब्दाच्या तशाच स्वयंभू अवलयाशी टक्कर देतात आणि त्यातून त्या दोन्ही वलयांना व्यापून विशाल होत जाणाऱ्या तिसऱ्याच वलयाचा जन्म होतो. एका समर्थ आणि चांगल्या कवितेच्या या अटी अनुराधा पाटील यांच्या कवितेला अस्सल पणा प्राप्त करून देतात.

शेत मजुराच्या घरात जन्म घेणाऱ्या अनुराधा पाटील यांनी आपल्या काव्य सृष्टीला अगदी मनाच्या तळ घरातून निसर्गाला आणि भाव वृत्तीला, दुःखाला साद घातलेली आहे. मात्र या हाके मध्ये विनाशी वाटा आहेत. पचवलेले पराभव आहेत. नसलेले भविष्य आहे. आयुष्याची भ्रमंती आहे, अज्ञाताचे गुढ व स्वप्नांचे जोजवणे देखील आहे व सोबतीला समर्पणाच्या ओढीतून उच्चारलेली उत्कट भावाभिव्यक्त देखील आहे. या जीवन विषयक दाहक अनुभवांना सामोरे जाण्याची संपूर्ण क्षमता त्यांच्या काव्य प्रवृत्तीत आहे. या प्रयत्नशील मनो भूमिकांची सांगता मांडता-मांडता जीवनाच्या प्रवाहाचे किनारे घेऊन आलेली संपृक्त वेदना, एकाकी पणा व परकेपणाला आत्मलक्षी जाणीवांचे अवगुंठन कवयित्रीला देता आले आहे. आत्मकोषात दडलेली स्वप्ने व कठोर वास्तवता यांचे अनुभव विश्व हे द्वंद्वाच्या सीमा रेषा आखणारे असतात. कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कविता १९७२

पासून प्रसिद्ध आहेत. 'दिगंत' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९८१ साली प्रकाशित झाला आणि मराठी काव्य प्रांतात एक वेगळे स्थान या कवयित्रीने निर्माण केले. तरी ही हा दुसरा काव्यसंग्रह १९८५ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दिवसें दिवस' हा तिसरा काव्यसंग्रह १९९२ साली प्रकाशित झाला. 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' चौथा काव्यसंग्रह २००५ मध्ये प्रसिद्ध झाला आहे आणि पाचवा कवितासंग्रह 'कदाचित अजूनही' हा त्यांचा कवितासंग्रह २०१७ मध्ये प्रकाशित झाला आहे. बा. सी. मर्ढेकर यांच्या प्रमाणे मथळया विना कविता लिहिण्याची प्रथा अनुराधा पाटील यांनी अवलंबिली आहे. मथळे न देता त्याचे गुढ सौंदर्य अधिकच वाढविले आहे. सौंदर्यभाव ग्रामीण स्त्रीसत्व आणि महानगरी अशा सूत्रांना अभिव्यक्त करणारी आहे. त्यांच्या कविता अभ्यासत असताना कवयित्रीचे तीन काव्यविशेष ठळकपणे जाणवतात. एक म्हणजे सुजाणत्व होय. त्यातून त्यांची कविता वाचकांशी संवाद करताना दिसते. कवयित्री आणि रसिक, वाचक यांच्या मधला हा संवाद काव्य आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या त्यांच्या कवितांमधून अस्वस्थ करणाऱ्या अशा सूत्रांचा विलक्षण, बहुपदरी, बहुरंगी, बहुस्पर्शी असा दडपलेला कोलाहल व्यक्त होतो. अत्यंत दुःखद, करूण अनुभूतीची संमिश्र आशय सूत्रे व्यक्त करून ही या कवितांच्या मांडणीत, ओळीच्या कमी जास्त लांबीत, शब्दांच्या निवडीत स्त्री सुलभ समंजसपणा, दुःख सोसण्याची आणि अविष्कार करण्याची खास सहनशीलता आणि रूपकांच्या निवडीत काव्यात भाषेची नवीन पद्धत दिसून येते. या संदर्भात चंद्रकांत पाटील म्हणतात, "त्या प्रमाणे ही कविता रोमँटिसिझम मधून बाहेर येणारी आणि मराठीच्या सशक्त परंपरेशी नातं सांगणारी आहे". हे विधान पटण्यासारखे आहे. म्हणूनच कवयित्री अनुराधा पाटील यांनी समकालीन कवितेत एक वेगळा ठसा उमटविला आहे.

अनुराधा पाटील यांच्या 'दिवसें दिवस' या काव्य संग्रहांने ही आपला दर्जा कायम राखला आहे. त्यांची निसर्ग दत्त तरल भाववृत्ती,

स्वप्नांचे मोहक संमोहन आणि आरस्पानी, मनाचे तरल ऐश्वर्य घेऊन त्यांची कविता रसिकांसमोर आली आहे. आयुष्याला सामोरे जाणारे धीटमन असून ही दुःखाचे कढसोसणारी भूमिका दुःखाच्या अश्रूपातानेच जीवनाचे सलग सजीव अर्थ टवटवीत ठेवणारी जाणीव असाही एक सारांशाने अनुयायार्थ काढून देते की, "कुठे जातो पाऊस डोळा दाट ते असोशी, माझे थकलेले दुःख उभे इमानीदाराशी" दुःखाच्या या अतीव भोगण्यातून आलेला थकवा हा ही जीवनाचा एक उत्कट अर्थच असतो. अशा अर्था भिव्यक्तीची खूप स्थळं या कवितेत आहेत. सुखदुःखाच्या जीवन प्रवाहाचे कल्लोळ, संगीत आपसूक कवितेची यात्रा बनते. तेव्हा या कवयित्रीचे भाबडेमन आणखी भाबडे होत जाते. मराठी साहित्यात तसेच मराठवाडा या प्रादेशिक भू-भागात स्त्री मनाचा असा तरलाविष्कार अलीकडे फार दुर्मिळ होता. तो अनुराधा पाटील यांच्या कवितेने उणीव उभरून काढली आहे. भविष्यातील समर्थ जाणिवेच्या खाणाखुणा या कवितेत भरपूर आहेत. तरल भाववृत्तीच्या हळुवार अभिव्यक्तीची ही कविता आहे. ती मोहक आहे, आकर्षक आहे. मनात ठसणारी व पुरून उरणारी आहे. असे प्रकाश कामतीकर यांनी मांडलेले विचार खरे आहेत. दुःखमयता हा अनुराधा पाटील यांच्या कवितेचा स्थायी भाव आहे. काळाच्या अनुभवाचे दुसरे रूप ऋतुचक्राच्या जाणिवेचे आहे. निसर्ग आणि मौसम यांचे उत्कट दर्शन ही त्यांच्या कवितेतून होते; परंतु स्वतःच्या सभोवताली ही हा अनुभव दुःखमयच आहे. ऋतुचक्रात आपल्याला निसर्गाचे नाविण्य जाणवते. माणूस या नाविण्याचा उपभोग घेत असला तरी त्याच्या जीवनाचे कालिक परिणाम जन्मल्या पासून मरेपर्यंत सरळ एका लाईनमध्ये असल्यामुळे यातून माणूस वगळला जातो. म्हणूनच तडफडणाऱ्या वास्तवाच्या शोकात्मक अनुभवाला पर्याय शोधण्याची इच्छा निर्माण होते. सर्व सामान्य माणसाला विस्मरण हा एक पर्याय असतो. काळानुरूप घटना, प्रसंग, संबंध आणि अभाव यातून निर्माण झालेल्या दुःखाचा विसर होतो. वास्तवाचे एकरूपच ठरते; परंतु प्रत्यक्ष जीवनात काळजाला

भिडणारी काही अनुभवाची शिदोरी असते की, त्याचा विसर तर होतच नाही, उलट सर्व उरलेले जीवन त्या विशिष्ट अनुभवाच्या प्रभावातच जगावे लागते. सगळे अस्तित्व हादरून टाकणाऱ्या अशा वेदनामय अनुभवाची धारदार जाणीव अनुराधा पाटील यांच्या कवितेचा मध्यवर्ती केंद्र आहे. सभोवतालच्या जगाचे भेसूर स्वरूप कळल्या नंतर माणूस स्वप्न रंजन अलौकिक विश्वाचा शोध, कार्यमग्नतेचा ध्यास, कवितेचे किंवा कलात्मकतेचे विश्व असे पर्याय कवटाळत असतो. प्रत्येक संस्कृतीत शोकात्म अनुभवा वर मात करण्यासाठी काही पारंपारिक बंध असतात. जीवनातील सगळ्या समस्यांवर मात करणारी चैतन्याची उसळती ज्वाला कवितेचा प्रेरणा स्त्रोत आहे. 'दिवसें दिवस' मध्ये हा आत्म विश्वास ही पूर्णपणे गमावलेला दिसतो. व्यावहारिक जगाचा शोध किंवा कवितेच्या विश्वाची पर्यायी निर्मिती या दुःखाला खतपाणी घालणाऱ्या बाबीही 'दिवसें दिवस' मधल्या जाणीवां समोर निष्फळ ठरतात. "दिसतं तसं तेवढंच स्विकारावं एखाद्याचं जग" दुःख जगत असताना माणसाला या अनुभवाची आढळता पटली तरी तो अपरिहार्य आहे असे वाटत नसते. त्याचा काही एक अर्थ, काही एक संगती लावण्याचा माणूस प्रयत्न करतो. "आता तू नाहीस कुठेच नाहीस, आणि तुझ्या शिवायचा हा माझा नवा जन्म आहे, फक्त मृत्यूचाच वास येणाऱ्या, मातीच्या या शरीरात पुन्हा घेतलेला" अभाव, यातना, कलेश, दुःख आणि विनाशाची चाहूल यांची जाणीव अशा कितीतरी तुकड्यातून अनुराधा पाटील यांच्या कवितेतून व्यक्त होते; परंतु हे सर्व अनुभव विश्व त्यांच्या कवितेतून एकटेपणाने येत नाही, 'स्व' च्या अनुभव क्षेत्राच्या घेणाऱ्या प्रकटीकरणाची त्याची पद्धती म्हणूनच अधिक मौलिक आहे. निसर्ग, इतर व्यक्तींचे दुःख किंबहुना सामूहिक आणि सार्वत्रिक दुःखमयतेची सनातन जाणीव व्यक्त करणाऱ्या लोक मानसाशी सहजपणे जुळलेली पद्धत त्यांनी अवलंबलेली आहे. "एका बाजूनं शिवताना दुसरी कडे फाटत जाणाऱ्या, जुन्या कपड्या सारखं आयुष्य आणि मन झालं आहे, घराच्या अशा रिकाम्या भिंती सारखं जिथे लावत नाही कुणी, भकासपणा टाळावा म्हणून ही एखादं रंगीत

चित्र की आपण तर असतो, दैवाच्या हातानं पोत्यात घालून कुठंतरी सोडून दिलेल्या मांजरा सारखे" 'स्व' ची निखळ वैयक्तिकता ओलांडून त्यांच्या लिरिकल कवितेतला शोकात्म भाव या पद्धतीमुळे समर्थपणे अभिव्यक्त होतो. शौकात्म अनुभवाचा अनुयायार्थ लावण्यासाठी माणूस पुरातन काळापासून तळमळत आहे. या संदर्भात "तुझ्या या अफाट पात्रात" ही संपूर्ण कविता याचने सारखी लिहिलेली आहे. "यथार्थाला सामोरे जाणाऱ्या इर्षेने अनुराधा पाटील यांनी सनातन दुःखाच्या सच्चेपणा व्यतिरिक्त कोणातही पर्याय मान्य केलेला दिसत नाही". असे आदित्य जोगाईकर म्हणतात. ते योग्य वाटते. तसेच चंद्रकांत पाटील यांनी ही अनुराधा पाटील यांच्या काव्यातून जीवनातल्या दुःखाचा वेध घेणारी चिंतनशीलता आणि प्रतिमा सृष्टीचे आगळेपण असे दोन पैलू व्यक्त झालेले आहेत. दुःख, वेदना, विरह, अस्वस्थता, उदासीनता, वैफल्य इत्यादी भावभावनांचा उत्कट प्रत्यय त्यांच्या कवितांमधून येतो. हे विविध भाव प्रतिमे मधून व्यक्त झाले आहे. या सर्वांच्या मागे कवयित्रीचे प्रगल्भ असे चिंतन आहे. त्यांच्या 'दिवसें दिवस" मधील पहिल्याच काव्यातून 'मी विसरले असते' मध्ये चिंतनाचा धागा हळुवार पणे गुंफलेला आढळतो. "मी विसरले असत, काळोख उजळणारी सगळीच प्रकाश चिन्ह" तसेच दुसऱ्या कवितेतही त्यांचे मन कुठंतरी आपली व्यथा सांगतात, "स्वीकारता येत नाही मला आता, तुझं निरंतर असणं आणि फिरवता ही येत नाही पाठ तुझ्याकडे" किंवा मायाबाई, आपण तर अस तो इथं, दारालाच न पुरणाऱ्या दाराच्या माती सारखे आणि आपली सावली बांधून, पांगत जातं हे आयुष्य दिवस दर दिवस" कवयित्रीची ही चिंतनाची अभिव्यक्ती तिच्या 'स्व' अनुभवाचीच भाव चित्रे प्रकट करून जातात. कवयित्री एका की अवस्थेत सतत दुःखाने कोसळून जात असते. मानसिक आघाताने व्याकुळ होते. आयुष्य ही माणसाला मिळालेली एक देणगी आहे; परंतु आयुष्य म्हणजे गोळा बेरीज नव्हे. काही मोजके, निवडक आवडते बरोबर घेऊन जावे. असे कवयित्रीला वाटते. आयुष्याच्या वाटचालीत ती थकून गेली आहे.

कवयित्री अनुराधा पाटील ची बेचैनी, एकाकीपण अत्यंत वेधकपणे या ठिकाणी चित्रित झाले आहे. रितेपणाच्या काळोखात कवित्री बुडून गेली आहे. या काळोख्या जीवनात ही ती दुःखाचीच आशा करते आहे. हेच तिचे जीवन मूल्ये ठरते आहे. ती म्हणते, “काही द्यायचंच असेल, तर मला निरंतर दुःख दे म्हणजे सदैव तुझी आठवण येईल”. तसेच कवयित्री पुढे लिहिते, “बोलता येत नाही मला ही आता मनावर अडसर घालून, आयुष्याच्या अर्थपूर्ण ते बद्दल आणि सांगता येत नाही, सुखा बरोबर दुःख ही देखणं करून.” कवयित्रीचं आयुष्यच असं दुःखाने भरलेलं आहे. दुःखाच्या आठवणीनं ही तिची व्याकुळता अधिकच गडद होत जाते. “संध्याकाळच्या दुखऱ्या वाऱ्यामधून वाहत जातात, हलकेच आवाज देत मागच्या जन्माच्या वाटाव्यात, अशा झुरमुर आठवणी, आणि पाण्यावर चांदणं हलावं, तसे थरथरत हे मुके दिवस” त्यांच्या प्रत्येक काव्यातून दुःखाचे भावस्पर्शी तरल अनुभव प्रकट होतात. त्यातून त्यांच्या चिंतनशीलतेची भाव गर्भजाणीव ही प्रकट होत जाते. अप्रत्यक्ष प्रीतीच्या अनुभूतीचे ही भावचित्र त्यातून प्रकट होतात. तेव्हा त्या लिहितात, “तुझ्या या अफाट पात्रात उभं राहताना, आठवतात अनेक गोष्टी, आठवतात तुझ्या शिवायचे दिवस, तुझ्या वाचूनच संदर्भ नसणारे” कवयित्रीची प्रतिमा सृष्टी ही आगळी वेगळी आहे. तिचं अलौकिक रूप बहरदार आहे. या कवितां मधून येणारा दुराव्याचा जाळ, बिनसावलीचं जग, अबीर बुक्क्याचं पंढरपूर, श्रीरंग चकवा, पिकली पानं, थकलेलं आयुष्य, गंगेची कावड, रापलेलं हाड, अष्टवसूवैदेही, काचमळ, नापीक जमीन, दुभंगवणारा तान्हा, काळोख चित्रे, मृत्यूची पावलं, दूधभरल्या कोवळे पणा कवितेचा देह, कवितेचे अंगण, अशा कितीतरी प्रतिमांनी त्यांच्या काव्यात वेगळे परिमाणला भलेले आहे. कवयित्रीचा काव्य पिंडच चिंतनशील असल्यामुळे तिची कारूण्य वृत्ती या अपरलौकिक सृष्टीत पूर्णतः बुडून गेली आहे. ‘दिवसें दिवस’ या काव्य संग्रहातील कवितां मधील अनुभव विश्वाची प्रगल्भता

पूर्वीच्या कविता संग्रहा पेक्षा वेगळी आहे. या कवितेची जात कुळी ही शोकात्म जाणिवेच्या चिंतनशीलतेची आहे. कवयित्रीची जीवन विषयक जाणीव ही याच दुःखाच्या कोंभातून वर येते. कवयित्री अनुराधा पाटील यांची जीवन विषयक जाणीव ही तिच्या आत्म गत चिंतनाची 'स्व' ने भोगलेल्या एकाकी जीवनाची जाणीव होऊन राहते. 'दिवसें दिवस' या काव्य संग्रहाच्या अर्पण पत्रिकेतच कवयित्रीने आपल्या प्रिय बंटीस जे म्हटलंय, ते असं-"प्रिय बंटी तुझं असणं हा माझा तोल होता जगणं सहज करणारी, त्यावर श्रद्धा ठेवायला लावणारी ती शक्ती होती, तसं फार काही मागितलं नव्हतं. आयुष्य जवळ नुसतं पाऊल बुडावं एवढी ओल आणि डोक्यावर एखादा तुकडा आपल्या आभाळाचा" हीच खरी कवयित्रीची जीवन विषयक जाणीव आहे. आपल्या हरवलेल्या काही आठवणींना उजेडात आणून त्यात स्वतःला सामावून घेत कवयित्री जे जीवघेणं दुःखानं रापलेले जीवन जगत आहे. त्यातूनच तिच्या जीवन विषयक जाणीवांचा शोध घेता येतो. कवयित्री अनुराधा पाटील दुःखाने एवढ्या रापलेल्या आहेत की, त्या परमेश्वराच्या अस्तित्वाला ही नाकारत आहेत. परमेश्वराचं असणं ही त्यांना नको आहे. त्यांना जे हवं आहे तेच नाकारलं गेलं आहे. त्यांना हवं असलेलं आईपणाचे सुख त्यांच्या कडून अकालीच हिरावून घेतल्यामुळे त्यांची जीवन विषयक जाणीव ही उदास झाली आहे. या उदास आयुष्यात जगण्यासाठी एखादा सुखाचा क्षण यावा असं त्यांना वाटते. म्हणून त्या म्हणतात, "उजळूदे थोडा काकणांचा रंग असूदे सुखाचा एखादा क्षण अपार शीणलेल्या जगण्यासाठी" अनुराधा पाटील स्वतःकडे प्रोढत्व स्वीकारून आपल्याला येणाऱ्या नवयुतींना सांगण्याचा काही अधिकार आहे व ते आपले कर्तव्य आहे. असे समजून म्हणतात, "मायाबाई सांगता येत नाही का वाजतात असे कोणत्याही दुष्काळाचे पाय नेहमी आपल्याच दाराशी आणि उरत नाही हातभर ही आडोसा". आयुष्याचे गणित ही असंच तिच्या जीवन विषयक जाणीवांना समोर ठेवून होत असतं. ते उलगडून दाखवितात, "तुझ्या भरल्या किनाऱ्यावर

ही नांदतात तोंड लपवून, एका बाजूनं शिवताना, दुसरी कडे फाटत जाणाऱ्या जुन्या कापडा सारखं हे आयुष्य" अनुराधा पाटील यांची जीवन विषयक जाणीव त्यांच्या 'तुझ्या या अफाट पात्रात' या कवितेतून विशेषत्वाने प्रतिबिंबित होते. कवयित्री म्हणते, "तुझ्या या अफाट पात्रात, उभं राहताना आठवतात अनेक गोष्टी, आठवतात तुझ्या शिवायचे दिवस तुझ्या वाचून संदर्भ नसणारे". स्मृतीचे धागेवर येत असताना एकूणच कवयित्रीची जीवन गाथा ही पुढं –पुढं उलगडत जाते. कवयित्री ज्या ईश्वराचं अस्तित्व नाकारते त्याच ईश्वराला आपल्या रीत्या आयुष्यासाठी काही दानही मागत असते, "मी घेईन ईश्वरा तुझ्या हातून पुन्हा एकदा, एखाद्या उदास पाखरा सारखं तू नेमून दिलेलं चारापाणी, आणि घेईन त्या असंख्य यातना ज्यावर लिहिलेलं असेल तुझ्या अदृश्य हातांनी, माझं फक्त माझं नाव, मी मागेन आभाळाकडे माथा नमवून थोडी करूणा आणि मागेन मला बदलताच येणार नाही, अशा अंतिम यथार्थाला स्वीकारण्याचं बळ". 'आता तू नाहीस' या कवितेतून ही जीवन जाणीव प्रकट करताना म्हणतात, "आता तू नाहीस कुठंच नाहीस आणि तुझ्या शिवायचा हा माझा नवा जन्म आहे. फक्त मृत्यूचाच वास येणाऱ्या मातीच्या या शरीरात पुन्हा घेतलेला" हे आयुष्य बिन तक्रार घालवीत असताना तिच्यावर जो अचानक आघात होतो, त्यामुळे तिची कूस रिकामी होऊन जाते, तेव्हा कवयित्रीच्या मनात भाव तरंग उमपतात. या दुखात ही सुखाचा शोध घेताना म्हणतात, "पण फुटलेत तरीही जगण्याला, क्वचित कुठे हिरवे कोंब आणि उमलून आली देह मनाच्या फांदीवर जीवनोत्सुक क्षणांची लाल बुंद कोवळी पानं" अशी दुःख भरी, उदास जीव घेणी जीवन कहाणीच 'दिवसें दिवस' या कविता संग्रहातून प्रकटताना दिसते. या संग्रहातील त्यांच्या बहुतेक कविता आईपणाच्या, रितेपणाच्या, दुःखाच्या व हरवलेल्या क्षणांच्या, आठवणींच्या, स्मृतींच्या जीवन पाकळ्या आहेत.

कोणतीही आई आपल्या बाळाला अवेळीच हरवून बसली, तर तिच्या काळजावर दुःखाचे जे जीवन कोरले जाते. त्याची गाथाच या

काव्यातून प्रकट होताना दिसते. 'मी विसरले असते' या पहिल्याच कवितेतून जे भावचित्र प्रकट होते ते असे-"मी विसरले असते, काळोख उजळणारी सगळीच प्रकाश चिन्हं, पण तू अजून ही इतका माझा की बोलावसं वाटत नाही, मला तुझ्या बद्दल कविते शिवाय कुणाजवळ" या आईच्या रित्या आयुष्यात आता कविते शिवाय काहीच शिल्लक राहिलेले नाही. तेव्हा ती आता कविते शिवाय कुणाशीच संवाद साधू इच्छित नाही. आईच फाटलेल्या दुःखानं करपलेल्या मनाने पुढे म्हणते, "या घराला जाणवत नाही तुझं नसणं आणि इथली माणसं रमून गेली आहेत. आपल्यातच पुन्हा आवेगानं". आयुष्याचं चक्र हे असंच असतं. आई शिवाय खरं दुःख कुणालाच कळत नसतं. सारं विसरून या संसारचक्रात सर्वजण पुन्हा एकरूप होतात; परंतु आईची रिकामी कूस सारखी तिला आठवणी चक्रात ओढीत नेत असते. म्हणून तिच्या दुःखाला परिसिमा नसते. ते दुःखच अनाकलनीय असते. आई शिवाय त्या दुःखाची तीव्रता इतरांना कळणे शक्य नसते. ते दुःख पचवीत कवयित्री सांगतात, "घरात निर्माण केले होते, कित्येक भ्रम तुझ्या-माझ्या मनात, ज्यावर सोसत होतो आपण स्वतःला भुलवत तुझ्या तेरा मैल लांब मृत्यूचा प्रत्येक क्षण". या साऱ्या आठवणींवर ती आपलं पुढचं आयुष्य दुखानं करपत-करपत जगते आहे. तरी त्याच्या आठवणी तिला कांजून टाकतात, "मी वाटून टाकीन तुझ्या आठवणी झाडांना, पाखरांना, वाऱ्याला तरी सतत बरोबर असणारा तू वेगळा असा आठवशील मला त्यावेळी". कवयित्रीचे हे रीतं आयुष्य म्हणजे दुःखाची महानगाथाच आहे आणि ही दुःखाची गाथा शब्दबद्ध करताना ते शब्द ही थरथरून जातात. "मी कोंबले सगळे अभाव कवितेत, आणि शोधला दिलासा एका बाळमुठीत आयुष्या सारख्या, पण तो दिलासा ही त्यांना साथ देऊ शकला नाही, आता देणार नाहीत, कुठूनच साधी हाक सुद्धा, दिवस असणार नाही, कोणतीच आतली सोबत आपल्यासाठी कदाचित इथून पुढं कवितेचा ही". हे दुःख पचवीत असताना अनुराधा पाटील म्हणतात, "मला नको आहेत आता तुझ्यासाठी, कुणाचेच सांत्वनाचे

शब्द, पावसाळयात ही कोरड्या जाणाऱ्या नक्षत्रा सारखे". आईचं मन राहून-राहून आपल्या बाळासाठी कसं आसुसलेलं असतं, त्याच्या नसण्यानं तिच्या मनावर कोण कोणते प्रसंग आघात करतात व त्या दुःखाच्या पापुद्र्यावर जे काही मन सुन्न करणारे भाव चित्रत रंगत जातं, ते मनाला खोल-खोलगर्तेत डुबत ठेवते. "एकेक खडा टाकत, रांजण भरणाऱ्या तहानेल्या कावळयाची गोष्ट, सांगते सुकलेल्या ओठांनी एखादी आई आणि मी उधळून देते, हुरूपानं जमवलेले शब्दांचे चार दोन दाणे, पाखरां शिवा याच्या अंगणात". कवयित्रींच्या अंतःकरणात आता त्याच्या आठवणी केवळ दंत कथा म्हणूनच उरलेल्या असतात. "तू नसतानाही तुझी आठवण यावी, दिवस तर असे अमानुष, प्रदीर्घ होते कधी पासून, पण सोसणार नाही मला आता, तुझं अवचित भेटणं सुद्धा, की एकदंत कथा आहेस तू आज माझ्या मनात". कवयित्रीच्या व्याकुळ मनाला अधिक व्याकुळता येते, जेव्हा तिच्या समोर तान्ह्या मुलाचा चेहरा येतो. तेव्हा आई म्हणते, "झाडाला बांधलेल्या झोळी मधलं एखादं तान्हा, मग माझ्या डोळया समोर तरळतं आभाळा एवढं लकहसणारं आणि बाभळीच्या पिवळया फुलांनी झाकून जाणारे रस्ते, प्रत्येक नव्या पायांसाठी नव्यानं उलगडत जातात, तसेच आणि एका कोवळया समजूतदार हसण्याच्या हलक्या-हलक्या रेषांनी भरून जातो तिचा सारा चेहरा". अशा प्रकारे अनुराधा पाटील यांनी आईपणाचे दुःख व रितेपणा तील वेदना अत्यंत प्रत्येकारी स्वरूपात प्रकट केले आहे. नियती कठोर असते, काळ कोणासाठीही थांबत नाही, हे जीवन विषयक तत्त्वज्ञान ही या काव्यातून कवयित्रीने मांडले आहे.

**सारांश :-**

कवयित्री अनुराधा पाटील यांच्या 'दिवसें दिवस' कविता संग्रहातील कवितांमधील गद्यलय उत्कट बोलण्या इतकी स्वाभाविक पणे जवळ गेली आहे, की त्या यमकाच्या बांधणीचे बाह्य सूत्र ही तिने पूर्णपणे नाकारलेले दिसते. म्हणूनच 'दिवसें दिवस' मधील कविता दीर्घ स्वागता सारख्या किंवा अनुपस्थित व्यक्तीला उद्देशून केलेल्या संभाषणा

सारख्या आहेत. निखळ लिरिकलवळणाची, स्वतःची भाषा लाभून आपले काव्यगत विश्व घडवू पाहणारी आणि मानवी दुःखाचा भाव तीव्रपणे व्यक्त करणारी कविता आहे. असे अभ्यासकांनी म्हटले आहे. त्यांच्या कवितेतील एकूण परिसर खेड्यातील आहे. वास्तविक शहर हा शब्द सुद्धा त्यांच्या कवितेत अपवादानेच येतो. सामान्य कष्टकरी माणूस, त्याचे पिचलेले आयुष्य, मोसम, जगण्यात हरघडी भोगावे लागणारे दुःख आणि मातीशी झाडा झुडपा प्रमाणे बांधल्या गेलेल्या माणसांची होरपळ ही कविता ताकदीने व्यक्त करते. परंतु हा सगळा ग्रामीण परिसर त्यांच्या कवितेचा प्रमुख प्रतिपाद्य विषय आहे असे म्हणता येणार नाही. स्वतःची वेदना, अभाव, दुःख आणि आदर हे अंतरीक कोलाहल समजून घेण्याचा म्हणजे पर्याय आणि स्वतः संवेदनाक्षम शोधाचा तो एक काव्यगत मार्ग आहे. श्रेष्ठ लिरिकल कविता काल आणि अवकाश यांच्या संदर्भातल्या स्वतः शोध व्यक्त करीत असते. म्हणूनच लिरिकल कविता उच्च प्रतीचे भावस्पर्शी चिंतन असते. या दृष्टीने आयुष्य, आयुष्यातले अभाव, अभावातून जन्मणारे अटळ दुःख आणि काळाच्या संदर्भात होणारी फरपट ही अनुराधा पाटील यांच्या कवितेची प्रमुख आशय सूत्रे आहेत. 'स्व' आणि 'काळ' यांच्या संबंधीची तीन रूपे त्यांच्या कवितेत व्यक्त झालेली दिसतात. त्यातली एक रूप काळाची सरळ रेषीय जाणीव प्रतिबिंबित करते. क्षणा मागून क्षण, दिवसा मागून दिवस अशा अनुक्रमाने आपण काळ अनुभवत असतो. रोजच्या जगण्याची ही एक सर्वसामान्य पातळी झाली. वर्तुळांकित निरसता आणि आयुष्याचे निर्णायकसरणे आपण असहाय्य पणे भोगत असतो. 'स्व' ची निखळ वैयक्तिकता ओलांडून त्यांच्या लिरिकल कवितेला शोकात्म भाव यापद्धतीमुळे समर्थपणे अभिव्यक्त होतो. यथार्थाला सामोरे जाण्याच्या इर्षेने अनुराधा पाटील यांनी सनातन दुःखाच्या सच्चे पणा व्यतिरिक्त कुठलाही पर्याय मान्य केलेला दिसत नाही. यातून पुढे त्यांची कविता कोणती भाषा, कोणते अध्यात्म आणि कोणते वळण घेईल हे पाहणे मराठी कवितेच्या संदर्भात महत्त्वाचे ठरते. चैतन्याची मनस्वी कविता लिहिण्याची इच्छा 'दिवसें दिवस' मध्ये

चहूबाजूने घेरून टाकणाऱ्या मौनाने घेतली जावी हे त्यामुळेच स्वाभाविक वाटते. समकालीनतेचे जागृत भान ठेवून ग्रामीण परिसरातून व्यक्त झालेल अनुभव संचित इतक्या उत्कटपणे मराठी कवितेत क्वचित व्यक्त झालेले दिसते. म्हणून मराठी समकालीन कवितेत अनुराधा पाटील यांच्या काव्याचे स्थान अनन्य साधारण आहे. अनुराधा पाटील यांनी आपला काव्यगत प्रवास सहजतेने केला आहे. तिला अनुभव विश्वाचा आणि ते साकारकरणाऱ्या शैलीचा निश्चित पणे शोध लागलेला आहे.

कवयित्री अनुराधा पाटील यांचा भावनिक कल स्पष्टपणे प्रकट करणाऱ्या कविता मधून उचित शब्द कळा आणि अनोखी प्रतिमा सृष्टी यांच्या द्वारे साकार होतात. नव्हे तर शोधाची वाट बंद होते. त्यांच्या वैयक्तिक पातळीवरचा विकास मंदावतो. त्याच त्या जाणिवांची आणि शब्दकळांची पुन्हा-पुन्हा आवडताने घेतली जातात. काही सन्माननीय अपवाद वगळता मराठी कविता अभ्यासताना याची परिचिती आपल्याला येते. 'दिवसें दिवस' मधील भाव चित्रे वाचताना कवयित्रीचे सुजाणत्व वाचकांशी संवाद साधण्याची प्रक्रिया आणि कवयित्रीची दुःखमयतेची अर्थताही सर्व भाव चित्रे मराठी काव्यात मीचा ठसा उमटवतात कवयित्री आपली प्रौढता अतिशय सावकाशपणे व्यक्त करताना म्हणतात बाई मायाबाई ही गंगेची कावड जी उचलून खांद्यावर घेतली तर जड होते एका अनुभवाच्या पातळीवर आईने आपल्या मुलीला प्रौढत्वाच्या नात्याने संसाराच्या वाटेवर सुख दुःखाच्या करूण व्यथा पदोपदी अनुभवाव्या लागतात हे सांगितले आहे. बाई आवर आता तुझे अलाबला घेणारे मायेचे हात आणि जरा पाणी घाल तिच्या हळदीच्या पायावर कुणीच आपलं नसणाऱ्या नसण्याच्या या निराधार वेळेला या ठिकाणी कवयित्रीने आपली प्रौढता अत्यंत हळुवार पणे व्यक्त केली आहे. येणाऱ्या दिवसांना गतीचे चक्र लावले आहे. लेखीबाळींना पुढच्या संसाराच्या दुःखाच्या खुणा आई पणाच्या नात्याने, प्रौढत्वाच्या नात्याने कवयित्री सांगत आहे. येथे कवयित्रीचे प्रोढ मन चित्रीत होते. कवयित्रीचा सुजाणपणा ही 'दिवसें दिवस' मधून सतत जाणवतो. अशी कविता कवयित्रीला अंतर्मुख करते. अंतर्मुख होऊन ती सुजाणपणे विचार करू लागते. कवयित्री कवितेत इतकी

मनाच्या गाभाऱ्यात खोल बुडून जाते की, मी विसरले असते काळोख उजळणारी सगळीच प्रकाश चिन्हे आणि पुसल्या असत्या नेहमी साठी शब्दांच्या सावल्या कागदावरून ; पण तू अजून ही इतका माझा की, बोलावसं वाटत नाही मला तुझ्या बद्दल कविते शिवाय कुणा जवळ कवयित्रीचा हा सुजाण पणा तिच्या अनुभूतीचाच पदर म्हणतो आणि त्या सुजाणपणातून तिला ते जाणवतं ते व्यक्त होतं. कवयित्री म्हणते, म्हणतात उमटत नाहीत तुझी पावलं इथल्या मातीवर आणि ऐकू येत नाही तुझा देवाचा म्हणून एखादा शब्द ईश्वरा वाचताच येत नाही अशा अक्षरांचा तू ग्रंथ आहेस मला नको आहे तुझं अबीर बुक्क्याचं पंढरपूर नको आहे जन्मोजन्मी पडणारा मुक्तीचा श्रीरंग चकवा पंढरपूर कितीक दूर म्हणता म्हणता कवयित्री अनुराधा पाटील यांचे सुजाण पण कवितेच्या प्रत्येक ओळीतून व्यक्त होताना दिसते. कवयित्री एकाकी अवस्थेतील दुःख मुखाट्याने सहन केले आहे. सतत एकटे पडलेले हे व्यक्तिमत्व संकटांच्या मालिकांनी भरलेले आहे. तरीही संकटांना सामोरे जाण्यातच कवयित्रीला आनंद वाटतो. त्यातच तिला आपल्या जीवनाची प्रतकृत्यता वाटते. अशा अनेक कवितांमधून कवित्रीने आपल्या अंगचा सुजाणपणा, सोसिकपणा व्यक्त केला आहे. समंजसपणा हा कवयित्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा तिसरा पैलू आहे. दुसऱ्यांना समजून घेत आणि स्वतःच्या अंतर्मनाचा शोध घेत ती आपला काव्यात्म प्रवास करते. यात इतरांच्या स्वभावातील दोष दाखवण्याची इच्छा नाही की, त्याला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ती नाही स्वतःच्या व्याकुळ दुःखाची एकाकी पणाची अवस्था चित्रित करत कवयित्री अगदी समंजसपणाने आपल्या जीवनाचा आलेख चित्तारते. त्या म्हणतात, खरंतर मीच सजवत आलेले कवितेला जत्रेत भरलेल्या रेशमी बांगड्या घालून मिरवताना मन भरून जावं अद्भुत आनंदान तसं आपल्या आयुष्याच्या दुःखमय वाटेवरून चालताना ही आयुष्याचा नवा आशय शोधण्याची कवयित्रीची धडपड ही मोलाचीच वाटते. अशा पद्धतीने कवयित्री अनुराधा पाटील यांच्या काव्यातील आगळी वेगळी प्रतिमा सृष्टी हे ही काव्याचे विशेष होय. मुक्तीचा श्रीरंग, चकवा, गंगेची कावड, भरल्या घागरी, सैनिक धागे, मातीचे मडके, अष्टा, वसु, काचकमळी, वैदेही, ऋतू, गवत इत्यादी कितीतरी प्रतिमांनी त्यांच्या कवितांमधून अनुभव

सेंद्रिय होत जातो आणि त्या कविता रसिकांशी संवाद साधतात. एकंदरीत अनुराधा पाटील यांच्या काव्याचे वेगळेपण त्यांच्या समृद्ध प्रतिमा सृष्टीत आणि त्यांच्या प्रगल्भ अनुभव विश्वात आहे. तरीही रती संबंधी या कवयित्रीच्या मनात सळसळणारी एक भावना दिसते. कवितेच्या शब्दांतून, प्रतिमांतून ती उठावदार होताना दिसते. त्यांची अतृप्ती जाणवते. कधीकधी जळजळीत असते, तर भिजून उरते. कवयित्री पडद्या आड करण्याचा प्रयत्न करतात. 'दिवसें दिवस' या काव्यातील अनुराधा पाटील यांची चिंतनशीलता चांगल्या दर्जाची आहे.

संदर्भ ग्रंथ :-


१) अनुराधा पाटील, 'दिवसेंदिवस' कुशा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९२

२) दादागोरे, 'अनुराधा पाटील यांची कविता', संस्कृती प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०२३

३) पी. विठ्ठल, 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०१९

४) सदाशिव सरकटे, '१९८० नंतरची स्त्रीवादी कविता', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०११.


***

# मैनाताईंच्या धाडसी जीवनाची यशोगाथा: 'संघर्ष यात्रा'

**डॉ. मारोती कसाब**
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर

'संघर्ष यात्रा' हे प्राचार्य मैनाताई साबणे यांचे आत्मकथन ऑगस्ट २०२३ मध्ये लातूरच्या मुक्तरंग प्रकाशनातर्फे प्रकाशित झाले आहे. डिसेंबर २०१० मध्ये उदगीर येथील शामार्य कन्या माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून त्या सेवानिवृत्त झाल्या.

उदगीर येथील सामाजिक चळवळीमध्ये निर्मलाताई डोळे, मीनाताई घनपाठी, लक्ष्मीबाई पांढरे, अरुणा लेंडाणे, प्रा. भारती मुळे, उत्तरा कलबुर्गे, सुशीलाताई खादीवाले यांच्यासोबत मैनाताईही आघाडीवर होत्या.

शून्यातून विश्व निर्माण केलेल्या मैनाताई साबणे हे व्यक्तिमत्त्व म्हणजे सर्वसामान्य महिलांसाठी एक प्रेरणास्थान आहेत. उदगीर, देवणी, शिरूर अनंतपाळ आणि जळकोट परिसरातील सामाजिक चळवळीतील त्यांचे योगदान निश्चितच दखलपात्र आहे. आदर्श शिक्षक, कुशल मुख्याध्यापक व संस्थाचालक, धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या, लातूर जिल्ह्याच्या शिवसेना नेत्या ते हेर (राखीव) विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार हा त्यांचा प्रवास अत्यंत संघर्षमय आहे.

हजारो वर्षे विकासापासून वंचित राहिलेल्या अनुसूचित जाती समूहातील एक स्त्री, केवळ स्वाभिमान आणि शिक्षणाच्या बळावर स्वप्रयत्नांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात अस्तित्व निर्माण करते, एका नामांकित संस्थेत प्राचार्यासारख्या मोठ्या पदावर विराजमान होते, ही गोष्टच येथील प्रस्थापित व्यवस्थेच्या पचनी पडण्यासारखी नव्हती. त्यामुळे पदभार स्वीकारल्यानंतर मैनाताईंना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. संस्थाचालकांच्या मनात नसतानाही संविधानातील सामाजिक न्याय व कायद्यामुळे त्या प्राचार्य या पदावर विराजमान झाल्या. त्यामुळे पहिल्या दिवसापासूनच संस्था चालकांनी त्यांच्या विरोधात कारवाया सुरू केल्या. शाळेला आणि महाविद्यालयाला शिस्त लावून उत्तम शैक्षणिक कार्य करीत असतानाही बेकायदेशीररित्या नोटीसा देऊन त्यांना पदावरून मुक्त करण्यात आले. संस्थेच्या या एकतर्फी मनमानी कारभाराविरुद्ध मैनाताई कोर्टात गेल्या आणि कोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. तरीही संस्था कोर्टाचा निर्णय मानायला तयार नव्हती. शेवटी सर्व कर्मचाऱ्यांच्या पगार बंद केल्यावर चार महिन्यानंतर संस्थेला नमते घ्यावे लागले आणि सन्मानपूर्वक पुन्हा मैनाताईंना प्राचार्य पद बहाल करावे लागले.

एक महिला खंबीरपणाने जात-धर्म पुरुष सत्ताक व्यवस्थेविरुद्ध लढा देऊन कोर्टातून जिंकून येते ही गोष्ट येथील समाजकंटकांना रुचली नाही. त्यांच्यावर अनेक खोटे आरोप लावले गेले. पदोपदी अपमान करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु त्या डगमगल्या नाहीत. राज्य घटनेने दिलेल्या अधिकारांसाठी कायदेशीर रित्या लढत राहिल्या आणि जिंकल्या देखील.

शाळेमध्ये मुख्याध्यापक पदासाठी संघर्ष करीत असतानाच त्या शिवसेनेमध्ये सक्रिय कार्यकर्ता झाल्या. महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने त्यांना शासनातर्फे एक शाळा मंजूर करण्यात

आली. मैनाताई संस्थाचालक बनल्या. आपल्या शाळेवर त्यांनी शिक्षक पदासह विविध कर्मचाऱ्यांची पद भरती केली. आपल्याच जात समूहातील एका होतकरू तरुणाला त्यांनी शिपायाची नेमणूक दिली. कौटुंबिक कलहातून त्याने आत्महत्या केली. मात्र आपल्याच जात समूहातील लोकांनी ताईंवर खोटी केस दाखल केली. पोलिसांनी आरोपी म्हणून त्यांना पोलीस ठाण्यात नेऊन बसवले. परंतु आपल्यावर आलेले हे बालंट मैनाताईंनी कायद्याचा आधार घेऊन मोठ्या खंबीरपणाने झुंज देऊन झुगारून दिले.

मैनाताई साबणे म्हणजे व्यवस्थेच्या विरुद्ध लढणारी झुंजार वाघीण होय. त्यांच्या या संघर्षाची कहाणी म्हणजेच त्यांचे हे आत्मकथन होय.

मराठवाड्याच्या कर्नाटक सीमा भागातील उस्मानाबाद जिल्ह्यात असलेले ईट (ता. भूम) हे मैनाताईंचे जन्मगाव. त्यांचे कुटुंब कळंब तालुक्यातील येडाई देवीच्या येरमाळा या गावातून विस्थापित होऊन ईट येथे स्थायिक झालेले.

संघर्ष हा मैनाताईंच्या पाचवीलाच पुजलेला. घरची गरीब परिस्थिती. ईट गावात त्यांना स्वतःचे घरही नव्हते. स्थलांतराचे दुःख घेऊन हे कुटुंब कष्ट करून जगत होते. पण त्यातही या कुटुंबाने आपले संस्कार सोडले नाही. मैनाताईंच्या वडिलांनी ताडी – शिंदीचे गुत्ते घेऊन अनेक संकटे झेलून कुटुंब सांभाळले.

मैनाताईंच्या आजीच्या आग्रहावरून त्यांना शाळेत घालण्यात आले. शाळेत सुरुवातीपासूनच त्या हुशार होत्या. खो-खो सारख्या खेळात त्यांनी तालुका आणि जिल्हा पातळीवर यश संपादन केले होते.

मैनाताईंना ईट गावात शिक्षणाची चांगली गोडी लागलेली असताना पोटापाण्यासाठी या कुटुंबाला पुन्हा एकदा स्थलांतर करावे लागले. यावेळी हे कुटुंब बीड जिल्ह्यातील चौसाळा येथे जाऊन राहू लागले. चौसाळा येथील जिल्हा परिषद शाळेत शिकत असतानाच

अल्पवयीन मैनाताईंचा विवाह उदगीर येथील साबणे कुटुंबातील तुकाराम साबणे यांच्या सोबत झाला. सासरी मोठ्या एकत्रित कुटुंबात राबत असतानाच त्यांना शिक्षणाचे महत्त्व पुन्हा जाणवू लागले. दोन मुली झालेल्या असताना त्यांनी उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि बघता बघता पदवी धारण केली. पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिक्षक पदासाठी आवश्यक असलेले बी.एड.चे प्रशिक्षण त्यांनी उस्मानाबाद येथे आजीसोबत राहून पूर्ण केले. शिक्षिका म्हणून एका नामांकित विद्यालयात त्या रुजू झाल्या. इथपर्यंतचा प्रवास म्हणजे प्रचंड संघर्षाने मिळविलेले यश होय. शिक्षिका म्हणून काम करताना त्यांना काहीच अडचणी आल्या नाहीत. मात्र जेव्हा त्यांनी भारतीय संविधानाच्या कलमानुसार मुख्याध्यापक पदावर आपला हक्क सांगितला आणि ते पद कायद्याने खेचून आणले, त्यानंतर मात्र त्यांना सातत्याने अनेक संकटांचा सामना करावा लागला.

२४८ पानांचे ‘संघर्ष यात्रा’ हे प्राचार्य मैनाताई साबणे यांचे आत्मकथन म्हणजे साठोत्तरी मराठी आत्मकथनांतील एक महत्त्वाचे आत्मकथन होय. बेबी कांबळे (जीणं आमुचं), कृष्णाबाई कांबळे (माझ्या जन्माची चित्तरकथा), मल्लिका अमर शेख (मला उध्वस्त व्हायचंय), मुक्ता सर्वगौड (मिटलेली कवाडे), विमल मोरे (तीन दगडांची चूल), जनाबाई कचरू गिऱ्हे (मरणकळा), उर्मिला पवार (आयदान), कृष्णाबाई नारायण सुर्वे ( मास्तरांची सावली), नंदा केशव मेश्राम (मी नंदा), कुमुद पावडे (अंतःस्फोट), सुनीता भोसले (विंचवाचं तेल), नसिमा हुरजुक (बिन चाकाची खुर्ची), समीना दलवाई (मी भरून पावले आहे), नजुबाई गावीत (आदोर), तसनीम पटेल (भाळ आभाळ) अशा वंचित समूहातील अगदी बोटांवर मोजता येतील एवढ्या लेखिकांमध्ये प्राचार्य मैनाताई साबणे यांचा समावेश करावा लागेल. विशेषतः मराठवाड्यातील स्त्रियांचे अत्यंत अल्प प्रमाणातील लेखन

पाहता, मैनाताईंचे हे आत्मकथन अधिक उठावदार दिसते. डॉ. सुधाताई काळदाते यांचे 'जीवन सुधा', इंदुमती जोंधळे यांचे 'बिनपटाची चौकट', प्रा. डॉ. तसनीम पटेल यांचे 'भाळ आभाळ' असे सन्माननीय अपवाद वगळता मराठवाड्यातील स्त्रियांनी फार कमी प्रमाणात आत्मकथने लिहिली आहेत. या पार्श्वभूमीवर मैनाताईंच्या हिंमतीला दाद दिली पाहिजे.

इ. स. १९४० ते २०१० अशा साठ- सत्तर वर्षांच्या प्रदीर्घ काळाचा पट लाभलेल्या या आत्मकथनात लेखिकेने अत्यंत तटस्थपणे आपल्या कुटुंबाचे, माहेर आणि सासरचे तसेच वास्तव्य केलेल्या परिसराचे आणि एकूणच समकालीन स्थिती गतीचे चित्रण केले आहे. त्या काळातील गावगाडा, गावगाड्यातील विविध जातीय स्तर, वर्गीय स्तर याबरोबरच शेतीमाती आणि अस्सल मराठमोळया ग्रामीण संस्कृतीचेही दर्शन लेखिकेने घडविले आहे.

भारतात अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. त्यांनी समाजाच्या भल्यासाठी आपले जीवन समर्पित केले. येथे समता नांदावी, सर्व नागरिकांना समान विकासाची संधी मिळावी, सर्वांना समान पातळीवर जगण्याचा आनंद घेता यावा यासाठी आणि भेदभाव विरहित समाजाचे स्वप्न साकारण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मात्र भारतीय समाजमन अजूनही बदलायला तयार नाही. समाजात अजूनही प्रचंड भेदभाव आहेत. स्त्री पुरुष विषमता आहे, जातीय विषमता आहे, हेच मैनाताईंना कराव्या लागलेल्या संघर्षावरून दिसून येते.

या आत्मकथनात मैनाताईंनी आपल्या संपूर्ण जीवनाची चित्रकथा सुंदर शब्दांमध्ये साकार केली आहे. हे आत्मकथन म्हणजे तत्कालीन समाज जीवनाचे निखळ प्रतिबिंब होय. तत्कालीन समाज जीवनाचा उभा आडवा छेद या आत्मकथनाच्या निमित्ताने मैनाताईंनी घेतलेला आहे. या आत्मकथनाचे साहित्यिक मूल्य जसे महत्त्वाचे आहे,

तसेच या आत्मकथनाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक मूल्य ही प्राप्त झालेले आहे. रोजच्या व्यवहारातील साध्या सोप्या भाषेत लिहिलेल्या या आत्मकथनात वैयक्तिक, कौटुंबिक जीवन अनुभवांबरोबरच शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अनुभव सुद्धा आलेले आहेत आणि ते मराठवाड्याचा सामाजिक इतिहास समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

'स्त्री जन्म म्हणुनी न व्हावे उदास' असा संदेश मध्ययुगीन काळात विद्रोही संत कवयित्री जनाबाईंनी दिला होता. त्याचीच अनुसरण मैनाताईंनी केलेले येथे दिसून येते. स्त्री म्हणून उदास न होता प्रत्येक क्षेत्रात माणूस म्हणून त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. ही समतेची लढाई अत्यंत प्रेरणादायक आहे. वाचकांना या आत्मकथनातून निश्चितच जीवनाचा बोध सापडेल असा मला विश्वास वाटतो. मैनाताईंनी इथेच न थांबता यापुढेही लिहीत रहावे यासाठी खूप खूप शुभेच्छा..!

**संदर्भ-**

१ साबणे मैनाताई, 'संघर्ष यात्रा', मुक्तरंग प्रकाशन, यशवंतराव चव्हाण शाॅपिंग काॅम्प्लेक्स, मेन रोड, लातूर, प्रथम आवृत्ती – २०२३

***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

## प्रा. महेश भाऊ थोरात

जीवनदीप वरिष्ठ महाविद्यालय, गोवेली, कल्याण.

१९६० नंतरचा कालखंड हा चळवळींनी भरलेला कालखंड आहे. यात मराठी साहित्य विश्वात अनेक बदल झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सगळयाच सामाजिक, राजकीय प्रश्नांना शिथिलता प्राप्त झाली. १९६० नंतर मात्र बेकारीपासून देशद्रोह आतंकवादापर्यंत अनेक नवे प्रश्न निर्माण झाले. त्यातून सामाजिक राजकीय चळवळींना प्रारंभ झाला. विशेष म्हणजे या चळवळींचे नेतृत्व सर्वसामान्य असलेल्या माणसाकडे होते. १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहीर झाले. यातून स्त्री प्रश्नांविषयीचे नवे विचारमंथन सुरु झाले. विविध स्त्रीवादी संघरटनांची निर्मिती झाली. यातून स्त्रीवादी चळवळ, गतिशील झाली. सर्वसामान्य स्त्रियांच्या प्रश्नांपासून स्त्रीवादाच्या सैध्दान्तिक मांडणीपर्यंत चळवळीने प्रगती केली. या सर्व घडामोडींचा परिणाम मराठी साहित्यावरही झाला.

'साठोत्तरी मराठी साहित्यातील महिलांचे योगदान' स्पष्ट करत असतांना 'साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद समजून घेणे आवश्यक आहे.

**स्त्रीवाद :**

स्त्रीवाद ही केवळ सैध्दान्तिक पातळीवरची चर्चा नसून ही चर्चा प्रत्यक्षात उतरवून समाजात बदल घडवून आणण्याचे आव्हान स्त्रीवादासमोर आहे. या समान व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्यामुळे त्यांच्या आयुष्यात फारसे बदल झालेले दिसत नाहीत. संपूर्ण व्यवस्थाच लिंगभेदावर आधारित असल्यामुळे हा लिंगभेद जसा नैसर्गिक आहे त्याच पद्धतीने स्त्रियांचे समाजातील स्थान ही दुय्यम आहे असे समजण्यावर भर दिला आहे.

स्त्री मुक्तीच्या चळवळींना जरी १८ व्या शतकापासूनची पार्श्वभूमी असली तरी स्त्रीवादी विचारसरणीचे साहित्य विसाव्या शतकातच रुजले आहे असे म्हणावे लागते. 'स्त्रीवाद' ही संकल्पना स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी रुढझालेली चळवळ आणि साहित्य या दोहोंसाठी विचारसरणी म्हणून अस्तित्वात आलेली दिसते. आपल्या लेखणातून अनुभवातून व

कृतीतून स्त्रियांनी अभिव्यक्त केलेली ही विचारसरणी असून याला कोणी एक विशिष्ठ ठराविक असा प्रणेता आढळून येत नाही. ज्याप्रमाणे ग्रामीण आणि दलित जाणिवेतून निर्माण झालेल्या साहित्यामागे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा आहे. त्याप्रमाणे स्त्रीवादाच्या जाणिवेमागे विशिष्ट असा प्रवक्ता आपल्याला दाखविता येत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी अनेक स्त्रियांनी उभी केलेली ही विचारसरणी म्हणून 'स्त्रीवाद' या संकल्पनेचा विचार करावा लागतो. 'स्त्रीवाद' ही भारतीय भूमीतील विचारसरणी नसून ती पाश्चात्य जगतातील घडामोडींपासून उदयास आलेली आहे. जागतिक पातळीप्रमाणे भारतात ही स्त्रीमुक्तीची चळवळ कमी अधिक सुरु होती. पण 'स्त्रीवाद' म्हणून अस्तित्वात आलेली विचारसरणी विसाव्या शतकात पाश्चात्य राष्ट्रातूनच जगभरात प्रचलित झाली आहे.

"The Female is femals by Virtu of a certain lack of qualities" हया ॲरिस्टॉटलपासून चालत आलेल्या अभावमूलक विचारसरणीला छेद देणे, स्त्री ही अपूर्ण मानव असल्याची समजूत नष्ट करणे आणि स्त्री विषये नविन मानदंड निर्माण करण्यासाठी व्यूहरचने ही स्त्रीवादी चळवळीची थोडक्यात भूमिका सांगता येईल. विविध अंगाने 'स्त्रीवाद' या विषयाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, समाजकारण, अर्थकारण, राजकारण कला व वाड्मय व्यवहार या सर्व क्षेत्रात स्त्रियांच्या वाटयाला आलेले दुय्यम स्थान नाकारुन माणूसपणाचा क्षमताधिष्ठीत हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ हे 'स्त्रीवादा' चे सर्वसाधारण स्वरुप आहे आणि या स्त्रीवादी विचारसरणीच्या समोर भारतीय दृष्टीकोनातून बरीच आव्हाने आहेत. पुरुषांप्रमाणेच माणूस म्हणून जगण्याची आपली आंतरिक ओढ स्त्रियांनी आपल्या भाषिक कृतीतून व्यक्त करायला सुरुवात केली. या माणूसपणाची जाणीव होणे व ते मिळविण्यासाठी लढा देणे ही स्त्रीवादी विचारांची पार्श्वभूमी आहे. या संदर्भात डॉ. अश्विनी धोंगडे यांनी काही निष्कर्ष नोंदविला तो असा – १) स्त्रियांच्या म्हणून पुरुषापासून वेगळया असलेल्या जाणिवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाड्मयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते. २) स्त्रीवादी साहित्याची भूमिका जशी प्रस्थापितांविरोधी बंड करण्याची आहे त्याचप्रमाणे शोधकाची देखील आहे. स्त्रीवादाचा विचार करताना तीन प्रमुख

प्रवाहांचा विचार करावा लागतो. मानवतावादी भूमिका स्वीकारुन न्याय, समता, स्वातंत्र्य, भगिनीभाव आणि बंधुभावाचा पुरस्कार करणारी विचारधारा म्हणजेच समानतावादी स्त्रीवाद होय. लोकशाही विचार प्रणालीतील लिंगभेदातील समतेच्या विचार संकल्पनेवर भर देणारी ही विचारसरणी आहे. शिक्षणाची व विकासाची समान संधी लोकशाही कायद्याच्या आधारे मिळविण्यावर या विचारसरणीचा भर आहे. स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळावेत. विवाह संबंधात समान स्थान, निर्णय स्वातंत्र्य अत्याचारापासून कायदयाने संरक्षण, संपत्ती, वारसाहक्क, घटस्फोटाचा हक्क, मुलांचा ताबा या हक्काचा पुरस्कार मानवतावादी आणि समतावादी स्त्रीवादाने केला. स्त्रियांमधील जाणीव जागृतीवर या विचारसरणीचा भर आहे.

वरील सर्व संदर्भाचा विचार करता आपणांस असे म्हणता येते की, स्वत्वाच्या जाणिवेतून निर्माण झालेल्या मराठी भाषेमध्ये साठोत्तर काळात या स्त्रीवादी प्रवाहाने मराठी साहित्याची कक्षा रुंदावण्याचे काम केले. एक अलक्षित, उपेक्षित घटक साहित्याच्या केंद्रवर्ती आणला एवढेच नव्हे तर स्त्रीला एक स्वतंत्र अस्तित्व भान प्राप्त करुन देण्याचे कार्य केले.

**मराठी साहित्यातील स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची प्रेरणा व परंपरा**

स्त्रियांचे स्वत:च्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. साहजिकच पुरुषी साहित्याहून ते स्वरुपत: वेगळे ठरते तथापि स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ केवळ स्त्रीनिर्मित साहित्य नव्हे तर पुरुषकेंद्री विचार व्यूहातून मुक्त अशा परिप्रेक्ष्यातून कोणीही स्त्री पुरुषाने निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवाद साहित्य असेही व्यापक अर्थाने म्हणता येईल. बाईच्या असण्याचा, होण्याचा म्हणजेच अस्तित्वाचा, स्वत्वाचा व अस्मितेचा समग्रतेने वेध घेणारे तिच्या आत्मशोधाचा प्रवास वाङ्.मयीन अवि  कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल.

स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांच्या लेखनपरंपरेचा इतिहास सिध्द करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यातून एक 'स्त्रीकेंद्री' सहित्यप्रवाह निर्माण झाला. ॲलन मोअर्सचे 'लिटररी विमेन' (१९७६) ॲलन शोवॉल्टरचे 'अ लिटरेचन ऑफ देअर ओन' (१९७७) आणि सँड्रा गिल्बर्ट आणि सूसान ग्यूबर यांचे 'द मॅड वुमन इन द ॲटिक : द वुमन रायटर अँड द नाइन्टीन्थ सेंच्युरी लिटररी इमॅजिनेशन (१९७९) या तीन पुस्तकांतून प्रामुख्याने हया स्त्रीकेंद्री साहित्यप्रवाहाचे दर्शन घडते. स्त्रीवादी लेखन परंपरा निर्माण करुन,

स्त्रियांमध्ये 'भगिनीभाव' निर्माण करुन पुरुषप्रधान संरचनेला हादरवून टाकण्याचा हा राजकीय प्रयत्न आहे. या वरील ग्रंथात एकोणिसाव्या शतकातील लेखिकांच्या साहित्याचे विश्लेषण करुन स्त्रीवादी काव्य–शास्त्राची (फेमिनिस्ट पोएटिक्स) मांडणी करणारे विवेचन केले.

भारतातील स्त्री लेखनाची परंपरा जाणीवपूर्वक एकत्र आणून, भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहास निर्माण करण्याचा स्त्रीवादी प्रयत्न विमेन रायटिंग इन इंडिया ६०० बी.सी.टू द प्रेझेंट खंड १ व २ (१९९२–९३) या ग्रंथाने केला. विविध कालखंडात स्त्रियांनी लिहिलेले तेरा भारतीय भाषांतील १४० साहित्यिक वेचे त्यात आहेत. त्यातून अगदी बुध्दकालीन थेरी गाथांपासून भक्तिकाळातील स्त्रियांचे लेखन, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्रे, आत्मचरित्रे व वर्तमानकालीन बंडखोर लेखन एकत्र सापडते. प्रस्थापित पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचा प्रतिकार करणारे वा ती उलथवून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखवून देणारे विपुल व वैविध्यपूर्ण स्त्री–साहित्य भारतीय भाषांमध्ये दिसते.

स्त्रीवादी विचाराला पाश्चात्य राष्ट्रांतील चळवळींची पार्श्वभूमी असली तरी भारतामध्ये एकोणिसाव्या शतकापासून ज्या सुधारणावादी चळवळी सुरु झाल्या त्याचा प्रभाव भारतीय स्त्रीवादावर दिसून येतो. स्त्रीवादी जाणिवेचा पहिला ग्रंथ सन १८८२ मध्ये 'स्त्री पुरुष तुलना' लिहून ताराबाई शिंदे यांनी भारतीय स्त्रीवादी विचारसरणीचा पाया घातला असे म्हणता येईल. १८८२ मध्ये पंडिता रमाबाई यांनी 'आर्य महिला समाज' ही पहिली स्त्रियांची संघटना सीापन करुन स्त्री मुक्तीच्या कार्यालय संघटनात्मक स्वरुप दिले. विसाव्या शतकात १९२७ साली 'अखिल भारतीय महिला परिषद' ही सुशिक्षित महिलांची पहिली संघटना सीापन करण्यात आली. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या स्वातंत्र्यांच्या चळवळीतून भारतात व मराठीमध्ये स्त्रीवादी साहित्याची जाणिवपूर्वक बैठक तयार होत गेली असली तरी खऱ्या अर्थाने १९६० नंतरच स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य मराठीत लिहिले जाऊ लागले.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्त्रीमुक्तीच्या संदर्भातील घटना व भारतीय तसेच महाराष्ट्रीय पातळीवरील सामाजिक, सांस्कृतिकव राजकीय घटना प्रसंगाचा परिणाम म्हणून मराठी साहित्यात विविध स्तरातील स्त्री लेखिकांनी वेगवेगळया वाड्.मय प्रकारातून आपली अभिव्यक्ती करण्यास सुरुवात केली.

**साठोत्तरीमराठी साहित्य :**

१९६० ते ८० या वीस वर्षांच्या कालखंडात लघु – अनियतकालिकांची चळवळ, दलित साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळ, स्त्रीवादी चळवळ, यासारख्या चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी साहित्यविषयक मूल्यभान बदलवून टाकले, १९६० साली 'अथर्व' १९६२ साली 'असो' हे लघुनियतकालिका प्रकाशित झाले. लघुनियत कालिकांची चळवळ केवळ वाङ्.मयीन क्षेत्रातील साचलेपणाच्या विरुध्द होती. लघुनियतकालिकांच्या चळवळीला स्त्रियांशी फारसे देणेघेणे नव्हते. तसेच ग्रामीण साहित्य चळवळ फारशी फोफावली नाही. त्यामुळे तिच्यात अनेक उणिवा राहिल्या. पुढे प्रतिमा इंगोले सारखी एखादी ग्रामीण लेखिका आली.

१९८० नंतर आदिवासी, मुस्लिम, खिश्चन हे साहित्यप्रवाह पुढे आले. आपआपल्या समुहातील व्यथा वेदना या प्रवाहांनी साहित्यात मांडली. संधना मेश्राम, रत्ना गोटले या साहित्यीकांबरोबरच कुसूम आलाम, वाहरु सोनवणे, उषाकिरण आत्राम या आदिवासी कवयित्रींनी आपले योगदान दिले. आदिवासींच्या व्यथा वेदना या साहित्यातून प्रकट होत आहेत.

मुस्लिम साहित्य क्षेत्रात राजन खान, क.म. शहाजिदे, मुबारक शेख, जावेद कुरेशी, एहतेशाम देशमुख इ. लेखकांचे योगदान महत्वपूर्ण ठरते. या साहित्यात मुस्लिम म्हणून भोगावी लागणारी यातना मध्यवर्ती आहे. वैचारिक साहित्यात मुस्लिम म्हणून भोगावी लागणारी यातना मध्यवर्ती आहे. वैचारिक साहित्यात डॉ. अब्दुल कलाम, डॉ. यु. म. पठाण, असगरअली इंजिनिअर फक्रुद्दीन यांचा उल्लेख करावा लागेल.

ख्रिश्चन साहित्यप्रवाहात फ्रान्सिस दिब्रिटो, सिसिलिया कार्व्होलो, जयवंत गायकवाड, निरंजन उजगरे, प्रविण गायकवाड, मधुकर पाठक इ. साहित्यकांनी आपले योगदान दिले. एकंदरीत १९६० ते २०१० या कालखंडात वेगवेगळया गटातील लेखक, कवींनी मराठी साहित्यात भर टाकली. भारतीय धर्म व्यवस्था, जात व्यवस्थेच्या अनुषंगाने होणाऱ्या अन्याय अत्याचाराची मीमांसा केली. प्रस्थापित साहित्य विश्वाविषयी अनेक प्रश्न निर्माण केले. आधुनिक वाद, उत्तर आधुनिक वाद संरचनावाद ते स्त्रीवादाचा प्रभाव साहित्य क्षेत्रावर निर्माण झाला. या सगळया प्रवाहांमध्ये नेमके स्त्रियांच्या साहित्याचे स्थान काय ? असा प्रश्न निर्माण होता. दलित आदिवासी लेखिका आपल्या समुहाची व्यथा वेदना आणि परत स्त्री म्हणून

असलेली वेदना आपल्या कवितांमधून अन्य लेखनकृतीतून व्यक्त करताना दिसतात. दलित लेखिकांनी आत्मकथन आणि कविता या दोघांमधून ही व्यथा अधोरेखित केली. स्त्रीवादी चळवळीचा या लेखिकांवर आणि स्त्रीवादावर काही परिणाम झाला का? की दलित चळवळ, आदिवासी चळवळ तसेच व्यथेच्या जाणीवेतून त्या लिहिण्यात आल्या ? असा प्रश्न निर्माण होतो.

साठोत्तरी मराठी साहित्याचा विचार मांडत असतांना या कालखंडातील लेखिका व त्यांच्या लेखनकृती विषयी विचार स्पष्ट करणे आवश्यक आहे. ते १९६० ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालखंडात स्त्रियांच्या साहित्यात बदल होत गेले. पुरुषसत्ताक व्यवस्थेचा जडणघडणीतून आलेले संस्कार लेखिकांच्या मनावरही पक्के असतात आणि त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. १९७५ नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांच्या साहित्यातून काही स्त्रीवादी मूल्ये प्रखरपणेसमोर आलेली दिसतात. गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन यासारख्या लेखिकांच्या कथा कादंबऱ्यांमधून हा दृष्टीकोन काही प्रमाणात प्रकट झालेला दिसतो. माणूस म्हणून जगण्याची मूल्ये नाकारुन जो नवा अवकाश समोर आला तो या लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडला. १९७५ नंतर स्त्रीची माणूस म्हणून जगण्याची गरज स्पष्टपणे पुढे आली. पुरुषसत्ताक व्यवस्थेत होणारी शारीरिक आणि मानसिक घुसमट तिला असहय व्हायला लागली. या अस्वस्थतेचा स्वर या लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडला. कथा कादंबरीप्रमाणाचे कवितेच्या क्षेत्रातही मलिका अमरशेख, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर ते आत्ताच्या संध्या रंगारी पर्यंत अनेक कवयित्रींनी माणूस म्हणून जगण्याची आपली आस स्पष्ट केली. आत्मचरित्राच्या क्षेत्रात मलिका अमरशेख, सुनिता देशपांडे, उर्मिला पवार यांनी ही जाणीव मांडण्याचा प्रयत्न केला. अशा मोजक्या काही लेखक कवयित्री सोडून दिल्या म्हणजेच लेखक कवयित्रींचा मोठा वर्ग पारंपारिक परिप्रेक्ष्यातून लेखन करीत राहिला.

१९६० नंतर मराठी साहित्याच्या अवकाशात अनेक बदल झाले. स्त्रीवादी लेखनात गौरी देशपांडे, शांता गोखले, अंबिका सरकार, मेघना पेठे, सानिया, अशा बगे यासारख्या लेखिका आपले योगदान देत होत्या. पण स्त्रीवादी विचार या कालखंडात काठावरच दिसतो. त्यामुळे स्त्रियांचे साहित्य देखील तत्कालीन साहित्य संस्कृतीपासून अलिप्त दिसते. स्त्री—पुरुष

संबंधाच्या परिघात फिरणारे स्त्रियांचे आयुष्य त्यातून त्यांना मुक्ती अभिप्रेत होती. त्यामुळे या परिघाच्या बाहेर जाऊन लिहिणाऱ्या मोजक्याचा लेखिका मराठी साहित्यात दिसतात. मलिका अमरशेख, रजनी परुळेकर यांची कविता महाजन यांच्या कादंबऱ्या अशी काही प्रतिनिधिक उदाहरणे देता येतील.

स्त्रियांचा एक मोठा गट मनोरंजन प्रधान साहित्याची निर्मिती करीत होता. प्रत्येक कालखंडात काही मोजक्या स्त्रियांनी आपली प्रखर अभिव्यक्ती साहित्यात केली. प्रत्येक लेखक हा आपल्या प्रकृती धर्मानुसार लेखन करीत असतो. निखळ जगण्याचा अधिकार स्त्रियांना नाकारला गेला. या अधिकारापय ३६६ व वके ३६६त्रया पोहोचू नयेत याची पुरेपूर काळजी घेतली गेली. कुटूंब व्यवस्थेच्या चौकटीत जगत असतांना त्या खोटया आयु  यालाच स्त्रिया खरे मानू लागल्या आणि ही चौकट त्यांना सुरक्षित देखील वाटली त्यामुळे ही चौकट ओलांडून वेगळे जगण्याची जिद्द निर्माण झाली नाही आणि हे खोटे आयु  यात त्या साहित्यातून मांडत राहित्या. अपरिहार्यपणे येथल्या समाजव्यवस्थेचीच ही देण होती.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) डॉ. अरुणा देशमुख, स्त्रीवाद साहित्य आणि संस्कृती आकांक्षा प्रकाशन, नागपूर

२) डॉ. वंदना महाजन, स्त्रीवाद आणि मराठी साहित्य विजय प्रकाशन, १ नोव्हेंबर २०१३

३) संपा डॉ. मंगला वरखेडे, स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजना का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, जाने.१९९९

४) संपा. डॉ. शरणकुमार लिंबाळे, साठोत्तरी मराठी वाङ्.मयातील प्रवाह दिलीपराज प्रकाशन पुणे, जून २००७

५) डॉ. शोभा पाटील, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

६) डॉ. भालचंद्र फडके, मराठी लेखिका चिंता आणि चंतन श्रीविद्या प्रकाशन, पुणे.


***

# साठोत्तरी मराठी साहित्य : संकल्पना व स्वरुप


## सुरेखा विठ्ठल कांबळे

गोखले एज्युकेशन सोसायटी, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन
जि. रायगड पिन.४०२११०


**प्रस्तावना:**

मराठी साहित्यात १९६० नंतर विविध प्रवाह उदयास आले. या कालखंडानंतर दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य आणि आदिवासी साहित्य असे अनेक साहित्य प्रवाह उदयास आले. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार सर्व पातळयांवर झपाटयानं होऊ लागला. ज्ञानाची गंगा घरोघरी पोहोचली. ज्ञानाचे दिवे चोहीकडे उजळले. शिक्षणाची संधी समान झाली. मुलांच्या बरोबरीने मुली शिक्षण घेऊ लागल्या. १९६० हे वर्ष महारा  ट्राच्या विचारविश्वावर प्रभाव टाकणारे वर्ष आहे. सामाजिक क्षेत्रात १९६० हे वर्ष अनेक अर्थाने महत्वाचे आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणानुसार लोकांचा स्वभाव आणि दृष्टिकोन घडत आसतो. व या सर्व गोष्टींचा प्रभाव साहित्यावरही पडत आसतो. १९६० नंतरच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या वैविध्यामुळे लेखनातही विषय वैविध्य येणे अपरिहार्य होते. मार्क्सवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद आणि जागतिकीकरण या विचारधारेने या काळातील साहित्य प्रभावित झालेले आहे. १९६० याच कालखंडातील लेखनावर डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्याही विचारांचा प्रभाव पडलेला आहे. त्यातूनच साठोत्तरीतील साहित्याची निर्मिती विपूल प्रमाणात झालेली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साहित्यभूमीत नवे उमाळे फुटले, ग्रामीण, दलित, आदिवासी, जनवादी, स्त्रीमुक्तीवादी इ. मर्यादित जीवनाचे चित्रण करणाऱ्या आणि सरसकट विश्वात्मकतेचा दावा करणाऱ्या मराठी साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहाविरुध्दचे हे पवित्रे होते. आधुनिक सामाजवास्तवाशी भिडू पाहणारे आणि व्यक्तीच्या जात, धर्म, लिंगनिरपेक्ष व्यक्तिमत्वाची विकास शोधण्याचे व साधण्याचे हे प्रयत्ना होते. त्यामुळे साहित्यचित्रणाला आव्हान मिळाले. शेकडो वर्षापासून माणुसकीला पारखा झालेला तळभारतातला माणूस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादाच्या चळवळीमुळे आत्मसन्मानाने तेजाळून उठला. जीवनाची सर्व अंगे डॉ. बाबासाहेबांच्या विचार आंदोलनामुळे प्रभावित झाली. मराठी साहित्याला वैश्विक ओळख निर्माण

करुन देणारे 'दलित साहित्य' डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेतूनच निर्माण झाले आणि ''१९६० नंतरचे समग्र दलित साहित्याचे लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव पचवूनच निर्माण झाले. ३६८ववकेखन साहित्याविषयक प्रश्नांची मांडणी जसे करते, त्याचप्रमाणे आबेंडकरांच्या तत्वज्ञानाचा अन्वयार्थही लावते. हे दलित साहित्य चळवळीचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून नोंदवावे लागेल. सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेले आंबेडकरी साहित्य लक्षणीय असे आहे. एकूणच मराठी साहित्याला एक आगळी उंची प्राप्त करुन देण्याचे काम आंबेडकरी साहित्याने केलेले आहे ही वस्तुस्तिती आहे.

**उदिष्टये :**

- साठोत्तरीतील मराठी साहित्य समजून घेणे.
- साठोत्तरीतील मराठी साहित्यातील नवे प्रवाह समजून घेणे.
- मराठी साहित्याची स्वरुप व संकल्पना समजुन घेणे.

**गृहितके :**

- साठोत्तारीतील मराठी साहित्यानिर्मिता शोध घेतला जाईल.
- साठोत्तरीत नव्याने उदयाला आलेल्या मराठी साहित्याचा शोध घेतला जाईल.
- साठोत्तरीतील मराठी साहित्याची स्वरुप व संकल्पना स्पष्ट केली जाईल.

**साहित्याच्या व्याख्या :**

१) साहित्य म्हणजे सामग्री— संच ही व्यापक अर्थाने मान्य असलेली व्याख्या असली तरीही दीर्घकाळ टिकणारे, मानवी जीवन, भावभावना चित्रित लिखित म्हणजे साहित्य.

२) साहित्य ही एक कला आहे व कोणत्याही कलेचा हेतू जसा सौंदर्यात्मक आविष्कार हा असतो, तोच साहित्याचाही हेतू असतो. सौंदर्य हे साहित्याचे आत्मतत्व होय. जीवनानुभवातील सौंदर्याचा मागोवा साहित्य घेत असते लेखकाच्या सर्जनशील, कलासक्त मनाला जाणवलेले जीवनाचे स्वरुप तो साहित्याद्वारे रेखाटत असतो. लेखकाला जाणवलेले जीवनसत्य साहित्यात सौंदर्यरुप घेऊन प्रकट होत असते. म्हणूनच साहित्यातील सत्य हे केवळ बुद्धिनिष्ठ न राहता ते अनुभविण्याचा विषय बनलेले असते.

३) प्रत्यक्ष जीवन कसे आहे यापेक्षा जीवनाचे रुप त्या कलावंत मनाला कसे जाणवते याला साहित्यामध्ये महत्व असल्याने साहित्य हे व्यक्तिमनाचा आविष्कार ठरते.

४) साहित्यकृतीचे व्यक्तिमत्वही भाषाशैली, रचना, प्रतिमा, अलंकरण, काव्यत्व, नाटय, संवाद, निवेदन, संघर्ष इ. घटकांशी संबंधित असते.

५) मानवी जीवन व्यवहारविषयक चित्रण, अर्थनिर्णयन, भा य अशा स्वरुपाच्या भाषिक अभिव्यक्तीस स्थूल मानाने 'साहित्य' असे संबोधले जाते.

६) साहित्य मुल्यांच्या संकल्पना आसल्याने त्यामध्ये विविधता आढळते. साहित्य ही एक व्यामिश्र व अनेकांगी घटना आहे. म्हणून साहित्याशी एकच व्याख्या असंभव आहे.

**साठोत्तरीतील मराठी साहित्याचे स्वरुप :**

साहित्याचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी साहित्यकृतीच्या अंगांचा अभ्यास करणे महत्वाचे आसते. या भाषिक अंगातून तिचे अर्थात्मक किंवा आशयात्मक अंग प्रकट होत असते.

१) साहित्यकृतीत घटना, कथानक, पात्रे, प्रतिमा आदी गोष्टींतून शब्दार्थजनित असे एक कल्पित विश्व तयार केलेले असते.

२) साहित्यकृती ही शब्दांनी बनलेली असते.

३) साहित्यकृतीत शब्दांचे ध्वनिरुप, अर्थरुप, आणि वाक्यविन्यासात्मक रुप घटकांनी तिची घडण होते.

४) साहित्यकृती ही शब्दबंध, वाक्यबंध, प्रतीमाबंध, चरण, कडवी, कथाबीज, कथानक, पात्रे आदी अनेक घटकांनी मिळून एकात्म, संघटीत झालेली असते.

५) प्रत्येक साहित्यकृती ही सौंदर्यपूर्ण कलाकृती मानली जाते.

६) साहित्यकृतीला स्वयंपूर्ण स्वायत्त, अनन्य स्वरुपाचे अस्तित्व असते.

**साठोत्तरीतील मराठी साहित्याची संकल्पना :**

१) संकल्पना निर्मात्याच्या मनात नसते. वेगवेगळया स्थळी आणि वेगवेगळया काळी त्याने घेतलेले अनुभव त्याच्या मनात साठलेले असतात. त्यांत कधीतरी अचानक त्याला काही संबंध जाणवू लागतात. ते धूसर असतात, रंग, स्वर, शब्द वगैरे माध्यमांतून तो या संबंधाचा शोध घेऊ लागतो आणि त्यांचा एक नवाच संयोग साधून नवी वस्तू आकाराला आणतो.

२) मराठी भाषेतील ''साहित्य'' ही संकल्पना इंग्रजीतील Literature या शाब्दाला पर्यायी म्हणून उपयोजिला आहे. इंग्रजीतील Literature या शब्दाचा शब्दकोशात अर्थ ''कलामूल्य असलेले लेखन, साहित्य विशिष्ट विषयावरचे वाड्.मय'' असा आहे. साहित्याचा व्यावहारिक अर्थ सामानसुमान असाही आहे. परंतु आपण साहित्याचे अभ्यासक म्हणून आपल्याला साहित्याचा जो अर्थ अभिप्रेत आहे तो मौखिक, लिखित सर्जनशील साहित्य असा होय. परंतु मराठी साहित्यात ''वाड्. मय'', ''स्वारस्वत'', ''विदग्ध वाड्.मय'', ''ललित वाड्.मय'' अशा पर्यायी संकल्पना उपयोजिल्या जातात.

३) तीसरी संकल्पना आहे वाड्.मय, आता वाड्.मय याचा अर्थ वाक् (वाणी) मय असा आहे. काटेकोरपणा निर्माण करण्यासाठी म्हणून साहित्याचा ललित व ललितेतर असा प्रकार भेद केला आहे.

**मराठी साहित्य निर्मिती:**

लेखकाला जाणवलेले जीवनाचे स्वरुप त्याच्या साहित्यामधून प्रकटत असते. त्याला जे अनुभव येत असतात, त्याच्या आधारेच त्याच्या साहित्यानुभवाचे, त्याच्या साहित्कृतीमधील अनुभवाचे रंग—रुप ठरत असते. त्याला त्याच्या बौध्दिक, भावनिक, कलात्मक, मुलभूत वृत्ति प्रवृत्ति नुसार, या अनुभवांचे आकलन होत असते. हे त्याच्या अनुभवाचे आकलन त्याच्या साहित्यकृतीला आकार देत असते. निर्मिती ही एका व्यक्तीच्या मनाने केलेली असते, त्या व्यक्तीच्या मनाचा ठसा त्याच्या निर्मितीवर उपटलेला आसतो. कोणताही लेखक विशिष्टि सीली, विशिष्ट काली, विशिष्ट समाजात जन्माला येतो व जगत, वाढत, विकसत जाते. तो आपल्या विचारांनी वा मनीमानसी उचंबळून येणा-या उत्कट भावभावनांनी विश्वमानव बनला तरी त्याच्या भोवतालच्या सामाजिक परिस्थितीच्या अनुकूल—प्रतिकूल संस्कारापासून त्याची सुटका नाही. एखादा लेखक जेव्हा कथा, कांदबरी लिहतो तेव्हा भोवतालच्या परिस्थितीचे कलात्मक पातळीवरुन चित्रण करणे त्यांना मोलाचे वा अर्थपूर्ण वाटत असते.

लेखकाच्या सामाजिकतेला दुसरी एक बाजू असते व ती प्रतिभाशक्तीच्या घटकाप्रमाणेच महत्वाची असते. लेखक समाजातच जन्मतो, जगतो, व मरतो. त्यामुळे जन्मापसून तो एक अखंड सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेने संस्कारित होत आसतो. त्याच्या लौकिक जिण्याचे क्षेत्र समाजातच असते व लेखक म्हणून तो करीत असलेली वाड्.मयीन निर्मिती ही देखील समाजातच होते. ती समाजासाठी असते व समाजातून त्याने घेतलेल्या जीवनविषयक अनुभवांचे अत्वयार्थ लावलेला असतो. माणूस ज्या समाजात जगतो, त्या समाजाची सगळी पूर्वपरंपरा, रुढी यांचा वारसा त्याला नकळत

प्राप्त होत असतो. समाज संस्कारांचे प्रचंड ओझे लेखकावर लादत असतो. लेखक – कलावंत आपल्या अमूर्त अशा प्रतिभाशक्तीला साकार करतो, समूर्त करतो, तो सामाजिक संस्कारांच्या, अनुभवांच्या, कल्पनांच्या माध्यामांतूनच साहित्यिकाची साहित्यिकता सिध्द होते. समाज केवळ भाकरीवर जगत नाही, तो भाषिक निर्मितीवरही जगत असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकप्रिय साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणावर होत गेली आहे. तिला उदंड प्रतिसाद मिळतो आहे. लोकप्रिय लेखकांचे अर्थार्जन समाधानकारक झाले आहे. चतुर प्रकाशकांनी या लेखकांना आश्रय दिला आहे. या साहित्यात प्रामुख्याने गुन्हेगार कथा– कादंब-यांचा समावेश होतो.

**साठोत्तरीत नव्याने उदयाला आलेल मराठी साहित्य :**

१. १९६०ग्रामीण साहित्य
२. दलित साहित्य
३. स्त्रीवादी साहित्य
४. आदिवासी साहित्य

**ग्रामीण साहित्य:**

१९६० नंतरचे ग्रामीण साहित्य हे अधिक वास्तववादी आहे. याकाळातीत आण्णाभाऊ साठे (फकीरा), उध्दव शेळके (धग), हमीद दलवाई (इंधन), शंकर पाटील (टारफुला), ना.धो. महानोर (गांधारी), रा. रं. बोराडे (पाचोळा), आनंद यादव (गोतावळा) अशी एक समर्थ पिढी निर्माण झाली. त्यांनी खेडे प्रत्यक्षात अनुभवलेले होते. त्यांचे बालपण खेडयात गेलेले होते. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून शेतकरी, बारा बलुतेदार, विविध जाती यांचे परस्परसंबंध, त्यांचे दारिद्रय, कष्टमय जीवन, यंत्रयुग, लोकशाही यामुळे बदलत चाललेले ग्रामजीवन याचं वास्तव चित्रण अतिशय सकसपणे आलेले आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात तरुण लेखकांनी वैशिष्टयपूर्ण भर घातलेली आहे. ग्रामीण जीवनाचे बदलते वास्तव खोलात जाऊन शोधले जात आहे. निरनिराळया मराठी भागातील तरुण लेखकांनी आपल्या भागातील जीवनाचे दर्शन आपल्या बोली भाषेत करुन त्याला वेगळे वास्तवाचे परिणाम दिले आहे. त्यात ग्रामीण माणसाच्या दुःखाचा, दारिद्रयाचा, त्यांच्या परिणामांचा अविष्कार करणे, ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या परस्पर संबंधाचा शोध घेणे. लोकशाही, निवडणुका यांचा ग्रामीण भागावर झालेल्या परिणामांचा शोध घेणे, ग्रामीण भागातील विविध प्रश्न, समस्या यामुळे धगधगत असलेल्या ग्रामीण समाजाच्या मानसिकतेचे चित्रण करणे इत्यादी प्रेरणांमधून ग्रामीण साहित्य लिहिले गेलेले आहे. महाराष्ट्रातील आनंद पाटील, भास्कर चंदनशिव, विश्वास पाटील, वासुदेव

मुलाटे, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, राजन गवस, बाबा भांड, शंकर खंडू पाटील, उत्तम बंडू तुपे, मधुकर वाकोडे, नागनाथ कोतापल्ले, तानाजी राऊ पाटील, मराठवाडयातले मुसळे, बा. ग. केसकर आणखी अनेक नव्या दमाचे लेखक उल्लेखनीय आहेत. १९६० नंतरच्या साहित्यामध्ये आपल्याला वास्तव, वास्तवाच्या कारणांचा शोध यासोबत विद्रोह दिसून येतो.

**दलित साहित्य :**

दलित साहित्य प्रवाह हा १९६० नंतर मराठी साहित्यात विकसित झालेला आहे. दलित साहित्य एक ठळक साहित्य प्रवाह आहे. दलित साहित्य हे वेगळया जाणिवेचे साहित्य मानले जाते. वर्षानुवर्ष गावकूसाबाहेर जीवन जगणा-या अस्पृश्य व अडाणी समजल्या जाणा-या आणि राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्टया उपेक्षित राहिलेल्या समुहाविषयी ही जाणव आहे. नकार, दु:ख, अपमान, लाचारी, बेकारी, गुलामगिरी, शोषण, वेदना सहन करुन हा वर्ग जगत होता, याविरुध्द आवाज उठवणे यातून विद्रोह करणे, हे दलित साहित्याने शिकविले. दलित साहित्याचे योगदान महत्वपूर्ण आहे. दलित साहित्य हे समाजातील सर्व प्रकारच्या अन्याय, शोषण, विषमता, याविरुध्द बंड पुकारते. ते लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवतावाद अशा मानवी मूल्यांचा आग्रह धरते. ज्या ठिकाणी ही मूल्ये पायदळी तुडवली जात असतील, त्याठिकाणी ते विरोध करते. दलित साहित्य हे आक्रमक स्वरुपाचे असून माणसाचे माणूसपण नाकारणा-या परंपराना दलित साहित्य नाकारते. दलित साहित्याने घडविलेले जीवनदर्शन स्फोटक आहे. त्याने पारंपरिक साहित्याचा फेरविचार करण्याची निकड निर्माण केली आहे. साठोत्तरीतील दलित साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य, आणि प्रामुख्याने आत्मचरित्रे यांची गंभीर दखल घ्यावी लागली आहे. या आत्मनिवेदनांनी दलित वर्गाच्या परिस्थितीचे, त्याच्यावर झालेल्या अन्याय, जुलमांचे, त्यांच्या पशुवत जगण्याच्या जाणिवा सुन्न करणारे भेदक दर्शन घडविले आहे. 'आठवणीचे पक्षी', 'उपरा', 'बलुतं', 'आभरान', 'मुक्कामपोस्ट', 'गबाळ', 'काटयावरची पोट', 'अक्करमाशी', 'जिण आमुचे', 'तराळ अंतराळ', ते अलीकडच्या आम्ही आणि आमचा बाप आणि कोलाटयाचे पोर पर्यतची दलित आत्मचरित्राची मालिका मराठी साहित्यात स्फोटक ठरली. तसेच बाबूराव बागूल, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, भास्कर चंदनशिवे यांच्या कथांनी असेच स्फोटक दर्शन घडविले.

**स्त्रीवादी साहित्य :**

मराठी साहित्यात साधारणत: १९६० नंतरच्या दशकांत स्त्रीवादी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले. कथा, कादंब-यांत स्वतंत्र, मुक्त, प्रगल्भ, स्त्रीची अनेक रुपे आढळतात. पुरुषकेंद्री विचारव्यूहातून मुक्त

अशा परिप्रेक्षातून कोणतीही – स्त्री वा पुरुषाने – निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असे म्हणता येईल. तसेच बाईच्या असण्याचा, होण्याचा – म्हणजेच अस्तित्वाचा, स्वत्वाचा व अस्मितेचा – समग्रतेने वेध घेणारे, तिच्या आत्मशोधाचा प्रवास वाड्.मयीन आविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल. स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कांदबरी व आत्मकथने अशा प्रकारांत जोमाने विकसित होऊ लागला. आत्मकथने फार कमी प्रमाणात लिहिले गेलेले दिसून येते. दलित स्त्रियांची आत्मकथने ही स्त्रीवादी साहित्यातील एक महत्वाचा दस्तावेज आहे. बेबी कांबळे (जिन आमचे), शांताबाई कांबळे (माज्या जलमाची चित्तरकथा), उर्मिला पवार (आयदान), सिंधुताई सपकाळ (मी वनवासी) इ. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात महत्वाचे योगदान आहे. १९७० च्या दशकात जगभरात स्त्रीवादाची चर्चा मूळ धरु लागली होती. स्त्रियांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवणा-या सामाजिक चळवळी जोर धरु लागल्या होत्या. १९७५ नंतरच्या काळात अनेक स्त्रिया लिहित्या झाल्या. या काळातील स्त्री– केंद्री कथा– कादंबरीलेखनामध्ये कमल देसाई, ज्योत्सना देवधर, गौरी देशपांडे, आशा बगे, प्रतिभा रानडे, माधवी देसाई, अरुणा ढेरे, शांता गोखले, अंबिका सरकार, नजुबाई गावित, प्रतिमा इंगोले, सानिया या लेखिकांचा समावेश होतो. आधीच्या स्त्रीकेंद्री कथा, कादंब-यातील एक उणीव म्हणजे त्यातील आशयसूत्रांचे पांढरपेशी मर्यादा. त्यानंतर अर्मिला पवार, बेबी कांबळे व नजुबाई गावित या दलित आदिवासी स्त्रियांचे आत्मकथनात्म लेखनही कोंडी फोडू पाहत होते.

**आदिवासी साहित्य :**

आदिवासी साहित्य, आदिवासी समाजातले नवशिक्षित लेखक आज दलित, ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या पावलावर पाऊल टाकत आपले स्वतंत्र साहित्य निर्माण करत आहेत. आदिवासी समाजाचा अस्सल डांगाणी मेवा म्हणा, किंवा मावळी म्हणा नाही तर गोंडी म्हणा असा नवा प्रवाह आपली आपली जाणीव घेऊन पुढे भक्कमपणे आलेली आपणास पाहवयास मिळतात. आज आदिवासी साहित्यामध्ये खूप अश्या संवेदना भरुन ते समोर आणल गेल आहे. त्यांची चालत आलेली परंपरागत आदिम संस्कृती, धार्मिक विधी– उत्सव, त्यांचे होणारे आर्थिक लैगिक, शारीरिक शोषण, त्यांचे आरोग्य, शिक्षण समस्या, समजुती शिक्षणासाठीचा संघर्ष या अनेक विषयांचा उलगडा आदिवासी साहित्यामधून झालेला दिसून येतो.

**सारांश :**

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर काळ हा एक अर्थपूर्ण टप्पा मानता येतो. स्वातंत्र्यप्राप्तीचा परिणाम क्रमाक्रमाने साहित्यावर दिसू लागला. ते सर्वार्थाने निराळे झाले असे नव्हे. परकीय राज्यसत्तेखाली जे प्रभाव मराठी साहित्यावर अपरिहार्यपणे पडले आणि एका दृष्टीने प्राचीन परंपरा खंडित

झाली– ज्याला आक्रमकपणे वसाहतवादी साहित्य म्हटले जाते– त्या साहित्यप्रकारांनी आणि साहित्यिक मानदंडांनी मराठीभोवती वेढा टाकला आणि वेगवेगळी दडपणे निर्माण केली. त्यातून मोकळे होण्याची प्रक्रिया स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरु झाली. नवे साहित्यप्रवाह उगम पावले आणि त्यांचे सामर्थ प्रस्थापित झाले. समाजात अनेक शतके बंद असलेले दरवाजे आज उघडे झाले. आहेत आणि जीवनचित्रणाचे नवे धाडसी प्रवाह त्यातून साहित्यात अवतरले आहेत. बहुजनसमाजातील निरनिराळया गटांना आत्मभाव मिळाले. या अर्थ स्वातंत्र्यपूर्व काळातले सारे प्रवाह नष्ट झाले असे नव्हे, पण त्यांचा मुकाबला करणारे नवे प्रवाह बळ घेऊन उभे राहिले.

लोकसाहित्य, लोककला, ग्रामव्यवस्था यांच्याबद्दलच्या अभ्यासपूर्ण लेखनाला बहर येऊ लागला. दलित, ग्रामीण, जनसाहित्याचे वारे वाहू लागले. राष्ट्रीय, राज्यस्तरावरच्या साहित्यसंस्था कार्यान्वित झाल्या, राष्ट्रीय पुरस्कार व सन्मान देण्यात येऊ लागले. साहित्यिक मंडळी लाखालाखाचे साहित्यिकांचे जथे आंतरराष्ट्रीय मेळाव्यात भाग घेऊ लागले. सांस्कृतिक मंडळातून निरनिराळया देशांना भेटी देऊ लागले, तिथल्या साहित्यिक पारितोषिकांचे मानकरी ठरु लागले. एकूण स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्य जगाच्या नकाशावर जाऊन बसले. हा सर्व परिणाम स्वातंत्र्यप्राप्तनंतरचा असे नि:संशयपणे म्हणता येते.

**संदर्भ:**


१) साहित्य विचार – प्रा. आरंविद वामन कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९२.

२) साहित्य संशोधन वाटा आणि वळणे – सुधाकर शेलार, अक्षरवाड.मय, प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १३ जुन २०१९.

३) साहित्य आणि सामाजिक संदर्भ – रा.ग. जाधव, कॉन्टनेन्टल प्रकाशन, विजयनगर पुणे, प्रथम आवृत्ती १९७५.

४) साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध – म.सु. पाटील, शब्दालय पकाशन, श्रीरामपूर, आवृत्ती जुलै २००१.

५) साहित्याचे ३७४ववके –म.द. हातकणंगलेकर, विद्या प्रकाशन पुणे, द्वितिय आवृत्ती, १९ जानेवारी २००८.

६) साहित्यविचार – संपा. डॉ. दत्तात्रय पुंडे आणि डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती १९९५.

७) shodhganga.inflibnet.ac.in

८) drrahulrajani. Com

९) https://vishwakosh.marathi.gov.in

१०)https:// vikaspedia.in

११)kavyavena.blogspot.com


***

# साठोत्तरी कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन

## डॉ. संगीता भाऊसाहेब वडितके

### मु. पो. गळनिंब, ता. श्रीरामपूर जि. अहमदनर

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांनी केलेले लेखन हे सर्वच नसले तरी ते लेखन नगण्य नाही** कथेच्या तंत्रात्मकतेचा अथवा कलात्मकतेचा त्यांनी विचार केलेला दिसून येत नाही. परंतु१९६०या कालखंडात अनेक स्त्री लेखिकांनी स्त्री समस्याला वाचा फोडण्याचे काम केले आहे.

साठोत्तरी काळाचा विचार केला तर मध्यमवर्गीय स्त्रिया व कामगार स्त्रिया यांनी आपल्या न्याय हक्कासाठी प्रस्थापित समाज व्यवस्थेची संघर्ष केला. या पार्श्वभूमीवर १९६० नंतर साहित्यात अनेक बदल झाले, परिवर्तन घडून आले. अनेक प्रवाह निर्माण झाले, आशय व अभिव्यक्तीत बदल झाले. या सर्वांचा परिणाम साहित्यावर झाला. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने मराठी कथेला जी नवी  परिमाणे लाभली. ती मिळवून देण्यात १०६० नंतर उदयास आलेल्या पुरुष कथाकारा इतकेच स्त्री लेखिकांचे कथालेखन वकर्तुत्व कारणीभूत ठरले.

**तारा वनारसे** यांनी अल्पकाळ लेखन केले आहे.'पश्चिमकडा' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांनाही स्त्रीच्या दुःखाचा वेध घ्यायचा आहे हे जाणवते. त्यांच्या कथात घटना मागोमाग गुंफलेल्या नसतात. एखाद्या घटनेच्या निमित्ताने स्त्रीच्या भाषाविश्वातील आंदोलने त्या चित्रित करू पाहतात. **सरिता पदकी** यांनी देखील १९६० नंतर कथालेखन केले आहे. 'बारा रामाचा देऊळ' (१९६६) तसेच 'घुस्मट' (१९८०) हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. **सुधा नरवणे** ह्या साठोत्तरी काळातील महत्त्वाच्या कथा लेखिका आहेत. त्यांचे 'मरालिका' (१९६४), 'दोलाचल' (१९७३), 'मरण गच्छामी' (१९७८), 'इंद्रधनू' (१९८५), 'कुठून कुठे' असे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी

महत्त्वाचे विषय आपल्या कथांमधून हाताळले आहेत. त्यांच्या कथांमधून वाचकाला विचार करायला चालना मिळते. त्यांनी आपल्या कथेमधून सामंजस्याने तडजोडीने वागणारी स्त्री उभी केली आहे. त्यांच्याबाबत डॉ. सुभाष पुलावळे म्हणतात, "स्त्री कुटुंबात एक व्यक्ती म्हणून मान असला पाहिजे ही त्यांची आग्रहाची भूमिका व तिचे प्रतिपादन त्यांच्या कथेमधून दिसते. म्हणून त्यांच्या कथांमध्ये स्त्रियांची शारीरिक वर्णन नसतात. स्त्रीच्या देहामुळे तिला असलेलं स्थान नको आहे तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणारं स्थान तिला कुटुंबात हवं आहे." **सुधा नरवणे** यांनी अनेक समस्या व ज्वलंत विषय कथेतून हाताळले आहेत. उदा. तारुण्यातीलफसवणुक, विवाहपूर्व, गर्भारपण, इत्यादी **कमला फडके, इंद्रायणी सावरकर, योगिनी जोगळेकर** इत्यादींनी या काळात कथा लेखनात भर टाकली आहे.

**स्नेहलता दसनूरकर** यांचे कथालेखन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांचे स्त्री कथाकार म्हणून कार्य अमूल्य स्वरूपाचे असून अतिशय नाजूक विषय त्यांनी आपल्या कथांमधून चितारले आहेत.त्यांचे 'अर्धीच रंगली प्रीत प्रिया', 'दोन भिंती', 'नदीचे पाणी', 'मायावी', 'नव्हते मी तव कोणी', 'मनी प्लांट', 'मुक्ती', 'मृणाल पारा', 'रात्रीच्या बहुपशात', 'कळप', 'भाग्यवान', 'लागले जीवास पिसे', 'वळून पाहता मागे' 'सुजाता', 'स्नेहकथा', 'स्नेहांकित', 'स्वर्ग तुच्छ भासतो', 'अंधाराची व्यथा', 'स्वप्न', 'शपथ', 'परतफेड', 'धडा' इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत. **कमलाबाई टिळक** आपल्या बऱ्याच कथांतून मागासवर्गीय कुटुंबाची चौकट रंगवले आहे. त्यांनी आपल्या कथा लेखनातून विविध स्वरूपाचे विषय समस्या चित्रित करून स्त्रियांच्या दुःखाला वाचाफोडण्याचे मौल्यवान कार्य केले आहे. **लीला श्रीवास्तव** यांनीही 'जखमा', 'माझ्या अंगणातला कॉक्टस', 'एक लेखणीसुळावर', 'कुबड्यावरचं अस्तित्व', इत्यादी कथासंग्रहातून स्त्री पुरुषातील भडक विचार मांडतात. **पद्मजा फाटक** यांनी 'राही' १९७८ या कथासंग्रहातून स्त्री पुरुष संबंधाचे चित्रण केले आहे. परंतु **छाया दातार** यांनी 'गोष्ट

साधी सरळ सोपी' या कथासंग्रहातून वर्तमानाची ओढ व भूतकाळातील स्त्रीचे दास्य नाहीसे व्हायला हवे असे त्यांना वाटते त्यांची स्त्री म्हणते, "तो घरातला कर्ता पुरुष आहे त्याला घरी आल्यावर सुख समाधान द्यायचं काममाझं." तर दुसरी म्हणते, "माझे जीवन मलासर्वांगानी उपभोगायचे आहे, डोळयांना झापड बांधून चालायचं नाही." तिसरीच्या मनात येते, "तू वाढतो आहेस मी मात्र माझ्या जुन्या रोमँटिसिझम मधून बाहेर येत नाही." (पाऊस माझा सारखा) या तिन्ही प्रतिक्रिया बोलक्या तर आहेतच पण त्यामागे एक ठसठसणारे स्त्री मन आहे. ते **छाया दातार** यांनी चित्रतकेले आहे.

कराड येथे भरलेल्या महाराष्ट्र कथा लेखिका संमेलनाच्या (१९७५) व्या अध्यक्षा होत्या. त्यांनीच स्त्रियांच्या कथा लेखनाविषयी तक्रार करताना म्हटले आहे कथा म्हणजे जीवनाचा आलेख नव्हे. जीवनातला एखादा अनुभव प्रसंग विचार कथेत मांडावा, उमलावा असा विचारच त्यांच्या मनात येत नाही. म्हणून त्यांची कथा फापट पसारा ठरते. त्यांची तक्रार खरी आहे.

**ज्योत्स्ना देवधर** १९६० नंतर महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांचे 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या', 'गजगे', 'बोच', 'उध्वस्त', 'आकाशी झरोका', 'सात घरांच्या सीमारेषा', 'काळजी' इत्यादी कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी प्रत्येक कथेतून वेगवेगळी स्त्री नायिका वेगवेगळया समस्येतून चितारल्या आहेत. तसेच त्यांनी आपल्या कथेतून बाल्यावस्थेतील मुली पासून तर वृद्धा स्त्री पर्यंतच्या विविध छटा रेखाटल्या आहेत. विविध पातळीवरील स्त्री पुरुष संबंधाचे धीटपणे चित्रनत्याकरू शकतात. कमल देसाई यांनी मनोव्यापाराचा शोध घेत कथालेखन केले आहे. **कमल देसाई** प्रमाणेच **विजया राजाध्यक्ष** यांचे कथालेखन मराठी कथेच्या संदर्भात महत्वपूर्ण आहे. विजयाबाईनी आपल्या अनेक कथांमधून स्त्रीची वेगवेगळी रूपे साकारले आहेत वेगवेगळया तऱ्हेच्या व्यक्ती व त्यांचे वेगवेगळया पातळीवरील अनुभव चित्रित केले आहे. त्यामुळे अंजली सोमन म्हणतात, "विजयाबाईंच्या कथातील अनुभव सूक्ष्म असला तरी वाचकांवर त्याचा परिणाम तीव्र

असतो." 'जमुना के तीर' या संग्रहात **वसुधा पाटील** यांनी दाखवलेली कथा अभिव्यक्तीची वेगवेगळी रूपे मराठी कथेच्या संदर्भात महत्वपूर्ण ठरतात स्त्रीपुरुष संबंधाचे वेगवेगळया पातळीवर चित्रण करणाऱ्या कथा त्या लिहितात.

1960 नंतर नव्या दमाने नव्या जाणीवाने लेखन करणाऱ्या कथा लेखिकांमध्ये त्यांनामहत्वाचे स्थान द्यावे लागेल. घटनांपेक्षा व्यक्तित रस आहे. या व्यक्ती चारचौघांसारख्या नाहीत त्या वेगळया वाटेने जाऊ इच्छितात. **वसुधा बाईंच्या** कथा आईस पैस असतात प्रवाही निवेदनामुळे त्या वाचनीय वाटतात. इतकेच, स्त्रीची दैवच फरपट करीत असते. या सूत्राचा प्रत्यय त्यांच्या कथातून येतो.

१९७० ते १९९० च्या दरम्यान लेखन करणाऱ्यांमध्ये स्त्रियांनी आपला ठसा निर्माण केला आहे. त्यात गौरी देशपांडे, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, सानिया, उर्मिला शिरुर यांनी कथा क्षेत्रात आपला ठसा निर्माण केला आहे.

१९६० नंतर स्त्री ही घर चूल आणिमूलही भूमिका सोडून घराबाहेर पडू लागली. नोकरी करू लागली. स्वतःच्या जीवनातील अनेक निर्णय स्वतः घेऊ लागली. परिस्थितीमुळे तिला बऱ्याच वेळा झुकावे लागले आहे. ती समाज व्यवस्थेपुढे झुकली आहे. तिला जीवनात विविध प्रकारचे अनुभव आले ते तिनेया कालखंडात कथा रूपाने मांडले आहेत. या कालखंडात वरील कथा लेखिकांचा उल्लेख केला आहे. या कालखंडातील स्त्रियांच्या कथालेखनात स्त्रीचे विविध स्पर्शी दुःख नातेसंबंधाचे चित्रण, विस्कळीत झालेली कुटुंब व्यवस्था, स्त्री देहाचे चित्रण इत्यादी विषय प्रत्ययास येते. फारच थोड्या लेखिकांमध्ये चिंतनशीलता अनुभवातील सत्यता सामाजिक जाणीव आणि कलात्मकतेचे भान आढळते.

साठोत्तरी कथा लेखिकांनी बदलत्या काळाचा विचारसरणीचा वेध घेऊन दास्यमुक्त बंडखोर आणि स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या स्त्रीचे यथार्थपणे चित्रण केले आहे. तसेच पुरुषप्रधान व्यवस्थेत होणारा स्त्रीचा कोंडमारा कुटुंबप्रमुखाचे वर्चस्व स्वतंत्र व्यक्तिमत्त्वासाठी स्त्रीचा

चाललेला संघर्ष मुक्तीची आकांक्षा या दृष्टीने स्त्रियांची वाटचाल होताना दिसते.

**संदर्भग्रंथ**

१) सोमन अंजली, 'मराठी कथेची स्थितीगती' प्रतिमा प्रकाशन, पुणे,१९९५.

२) कुलकर्णी दा. वि. 'मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद'

३) पुलावळे सुभाष (डॉ.), 'मराठी कथा परंपरा आणि स्वरूप विशेष', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी २०१०.

४) फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, मार्च (१९८०)

५) पाटील शोभा (डॉ.), 'स्त्रीवाद विचार आणि समीक्षेचा मागोवा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, मार्च (१९८०)

***

# 'सूप आणि जातं' कवितेतून व्यक्त झालेले स्त्रियांच्या जगण्यातील दाहकतेचे व सोशिकतेचे चित्रण

**प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले**

मराठी विभाग श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा जि. धाराशिव

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासात स्त्रियांचे योगदान मोलाचे आहे. स्त्रियांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात आपले योगदान देऊन आपली योग्यता सिद्ध केलेली आहे. सद्यस्थितीत स्त्रियांनी सरपंच पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारलेली आहे. म्हणजेच जबाबदाऱ्या स्वीकारणे आणि त्या सक्षमपणे पार पाडण्याचे कौशल्य आणि सामर्थ्य हे महिलांमध्ये आहे. तरी देखील स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा असलेला आपणास दिसून येतो. स्त्रियांना प्रत्यक्ष जीवन जगत असताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण स्त्रियांवरती होणारा अन्याय आणि अत्याचार यांचे वाढणारे प्रमाण हे चिंताजनक असल्यामुळे स्त्रियांच्या जगण्यामध्ये एक प्रकारची सोशिकता दिसून येते. जगण्याचे हे विविध संदर्भ अनेक महिलांनी साहित्याच्या माध्यमातून शब्दबद्ध करण्याचे काम केलेले आहे. मराठी साहित्यामध्ये साठोत्तरी काळामध्ये कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात विपुल प्रमाणात लेखन करण्यात आले आणि स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात आली अनेक स्त्रिया लिहू लागल्या या लिहीण्यातूनच विपुल प्रमाणात स्त्री साहित्याची निर्मिती झाली.

महाराष्ट्रात महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादींनी तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इ. लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे, तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम, शोषण व त्यांतून स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे, वेदना यांचे प्रभावी चित्रण केले दिसून येते. तसेच साठोत्तरी काळात अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, कविता महाजन, आसावरी काकडे इत्यादी स्त्रीवादी कवयित्रींनी काव्याचे दालन समृद्ध करण्याचे काम केले आहे. कवयित्री स्वाती शिंदे-पवार या देखील आघाडीच्या नवोदित कवयित्री असून त्यांच्या कवितांमधून स्त्रियांच्या विविध प्रश्नांची मांडणी केलेली आहे. सूप आणि जातं ही महिलांचे जगणे कसे दाहक आणि सोशिक आहे याचे चित्रण करणारी कविता आहे.

**उद्देश :-**

१) 'सूप आणि जातं' या कवितेतील स्त्रियांच्या जगण्यातील दाहकता आणि सोशिकता अभ्यासणे.

२) 'सूप आणि जातं' या कवितेतील 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमांद्वारे स्त्री-पुरूष नातेसंबंधांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

सदरील संशोधन लेख लिहिण्यासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

**डॉ. स्वाती शिंदे-पवार यांचा जीवनपरिचय :**

डॉ. स्वाती प्रतापराव शिंदे यांचा जन्म ८ एप्रिल १९७४ साली सांगली जिल्ह्यातील 'विटा' या गावी सामान्य शेतकरी कुटुंबात झाला.

महिलांसाठी शिक्षण आणि स्वातंत्र्य अत्यावश्यक असलेल्या कुटुंबात त्या वाढल्या. त्यांचे बालपण किल्ले भूपालगड म्हणजेच सध्याचे बाणूरगड ता. खानापूर जि. सांगली येथे गेले. डॉ.स्वाती शिंदे-पवार या व्यवसायाने शिक्षिका, छंदाने वक्त्या, स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आणि उत्तम गृहिणी आहेत. त्याचप्रमाणे अक्षय ड्रायक्लीनर्स नांदेडच्या त्या ब्रँड अँबेसेडर आहेत. देशभरातील नामांकित व्याख्यानमाला, साहित्यसंमेलने, चर्चासत्रे, काव्यसंमेलने, क्रीडास्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यसनमुक्ती, स्त्रियांचे प्रश्न, आंदोलने, तंटामुक्ती, पाणी चळवळ, विद्यार्थिनी दत्तक योजना, वृक्षारोपण, पती-पत्नी समुपदेशन, विधवाबंदी इ. अनेक पातळीवर त्यांनी सातत्याने सहभाग नोंदविला आहे, तसेच त्यावर प्रखर आवाज उठविला आहे. 'स्त्रीकोश', 'प्रेम म्हणजे प्रेमच', 'वाटेवरती काचा गं', 'वेदनेच्या खोल तळाशी', 'काळजातील काही ओळी', 'मास्तरकी', 'अंधारात मठ्ठ काळाबैल' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'अक्षरलेणं' हा निबंधसंग्रह प्रसिद्ध आहे. स्वाती शिंदे – पवार यांनी नियतकालिकांमधून कथा, समीक्षा, लेख प्रकाशित केलेले असून त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याबद्दल अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. 'सूप आणि जातं' या कवितेत 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमांद्वारे सनातन प्रवृत्तीमुळे समाजातील स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधांमधील विदारक वास्तव अधोरेखित केलेले आहे तसेच स्त्रियांच्या जगण्यातील दाहकता आणि सोशिकता विलक्षण संवेदनशीलतेने प्रकट केलेली दिसून येते.

**'सूप आणि जातं' कवितेतून व्यक्त झालेले स्त्रियांच्या जगण्यातील दाहकतेचे व सोशिकतेचे चित्रण :-**

'सूप आणि जातं' ही कविता स्वाती शिंदे – पवार यांची असून ही कविता 'वेदनेच्या खोल तळाशी' या काव्यसंग्रहातील आहे. या कवितेमध्ये 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमांद्वारे सनातन प्रवृत्तीमुळे समाजातील स्त्री-पुरुषाच्या नातेसंबंधातील विदारक वास्तव स्पष्ट केले आहे तसेच स्त्रियांच्या जगण्यातील दाहकता आणि सोशिकता अत्यंत संवेदनशीलतेने कवयित्रीने प्रकट केलेली आहे. जीवन जगत असताना स्त्रियांना नातेसंबंध प्रस्थापित करत असताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे आणि यातायातीचे चित्रण यामध्ये आलेले आहे.

**"सुख ओटीत माझिया**

**सूप म्हणते जात्याला**

**फिर खुंट्याच्या भोवती**

**शोध स्वतःच्या नात्याला"**

कवयित्री 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमांचा उपयोग करून स्त्री-पुरुषातील नातेसंबंध व्यक्त करताना म्हणतात की, सूप जात्याला म्हणते की सुख माझ्या ओटीत आहे खुंट्याच्या भोवती फिरून तुम्ही स्वतःच्या नात्याला शोधावे. हे नाते स्त्री-पुरुषांचे आहे स्त्री-पुरुषांचे नाते प्रेमाने, आपुलकीने वाढत असते असे नातेसंबंध जोपासण्यासाठी अनन्वित प्रयत्न करावे लागतात. पुरुषांनी समाजामध्ये वावरत असताना स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे त्यांना मानाचे आणि सन्मानाचे जिणे बहाल करणे गरजेचे आहे. जेणेकरून स्त्रिया समाजामध्ये स्वाभिमानाने जीवन जगू शकतील.

**"सारा भरडा पडतो**

**इथे तुझ्याच श्रमाचा**

**लख्ख लेबल लागते**

**शिक्षा माझ्याच कामाचा"**

कुटुंबामध्ये स्त्री वावरत असताना एक पत्नी म्हणून आई म्हणून आणि सून म्हणून तिला अनेक श्रमाची कामे करावी लागतात. स्त्री सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळी झोपेपर्यंत श्रमाची अनेक कामे घरामध्ये पार पाडत असते मात्र तिला या कामातून कधीही उसंत मिळत नाही. घर कामातून तिला कधीही सुट्टी मिळत नाही. अशा स्त्रीचे श्रम अविरत आहे. त्या श्रमाच्या मोबदल्यात तिला कुटुंबात सन्मान देखील मिळणे गरजेचे आहे. मात्र ज्यावेळेस निर्णय घेतला जातो त्यावेळेस घरातील पुरुष मंडळी निर्णय घेत असतात आणि त्यांच्याच नावाचा बोलबला होत असतो पण त्यांच्या यशामागे त्यांच्या कर्तृत्वामागे एका कर्तबगार स्त्रीचा हात असतो हे मात्र लोक विसरतात याचीही खंत कवयित्रीने कवितेमध्ये व्यक्त केलेली आहे.

**"बाई जात्याच्या भोवती**
**फिरते त्याच्याच नात्यात**
**सुख फेकते फुलाला**
**दाणे ठेवते ओट्यात"**

प्रत्येक घरातील स्त्री ही आपला संसार करत असताना माझा पती, माझी मुले, माझे कुटुंब, माझे घरदार असे म्हणत – म्हणत घरामध्ये राबराबत असते. परंतु घरामध्ये मात्र तिला कवडीमोल किंमत राहत नाही. तिच्या कामाची कोणीही घरातील व्यक्ती दखल घेत नाही. यामुळे स्त्रिया अगतिक झालेल्या आहेत. त्यांच्या मनामध्ये जे दुःख आहे त्या दुःखाने परिसीमा गाठलेली आहे. संसार करत असताना अनेक समस्या येत असतात पण त्या समस्यांवरती मात करून जीवन जगायचे असते. याची कल्पना स्त्रियांना आहे म्हणूनच स्त्रिया हे सर्व

दुःख पचवून पुढे-पुढे चालत आहेत आपले नातेसंबंध, आपले कुटुंब एकसंघ रहावे यासाठी आटापिटा करत आहेत. मात्र एवढे करून देखील त्यांची अवस्था दाण्यातील फुलासारखी झालेली आहे असे कवयित्री म्हणतात.

**"नाते सुपाचे जात्याचे**
**पती-पत्नीच्या नात्याचे**
**एक फिरते भरारा**
**दुज्या नावाचा दरारा"**

सूप आणि जातं यांचे नाते अगदी पती-पत्नी सारखे असते. संसार करत असताना संसारासाठी घ्याव्या लागणाऱ्या वस्तू, घर व इतर साहित्य मिळण्यासाठी घरातील पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील मोठी कसरत करावी लागते. घरामध्ये पुरुषांचे मन जपणारी स्त्रीच असते तिला सर्वांची मनधरणी करावी लागते. सर्वांच्या मनाप्रमाणे वागावे लागते. आणि घरात आनंदी वातावरण ठेवण्याचे काम करावे लागते. म्हणजेच कुटुंबाचा 'स्त्री' ही आधार असते म्हणून तिच्या नावाचा दरारा घरात जास्त असतो अशीही भावना कवितेत व्यक्त होते.

**"किती झिजावे जात्याने**
**घाव टाकीचे घेताना**
**याला मायेचा सारव**
**तरी टोचते हातांना"**

'सूप' म्हणजे 'स्त्री' तर 'जातं' म्हणजे 'पुरूष' आहे. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देव पण येत नाही म्हणून जात्याने किती झिजावे असे कवयित्री म्हणते. स्त्रीच्या श्रमाला सुद्धा मर्यादा आहे तिने किती

संघर्ष करावा याला सुद्धा मर्यादा आहे. तरीदेखील संसारामध्ये टाकीरुपी घाव ती सतत सोसत असते. ज्याप्रमाणे टाकीचे असंख्य घाव सोसून जातं तयार होते त्याचप्रमाणे संसारामध्ये अनेक यातना, दुःख, कष्ट सोसून स्त्रिया आपला संसार फुलवत असतात. सुपाला मात्र मायेने सारवले जाते तरी देखील ते हाताला टोचते म्हणजेच पुरुषी मानसिकता स्त्रियांना कशी दुय्यमत्व देणारी आहे यावर देखील कवयित्री नेमकेपणाने बोट ठेवतात.

**"जात बाईची जात्याची**
**घास घासते स्वतःला**
**किती आरास देखणी**
**सूप पुरुष होताना"**

कवयित्री म्हणतात की, स्त्री म्हणजे जातं आहे. स्वतः खूप कष्ट करते. स्वतःला घास घास घासते म्हणजेच संसार करण्यासाठी खूप खूप कष्ट, मेहनत करून संसार उभा करते. आणि सुप म्हणजे पुरुष असते. पुरुषांना कष्ट करून कुटुंब चालवण्यासाठी स्त्रिया सर्वोतोपरी सहकार्य करतात. यामुळे पुरूष सुख उपभोगतात. म्हणूनच कवयित्री म्हणतात की, 'किती आरास देखणी सूप पुरुष होताना' म्हणजेच आपण जर पुरुषांच्या जन्माला आलो असतो तर सुख उपभोगलो असतो अशी संवेदनशीलवृत्ती देखील कवितेतून व्यक्त होते.

निष्कर्ष :-

१) 'सूप आणि जातं' या कवितेत 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमांद्वारे सनातन प्रवृत्तीमुळे समाजातील स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधांमधील विदारक वास्तव अधोरेखित केलेले आहे.

२) 'सूप आणि जातं' या कवितेत स्त्रियांच्या जगण्यातील वास्तवता संवेदनशीलतेने प्रकट केलेली दिसून येते.

३) 'सूप आणि जातं' कवितेतून स्त्रियांच्या जगण्यातील दाहकतेचे आणि सोशिकतेचे चित्रण केलेले आहे.
४) 'सूप आणि जातं' या कवितेत 'सूप' म्हणजे 'स्त्री' तर 'जातं' म्हणजे 'पुरूष' आहे.
५) 'सूप आणि जातं' या कवितेत पुरुषी मानसिकता स्त्रियांना कशी दुय्यमत्व देणारी आहे यावर देखील कवयित्रीने नेमकेपणाने बोट ठेवले आहे.

समारोप :-

'सूप आणि जातं' या कवितेत कवयित्री स्वाती शिंदे – पवार यांनी 'सूप' आणि 'जातं' या प्रतिमाद्वारे स्त्री-पुरुषांतील वास्तव, विदारक सत्यस्वरूप मांडलेले आहे. स्त्रियांच्या जगण्यातील दाहकता आणि सोशिकता अत्यंत संवेदनशीलतेने मांडली आहे. तसेच स्त्रियांना जीवन जगत असताना संसारामध्ये कराव्या लागणाऱ्या अविरत श्रमाचे कवितेत चित्रण आलेले असून आणि पुरुषांना सर्वतोपरी साथ देऊन देखील स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो याची खंतही कवितेत व्यक्त केलेली आहे.

**संदर्भ :**

१) स्वाती शिंदे – पवार ; वेदनेच्या खोल तळाशी ; प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे.
२) डॉ. ढेरे अरूणा ; स्त्री लिखीत मराठी कविता (1950 ते 2010).
३) डॉ.मंदा खांडगे, डॉ निलिमा गुंडी, डॉ ज्योत्स्ना आफळे ; स्त्री साहित्याचा मागोवा.
४) www.google.com

***

# नितळ मनाची निर्मळ अभिव्यक्ती : ‘काव्यवर्षा’

**प्रा. डॉ. अनिल व्यंकटराव मुंढे**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, ता.अहमदपूर जि. लातूर

‘कविता’ हा साहित्यप्रकार जगातील सर्व भाषांमध्ये लोकप्रिय आहे. ज्या भाषेत कविता नाही, अशी भाषाच या जगामध्ये अस्तित्वात नाही. निसर्गाने मानवाला शरीर दिले, त्या शरीराची रचनाच अशी आहे की, त्याच्या मध्यभागी माणसाचे मन असते. कवी त्याला काळीज, अंतःकरण, हृदय, दिल, हार्ट अशा विविध नावांनी ओळखतात.

माणसाच्या डोक्यात विचार असतात, तर मनात भावनांचा कल्लोळ असतो. अशाच भावनांचा समुद्र जेव्हा उधाणून येतो तेव्हाच कवितेचा जन्म होतो. म्हणूनच ‘जी काळजातून येते आणि काळजाला भिडते ती कविता’ अशी कवितेची एक व्याख्या केली जाते. कविता लिहावी म्हटली तर लिहिता येत नाही आणि आवरावी म्हटली तर आवरता आवरत नाही, हेच खरे आहे. म्हणूनच संत तुकारामांनी **‘अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। आवरीता परी आवरेना’**।। असे प्रतिपादन केले आहे. खरी कविता ही अशीच अंत:करणातून सहजस्फूर्त येत असते. आमच्या विद्यार्थिनी कवयित्री वर्षा माळी- लगडे यांची कविता ही अशीच काळजातून येते आणि थेट काळजाला भिडते. ‘काव्यवर्षा’ या त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहातून प्रकट झालेली कविता मराठी कवितेला समृद्ध करणारी आहे हे निःसंशय खरे आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त २०२३ साली प्रकाशित झालेल्या ‘काव्यवर्षा’ या संग्रहात एकूण ५३ कविता

आहेत. या सर्व कवितांतून मानवी मनाचा नितळ भाव प्रकट झालेला आहे. या संग्रहातील पहिल्याच कवितेत त्या लिहितात-

**“भगवंत कृपा असावया लागे भक्तिरस निर्मळ**
**भव सागर पार करावया**
**नित्य मार्ग हा क्रमवार सरळ”**

कवयित्री वर्षा माळी- लगडे यांची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर प्रगाढ निष्ठा आहे. त्यांच्या विचाराचा वसा आणि वारसा त्या सातत्याने विविध उपक्रमांच्या व्याख्यानांच्या माध्यमातून राबवत असतात. त्यांचा ईश्वर हा निर्मिक स्वरूपात प्रकटतो. याच कवितेत त्यापुढे लिहितात-

**“दया, क्षमा, समानता**
**असे देवत्वाचे गमक**
**जाणावी गोष्ट ही एक**
**जाणावा असा तो निर्मिक”**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्माचे नवनिर्माण केले आणि आपल्या ईश्वराला निर्मिक हे नाव दिले. हीच सत्यशोधकी विचारांची परंपरा वर्षा माळी पुढे चालवत आहेत. आपल्या पवित्र श्रद्धास्थानाबद्दल त्या म्हणतात-

**“सावित्रीबाईंचा गौरव किती आपण करावा**
**दरवळतो कार्यगंध**
**जसा मोगरा फुलावा**
**मुलींना देण्या शिक्षण सावित्रीबाई सरसावल्या केले तन- मन- धन**
**अर्पण जराही नाही त्या घाबरल्या**
**ज्ञानमंदिरे वाढत गेली**
**ज्ञानकण घेत होत्या मुली ज्ञान कक्षा रुंदावत गेल्या सावित्रीबाई यशवंत झाल्या”**

कवयित्री वर्षा माळी – लगडे यांची कविता ही वाचकांशी थेट संवाद साधते. ही कविता पार आतून आलेली असल्यामुळे वाचकांच्या मनात शिरते. ही कविता मनोरंजनासाठी नाही तर समाज प्रबोधनासाठी लिहिलेली कविता आहे. या काव्यसंग्रहात विविध विषयांच्या अनुषंगाने कविता आहेत. प्रेम, विरह, संसार, जीवनातील समस्या या तर आहेतच; त्याचबरोबर समाजात पसरलेल्या अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, देव – दैववाद पाहून कवयित्रीचे मन बेचैन होते. भारतात अनेक महामानव होऊन गेले, ज्यांनी आपल्या जीवाची बाजी या समाजाच्या भल्यासाठी लावली. प्रसंगी प्राणही अर्पण केले. मात्र भारतीय समाज जो पुढे जायला हवा होता तो

**"बसवण्णा तुमच्या अनुभव मंडपात**
**स्त्रियांना होता शास्त्र चर्चेचा मान**
**तुमच्या लिंगायत धर्म स्थापनेने**
**उच्च नीच झाले समान"**
**'शिवराय तुमच्या स्वराज्यात प्रजा होती विश्वस्त मावळयांच्या शौर्याने**
**गनिमाचा विजय दुरापास्त'**
**'ज्योतिराव तुमच्या ज्ञानाने सर्वांना मिळाले शिक्षण अस्पृश्यांचाही**
**झाला उद्धार झाले सशक्त राष्ट्र निर्माण'**
**'बाबासाहेब तुमच्या घटनेने स्त्री सन्मानाने जगतेय आज समाजातील**
**प्रत्येक घटकास मिळाला मुक्ततेचा आवाज"**

महामानवांच्या कृपाशीर्वादाने सर्व काही ठीक होईल असे वाटले होते; परंतु झाले मात्र उलटेच. महामानवांच्या कार्याचा समाजाला विसर पडला आणि प्रस्थापितांचाच विजय झाला. हे दुखरे वास्तव कवयत्री वर्षा माळी यांनी आपल्या कवितेतून रोखठोकपणे मांडले आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांना कमी लेखण्याची परंपरा दीर्घकाळ राहिली आहे. परंतु याच भारतीय स्त्रीने देशाचे नाव

जगतावर करून राहील असे महतकार्य केलेले आहे. या देशात मा जिजाऊ साहेब आणि सावित्रीबाई फुले यांच्या आदर्श मुळे भारतीय समाजात स्त्रियांना एक आधाराचं आणि मानाचा स्थान प्राप्त झालेला आहे याबाबत 'भारतीय स्त्री' या कवितेतून कवित्री म्हणते,

**'जिजाबाईंनी शिकवला**
**अन्यायाचा प्रतिकार**
**सावित्रीबाईंनी घेतला**
**आदर्श नारीचा आकार'**

भारताच्या इतिहासात आजपर्यंत ज्या शूरवीर स्त्रियां होऊन गेल्या त्यांच्या कार्याचा सर्व पट त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून उलगडून दाखवलेला आहे. या संपूर्ण स्त्रियांचा आदर्श समाजाला पुढच्या पिढीला अतिशय मार्गदर्शक ठरणार आहे. म्हणून त्यांचे ज्वलंत कार्य कवयित्रीने आपल्या 'भारतीय स्त्री' या कवितेतून सर्वांच्या समोर त्या महान कर्तृत्ववान शूरवीर महिलांचा आदर्श उभा करून दाखवलेला आहे.

प्रत्येकाला आपली आई प्रिय असते खरे तर आपण ती आई असेपर्यंत तिच्यासमोर नैतिक भान ठेवून वागायला पाहिजे तिच्या उतार वयात तिची प्रचंड काळजी घ्यायला पाहिजे तिची कुठेही अवहेलना होणार नाही याची काळजी घ्यायला पाहिजे. आपल्या आयुष्यात विश्रांतीचा खरा ठाव आपली आई असते. जेव्हा तीच आहे या जगातून नाही शिवते तेव्हा मात्र आपल्याला नेहमी काहीतरी हरवल्याची सतत जाणीव होते आपल्या आईची आठवण पदोपदी माणसाला येते. याविषयी 'मातृवात्सल्य' या कवितेतून कवयित्रीने आपल्या आईच्या जाणे विषयी हळहळ तर व्यक्त केली आहेत परंतु आपल्या जीवनात तिचे किती अद्वितीय स्थान आहे याचे महत्त्व पटवून सांगितले आहे. आपली आई आपल्यावर जे प्रेम करते त्याची मोजतात कुणीही करू शकत नाही तिचे प्रेम समजण्यासाठी आपण कितीही मन

मोठे केले तरीही ते तोकडेच पडणारे आहे इतकं ती स्वतःचा विचार न करता आपल्या मुलांवर, कुटुंबावर जीव लावते याबाबत कवयित्री म्हणते,

**'मनाला समजत नाही कोडे**
**आम्हाला किती गं दिलेस प्रेम वेडे**
**स्वतःचा विचारही न करशी गडे**
**तुझे प्रेम कळण्या सर्वांग तोकडे'**

आजच्या स्वार्थी दुनियेत माणूस स्वतःच्याच मोहमायेत गुरफटला आहे. त्याला इतरांविषयी काही देणे घेणे राहिले नाही. त्यामुळे सज्जनपणाने विचार करणाऱ्या माणसाचा इथे अक्षरशः जीव गुदमरतो आहे.

**निर्दयी या जगात**
**गुदमरते आहे मन**
**तुझ्या मायेच्या आठवणीत**
**जगते आहे जीवन'**

अशा प्रकारची भावना व्यक्त करून कवयित्रीने एक प्रकारे समाजाला नैतिकतेची जाण करून दिली आहे.

माणसाला स्वच्छंदीपणाने जीवन जगण्यासाठी आणि रोजच्या कटकटीतून, तणावातून मुक्त जीवन जगण्यासाठी मैत्री असणे फार महत्त्वाचे आहे. कारण या नात्यात कुठलाही दुरावा राहत नाही एकमेकांविषयी निखळ भावना जोपासली जाते. मैत्रीच्या नात्यात भावना मनमोकळेपणाने व्यक्त करता येतात मनाच्या खोल गाभाऱ्यात दाटून आलेल्या भावनांचा निचरा करणार नातं म्हणजे मैत्री असते या मैत्री भावा विषयी 'मैत्री अशी असावी' या कवितेतून कवयित्रीने खूप छान संदेश दिला आहे.

**'जीवनाच्या मार्गावर**
**परस्परांना सावरावे**

**एक असेल दुःखी तर**
**त्याला दुसऱ्याने आवरावे'**

मैत्रीच्या निखळनात्यातील गोडवा किती सहज सुंदर शब्दात कवयित्रीने मांडून मानवी जीवनात परस्परांना समजून घेणे किती फार महत्त्वाचे आहे कारण आज या धावपळीच्या जगात माणूस प्रचंड ताण-तणावात अडकलेला आहे त्याला स्वतःचे खाजगी असे जीवन शिल्लकच राहिलेली नाही म्हणून जीवनात मैत्री असणे फार महत्त्वाचे आहे अनेकदा माणसावर काही बिकट प्रसंग येतात अशा वेळेला त्याला साथ देणारा वाईट परिस्थितीत चांगलं मार्ग दाखवणारा आई-वडीनंतर मित्रच असतो कारण तोच खरा सन्मार्ग दाखवतो याबाबत कवयित्री म्हणते,

**अतिशय बिकट प्रसंगीही**
**परस्परांना द्यावी साथ**
**एक जण चुकला तर त्याला**
**दुसऱ्याने द्यावा सन्मार्गाचा हात'**

वर्षा माळी यांनी आपल्या 'काव्यवर्षा' या काव्यसंग्रहातून एकापेक्षा एक सरस अशा आदर्शवादी कविता लिहून समाजाला माणुसकीचा मानवतेचा संदेश दिला आहे. खऱ्या अर्थाने महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आदर्श हा त्यांच्या तनमनात भिनला आहे. समाजाला आदर्श बनवण्यासाठी त्यांची चाललेली धडपड लाख मोलाचे आहे. या कवितांशिवाय त्यांनी समाजातले वेगवेगळे दिनविशेष, त्यांच्या जीवन प्रसंगातील अनेक अनुभव, आठवणी शैक्षणिक, जीवनातील काही प्रसंग आणि कुटुंब जीवनाच्या पातळीवरील घडलेल्या घटना घडामोडींचा विचार करताना अतिशय शांत संयमी मनाने त्यांनी जीवनाचा अर्थ कसा समजून घेतला आहे व कसा समजून देत आहे हे त्यांच्या अनेक कवितेतून अनुभवायला मिळते. स्वतःवर ओढवलेल्या दुःखाला सतत

उगाळत न बसता आपले दुःख बाजूला ठेवून समाजासाठी, समाजातल्या दुर्लक्षित वंचित, शोषित या घटकांबरोबरच महात्मा फुले यांच्या सत्य धर्मावर आधारित मूलगामी विचार घेऊन त्या पुढे निघाल्या आहेत व तो मार्ग आजच्या समाज जीवनाला किती अनुकूल आहे हे त्यांच्या कवितेतल्या भावनिक आव्हानावरून आपल्या लक्षात येते.

एकूणच वर्षा माळी लगडे यांचा काव्य वर्षा हा कवितासंग्रह त्यांच्या जीवन अनुभवातून साकारलेला व मनाच्या अंतर्मनातील तळठाव घेणारा अत्यंत वाचनीय असा काव्यसंग्रह आहे. हा काव्यसंग्रह समजून घेतल्यास नैतिकतेची शिकवण सहजतया मानवी मनात भिनताना दिसून येते. या काव्यसंग्रहातील सर्वच कविता वाचनीय व आकलनीय आहेत. प्रत्येक कवितेतून त्यांनी मांडलेल्या भावना व विचार एक दृष्टिकोन देणाऱ्या आहेत. या काव्यसंग्रहाला साहित्यिक, समीक्षक प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी दिलेली प्रस्तावना अभ्यासपूर्ण असून या काव्यसंग्रहाला न्याय देणारी आहे. तर डॉ. मारोती कसाब यांनी केलेली पाठराखण कवयित्रीला नवी उर्मी देणारी व काव्य लेखनाला प्रेरणादायी ठरणारी आहे.

**संदर्भ:**

१. लगडे – माळी वर्षा वसंतराव, ‘ काव्यवर्षा ‘ गुरु माउली प्रकाशन, उदगीर, प्रथमावृत्ती, जानेवारी २०२३.

***

# साठोत्तरी मराठी साहित्याने समाजाला काय दिले ?

**नेहा रतन बनसोडे**
सहायक प्राध्यापक, ए.ई.व्ही.पी. एम.महिला महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रास्ताविक :**

प्रस्थापित मराठी साहित्य हे गुळगुळीत होते. काल्पनिकता हे साहित्याचे सूत्र होते. मराठी साठोत्तरी साहित्यामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य या मुख्य साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याला एक ओळख निर्माण करून दिली. काल्पनिकतेची नाळ सोडून वास्तविकेतचे भान या चारही साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याला दिले. मराठी साहित्यातील साचलेपण नष्ट करून वास्तव जीवन जाणिवा अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य या साहित्य प्रवाहाने दिले. प्रस्थापित साहित्याची चौकट मोडून या साहित्य प्रवाहांनी साठोत्तरी मराठी साहित्याची कक्षा वृदिंधगत केली. विसाव्या शतकाच्या पार्श्वभूमीवर १९६० हा टप्पा लक्षणीय असा आहे. सामान्य माणसांच्या तसेच शोषित-पीडितांच्या अनुभवापासून मराठी साहित्यापासून दूर राहिलेला अस्सल दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी जीवनानुभवांना स्थान या प्रवाहामुळे मिळाले त्यामुळे साठोत्तरी वाङ् मय प्रवाह वगळून मराठी साहित्याला पुढे जाताच येत नाही. दलित साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला सामाजिक क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार दिला. समता, स्वातंत्र्य, बंधुता ही त्रिसूत्री दिली, वंशी, वर्ण व जातिश्रेष्ठत्वाला कडाडून विरोध करून मानवमुक्तीचा संदेश दिला. दलित जाणिवेचे संवेदनशीतेचे, मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे माणसाचे मोठेपण मांडणारे

तत्त्वज्ञान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. वेदना, विद्रोह आणि नकार ही त्रिसूत्री दलित साहित्याने दिली. दलित साहित्य हे जीवनवादी साहित्य आहे, वास्तविक जीवनाचे तत्त्वज्ञान दलित साहित्य मांडते. माणसामध्ये आत्मभान जागे करण्याचे कार्य दलित साहित्याने केले.

दलित साहित्यात कविता, कथा, कादंबरी नाटक याबरोबरच आत्मकथने विपुल प्रमाणात लिहिली गेली. दलित आत्मकथानांनी एकूणच मराठी साहित्य समाजाला भाषिक सौंदर्याचे वैभव प्राप्त करून दिले. प्रत्येक दलित आत्मकथन त्या-त्या समाजाची बोलीभाषा घेऊन प्रकटलेले आहे. या दलित साहित्याने बोली, वाक्प्रचार, म्हणी, शिव्या लोकगीते, प्रतिमा, प्रतिके यांच्या माध्यमातून मराठी साहित्याचे भाषिक भंडार समृद्ध केले. तसेच अनुभव विश्वाचे नवे शब्द वैभव मराठी साहित्यात आले. माणूस म्हणून आम्हालाही जगण्याचा हक्क आहे हे दलित साहित्याने अधोरेखित केले. तसेच दलित साहित्याने अधोरेखित केले. तसेच दलित साहित्य हे सामाजिक बांधिलकी असलेले मानवतावादी साहित्य आहे. परिवर्तनाचा पुरस्कार करणारे विज्ञाननिष्ठ साहित्य आहे. भुकेचे महात्म्य वर्णन दलित साहित्याने केले. म्हणून दलित साहित्य हे साठोत्तरी मराठी साहित्यातील महत्त्वाचा व लक्षणीय असा टप्पा आहे.

साठोत्तरी मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्य हा ही महत्वाचा प्रवाह आहे. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्य समाजाला, प्रादेशिकतेचे व ग्रामीण बोलीभाषेचे आविष्करण दिले, दुष्काळी खेड्यांची वाताहात नैसर्गिक आपत्ती, शोषित मानवी मनातील ताणतणावाचे चित्रण, खेड्यातील माणसे आणि त्यांचा शेतीचा असणारा अतुट संबंध निसर्गावर पशुधनावर भरभरून असणारे त्यांचे प्रेम, ग्रामीण माणसाचे त्यांच्या काळया आईवरील, पिकांवरील,

झाडांवरील असणारा घनिष्ठ जिव्हाळा यांची ओळख व जाणीव ग्रामीण साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला करून दिली.

आपण वाचतो ते प्रस्थापित मराठी साहित्याने अस्सल जीवनाचे चित्रण करीत नाही. खरे तर ग्रामीण साहित्याचा आपलेपणा "ग्रामीणतेच्या जाणिवेमध्ये आहे. कृषी व्यवसाय ग्रामीणतेत समाविष्ट होतो. शेतकरी, शेतमजुर बलुते-आलुते यांचे परस्परसंबंध शेतीमुळे परस्परांशी घट्ट असते. यांत्रिकीरणाच्या रेट्यामुळे जुनी गावगाडा पद्धती मोडकळीस आली आहे. पण ती संपूर्ण नष्ट झाली नाही. निसर्गाशी सहाकार्य, निसर्गाचे सहकार्य, अशा मैत्रीच्या संबंधाप्रमाणेच विरोधाचे ही संबंध असतात. अनावृष्टी, गारपीट पिकांवरील अनावर कीड यासारख्या निसर्ग कोपाला ग्रामीण माणसे धैर्याने तोंड देतात. निसर्ग आणि ग्रामीण माणासांच्या या संबंधाचा शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

ग्रामीण साहित्याने मराठी साहित्य समाजाला कृषिनिष्ठ संस्कृतीचा, रूढी, परंपरा सण-उत्सव याचा आविष्कार दिला. तसेच ग्रामीण समाजाची धोरण निवडणुकीचे राजकारण, गावगाडा, गावगाड्यातील स्त्री-चित्रण, समग्र ग्रामीण समाजवास्तवता आणि ग्रामीण तेथील भाषेचे शब्द वैभव प्राप्त करून दिले.

साठोत्तरी मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. एकोणिसाव्या शतकात पितृसत्ताक पद्धतीच्या बंदिस्तपणामुळे सर्जनशीलता ही फक्त पुरूषांचीच मक्तेदारी होती. स्त्रियांना साक्षर होण्याची तसेच मुखातून ब्र काढण्याची मुभा नव्हती साहित्यनिर्मिती स्त्री सर्जनशीलतेतून येते आणि सर्जनशीलता ही स्त्री-पुरूषभेद मानत नाही. १९६० नंतर विविध साहित्यप्रवाहांची निर्मिती झाली. त्यामध्ये स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा नवा वाङ्मयीन प्रवाह उदयास आला. आजपर्यंत जे स्त्रीसाहित्य अंधारात उदयास आला. आजपर्यंत जे स्त्रीसाहित्य अंधारात चाचपडत होते. ते साहित्य व

स्त्रीजीवन जाणीवत प्रकाशात आणण्याचे काम स्त्रीवादी साहित्याने केले एलेन शो वॉल्टर यांनी प्रथम स्त्रीवादी साहित्याशास्त्राची रूपरेषा मांडलेली दिसते. व्हार्जिनिया वुल्फ चे "अश् रूम्स ऑफ वन्स झोन" हे पुस्तक म्हणजे स्त्री निष्ठ समीक्षेचा प्रारंभ बिंदू मानला जातो. मराठी स्त्रीवादी साहित्यात ताराबाई शिंदे यांच स्त्री-पुरूष समानता हे ही पुस्तक खूप महत्वाच आहे.

रांधा, वाढा, उष्टी काढा या उक्तीला छेद देऊन स्वअस्तित्व निर्माण करण्याची धमक स्त्रीवादी साहित्यानी दिली. वसंत आबाजी डहाके लिहितात, "ज्यात स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण आहे ते साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय" स्त्रियांचे स्वत: संबंधीचे साहित्य ज्यातून शोध घेतला आणि जे "स्व" त्वाच्या जाणिवेने लिहिलेले आहे असे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य"

स्त्रीवादी साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला प्रस्थापित समाजरचनेच्या विरोधात उभे राहून स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या हक्काकांची पुर्नस्थापना दिली. पुरूषाच्या विरोधात उभे न राहता पितृसत्ताक पद्धतीला विरोध व स्त्री-पुरूष समता, स्त्री स्वातंत्र्य या उदारमतवादी विचारांची मांडणी, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक, बौद्धिक स्त्रीयांचे शोषण याची जाणीव व या व्यवस्थेविरोधात बंड करण्याच्या उद्देशाने सुरू झाली स्त्री मुक्ती चळवळ, स्त्रीयांची घुसमट, स्त्री-प्रश्नाची मांडणी याची जाणीवा व भान साठोत्तरी मराठी साहित्य समालाला दिले.

आदिवासी साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्याला दुर्लक्षित असलेल्या आदिवासी साहित्याची नव्याने ओळख करून दिली. त्याचबरोबर भाषा समाज, मानववंश, मानसशास्त्र, लोककथा, लोकगीते इतिहास याचा वारसा याचीही ओळख करून दिली. आदिवासी लोकसाहित्य हे ख-या अर्थाने साहित्याचे मूळ आहे. त्याचा कर्ता अनामिक आहे. आदिवासींच्या लोककथा, लोकगीते,

देवदेवतांच्या, प्राण्यांच्या उत्पत्ती कथा आणि मरणाच्या कथा, यातुप्रधानता, बोलण्याच्या पद्धती, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे हा आदिवासी साहित्याचा आद्यप्रकार आहे. त्याचा उगम कोठे, केव्हा कसा झाला, त्याचा कर्ता कोण हे कुणालाही सांगता आले नाही तरी आदिवासी अनादी काळापासून या साहित्यावर जगला आहे. अनादी काळाचे मौखिक साहित्याचे आविष्करण आदिवासी साहित्याने मराठी साहित्य समाजाला दिले. प्रस्थापित व्यवस्थेने आपल्याला डावलेले आहे याची चीड आणि नकार आदिवासी साहित्यात प्रकटलेला आहे. आदिवासी जीवनातील अटळ संघर्षाचे चित्रण ही आदिवासी साहित्याने मराठी साहित्य समाजाला दिले, तसेच शेकडो वर्षे जंगल पहाडात जीवन जगत असतांना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्य जोपाणा-या मानव समुहाची ओळखही दिली.

**समारोप**

एकूणच साठोत्तरी मराठी साहित्या मध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य या चारही साहित्य प्रवाहाने, वास्तविक जीवन जाणीव, गावगाड्यातील जगणे, स्त्रीयांचया मनातील हुंकार, निसर्गाशी असणारे अतुट संबंध, तसेच बोलीभाषा, लोकभाषा, संस्कृती, स्त्रीयांचे "स्व" स्वतंत्र्य, शब्दवैभ, मौखिक साहित्य आणि बोलीभाषेचे भंडार हे सगळे वैभव प्राप्त करून देऊन साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला समृद्ध केले.

**निष्कर्ष :**

१) दलित साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला वास्तविकतेचे भान, भार्षिक सौंदर्य, भूकेचे चित्रण याचे वैभव प्राप्त करून दिले.

२) ग्रामीण साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्याला कृषिनिष्ठ जीवन जाणिवा, शेती निसर्ग, गावगाडा ऋतुचक्र, खेड्यातील राजकारण,

पीकपाणी, होरपळून निघणारे ग्रामीण जीवन याची जाणीव करून दिली.

३) स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्य समाजाला स्त्री म्हणून स्वतंत्र्य जगण्याचा हक्क, स्त्री -पुरूष समानता, स्त्री मुक्ती चळवळ, स्वत:च्या अनुभवाकडे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पाहण्याची दिशा दिली.

४) आदिवासी साहित्याने साठोत्तरी मराठी साहित्य समाजाला, आदिवासी समाजाची संस्कृती, मातृ-सत्ताक पद्धती, निसर्गाशी एकरूपता, सहकार्याची भावना, मानवी मूल्याचे, मानव संस्कृती अनोखे दर्शन घडवून दिले.

**संदर्भ सूची**


१) शरणकुमार लिंबाळे : साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे

२) सदा क-हाडे : दलित साहित्याच्या निमित्ताने, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद

३) वासुदेव मुलाटे : दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

४) चंद्रकुमार नलगे : ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर

५) सुमती लांडे (संपा) : स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर

६) डॉ. विनायक तुमराम : आदिवासी साहित्य, स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर श्रीरामपूर.


***

# 'मृत्यू जगलेला माणूस' एक अद्‌भुत जीवनानुभव

## अंगद श्रीपती भुरे

दयानंद कला महाविद्यालय लातूर

आधुनिक युग हे धावपळीचे युग म्हणून ओळखले जाते.त्यामुळे माणसाला माणसासाठी वेळ मिळत नाही. अशा स्थितीमुळेच माणुसकीचे, जिव्हाळयाचे नाते दुरावले जात आहेत. भारतीय समाज व्यवस्थेत पितृसत्ताककुटुंब पद्धती आहे. त्यामुळे घरातील वरिष्ठ व्यक्तीचा दरारा कुटुंबावर अधिक असल्याचा दिसून येतो. सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, वैचारिक, मी पणा, श्रेष्ठ-कनिष्ठपणा, वर्चस्व अशा अनेक कारणांमधून संयुक्त कुटुंब पद्धतीचा लोप होऊन विभक्त कुटुंब पद्धती निर्माण होऊन नातेसंबंध, आप्त संबंध आणि जिव्हाळयाचा 'गोतावळा'दिवसेंदिवसनष्टहोतोकीकाययाचीभीतीनिर्माणझालीआहे.
आई, वडील, मुले, मित्रपरिवार हे नावापुरते राहिलेले आहेत कारण व्यक्तीमधला मी पणा, स्वार्थीपणा, माझे आयुष्य मी कसे जगावे, मी दुसऱ्यासोबत कसं वागलं पाहिजे, मी माझाच विचार करावा, माझ्याच मतानुसार इतरांनी वागावं अशी स्वार्थी विचार प्रवृत्ती व्यक्ती व्यक्तीत निर्माण झाली आहे. त्यामुळे व्यक्ती हीव्यक्ती पासून दुरावला जात आहे. आपली जबाबदारी, आपले कर्तव्य विसरून फक्त आपल्या स्वार्थीहिताचा व्यक्ती विचार करतो आहे. त्यामुळे रक्ताचे नाते असले तरी ते औपचारिक स्वरूपाचे बनले आहेत.

मानवाला भेडसावणारी आरोग्याची समस्या व मानसिक, शारीरिक व्याधीपासून मुक्तता मिळवण्याची मानसिक इच्छा ही व्यक्तीलामिळालेले सुंदर जीवन नकोशे करून टाकणारे झाले आहे.

विविध शारीरिक, मानसिक आजार व त्यातून वृद्धावस्थेत होणाऱ्या हालअपेष्टायाला कंटाळून मानव इच्छामरणाची अपेक्षा करत असतो. त्याही पुढे जाऊन असाह्यतेमुळे आत्महत्या करण्यापर्यंत तो विचार करतो आहे. याला कारणीभूत कोण? तर तो स्वतः माणूसच आहे! मी पणा स्वार्थी भावना, लोभ, राग, द्वेष अशा विविध कुविचारात गुरफटून स्वतःचे आयुष्य जगण्याचीवृत्ती मानवाची बनली आहे. आयुष्य हे खूप सुंदर आहे ते दुसऱ्यासाठी जगलं पाहिजे तेव्हाच आयुष्याचा खरा आनंद मिळतो हे निसर्गातल्या प्रत्येक घटनेतून शिकायला मिळते.

आयुष्याच्या शेवटच्या अवस्थेत वृद्धावस्थेत प्रत्येक व्यक्तीला मोक्ष, मुक्ती मिळावी असेचवाटते. जर्जर अवस्थेत इच्छा मरनाची मनात इच्छा निर्माण होते. जैन धर्मात इच्छामरणाला 'संथारा' म्हणतात. यासाठी व्यक्तीला आयुष्याच्याशेवटी क्षमाशील होणं आणि लोभ, द्वेष सोडून सर्व इच्छातून मुक्त होणे आवश्यक असते. यासाठी व्यक्तीने आनंदाने निस्वार्थपणे जीवन जगले पाहिजे. मी पणा, हट्टीस्वभाव, वर्चस्व गाजवणे, दुसऱ्याचे मत न ऐकणे, आपलेच सर्वकाहीयोग्य म्हणणे अशा स्वभावातून एकटेपणानिर्माणहोऊन आयुष्य जगलेल्या व शेवटी सत्तराव्या वर्षी वृद्धावस्थेत आयुष्याच्या प्रेमात पडून जगाव वाटणाऱ्या व्यक्तीची कहाणी म्हणजेच 'मृत्यू जगलेला माणूस'.

'मृत्यू जगलेला माणूस' ही १६७ पृष्ठ संख्या असलेली, परंतु मानवी जीवनाच्या संपूर्ण आयुष्याचा, सार्थक जीवनानुभवाचा आलेख चित्रित करणारीवेधघेणारी कादंबरी आहे. 'मृत्यू जगलेला माणूस' ही कादंबरी रेखा बैजल यांची असून रेखाबैजल या एक स्त्री लेखिका आहेत. अनेक प्रकारचे साहित्य लेखन त्यांनी केले आहे. ज्यामध्ये कथासंग्रह, नाटक, कादंबरी, एकांकिका, विज्ञान कथासंग्रह, चित्रपट कथा, ललित लेखन इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण लेखनाचा उल्लेख करावा लागेल. त्यांची साहित्य संपदा ही मानवी जीवनाला एक नव दिशा प्राप्त करून देणारी

आहे. 'मानस', 'तपस्या', 'विज्ञान कथा', 'आदीम', 'स्वप्नस्थ', 'स्पंदन', 'पक्षी जाय दिगंतरा', 'निसटलेले किनारे', 'अशब्द', 'दुष्काळ',' शिवार',ज्ञातापलीकडले इत्यादी कथासंग्रह त्यांचे आहेत. तर, 'अज्ञेय', 'जलपर्व', 'तृप्ता', 'देवव्रत', 'प्रलयंकार', 'प्रस्थान', 'मृत्यू जगलेला माणूस', 'युगावर्त' या कादंबऱ्या आहेत. त्याचबरोबर रेखा बैजल यांनी नाटकाचेही लेखन केले आहे. ज्यामध्ये 'भिंत काचेची', 'आकाश ओढ', एकांकिका मध्ये 'आदिम', 'मम्मी रोबो' इत्यादी. रेखा बैजल यांच्या विज्ञान कथांमध्ये 'किडनॅपिंग' व 'क्लोन', तर 'स्वतःहून उगवताना' हा कवितासंग्रह त्यांचा प्रसिद्ध आहे. 'अब तो जिया जाएँ', हा हिंदी कवितासंग्रह.तर'प्रकाशाची फुले' ही बालसाहित्य कादंबरी आहे, 'कांटा रुते कुणाला' - चित्रपट कथा, 'नक्षत्र', 'प्रकाश शलाका' हे ललित गद्य. असे वैशिष्ट्यपूर्ण साहित्य लेखन रेखा बैजल यांनी केले आहे.

रेखा बैजल यांनी मानवी जीवन हे किती सुंदर आहे,ते कसे जगले पाहिजे हे 'मृत्यू जगलेला माणूस' या कादंबरीतून वास्तरूपाने चित्रित केले आहे. आयुष्यभर आपल्याच हट्टीपणा, मीपणातून जगत आलेल्या अप्पाया व्यक्तीचित्रणातून स्वतःमध्ये एकटेपणा निर्माण करून वृद्धावस्थेत आपल्याला कोणीही जिव्हाळयाने बोलत नाहीत या स्वभावातून इच्छामरण 'प्रायोपवेशण' करण्यासाठी तयार झालेल्या आप्पांना ७० व्या वर्षी पुन्हा नव्याने कशी आयुष्य जगण्याची इच्छा निर्माण होते, हे परिवर्तन कसे घडले, याचे वास्तव दर्शन या कादंबरीतून घडविले आहे. एकूणच या कादंबरीत अप्पा विनायकराव देशमुख, त्यांची पत्नी उर्मिलाबाई, मुलगा - सुधांशू, सून - कविता, मुलगा- अनिरुद्ध, सून - मुग्धा, मुलगी - नेहा, जावई - दीपक, अप्पांची पूर्वीची पत्नी - अंजली, मुलगा- तनय किंवा अनिकेत किंवा राहुल. मित्र- अरविंद मुलाटे, त्याची पत्नी विभा, डॉक्टर जाधव, श्राफ साहेब, झोपडपट्टीतला अनाथ बाळू, नातू - नकुल.अप्रत्यक्ष इठाआजी इत्यादी कादंबरीतील व्यक्तिरेखा आहेत. यामध्ये मुख्य केंद्रबिंदू असलेली

व्यक्तिरेखा म्हणजे विनायक अप्पा देशमुख हे आहेत. अप्पांचा हट्टीस्वभाव व मी पणा यामुळे कुटुंबात समन्वय राहिलेले नव्हते.दोन मुलांपैकी एक मुलगा कुटुंबातुनविभक्त झाला होता. आयुष्यभर आपण स्वतःशी, इतरांशीकसे वागलो याचा विचार न करणारे अप्पा उतरत्या वयामध्ये ७० व्या वर्षी आपल्या इच्छामरणासाठी प्रायोववेशन करणार असे बोलून नातेवाईकांना गोंधळात टाकतात.त्यांना जाणीव होतीकी, "वर्षानुवर्षे एक नाणं चलनात असावं आणि हळूहळू त्यांच्यावरचा छाप घासला जाऊन पुसट व्हावा... ते नाणं बाद व्हावं, पण त्याचा खणखणाट मात्र येत राहावा; तसं आपलं झालं आहे, हे त्यांनी ओळखलं होतं. आपल्या दृष्टीनं काहीही असो; पण व्यवहारात आपण आता संपलो आहोत ह्यची जाणीव त्यांना झाली. आपल्या हट्टीस्वभावामुळे त्यांची एक सून कुटुंबातून अलिप्त राहू लागली. मुग्धा व अप्पांचा स्वभाव मिळत नव्हता परंतु, अप्पाचीदुसरी सून कविता मात्र अप्पाच्या स्वभावाला सामोरे जाऊन शांतपणे आयुष्यात जगत होते. वेळोवेळी सुनेचा अपमान करणे, नवीन परिवर्तनानुसार बदललेल्या मुलीला म्हणजे नेहाला रागावणे परंतु अप्पाला सडेतोड उत्तरे देणारी कुटुंबात एकमेव नेहा हीच होती.

अप्पाला कोणताही आजार नसताना अप्पा इच्छामरणाचा निर्णय घेतात, याचे दुःख अप्पाच्या परिवाराला होते. डॉ. जाधव यांनाही अप्पा पटवून सांगतात की," नाती एवढी गढूळ झाली आहेत की, मला असहाय होण्याची कुठलीही रिस्क घ्यायची नाहीये. माझी चिडचिड होते एकेकाला पाहून. आणि खरं तर जगण्यासारखं काही उरलं नाही. आणि एकूण आयुष्यच फारसं म्हणावं तसं गेलं नाही." या विचाराला कारणीभूत अप्पाच आहेत. खरंतर अप्पाने भूतकाळात घडलेल्या घटनांच्या कारणावरून वर्तमानातील नात्यांतदुरावा निर्माणकेला. आपल्या स्वभावात चिडचिड निर्माण करून स्वतःमध्ये एकटेपणा निर्माण केला. व हाच स्वभाव नवीन पिढीतील मुले व

सुनांना न आवडणारा झाला. तरीही अप्पाच्या स्वभावानुसार कविता आपलेआयुष्य जगत राहते. अप्पाच्या इच्छामरणाच्यानिर्णयाची माहिती ही अप्पाची मुलगी नेहाहिला सांगितली जाते. परिवारामध्ये अप्पांचा अधिकजीव मुलीवर होता. परंतु निर्भीड राहणारी, बॉयकट, जीन्स-टॉप, कानात लांब खांद्यापर्यंत येणारी आभूषण, मनगटावर घड्याळ, बालिशपणा असणारी ती होती. असे असले तरीही अप्पांचा जीव तिच्यावर अधिक होता. परंतु नेहाने आंतरजातीय विवाह केला. याचा राग आप्पांना अधिक होता.

अनिरुद्ध, सुधांशू एकत्र येऊन अप्पानेघेतलेल्या निर्णयाच्या विषयावर चर्चा करतात. आपापल्या वपत्नीच्या गप्पा मारून झाल्यावरआईच्या आठवणीने त्यांचे डोळे पानावले जातात."आपण नवरा-बायकोच्या आयडेंटिटी बद्दल बोललो; पण आईनं स्वतःचीही आयडेंटिटी गमावली, पत्नी असूनही पत्नीचा दर्जा, मान अप्पांनी दिला नाही. नावाची पत्नी! शेवटी ती केवळ एक 'आई ' म्हणूनच उरली. आणि जेव्हा आपण मोठे झालो, स्वतंत्र झालो... तेव्हा ती संपली".

नेहाने प्रेमामुळे दीपकशी आंतरजातीय विवाह केला होता. ती अप्पांना लग्नानंतर पहिल्यांदाच भेटते. अप्पालातिचाराग असला तरी, मुलगी व वडील यांच्यातील अतूट नाते पुन्हा एकत्रित जुळलेजाते. पूर्वीची सडेतोड व निर्भीडपणे वागणारी नेहा आता खूप बदललेलीअसते.तिचा शांत स्वभाव, तिची संस्कारमय वेशभूषा पाहून अप्पांबरोबरच सर्व कुटुंबीयांना आश्चर्य वाटते. अशी ही दोन वर्षात परिपूर्ण बदललेली नेहा अप्पांना इच्छामरण घेण्यासाठी मनातीलसर्वविकार संपवण्यास सांगते. कारण इच्छामरण हे निर्विकार गुणांनी घेतले पाहिजे. यासाठी ती आपल्या मॉजी म्हणजे सासुबाईचे उदाहरण सांगते. नेहाच्या विचारात, आचरणात, राहणीमानात जे परिवर्तन झाले आहे ते केवळ मॉजीमुळेच. म्हणून मॉजीच्या विचारांची, जैनधर्मीय विचारांची, तत्त्वज्ञानाची जपणूक नेहाने केली व आपल्यात

बदल घडवला. मॉजीचे विचार बहुमोल आहेत. दुसऱ्या जातीतील सून म्हणून मॉजीला कधी राग आला नाही, ती म्हणते की, " नेहा, जैन धर्मात सहा तत्व सांगितली आहेत. सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय, ब्रह्मचर्य, संन्यास... पण मी स्त्री आहे, एक पत्नी होते. एक आई आहे. स्त्रीजवळ या सहा तत्त्वाखेरीज एक आणखी तत्त्व असतं प्रेम. ते तत्त्व फार गृहीत धरलं जातं, म्हणून दार्शनीकांनी मांडलं नसावं, पण हेच प्रेम हृदयाशी घेऊन तू दीपक सोबत घरात आलीस. आणि मी तर मी जैनधर्मीय आहे. ह्या भावनेचाही अपरिग्रह केलेला. मी का रागावावं तुझ्यावर? माणसातला दुसऱ्यासाठी फार काही करता नाही आलं, तरी प्रेम तर करता येत ना! तेच महत्त्वाचं."

नेहाअप्पांच्या विचारात परिवर्तन घडवून आणते.नेहमी वेगळे, एकटेपणात राहणारे, हट्टी स्वभावाचे अप्पा आपल्यामुलांना व सुनेला एकत्रित बोलावून सर्वजणएकत्रितपणेजेवण करतात. निसर्गाच्या सानिध्यात ध्यान, योग करून मन परिवर्तन करतात.परंतु जुन्या आठवणीने अपराधीमान मनबाहेर पडतनाही. म्हणून ते आपल्या मित्राला अरविंदला व प्रेम केलेल्या पहिल्या पत्नीला अंजलीला भेटून क्षमा मागण्यासाठी घराबाहेर पडतात. पूर्व आयुष्यात आलेली अंजली ही दुसरे लग्न न करता अप्पांच्या मुलाला आधार म्हणून आपले आयुष्य जगते. मुलाला कलेक्टर करते. वडील अपघातात गेले म्हणून वडिलांच्या प्रेमापासून आपल्या मुलाला अलिप्त ठेवते. अप्पाबदल तिच्या मनात कसलाही राग अथवाद्वेषराहत नाही. जिवलग असलेला मित्र अरविंद हे अप्पांना गुरुवर्य म्हणून ओळखतो. आपला जिवलग मित्र गैरव्यवहार करतो आणि त्यात आपली फसवणूक झाली हे अरविंदला कळाले होते आणि त्याची क्षमा मागण्यासाठी अप्पा अरविंदच्या घरीजातात.अरविंद ला भेटतात. अरविंदचा निरपराधपणा आणि प्रामाणिकपणा त्याच्याबॉसला भावला जातोवते अरविंदचे सासरे होतात. हा बद्दल सांगताना अरविंद म्हणतो की, "विनायक,

माणसाच्या दोनच जाती असतात. प्रामाणिक आणि अप्रमानिक. आम्ही दोघं एकाच जातीचे होतो. ते हळहळले नकळत गैरसमजाणं अन्याय केला गेला, म्हणाले. पण गुरु...ती घटना आयुष्याचं वळण ठरलं भोळं राहून चालत नाही, हे कळालं. मित्रावरही विश्वास ठेवू नये, हे कळालं. आणि आयुष्यानं असा धोबीपछाड लावला तरी आपण उसळून येत आयुष्यावर मांड बसवावी लागते, हे देखील कळालं. वाईट घटना आणि धोका देणारे लोक आपल्याला खूप काही शिकवून जातात, म्हणून त्यांचं कृतज्ञ असावं, हेही कळालं."

अंजली व अरविंदला केलेल्या विश्वासघाताच्या अपराधातून बाहेर पडण्यासाठी अप्पा पश्चाताप म्हणून इच्छामरण स्वीकारून क्षमा मागतात. परंतु नेहाच्या विचाराने, नेहाच्या सासूच्या विचाराने अप्पाचे मन परिवर्तन होते. आयुष्य पुन्हा नव्याने जगावे असे वाटते. अप्पामध्ये झालेले बदल सर्वांना दिसून येतात. झोपडपट्टीतल्या अनाथ बाळूच्या भेटीने अप्पांना नव्या उमेदीने आयुष्य जगण्याची ऊर्जा मिळते. आपला दुःखाने ग्रासलेला भूतकाळ विसरून अप्पा आपल्या मुलांना झोपडपट्टीतल्या अनाथ बाळूला शिक्षणासाठी मदत करण्यासाठी सांगतात. आपल्या मालमत्तेचे वाटणी पत्र ते आनंदाने करून मनसोक्त आयुष्य जगण्यासाठी हिमालयात जाण्याचा निर्णय घेतात.सर्वांना सुखी राहा, आनंदी राहा म्हणून, येतो मी! म्हणत अप्पांनी पाठ वळवली... क्षणभर थांबून भूतकाळ विसरून अप्पा अनिश्चित वाटेकडे निश्चयानं चालू लागले.

सारांश : '

मृत्यू जगलेला माणूस' या रेखा बैजल यांच्या कादंबरीतून व्यक्तीच्या इच्छा, आकांक्षा व माणुसकी टिकवण्यासाठीचे विचार, तत्त्वज्ञान कसे आहेत. पुरुषप्रधान संस्कृती, पुरुषांचे वर्चस्व, स्त्रीचे अस्तित्व, स्त्रीची पतीसेवा, ममतामयी वात्सल्य, सेवाभाव, मातृत्व, परिस्थितीनुसार बदलण्याची स्त्रीची वृत्ती,मित्रप्रेम, विश्वासयाचे

वास्तव चित्रण कादंबरीतूनसमोर येते. व्यक्तीला आयुष्य जगताना अनेक मार्गातून जावे लागते. अनेक प्रसंग, इच्छा, समस्यांना व्यक्तीला सामोरे जावे लागते. मी पणा,स्वार्थीपणा, वर्चस्व, षडविकार यांचा त्याग करून एक आनंदी जीवन जगण्यासाठी दुसऱ्यांच्या मनाचा विचार करून निर्विकार पणे जगणे हेच खरे आयुष्य असते. व्यक्ती लहान असो किंवा वरिष्ठ असो मानवी मूल्य, तत्वे ही आचरणात आणून आयुष्य जगणे महत्त्वाचे असते. हे 'मृत्यू जगलेला माणूस' या कादंबरीतून सहजपणे लक्षात येते. एकमेकांचे दुःख समजून घेणे वात्सल्यभाव, जिव्हाळा, प्रेमभाव ठेवून माणुसकीचे नाते जपणे हेच खरे आयुष्य आहे याची ओळख हीसाहित्यकृती करून देते.

संदर्भ सूची :

१) रेखा बैजल- मृत्यू जगलेला माणूस, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे. द्वितीयावृत्ती-१५ मार्च २०१७.

२) रेखा बैजल - मृत्यू जगलेला माणूस, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे. पृ. क्र.०९, १८, २५, ३५, ९२

***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्री जीवन

**प्रा. दिप्ती लक्ष्मण निकाळजे**
सहायक प्राध्यापक, ए.ई.व्ही.पी. एम.महिला, महाविद्यालय औरंगाबाद

**प्रस्तावना :**

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. एखाध साहित्य कधीच घडत नाही. अनुभव, वेदना, जाणिवा, संवेदनशीलता असे अनेक धागे एकमेकांमध्ये गुंफुन साहित्य निर्माण होतं. एखाद्या अनुभवाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन असतो, त्याचमुळे त्याचे विविध हुंकार मनात उमटतात आणि हे साहित्य लेखणीतून उतरत जाते.

अभिव्यक्तीला चालना मिळावी यासाठी साहित्याचे अनेक प्रवाह मराठीमध्ये अस्तित्वात आले, ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी महानगरी, कामगार साहित्य इतकेच नाही तर मुस्लिम मराठी साहित्य, ख्रिश्चन मराठी साहित्य असेही प्रहर निर्माण झाले.

वाचकांना १९६० नंतरच्या या प्रवाहामध्ये समाजाचे विविधांशी दर्शन वाचकांना घडले मात्र या प्रवाहांची आजही तेवढीच गरज आहे का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. हा प्रश्न हे प्रवाह निर्माण होत नाही विचारला गेला होता अंधून मधूनही याबद्दल चर्चा होत असते. तरीही अभिकंडचा उडके आणि समाजमाध्यमातून होणारे विचार प्रकटन पाहता आता पुन्हा एकदा याचा वेध घेण्याची गरज आहे.

यामुळे नव्याने विचार ढवळले जातात आणि काही उत्तरे, काही गरजा, काही प्रश्न वेगळ्या अंगाने समोर येऊन त्याचा शोध घेणे सुरू होते. समाजामध्ये माणुसपण हरवत असतांना जातीयवाद, धर्मवाद विविध स्तरांवर वारंवार अधोरेखित होत असतांना

समाजमनाचा आरसा असलेल्या साहित्यामध्ये हे प्रवाह टिकविण्याची किती गरज आहे, याचे उत्तर मिळणे गरजेचे आहे.

**नवसाहित्य म्हणजे काय ?**

१९६० ते २०१० या कालावधीत साहित्य प्रांताचे पिटा कोणत्या प्रकारचे आहे त्याला नवसाहित्य म्हणजे नवकथा, नवकादंबरी असे इतिहासाच्या ओघात म्हटले गेले. ते १९६० च्या आसपास हळूहळू वेगवेगळया वातावरणात जाऊ लागले. होते आणि त्याचे नवजीवन साहित्य प्रवाहात रूपांतर होऊ लागले होते.

**स्त्रीवादी साहित्य :**

"स्त्रियांचे, स्वत:च्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय." स्त्रीवादी साहित्याची वाटचाल समजावून घेतांना प्रथम स्त्रीवाद म्हणजे काय? याची गरज का निर्माण झाली. या बाबींचा विचार करावा लागतो. २१ व्या शतकामध्ये अनेक सामाजिक चळवळी घडून आल्या यामध्ये स्त्रीमुक्ती चळवळीचा वाढता प्रभाव लक्षात येतो. चळवळीच्या अनेक अंगोपांगातील एक महत्वाचे साहित्य अंग म्हणून स्त्रीवादी साहित्याचा विचार करावा लागेल स्त्रियांनी लिहिलेली म्हणून स्त्रियांची पुस्तके स्त्रीवादी ठरत नाहीत. स्त्रियांनी स्त्रियांवर लिहिलेली पुस्तके ही शोषणाला आव्हान देणारे असतातच असे नाही.

अश्विनी धोंगडे म्हणतात, "जाणीव-जागृती हा स्त्री चळवळीचा मुख्य आधार असल्याने अशा खास अनुभवांना अविष्कृत करणारे साहित्य हे स्त्रीवादी साहित्य होय."

कोणताही बदल हा सहजासहजी होत नाही. स्त्रीवाद स्त्री सत्व, अस्मिता या गोष्टी लगेच साध्य होणा-या नाहीत तर त्यासाठी बराच काळ जावा लागणार आहे.

**स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळ:**

"स्त्रीवादी" या संकल्पनेचा उदय व विकास स्त्रियांच्या क्रियाशिल चळळीमधून झालेला दिसतो. पुरूषांनी स्त्रियांकडे अभाववादी दृष्टिकोनातून पहिले तिचे माणूसपण नाकारले, स्त्रीवाद पुरूषी कथाला विरोध करतो. स्त्रीवाद ही संकल्पना थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल अभाव मूलक विचारसरणीला नकार देणे स्त्री ही संपूर्ण मानव असल्याची समजून नष्ट करणे आणि स्त्रीविषयक नवीन मानदंत निर्माण करण्यासाठी व्यहसन करणे ही स्त्रीवादाची थोडक्यात भूमिका आहे.

१९ जुलै (१९४८) साली न्यूयॉर्क जवळ सेनका फॉल हा लहानशा खेड्यात पाच स्त्रिया एकत्र व रलिझविथ कडी स्टॅन्टन हा बत्तीस वर्षाच्या एका स्त्रीने बाजारातील एका ओल्यावर चढून धीटपणे, स्त्रियांनी आपले प्रश्न स्वत:च मांडले पाहिजेत कारण तिचा, समस्येची उंची, खोली रूंदी केवळ तिच समजू शकते. असे प्रतिपादन करून स्त्री आणि पुरूष दोघेही परमेश्वरांची निर्मिती असतील तर त्यांना समान हक्क का नसावेत? असा जाहिर सवाल केला. "स्त्रियांच्या संघटित चळवळीचा हा जागतिल महिला प्रतीकात्मक अविष्कार म्हटला पाहिजे.

असे असले तरी स्त्रीवादी जाणिवांची लिखित अभिव्यक्ती सर्व प्रथम भारतात झाली हे सत्य नाकारता येणार नाही. (१९८२) साली ताराबाई शिंदे भा. म. फुले यांच्या सहवासातील "स्त्री पुरूष तुलना" हा दीर्घ निबंध लिहिला.

थोडक्यात (१९) व्या शतकात मतदानाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या चळवळीत आपणास स्त्रीवादी विचारसरणीच्या आणि चळवळीच्या खुणा सापडतात.

**"आशा बगे यांच्या कादंबरीतील स्त्री दर्शन : चिकित्सक अभ्यास,**

(१९६०) नंतरच्या कालखंडामध्ये कादंब-यांचे युग सुरू झाले प्रत्येक जण आपल्या जीवनानुभव लोकात मांडणे आणि सामाजिक वास्तवतेला जसेच्या तसे समोर भाषणे हे अनेक लेखिकांनी आपल्या साहित्यातून मांडलेले दिसते. मराठी साहित्यात कथा कादंबरी नाटक चरित्र, आत्मचरित्रे प्रवास इ. प्रवाह आहेत. प्रत्येक प्रवाह आपले स्वतंत्र अस्तित्व व महत्त्व टिकवून आहे.

(१९७०) च्या दशकात सातत्याने व दर्जेदार कादंब-या लिहिणा-या आशा बगे या एक आघाडीच्या लेखिका आहेत. या दशकात आधुनिक स्त्रियांची विविध रूपे रेखाटणा-या व स्त्रीजीवन दर्शन घडविणा-या अनेक लेखिका आहेत. त्यात कमल देसाई, निर्मला देशपांडे, गौरी देशपांडे, तारा बनारसे, अंबिका सरकार, कविता महाजन, गीता साने इ. महत्त्वाच्या लेखिका आहेत.

**आशा बगे यांचे कादंबरी लेखन :**

कादंबरी हा आत्मनिष्ठ वाङमयप्रकार आहे. संपूर्ण जीवनाला समजून घेण्याची शक्ती या वाङमय प्रकारात आहे. जीवनाची खोली, जीवनाची उंची जीवनाचा विस्तार व जीवनातील सुक्ष्म चिंतन यासाठी कादंबरी हा वाङमय प्रकार प्रसिद्ध आहे. आशा बगे यांनी मराठी साहित्यात कादंबरी मनस्विनी, झुंबर, त्रिदव्य, सेतू, भूमी भूमिका इ. कादंब-या लिहिल्या.

**आकाश (१९९६) :**

"आकाश" या कादंबरीत नाटकाच्य तालमीत काम करणा-या व्यक्तीची पात्रे आहेत. महेश, अशोक हे मित्र उर्मिला, अंजली या त्यांच्या बायका आहेतही कादंबरी उर्मिला भोवती विणलेली आहे. "सेत" - (२००९) "सेतु" ही कादंबरी अंतर्मुख करणारी आहे. या कादंबरीतील नायिका सुचरिता ही संपूर्ण कादंबरीमध्ये कोठेही आक्रमक बंडखोर भूमिका घेताना दिसत नाही. "सेतू" ही कादंबरीचे कथानक गुंतागुंतीचे तर आहेत पण त्यात रहस्यही आहे. राघवेन्द्रची आई घरातून

निघून गेलेली असते, आणि तिचा नृत्यकलेचा अभ्यास असतो, असा उल्लेख येतो. पण त्याचा विस्तार फारसा नाही. सुचरिता ही बबी मावशीची मुलगी असते हे रहस्य अगदी शेवटी दादाकडून तिला कळते. दादा आणि आई, बबीमाशी यांची नातीही स्पष्ट केलेली आहे.

"सेतू" कादंबरीमध्ये स्त्री-पुरूष नातेसंबंधातील ताणतणाव लेखिकेने फार सुक्ष्मपणे रेखाटले आहेत स्त्रियांच्या व्यथा व दु:खांना समजून घेतानाच पुरूष व्यक्तिरेखाच्या वाट्याला येणरे दु:ख व एकटेपाणाही लेखिकेने समतोलपणे रेखाटलेले आहे. उदा- ब्रिजमोहन या पात्राच्या रूपाने लेखिकेने आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी तरूण मुले, त्यांचे दिशाहीन जगणे हे लेखिकेने "सेतू" कादंबरीतील सुमंगलच्या रूपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

"सेतू" या कादंबरीत माणसांमधील नात्याचा सूक्ष्म वेध घेत लहान-मोठ्या व्यक्तिरेखांचा पट यात मांडलेला आहे. पती-पत्नी, नणंद-भावजय, आई-मुलगा, वडील-मुलगी, मावशी-आजी असे विविध नातेसंबंध मनात जणू घरच करतात जीवनाचे क्षेत्र अमर्याद झाले असतांना कलावंताचे समर्थ्य न प्रकटण्याच्या आजच्या काळात, मध्यमवर्गीय बदलत्या वास्तवाला सामोरे जाणा-या, क्रांती घडवू शकणा-या व सर्व बाजू भरडल्या जाणा-या या काळात लेखिका काही मानवी निवढा व मर्मदृष्टीला गवसणारी मूल्ये यांची एक पुर्न-वर्धी तपासणीच नायिकांच्या रूपाने माडत आहे.

"सेतू" ही गुंतागुंतीच्या नाल्यांनी विणलेली घट्ट पोताची कादंबरी आहे. बनारस जवळच्या गंगेच्या काठावर असणा-या खेड्यात राहणारे बाबूजी मॉ, बहिणी, भाऊ, पुतण्या यांच्यात "सेतू" तल्या ब्रिजमोहन गुंतलेला आहे. सुचरिता त्याच्याशी लग्न करते पण त्यांच्या मावसांशी तिचे नाते कळूच शकत नाही.

आपल्या मायेच्या माणसांपासून स्वत:च दूर जाणे ब्रिजमोहनला सहन होऊ शकत नाही. त्याचे मानसिक संतुलन ढासळते. त्याचे चित्रण आशा बगेनी अचुकपणे मांडलेले आहे.

**"भूमी"** (२००४) :

"भूमी" ही आशा बगे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी आहे. ही नायिका प्रधान कादंबरी आहे. "मौथिली" ही नायिाका कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मद्रासजवळच्या एका खेड्यातील ही पोरकी पोर म्हणजे आई विना वाढलेली, आईचे छत्र लवकरच हरपलेली अशी मैथिली आहे. मैथिलीचे वडील डॉक्टर असतात. पण ते मैथिली च्या बालपणीच मरण पावतात वडील हिंदू व आई तमिळ ख्रिश्चन असते. आई हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करत असते. पण ती सुद्धा आजारी पडून काही दिवसातच मरण पावते.

त्यामुळे आई-वडिलांविना पोरक्या झालेल्या मैथिलीला तिची आत्या मुंबईला मुंबईला घेऊन जाते. परंतु तिचे बालपण मद्रास च्या समुद्र किना-यावर गेल्यामुळे तिल्या मुंबईमध्ये बंदिस्त वातावरणात करमत नाही. हळूहळू ती शाळेत व कॉलजेमध्ये जाते. तेथे मित्र-मैत्रिणी जमतात. त्यांच्यात ती रमून जाते मिंलिंद, चेतन, कीर्ती यांच्या सोबत ती नाटकातही काम करते. तसेच ती आत्याच्या मुलींच्या (बीना) ओळखीने छोट्याशा ग्रंथालयात नोकरी करते व नंतर देवस्थकीकडे घरकामासाठी जाते. या कादंबरीत मैथिलीच्या मार्फत लेखिकेने स्त्रियांना करावा लागणारा संघर्षच मांडलेला आहे.

"भूमी" कादंबरीतून लेखिकेने मैथिलीच्या जीवनाचा प्रवास मांडला आहे स्वत:च्या कर्तृत्वावर पुढे येणा-या मैथिलीच्या जीवनात तिच्या वाट्याला कुटुंबात दु:खच दु:ख आलेले असूनही ते दु:ख पचवून ती नव्या उमेदीने जगते. आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी स्वत:च्या भावनांचा त्याग करते परंपरेने चालत आलेली कुटुंब व्यवस्था सांभाळते. नैसर्गिकदृष्ट्या कुठेही स्वत:चा तोल ठळू देत नाही तिच्या

भावनांची झालेली घुसमट प्रभावी रीतीने आशा बगे यांनी "भूमी" या कादंबरीत मांडलेली.

**"भूमीका" आणि "उत्सव" (२०११) :**

"भूमीका" आणि "उत्सव" या कादंब-यात नव्या जुन्या पिढ्यांतील माणसांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन व मानवी नातेसंबंधाची उत्कृष्ट रूपे चित्रित केलेली आहेत. "भूमिका" मध्ये आजी-आजोबांच्या एकमेकांशी बोलण्यातून त्यांचे स्वभाव कळून येतात. "भूमिका" मधील मोचीत भाग घेणारा अभावग्रस्तांबदल आपुलकी असणारा समाजमनस्क आणि शिक्षण, नोकरी, लग्न अशी चाकोरी नाकारणाचा सोहनच्या रूपाने आशा बगे यांनी तरूण पिढीच्या वागण्या बोलण्यातून क्रिया प्रतिक्रियांमधून समकालीन जगातील बदलांचा, वातारवणातील अशाततेचा, जुन्या नण्यामधील संस्कृती विचार यातील अंतराचा स्पर्श या कादंबरीतून आलेला दिसतो.

"उत्सव" या कादंबरीत डॉ. सरस्वती आणि तिचा बालपणापासूनची मैत्रीण माधवी या दोघींची ही कथा आहे. दोघीची व्यक्तिमत्व निरनिराकी, परंतु प्रेम, माया, स्निग्धता, हे या मैत्रीचे मुलद्रव्य शेवटपर्यंत कायम राहते. आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन हे वेगळे आहे सदभावनेच्या सतप्रवृत्तीच्या परंपरेचा ठसा त्यावर आहे. मध्यमवर्गीय संस्कृतीशी एकत्र कुटुंबातील सण, उत्सव, व्रत, कीर्तन, संस्कार विचार यांच्याशी जवळचे नाते. असलेले दिसून येते. मानवी मूल्यांची जपणूक करणा-या त्यांच्या कादंब-या आयुष्याच्या शेवटी मूल्यांना जपणे किती महत्वाचे आहे. हेच दर्शवितात व हे सर्व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा दिसून येते.

**माझी कथा माझी निवड (२००९) :**

"माझी कथा माझी निवड" या कथा संग्रहामध्ये लेखिकेने आवडल्या दीर्घ कथा निवडलेल्या दिसतात. यामध्ये रंग "आतार" "मारवा" व मल्हार या कथा आहेत. लेखिका या कथासंदर्भात स्वत:च

सांगते की, "संगीत ही माझी भूमी आहे. या भूमीतील अनुभव मला नित्यतूनाच वाटत असतो. या भूमीने मला कितीतरी अनुभव दिले याचे प्रत्यंतर "रंग" सारख्या काही कथांमधून या कथेचे पोतच संगीताचे होते.

**समारोप**

आशा बगे यांनी कथा-कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये सातत्याने दर्जेदार लेखन करून स्वतंत्र वाट चोखाकली आहे. आशा बगे यांच्या साहित्यात सुखमय जीवनात काव्यासारखे रुतवारे प्रसंग साकार करण्यात आलेले आहे. कथा-कादंबरीमध्ये परंपरेतील आणि वर्तमान काळातील आधुनिकता व त्यांचा निर्मळ मनाने केलेला स्वीक यांचा आंतरिक मिलाक त्यांच्या लेखणीत कायम आहे.

**निष्कर्ष**

१) एखादी सूक्ष्म घटना त्यातील माणसाचं अडकणं किंवा बाहेर निघणं सुटणं किंवा गुंतुन पडणं किंवा दोन्ही गोष्टीच मिश्रण आशा बगे यांच्या कथा-कादंब-यांतून आलेले आहे.

२) आशा बगे यांच्या कथा-कादंब-यांतून परंपरेची बंधने व आधुनिकतेचा स्वीकार यात माणसाची जी फरफट होते. त्याचा शोध घेतलेल्या आहे.

३) आशा बगे यांच्या लेखनामधून माणसांच्या अंतरंगाचा शोध त्यांच्या मनातील पारदर्शक नजर शोधून तळ गाठव्याचा व माणसाचा गूढ स्वभावाचे दर्शन झालेले आहे.

**संदर्भ सूची :**


१) कुसुभावती देशपांडे - (मराठी कांदबरी पहिले शतक)

२) आशा बगे - माझे कथालेखन

३) प्रमिला भिरूड - मराठी कादंबरी, स्त्रीयांचे योगदान

४) विद्या देवधर - स्त्री लिखीत कादंबरी "प्रेरणा आणि प्रवृत्ती


***

# साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद

**प्रा. कांबळे डी. आर.**

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड, ता. लोहा जि. नांदेड

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्याला समृध्द अशी परंपरा आहे. अगदी प्राचीन काळापासून म्हणजेच मराठी भाषेच्या उगमापासून मराठी साहित्याच्या समृध्द परंपरेला प्रारंभ होतो. विविध काळात उदयास आलेलया विविध पंथ, संप्रदाय व परिवर्तनाच्या चहवळीच्या प्रेरणा आणि प्रभावातून मराठी भाषेत साहित्य निर्मिती झालेली दिसून येते. स्वातंत्र्याच्या कालखंडापर्यंत आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातही विविध प्रवृत्ती आणि प्रेरणांसह मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झालेली आहे.

१९६० नंतर मराठी साहित्य आणि पर्यायाने विविध साहित्यप्रकार समाजाभिमुख झाले. काव्य - शास्त्र - विनोद' ही विशिष्ट उच्चवर्णिय बुध्दिजीवी लोकांचीच मिरा आहे, असा दृढ समज भारतीय आणि महाराष्ट्रीय समाज जीवनात पक्का रूजलेला होता ; परंतु १९६० नंतर दलित, आदिवासी भटके विमुक्त, स्त्रीवादी इत्यादी साहित्य प्रवाहांनी आपल्या जोरदार मुसंडीने मराठी साहित्यविश्व हादरवून टाकले. साहित्य विश्वाने हजारो वर्षात कधीच न ऐकलेल्या, पाहिलेल्या जीवन जाणिवा आणि अनुभव मराठी साहित्यात आविष्कृत होऊ लागले. हे संबंध साहित्य जसे गाव कुसा बाहेरच्या उपेक्षित, वंचित शूद्र वर्णीय कष्टकरी माणसांचे होते, त्याच प्रमाणे हजारो वर्षे इथल्या तथाकथित वर्ण वर्चस्ववादी लिंगाधारीत पुरूषप्रधान व्यवस्थेने समाजाची अर्धी लोकसंख्या असलेलया आणि दुय्यमत्त्वाचे जीवन जगण्यास भाग पाडलेलया स्त्रियांचेही होते.

साठोत्तरी कालखंडामध्ये स्त्रीवादी जाणिवेने लेखन करणाऱ्या काही महत्त्वपूर्ण लेखिकाचा उल्लेख करताना जी नावे पुढे येतात त्यामध्ये शांता गोखले, आशा बगे, कमल देसाई, गौरी देशपांडे, तारा वनारसे, सानिया, अंबिका सरकार ते कविता महाजन इत्यादी अनेक नावाचा उल्लेख करता येईल. या लेखिकांच्या साहित्यकृतीच्या संदर्भाने अरूणा ढेरे लिहितात, "या लेखिकांच्या लेखनामागे जीवनशोधाचे गंभीर प्रयोजन आहे. स्त्री जीवन, कुटुंब जीवन आणि स्त्री - पुरूष संबंध हेच बहुतांशी केंद्रवर्ती विषय असतानाही या स्त्रिया पुरूष विरोधाचा कडवटपणा दूर ठेवून आपल्या अनुभव विश्वाच्या सूक्ष्म गं ुतागं ुतीचा शोध निष्ठेने घेताना दिसतात. या शोधामागची त्यांची जाणीव त्यांच्या लेखनाला वेगळी उंची देणारी आहे."[१] सदरील संदर्भावरून हे लक्षात येते की, साठोत्तरी कालखंडात निर्माण झालेल्या स्त्रीवादी साहित्य प्रवाहाने जोरकसपणे आणि प्रथगात्मपणे मुसंडी मारून आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

स्त्रीवादाची पहाट आणि पाश्र्वभूमी :

उच्चवर्णीय वर्चस्ववादी पुरूष सत्ताक लिंगभेदवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य हे मूठभर बुध्दिजीवी वर्गाच्या मनोरंजनासाठी निर्माण झालेले साहित्य असते. १९६० नंतर मराठी साहित्याने खऱ्या अर्थाने कुस बदलली. विविध वर्चस्ववादी संयंत्राने दाबले गेलेले समाजघटक अत्यंत ताकदीने आपले जीवनानुभव साहित्याच्या माध्यमातून शब्दबध्द करू लागले. त्यात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसतो. पारंपरिक जीवन जाणिवा आविष्कृत करण्यापेक्षा विशिष्ट तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन आत्मसन्मानाची जीवन जाणिव अस्तित्वशोधातून या स्त्रीवादी लेखिका साहित्यातून अभिव्यक्त करू लागल्या.

भारतीय समाजरचना ही मूलत: विषमतवादी आहे. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, उच्च निचपणा, अस्पृश्यता, पुरूषसत्ताक

लिंगभेदात्मक व्यवस्था या आरिष्टांनी भारतीय समाजव्यवस्क्ष्थेत प्रचंड भेद निर्माण केलेले आहेत, परंतु या सर्व विषमताग्रस्त स्तरांमधल्या स्त्रियांची अवस्था आणखी जास्त विषमताग्रस्त आहे. कारण स्त्रीला स्वतंत्र अस्त्विव आहे. ही बाब कोणत्याही समाजातील आणि कोणत्याही काळातील पुरूष प्रधान व्यवस्थेला मान्य नव्हती. शूद्रापेक्षाही वाईट अवस्था समाजामध्ये स्त्रियांची होती. कोणत्याही प्रकारचे कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक अधिकार स्त्रियांना नव्हते. 'चूल आणि मूल' हेच तिच्यासाठी आखून दिलेले कार्यक्षेत्र होते. वरील परिस्थिती स्त्रियांच्या संदर्भात थोड्या फार फरकाने जागतिक पातळीवरील सर्वच राष्ट्रांमध्ये असित्वात असल्याने दिसून येते. भारतीयच नव्हे तर जागतिक समाजकारणात आणि राजकारणात दिसून येते. भारतीय नव्हे तर जागतिक समाजकारणा आणि राजकारणात पुरूष प्रधान व्यवस्थेचा वर्चस्ववादी दृष्टिकोन राहिलेला आहे.

स्त्रीवादी विचारसरणी आणि चलवळीच्या अनुषंगाने विचार करता १९७५ हे वर्षे अतिशय महत्त्वाचे मानले जाते. कारण १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने स्त्री वर्ष म्हणून साजरे केले. पुढे त्यातूनच स्त्रियांसाठीच्या दशकाची कल्पना आणि स्त्रियांच्या संदर्भातील विविध प्रश्न आणि समस्यांच्या चिंतन चर्चेतून एक नवा दृष्टिकोन निर्माण होण्यास प्रारंभ झाला. १९६० ते १९७० या दशकामध्ये स्त्रियांच्या समतेच्या चळवळीची पायाभरणी झाली, आणि त्याचे रूपांतर पुढे जागतिक चळवळीमध्ये घेण्यात आले. "असे म्हटले जाते की, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात जे शौक्षणिक प्रयोग झाले, त्यातून 'नवी स्त्री' घडविली गेली, अशी स्त्री जिथे हितसंबंध फक्त कुटुंबाच्या चौकटीत बंदिस्त नव्हते."[2] समाज प्रबोधनाच्या चळवळींनी शिक्षणाच्या माध्यमातून उपेक्षित, वंचित, पीडित मानवीय घटकांच्या आत्मभानाला अवकाश देऊन त्यांचा

आत्मसन्मान आणि अस्मिता जागी केली. परिणामत: मोठ्या प्रमाणामध्ये स्त्रियांच्या चळवळी निर्माण झाल्या.

**साठोत्तरी मराठी साहित्य आणि स्त्रीवाद :**

साठोत्तर काळात जीवनाच्या विविध क्षेत्रात होत गेलेले बदल स्त्रियांना आत्मभानाला चेतना देऊन गेले. मानवी विकासाची किंवा उन्न व्यक्तिमत्त्वाची परिकल्पना मांडत असताना विशिष्ट व्यक्तीचे किंवा व्यक्तिसमूहाचे जीवनाच्या विशिष्ट क्षेत्रामध्ये नेमके स्थान काय आहे, यावरून त्या व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची प्रतिष्ठा आणि जगण्याचा दर्जा निश्चित केला जातो. स्त्रीवादाच्या संदर्भाने असाच विचार करावा लागतो. समाजाची अर्धी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांना जीवनाच्या विविध क्षेत्रात दुय्यमत्व दिलेले होते. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात मानवीय पातळीवर बरोबरीचा दर्जा मिळावा यासाठीचा वौचारिक संघर्ष हा स्त्रीवादाच्ञा रूपाने पुढे आलेला दिसतो. प्रस्तुत लेखात साहित्याच्या क्षेत्रात "स्त्री साहित्याच्या संकल्पनेचा विचार हा दुहेरी स्वरूपाचा आहे. स्त्रीने निर्माण केलेले साहित्य ही पहिली संकल्पना तर स्त्री विषयक प्रश्नांना प्राधान्य देऊन निर्माण केलेले साहित्य ही पूरक संकल्पना स्त्रीवादी साहित्यात मांडली जात आहे."[3] याचा अर्थ असा की स्त्रियांनी स्वत:च्या मानवनिर्मित वेदनांना, प्रश्नांना प्राधान्य देऊन स्वत: केलेले लिखाण आणि इतर लेखकांनी सहानुभूतीने किंवा मानवतावादी दृष्टिकोनातून स्त्रियांच्या विषमताग्रस्त आणि वेदनादायी जीवनाचे साहित्यातून केलेले चित्रण असा हा स्त्रीवादी साहित्याचा दुहेरी प्रवास आहे.

जागतिक स्तरावर स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या सिमॉन द बोव्हार या विदुषीने पहिल्यांदा 'द सेकंड सेक्स' ह्या पुस्तकातून स्त्रियांच्या माणूसपणाची भूमिका मांडली, "पुरूषाचा उल्लेख हा नहेमी 'माणूस' (ह्युमन बिइंग) असा केला जातो आणि बाईला बाई (फिमेल) म्हणूनच संबोधले जाते. स्त्री - पुरूष समानतेला जगाने मान्यता

दिल्याशिवाय आणि या समानतेचा अर्थ उमगल्याशिवाय स्त्रीसाठीही पुरूषांच्या स्तरावर स्वत:ला ठेवून त्यांच्या बरोबरीने जगणे अवघड आहे."[4] अशी मांडणी सिमॉन द बोव्हार या लेखिकेने केली. त्याचा परिणाम म्हणून संपूर्ण जगामध्ये स्त्रीवादी साहित्याचा उगम झाला.

साठोत्तरी कालखंडामध्ये मराठी साहित्य विश्वात अनेक लेखिकांनी स्त्रीवादी जाणिवा आविष्कृत करणाऱ्या साहित्यकृती निर्माण केल्याचे दिसून येते. यामध्ये, "स्त्री जाणिवा अभिव्यक्त करणाऱ्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांमध्ये 'रीटा वेलिणकर', 'त्यावर्षी' (शांता गोखले), 'प्रतिदवंदवी', 'भूमी', 'मुदा' (आशा बगे) अशा काही मोजक्या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येतो."[5] स्त्रीकडे 'स्त्री म्हणून न पाहता तिच्याकडे एक माणूस म्हणून तर पाहिले पाहिजेच. परंतु समाज व्यवस्थेने पुरूषाला जे विशेषाधिकार देऊन स्त्रीवर गुलामी लादली आहे, ती नष्ट होऊन 'पुरूष - पुरूष' ही विषमता नष्ट झाली पाहिजे. अशा प्रकारची मांडणी आणि भूमिका साठोत्तरी कालखंडातील स्त्रीवादी साहित्याची राहिली आहे. पारंपरिक समाजव्यवस्था जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रीला दुय्यमत्व देऊन तिचे माणूसपणाचे नौसर्गिक अधिकार नाकारते, याविरूध्दचा विद्रोह 'स्त्रीवादी' विचारसरणीने साहित्याच्या माध्यमातून आविष्कृत करून त्याला एक मानवीय नौतिक बौठक प्राप्त करून देण्याचा प्रयत्न साठोत्तरी कालखंडातीला विविध साहित्यकृतीमधून केल्याचे दिसून येते.

**समारोप :**

प्रस्तुत शोधनिबंधातून साठोत्तरी कालखंडातील मराठी साहित्यामध्ये अवतरलेल्या स्त्रीवादाच्या संदर्भाने काही आकलनात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्रीवादी तत्त्वज्ञानाने आणि साहित्याने' स्त्री' ची माणूस होण्यासाठीची धडपड, स्त्रियांचे वास्तव जगणे, त्यांचे भावविश्व रेखांकित करून, मानवीय मूल्यांना अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. सागर अशोक पाटील, 1990 नंतरची कादंबरी : आशय आणि अभिव्यक्ती, अक्षरगाथा, त्रैमासिक, अंक एप्रिल - मे - जून 2023, पृ.क्र. 81.

२) मिळून सा-याजणी (संपा.) विद्या बाळ, महिलादिन विशेषांक, मार्च 2015, पृ.क्र. 22.

३) डॉ. अलका चिडगोपाळकर, मराठवाड्यातील स्त्रीवादी कथा लेखिका : एक शोध, मराठवाडा : सृजन आणि साहित्य (संपा) मिलिंद कांबळे, पृ.क्र. 197.

४) कित्ता, पृ.क्र. 199.

५) उनि. पृ.क्र. 82 (अक्षरगाथा)

***

# गौरी देशपांडे यांच्या 'मध्य लटपटीत' कांदबरीतील नायिकेची मनोव्यथा

डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर जि. जालना

एकोणिसाव्या शतकातील एकूण जागरण व्यक्ती जीवनाला महत्त्वाचा आयाम देऊन गेले. पुढे विसाव्या शतकात समाजाच्या सर्वच स्तरांवर त्याला पूरक असे नवविचारांचे मंथन सुरू झाले. शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान यांच्या विकासाची फलश्रुती म्हणून झालेला जाणिवांचा विकास व आलेले जीवनभान याची परिणती म्हणून व्यक्तिजीवनात आणि सामाजिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन होत गेले. साहित्य आणि समाज यांच्यात अन्योन्य संबंध असल्याने साहित्यही कालमान परिस्थितीनुरूप वेगवेगळी रूपे धारण करत गेले. मानवाच्या बौद्धिक व्यापारातील अत्यंत महत्त्वाची बाब असलेल्या साहित्याभ्यासातून समाजाच्या सर्व स्तरांमध्ये अस्तित्वभान येऊ लागले. जगभरातील सर्वच स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या दास्यात रहावे लागले. विविध प्रकारच्या शोषणाचे बळी ठरावे लागले आहे.

अन्याय-अत्याचार निमूटपणे सहन करावे लागले. हे आपल्या स्त्री जातीवर होणारे अन्याय आहेत आणि ते दूर करण्यासाठी संघर्ष करायला हवा; त्यासाठी हे अन्याय कोणकोणत्या प्रकारे होतात हे समजून घेतले पाहिजे, त्यांची कारणे शोधली पाहिजेत, त्या कारणांची मीमांसा केली पाहिजे याचे भान जसजसे स्त्रियांना येत गेले तसतसा या अन्यायाविरुद्धचा स्त्रियांचा लढा अधिक व्यापक व सूक्ष्मतर होत गेला. भूतकाळाच्या तुलनेने आज स्त्रियांची जी 'बरी स्थिती' दिसते आहे, ती स्त्रीने प्रदीर्घ काळ केलेल्या संघर्षाची फलनिष्पत्ती मानावी लागेल. 'आदर्श भारतीय नारी'चे चित्र तर स्त्री शोषणाचे प्रतीकच आहे. त्याला आदर्शत्वाची झूल चढवली गेली. इंग्रज राजवटीमुळे जीवनाच्या सर्वच

पैलूत आमूलाग्र परिवर्तन घडले. स्त्री जीवनही त्याला अपवाद राहिले नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय घटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणले. शिक्षणामुळे व कर्तृत्वाला संधी मिळाल्याने अनेक कर्तृत्वसंपन्न स्त्रियांनी स्वातंत्र्योत्तर काळात महत्वाची कार्य केली. स्त्री पुरुषापेक्षा कमी आहे ही धारणा व तद्‌भूत 'कमीपणा' स्त्रीवर लादलेला आहे याचे भान स्त्रीला येऊ लागले.

मराठी साहित्यातील स्त्री कादंबरीकारांनी मराठी कादंबरी आपल्या परीने समृद्ध करताना स्त्रीचे भावविश्व प्रकट केले आहे. शिक्षणाची संधी मानवतावादी प्राकृतिक विचारांचा प्रभावए औद्योगिक क्रांती, विज्ञान-तंत्रज्ञान यात झालेली प्रगती आहे. जीवनदृष्टीचा प्रभाव आणि बदलते अर्थकारण, व्यक्ती स्वातंत्र्यांचा उद्गम या साऱ्यांचा परिणाम मानवी जीवनावर पर्यायाने समाजजीवनावर झाला सामाजिक पर्यावरण बदलत गेले. स्वाभाविकपणे स्त्रीही बदलली. बदलत गेलेली ही स्त्री नव्या जाणीवा, नव्या दृष्टि नवी मूल्ये आत्मसन्मान आणि सत्व घेऊन स्त्रीत्वाचा शोध घेऊ लागली. हा शोध घेताना स्त्रीचे माणूसपण नाकारणारी, पुरुष सत्ताक समाज व्यवस्था त्यातून निर्माण झालेली सर्वांकष शोषण व्यवस्था याचा बोध तिला होत गेला. अनेक प्रश्न तिच्या मनाला भेडसावू लागले, अस्वस्थ करू लागले. ही अस्वस्थता ती कादंबऱ्यातून मांडू लागली. त्यांच्या कादंबऱ्यांचे वेगळेपण जाणवू लागले. हे वेगळेपण वाङ्मयीन निकषांपेक्षा जीवनाभिव्यक्तीच्या बाबतीत विशेष लक्षणीय आहे.

१९६० नंतर लिहित्या झालेल्या स्त्री कादंबरीकारांपैकी गौरी देशपांडे ह्या एक महत्त्वाच्या व लक्षवेधक स्त्री कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'कारावासातून पत्रे' (१९७६), 'मध्य लटपटीत', 'एकेक पान गळावया' (१९८०), 'काही दूरपर्यंत' (१९८०), 'तेरूओ' (१९८२), 'निरगाठी' (१९८४), 'यांग' (१९८६), 'चंद्रिके गंऽऽ सारिके गंऽऽ' (१९८७), 'दुस्तर हा घाट' (१९८८), 'मुक्काम' (१९९२), 'गोफ' (१९९९), 'उत्खनन' (२००२) - कादंबऱ्या; 'आहे हे असं आहे' (१९८६) - कथासंग्रह : अरेबियन नाईट्स - अनुवाद: विंचुर्णीचे धडे इत्यादी साहित्य प्रसिद्ध आहे.

समकालीन साहित्यिकांपेक्षा वेगळया स्वरूपाचे लेखन करणाऱ्या, एक प्रतिथयश स्त्री कादंबरीकार म्हणून त्यांची नोंद घेतली.

व्यक्ती ज्या वातावरणात, संस्कारात वाढते त्यानुसार त्याची जडणघडण होते. म.कर्वे यांची नात दिनकर इरावती कर्वे यांची कन्या व र.धों. कर्वे यांची पुतणी असणाऱ्या गौरी देशपांडे यांना स्त्री स्वातंत्र्याचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे बाळकडू घरातूनच मिळाले. या आचार-विचार, निर्णय स्वातंत्र्यातून गौरी देशपांडे यांचे स्वतंत्र व्यक्तित्व आकारास आले. व्यक्तिस्वातंत्र्याची पेरणी त्यांच्या बालमनावर झाल्याने स्त्री-पुरुष व्यक्तिजीवनाकडे त्या प्रगल्भ दृष्टीने पाहतात. घरातील वाङ्मयीन व वैचारिक वारशातून त्यांची वैचारिक घडण झाल्याचे दिसते. त्यांच्या या स्वतंत्र व्यक्तित्वाची फलश्रुती म्हणून त्यांच्या साहित्यातील महत्त्वाची पात्रे व्यक्तिस्वातंत्र्याची विचारसरणी, जीवनसरणी अनुसरताना दिसतात. "लेखकाने घेतलेला जीवनानुभव साहित्यकृतीतून आविस्कृत होत असतो. या चित्रणामध्ये केवळ घटना वा व्यक्तिरेखा यांच्या वर्णनावर लेखकाचा भर नसतो. तर त्याच्यामागे असलेल्या मानवी मनातील भावभावनांचे तांडव लाघव, संमिश्रण, सखोलता, व्यापकता यांच्या चित्रनाकडे त्याचे लक्ष वेधलेले असते. वास्तव जीवनातील भावनाजागृती व साहित्याच्या आस्वादाने निर्माण होणारी रसिक मनातील भावनाजागृती या एकाच पातळीवरच्या नसतात" साहित्य विचार समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, प्रकाशन : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २०१०,पृ.७

'मध्य लटपटीत' कादंबरीचे कथानक नायक-नायिका यांच्यासह रती-श्रीधर, निर्मला-जयंत, ताई ताईचे यजमान, गीता, कांचन या कादंबरीतील महत्त्वाच्या पात्रांभोवती फिरत राहते. नायिका स्त्री-पुरुष (पती-पत्नी) संबंधाची, त्यातील प्रेमभावनेची विविध रूपे आजमावून पाहत आहे. स्त्री-पुरुष सहजीवनाचा, त्यातील नातेसंबंधाचा शोध घेत आहे. नायिका व तिचा पती यांचा प्रेमविवाह झाला आहे. त्यांच्या नात्यात परस्परांच्या स्वातंत्र्याविषयी आदर, जोडीदारावर पूर्ण विश्वास, मालकी हक्काचा अभाव आहे. दोन-तीन वर्षांसाठी नायकाची नेमणूक परदेशात झाल्याने नायिकादेखील आपली नोकरी सोडून त्याच्यासोबत परदेशात येते.

भारतात नोकरी, संसार, घर, मुले या व्यापात बुडालेली नायिका परदेशातील टापटीप, स्वच्छता, सततचे सौंदर्य, यांत्रिकता, एकाकीपणा यांना कंटाळते. जीवनातील यांत्रिकतेला कंटाळलेली नायिका त्याच्या व आपल्या नात्यात देखील हीच यांत्रिकता आली नाही ना या विचाराने धास्तावते, भरपूर रिकामा वेळ असल्याने ती त्याच्या व आपल्या नात्याविषयी चिंतन करू लागते. तिचे हे चिंतन तिच्याही नकळत चिंतेचे रूप धारण करते.

एकाकीपणाची जाणीव तिला अस्वस्थ करू लागते. या अस्वस्थतेतूनच आपल्या व त्याच्या नात्याचा नव्याने शोध घेण्याची, दोघांतील नात्याचा अन्वयार्थ नव्याने शोधण्याची गरज तिला तीव्रतेने भासू लागते. खरे पाहता नायिकेला नवऱ्याचे प्रेम लाभले आहे. त्याच्याकडून तिला विचारस्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य, कृतिस्वातंत्र्य एकूणच व्यक्तिस्वातंत्र्य लाभले आहे. नवऱ्याचे पाशमुक्त प्रेम लाभूनही ते प्रेम आपल्या आयुष्यात आहे याची तिला जाणीवच नाही. त्यामुळे आजपर्यंतच्या आयुष्याचा अर्थ काय ? आजपर्यंतच्या जगण्यातून आपल्याला काय मिळाले ? त्याच्या - माझ्यातील नात्याचा, प्रेमाचा अर्थ काय ? असे प्रश्न तिला पडले आहेत.

पतीबरोबरच्या आपल्या संबंधाची अर्थपूर्णता ती शोधू लागते. नवऱ्याबरोबरचे आपले नाते ती नव्याने तपासू इच्छिते. त्यासाठी तिला थोड्या मोकळ्या अवकाशाची आवश्यकता भासली. त्यासाठी ती त्याला सोडून भारतात आली. आपल्या वैवाहिक जीवनातील अर्थपूर्णता स्वत: च शोधून काढण्यासाठी ती धडपडते आहे. पतीपासून दूरदेशी - भारतात येऊन राहते. या मुक्कामात स्वतःबरोबरच तिच्या भोवताली असणाऱ्या रती-श्रीधर, निर्मल-जयंत, ताई- ताईचे यजमान, गीता-तिचा पती या जोडप्यातील नातेसंबंधातून; आणि रती-कांचन यांच्यातील विवाहबाह्य संबंधावर अनेकांगी प्रकाशझोत पडून पती-पत्नी नात्यातील विविध पदर तिला उलगडत जातात.

पतीसोबत परदेशी गेलेली नायिका लवकरच तिथल्या सततच्या, सौंदर्याला, टापटीपीला, रिकामपणाला कंटाळते. परदेशात रिकामपणातून आलेला एकाकीपणा, एकाकीपणातून आलेले दुःख याची फलश्रुती म्हणून तिच्या मनात नको ते विचार डोकावू लागतात. त्यामुळे मुलीच्या वयाच्या सानया आणि तिह्राची त्याने स्तुती केली तर

नायिकेची रात्ररात्रभर झोप उडू लागली. आजपर्यंत ज्या शंका कधी तिच्याकडे फिरकल्या नव्हत्या त्या शंकांनी बेजार होऊ लागली. नवरा दुसऱ्या स्त्रीचा विचार करेल ही तिच्या मनातील भीती तिच्या विचारांवरील पारंपरिक प्रभावपणाचे द्योतक ठरते.

प्रेमविवाह झालेल्या नायक - नायिकेचे परस्परांवर प्रेम आहे. परस्परांबद्दल आदर, विश्वास, सामंजस्य आहे. पण परदेशात तिच्या वाट्याला आलेला एकाकीपणा तिला अस्वस्थ करतो. तिच्या प्रचंड अस्वस्थपणाची जाणीव त्यालाही होते. एक दिवस स्वत: च्याही नकळत अश्रू गाळणाऱ्या तिला तो, "अगं, रडतेस कां ?" *देशपांडे, गौरी, 'मध्य लटपटीत', मुंबई, मौज प्रकाशन,स.आ.२००४,पृ.४०.* असं विचारतो. तेव्हा त्याला, "किती, काय आणि कसं समजावायचं ?"*तत्रैव,पृ.४०* असे प्रश्नात्मक उत्तर देते, नायिकेला पडलेला हा प्रश्न त्या दोघातील नात्याकडे पुन्हा एकदा दुरून व तटस्थपणे बघण्याची तिला वाटणारी गरज अधोरेखित करतो. नवऱ्यापासून दूर भारतात आलेली नायिका स्वत: च्या पतीबरोबरचे नातेसंबंध अंतर्मनात शोधता शोधता त्याच शोधक दृष्टीने आपल्या भोवती असणाऱ्या दांपत्यातील स्त्री-पुरुष संबंधाचा शोध घेऊ लागते. व शोध घेताना स्त्री-पुरुष संबंधातील एक-एक पदर उलगडत जातो. नायिकेची मैत्रीण रती व तिचा आयडिअल नवरा श्रीधर यांच्या सुरळीत चाललेल्या नात्यात साचलेपणा आला आहे. हा साचलेपणा दूर करण्यासाठी ती तिच्याच ऑफिसमध्ये कमर्शियल आर्टिस्ट असणाऱ्या कांचनशी जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करते. त्यांच्यातील या संबंधाची माहिती असलेला श्रीधर त्या संबंधावर कुठल्याही प्रकारचा आक्षेप घेत नाही. आयुष्य कसे जगायचे, त्यातून काय मिळवायचे हे ठरवून जाणीवपूर्वक आयुष्य घडविणारे निर्मला-जयंत हे जोडपे. निर्मला ही नायिकेची मोठी नणंद आहे. ती सतत इतरांना मदत करण्यात, त्यांचे प्रश्न सोडवण्यात व्यग्र असते. तिच्या मते फॅमिलीमध्ये टुगेदरनेस येण्यासाठी काही कॉमन इंटरेस्ट हवेत. जयंत व निर्मला प्रत्येक गोष्ट मिळून ठरवत असतात, करत असतात. त्याबद्दल कुतूहलानं विचारणाऱ्या नायिकेला जयंत म्हणतो, "होय ! अर्थातच ! सगळं काही मिळून नाही ठरवायचं, करायचं, तर मग लग्नाला काय अर्थ? मग प्रत्येकानं आपापल्या वाटेनं जावं की. "*तत्रैव,पृ.६०* पण अशी प्रत्येक गोष्ट एकमेकांना विचारून करणे म्हणजे नायिकेला

व्यक्तिस्वातंत्र्यावरील गदा वाटते. तर तीच गोष्ट जयंतला सामंजस्यपूर्ण सहजीवनात अतिशय महत्त्वाची वाटते. त्यामुळे लग्नसंस्था व व्यक्तिस्वातंत्र्य दोन्हींना आपल्या ठिकाणी महत्त्वाचे मानणाऱ्या नायिकेला प्रश्न पडतो की, "व्यक्तिस्वातंत्र्य आणि लग्न यांची सांगड कधी बसतच नाही का ?"*तत्रैव,पृ.६०* पती-पत्नी नातेसंबंधाचा पर्यायाने विवाहसंस्थेचा मुळातून शोध घेऊ इच्छिणाऱ्या नायिकेला जयंत म्हणतो, "तुझं सांग मग. कां लग्न केलंस भाऊशी ?"... "प्रेमात पडले ना ?... "*तत्रैव,पृ.६०* असं सांगणाऱ्या नायिकेला जयंत म्हणतो, "पण आता सांग ना, प्रेमात पडलीस म्हणून लग्न केलंस, आणि लग्न केलंस म्हणजे काय केलंस?"*तत्रैव, पृ.६०* जयंतच्या प्रश्नावरील 'ठाऊक नाही' या तिच्या उत्तरातून तिच्या मनातील गोंधळ स्पष्ट होतो. तद्वत त्याच प्रश्नाचे उत्तर शोधण्याची तिची धडपड ध्वनित होते.

नायिकेची बहीण ताई तिच्यापेक्षा सुंदर, हुशार, सरस असूनही ती एका साध्या माणसाशी विवाह करून संसार करते आहे. त्याबद्दल तिला कुतूहल आणि जिज्ञासा आहे. म्हणून ती विचारते, "पण त्यांच्या ... म्हणजे त्यांच्यावर ... प्रेम आहे तुझं ?"*तत्रैव, पृ.६५* त्यावर ताई प्रतिप्रश्न करते, "काय गं, वीस वर्षांची असताना नवऱ्याच्या प्रेमात पडलीस तसंच वाटतंय तुला आजही त्याच्याबद्दल ?"*तत्रैव, पृ.६५* या प्रश्नावर 'तेच तर' असं म्हणत तिच्या डोळयातून अश्रू वाहू लागतात. वीस वर्षापूर्वीचे 'प्रेम' आज राहिलेले नाही. मग काय राहिले आहे? हा प्रश्न नायिकेबरोबरच वाचकांनाही अस्वस्थ करतो. असेच वादळात सापडलेले आणखी एक जोडपे म्हणजे लीना-अशोक. अशोकच्या नेहमीच बाहेर भानगडी चालत. बिझनेस पार्टीच्या निमित्ताने सर्वांचे एकत्र येणे होई, पिणे होई. मग कुणाचा पायपोस कुणाला राहत नसे. अशाच, "एका पार्टीनंतर लीनानं सकाळी उठून बघितलं तर नवरा कुणा बाईबरोबर लिव्हिंग रुममध्ये झोपलेला !"*तत्रैव,पृ.४६* वैवाहिक जीवनात अपेक्षित असणारी विश्वासार्हता, सचोटी, प्रामाणिकपणा, 'एकपत्नीव्रत' यांना छेद देऊन स्वच्छंद, मुक्तजीवन जगणाऱ्या आणि प्रतारणा करणाऱ्या अशोकबरोबर लीना संसार का करते हा प्रश्न नयिकेला पडतो. आणि अशोक लीनाचीही काही कारणे असतील हे

ध्वनित करतो. लीना संघर्ष करीत नाही तर तडजोड करते. तिच्या या तडजोडीत नयिकेला स्त्रीची अगतिकता अनुभवास येते. पतीला त्याच्या दुर्गुणांसह स्वीकारण्याचे हे स्त्रीचे भागदेय लीनाच्या माध्यमातून अधोरेखित हाते. 'पत्नी' असूनही दुसऱ्या स्त्रीशी लैंगिक संबंध ठेवणे लीनाप्रमाणेच नायिकेला अक्षेपार्ह वाटते. लीना भांडते. पण तरीही त्याच्याबरोबरचे वैवाहिक सहजीवन चालू ठेवते. हे सहजीवन चालू ठेवण्यात तिची अगतिकता प्रकट होते. ही अगतिकता 'स्त्री' जातीची प्रातिनिधिक अगतिकता आहे. गीता व तिचा पती हे कादंबरीतील आणखी एक जोडपे. रूढीनुसार लहानपणी विवाह होऊनही पुढे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या बळावर जगन्मान्य अर्थशास्त्रज्ञ, प्रोफेसर झालेली गीता आपल्या नवऱ्याशी एखाद्या मतिमंदाशी वागावे त्याप्रमाणे वागते. पिढीजात शेतीचा धंदा सोडून कारखानदारीत स्वत: ला सिद्ध करणाऱ्या नवऱ्याचे त्याच्या क्षेत्रातील कौशल्य तिच्या लेखी गौण होते. केवळ बुद्धिमत्तेलाच महत्त्व देणारी, गर्व बाळगणारी गीता नवऱ्याला तुच्छ लेखते. "हा माझा नवरा, खिळेबिळे बनवून विकतो." *तत्रैव, पृ.५६* अशी अवहेलना चारचौघात करते. गीतेची ही अहंमन्यवृत्ती 'पती-पत्नी' संबंधातील एका वेगळया अंगाला प्रकट करते.

पती-पत्नी नातेसंबधाचा अंतर्मनात शोध घेताना नायिका म्हणते, "आणि आता वीस वीस वर्ष संसार केल्यावर मी आजूबाजूला बघत विचार करते. नवरा-बायकांचं एकमेकांवर प्रेम असतं का ? ते काय असतं ? श्रीधर-रती बंधांना अगदी पुरेपूर ताणून बघत होते, जयंत-निर्मला एखादी भिंत बांधावी वीट-वीट करून तसं प्रेम बांधत होते, अशोक-लीनासारखे कुणी एका नाट्यमय प्रसंगापासून दुसऱ्यापर्यंत उडी घेत होते, कुणा गीताच्या लेखी तो प्रश्न अलाहिदा होता, गंडेरियासारखे कुणी... म्हणते, "प्रेमाचा लग्नाशी काय बुवा संबंध ? प्रेम आपल लहानपणी, कॉलेजबिलेजात करायचं. लग्नाचा हेतू प्रजोत्पादन व समाजमान्य रीत्या भूकशमन." *तत्रैव, पृ.५७* वैवाहिक जीवनासंबंधीचा गंडरियाचा हा साधा, सरळ आणि सोयिस्कर अभिप्राय ऐकल्यावर नायिका अस्वस्थ होते. स्वतःच्या शोधासंबंधी अधिकच बुचकाळयात पडते. आपल्याला विवाहाकडून काय हवे आहे याचा शोध घेण्यासाठी

भारतात परतलेली नायिका रती, निर्मला, नाना यांच्याकडे काही दिवस राहते. पण तिचा शोध काही पूर्ण होत नाही. शेवटी ती मुंबईतील आपल्या घरी एकटी राहून एकांतवास पत्करते.

आपल्या या अवस्थेबद्दल रतीला म्हणते, "मला साऱ्यांचाच कंटाळा आला होता, कुठं कुणाकडे मन रमत नव्हतं, काही उलगडा होत नव्हता काय झालंय याचा."*तत्रैव,पृ.७८* तिचे हे उद्गार तिच्या अस्वस्थतेवर प्रकाशझोत टाकतात. आपल्या वैवाहिक जीवनातील अर्थपूर्णता स्वतःच शोधून काढण्यासाठी ती धडपडते आहे. त्यासाठी एकांतवास पत्करते आहे. नवऱ्यात आणि तिच्यात निर्माण केलेले हे अवकाशातले अंतर नातेसंबंधाच्या शोधाच्या दृष्टीने तिला आवश्यक आणि महत्त्वाचे वाटते. अंतर्मुख होऊन विचार करण्यासाठी तिने स्वत: ला, स्वत: च्या घराच्या अवकाशात काही काळासाठी कोंडूनही घेतले आहे. थोडेसे दुरून, तटस्थपणे आपल्या त्याच्यातील नात्याचा शोध घ्यावा म्हणून भारतात परत आलेली नायिका परत जायचे की नाही या संभ्रमावस्थेत आहे. तिचे स्वातंत्र्य जोपासणाऱ्या त्यानेही तिच्या परत येण्या न येण्याचा निर्णय तिच्यावर सोपवला आहे. पण तिच्या नकळत तिच्या मनानं त्याच्याकडे परत जायचा निश्चय केला आहे. पण मनाचा कौल पूर्ण खात्री पटल्याशिवाय ती मान्य करणार नव्हती. "कारण हे पाऊल नीट तयारीनिशी टाकलं नाही तर घसरणार होतं !"*तत्रैव,पृ.७२* केवळ भावनेच्या भरात वाहून जाऊन कृती करण्याइतकी ती भावनिक नाही. दोघातील नाते तिला जाणून घ्यायचे आहे. त्यासाठीच ती त्याच्यापासून दूर आली आहे आणि हे पक्के जाणल्याशिवाय घाईगडबडीत परत जाण्याचा निर्णय ती घेऊ इच्छित नाही. आपल्यावरील त्याच्या प्रेमाची, मायेची तिला पूर्ण जाणीव आहे. असे असूनही कुठेतरी अपुरेपणाची जाणीव तिला होते. ही अपुरेपणाची जाणीव तिला अस्वस्थ करते. मनाची अस्वस्थता, घालमेल व्यक्त करताना ती म्हणते, "एका बाजून उमजत होतं की आपण कुठे तरी चुकलो, काही तरी करायला हवं होतं ते विसरलो, पण काय , कुठं समजत नव्हतं. चूक कशी काय सुधारायची तेही दिसत नव्हतं."*तत्रैव,पृ.७२* 'आपल्याला 'काय हवे ?' हेच तिला कळत नाही. काहीतरी अपुरे आहे पण नेमके काय ? कशाचा तरी आपण शोध घेत आहोत पण नेमका कशाचा ? याचे उत्तर तिला सापडत नसल्याने तिची

ही अस्वस्थता आणखीणच वाढते. पण ही अवस्था केवळ नायिकेचीच नाही.

नायिकेला पडलेला हा प्रश्न समस्त स्त्रियांचा प्रातिनिधिक प्रश्न आहे. म्हणूनच नायिका म्हणते, "अशा किती तरी आम्ही. कुणी नुसत्याच गोंधळात पडलोय, कुणी दुसऱ्या कुणाचा आधार बघताहेत, कुणी लष्करच्या भाकऱ्या भाजताहेत, कुणी आदळआपट, त्रागा करताहेत. साऱ्यांचा प्रश्न एकच काही तरी कमी पडतंय, ते काय आहे आणि कसं मिळवायचंय ?" *तत्रैव, पृ. ७२* आयुष्याच्या विशिष्ट वळणावर प्रत्येक स्त्रीला ही कमतरता जाणवते. पण नेमके काय मिळवायचे आणि कसे मिळवायचे हेच माहीत नसल्याने त्यातून मार्ग काढणे कठीण होऊन बसले आहे. आयुष्यभर सोबत करणाऱ्या आयुष्याला व मनालाही व्यापून उरणाऱ्या पती-पत्नी नातेसंबंधात मनाला कधीतरी काहीतरी कमतरता जाणवते. या कमतरेमुळे निर्माण झालेली अस्वस्थता तिचे उभे आयुष्य ढवळून काढते. पती-पत्नी नात्याचा नव्याने शोध घेण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे आयुष्याच्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना ती म्हणते, "मनात येतंय, कुठं तरी काही तरी राहून गेलं गड्या. काय ? कुठं ? काही तरी मागं विसरून आपण पुढच्या स्टेशनात आलो." *तत्रैव, पृ. ६६* ही कमतरता प्रत्येक स्त्रीला जाणवते. परिस्थितीशरण न बनता त्यांचा शोध घेण्याचा नायिकेचा प्रयत्न तिचे वेगळेपण अधोरेखित करतो.

व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य जोपासणारा नायक परदेशी पर्यावरणातील टापटीप, सौंदर्य याचा आग्रह, त्यात आलेली एक प्रकारची कृत्रिमता आणि रिकामपण यामुळे एकाकीपण आलेल्या नायिकेची मानसिकता अस्वस्थ आणि सैरभैर होते. एक प्रकारची उदासीनता तिला घेरते. पती-पत्नीतील नात्याचा अन्वयार्थ काय हा प्रश्न तिला भंडावतो. त्याचा शोध घेण्याची उर्मी उफाळून येते आणि त्यासाठी त्याच्यापासून दूर जाण्याच्या हेतूने ती परत भारतात स्वदेशात जाण्याची इच्छा व्यक्त करते. तेव्हा तिचा नवरा तिला भारतात जाण्यास स्वेच्छेने अनुमती देतो किंबहुना परत यायचे की तिथेच थांबायचे ह्याचा निर्णयही तिच्यावर सोपवतो. तिच्या भावभावनांची आणि अस्वस्थतेची कदर करणारा नवरा समजूतदार आणि व्यक्तिस्वातंत्र्याची चाड बाळगणारा आहे. व्यक्तिस्वातंत्र्य निर्णय स्वातंत्र्य ही मूल्ये तो अंगीकारण्याइतका प्रगल्भ आहे.

पुरुषी प्रवृत्तीचा प्रतिनिधी मेहरोत्रा - कुठल्यातरी कंपनीचे एजंट असणारे मेहरोत्रा बरीच वर्षे परदेशी वास्तव्य करुन होते. त्यांची पत्नी मुलांच्या शिक्षणासाठी भारतात येऊन जाऊन असे. त्या

गृहस्थाच्या परदेशात लटपटी चालत. एकदा एका बाईला जेवायला घेऊन आलेले मेहरोत्रा स्वतःहून नायिकेच्या टेबलापाशी येऊन आपल्या वर्तनाचे समर्थन करतात, "की कुटुंब दूर असलं की कसे हाल होतात वगैरे."*तत्रैव,पृ.४०* तेव्हा रागावलेली नायिका म्हणते, "मग तुमच्या कुटुंबाचेही होत असतील नाही हाल तिकडे ?" तर मी मोठा विनोद केल्यासारखे हसून म्हणाले , "बाई माणसाची गोष्ट वेगळी हो."*तत्रैव, पृ.४१* अन्न, वस्त्र, निवाऱ्याप्रमाणे लैंगिक गरज ही मानवाची नैसर्गिक गरज आहे. पण मानवाच्या या नैसर्गिक गरजेकडे केवळ पुरुषाची नैसर्गिक गरज म्हणून पाहिले जाते. स्त्रीची देखील ती गरज आहे ही गोष्ट हेतू पुरस्सर दुर्लक्षिली जाते. स्त्री केवळ पुरुषाच्या वासनापूर्तीचे साधन बनून राहते. "आपल्या समाजात, एकूण बाईचे जगणे हे दुय्यमच. त्यामुळे तिच्या दुःखाला तगमगीला फार मोल नसते."*अरूण म्हात्रे, आशयघन, त्रैमासिक,जुलै २०२० ते जून २०२१,पु.४५* स्वहितार्थ बनवलेल्या पुरुषी वृत्तीचा प्रतिनिधी म्हणून येथे मेहरोत्रा येतो. स्त्रीला केवळ पुरुषाच्या लैंगिक तृप्तीचे साधन ठरवणाऱ्या या पुरुषप्रधान व्यवस्थेचे दर्शन 'बाईमाणसाची गोष्ट वेगळी हो' या विधानातून होते.

'मध्य लटपटीत'ची नायिका आयुष्याच्या व संसाराच्या मध्यावर 'लग्न' संस्थेचा मूलभूत शोध घेते आहे. ती स्वत: च्या व स्वेतरांच्या वैविध्यपूर्ण संसाराचे निरीक्षण करते. लग्नसंस्थेमुळे निर्माण झालेले विविध नातेसंबंध, त्यातील ताण जाणून घेण्याचा, ते सोडवण्याचा प्रयत्न करते. लग्न ही अपरिहार्य गोष्ट न बनता हव्या असलेल्या व्यक्तीबरोबर राहण्याचे, संसार करण्याचे स्वातंत्र्य, स्त्री-पुरुषांना असावे असे तिला वाटते. लैंगिक इच्छांचे विरेचन व संसार करण्याची इच्छा या कारणांसाठी स्त्री-पुरुषांना लग्न बंधनकारक करणे हे तिला स्त्री-पुरुष दोघांच्या दृष्टीने अन्यायकारक वाटते. नायिकेचा हा विचार एकूण मराठी साहित्यपरंपरेत मोठा धिटाईचा व वेगळा आहे. एकीकडे इतका धीट व वेगळा विचार करणारी नायिका पती-पत्नी शरीरसंबंधाबाबत मात्र पूर्णपणे पारंपरिक विचारसरणी अंगीकारते. पत्नीच्या शरीरावर पतीरूपी पुरुषाचा 'हक्क' असतो असे ती मानते. एकंदरीत लग्न संस्थेविषयी मूलभूत व महत्त्वपूर्ण चिकित्सा करणाऱ्या या नायिकेच्या काही विचारांवर पुरुषप्रधान व्यवस्थेचा पगडा असल्याचे दिसून येते.

# 'वलय' कथा संग्रहातील स्त्रीजीवन


## प्रा. डॉ. आशा सोपान गिरी

मराठी विभाग, कै. सौ. कमलताई जामकर, महिला महाविद्यालय परभणी


मराठी साहित्यामध्ये १९६०नंतर विविध साहित्य प्रवाह उदयास आले. त्यामध्ये स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा अतिशय महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो. स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा आता फक्त व्यासपीठापुरता व चळवळीपुरताच मर्यादित राहिलेला नाही तर खऱ्या अर्थाने समस्त महिला वर्गात आपल्या हक्काची जागृती करून स्त्रीवादी भूमिकांना या साहित्य प्रवाहाने मजबूत बनविले आहे आणि याचेच पडसाद मराठी साहित्यामध्येही आपल्याला पहावयास मिळतात. मराठी साहित्यामध्ये स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करणाऱ्या कथा लेखिकांमध्ये सानिया यांचा नावलौकिक आहे. मराठी कथाविश्वामध्ये त्यांनी आपल्या लोकप्रियतेचा ठसा उमटविला आहे. अनेक कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यापैकी 'वलय' या कथासंग्रहामध्ये आलेले स्त्रीविषयक प्रश्न, स्त्रीजीवन पुढील प्रमाणे सांगता येते

**वलय:-**

'वलय' कथेतील ललिता ही अद्वैतची आई. ती स्वतंत्र विचाराची स्वाभिमानी स्त्री आहे. तिचा नवरा अशोक हा हरिहर यांची नोकरी नाही, तर गुलामीच करतो व त्याची तिला खंत वाटत असते. ती अशोकला हरिहरच्या हातातील खेळणी होऊ नकोस, त्यांच्या गुर्मीला ताठ्याला तू स्वीकारू नकोस, हे सांगत आलेली असते. "लग्नानंतर अशोकचं मन लावून काम करणं धावपळ आणि वरताण म्हणजे कुठल्याही वेळी कोणतेही काम नकार न देता करणं. ती एकदा वैतागून त्याला म्हणाली होती तू त्यांचा हरकाम्या आहेस" (पृ. ५) नवऱ्याला

कितीही सांगितले तरी त्यात तिला कायम अपयश आले. नवरा गेला तरी तिला कायम चिडच हरिहरविषयी वाटत गेली. अशोकच्या निधनानंतर तिने जाणीवपूर्वक आपल्या मुलाला हरिहरपासून दूर ठेवले. घरच्याशी बोलून ती अशोकबरोबर प्रेमविवाह करते, अशोकच्या निधनानंतर ती मुलाला स्वतंत्र वाढवते, नोकरी करते, त्याला स्वतःच्या पायावर उभा करते आणि हरिहर पासून दूर ठेवते. ती खरंतर एक स्वाभिमानी आणि स्वतंत्र विचारांची आणि संवेदनशील मनाची स्त्री आहे. हरिहरनविषयी मनामध्ये कायमची  चिड असूनही त्यांच्या विनंतीचा मान ठेवून, वयाचा मान ठेवून त्यांना भेटायला जायचे ठरवते.

**घर:-**

या कथेतील गौरी ही नोकरी करत घर संसार सांभाळणारी स्त्री. तिला सर्वांसारखे चाकोरीबद्ध जीवन आवडत नसते. तिला घर कामांमध्ये सारस्य नसते, ते फक्त जबाबदारी म्हणून ती करत असते. तिला प्रवासाची, फिरण्याची प्रचंड आवड असते. नोकरी करून पैसा जमा करून प्रवासासाठी खर्च करावा, असे तिला वाटते. कधीकधी घरातील कामाचा कंटाळा आल्यावर ती विचार करते. "गौरीला मध्येच मनस्वी कंटाळा आला, वाटलं की हे सगळं फेकून द्यावं ना जावं कुठेतरी मस्त लोळत. आपल्याला वाटतं ते करायचं स्वातंत्र्य घेऊन... पण काय करायचं आहे ? खूप भटकायचं आहे, डोंगरदऱ्यांतून, रानावनातून, बरोबर कोणी असो, नसो सगळं पाहत पाहत, अनुभवत, झाडं-पानं-फुलं पाणी हे सारं अगदी अंगावर घेऊन एकच होऊन जायचं त्याबरोबर." (पृ. १८) गौरीला वाटत असते की, आपण आठ तास नोकरी करतो त्यामुळे नवऱ्यानेही घर कामात मदत करायलाच हवी आणि या कामाच्या बाबतीत ती नवऱ्याच्या विचारांमध्ये बदलही घडवते. ट्रेकिंगला जाण्यासाठी अडथळा येत असेल तर गौरीला मुलंही नको असतात. तिला घरामध्ये किंवा इतर गोष्टींमध्ये खर्च करण्यापेक्षा

प्रवासावर खर्च करणे आवडते. म्हणजे गौरी ही एक भरभरून जीवनाचा आनंद घेण्यासाठी जगणारी आणि आपले छंद, आवडीसाठी झटत राहणारी एक स्वतंत्र विचाराची स्त्री आहे.

**छबूताई:-**

'घर' या कथेतील छबुताई ही गौरीची सासू. तिला आपल्या सुनांबद्दल छोट्या-मोठ्या तक्रारी असतात. पण ती तिचे मन सांभाळत असते. त्यांच्या एकुलत्या एका मुलाने गौरीबरोबर केलेला प्रेमविवाह त्यांना आवडलेला नसतो, पण तरीही त्या गौरीचा स्वीकार करतात. त्यांना असे वाटत असते की, सुनेने घरातल्यांना चांगलं खायला घालावं, घरसंसार यामध्ये रमून जावे, अशी त्यांची इच्छा असते.

**खेळ:-**

या कथेतील रोहिणी जीवनबरोबर प्रेमविवाह करते. तिच्या नवऱ्याचा लग्नानंतर पहिल्या पाच वर्षाच्या आतच घडलेला घटस्फोट तिला माहीत असूनही त्याच्याशी लग्न करते. तिला स्वतःचे मूल नसते म्हणून तिने अनाथालयातून मुलगी दत्तक आणलेली असते. मीनलविषयी तिला जेव्हा उत्तरा बोलते की, स्वतःचं मुल हे शेवटी स्वतःच असतं, तर ती म्हणते, "मीनल काही आम्हाला पोटच्या मुलीहून कमी वाटत नाही. लोकांना वाटतं तसं बहुधा, पण अगं, चार महिन्यांची असल्यापासून आणली आहे. वाटणार नाही का बघ तूच सांग. शेवटी आपण किती गुंतले जातो ते महत्त्वाचं. नाही का? (पृ. ४३) रोहिणीची आणि उत्तराची मैत्री होते. परंतु त्यांची मैत्री जीवनला आवडत नसते, तरीसुद्धा ती उत्तराला भेटायला जाते. पेंटिंग, मुलं, नवरा असं विश्व असणारी रोहिणी 'खेळ' या कथेत भेटते.

**उत्तरा:-**

ही श्रीमंत घरामधील सून. तिचा नवरा डॉक्टर असतो. परंतु तिला काडीचाही मान त्या घरामध्ये नसतो. तिचा मुलगासुद्धा तिच्यावर प्रेम करत नसतो. तिला जवळचे कोणीच नसते. त्यामुळे ती

रोहिणीबरोबर मैत्री करते. उत्तराला रोहिणीविषयी प्रचंड माया वाटत असते. उत्तरा नोकरी करणारी स्त्री असली तरीही तिचा नवरा तिला मारहाण करत असतो. परंतु हे ती रोहिणीजवळ कधीच बोलत नाही. म्हणजे शिकलेली, नोकरी करणारी उत्तरा ही अन्याय अत्याचार सहन करत जगणारी स्त्री आहे.

**रीत:-**

अरुणा ही डॉक्टर. समाज कल्याण केंद्राच्या दवाखान्यात निरनिराळया गावी ठराविक वारी ती जात असते. तिला ते आवडतं. आपण समाजासाठी काही करावं, हा ध्यास तिचा असतो. कुमारबरोबर तिचा प्रेमविवाह झालेला असतो. जेव्हा तिला तिचे सासरे उपाध्याय यांनी आठ दहा लाख रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे हे समजते. तेव्हा ती नवऱ्याला म्हणते, "तू समजत असशील, की मला त्यांचा राग आलेला आहे. तसं काही नाही. ती तुझी माणसं आहेत. फक्त मी त्यांना आपली मानणार होते. प्रयत्न करून. जगात अशी अनेक नातीगोती मुद्दाम घडवावी लागतात. आता माझ्यापुरती ती तशी होणार नाही का इतकच. आपण नाही का लांबच्या, शेजारच्या किंवा नुसत्या तोंडओळखीच्या लोकांकडे पाहून दुःख व्यक्त करतो, हळहळतो नि सोडून देतो. नाही का? तसंच. माझ्यापुरतं हे तसंच होणार आहे" (पृ. ८०) अरुणा ही अतिशय स्वाभिमानी, प्रामाणिक, स्वतःची दिशा, ध्येय अचूक जाणणारी, परखड मते असणारी एक संवेदनशील स्त्री व्यक्तिरेखा आहे.

**मंगला:-**

'रीत' या कथेतील मंगला ही अरुणाची सासू. तिला आपल्या मुलाने म्हणजे कुमारने अरुणाशी प्रेमविवाह केलेला, रजिस्टर लग्न केलेले आवडलेले नसते. तिचा नवरा हा बेकायदेशीर रितीने घरात पैसा आणतो, हे तिला माहीत असते. शिवाय त्याला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली सस्पेंड केल्यावरही तिला नवऱ्याचा राग येत नाही. ती

त्याची बाजू घेत राहते. मुलाला त्यावरून ती म्हणते की, "लोकांचं काय ! असे न तसे बोलतातच. ते बोलतात त्यांची पर्वा का करायची आपण? बाकी जे व्यवस्थित वागतात ते महत्त्वाचे. आपलं कुठं काही अडत नाही." (पृ. ६९) मंगला ही एक गृहिणी आणि टिपिकल सासूसारखा विचार करणारी स्त्री आहे.

**वर्तमानाचे रंग:-**

सुधा ही स्त्री सुदर्शन या आपल्या मुलाला नवरा गेल्यानंतर नोकरी करून सांभाळते. त्याचे शिक्षण पूर्ण करते आणि त्याने कोणती तरी कायमची नोकरी करावी यावरून त्याला सतत बोलत असते. ती आजारी पडते तेव्हा ती मुलाला म्हणते की, "तुला आवडत नाही ना मी घरी असलेलं, तुला आपलं वाटतं आईने सदा उत्तमच असावं, एखादं यंत्रच जसं काही तेल पाणी करून चालत राहिलेलं. (पृ. ९४) सुधा आणि मीरा या खूप चांगल्या मैत्रिणी, एकमेकींच्या सुखदुःखात धावून येणाऱ्या, एकमेकींना समजावून घेणाऱ्या आहेत. त्यांच्यातील घट्ट मैत्रीचे वर्णनही या कथेमध्ये आलेले आहे.

**मीरा:-**

मीरा ही गृहिणी आहे. अनंत हा मीराचा नवरा तो सतत घराबाहेर असतो. त्याने कायम घराकडे, बायकोकडे, मुलीकडे दुर्लक्ष केलेले असते आणि तो मीरावर चांगलाच वचक ठेवून असतो. मुलीने नोकरीतील पैसे घरी ठेवावे असे त्याला वाटते. दुसरी मुलगी ही थोडीशी अर्धवट वेडी असते ती त्याला अजिबात आवडत नाही. मीरा मात्र कायम त्याला समजून घेत राहते आणि आपल्या मुलींविषयी कायम तिला चिंता असते. जाई या मतिमंद मुलीविषयी सतत मिराला काळजी असते. ती सुदर्शनला म्हणते की, "तिच्या बाईपणाची इतकी काही धास्ती वाटते म्हणून सांगू सुदर्शन. काय होणार आहे कळत नाही. सगळं आयुष्य जायचं आहे तिचं...माझा एकेक दिवस जाता जाता.. ओझ्यासारखा... जास्तच..." (पृ. १०१) मीरा ही सतत जाईच्या

काळजीमध्ये वावरणारी आणि नवऱ्याच्या कायम धाकात राहणारी स्त्री आहे.

**माधवी:-**

माधवी या कथेतील शशी ही तरुण, सुंदर, आधुनिक शहरी चांगल्या सांपत्तीक स्थितीतील एक स्त्री. दोन-तीन वर्षाचे अंतर असलेल्या तीन मुली तिला असतात. श्रीनाथ यांना बोलताना ती म्हणते की, "तीन मुली मुलगा होईल या आशेवर लादण्यात आलेली बाळंतपण." (पृ. ११५, ११६) शशी ही लग्नाअगोदर स्वतःचे मत असणारी धीट आणि आक्रमक होती. त्याचबरोबर स्त्रियांबद्दल हिरारीन मतं मांडणारी ती होती. परंतु लग्नानंतर मात्र ती तिच्यावर लादलेली बाळंतपणंही सहन करते. आई-वडिलांचा, समाजाचा विचार करताना ती स्वतःचे मत, स्वतःचं जगणं हे विसरून गेलेली आहे.

**चौकट:-**

'चौकट'मधील आरती ही अतिशय हुशार, कर्तबदार आणि स्वतःचं सगळं स्वतःच मिळवणारी स्त्री. तिच्या वडिलांनी म्हणजे आप्पांनीही तिला मुलगा आणि मुलगी असा भेद न करता वाढवले आणि तिने स्वतःचे अस्तित्व घडविले. ती लग्न न करता राहते. लग्नाविषयी वडिलांनी विचारल्यावर ती त्यांना म्हणते की, मी जर लग्न केले असते तर मला आजपर्यंत मी जे मिळवले आहे ते मिळवता आले नसते. त्याचबरोबर ती त्यांना म्हणते की, "तडजोड करण्याचा आपला स्वभावच नाही. जे करावे असं वाटतं त्यात पूर्ण झोकून देऊन हवं ते मिळवायचं तेवढेच आपण ठरवतो. त्याची खंत नाही. जे नाही ते विसरून गेलो. त्याबद्दल सतत कुढत राहायचं नाही असं ठरवून टाकलं. आपला मार्ग तो आपला हे कदाचित समर्थन असेल पण त्याचाही खेद नाही. का असावा? (पृ. १३७) स्त्री ही कितीही कर्तबदार असली तरी तिच्या आयुष्याचे सार्थक हे तिचे लग्न आणि मुलं यातच आहे, अशा समाजाच्या धारणेला चपखल उत्तर देणारी आरती आहे. समाजाची रूढ चौकट मोडीत काढणारी आहे.

**रितू:-**

रितूला नवऱ्याच्या मोठ्या बहिणीविषयी म्हणजे आरतीविषयी तिला आत्मीयता कमी आणि मत्सरच जास्त वाटत असतो. ती कशी श्रीमंत आहे, ती कशी पैसा मिळवते, याविषयी तिला असूया वाटते. आपल्या संसाराविषयी तिला असे वाटते की, "नात्याची जबाबदारी फक्त आपलीच कशी काय? हे एवढंच आपलं जग घरातलं, भिंतीतलं, स्वयंपाक घरातलं, नवऱ्याची बायको, मुलांची आई आणि वर आदर्श सून, गृहिणी. इतके करूनही आरतीच्या कर्तृत्वाशी तर तुलनाही नाही. कितीही झालं तरी तिचं काम, तिची कुवत कितीतरी मोठीच ठरणार. (पृ. १३४) तिला सतत याचे वाईट वाटत असते की, आपली उमेदीची वर्ष घर संसारातच वाया जात आहेत आणि या जाणिवेपोटी ती सतत आरतीचा मत्सर करत राहते.

**नाती:-**

'नाती' या कथेतील आदिती ही शाळेत शिक्षिका असते. तिचा नवरा सौदी अरेबियाला असतो. ती भारतामध्ये सासऱ्यांसोबत आनंदात राहत असते. शाळा आणि काहीना काही कामे ती करत असते. तिचे भरगच्च रुटीन ठरलेले असते. सासऱ्यांची ती काळजी घेत असते. तिचा नवरा तिला भेटायला येतो. तेव्हा तो तिला म्हणतो की, सोडून राहावं लागतं तुला कामामुळे. तुला राग येत असेल ना माझा? त्यावर ती त्याला म्हणते, "रागवायचं काय आहे ती खऱ्या निरागस आश्चर्याने म्हणाली." (पृ.१५०) भक्कमपणे एकटी राहून सासऱ्यांना आधार देणारी, नोकरी करून घर चालवायला समर्थ असणारी अदिती ही स्त्री आहे

**अर्थ:-**

'अर्थ' कथेतील रमा ही हुशार, बुद्धिमान, सुवर्णपदक जिंकून चार्टर्ड अकाउंटंट झालेली स्त्री. ऑफिसच काम चोखपणे आणि प्रामाणिकपणे करणारी. तिच्या नवऱ्याला केदारला कॅन्सर झाल्यावर त्याच्याबरोबर लढणारी, त्याला सांभाळून घेणारी. केदारच्या मृत्यूनंतरही ती परिस्थितीला शरण जात नाही. खूप धैर्य तिच्याकडे

असते. "आक्रोश न करता, दुःखाचे प्रदर्शन न मांडता त्याने त्याच्या लढाईभर दिलेल्या समर्थ क्षणांना जागवीत" (पृ. १९४) बाहेरून कसलेही ओरखडे ती पडू देत नाही आणि तिला असे वाटते की, केदारचे आणि तिचे आयुष्य हे फक्त त्या दोघांचे आहे. त्यात कोणाला प्रवेश नाही दिला पाहिजे. एकंदरीत एक खंबीर आणि लढाऊ स्त्री म्हणून रमा ही व्यक्तिरेखा येते.

**विभा:-**

'अर्थ' या कथेतील विभा ही निर्मलची बायको. तिला निर्मलचे वागणे खटकत असते. केदारबरोबर जाणे, रमा बरोबरची मैत्री, प्रवीण त्याची करत असलेली फसवणूक आणि निर्मलचे थंडपणे वागणे, या सर्वांची तिला चीड येत असते. यावरून ती सतत त्याच्याशी भांडणही करत असते. जेव्हा निर्मल तिला म्हणतो की, तू माझ्या ऑफिसच्या कामात लक्ष घालू नको. त्यावेळेस ती म्हणते की, "मी काय अशिक्षित बाई आहे, की मला एवढेही कळून मी गप्प बसावं? फार उशीर होण्याआधी तू जागं व्हावंस एवढ्या करताच म्हणते मी पुन्हा पुन्हा" (पृ. १६५) विभाला सतत वाटत असते की नवऱ्याला आपल्या जवळच्या माणसांची पर्वाच नाही.

एकंदरीत 'वलय' या कथासंग्रहातील ज्या प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहेत. त्या सर्वांना आत्मभान प्राप्त झालेले आहे आणि त्यांची स्वची जाणीव ही अतिशय प्रगल्भ आहे. स्त्री म्हणून कुठल्याही प्रकारचे दुय्यमत्व न स्वीकारता त्या आपल्या आयुष्यामध्ये घेतलेल्या निर्णयांमध्ये अतिशय ठामपणे उभ्या राहिलेल्या आहेत. सानिया यांनी धैर्यवान, परिस्थितीची जाण असणाऱ्या आणि संवेदनशील अशा स्त्री व्यक्तिरेखा या कथासंग्रहामध्ये समर्थपणे चित्रित केल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ-**

१) वलय, सानिया, विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९५.

***

# मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद

## ("मी अस्सल प्रत जन्माची" या राधिका प्रेमसंस्कार (फराटे) लिखित गझलसंग्रहाच्या अनुषंगाने)

संशोधक विद्यार्थी

**चंद्रकांत ज्ञानेश्वर धस**

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. जालिंदर तुकाराम कानडे**

पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.

**प्रास्ताविक :**

जगभर प्रदीर्घकाळ अस्तित्वात असलेल्या पितृसत्ताक समाज व्यवस्थेने स्त्री-पुरुषामधील जैविक लिंगभेदाला सांस्कृतिक लिंगभेदाचे रूप दिले. पुरुषांनी आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्री-पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्तासंबंध रचला. ज्यात स्त्रीला गौण ठरविले गेले. स्त्रीची लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये जन्मजात नाहीत, समाजाने व संस्कृतीने स्त्रीवर लादलेली आहेत. संस्कृतिनिर्मित स्त्री-पुरुष भेदावर विधान करताना फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सीमॉन द बोव्हार म्हणते, जन्मतःच कोणी 'स्त्री' असत नाही; तर 'स्त्रीत्व' हे समाजाने, संस्कृतीने घडविलेले असते '(वन इज नॉट बॉर्न अ वुमन, रादर वन बिकम्स अ वुमन).[१] शिक्षणाची दारे खुली झाल्यावर स्त्रियांनी आपल्या विविध प्रकारच्या लेखनातून उपरोध, विनोद, विडंबन अशी शस्त्रे वापरून पुरुषी व्यवस्थेविषयीचा आपला संताप व विरोध प्रकट केला. प्रस्तुत शोधनिबंधातून आपण मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद

पाहणार आहोत. तत्पुर्वी आपण स्त्रीवाद, स्त्रीवादी जाणीव, स्त्रीवादी साहित्य, थोडक्यात पाहू या.

**स्त्रीवाद - जाणीव व उदय :**

स्त्रियांचे क्षमताधिष्ठित मानवी हक्क प्राप्त करून समाजपरिवर्तन घडवणारी स्त्रीवाद ही एक राजकीय जाणीव आहे, विचारप्रणाली आहे. स्त्रीकेंद्रित व्यवस्था आणण्यास कार्यरत असलेली चळवळ म्हणजे स्त्रीवाद. केवळ नैसर्गिक शारीरिक रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने स्त्रीला स्वतःच्या अस्तित्वाला अर्थ देता येत नव्हता. याची जाणीव म्हणजे स्त्रीवादी जाणीव होय. स्त्री-पुरुष विषमतेचे भान येणे, ही या जाणिवेची पहिली अवस्था, पुरुषरचित स्त्रीत्वाच्या कल्पनेला नकार देणे, ही दुसरी अवस्था, तर एक व्यक्ती म्हणून स्वतःचा शोध घेतानाच स्त्रीत्वाचा शोध घेणे, ही स्त्रीवादी जाणिवेची अंतिम अवस्था होय.

पाश्चात्त्य देशांत स्त्रीवादाचा उदय साधारणपणे १९६० च्या आसपास झाला. भारतात तो इ.स. १९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष घोषित झाल्यानंतरच्या दशकात रुजला. ह्या दशकातील स्त्रीमुक्ती चळवळींमुळे स्त्रियांचे शतकानुशतके अंधारात असलेले प्रश्न उजेडात आले. असे असले, तरी स्त्रीवादी जाणीव तत्पूर्वी अस्तित्वात नव्हती, असे मात्र नव्हते. स्त्रियांना गौणत्वाची जाणीव होतीच; पण ती व्यक्तिगत होती. त्याला संघटित चळवळीचे स्वरूप आले नव्हते.

**स्त्रीवादी साहित्य :**

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर कालखंडात नवनवीन वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले त्यात स्त्रीवादी साहित्यही निर्माण झाले. त्यामधून स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब दिसू लागले. डॉ. जनार्दन वाघमारे या

अनुषंगाने म्हणतात, “हया नवीन वाङ्मयीन प्रवाहांचा आशय काय होता व काय आहे? सांस्कृतिक स्वातंत्र्य, सामाजिक समता व मानवी प्रतिष्ठा या तीन गोष्टी त्यांना अभिप्रेत होत्या व आहेत. वस्तुतः या वाड्.मयीन प्रवाहांनी मराठीमध्ये समांतर साहित्य निर्माण केले आहे.”(२) बाईच्या अस्तित्वाचा, स्वत्वाचा अस्मितेचा व आत्मशोधाचा समग्रतेने वेध घेत, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव व्यक्त करीत, स्त्रीवादी जाणिवेचा विविध दृष्टिकोणांतून, विभिन्न अनुभवांना अभिव्यक्त करणारे पुरुषकेंद्री विचारव्यूहातून मुक्त अशा परिप्रेक्ष्यातून स्त्री वा पुरुषाने निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असेही व्यापक अर्थाने म्हणता येईल.

**मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद :**

समाजामध्ये होणाऱ्या बदलांची नोंद इतर वांड्.मयप्रकारांपेक्षा कवितेने प्रथम घेतलेली दिसते. कविता हा एक सर्जनशील असणारा साहित्यप्रकार आहे. कवितांची कविता म्हणजे ‘गझल’ असे म्हणतात. कारण गझलेत प्रत्येक व्दिपदी(शेर) ही स्वतंत्र कविता असते. अशा किमान पाच व्दिपदी मिळवून एक गझल तयार होते. मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद अभ्यासण्यासाठी राधिका प्रेमसंस्कार यांच्या “मी अस्सल प्रत जन्माची”(३) ह्या गझलसंग्रहातील स्त्रीवादावर भाष्य करणाऱ्या निवडक व्दिपदी पाहू या -

प्रथम राधिकाजींच्या शीर्षक गझलेतून व्यक्त झालेली स्त्रीची भावना, खंत, व्यथा-वेदना पहा-

**"मी मला विसरले शप्पथ पण तुला टाळले नाही**
**मी बोल लावले मजला पण तुला बोलले नाही**
**तू जन्माने गुलमोहोर मी निवडुंगाचा काटा**

**तू मला झोडले वेड्या मी तुला टोचले नाही**

**मी जीव काढला माझा मी गहिवरले तळमळले**

**पण मनोव्यथेचे गाणे ओठांवर आणले नाही**

**मी जखमी झाल्यावरती तू मीठ चोळले त्यावर**

**मी गोड बोलले केवळ जे तुला सोसले नाही**

**प्रत्येक तुझ्या श्वासांचे मी पाठांतरही केले**

**मी अस्सल प्रत जन्माची तू मला वाचले नाही"(पृष्ठ ९०)**

कवयित्रीला सखी-सोबती म्हणून वेदनाच अनमोल वाटू लागते. तिला पापण्यांच्या आतच जपून ठेवते. आपली व्यथा, वेदना मांडताना रोजच्या जीवनातील प्रतिमा आणि प्रतीके राधिकाजींनी आपल्या गझलेतून कशी चपखलपणे वापरलीयत पहा-

**"पापण्यांच्या आत आहे ठेवली**

**वेदना अनमोल आहे वाटते" (पृष्ठ २९)**

**"आज कळली व्यथा चुलीची ही**

**दाह होतो किती जळल्यावर" (पृष्ठ २३)**

पिढ्यानुपिढ्या अन्याय सहन केल्यावर स्त्री च्या मनाची झालेली उद्विग्न अवस्था चित्रीत करणाऱ्या काही व्दिपदी पहा-

**"हासले होते मलाही आरसे केव्हातरी**

**काळजावर राहिले होते ठसे केव्हातरी" (पृष्ठ ८६)**

**"घेऊनी का सोबतीला घात आले**

**हे कुणाचे हात या हातात आले" (पृष्ठ ९)**

**"चेहऱ्याची मोडते कोठे घडी**

**पाहिल्या आहेत इतक्या पडझडी**

**चिकटल्या नजरा अशा जातात का?**

**एवढी घासू नको तु कातडी" (पृष्ठ १३)**

आयुष्यभर त्याने जखमा दिल्याचे आत्मभान स्त्रीला येते तेव्हा ती पुरुषी व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठते -

**"खऱ्या खोट्यावरी भांडण पुन्हा आणायचे आहे**
**मला माझ्याच जगण्यावर जरा बोलायचे आहे**
**तुम्ही शब्दांमध्ये फुलवा प्रणय वाह्यात कृष्णाचा**
**मला काहूर राधेचे जरा मांडायचे आहे" (पृष्ठ ७०)**

**"ठेव सांभाळून सारे बुडबुडे तू सागरा**
**तू किती पाण्यात आहे जाणते ही सारिका" (पृष्ठ २६)**

**"नाव त्याचे काढले नावातुनी मी**
**अडकले होते उगी नावात त्याच्या" (पृष्ठ ८)**

**"जा तुला नाही कदर तर मोकळा हो**
**मी कुणाला फारसे बांधीत नाही" (पृष्ठ १८)**

**"मान-मर्यादेतली चौकट नको दावू मला तू**
**मी तुला काढून देऊ का तुझे ही माप सारे" (पृष्ठ १०)**

पुरुषाला स्त्रीचे वावडे असले तरी स्त्री मात्र नशिबी आलेल्या पुरुषाचा स्वीकार करतानाची तिची अपरिहार्यता व चीड राधिकाजींनी उत्तम रीतीने मांडली आहे-

**"ह्या छताला केवढे आहे धुराचे वावडे**
**काय ती करणार जर ओली निघाली लाकडे" (पृष्ठ १६)**

**"जरासे हासले मनसोक्त मी**
**कळेना बाप का रागावला" (पृष्ठ ८२)**

स्त्रीमुक्तीचा आनंद घेताना ती आसक्ती आणि विरक्ती यांच्या मधोमध उभी राहून पुरुषप्रवृत्तीला कशी आव्हान देते पहा....

**"मुक्त मी आहे खरोखर मुक्ततेला ही विचारा**
**भोगला संसार आधी फेकला नंतर पसारा**
**ही कहाणी एवढ्यावर संपली समजू नको तू**
**यायचा पाऊस बाकी, यायचा आहे निखारा"(पृष्ठ १७)**

पुरुषांची अनेक रूपे असली तरी प्रत्येक रूपामध्ये तो स्त्रीला नाकारतानाच दिसत आहे. मग ती स्वतःलाच आधार देत पुढे चालते. हे पुढील शेर पहा-

**"मी खडयासम चार दाण्यांच्या मध्ये रेंगाळले**
**उगवले माझ्यातुनी त्यांनी मला नाकारले**
**मीच माझा हात धरुनी राहिले आहे उभी**
**मी मला आधार माझा देत आहे चालले" (पृष्ठ २०)**

**"ज्यास ओठातला मी दिला गोडवा**
**आज हातात त्याच्या असे कोयता" (पृष्ठ ७३)**

पिढ्यानुपिढ्या पुरुषप्रधान संस्कृतीने केलेल्या वंचनेमुळे पायाला प्राक्तनाची भिंगरी व दोघामध्ये ही विषमतेची दरी का? असे ती विचारते-

**"केवढे हे येरझारे केवढी ही वंचना**
**थबकल्या पायास बसली प्राक्तनाची भिंगरी**
**हे खरे की भेटतो आहोत आपण नेहमी**
**पण तरीही आपल्यातील वाढते आहे दरी" (पृष्ठ २२)**

जेव्हा तिच्या विश्वासाला तडा जातो तेव्हा ती कुणाच्या भरवशावर थांबू शकत नाही. ती म्हणते -

**"थांबते मी कुठे कुणासाठी**
**काम होते कुठे भरवशावर" (पृष्ठ २३)**

भावनिक गुंता सोडवण्यासाठी स्त्री नेहमीच डोळ्यात वेदना लपवून अश्रूंना संयमाने त्यांना पापणीच्या आड दाबून ठेवत दुनियेची बाराखडी शिकत राहते. ह्या दोन द्विपदी पहा-

**"मी तुला सोडले तेव्हा तू जितका रडला होता**
**मी मला सोडतानाही तितकेच रडावे म्हणते**
**हो मीच ठेवले माझ्या अश्रूंना थोडे भोळे**
**मी क ख ग दुनियेचे आधीच शिकावे म्हणते"(पृष्ठ २४)**
**"हासऱ्या डोळयामध्ये मी लपवलेल्या वेदना**
**पण अभागी हुंदके माझ्या गळयाशी राहिले" (पृष्ठ ५२)**
**"दाटलेला कंठ आणिक श्वास आहे कोंडला**
**मोकळे होण्यास आतातर मला एकांत दे" (पृष्ठ ५३)**

जिवापाड सांभाळलेल्या जोडीदाराला कितीही जीव लावला तरी तिला त्याच्या मनात किंचित जागा असते. तो अस्तनीतला साप निघतो आणि ती मात्र शेवटपर्यंत त्याच्याचसाठी झिजत राहते मग तिच्या मनाचा कोंडमारा तिला अनेक प्रश्न विचारतो-

**"मला ताटात असलेल्या मिठाच्या एवढी जागा**
**हवेतर घ्यायचे किंवा नकोतर घ्यायचे नाही" (पृष्ठ ८३)**
**"कळेना खरा कोण आहे मुखोटा इथे चेहरा वाटतो घातकी**
**बघावे कुणाला?हसावे कुणाशी?मरावे कुणावर?जगावे कसे?(पृष्ठ २५)**
**"झिजावे किती हे जराही कळेना जिथे दाह होतो तिथे लेप मी**
**उगाळून घ्यावे किती मी स्वतःला सहाणावरी देह संपायचा"(पृष्ठ ४८)**
**आणि एवढे सगळे झाल्यावर ती स्वतःलाही आवाहन करते-**
**"का अपेक्षा ठेवते तू, तू तुला निर्माण कर**
**सांत्वनाने का कधीही चालते उपजीविका?**

**कर खरा एल्गार आता फाड खोटे मुखवटे**

**जेवढी सोशीक होशील तेवढी होईल टिका" (पृष्ठ २६)**

स्त्री भोवती असलेल्या अशा असंख्य प्रश्नांच्या चक्रव्युहामध्ये ती आता खूप खोलवर गेलेली आहे असे ती मानते आणि जोडीदाराकडून या चक्रव्युहातून बाहेर काढण्याची अपेक्षा करते तेव्हा तो तिला वाट दाखवतो आणि मग ती त्याला उद्देशून प्रश्न करते जर तुला बदलायचंच नसेल तर मी मला बदलून काय उपयोग? शक्य तेवढे सगळे सहन केले आजवर, आणखी किती समजून घ्यायचे असा खडा सवाल ती त्याला विचारते-

**"केवढ्या खोलात आहे पोचले मी**

**पण कुठे जाऊ पुढे पोहून आता**

**पाठमोरा जाहला मज पाहता तू**

**काय पाहू वेगळे पाहून आता**

**जर तुला बदलायचे नाही मुळातच**

**फायदा नाही मला बदलून आता**

**शक्य होते तेवढे ऐकून घेते**

**केवढे घ्यावे तुला समजून आता" (पृष्ठ २७)**

पुरुषासाठी स्त्री जन्मभर आपला देह चंदनाप्रमाणे उगाळत असते. एवढे करूनही त्यांच्या काळजाची वेदना जाईल का हा प्रश्न उरतोच. शिवाय तो असा काही तिच्या डोळयात रोखून पाहतो आहे की त्याच्याशी बोलण्याची देखील तिला आता भीती वाटते-

**"बाहुली उगळायची का चंदनाची**

**वेदना जाईल त्याने काळजाची?**

**पाहतो डोळयात माझ्या तू असा की**

**वाटते भीती तुझ्याशी बोलण्याची" (पृष्ठ २८)**

तिच्या भावनांशी खेळ झाल्याने ती एकटी पडल्या सारखे तिला वाटते. तिच्या मनातला गोंगाट तिला अस्वस्थ करतो. मग ती उद्विग्न होऊन म्हणते-

**"भावनांचा खेळ झालेला पटत नाही**
**एवढे होऊनही मी का मरत नाही**
**एकटी झाले पुन्हा मी या क्षणाला ही**
**आतला गोंगाट काही सोसवत नाही" (पृष्ठ ३०)**

कर्तव्याच्या ओझ्याखाली दबलेल्या स्त्रीच्या भावनेच्या भुकेचा प्रश्न त्याच्या कोरड्या उत्तराने घडीभर सुटला तरी तेवढ्याने मनाची भेगाळलेली भुई काही पूर्ववत होत नाही. मनाचे टाके पुन्हा पुन्हा उसवतात आणि पुन्हा पुन्हा नव्याने सांधावे लागतात. अशाने मनाचे अस्तर फाटण्याची भीती तिला वाटते. ती म्हणते-

**"भुकेचा प्रश्न ओलेता नभाचे कोरडे उत्तर**
**उडाल्या वावड्या हिरव्या पुन्हा भेगाळले वावर**
**किती उसवायचे टाके नव्याने सांधण्यासाठी**
**अशातच ताणले जाऊन हे फाटायचे अस्तर" (पृष्ठ ३१)**

स्त्री जन्मताच आसवे सोबत घेऊन येत नाही पण तिच्या वाट्याला ती येतात. काळानेच वेदना जाळण्याची आशा ती करते-

**"जन्मले तेव्हाच होती सोबतीला आसवे**
**एवढा नाही अजूनही लावला कोणी लळा" (पृष्ठ ३२)**
**"उडावी एक ठिणगी अन् जळावी वेदना माझी**
**इथे हातात काळाच्या असे भाते हवे होते" (पृष्ठ ८१)**

माझी न्यूनतेची पातळी तू ठरवू नकोस असे त्याला खडसावताना सहजीवन नको असेल तर राहिलेले अंतर एकमेकाशिवाय पार करण्याचा उपायही सुचवायला ती मागेपुढे पाहत नाही-

**"ठेंगणी की उंच मी ठावे मला**

**तू नको ठरवूस माझी पातळी**

**एकट्याने पार हे अंतर करू**

**राहूया तू वेगळा मी वेगळी" (पृष्ठ ३३)**

ती एवढ्यावरच न थांबता, वाट चुकण्याच्या आधी मागोवा घ्यायचा सल्लाही त्याला देते. आणि जगासारखा तू ही स्वार्थी निघालास, गरजेपुरतीच तुला माझी आठवण येते, असे सांगून एकदा तरी प्रेमाने जवळ घे भले मेल्यावर स्पर्श नाही केलास तरी चालेल असे सांगते. राधिका यांच्या ह्या द्विपदी किती बोलक्या आहेत पहा-

**"स्वतःचा घ्यायचा होतास मागोवा**

**परतणे शक्य नाही वाट चुकल्यावर**

**जगाच्या सारखा तू ही निघाला बघ**

**तुलाही आठवण येतेय नडल्यावर**

**कपाळी ओठ टेकव एकदा माझ्या**

**नको मग हातही लाऊस मेल्यावर" (पृष्ठ ३४)**

पुरुष प्रधान संस्कृती ने तिला दिलेल्या चिंता जन्मभर सरत नाहीत. ती म्हणते –

**"सोबती आजन्म चिंता चालल्या**

**सावल्या झोपेतही किंचाळल्या" (पृष्ठ ३५)**

आजही कोणी तिच्या प्रश्नांची दखल घेत नाही मुख्य प्रवाहात राहण्याची इच्छा असूनही तिला किनाऱ्यावर फेकले गेल्याची तिची भावना आहे-

**"आजही कोरेच माझे प्रश्न सारे राहिलेले**
**आजही नाही अपेक्षा कोणत्याही उत्तराची**
**मी किनाऱ्यावर कशाला फेकले गेले कळेना**
**आतमध्ये खोल होती ओढ एका सागराची" (पृष्ठ ३६)**

हल्ली इतकी मानवी मूल्यामध्ये घसरण झालेली आहे कि राक्षसापेक्षा आपल्या माणसाचीच भीती जास्त आहे, असे गझलकाराचे म्हणणे आहे-

**"राक्षसाच्या छान गोष्टी सांगते आजी अताशा**
**घालते भीती परंतु ओळखीच्या माणसाची" (पृष्ठ ३६)**
**"अता शेवटी एक आहे विनंती कळीला जपावी जरा आणखी**
**पुन्हा ओळखीचाच माळी कुणीतर तिचा देठ नाजूक खोडायचा" (पृष्ठ ४८)**

आपल्या माणसाने दिलेले दुःख अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी त्रास दिला तर दाद कोठे मागायची? त्यांनी स्त्रीचं अस्तित्व नाकारलं म्हणून स्त्री संपत नाही. अशाच आशयाचे हे शेर बघा-

**"हा दोष आपल्यांचा दुनियेस काय देऊ**
**मजलाच फाडते जर आहे गिधाड माझे" (पृष्ठ ६५)**
**"मला माझ्या पिलांसाठी लढावे लागते आहे**
**कुणी परका नसे खोप्यातला अपुला कुणी डसला" (पृष्ठ ३८)**
**"ह्या भिंतीचा दगड काढला अपुले म्हणणाऱ्यांनी**
**पाया पोखरणारी कोणी घूस वगैरे नाही" (पृष्ठ ३९)**

**"बहिणी बाळा जिकडेतिकडे सुखात माझ्या**
**कुणी कुणाला आपुलकीही दावत नाही" (पृष्ठ ४०)**
**"घ्यायची बाजू कुणाची दोष कोणा द्यायचा**
**उन्ह हे माझेच अन् माझाच माझाच हा पाऊसही" (पृष्ठ ३७)**
**"युगापासून आलेला शिरस्ता सांगतो आहे**
**तुझे ते घावही विकतील तुला मांडून बाजारी" (पृष्ठ ४१)**
**"म्हणायला जरी प्रत्येकजण माझाच होता पण**
**कुणाच्याही उरामध्ये जराही दाटले नाही" (पृष्ठ ४६)**

व्यवस्थेने लादलेल्या स्त्रीसमस्यांवर ती आता रोख-ठोक विचारू लागलेली आहे. राधिकाजी म्हणतात-

**"विषाचा लावला प्याला कळीने का बरे ओठी**
**अशा व्याकूळ प्रश्नावर खरे उत्तर कुठे आहे" (पृष्ठ ७१)**
**"मुक्त वाऱ्यासारखा तू राहतो आहेस अन्**
**आत माझ्या का मला रे कोंडतो आहेस तू" (पृष्ठ ४२)**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आली पण स्त्रीला अद्यापही किती स्वातंत्र्य आहे? असे ती विचारते. स्त्रीवाद हा राजकारणावर देखील भाष्य करतो आहे. या द्विपदी बघा-

**"तिरंगा आसमंती फडकताना पाहतो आपण**
**खरे सांगा किती स्वातंत्र्य पण उपभोगतो आपण?**
**इथे सत्तेवरी आलेत काही गारुडी आता**
**जरासी वाजते पुंगी सुखाने डोलतो आपण" (पृष्ठ ४३)**

जातीयत्तेबद्दल सुद्धा स्त्री आपल्या साहित्यातून परखडपणे आपले विचार मांडते-

**"नको ह्या जातपातीच्या निरर्थक वेगळ्या गोष्टी**

**कुणाच्या सावलीने कोण येथे बाटले नाही" (पृष्ठ ४६)**

स्त्री आपल्या साहित्यातून अंधश्रद्धेवर ही प्रहार करते- स्त्रीच्या समस्यांवर चिंताही व्यक्त करते-

**"भूत प्रेत अन् भोंदू बाबा सगळे माझ्या हाती**
**चिमटीमध्ये मीच पकडला माझा ईश्वर आहे" (पृष्ठ ४७)**

वाट्याला सतत अश्रू देणाऱ्या व्यवस्थेला स्त्रीवादाने दिलेले आव्हान पहा-

**"दुःख उभे हे पापणकाठी ओघळणारे नाही**
**माझे गाणे तुला जराही परवडणारे नाही**
**वरवर शोधत बसणे केवळ यत्न फुकाचा आहे**
**तुला आतले माझ्या काही सापडणारे नाही" (पृष्ठ ४९)**

तिला वाटते घरातील निर्जीव वस्तूला सुद्धा वेदना कळतात तुला का नाही? ती म्हणते -

**"अचानक थांबला पंखा कुणाचे पाहुनी अश्रू**
**घराचा हुंदका निर्जीव वस्तूलासुधा कळतो" (पृष्ठ ५१)**

स्त्री आता स्वावलंबी झाली आहे. आसवांना रंग नाही, जात नाही, निरर्थक आहेत हे ही तिला कळले आहे. तिच्या आत आता पूर्वीची ती राहिलेली नाही. ती म्हणते-

**"मी घरी नाही कुणाच्या**
**मी कुण्या दारात नाही**
**आसवांना रंग नाही**
**वेदनेला जात नाही**
**आज हे कळले मलाही**
**मीच माझ्या आत नाही" (पृष्ठ ५४)**

स्त्रियांनी दु:खाचे भांडवल करण्याचा पुरुषी कावा ओळखला आहे. त्यांना कळून चुकले आहे की इथे कुणीही संत नाही, साध्या माणसांनाच भेटण्याची आस त्यांना आहे-

**"जुन्या दुःखावरी येतीलही आता नव्या टाळया**
**पुन्हा होईल बघ चर्चा तुझ्या प्रत्येक घावाची" (पृष्ठ ६८)**
**“इथे प्रत्येक जण करतोय दावा संत झाल्याचा**
**मला भेटायला साधीच आणा माणसे काही" (पृष्ठ ५५)**

स्त्री आता वाऱ्याच्या वेगाने पुढे निघून गेली आहे, तिला कोणीही थांबवू शकत नाही. ती व्यवस्थेला आव्हान देते-

**"पाय वाऱ्याचे कधीही बांधता येतात का?**
**अश्व वेड्या कल्पनेचे डांबता येतात का?" (पृष्ठ ५९)**
**"तुझ्या धमक्या पुरे झाल्या मुळी मी घाबरत नाही**
**करायाचे तुला ते कर तुझ्या गावात आहे मी**
**हजाराच्या तुझ्या नोटा कधीच्या बंदही झाल्या**
**मला चिल्लर समजला तू तरी चलनात आहे मी**
**तुझ्या प्रत्येक प्रश्नाची उकल देईन मी दुनिये**
**समीकरणात आहे ना जरी कंसात आहे मी" (पृष्ठ ५६)**
**"पेन होता पण तरीही घेतली बंदूक मी**
**ढाळले अश्रू अगोदर हीच केली चूक मी" (पृष्ठ ७२)**
**चेहऱ्यावर तुझ्या डाग लाखो गडे**
**तू नको ना मला दाखवू आरसा" (पृष्ठ ७३)**
**"किती तोऱ्यात होता काल तो**
**कशाने आज आहे वाकला" (पृष्ठ ८२)**
**"तू तरंगावर नको जाऊस वेड्या**
**ह्या तळाच्या आत सुद्धा लाट आहे" (पृष्ठ ६१)**

**"मी बंध तोडलेही साऱ्याच चौकटीचे**
**आभाळ पण सुखांचे त्यांच्या पल्याड माझे" (पृष्ठ ६५)**
**"गुलामी मान्य नव्हती ठेवलेली ताठ कॉलर मी**
**मला मंजूर मरणे पण मला वाकायचे नाही" (पृष्ठ ८३)**

पुरुषाला ती बरोबरीच्या हक्कासाठी नको आहे पण भोगवस्तू म्हणून हवी असते. कावा मनांत ठेवून तो प्रेमाच्या खोट्या शपथा घेत सांत्वनाचा बाजार मांडतो त्यामुळे तिची संभ्रमावस्था वाढते-

**"नकोशी जरी आहे तरीही मी हवी आहे**
**कळेना नेमका मी कोणता संदर्भ लावावा**
**तुझ्या शपथा नको मजला तुझी वचने नको मजला**
**तुझ्या डोळयात आहे पाहिला मी काजळी कावा" (पृष्ठ ६९)**
**"मला निशब्द केले अन् पुन्हा कुरवाळलेले**
**जगाने सांत्वनाचा मांडला बाजार होता" (पृष्ठ ७४)**

परस्परांना समजून घेतले नाही तरी ती त्याच्यासाठी अनेक भूमिका बजावत असते-

**"एकमेकांना कधी समजू न शकलो**
**पात्रता नव्हती तशी नात्यात अपुल्या" (पृष्ठ ७९)**
**"मी शमा की देवयानी मी यदु**
**मी ययाती, कच, पुरू सांभाळते!" (पृष्ठ ६७)**

ती कधीतरी थोडी हळवी होऊन त्याला भावनिक अवाहनही करते-

**"मौन माझे बोलके समजून घ्यावे तू जरा**
**भावना शब्दात साऱ्या सांगता येतात का?" (पृष्ठ ५९)**

अनेक जन्म स्त्रीविवंचनेची मालिका काही सरत नाही, मग शेवटी ती विठ्ठलाला या पुढील जन्मी तरी बाईच्या भूमिकेत पाठवू नको अशी आर्त विनवणी करते

**"जन्म चाळावे किती केव्हा सरावी मालिका**
**विठ्ठला आता नको रे त्याच त्या ह्या भूमिका"(पृष्ठ २६)**

**समारोप :**

अशा प्रकारे आपण पाहिले की स्त्रीवाद पुरुषांना नव्हे तर पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतो कारण त्या व्यवस्थेद्वारे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही पुरुषाची भोगवस्तू आहे, अशी शिकवण पुरुषांच्या मनात बिंबवली जाते. इथे दोघांचे हितसंबंध एकच आहेत, दोघांची कर्तव्ये सारखीच आहेत. म्हणून सत्तेचे हस्तांतर हा स्त्रीवादात मुद्दाच नाही. स्त्रियांच्या साहित्यातील वैशिष्टय़ अधोरेखित करणे, ही स्त्रीवादाची गरज आहे. स्त्रीवाद हा प्रत्येक स्त्रीचा व्यक्ती म्हणून विचार करतो. त्यामुळे स्त्रीवाद ही जगातल्या प्रत्येक स्त्रीशी जोडली गेलेली कल्पना आहे असे गांधीजी म्हणत. त्याचप्रमाणे स्त्रीवादी चळवळ हा फक्त स्त्रियांचा प्रश्न नसून, पुरुषांची मानसिकता बदलण्याचा तो प्रयत्न आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, प्राचार्य गोपाळ कृष्ण आगरकर, महात्मा गांधी, दादा धर्माधिकारी, वि. का. राजवाडे आदींनी शतकापूर्वीपासून स्त्री-पुरुष समता व स्त्रीचे स्वातंत्र्य याबद्दल अतिशय उदारमतवादी विचारांची मांडणी केली आहे. राधिकाजींच्या काव्यातून व्यक्त झालेले स्त्रीवादी विचारही त्याला समांतर असेच आहेत.

**संदर्भ व टीपा:**


१) बोव्हार, सीमॉन द; अनु. गोखले, करुणा, द सेकंड सेक्स, पुणे, २०१२.

२) वाघमारे डॉ. जनार्दन, बदलते समाजजीवन आणि मराठी साहित्य, संपा. डॉ. र. बा. मंचरकर, सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०११, पृष्ठ ३७.

३) फराटे राधिका प्रेमसंस्कार, 'मी अस्सल प्रत जन्माची' (गझलसंग्रह), अष्टगंध प्रकाशन, ठाणे, प्रथम आवृत्ती ०१ एप्रील२०२१.


***

# साठोत्तरी मराठी साहित्यातील दोन आत्मकथनातील स्त्री जीवन


## डॉ. स्नेहा सुवास प्रभु महांबरे

सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख, सरकारी महाविद्यालय, सांखळी-गोवा.


**गृहितक –**

प्रत्येक व्यक्तीचा जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन असतो, तद्वत प्रत्येक व्यक्तीची जगण्याची आणि अनुभव घेण्याची तो अनुभव मांडण्याची वेगळी शैली असते. या शैलीमुळे अभिव्यक्त केलेल्या भावनाना विशिष्ट घाट प्राप्त होतो.

आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार मराठीत पूर्वी पासून रुढ आहे. आत्मचरित्र आणि आत्मकथन याच्या सीमा रेषा अत्यंत धूसर आहेत. आत्मकथन कथनाच्या अंगाने लिहिले जाते. आत्मकथनात घटना प्रसंग सांगताना कालानुक्रमाने उल्लंघन होते. कथात्म साहित्य चरित्रा प्रमाणे समग्र जीवनाचे दर्शन न घडवता जीवनाच्या अंश भागाचे व तुकड्यांचे दर्शन घडवते. आत्मकथनाला स्व कथन असाही शब्द वापरता येऊ शकेल. त्यात स्वतःच्या जीवनाची अशी कहाणी नसते तर स्वतः बरोबर समाज जीवनात जे काही आले ते वर्णन येते. कित्येकदा ज्या सामाजिक परिस्थितीमुळे आपल्याला ही जीवन भोगावे लागले त्याची चिकित्सा कित्येकदा अशा पद्धतीच्या कथनात केली गेली आहे.

यांना आत्मकथन म्हणावे की आलेल्या आठवणी एकत्रित केलेले संग्रह, कारण 'फुले वेचिता' हा संग्रह लता मंगेशकर यांच्या लेखांचा आणि पत्रांचा संग्रह आहे. 'एक धागा सुताचा' स्वातंत्र्याची स्मृती चित्रे हा संग्रह कमला काकोडकर (डॉ. अनिल काकोडकर यांच्या आई) यांच्या जीवनातील आठवणींचा आहे. या दोन्ही आपआपल्या ठीकाणी अतिशय दिग्गज अशा व्यक्ती आहेत.

'फुले वेचिता' (1997) हे लता मंगेशकर यांचे ग्रंथाली वाचक चळवळीने प्रसिद्ध केलेले पहिलेवहिले पुस्तक! याला प्रकाशक सांस्कृतिक घटना म्हणून संबोधतात. लतादिदीं बद्दल बरेच लिहिलेले आहे, परंतु त्यांनी

केलेले लेखन पुस्तक रूपाने असे प्रथमच प्रकाशित झाले. मधुवंतीसप्रे आणि श्री. उपेंद्र चिंचोरे यांच्या मदतीने १८ लेखयात समाविष्ट केले आहेत. शेवटी लताबाईंचे आळंदी येथील 'अखिल भारतीय साहित्य संमेलना'तील उत्स्फूर्त उद्घाटकीय भाषण आहे. लतादीदींचे मूळ नाव 'हृदया'चाही परिचय याच लेख संग्रहामुळे नव्याने होतो, शब्दाला गीत बनवताना ते शब्द जसे लपेटेतून येतात तसेच येथे गद्य लेखन ही सहजपणे त्यांच्या लेखणीतून स्त्रवलेले जाणवते.

**वैलिध्य पूर्ण आठवणी -**

'मी, लतादीना नाथ मंगेशकर' या लेखाने या संग्रहाची सुरुवात झाली आहे. आपल्या वडिलां विषयी असलेला अतीव आदर मनातून शब्दात आणि शब्दांतून कागदावर उतरलेला आहे. मा. दीनानाथांच्या आकस्मिक मृत्यूमुळे अवघ्या तेरा वर्षाच्या लतावर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आली. त्या काळात जे जे भोगावं लागलं, जगताना जे अनुभव आलेत ते अतिशय प्रामाणिकपणे आणि प्रांजळपणे येथे निवेदन केलेले आहेत.

'बाबा' या लेखात दीनानाथांच्या जाण्याने घरात झालेल्या बदलां विषयी लिहीले आहे. पाच ही मुलांना दिलेले संगीताचे शिक्षण, मुलांचे लाड करणारे, मनावर चांगले संस्कार व्हावेत, तसेच भाषा शुद्ध व्हावी यासाठी संस्कृत भाषेची लावलेली शिकवणी, आयुष्याच्या अखेरच्या काळात मित्रांनी अव्हेरलेले, परिस्थितीने गांजलेले, मनाने हताश आणि विरक्त झालेले दिनानाथ अशा अनेक रूपांचा लहान सहान उदाहरणातून लतादीदीनी आगळा वेगळा परिचय दिला आहे. एका नटा सोबतच त्यांच्या व्यक्तिमत्वात वत्सल पिता, जबाबदार कुटुंब प्रमुख, नाटक कंपनीचा मालक, एक श्रेष्ठ नट, गायक, कलंदर कलावंत, मुलांसारखा निरागस निर्मळ मनाचा जीवन साधक अशी ओळख करून देत थोर पित्याच्या पोटी जन्मला भला हे आमचे भाग्य आहे. अशा भावना व्यक्त करतात.

मुलींनी गाणे शिकावे यासाठी केलेले प्रयत्न सांगतात. त्या काळी पंजाब मधल्या पहाडी राग वेगळया धाटणीने गाऊन महाराष्ट्रातल्या गाण्याला वेगळे वळण लावले. एक महत्त्वाचा गायक नाटकातली गाणी गझल, कव्वाली हे प्रकार ही नाटकात गात. अनेक

गाण्यांना वेगळया लावलेल्या चालींमुळे लोकांनी त्यांना दोष दिला अशा ही काही आठवणी येथे त्यांनी नमूद केले आहेत.

'तिने स्वाभिमान शिकवला' या लेखात १९४२ मध्ये दीनानाथ गेल्या नंतरच्या माई विषयीच्या विविध आठवणी लिहिल्या आहेत. माईचे शुद्ध मती म्हणजे शेवंता नाव. माईने या मुलांना वाढविण्यासाठी अपार कष्ट घेतले, खस्त्या खाल्ल्या आणि तिच्या शिकवणुकीमुळेच आम्ही सारे काही करू शकलो. वैभव घरी आणले आणि ते अनुभवले. ती कृतार्थ होती, बाबांच्या जाण्या नंतर माईबाबा म्हणूनच भावंडां बरोबर कशी उभी होती हे ही त्या सहजपणे सांगतात. माई स्वतः उत्तम पेंटिंग करत होती आणि ती पेंटिंग अनेकांना भेट म्हणून ही देत होती, अशा काही हृद्य आठवणी त्यांनी या पुस्तकात दोहारल्या आहेत.

**लताजींची शैली –**

या पुस्तकातील मराठी भाषेचा एक वेगळा लहेजा वाचकांना सुखावतो. ती खास लता मंगेशकर यांची भाषा आहे. लहानपणीचे अनुभव ही विलक्षण ताकदीने लिहिले आहेत. विविध आठवणींचा सडा अवतीभवती आहे, त्यातील काहींची नेमके पणाने निवड करून शब्द धनात त्यांना सजवून वाचकांसाठी ही अप्रतिम अनुभवांची त्या मेजवानी देतात. लिहिण्याच्या ओघात आलेली अनेक विधाने सुविचार वाटावेत इतकी मौलिक आहेत.

आपल्या आजीच्या विलक्षण वेगवेगळया आठवणी त्यानी येथे लिहिल्या आहेत. आजी म्हणजे आईची आई! 'श्रुती धन्य जाहल्या ऐकून ते संगीत' या शीर्षका खाली आजीचा एक वेगळा स्वभाव रेखाटला आहे. ठेंगणी, सावळारंग, लांबट चेहरा, तापट स्वभाव अशी आजी अतिशय रसिक आणि मोठी कलावंत होती. शास्त्रीय संगीताचे अध्ययन केलेले नव्हते, तरी लोकगीतांचा प्रचंड साठा तिच्याकडे होता. खानदेशातील अहिराणी भाषा, लग्न कार्यात स्त्रियांनी म्हणावयाची गाणी, सासरी पाठवणी करतानाची गीते, शेतकामाची विविध गीते, देवाधिकांशी गाणी, आरत्या, भुपाळया, पदे अशा वैविध्यपूर्ण गीतांचा संग्रह तिच्याकडे होता. ही गाणी तोंडपाठ होती. आजी स्वतः पेटी आणि सतार वाजवीत. गीतातील भावनेला, रसाला, संवाद अशा चाली देखील ती देत असे.

आजीच्या आठवणी सांगत असताना नुरजहा, रोशनआरा, अख्तरीबाई, सैगल, कामण्णा, बडे गुलाम अलीखां, भीमसेन जोशी अशा श्रेष्ठ कलावंतांची, गायकांची लतादीदी ओळख करून देतात. रूढार्थाने आपण ज्याला आत्मकथन म्हणतो, तसे हे पुस्तक नाही. वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या प्रसंगी लिहिलेल्या लेखांचा संग्रह आहे. कुटुंबाची जबाबदारी आपल्या लहान वयात खांद्यावर घेऊन ती समर्थपणे पार पाडली. त्या काळचा समाज, सभोवतालची परिस्थिती यावर त्यांनी टाकलेले कटाक्ष येथे समजतात. 'फुले वेचिता' या संग्रहात आलेले लेख म्हणजे आठवणींना उजाळा देणे, गतस्मृती अशा हेतूने लिहिले आहेत. जे घडून गेले त्याचे स्पष्टीकरण कधी केलेले नाही.

काही व्यक्तींचा निकट सहवास लताबाईंना लाभला होता त्यांच्या स्वभावातील खाजाखोतजा त्यांच्या काही लखोबा इत्यादीचा अधून मधून उल्लेख आल्यामुळे ही चरित्रे व्यक्तिरेखा अधिक खुलून दिसतात. दीनानाथांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविण्याचे काम त्या येथे करतात. दीनानाथां विषयी वाटणारा नितांत आदर भाव व प्रेम यामुळे काही लेखात जिव्हाळा उत्पन्न झालेला दिसून येतो.

यातील शीर्षके ही लतादीदींचा स्वभाव अधोरेखित करतात. ‘सज्जन कलावंत’ या लेखात संगीतकार श्री निवास खळे यांचे काही अनुभव त्यांनी येथे नोंद केले आहेत. खळे यांचा वेगळेपणा सांगताना त्या लिहितात, ‘त्यांच्या चाली ऐकायला अतिशय गोड सरळ साध्या वाटल्या तरी गाणाऱ्याला त्या चालींच्या कठीण पणाची कल्पना आल्या वाचून राहत नाही’ त्यांची गाणी तालाला अवघड असतात आणि प्रत्येक अंतरात चाल बदलण्याचे त्यांचे तंत्र खास आहे. या जोडीने स्वर रचनेत चित्रे आहे, भावपूर्णत आहे, नवीन आहे, खोल आहे, या साऱ्याला शास्त्रीय ज्ञानाची पक्की बैठक आहे. मुख्य म्हणजे ते कुणाचेही अनुकरण करत नाहीत, अशारीतीने त्यांच्या गाण्याच्या माहिती विषयी सांगत असताना दुसऱ्या ओळीत खळे मात्र अतिशय शांत शोषित सुस्वाभावी आहेत सज्जन आणि कामाला प्रामाणिक आहेत असे अनेक गुण त्यांनी या छोटे खाली लेखातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

‘आमचे पप्पा’ या लेखात पंडित नरेंद्र शर्मा यांच्या आठवणी लिहिल्या आहेत. नरेंद्र यांची शैली आणि कविता सादर करण्याची ढब इतकी प्रत्यय कारी होती की दीदी हिंदीकडे आकर्षित झाल्या. हिंदीतील

उत्तम उत्तम साहित्य वाचण्याचा छंद त्यांना जडला. पंडित नरेंद्र विषयी त्या लिहीतात, 'या माणसाचा आवाका प्रचंड आहे, याला चालतं बोलतं ज्ञानपीठ म्हणायला हरकत नाही. 'आपली संस्कृती, आपल्या परंपरा, चालीरीती, धार्मिक जडणघडण, धर्म ग्रंथ, उर्दू शायरी, आधुनिक साहित्यातील प्रवाह, आपला इतिहास, युरोपियन इतिहास आणि इतर कितीतरी विषय इत्यादी महत्त्वपूर्ण संदर्भ त्यांच्या जीभेवर असत.'

'सुरातले नाते, नात्यातले सूर' या लेखात आपल्या धाकट्या बहिणीची म्हणजेच आशाताईंच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. लहानपणा पासून आशा ताई घरकामात कशा प्रवीण होत्या, परंतु शाळा अचानक पणे सोडून त्यावर्षी त्यांनी लग्न केले. त्यानंतरचे त्यांचे आयुष्य, गाण्यात स्वतः केलेले नावलौकिक. वसंत पवार, सुधीर फडके, वसंत प्रभू, बाळ पळसुले, श्रीनिवास खळे, दत्ता डावजेकर यांच्या सोबत केलेल्या गाण्यां विषयी त्या लिहितात. आशाला सगळ्या स्तराची गाणी चांगली गाता येतात, पण वेस्टर्न ढंगाची किंवा सेमीक्लासिकल कव्वाली तिच्या आवाजालाच पखल बसते, हे निरीक्षण ही त्या नोंदवतात.

'किल्ले पन्हाळगडा' त आपल्या मनाला असणारी निसर्गाची ओढ, वीस बावीस वर्षे पन्हाळयाच्या कुशीत घालवलेले दिवस. भालजी पेंढारकर, शांताराम बापू, विटी पाटील यांचे बंगले आणि त्याच वेळी पन्हाळयाचा भालजीं कडून समजलेला नवा इतिहास या साऱ्यांचा विचार करीत असतानाच पन्हाळयाचे निसर्ग सौंदर्य, तेथे नव्याने खरेदी केलेला बंगला आणि त्याचे उत्तम वर्णन करताना बदललेल्या पन्हाळयाचे चित्रण उदास आणि गंभीर वृत्तीने त्या करतात.

लता मंगेशकर यांची लेखन शैली ही रसाळ आहे. इतिहास आणि चरित्र या दोन्ही लेखन प्रकारांची सांगड घालण्याचा लेखिकेने प्रयत्न केलेला दिसतो. आपल्या सुबोध भाषा पद्धतीने येथे काही व्यक्तीचित्रे रेखाटली आहेत.संगीत क्षेत्राचा विशेष अभ्यास करणाऱ्याला ती उपयुक्त ठरणारी आहेत. रंगभूमी आणि नटयाबद्दल महाराष्ट्रात सर्वांनाच प्रेम व कुतूहल वाटत असते. आपल्या आवडत्या नटाचे खाजगी जीवन त्याला जीवनातील त्याचे अनुभव त्याचे यशापर्यंत व सुख दुःख यासंबंधी माहिती अशा लोकांना हवी हवीशी वाटत असते.

बाबांच्या मृत्यूचा प्रसंग अत्यंत हळुवार आणि भावपूर्ण रंगवलेली आहे. याव्यक्तींची चरित्राची साधने फारशी गोळा करावी लागली नाही कारण घरातीलच व्यक्ती असल्या कारणाने त्यांचे विषयीची मते ठामपणे इथे आलेली आहे वडिलांविषयी सार्थ अभिमान अनेक ठिकाणी व्यक्त झाला आहे. साक्षेपी पद्धतीने सत्यसंशोधन करण्याचा आणि समाजाला माहिती नसलेली नवीन माहिती पुरवण्याचा येथे उद्देश आहे.

नाटक मंडळीं, दिनकर कामण्णा, प्रसिद्ध नट्या यांची शब्दचित्रे यांच्यात रंगवली आहेत. शास्त्रशुद्ध रागदाऱ्यांची ही माहिती विवेचनाच्या ओघात सहजपणेआलेली आहे, त्यामुळे त्याकाळात असणारे प्रसिद्ध गायक, अभिनेता आणि त्यांचा मिलाफ याविषयी गाजलेल्या संदर्भातली माहिती येथे वाचावयास सापडते. संगीत, नाट्य, इत्यादी कलांचे मर्मज्ञ चित्रण येथे येते. बाबुराव पेंटर, दिनकर कामण्णा अशा विविध कला क्षेत्रातील कलावंतांची व्यक्तिचित्रे प्रसंगोपात रेखाटलेली आहेत. यासर्व कलावंतांशी लताबाईंचा प्रत्यक्ष परिचय असल्यामुळे त्यांनी केलेले त्यांच्या कलेचे मूल्यमापन यथार्थ झाले असून व्यक्तीदर्शने जिवंत वाटतात..

'फुले वेचिता 'यात मुख्यतः व्यक्तिदर्शनावर भर असल्या कारणाने ही सर्व चित्रे नमुनेदार झाली आहेत. श्री.पु.ल.देशपांडे यांच्या सारख्या मनोज्ञ उल्लेख यात आला आहे. अशा विविध क्षेत्रातील काही नामावंत व्यक्तींचा येथे परिचय करून दिलेला आढळतो. व्यक्ती चित्रांच्या रूपाने चरित्र वाङ्.मयात एका पद्धतीने भर पडली आहे. व्यक्तीचित्र म्हणजे कार्याचा फक्त परिचय नव्हे तर त्यांच्या कार्याच्या मांडणी ही कलात्मक पद्धतीने केलेली आढळते.

आत्मचरित्र हे भावगीतासारखे असते. भावगीतात माणसाचे विचार, भावना इत्यादींना वाट करून दिली जाते, नेमका तोच प्रकार आत्मचरित्रात असलेला आपणास सांगता येतो. आपल्या जीवनयात्रेत जे बरे वाईट अनुभव येतात ते लोकांना सांगून आपले हृदय हलके करून घेतो. आपला जीवन प्रवास हा मनुष्य करीत असतो. आपल्या जिवंत प्रवासाचा वृत्तांत हा भारावलेले मन हलके करण्यासाठी हा लिहीत असतो त्यात एक प्रकारची स्वयंस्फूर्तता असते. आत्मचरित्र लिहिण्यासाठी कला दृष्टी असावी लागते. अनेक धोरणे सांभाळावी लागतात. आपले अनुभव दुसऱ्याला सांगून आपले अंतःकरण हलके करण्याच्या जोडीने आपल्या अनुभवांपासून दुसऱ्यास काही बोध व्हावा हा हेतू त्यात असू शकतो.

'एक धागा सुताचा, हे कमला काकोडकर यांचे मनोगत चंद्रशेखर कुलकर्णी यांनी शब्दांकित केले आहे. हे ही आठवणींचे पुस्तक,

हा कमलाताईंचा पहिलाच संग्रह आहे .आपल्या आयुष्यासाठी सत्तर वर्षां पूर्वीपासून घडलेल्या प्रसंगाचे त्यांनी कथन केले आहेत. जगविख्यात शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांच्या यांची ही आई आहे. कमलताईंची जडणघडण कशी झाली हे येथे आलेल्या लेखातून आपल्याला सहजपणे समजते. हे आत्मचरित्र किंवा आत्मकथन असे रूढार्थाचे पुस्तक नाही. तटस्थ वृत्तीने आपल्या आयुष्यातील बालपणापासून प्रौढ होई पर्यंतच्या अनेक आठवणी यात शब्दबद्ध झाल्या आहेत. स्वदेश आणि स्वावलंबन हाच कमला ताई काकोडकर यांच्या आठवणी आणि अनुभवांचा गाभा आहे. ज्या वातावरणात कमलताई जगल्या लहानाच्या मोठ्या झाल्या मुलांना त्यांनी वाढवले, त्यात शाश्वत मूल्य सामावलेले होते. ही मुल्ये पैशाने विकत घेत नाहीत. आठवणी आणि अनुभव हीच ती शाश्वत मूल्य आहेत. यात आलेले निवेदन प्रांजल, प्रामाणिक आणि सरळ आहे. त्यांत विनयशील वृत्ती आणि धैर्य ही आढळते.

या दोन्ही पुस्तकात त्याकाळची परिस्थिती, घटना, आलेली पात्रे, घडलेले प्रसंग त्यास्त्रियां भोवतीच फिरताना दिसतात. लिहीत असताना नेमके काय सांगावे किती सांगावे याचे भान यादोन्ही लेखिकांची असलेले जाणवते कोठेही आत्मसमर्थनाचा दावा त्यात केलेला आढळत नाही.

श्री. होते नामांकित शिक्षक लेखक म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या शिक्षकांचा व्यवसाय सांभाळून त्यांनी आश्रमाच्या उद्धारासाठी बहुमोल कामगिरी केली. संतवाणीच्या वाचनामुळे काही याविषयी काही कौटुंबिक प्रसंगामुळे त्यांच्या अंतःकरणात अस्पृश्यांबद्दल व रंजल्यागांजल्या दीनांबद्दल गाढ सहानुभूती निर्माण झाली. अस्पृश्यांच्या सेवेचे कार्य करीत असताना त्यांना जे बरेवाईट अनुभव आले ते त्यांनी मोकळेपणाने सरस भाषा पद्धतीने वर्णिले आहेत. स्वतःच्या स्वभाव दोषांचा ही त्यांनी प्रांजळपणे उल्लेख केला आहे. अस्पृश्यांच्या आणि दलित वर्गांच्या उद्धारासाठी तन मन धन वेचणाऱ्या समाज सेवकाची  झाली होती.

ज्या काळात या लेखिका वावरल्या तो काळ आपल्या डोळया समोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात असलेले आपणास आढळते. बालपणापासून सुरुवात करून अनुक्रमे घडलेल्या काही घटना, प्रसंग, व्यक्ति, तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन चित्रण कमीकमी करून इतरांच्या सोबत या लेखिका वावरताना दिसतात. या घटनांमुळे, पात्र प्रसंगांमुळे मधून आपले जीवन लोकांसमोर ठळकपणे कसे येईल याचे लिहीत असताना बाळगलेले भान महत्त्वाचे ठरते. या लेखनात रुक्षता किंवा पाल्हाळीक भाव आलेला नाही. नेमकेपणाने प्रामाणिक

निवेदन करत प्रांजळपणे सत्य दर्शन घडवतात. ज्या घटनांमधून ठळकपणे व्यक्तिमत्व साकारू शकेल अशा मोजक्या घटनांची नोंद येथे घेतली आहे.

**निष्कर्ष -**

१) स्वदेश म्हणजे भारताप्रती असणाऱ्या मनातल्या भावना तीव्रतेने येथे व्यक्त झालेल्या आहेत

२) दोन्ही लेखिकांनी आपल्या आराध्यां विषयी असणारा आदर नि:संकोचपणे व्यक्त केला आहे.

३) साधारणपणे एकाच काळात लहानाचे मोठे होत असताना, नावारूपाला येत असताना प्रारब्ध किंवा नियतीमुळे जे काही अनुभव आले त्याचे चित्रण येथे वाचावयास सापडते.

४) या दोन्ही लेखिका ज्या काळात लहानाच्या मोठ्या झाल्या त्या समाजाचे सहज सुंदर आपल्या पद्धतीने आपल्या रसमय शैलीत केलेले चित्रण येथे आपणास वाचावयास सापडते.

५) इतिहासात अन्यथा इतर ग्रंथात ही जे उपलब्ध असू शकत नाही, असे काही प्रसंग अशा काही व्यक्ती ज्यामुळे आपले आयुष्य पूर्णपणे बदलू शकले; त्यांच्या सहवासाने समृद्ध होऊ शकले ते प्रसंग विनासंकोच लिहिलेले येथे आढळतात.

६) आपआपल्या कुटुंबीयांविषयी असलेला आदर, ममत्व प्रतीत होते

७) रूढार्थाने केलेली नोकरी, त्यावेळी झालेली आर्थिक ओढताण विनासंकोच माणसांच्या नावानिशी येथे आलेले आहे.

८) कोल्हापूर हा दोघांच्याही आयुष्यातला एक टर्निंग पॉईंट पुस्तकात दिसून येतो.

९) 'साठोत्तरी साहित्य' असे म्हणताना केवळ विशिष्ट जाणिवेतून निर्माण झालेल्या साहित्याकडे चिकित्सक अभ्यास या दृष्टीने संशोधक पाहतात अशा या एकाच दृष्टिक्षेपात सगळ्यांना पद्धतीने मोजण्याच्या वृत्तीने अशा सारखी अनेक विद्वतर माणसे दुर्लक्षित होतात.

१०) प्रत्येक कालखंडातील साहित्याकडे सम्यक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे, तेथे लेबल करणे उपयोगा चे नाही.

११) हे सारे ज्ञात असून ही अभ्यासकांच्या दृष्टीने त्याचे उपयोजन केले जात नाही. त्यामुळे एक वेगळा निरपेक्ष, निकोप दृष्टिकोन वापरणे आवश्यक आहे.

***

# ‘खुरपं’ –निसर्ग आणि मानवनिर्मित दु:खानुभावाचे चित्रण

प्रा. अजित जयराम जाधव
आठल्ये-सप्रे-पित्रेमहाविद्यालय,(स्वायत्त)देवरुख ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

‘खुरपं’ हा सुचिता घोरपडे यांचा कथासंग्रह आर्ष प्रकाशन, पुणे यांनी १ मे २०२० रोजी प्रकाशित केला आहे. प्रस्तुत कथा संग्रहातील एकूण दहा कथापैकी सात कथा या स्त्री केंद्री कथा आहेत. ग्रामीण स्त्रीची सुखदु:खे, तिच्या समजुती, चालीरीती, चाणाक्षपणा यासगळयांचे दर्शन या कथासंग्रहात दिसून येते.

**‘अवदस’** कथेत महापुरामुळे झालेल्या वाताहतीचे अतिशय भीषण असे चित्र लेखिकेने रेखाटले आहे. डोंगराच्या पायथ्याशी कृष्णेच्या काठाला वसलेल्या गावात तराळा कडून कोल्हापूर तालुक्याकडून ‘राधा नगरी धरणाचे दरवाजे उघडणार तेव्हा नदी काठच्या गावांनी सुरक्षितस्थळी जावे’ अशा आलेल्या सांगाव्यामुळे गावात एकच खळबळ माजते. अशा परिस्थतीत गावातील सरपंचाचे समर्थने तृत्व गावाला लाभते. सगळ्या गावाला गोळा करून डोंगरावरच्या विठ्ठलमंदिरात आणले जाते. सरपंच जानबाला पलीकडच्या गावाकडून मदत मिळविण्यासाठी पुरातून पोहून जाण्यास सांगतो. जानबाही मागचा-फूडचा विचार न करता पुरात उडी घेऊन पोहू लागला. पलीकडच्या गावाहून नाव घेऊन आला. जानबासारखे तरुणही महापुरात होड्या घालून लोकांना पलीकडे पोहचवण्यासाठी धडपडतात. जीवाच्या आकांताने नदीतल्या भोवऱ्यातून नावा सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्राणांची बाजी लावतात, त्यात जन्या, नाम्याला प्राण गमवावे लागतात. शेवटच्या क्षणी सगळयांच्या छातीशी पाणी आल्यावर जगण्यासाठी जीवाचा आकांत करणाऱ्या माणसांना होडीतून नेताना होडी भोवऱ्यात सापडते आणि नदीला अखेरचा घास मिळतो. अशा भीषण आपत्तीनंतर भकास झालेल्या गावाचे अतिशय हृदय चित्रण लेखिकेने केले आहे. कथेतील पात्रांचे ठळक चित्रण आणि कथेतील प्रसंग अतिशय हृदय व परिणामकारक झाले आहेत. लग्न,

महापुराने गिळंकृत केलेला घरदार, गुरंढोरं, जिवाभावाची माणसं गमावलेला गाव. लेखिकेने याकथेचा केलेला सकारात्मक शेवटही परिणामकारक, नवीजीवन दृष्टी देणारा दिसतो.

**'खुरपं'** कथेतील चंद्री आई बापाची एकुलती एक मुलगी. दिसायला देखणी असणाऱ्या चंद्रीला शहरातून शिकली सवरलेली स्थळं सांगून येत होती. पण लांबचे स्थळ बघण्यापेक्षा आसपासच्या गावातील, जवळचे स्थळ म्हणून शेतीवाडी असलेल्या एकुलत्या एका मुलाशी आपल्या मुलीचे लग्न लाऊन दिले. पण ज्याच्याशी संसार थाटला तो नवराच प्रचंड विक्षिप्त निघतो. दिवसभर कामाच्या नावा खाली बाहेर राहणं आणि विक्षिप्तपणाला चंद्री त्रासली होती. चंद्रीचे घर म्हणजे शेतातील खोपटे होते त्यामुळे तिथे शेजारपाजारही नव्हता. त्यामुळे मन ही कोणाजवळ मोकळे करता येत नव्हते. अपवाद फक्त बायजाक्काचा होता. बायजाक्का ही चंद्रीच्या पलीकडच्या शेतात काम करणारी असून चंद्रीला लेकीप्रमाणेच मानून खाऊपिऊ घालत होती. चंद्रीला नववा महिना असतो तेव्हा बायजाक्का बाळंतपणाविषयी खूप काही सूचना देते. चंद्रीला बाळंतपणाच्या कळा येऊ लागल्या तेव्हा खोपटात, आजूबाजूला कोणच नसते. चंद्री एकाकी असते. मात्र बायजाक्काच्या सूचना लक्षात ठेवून अत्यंत धीराने स्वत:चे बाळंतपण करते. एका अर्थाने चंद्रीचा पुनर्जन्मच होतो. तिचे धाडस वाखाणण्या जोगी आहे. तिच्या नवऱ्याला चंद्रीच्या बाळंतपणाविषयी काहीच वाटत नाही. चार दिवसांनी तो आपल्या बायकोला म्हणतो, "आता लई झाली ही सोंगं. जगात काय तू एकटी बाळतीन नाय झालीस. बास झालं नखरं आता. उठ पयलं, अन चल खुरपनाला. "असे म्हणून तिच्या पुढ्यात खुरपं टाकून तिला शेती कामाला लावतो. चंद्री वाटयाला आलेले दु:ख निमूटपणे सोसते.

'**माचुळी**' मधील कमळीच्या नवऱ्याला (विष्णू) दारुचे व्यसन आहे. दारू पिऊन आला की, कमळीला प्रचंड मारहाण करीत असे. नवऱ्याचा प्रचंड मार खाऊनही पोटच्या मुलीसाठी, मंजी साठी जगत असते. संसारासाठी नाईलाजाने मोलमजूरीला बाहेर पडावे लागत होते. पण तेही तिच्या नवऱ्याला मान्य नव्हते. तो तिच्या चारित्र्यावरच नशेपायी संशय घेऊन गरळ ओकाताना म्हणतो, "तुझ्या आईच्या तुझ्या. कुठं शेण ख्या गेली व्हतीस ग व्ह्यमाले.. धा डाव सांगून नाय ऐकत. कितीदा बजावलं गं रांडं तुला उंबऱ्याबाहीर पाय काढायचा नाय. तरीबी ऐकत नाहीस. गतकाळी आपलचं खरं करतीया. धा डाव

बजावलं त्या देसायाच्या बांदाला पाय लावायचा नाही. तरीबी कानात खुट्ट मारून बसतेस की गं उंडकमल्ले." नवऱ्याने आपल्या चारित्र्यावर संशय घेणे कमळीला सहन झाले नाही. आपण काहीही एकूण घेणार नाही असे आणि बरेच काही नवऱ्याला बोलते. कमळीच्या बोलण्याने तो अधिकच संतापतो आणि वरवंटा डोक्यात घालून तिला ठार मारतो. कमळी मेल्यानंतर घरातल्या फडताळात पुरून ती पळून गेल्याचे सगळयांना सांगतो पण रागाच्या भरात केलेल्या केलेल्या कृत्याचा पश्चाताप होतो. त्याने पण जेव्हा त्याची मुलगी घरात पोपडे उडालेल्या फडताळावर सारवणाचा हात फिरवते तेव्हा हाताला लुगड्याचा फाटका तुकडा लागतो. तो आपल्या आईचा असल्याचे ती ओळखते. तो तुकडा तसाच ओढल्याने विटा ढासळतात तेव्हा विटांमध्ये आईचा सांगाडा बघून मंजीची दातखीळ बसते आणि तिथेच कोसळते. मंजीच्या हातात पदराचा तुकडा आणि ढासळलेल्या भिंतीतीतील सांगाडा पाहून विष्णूही तिथेच कोसळतो. व्यसन आणि संशयामुळे उध्वस्त होणाऱ्या कुटुंबाची कहाणी या कथेत येते.

**'येडताक'** या कथेतील शिलाक्काला अकाली वैधव्य येते. पण आपल्या एकुलत्या एक मुलीला गोदीला ती जीवापाड सांभाळते. गोदी वयात आल्याने गोदीच्या लग्नाच्या काळजीने ती अस्वस्थ होते. शिलाक्काने जुळवून आणलेल्या सोयरिकीत भाऊबंद विघ्न आणत आहेत हे लक्षात आल्यावर शिलाक्काचा भाऊ पाठीशी खंबीरपणे उभा राहतो. आपल्या भाचीच्या लग्नासाठी तो पुढाकार घेतो. शिलाक्काच्या भाउबंदामुळे गोदीच्या लग्नात विघ्न येऊ नये म्हणून शिलाक्काचा भाऊ आपल्या गावीच सोयरिक ठरविण्यासाठी त्यादोघींना गावात बोलावून घेतो. शिलाक्का गोदीला घेऊन आपल्या भावाकडे मुद्याळाला निघू लागते. सोबत भाकरीचे गाठोडे तेवढे घेतले होते. बैलगाडीतून मायलेकींचा प्रवास सुरु झाला. बैलगाडीतून उतरून आडवाटेने पायी जाऊ लागल्या तोपर्यंत सायंकाळ झाली होती. एवढ्यात शिलाक्काला त्यांच्या मागून अनोळखी तीन माणसे येताना दिसली. शिलाक्काचे काळीज चरकले. मनात नको त्या शंका येऊ लागल्या. दोघींच्याही चालण्याची गती वाढली. ती माणसेही त्यांच्या मागेमागे येतच होती. हे पाहून अब्रूच्या भीतीने माळावरच्या जुन्या-पडक्या खोपटात आपल्या जवळचे गाठोडे भिरकावून पळू लागतात. कसे बसे मायलेकींनी घर गाठले. इतक्यात ती माणसेही तिथेच आल्याचे पाहून शिलाक्काला घामच फुटला. पण नंतर तिला भावाकडून कळते की, ती माणसे म्हणजे सोयरिक जुळवण्यासाठी आलेले निंबाळकर आहेत. हे कळल्यावर आपण

त्यांना चोर-लुटारू समजलो त्याबद्दल  शिलाक्का माफी मागते. अन निंबाळकरांशी गोदीची सोयरिक जमते. याकथे मध्ये कष्टकरी आई तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा भाऊ, आणि धीटपणे येणाऱ्या प्रसंगाला सामोरी जाणारी स्वच्छंद गोदी यांच्यातील नाते तरलतेने लेखिकेने रेखाटले आहेत.

**'लागिरं'** या कथेतील किसन्या अचानक झपाटल्या सारखा वागू लागतो. त्याच्या या वागण्याने बायको भारती, नववीत शिकणारी बहिण चंद्री आणि आई काळजीत असतात. शेवटी त्याची आई मांत्रिकाकडे नेण्याचे योजते. पण चंद्री आणि त्याची बायको मांत्रिकाकडे नेण्यास  विरोध करतात. सून आणि मुलगी यांच्या विरोधाला न जुमानता किसन्याच्या आईने गावातील रायबाच्या मदतीने गाडी करून महादू देवरूषाकडे घेऊन जाते. सोबत नाईलाजाने चंद्री आणि सून भारतीही असतात. देवरूषाची उपचार करण्याची अघोरी पद्धत इतरांच्या बाबतीत पाहिल्याने चंद्री वहिनीच्या मदतीने आपल्या भावावर कोणतेही उपचार न करता आईचे काहीही न ऐकता तालुक्यातील मानसोपचार तज्ज्ञाकडे घेऊन जाते. औषध उपचार केला जातो. चंद्री डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपल्या भावाला विश्वासात घेऊन बोलते तेव्हा पारगाव येथील एका मुलीवर अत्याचार होत असताना आपण काहीच करू शकलो नाही हे सांगतो. पण असे काही झालेच नाही. कारण ती मुलगी माझ्या वर्गातील होती  असे त्या मुलीचे वर्णन करून सांगते तेव्हा त्याच्यातील अपराधीपणाची भावना नाहीशी होऊन तो मानसिक धक्क्यातून बाहेर येऊन बरा होतो. पण चंद्रीवरच जेव्हा अत्याचार करण्याचा प्रसंग येतो तेव्हा धीराने आपली सोडवणूक करून घेते. लेखिकेने हा प्रसंग कमालीचा चित्रित केला आहे. ही कथा अंधश्रद्धेवर मात करणाऱ्या चंद्रीची कथा आहे.

**'चईत'** ही वेठबिगारी करणाऱ्या सुदामाची कथा. सुदामा वतनदाराची विहीर खोदायला आलेल्या धिप्पाड मजूराचा पोर. तो मजूर विहीर खुदाई करताना घडलेल्या दुर्घटनेत दगावतो. तेव्हा कनवाळू वतनदार त्याला सांभाळतात, आपल्या जागेत खोपटं बांधून देतात. पण पुढच्या पिढीतील मुलगा श्रीपत पाटील हा अतिशय कंजूष व मग्रूर असल्याने सुदाम्याला प्रचंड राबून ही पुरेशी मजूरी देत नाही. त्याच्यावर पोरासारखी माय करणारी जनाक्का आपल्या भाचीशी त्याचे लग्न लावून देते. लग्न झाल्यावर काटकसरीने संसार करणाऱ्या बायकोला घेऊन देवाला जावं म्हणून मजुरीचे पैसे मागणाऱ्या सुदाम्याला पाटील

हाकलून देतो. स्वत:च्या कुटुंबाच्या साध्या गरजा पूर्ण करू शकत नसल्याने निराश झालेल्या शेतावर राबणाऱ्या त्याला, चैत्राच्या भर उन्हात त्याची बायको 'आपल्या वंशवेलीवरील कोंब माझ्या उदरात वाढत आहे' अशी बातमी देते. तेव्हा त्याबातमीच्या आनंदाने पुन्हा कष्ट करण्यासाठी त्याला दहा हत्तींचं बळ येतं. त्याच्या मनात वैशाख वणव्याची भीती रहात नाही. अशी कष्टाळू शोषित मजुराची कथा सरंजामशाहीचे मग्रूर रूप दाखविते.

**'डबरणी'** पंचगंगेचा घाटावरील कासारवाडीत राहणाऱ्या अंशीची ही कथा. विनोदाच्या अंगाने जाणारी, ग्रामीण जीवनातील नवविवाहितेचे अंतरंग उलगडणारी आहे. अनुसया म्हणजेच अंशी आपल्या घरी स्वच्छंद मोकळया वातावरणात आई, वडील, भावाच्या मायेच्या पंखाखाली वाढलेली. तिच्या कडे वाकड्या नजरेने बघणाऱ्या टवाळटोळक्याला पायताणाने फोडून काढण्याचे धाडस तिच्यात असते. लग्न करून सासरी धाडलेल्या अंशीचे मन सासरी रमत नाही. दावणीला म्हैस बांधल्यासारखे तिला वाटते. नवऱ्याचे प्रेम तिला कळत नाही. त्यामागे तिचे अल्लड, स्वच्छंदी मन आहे. ती घरी येते तेव्हा भावाचे भावी पत्नीशी असणारे संबंध, त्यादोघांचे एकमेकांवरील प्रेम ती पाहते. वडील ही जावयाकडून अंशीचे वागणे कळल्यावर 'नवऱ्याला सोड चिठ्ठी दे तुझं दुसरं लग्न करू. 'म्हणून तयारीला लागतात. तेव्हा तिच्या मनाची हुरहूर वाढते. सोडचिठ्ठीच्या कागदावर सही करायला आलेला नवरा अंशीला, 'अनु तू आता माझ्या संग येणार नाहीस का?' असं व्याकूळ होऊन विचारतो तेव्हा तिला विलक्षण अपराधी वाटते. तिच्या मनात प्रेमाचा अंकुर फुटतो आणि ती नवऱ्याबरोबर जायला आतुर होते. अगदी सहज घडणाऱ्या घटनांतून अंशीच्या मनात पती-पत्नींच्या नात्यात निर्माण होणारे अनुबंध, त्याना त्याच्या अर्थाची अननुभवी नवविवाहितेच्या मनात निर्माण होणारी उकल लेखिकेने मिश्किलपणे रेखाटली आहे.

**'खेकडं'** भुताखेताच्या संकल्पना मनात निर्माण होईल असे गूढ वातावरण ग्रामीण भागात असते. दाट काळोख गर्द झाडी आणि निर्मनुष्य डोह यामध्ये अशा कथा जन्माला येतात. गावातले तरुण वाघ जाईला डोहात खेकडे पकडायला जायचे ठरवतात. डबल हाडा पेराचा नाम्या आणि रव्या आपल्या सवंगड्यासह डोहावर जातात. पण भयाण काळोख आणि भयाण वाऱ्यामुळे काहींच्या पोटात भीतीचा गोळा उभा

राहतो. तेथील आंबीरड्याच्या झाडाजवळ कोणी झपाटल्याची आठवण रंग्या बोलून दाखवतो. पण नाम्याच्या पृढाकाराने टिक्कीभर खेकडे ही गोळा करतात एवढ्यात डोहाच्या पलीकडे चालू झालेला दिवट्यांचा नाच बघून मुलांची हबेलंडी उडते. घाबरून पळत सुटणाऱ्या मुलांना “लेकांनो सुटलासा” म्हणत किंकाळी ऐकू येते, तेव्हा भरलेली टिक्की तेथेच टाकून मुले पळ काढतात आणि मुलांना घाबरविण्यासाठी काश्या नाना आणि तुक्यानी योजलेल्या क्लुप्त्यांनी खेकड्यांची मेजवानी त्यांच्या आयतीच पदरात पडते.

**‘किनव्या’** कथेत वैदू नवऱ्याच्या अपघाती निधना नंतर हिकमतीने आपल्या पोरीला वाढवणारी चंद्राक्का पोरीचं लग्न लावून देते पण हुंड्याची रक्कम पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे सासरी लेकीचा छळ होऊ लागतो. लेक ‘सासरी धाडू नको’ म्हणून विनवण्या करते पण ‘माहेरात जनम अन सासरात मरण’ हेच संस्कार झालेली ती परत परत लेकीला सासरी धाडत राहते. एके दिवशी सासरच्यांनी घराबाहेर हाकलून दिलेल्या पारूला गावचाच भाई बंद घरी आणून सोडतो. लेकीची स्थिती बघून चंद्राक्काला गलबलून येतं. तरीही पुरेसा पैसा-अडका जमवून पारूच्या अंगावर दागिने घालून तिला सासरी पाठवता येईल ही आस मनात बाळगून माहीत असलेली झाडपाल्याची औषधं घेऊन तालुक्याच्या बाजारात जाते. तिथे तिचा सगळा माल खपतो. पैसे ही मिळतात. सर्वत्र उपचार करून हरलेला एक इसम आपल्या मिरगीचे झटके येणाऱ्या मुलावर उपचारासाठी येतो त्याला चंद्राक्का औषध देते. ती बाजाराला निघून गेल्यावर मावस दिरा कडून नवऱ्याने दुसरे लग्न केल्याची कुवार्ता पारूच्या कानावर पडल्याने ते सहन न होऊन पारू आत्महत्त्या करते. मुलीला सजवून सासरी धाडूया आनंदात घरी परतलेल्या चंद्राक्काला पारूचा मृत देह दृष्टीस पडतो. चंद्राक्काने दिलेल्या औषधाने आपला पोरबरं झाला म्हणून कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या माणसाला नियतीचा खेळ धिटाईने परतवून लावणारी चंद्राक्का गाव सोडून गेल्याची वार्ता कानी पडते. मुलीला पोसण्यासाठी स्वत: समर्थ असूनही नांदती पोर माघारी आली तर समाज काय म्हणेल? ही भीती परंपरागत गैरसमजुतींचा मनावर असणारा पगडा यात एका निष्पाप जीवाचा अंत होतो. हे ही चित्र पुरेसे प्रातिनिधिक ठरते.

**‘उतारा’**या कथेतील आठ-नऊ वर्षांची सुमी आणि दिन्या ही दोन भावंडे आईविना पोरकी आहेत. बायकोच्या पाठीमागे आपल्या दोन्ही मुलांना बाप काबाड कष्ट करून सांभाळत असतो. आईच्यापाठी

मागे सुमीस्वत: उपाशी राहून दिन्याची भूक भागवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. गावातल्या पक्याच्या पाठून जाताना मसणवटीपर्यंत पोचलेली सुमी घाबरून घरी येते तिला झोपेत स्मशानातील भूत दिसते. भाऊ दिन्या पोटाची भूक भागवण्यासाठी चिंचा, आंबे गोळा करत भटकायचा. दिन्या उकीरड्याच्या बांधाला उलट्या करत असल्याचे गणू जेव्हा सुमीला सांगतो तेव्हा सुमी धावतपळत जाऊन त्याला घरी घेऊन येते. सरकारी दवाखान्यात न्यावा तर दवाखानाही बंद असतो. दिन्या तापाने फणफणतो. भुकेने व्याकूळ होतो. घरात काहीही खायला नाही अशा अवस्थेत आजारी दिन्याला बाप घरी परत येईपर्यंत खायला काय घालायचं या विवंचनेत पडलेल्या सुमीला, पक्या भावाला (गण्याच्या) तापातून उतारा पडावा म्हणून कोणाच्या तरी सांगण्यावरून मसणवटीत तिकटीला त्याच्या अंगावरून काढलेला उतारा ठेवण्यासाठी जाताना दिसतो. प्रसादाचे काही खायला मिळेल ते दिनूला खायला घालूया आशेने देवळात गेलेल्या सुमीला तिथे काही मिळत नाही तेव्हा स्मशानात पक्याने ठेवलेल्या उताऱ्याची आठवण होते. भीतीला बाजूला सारून आईचं नाव घेत भावाची भूक भागवण्यासाठी ती स्मशानात ठेवलेला भात आणून भावाला खाऊ घालते तेव्हा त्याचा ताप उतरतो. लेखिकेची ही कथा श्रद्धा-अंधश्रद्धा याबाबत अंतर्मुख होऊन विचार करायला लावते.

ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्य पूर्ण पैलू या कथांमध्ये दिसतात.

**कथा संग्रहातील प्रादेशिक शब्द :-**

वैरणीचा भेंडा, येळबाडणे, किनिट, तापत्रा, आडामोडा, छलकाठी पोरं, तावदारणे, बुळगं, टिक्की, आडामोडा, हरगल, तवरका, पायाबुडी, वाळलीवटवट, हेलकांदं, दिक्पाल, जीवाची माचुळी, डबरणी, किनव्या, येडताक, झनाना, न्याट, चईत, किनाट, घोम्बडी, काटकवाळ, भगटणे, काचबारणे, बेज्मी, बडीम, खोडवी, गुथ्थी, येडताक इत्यादी.

**उपमा :-**

ईळभर गल्ली, वनवासी काळंकुत्रं, खालीमान पाताळ धुंड्यानं शेतात चखोपटकेलं, मधाचा खंजीरच घ्यून बसलेल्या बायका, किसन्या मत्तीर फुकल्यागत सुटला व्हता, कौलाच्या मदन हट्टानं आत शिरलेली सोन्याची तिरीप, वांझोट्या उसास्याने भरून गेलेले आयुष्य, शेंबडात

माशी गुत्फाळल्यागत, म्हशीची शिंग म्हशीला जड नसत्यात, साजुगऱ्यागत, खेळ बेस्तरवार, पिवळं धोट्टं चाफ्याचं फूल इत्यादी

**शिव्या:-**हेमल्या, लुताड्या, हंट्या, पेताड, मुडद्या, सुकाळीच्या, भाड्या, गतकाळे, हांट्याच्या, वसाड्या, उंडकमल्ले, छत्तरशिंगी, इत्यादी.

**कथाशयाला पूरक अशा ओव्या -**

"लेकीचा जलम आतराळी दोड का...सोयरा रितीचा हुडका"... (अवदस)

"झुलत्या अंबरी पाऊस आला मिरगाचा
पाऊस मिरगाचा गं बाई आनंद सरगाचा"... (अवदस)
"ऊठ ऊठ शेतकरी बाळा, तोड रं पैजणचाळा
भूमातेची साद तुला. रानगंध लेवी भाळा."...(अवदस)
"अंबारीचा हत्ती ह्यो लुटला जाईना...
भावाची सर माझ्या कुणाला यीना...
माझं दळण गं कोण्या वाड्यात रांधतं...
गोकुळीस खागं माझं माहेर नांदतं"..(येड्ताक)
"अरं तुझ्या जीवासाठी आभाळात व्हईन घार
भाई राज सारे माझ्या छाया करीन तूजंवर
लेन्हंवा लुगडं मजला नाय लागत
ताईचा बंधू माझा तुझ्या जिवाचा आगत."..(येड्ताक)
"लाडकी माझी लेक, लेकीवाचून गमना,
सारवल्या भित्ती, वर काढल्या मैना"... (डबरणी)
"दळणदळयिती, बाह्या माझ्या लोखंडाच्या
बायामाझ्या गवळणीनं, घुट्या दिल्या एकांडाच्या".. (किनव्या)

**वाकप्रचार :-**

मूरकन पडणे, जीववारं हुरं होणं, ढगा आड जाणे, आभाळ कुंद होणे, झोंड उसळणे, दारूची लत लागणे, भेंडाळून जाणे, बुड टेकणे, यड्डालाक्कडु लावणे, दात येणे, कात्री लावणे, त्वांडखदबाळणे, कुक्कू वरबाड्न नेणे, पाठशिवणीचा खेळ, मनभराच्या येणा, हाडाच्या तुरकाट्या होणे, धोशा लावणे,

**म्हणी :-**

'दिस गेला रेटारेटी अन चांन्यानं कापूस वाटी', 'रोज मरंत्याला कोणरडं', 'म्हशीला म्हशीची शिंगं जड नसत्यात', 'नकट व्हावं पण

धाकटं होऊ नये', 'सरणावरच ढोपातुर भोगवटा चुकत नाही बाईच्या जन्माचा'. लेखिकेने हा कथा संग्रह ग्रामीण कथाकार महावीर जोंधळे व इंदुमती जोंधळे यांना अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली आहे. कथासंग्रहाचे मुखपृष्ठ ग्रामजीवनाशी संबंधित असून रंगसंगतीही भावणारी आहे.

कथासंग्रहातील कथांना ग्रामीण समाजातील स्त्री दु:ख व परकेपणाची शोकांत पार्श्वभूमी आहे. ग्राम जीवनातील पारंपरिक चालीरीती, प्रतिकूल परिस्थितीत जीवावर उदार होऊन आपले कर्तव्य बजावणारा गावगाडा, उपजीविकेसाठी करावा लागणारा संघर्ष, मोकळ्या ढाकळ्या निसर्गात, मातीत रमणारी साधी भोळी माणसं, स्वत:ची अस्मिता टिकवून ठेवणाऱ्या स्त्रिया आणि ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण यामुळे हा कथा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

**संदर्भ:-**

१. 'खुरपं' सुचिता घोरपडे आर्ष प्रकाशन, पुणे, १ मे २०२०

***

# बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं'या आत्मकथनातील समाजजीवन


प्रा. कविता वामन कटारे
सहाय्यक प्राध्यापक, एच. पी. टी. आर्ट्स & आर. वाय. के. सायन्स कॉलेज, नासिक


मराठी स्त्रीचित्रण आणि मराठी स्त्रीवाद साहित्य यात फरक आहे आणि तो वृत्तिदर्शक आहे. खरंतर 1920 नंतर फार मोठ्या प्रमाणात मराठी स्त्रीच कौटुंबिक दुःख, तिचं जगणं, तिचे प्रश्न आस्थेने मांडले गेले. स्त्रीशिक्षण, नीति - अनीती, रूढी - परंपरा, अंधश्रद्धा, स्त्री मनाची अगतिकता गांभीर्याने व्यक्त झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तर कथा, कादंबरी बरोबरच संशोधन, समीक्षा आणि वैचारिकता या प्रदेशातही लेखिकांनी संचार केला. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, विजया राजाध्यक्ष यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल.

सुप्रसिद्ध लेखिका सानिया यांनी म्हटले आहे की, 'स्त्रीचा माणूस म्हणून विचार करणे, तिच्याकडे बघण्याचा तोच मूलभूत दृष्टिकोन असणे, माणूस म्हणूनच तिला वागविणे हा स्त्रीवाद होय.' भारतीय समाजव्यवस्थेत आजही स्त्रीचे दुय्यम स्थान आहे हे नाकारण्याचे कारण नाही परंतु म्हणून युरोप अमेरिकेकडून आलेल्या विचारप्रभावाने आजच्या काही स्त्रीवादी लेखिका लिहीत आहेत, हेही वास्तव आहे. स्त्रीस्वातंत्र्य हा स्त्रीवादाचा कणा आहे. पण त्यासाठी युरोप किँवा अमेरिकेकडे जाण्याची गरज काय? फुले -आगरकर किंवा ताराबाई शिंदे सारख्या सामाजिक भान असलेल्या स्त्री लेखिकेने स्त्री - स्वातंत्र्याच्या पाऊलखुणा 19 व्या शतकात रोवलेल्या आहेत.

साठोत्तरी मराठी साहित्यात महत्त्वाच्या तीन चळवळींचा समावेश होतो व त्यात दलित साहित्य चळवळ महत्त्वाची आहे. या चळवळीने लोकशाहीकरणाला वेग दिल्याचे श्री देशमुख म्हणाले. दलित साहित्य चळवळ हे मराठी साहित्य चळवळीचे वैभवशाली पर्व आहे. भारतीय साहित्याला मराठी साहित्याने दिलेली मोठी देणगी आहे.आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह ही दलित साहित्याची आशयसूत्रे होती जीवनाचे सत्य सांगितले पाहिजे, मानवमुक्ती शोधली

पाहिजे ही या साहित्याची महत्वाची भूमिका होती.या साहित्य चळवळीत 'आत्मकथा ', व ' कविता' या साहित्य प्रकारात विपुल लेखन झाले. या साहित्याने भारत व जगाला महान कवी नामदेव ढसाळ यांच्यासह दया पवार, बाबुराव बागुल, दत्ता भगत, शरणकुमार लिंबाळे आदी साहित्यिक दिले. त्यात कवयित्री व लेखिकांचाही समावेश होतो.यात शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, हंसा वाडकर, उर्मिला पवार, इत्यादी. लेखिकानी या साहित्यात मोठी भर घातली आहे 'जीणआमुचं', ही साहित्यकृती खूप महत्त्वाची आहे. (१९८६) रचनेच्या संदर्भात सामाजिक जवळीक साधणारी आहे. महार समाजाचे सर्व पैलू यात आढळतात. लग्नविधी, सासुरवास, बाळंतपणे, नवससायास, अंगात येणे इत्यादी बद्दलची माहिती तपशिलाने दिलेली आहे. तपशील आणि पाल्हाळीक्ता नजरेत भरणारी आहे उदा. महारवाड्याची माहिती देतांना तेथील दारिद्रय, साथीचे रोग, या रोगाने मरणारी माणसं, धनुर्वातासारखे आजार न कळल्याने अंधश्रद्धेच्या आहारी जाणे, भूत पिशाच्च काढणे, त्यासाठी देवऋषींनी केलेले हाल, उतारा टाकणे, उपास तापास, तेथील कधीच न शमणारी भूक, त्यासाठी निवडुंगाचे बोंडे खाणे, ते खाल्ल्यावर माणसाचे होणारे हाल, पड मिळावी म्हणून मुद्दाम म्हशीला औषध चारून मारणे. ती मेल्यावर माणसांची होणारी झुंबड, त्यांचे वाटे इत्यादींची त्या विस्ताराने माहिती देतात. मात्र हे सगळे विस्ताराने सांगण्यामागे प्रबोधनाची भूमिका आहे. समाज सुधारावा यासाठीची तळमळ आहे. त्या आपल्या निवेदनात म्हणतात, "पन्नास वर्षाच्या काळातील मला कळत असणाऱ्या बारीक सारीक गोष्टी न लाजता, प्रत्यक्ष त्यांची मांडणी केली आहे. इथे वाचकांनाही लाजण्याचे कारण नाही, कारण पन्नास वर्षा मागील महारांचे हे जिण प्रत्यक्ष कोणतं होतं, कोणता अनुभव होता आणि अस्पृश्य समाज गुडघ्यात मान घालून ढसाढसा रडत होता. गुलामीच्या बंधनांनी तो संपूर्ण जखडलेला होता. ही आवस्था आजच्या माझ्या मुलं नातवंडांना, लेकीसुनांना दाखवण्याचा एकच हेतू आहे की, लाखो वर्ष गुलामगिरीच्या बेड्या हातात अडकवून जगणारी खरीखुरी देशाची लेकर कसल्या अग्निदिव्यातून बाहेर पडली

आहेत, हे भावी पिढीला कळायला हवे. त्याशिवाय लाखो पिढ्यांनी न केलेले कर्तव्य एकट्या भिमान करून दाखवलं हे कळणार तरी कसं? ही जी जगण्याची हिन अवस्था दाखवली आहे ती काही आपण स्वखुशीने पत्करलेली नाही. एका विशिष्ट समाजाने पत करायला लावलेली आहे.".

बेबी कांबळे यांचे 'जिण आमुच' हे आत्मकथन आहे. त्यांची निवेदन शैली ही लेखनानुगामी असण्यापेक्षा कथनानुगामी अधिक आहे. कथनाचा तिला अधिक बाज आहे ग्रामीण दलितांच्या बोलीचा अकृत्रिम वापर त्यांनी केला आहे. दलितांच्या जीवनातील नित्याच्याच प्रसंगातून त्यांच्या जीवनातील अपार दारिद्र्य आणि करुणामय जिणे त्या सहजपणे मांडतात. हे मांडताना त्यांनी कुठलीही पोज घेतलेली नाही त्यामुळे कारुण्य, मिस्किलपणा उपहास आणि भाष्य यांचे बेमालुम मिश्रण त्यांच्या निवेदनात आढळते. त्यांच्या लेखनात समाजाविषयीचे अनेक बारीक सारीक तपशील येतात, महारवाड्यातील नित्याच्या व्यवहारातील शब्द, शिव्या, म्हणी, गाणी इत्यादीही येतात.

जीन आमुचं' हे बेबी कांबळे यांचं आत्मचरित्र 1987 मधलं. दलित स्त्रीनं लिहिलेलं बहुधा पहिलं आत्मचरित्र. हे आत्मचरित्र मासिकातून प्रसिद्ध झाल्याने अवघ्या अकरा प्रकरणाचं आहे. खरे म्हणजे हे आत्मचरित्र असे नसून बेबी कांबळे यांच्या बालपणीच्या आठवणींचा, आंबेडकरांच्या विचारांचा आणि लेखिकेने वेळोवेळी केलेल्या भाष्यांचा संग्रह आहे. या आठवणीतही लेखिका प्रमुख व्यक्ती नाही. या आठवणींना आतिशय सैल असा कालानुक्रम आहे. ह्या आठवणी व्यक्तिकेंद्री नसून एखाद्या समाजशास्त्राच्या पुस्तकातील वर्णनात्मक लेखांप्रमाणे आहेत. पुरंदर तालुक्यात वीर गावी आजोळी 1918 च्या सुमारास बेबी कांबळे यांचा जन्म झाला. मुलगी मेली असे समजले गेल्यावर योगायोगाने ती जिवंत असल्याचे कळले आणि या तान्ह्या मुलीचा पुनर्जन्म होतो. त्यानंतर मग महारांच्या घरांचे, घरातील भागांचे, देवदेवतांचे पोतराज व इतर वस्ती वर्णन येऊन शेवटी महारांच्या जीवनावर भाष्य येते. दुसऱ्या प्रकरणात महारांच्या बायका - मुलांच्या अंघोळी, पोतराजांचे वर्णन, लकामाई संचारणे आणि अंगात येण्याचे वर्णन येते. अंगात येण्याचे वर्णन व्यक्तीसंदर्भ निरपेक्ष असल्याने कंटाळवाने होते. तिसऱ्या प्रकरणात आषाढी अमावस्येला होणाऱ्या रेड

जत्रेचे वर्णन. जनावरांची क्रूर कत्तल आणि पुन्हा अंगात येण्याचे तपशीलवार वर्णन हे भाग आल्यावर शेवटी हिंदू धर्मावर कडवट भाष्य येते. चौथे प्रकरण एका काल्पनिक किश्याने सुरू होते. दलितांच्या भंग पावणाऱ्या स्वप्नांवर मग भाष्य होते...पाचव्या प्रकरणात महारवाडयातील श्रीमंत आजा आजीचे घर, ते करत असलेली शेजाऱ्यांना मदत, गुळ म्हणून मातीचा नागोबा चुरणारा गणपत आणि त्या संदर्भात पुन्हा हिंदू समाजावर भाष्य, पहाटे महारवाड्यात होणारी जात्यावरची गाणी, महार स्त्रियांची कष्टमय दिनचर्या, सवर्ण बायांची त्यांच्याशी तुसडी वागणूक, गावातील सामाजिक स्तरांची उतरंड आणि पुन्हा या समाजव्यवस्थेवर टीका करणार भाष्य अशा बऱ्याच गोष्टी येतात. सहाव्या प्रकरणात महार स्त्रियांचे बाळंतपण, त्यांची होणारी परवड, पाणी आणि शेक या दोनच साधनांचा वापर, सुईण, बालमृत्यूचे प्रमाण, पाचवीची पूजा, त्या संदर्भातील हिंदू धर्मावरचे कडवट भाष्य.

सातवे प्रकरण सोळाव्या वाट्याच्या श्रीमंत महाराच्या घरातील अन्न साठवणीच्या वर्णनाने सुरू होते. नंतर येसकराचे वर्णन, येस्कर आणि सवर्ण यांचे संबंध, गावातल्या लग्नातील येस्करावर पडणारी उकिरड्यावरची कामे, त्याला मिळणारे उष्टे अन्न, मृत्यूवार्ता, कफनवस्त्र वगैरेंचे संदर्भ आणि या सर्वांवर सामाजिक विषमतेच्या चिडीतून केलेले धारदार भाष्य हे भाग येतात. प्रकरणाच्या शेवटी महारांच्या भयानक आर्थिक विपन्नावस्थेचे वर्णन येते. आठव्या प्रकरणात हिंदू धर्माला धरून होणारे पण नवरदेव, विहीण यांना त्रास देण्याचे विशेष मार्ग असणारे महारांचे पाच-सहा दिवस चालणारे लग्न नेमकेपणाने उभे केले जाते आणि मग येते बालवयाच्या नव्या नवरीची सासरी होणारी अमानुष छळवणूक. याच छळवादाचे नमुने मांडत नवे प्रकरण सुरू होते. सुनेचे नाक कापणे, तिला मारहाण करणे, तिला खोड्यात घालणे अशा पाशवी उपायांनी सासवा आपल्या उट्टे कसे काढत याचे भेदक वर्णन करत असतानांच हे थांबविण्यासाठी आंबेडकर यांनी केलेल्या हिंदकोड बिलाचे गुणगान बेबीताई कांबळे करतात. दलितांच्या उद्धारासाठी आंबेडकर यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत हे प्रकरण संपते. दहाव्या प्रकरणात फलटणच्या शाळेचे अनुभव येतात. अस्पृश्य मुलींचा गट, त्यांची सवर्ण मुलींशी होणारी भांडणे, आंबेडकर चळवळीने भरलेला दलित तरुण वर्ग, फलटणची आंबेडकरांची सभा, शंकर वाघ काळाराम मंदिर प्रवेश आणि दलित

संघातील फुटीरवादी प्रवृत्तीवर कडक टीका असे भाग येतात. अकरावे प्रकरण संपूर्ण भाष्य आहे, ते म्हणजे आपल्या समाजाला विसरलेल्या आंबेडकरांचीमुल्ये दूर सारणा-या संपत्ती व सत्तालोलुप सुशिक्षित पण कृतघ्न मुठभर शहरी दलित समाजावरचे.

अनौपचारिक पद्धतीने ग्रामीण अशा स्त्रियांच्या भाषेत लिहिलेले हे पुस्तक काही प्रमाणात आत्मचरित्र आहे, पण यात व्यक्तीचा विचार नाही; पण त्यात चटपटीतपणा आणि आकर्षक वृत्त निवेदन नाही; फार मोठ्या प्रमाणात प्रकट चिंतन आहे, मात्र दलित स्त्रीच्या दृष्टिकोनातून केलेले हे दलित समाजाच्या अंतरंगाचे, विशेषतः स्त्रियांच्या जिन्याचे इतके स्पष्ट चित्र या आधीच्या कोणत्याही आत्मचरित्रात नाही.बेबी कांबळे यांच्या लेखनात ग्रामीण बोलीभाषेचे आणि शिष्ट प्रमाण भाषेचे मिश्रण आहे. अंघोळीचे रूप 'आंगुळी', वाघोबाचे रूप 'वागुळी,' असे बेमालूम पणे कधी बदलेल हे सांगता येत नाही. त्यामुळेच दोन बोलींचा वापर करूनही लेखनात कृत्रिम पणा येत नाही. बेबी कांबळे भाष्य करताना मात्र जाणीवपूर्वक शिष्टभाषा वापरतात, आम्ही तुमच्याविरुद्ध चाललो नव्हतो ना, तुम्ही पुजा आर्चा केली तर आम्ही नमाज तर पढले नाहीत ना, तुम्ही गाईला पूज्य मानलं तर आम्ही तिची अवहेलना तर केली नाही ना, आम्ही सगळया हिंदू धर्माच्या चालीरीती मनोभावे जोपासल्या मग तुमचा डोळा आमच्यावरच का ? आशा शिष्ट भाषेत ते भाष्य करतात.

दलित जीवनातील जात्यावरची गाणी आणि त्यातील लग्नातील गाणी हे या आत्मचरित्राचे आणखी एक वैशिष्ट्य. दया पवार, लक्ष्मण माने, शंकरराव खरात यांच्या लेखनात अभावाने असणारा विनोद बेबी कांबळे यांच्या लेखनात मात्र आहे. नवरदेव बंडी, धोतर, पटका या पोशाखात 'पिकातल्या बुजगावण्यासारखा' दिसायचा असं सहजपणे त्या म्हणतात, निखळ विनोदाकडून उपरोधाकडे जाण्याची क्षमता ही बेबी कांबळे यांच्या लेखनात आहे, वाहणारा रक्तस्त्राव धरण्याला त्यांना साधी चिंधी मिळू नये एवढी तर ही पापी जनता', धर शिक्का मार्क कपाळावर महाराच्या पोराकडून असं काही जगावेगळ घडायचं होतं म्हणून हे तरी लिहीत बसणार!" अशी काही उदाहरणे

देता येतील. भाषेचे आणि प्रस्तुतीकरणाचे हे विविध विशेष या आत्मचरित्राचे एक विशिष्ट रूप बनवतात. हे आत्मचरित्र म्हणजे एक अनौपचारिक कथन आहे असे वाटते. या कथनातील माणसं व्यक्ती म्हणून महत्त्वाची नाहीत. तर या कथनातले प्रसंग स्थलबद्ध नाहीत. या प्रसंगाचा रोख व्यक्तिकथा नाही. त्या प्रसंगातून जे घडते, जे जाणवते ते कोणीही दलितांच्या बाबत घडू शकते. ही व्यक्तीनिरपेक्षता या आत्मचरित्राला सामाजिक वास्तवाचे भान आणून देते. पण परिणामतः महार नावाच्या एका समूहाचे, कोण्या एका गावचे, कोण्या एके काळचे, नित्याचे अस्तित्व असे होते एवढाच ठसा या आत्मचरित्रातून उमटतो. जीन आमुचं ह्या आत्मचरित्रातून मोळी विकणाऱ्या, कष्ट करणाऱ्या स्त्रिया दिसून येतात. या स्त्रिया डोक्यावर मोळी घेऊन विकायला जातात मोळी विकून त्या पैश्यातून कुटुंबासाठी आवश्यक त्या वस्तू घेऊन येतात. घरी आल्यावर मुलांना स्वयंपाक करून खाऊ घालत असतात नंतर स्वतः जेवत असतात. तत्कालीन समाजात दलित स्त्रियांना असे उपासतापास करून काबाडकष्ट करावे लागत असे. हे चित्रण प्रगट केले आहे. आज २१ व्या शतकात स्त्रियांची परीस्थिती खूप सुधारलेली असली तरी तिला तिच्या कर्तव्यातून मुक्ती मिळाली नाही आज ती स्वतंत्र विचार करू लागली आहे तिच्याही मतांना आज मान मिळत आहे.

***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे आत्मचरित्र लेखन : स्थान महत्त्व

**डॉ. सुमन बजरंग जाधव**

साठोत्तरी मराठी साहित्यात अनेकविध लेखन प्रवाह निर्माण झाले आहेत. यांमध्ये प्रमुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य यांचा समावेश होतो. आत्मचरित्र हा साहित्य प्रकार स्त्रियांना अधिक जवळच वाटणारा आहे. आत्मचरित्राच्या प्रेरणा पहिल्यातर याची आपणास जाणीव होते. आत्माविष्कार, हितगुजकरणे, जीवनात घडून गेलेल्या गोष्टीबद्द्ल घटना, प्रसंग यांची कबुली देणे, आपले अनुभव सुख – दुःख इतरांना सांगणे या सर्व गोष्टींचा स्त्रीच्या जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. मराठी साहित्याची आत्मचरित्र लेखन परंपरा पाहता आपणास याची खात्री पटते. अगदी सुरुवातीच्या कालखंडातील पंडित रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आत्मचरित्राने मराठीतील आत्मचरित्र लेखनाची सुरुवात झालेली आहे. मराठी आत्मचरित्र लेखनाचे मानदंड म्हणून ओळखली जाणारी साहित्यकृती ही एका स्त्रीची आहे. ती म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृती चित्रे' हे आत्मचरित्र होय. मराठी साहित्यात स्त्री आत्मचरित्राला प्रदीर्घ अशी परंपरा लाभली आहे. प्रस्तुत ठिकाणी आपण साठोत्तरी मराठीतील स्त्री आत्मचरित्र / आत्मकथनांचा विचार करणार आहोत.

**उद्दिष्टे**

१) साठोत्तरी स्त्री आत्मचरित्र / आत्मकथन लेखन परंपरा विशद करणे.

२) साठोत्तरी स्त्री आत्मचरित्र / आत्मकथनांचे वेगळेपण नमूद करणे.

साठोत्तरी मराठी साहित्यावर नवविचारांचा परिणाम जाणवतो. या नव विचारधारेच्या प्रवाहांतून विविध साहित्य प्रकारांचे वैशिष्ट पूर्ण लेखन झाले आहे. विविध क्षेत्रातील स्त्रियांना आत्मचरित्र लेखन केले आहे. यांमध्ये प्रामुख्याने साहित्य, समाजकारण, राजकारण, चित्रपट, शिक्षण यां क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्त्रिया व नामांकित पुरुषांच्या पत्नीच्या लेखनाने वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आधुनिकीकरण व त्याचे कुटुंब व्यवस्थेवर झालेले परिणाम आपणांस या आत्मकथनांतून दिसतात. आधुनिक कालखंडातील स्त्रिया या 'चूल आणू मूल' या चौकटी बाहेर पडून स्वत: चे 'अस्तित्व' निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. स्त्रियांच्या आत्मचरित्र लेखना मागील भूमिका विविधांगी आहे. काहींची आत्मचरित्रे गतकाळातील आठवणींना उजाळा देताना दिसतात. काही जणी आपल्या आयुष्यातील कालपटाकडे संयतपणे पाहतात पती सापेक्ष भूमिकेतून न पाहता आत्मशोध घेण्याचा प्रयत्न अनेकींनी केलेला आहे. समाजव्यवस्था व त्यांतील आपले स्थान शोधताना स्त्रिया अंतर्मुख होताना दिसतो. आपल्या आयुष्यातील घटना प्रसंगा बरोबरच समाज भान जोपासणारी आत्मचरित्रे स्त्रियांची आहेत. एक सामाजिक दस्तऐवज म्हणून ही या आत्मचरित्राचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील घडामोडींचा आढावा घेताना आपला सांस्कृतिक वारसा जतन करण्याकडे स्त्रियांचा कल विशेष उल्लेखनीय आहे. या दृष्टीने 'नाच गं घुमा' – माधवी देसाई यांच्या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागेल. तर या रूढीपरंपरा मागील संदर्भ जाणून घेण्याची व आधुनिक काळात त्यांचे संदर्भ लावण्याची कमल पाध्ये यांची भूमिका अधिक सजग आहे. कोणतीही गोष्ट करण्या मागील शास्त्र शुद्ध कारण मीमांसा व त्यातील भूमिका याचे समाजात असणारे स्थान शोधताना दिसतात.

साठोत्तरी आत्मचरित्रातील काही आत्मचरित्रे पुढील प्रमाणे:

'ढळलारे ढळला दिन सखया' व उमटलेली पावले 'राधाबाई आपटे, 'द्रौपदीची थाळी' गिरीजा केळकर, 'गेलेते दिवस' - सत्यभामाबाई सुखात्मे, - 'मीच हे सांगितले पाहिजे' शिलवती केतकर, 'गोदा तरंग' - सुधाअत्रे, 'जेव्हा माणूस जागा होतो' – गोदावरी परुळेकर, 'स्वर, ज्योत्स्ना भोळे, - 'सांजवत', आनंदीबाई शिर्के, अजुनी चालतेची वाट', आनंदीबाई विजापुरे, 'सांगते ऐका' – हंसा वाडकर, 'पानाआडचे फूल' आशालता भावे, 'मी : दुर्गा खोटे' – दुर्गा खोटे, 'मिटलेली कवाडे' मुक्ता सर्वगौड, 'कोसबाडच्या टेकडीवरून' – अनुताई वाघ, 'स्वरमयी' - प्रभाअत्रे, 'आम्ही दोघं' - उषाभट, - 'पदावरील प्यादे', यमुना खाडिलकर, 'माझी कॅन्सर यात्रा' – वझे संगीता, 'माज्या जलमाची चित्तर कथा' – शांताबाई कांबळे, 'मृदगधं' – इंदिरा संत, 'अशी मी जयश्री' – जयश्री गडकर, 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' – मल्लिका अमरशेख, 'मी वनवासी' – सिंधुताई सपकाळ, 'यशस्विनी' – विनोदिनी गायकवाड, 'नाच गं घुमा' - माधवी देसाई, 'नाथ हा माझा' - कांचन घाणेकर, 'एरियल' – ज्योत्स्ना देवधर, 'आहे मनोहर तरी' – सुनीता देशपांडे, 'अंत:स्फोट' – कुमुद पावडे, 'कशाला उदयाची बात' – शांता हुबळीकर, 'बंध - अनुबंध' – कमल पाध्ये, 'जगले जशी - लालन सारंग, 'मरण कळा' - जनाबाई गिर्हे, आम्ही बिघडलो' – अनसूया लिमये, 'समिधा' – साधना आमटे, 'बिनपटाची चौकट' – इंदुमती जोंधळे, 'मी भरून पावले आहे' – मेहरून्नू सादलवाई, 'स्मृत्ति सुगंध' –चंपा लिमये, 'आयदान' – उर्मिला पवार... विस्तार भयास्तव प्रस्तुत ठिकाणी मोजक्याच – नाव लौकिक मिळालेल्या आत्मकथनांचा विचार केला आहे. उच्चपदस्थ, स्वतः साहित्यक असणाऱ्याना व लौकिक व साहित्यकांच्या पत्नीच्या आत्मचरित्रामध्ये यांचा समावेश होतो. इंदिरा संत, सुनीताबाई देशपांडे, माधवी देसाई, निर्मला देशपांडे, सरोजिनी बाबर, शिरीष पै, मल्लिका अमर शेख इत्यादी स्त्रिया स्वतः सर्जनशील साहित्य निर्माण करणाऱ्या आहेत. अनेकविध अनुभवांचे

संचित स्वतः जवळ आहे. निर्विवादपणे स्वतःची अशी एक प्रतिमा त्यांची समाजात आहे. त्या मानवी मूल्यांची जोपासना करताना दिसतात. नव विचारांच्या संदर्भात स्त्री म्हणून स्वतःचे कर्तृत्व नमूद करताना दिसतात.

साहित्यीक पत्नींची आत्मचरित्रे गाजलेली आहेत. समाजामध्ये प्रसिद्ध असणाऱ्या साहित्यिकांच्या पत्नीच्या आत्मचरित्रातुन त्यांचे खाजगी आयुष्य सर्व सामान्य व्यक्तीला समजते. इतरांच्या खाजगी आयुष्यात डोकावणे, त्यांचे जीवन जाणून घेणे यांमध्ये वाचकांना रस असतो. त्यांच्या खाजगी जीवनातील घडामोडींचा व साहित्यिकांच्या साहित्य कृतींचा सहसंबंध लावण्यात वाचक, वेळ प्रसंगी समीक्षक प्रयत्न करत असतात. साहित्यिक पत्नींची आत्मचरित्रे ही पती पारायणन होता एक व्यक्ती म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविधांगी दर्शन घडविताना दिसतात. मानवी स्वभावाचे विविध नमुने त्यांचा लेखनात येतात. पती म्हणून असणारा विक्षिप्तपणा, हट्टी स्वभावाची नमुनेदार उदाहरणे यशोदा पाडगावकर, माधवी देसाई, कमल पाध्ये, सुनीताबाई देशपांडे, रागिणी पुंडलिक मांडताना दिसतात.

यशोदा पाडगावकर यांच्या लेखनातून मंगेश पाडगावकरांच्या तरूण वयातील स्वभावावर प्रकाश टाकताना दिसतात. त्यांच्या लहरी, आक्रस्ताळेपणा, आळशीपणा, इतरांनी तुच्छ लेखण्याची सवय दिसते स्व- प्रतिमा जोपासताना आपण आपल्या पत्नीवर अन्याय करतोय यांची जाणीव ही दिसत नाही. पत्नीने नोकरी करणे त्यांना कमी पणाचे वाटते, त्यासाठी तिला आपले नाव न लावण्याचा सल्ला दिला जातो. पण आपण घरातील व्यक्तीवर (काहीच आर्थजन न करणे)

ओझे होतोय याची जाणीव दिसत नाही. 'झुलबाई झुला' सारखी अत्यंत लडिवाळ कविता लिहणारा कवी प्रत्यक्षात मात्र आपल्या मुलांना भर उन्हात फरफटत घेऊन जाताना दिसतो. प्रेम भावना अत्यंत संयत, नाजूक हळुवारपणे व्यक्त करणारा कवी प्रत्यक्ष

जीवनात मात्र कोरडाच दिसतो. याची जाणीव आपणांस 'कुणास्त्व कुणीतरी' मधून येत राहते. समृध्द भावविश्व साकारणार साहित्यिक प्रत्यक्षात मात्र काही वेगळाच असतो असे दिसतो.

विशेषतः साहित्यिक पत्नी या फक्त गृहिणीं म्हणून दिसत नाहीत त्याही विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. समाजात त्यांना फक्त साहित्यक पत्नी म्हणून न पाहता एक व्यक्ती म्हणून पाहावे असा आग्रह सुनीताबाई देशपांडे करताना दिसतात ते ही योग्यच आहे. आपल्याला फक्त भाईची (पु. ल. देशपांडे) यांची पत्नी म्हणून गौरविले जाणार असेल तर अशा कार्यक्रमाला जाण्याचे टाळतात. उगीचच श्रेय घेणे त्या टाळतात. स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जोपासना करण्या कडे कल असल्याचे दिसते. नव विचारांची जोपासना करणाऱ्या स्त्रीचे आत्मचरित्र म्हणून ओळखले जाते.

मराठी साहित्यातील रूढ - पारंपरिक आत्मचरित्र लेखना पेक्षा दलित आत्मकथनांचे स्थान वेगळे आहे. मराठी साहित्य विश्वाला हादरून सोडणारा साहित्य प्रकार म्हणून आत्मकथनांने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दलित आत्मकथनां आत्मचरित्राचे निकष लावताना अनेक अडचणी येतात. रूढ समाज व्यवस्थेला हादरा देण्याचे सामर्थ्य आत्मकथनांमध्ये आहे. पुरुषांच्या आत्मकथनां पेक्षा दलित स्त्रियांची आत्मकथने सर्वस्वी वेगळी आहेत. दलित स्त्रियायांची स्थिती तर अधिकच दयनीय आहे. सर्वच बाजुंनी ती नागवली जाते. शोषणाची परिसीमा गाठण्याची अनेक उदाहरणे दलित स्त्रियांच्या लेखनातून आली आहेत. 'मला उद्धवस्त व्हायचंय' या आत्मकथनांतून याची साक्ष पटते.

स्त्रियांच्या लेखनातून आलेले अनुभव हे सकस, साध्या - सोप्या, सरळ पण आकर्षक निवेदनामुळे वाचनीय झाले आहेत. अतिशय बिकट परिस्थितीवर मात करून या स्त्रियांनी समाजात आपले स्थान निर्माण केले आहे.

सत्य निष्ठा हा आत्मचरित्राचा निकष अत्यंत महत्वपूर्ण आहेच व त्याचे मोजमाप करताना गल्लत होण्याची शक्यता जास्त असते. कारण प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन महत्वाचा असतो. एकाच अनुभवकडे वेगवेगळया प्रकारे पाहिले असता तो अनुभव आपणास संभ्रमात टाकणारा ठरू शकतो. त्यामुळे अनुभवाची जात कुळी महत्वाची आहे. दलित आत्मकथनांतील अनुभव हा संवेदनात्मक – संकल्पनात्मक ठरताना दिसतो. तो एका व्यक्तीच्या न राहता समष्टीचा होतो स्त्रियांच्या जीवनातील अनेक घटना प्रसंग हे त्यांच्या फक्त दलित असण्यामुळे भोगावे लागले आहेत. मुळात स्त्री म्हणून एखाद्या घटनेकडे पाहण्याची दृष्टी महत्वपूर्ण ठरते. तिने जगलेले,भोगलेले अनुभव अत्यंत संयत भाषेत मांडले आहेत.

**निष्कर्ष**

१) स्त्रियांच्या आत्मचरित्रातून पती चरित्राला महत्वाचे स्थान आहे.
२) स्त्रियांच्या आत्मकथनांतील अनुभव प्रतिकूल परिस्थितीच्या फेऱ्यात अडकून पडल्याने होणारी वाताहत दर्शविणारे आहेत.
३) स्त्रियांच्या विकासाला मर्यादा पडलेल्या आहेत.
४) सर्वच वर्गातील स्त्रियांना उपेक्षित जीवन जगावे लागते. तिला दुय्यम स्थान दिले जाते, निर्णय प्रक्रियेत गृहीत धरले जाते.
५) स्त्रियांचे आत्मचरित्र लेखन ह्रदयस्पर्शी आहे.
६) स्त्रियांच्या आत्मचरित्राची भाषा चित्रमय – प्रत्ययकारी आहे.
७) मानवी भावभावनांची आंदोलन स्त्रियांच्या लेखनातून प्रभावी पणे आली आहेत.
८) स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रियांची घुसमट होताना दिसते.

अगदी लक्ष्मीबाई टिळक ते उर्मिला पवार यांच्या पर्यंतच्या लेखनामध्ये एक समानधागा दिसतो तो म्हणजे विनोदी वृत्तीचा. कितीही अडचणी आयुष्यात आल्या तरी त्यावर मात करून आयुष्याला

सकारात्मकतेने सामोरे जाताना दिसते. निखळ वृत्तीने जीवनाला समोरे जाताना दिसतात. स्त्रियांची भाषाशौली उपमा, प्रतीक यांनी सजलेली आहे. 'स्व' प्रतिमा अधीक सजगपणे जोपासना करताना दिसतात. स्त्रियांच्या आत्मचरित्र / आत्मकथन लेखनाने आत्मभान राखले आहे, मूल्यभान जोपासले आहे. सामाजिक – सांस्कृतिक दृष्टीने स्त्रियांची आत्मचरित्रे महत्वपूर्ण आहेत. साठोत्तरी मराठी साहित्यातला स्त्रियांची आत्मचरित्रे अनमोल ठेवा आहेत. ही आत्मचरित्रे विपुल संख्येने प्रकाशित झाली आहेत त्याच बरोबर आशयाच्या दृष्टीने ती समृद्ध आहेत. ही आत्मचरित्रे कोणत्याही विशिष्ट स्वरूपात बंदिस्त न होता या आत्मकथनकारांच्या अनुभवानुरूप साकार झाली आहेत. आविष्काराच्या दृष्टीने अतिशय संवादी असे रूप प्राप्त स्त्रियांच्या आत्मकथनांना प्राप्त झाले आहे. मराठी साहित्यात स्त्रियांच्या आत्मचरित्राला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) स्त्री आत्मकथन - संपा. प्राचंद्रकुमार नलगे डॉ. गंगाधर पानतावणे, सुरेश एजन्सी, पुणे प्रआ. जुलै१९९०

२) 'संपूर्ण स्मृति चित्रे' – लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त टिळक (अभिनव आवृत्ती), पॉप्युलर मुंबई, १९८९

३) 'मला उद्‌ध्वस्त व्हायचंय' – मल्लिका अमर शेख, मॅजेस्टिक, मुंबई, प्र. आ. १९८४

४) 'माज्या जल्माची चित्ररकथा' – शांताबाई कांबळे

५) 'आहे मनोहर तरी' - सुनीताबाई देशपांडे – मौज प्रकाशन पुणे प्रआ १९९०

६) कुणास्तव कुणी तरी – यशोदा पाडगावकर – राजहंस प्रकाशन पुणे २०००


***

# ग्रामवास्तवाचा वेध घेणारी लेखिका : पद्मा मदकुंटे

**रमेश गोविंदराव शेंडगे**
ज्ञान विकास विद्यालय,पाटोदा (बु.) ता. जळकोट

२००० नंतरमहाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक सीमा भागातील बोलीभाषेत लेखन करणाऱ्या नव्या दमाच्या लेखिका पद्मा मदकुंटे यांची झापड ही कादंबरी २०१७ मध्ये प्रसिद्ध झाली. नंतर जायदाद (२०१८) आणि भयलाट (२०२१) याकादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यांची ‘झापड’ ही पहिलीच कादंबरी अस्वस्थ करणारी, सत्ता, व्यवस्था आणि राजकारण यामुळे यातला माणूस कसा नाडला -पिडला जातो याचे वास्तव चित्रण म्हादू या पात्रातून लेखिकेने अतिशय दमदारपणे केले आहे. निसर्गावर आधारलेली शेती, गावातील राजकारण, घरात खाणारी सहा-सात तोंडे, शिक्षणाने काहीतरी घर पुढे जाईल या आशेने कर्ज काढून मुलाला शिकवले जाते; पण पैशाशिवाय नोकरी नाही अशी बरबटलेली शिक्षण व्यवस्था यासंबंधी तपशीलवार वर्णन लेखिकेने केलेले आहे.

म्हादू हा प्रामाणिक शेतकरी या कादंबरीचा नायक! सतत कष्ट करत असतो. शेतात पीक चांगलं आल्यामुळे स्वप्न पाहत असतो. यंदा सगळया सावकाराचा कर्ज फेडणे होईल आणि पेरणीच्या वेळी कर्ज काढण्याची गरज भासणार नाही. पारुलाही वाटते एखादं सणंग नवऱ्याने करावं म्हणून त्याच्या मागे तगादालावते आणि या सुखाच्या संसाराला दृष्ट लागते आणि संसार काळवंडतो. पाणी पिण्यासाठी बैल हापशफस्यावर येतात. गोंधळ उडतो, घागरी फुटतात, लचमीच्या डोक्याला खोक पडते. पाटलाच्या शिकवणीने लचमीम्हादूवर खोटा आळ घालून दहा हजार रुपये काढते. कमी व्याजदराने बँकेतून कर्ज मिळते हे कळाल्यावर महादूच्या बॅकेत हेलपाट्या सुरू होतात. दहा - दहा वेळा चकरा मारून बँकेतील क्लार्कच्या खिशात पाचशे रुपयाची नोट ठेवल्यानंतरच कर्ज मिळते येथे म्हादू नाडला जातो.

चांगली बैलजोडी गावातील लोकांच्या नजरेला खूपते. निवडणुकीत पाटलाचा झालेला पराभव पाटलाच्या जीवाला लागतो.

पाटील डूख धरून मधुचे बैल चोरून विकून टाकतो. भरडला गेला तो बिचारा प्रामाणिक म्हादू! व्यवस्थेच्या विरुद्धही लढता येत नाही. ही शोकांतिका कादंबरीतून पाहायला मिळते.

म्हादूची मोठी मुलगी गोदू शिक्षणात हुशार असते; पण तिला शिक्षणासाठी पूरक वातावरण मिळत नाही. गरीबीमुळे फीस भरण्यात अनंत अडचणी येतात. अशाही स्थितीत दहावीच्या परीक्षेत केंद्रातून प्रथम येते; पण घरच्या परिस्थितीमुळे आणि पारूच्या हेकेकोरपणामुळे गोदुला पारूच्या भावाकडे शिक्षणासाठी ठेवले जाते. मात्र येथे गोधूला प्रोत्साहन मिळण्याच्या ऐवजी कामाच्या जोखडाखालीच ठेवले जाते.

पारू म्हादुला साथ देण्याऐवजी त्याच्या उण्यादुण्यावरच असते. संधी मिळेल तेव्हा टोमणे मारते. संसाराला भोक पडले म्हणून सतत कटकट करत राहते.सगळा संसाराचा पैसा दुसरीकडे लावतो. असा आरोपम्हादू वर करते. सतत शंका घेत असते. पारूचं अस वागणं गोदु, शारी, इमली आणि पांड्या या तिच्या मुलांनाही आवडत नाही; पण शेवटी म्हादू आजारी पडल्यानंतर गळयातलं मंगळसूत्र विकून दवाखान्यात नेणारीविचित्र स्वभावाची पारू!

गोदु, शारी, इमली यांच्या लग्नासाठी ‘बाप’ म्हणून केलेले कष्ट, लागलेला घोर पुन:पुन्हा पाहायला मिळतो. म्हादूचं मन मोकळं करण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे त्याची विधवा आई! आपल्या मुलाच्या संसाराला पदोपदी हातभार लावण्याचे काम ही म्हातारी करते.

मुलगा शिकल्यावर नोकरी लागते असे म्हादूला मनोमने वाटते. कर्जाची तमा न करता पांडूला शिकवतो. शेत लिहून देऊन बी.एड.साठी ध्याडे गुरुजीकडून पन्नास हजाराचे कर्ज काढतो. बीएड झाल्यानंतर मुलगा मास्तर होईल आपल्या कष्टाचं चीज होईल असे म्हादूलावाटते; पण या भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेने त्याच्याआशेवरपाणी फिरते. चऱ्हाट वळल्यासारखं शिक्षण घेऊन नोकरी लागत नाही. सेट-नेट परीक्षा उत्तीर्ण होऊनही पांडू नोकरी पासून वंचित राहतो याचे शल्य म्हादूच्या मनात घर करून राहते. तेव्हा उद्विग्नपणे म्हादू म्हणतो,” शेतकऱ्याच्या पोरांनं मोठं स्वप्न बघू नये. शिक्षण खात्यात घाण भरलीया.” कोणती ना कोणती नोकरी कर म्हणून मुलाच्या मागेतगादा

लावतो. आरोग्य विभागात सेटनेट झालेल्या मुलाला चपराशी म्हणून नोकरी करावी लागते. नोकरीतून अर्धी रोटी सुखाचे मिळेल चार पैसे मिळणे महत्त्वाचे हा साधा व्यवहारिक विचार म्हादूच्या डोक्यात असतो. पांडू च लग्न केलं जातं महादूची सून रुक्मिणी नांदत नाही. भल्या पहाटे माहेरी निघून जाते. उलट त्यांनीच म्हादू कडून पैसे वसूल करून घेऊन जातात. ही गोष्ट म्हातारीच्या जिव्हारी लागते. ती जी बाज धरते पुन्हा न उठण्यासाठीच. म्हातारीचं जाणं म्हादूच्या जीवाला चटका लावून जाते. मनमोकळ करणारं, आधार देणारं ठिकाणी निघून गेल्यामुळे म्हादू हवालदिल होतो. आजारी पडतो. आजारातून उठत नाही. संसारावर अंधाराची गडद छाया पसरते. संसार काळवंडून जातो. झापड पडते. दिशा धूसर होतात.

झापड या कादंबरीतून शिक्षणाची वर्तमान स्थिती रेखाटलेली आहे. डोनेशनशिवाय नोकरी लागत नाही हे सत्य यातून अधोरेखित केले आहे. ही कादंबरी म्हणजे विचारी माणसाने लिहिलेली विचारचक्राला गती देणारी कादंबरी आहे.सामाजिक, राजकीय, शैक्षणिक मूल्यांची पडझड मांडणारी ही कादंबरी आहे. लेखिकेचे निरीक्षण सूक्ष्म व दमदार आहे. डोकं आणि कणा शाबूत असणाऱ्या माणसाला अंतर्बाह्य हलवून टाकणारी ही कादंबरी परिस्थिती पुढे माणूस कसा हातबल होतो हे म्हादूच्या माध्यमातून लेखिकेने अतिशय प्रभावीपणे मांडले आहे. सत्यावर अपार प्रेम करणारा, देवावर विश्वास ठेवणारा म्हादू या इमानदार शेतकऱ्यांच्या जगण्याची परवड कादंबरीतून मांडली आहे .

“कपड्याला पिळल्यावाणी बसल्यात गरीबाला पिळायला. ”यातून गरिबांची होत असलेली पिळूनकीची तीव्रता लक्षात येते. “म्हादूला ग पुसलेलं धोंड केलीस.” यावरून माणसाचा होत असलेला वापर लक्षात येतो. या कादंबरीत तेलंगणा, कर्नाटक सीमा भागातील बोलीचा लहेजा पाहायला मिळतो. आलुस, गेलुस ही क्रियापद तर ‘हिंग’ या शब्दाचा झालेला वापर त्याची प्रचिती आणून देतो.

लेखिकेने कादंबरीच्या माध्यमातून सरकारचे धोरण सामान्यासाठी नसतात हे दाखवून दिले. कर्ज मंजूर करणे, कर्ज माफ होणे, धान्य विकल्यानंतर शेतमालाला किंमत येणे. यातून शेतकऱ्याची होणारी अडवणूक-पिळवणूक पाहायला मिळते. शेतकऱ्याला सरपंच,

पाटील कसे लुबाडतात हे बयनाम्यासाठी बांधावी लागलेली जीप, चहा–पाण्यासाठी, जेवणासाठी करावा लागलेला खर्च यावरून लक्षात येतो. शिक्षणामुळे व्यक्तीचा कुटुंबाचा उद्धार होतो असे म्हटले जाते पण येथे पांडूच्या जीवनाचे झालेले वाताहात मन हेलावून टाकणारी आहे. एवढे शिक्षण घेऊन चपराशाची नोकरी नाईलाजाने करावी लागणे हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे वाभाडे काढणारे आहे.

एकंदरीत वर्तमान विषयावर तेलंगणा, महाराष्ट्र सीमा भागातील बोलीभाषेत शेतकऱ्याच्या वास्तव जगण्याची परवड लेखिकेने अतिशय दमदारपणे 'झापड' या कादंबरीतून मांडली आहे.

**संदर्भ :**


१. मदकुंटे पद्मा, 'झापड', इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती : मार्च २०१७

२. मदकुंटे पद्मा, 'जायदाद', इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी २०१८

३. मदकुंटे पद्मा, 'भयलाट', गणगोत प्रकाशन, देगलूर, प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर २०२१

४. डॉ. घोंगडे रमेश, 'मराठी भाषा आणि शैली, 'दिलीपराज प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती :एप्रिल २०१९(प्रथम आवृत्ती -१९८५)

५. डॉ.पाटील विद्या, 'मराठी बोली (रूप आणि बोल)', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : ऑगस्ट २०१७


***

# साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथा लेखन

**प्रा. डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
समर्थनगर, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

साठोत्तरी मराठी साहित्याचे विशेष म्हणजे नवजागृती. शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचू लागले. यातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याला वाव मिळाला, परिणामत: लेखक व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व देऊ लागला. त्याचबरोबर १९६० नंतर महाराष्ट्रात अनेक चळवळी उभ्या राहिल्या. ह्या चळवळी त्यांचा विकासासाठी मार्ग शोधू लागल्या. चळवळींचा प्रसार सर्वसामान्यापर्यंत पोहचवा यासाठी साहित्य हे माध्यम झाले आणि याचा परिणाम म्हणून साठोत्तरी मराठी साहित्यात एक नवीन चैतन्य, जागरूकता व विकासाचे मुद्दे दिसून येतात. त्याच बरोबर मनोविश्लेषणात्मक वर्णन अर्थात मनाच्या अभ्यासाचे, मनाच्या हृदयाचे वर्णन साठोत्तरी मराठी साहित्यात उमटू लागले आणि यामध्ये महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांपर्यंत शिक्षण पोहोचले. स्त्री ही जागरूक झाली आणि आपले अनुभव, विचार, समस्या ती व्यक्त करू लागली आणि व्यक्त होण्यासाठी स्त्रियांनी साहित्य ह्या माध्यमाचा प्रभावीपणे वापर केला.

**साठोत्तरी काळातील स्त्रियांचे कथा लेखन :**

लीला श्रीवास्तव, सुधा नरवणे व ज्योत्स्ना देवधर या १९६० नंतरच्या कथाकारांच्या पिढीतील महत्त्वाच्या लेखिका आहेत. आपल्या अनुभवांना घटनांच्या आधारे कथारूप देण्याकडे या लेखिकांचा कल दिसतो. दारिद्र्य, विषमता व भ्रष्टाचार यातून जीवनाला आज प्राप्त झालेल्या विरूपतेचे व मूल्य शून्यतेचे दर्शन लीला, श्रीवास्तव आपल्या कथांतून घडवितात. 'गढूळ पाण्यातील मासोळ्या', 'एका मेंढराचा

जन्म', 'सुट्टी', 'चॉकलेट', 'एक बिंदू दोन कोन' या त्यांच्या यशस्वी कथा म्हणून उल्लेखता येतील.

घटनांचा आधार घेऊनही पात्रांची मानसिक आंदोलने किती समर्थपणे टिपता येतात, याचा प्रत्यय सुधार नरवणे यांच्या कथा वाचकांना आणून देतात. मानसिक संघर्षाचे वेधक चित्र त्यांच्या 'ध्यास' सारख्या कथेत उमटते. माणसांच्या मानसिक क्रिया-प्रतिक्रिया त्या तितक्याच नेमकेपणाने टिपत जातात, पण त्यासाठी दुर्बोधतेच्या पातळीवर जाणारे मनोविश्लेषण किंवा जाणीव-नेणिवेतील गुंतागुंत यांचा आधार घेत नाहीत. 'विरत गेलेलं धुकं', 'तिचं स्वप्न', 'दोलाचल', 'ऋणमुक्ता' या यशस्वी कथांतदेखील अभिव्यक्तीचे हेच सूत्र सुधाबाईंनी कायम ठेवलेले आहे.

बोधनामय (Perceptual) व रसगंधवती भाषा आणि कथानुभवांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी हे ज्योत्स्ना देवधर यांच्या कथेचे वेगळेपण आहे. वसुंधरा पटवर्धन यांच्याप्रमाणेच ज्योत्स्ना देवधर यांचे कथाविश्व स्त्रीकेंद्रीत आहे. दु:ख या भावनेचे त्यांना सर्वाधिक आकर्षण आहे. आपल्या कथेसाठी एखादा नाट्यमय व संघर्षात्मक प्रसंग त्या निवडतात. परंतु बऱ्याच वेळा नाट्यमयतेबद्दलचे आकर्षण त्यांच्या कथांना भडकपणाकडे घेऊन जाते. आपल्या भाषेचे सामर्थ्य जाणून तिला अकारण राबविण्याचा प्रयत्न ज्योत्स्ना देवधर करत आहेत की काय, अशी शंका देखील त्यांच्या कथा वाचताना आल्याशिवाय राहत नाही.

गौरी देशपांडे यांच्या कथेला स्त्री कथाकारांच्या पुढील पिढीचे प्रतिनिधीत्व करणारी कथा मानता येईल. कथा संकल्पनेबद्दलची कोणतीही बांधिलकी गौरी देशपांडे मानत नसाव्यात, हे त्यांच्या कथा बघितल्यानंतर चटकन लक्षात येते. या दृष्टीने त्यांचे नाते सरिता पदवी यांच्या कथांशी जोडता येईल. अनुभवाला विलक्षण मोकळी वाट देऊनदेखील गौरी देशपांडे यांच्या कथा 'कथा' च असतात. किंबहुना, कथेची लवचिकताच त्यातून सिद्ध होते. त्यांचा अनुभव मुलत: 'कथा' रूप असतो, हेच त्यामागचे कारण सांगता येईल. त्यांच्या कथांत कधी वेगाने घडत जाणाऱ्या घटना येतात, कधी एखादा संस्मरणीय प्रसंग कथेचे रूप घेतो. कधी कथेत कलाटणी असते, तर कधी कथा म्हणजे

केवळ आत्मकथन असते. हे सर्व पुन्हा आशयानुसार घडत असते. तो जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न नसतो. मनोगंडांचा अथवा मानसशास्त्रीय पातळीवर जाणाऱ्या मनोविश्लेषणाचा आधार त्या फारसा घेतांना दिसत नाहीत. एकंदरीत त्यांची कथा रोखठोक असते व तिचे पाय वास्तवाच्या भूमीत पक्के रुजलेले असतात. इंग्रजीमिश्रित मराठीचे वेगळेच रूप गौरी देशपांडे यांच्या कथांमधून दिसते.

सानिया, अंबिका सरकार, उर्मिला सिरुर, वसुधा माने, मंदाकिनी गोगटे, पद्मजा फाटक या १९७० च्या आसपास लेखन करणाऱ्या स्त्रियांची कथाक्षेत्रातील कामगिरीही उल्लेखनीय आहे. १९७० च्या आसपास लेखन करायला लागलेल्या स्त्री-कथाकारांपैकी काहीची कामगिरी १९८० ते ९० या दशकातही महत्त्वाचे ठरते. सानिया यांचा ह्या संदर्भात आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या सहा कथासंग्रहातून त्यांनी मुख्यत्वे आधुनिक वळणाच्या उच्चभ्रूर स्त्रियांची दु:खे सूक्ष्मतेने मांडली आहेत. विजया राजाध्यक्षांप्रमाणे सानियाच्या नायिका हळव्या, रोमँटिक आणि स्वतःमध्ये असतात. या स्त्रियांच्या तरल दु:खाच्या छटा बारकाईने टिपत, सानियांची संथ लयीत उलगडत जाणारी कथा वाचकांच्या मनात प्रवेश करते. मात्र नायिकांच्या दु:खामागील सामाजिक संदर्भ त्यांच्या कथेत व्यक्त होत नाहीत. त्यांच्या बऱ्याच कथा आकाराने दीर्घ असतात. त्यांच्या कथा वाचकांना आता फारसे नवे काही सांगत नसल्यामुळे त्यांच्या कथांतील, विशेषत: दीर्घकथांतील पसरटपणा खटकतो, सूक्ष्मतेच्या नावाखाली येणारा अनावश्यक तपशील व त्याच त्याच आशयाची पुनरूक्ती यामुळे त्यांच्या अलीकडील कथा कोमट वाटतात.

आशा बगे यांच्या कथा १९७९ पासून 'सत्यकथे' सारख्या दर्जेदार मासिकातून प्रसिद्ध व्हायला लागल्या. सत्यकथेच्या १९८० च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'रुख्मिणी' या कथेने आशा बगे यांना कथाकार म्हणून चांगलाच नावलौकिक मिळवून दिला. त्या वर्षीच्या 'अक्षर दिवाळी' संग्रहातही ही कथा पुर्नमुद्रित झाली. आतापर्यंत त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून मराठी कथेत त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे.

आशा बगे यांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोण आधुनिक आहे. पण परंपरेशी असलेले नाते त्यांनी तोडलेले नाही. त्यामुळे त्यांच्या

कथांमधून परंपरा आणि नवता यांच्यातील ताण सूक्ष्मतेने जाणवत राहतो. फक्त त्याला त्या केंद्रस्थान देत नाहीत. 'बंदिशाळा', 'मैत्रीण', 'नर्सिंगहोम' या कथांत हा ताण जाणवण्याइतका स्पष्ट आहे.

प्रिया तेंडुलकर यांच्या कथा १९८४ पासून प्रसिद्ध व्हायला लागल्या. त्यांच्या कथासंग्रहाला पारितोषिक मिळून त्या आता कथालेखिका म्हणून स्थिर झालेल्या आहेत.आधुनिक स्त्रीचे दु:ख मांडणारी प्रिया तेंडुलकर यांची कथा गौरी देशपांडे आणि सानिया यांच्या परंपरेतली आहे. अर्थात त्यांची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आहेतच. प्रिया तेंडुलकर यांच्या कथा आकाराने लहान असतात. निवेदनाच्या आकर्षक शैलीमुळे त्या चटपटीत बनतात आणि वाचकांना खेचून नेतात. 'दु:खाचा शोध' हे त्यांच्या कथांचे केंद्र असते.

सुनीती आफळे व रेखा बैजल यांचे कथालेखन लक्षवेधी असले तरी स्वत:चा असा ठसा त्या अद्याप उमटवू शकलेल्या नाहीत. या दोघींचेही कथालेखन पारंपारिक पद्धतीचे आहे. नाट्यमयतेचा ध्यास आणि काहीशी अतिरंजित हाताळणी यामुळे विषय चांगले असूनही रेखा बैजल यांची कथा बरेचदा परिणामात ऊणी पडते. आधीच्या पिढीतील ज्योत्स्ना देवधरांच्या कथेशी तिचा प्रकृतिधर्म जुळथो. रोहिणी कुलकर्णी यांच्या काही कथा आशयाच्या दमदारपणामुळे लक्षात राहतात.

एकंदरीत स्वत:च्या लेखनाचा मराठी कथेवर ठसा उमटविणाऱ्या स्त्री-कथाकार या दशकानेही दिलेल्या आहेत. आशा बगे, सानिया, अंबिका सरकार, उर्मिला शिरुर, प्रिया तेंडुलकर यांचा 'दशकातल्या कथाकार' म्हणून आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. नव्या स्त्रीच्या जाणिवांचा थेट आणि आक्रमक आविष्कार करण्यास गौरी देशपांडे यांनी १९८० पूर्वीच सुरूवात केली होती. नव्या स्त्रीच्या भावविश्वाच्या वेगवेगळया बाजूंनी आणि आपापल्या व्यक्तिमत्वानुसार आविष्कार वरील सर्व लेखिकांनी केलेला आहे. स्त्री जीवनाचे अनोखे पैलू वाचकांच्या समोर त्यांच्या कथांतून आले, हे निर्विवाद सत्य आहे. स्वतंत्र शैलीतील लेखनामुळे या दशकावर ह्या स्त्री-कथाकारांनी अतिशय प्रभाव पाडलेला आहे.

**समारोप :**

१९६० नंतरच्या काळात साहित्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडत होते. त्याचाच एक भाग म्हणून वाङ्मयीन चळवळी निर्माण

झाल्या. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढण्यासाठी त्यांचा जन्म झालेला होता. सुरुवातीला हा उद्धार सांस्कृतिक स्वरुपाचा होता. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे त्याचे उद्दिष्ट होते. त्यातून लघुनियतकालिकांची चळवळ सुरु झाली. तर एकूण व्यवस्थेविरुद्ध स्त्री साहित्य चळवळींचा लढा होता. स्त्रीवादी साहित्य चळवळींचा रोष तर विषम समाजव्यवस्थेमुळे निर्माण झालेला होता. स्त्रियांवर एकूण समाजाने केलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीच जणू स्त्री चळवळींचा उगम झाला होता. स्त्रीचे प्रश्न व चित्रण मराठी साहित्यात नसल्याची जाणीव स्त्री साहित्य चळवळीमागे आहे. महाराष्ट्रात १९६० नंतरच्या स्त्रीवादी चळवळी पुढे आल्या याचे कारण जागृत होत असलेल्या पिढीच्या अपेक्षा पूर्ण होत नव्हत्या. साठोत्तरी मराठी साहित्यात या चळवळीच्या साहित्याने मोलाची भर घातली. सामान्य शोषित स्त्री मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आणली आणि स्त्रियांनी मराठी कथेत आपल्या विचारला प्राधान्य दिले.

**संदर्भसूची :**

१) जोग, रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड पाचवा.

२) जोशी, प्र. न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास

३) शेवडे, इंदुमती, मराठी कथा : उगम आणि विकास

४) देशपांडे, अ. ना., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड १ व २

५) गोडबोले, बापट, मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास

***

# साठोत्तरी काळातील काही मराठी कवयित्रीचे स्थान


## विळेगावकर रविकांत अंतराम


**प्रास्तावना :**

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, लघुनिबंध या वाङमय प्रकाराबरोबरच कविता मधुन काही स्त्रियांनी आपले जीवनचित्रण केले आहे.

मराठी स्त्रियांची हि लेखन परंपरा जुनी असून ती समृद्ध व संपन्न आहे. पुरूषाप्रमाणे स्त्रीला स्वातंत्र्य उपभोगता आले नाही. म्हणुन स्त्रीयांनी कमी लिहीले असले तरी ते समजण्यास योग्य आहे. ब्रिटीश काळाच्या आगोदर सुमारे पाचशे पन्नास वर्ष अधीपासून स्त्रिया लिहीत आल्या आहेत असे दिसते.

इंग्रजी आमदानीमुळे तिला नवे परिमाण लाभले आहे. विकासाच्या प्रक्रिया विशेषत्वाने कृतीशील झाल्या इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर नव्या युगाची हि कविता सुरूवातीला संस्कृत व इंग्रजी साहित्याची भाषांतरे या स्वरूपाची होती. नंतर स्वतंत्र काव्य निर्मीती होत गेली व आधुनिक काव्याला बाळसे प्राप्त होऊ लागले. स्वत:ला आलेले अनुभव, आपल्या आशा—आकांक्षा स्त्रियांनी काव्यातुन व्यक्त केल्या आहेत. जात्यावर दळताना, कांडतांना झोपाळयावर झोके घेताना त्यांनी कविता गायन केल्या. त्यांच्या विविध भावस्थितीचे चित्रण हया कवितेतून उमटलेले आहे. म्हणुन साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान आपण तपशिलाने जाणून घेऊ.

आधुनिक कालखंडातील काही कवयित्रींचा परिचय आपण करून घेऊ या.

प्राचिन मराठीत महदंबा, मुक्ताबाई, जनाबई, बहिणाबाई इत्यादींनी मराठी कविता संपन्न केली. अर्वाचिन खालखंडात इंदिरा संत(१९१४), पद्मा गोळे (१९१३) संजिवनी मराठे, शांता भोळके (१९२१), मल्लिका अमरभोख, प्रभा गणोरकर या कवयित्रींच्या साहित्याचा आपण परिचय करून घेऊ.

**१) इंदिरा संत (१९१४)**

इंदिरा संत यांची कविता या काळात सर्वात प्रभावी ठरली गंगाधर गाडगीळ यांनी 'हस्तीदंती तुकडयावरचे कोरीव काम' असे त्यांच्या काव्याचे वर्णन केले आहे. मराठी स्त्रिगितांच्या संस्कारातुन त्यांनी भौली उचलली व स्वत:च्या उत्कट भावनाविष्काराला प्राधान्य दिले. 'सहवास (१९४१) या काव्यसंग्राहात त्यांनी आपले पती ना.मा.संत यांच्या बरोबरचे सहजीवन वर्णिले आहे. यामध्ये प्रीतीचे साफल्य दिसते पण पुढील काव्यावर गुढता व उदासिनता दिसून येते.' 'भोला (१९५१), मेंदी (१९५५), मृगजळ (१९५७), रंगबावरी (१९६४), बाहुल्या (१९७२) या काव्य संग्रहातुन प्रीती आणि निसर्ग, प्रियकराचे रूपदर्शन घडविणारा निसर्ग या त्यांच्या कवितेचा स्थायी भाव राहिला. स्त्रीवादी भुमिकेपर्यंत त्यांची कविता पोहोचत नसली तरी प्रेयसी ते एकाकी

व्यक्ती हा त्यांच्या कवितेतील स्त्री व्यक्ती जीवनाचा प्रवास प्रगत दृष्टीकोन व्यक्त करतो.

**२) पद्‌मा गोळे (१९१३)**

पद्‌मा गोळे या मराठी कवयित्री 'पद्‌मा' या नावाने काव्यलेखन करीत असत त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रीती पथावर हा १९४७ साली प्रकाशीत झाला याशिवाय समिधा –१९४७ नीहार –१९५४ स्वप्नजा –१९६२ आकाशवेडी –१९६८ श्रावणमेघ १९८८असे कवितासंग्रह आहेत. वरील सहाही काव्यसंग्रहात स्त्रीजीवनातील विविध टप्यातील अनुभव येतात कुटुंबाच्या सुरक्षीत आवरणाखाली राहून बाहयजगात थोडी धडपड करू लागली पद्‌माताईची स्त्रीही अधिक डोळस धीट आहे पतीदेव आहे. पण राखणवाला नाही. स्त्री ही राष्ट्रशक्ती आहे. ती दास्यत्वात राहणार नाही.

श्रावणमेघ या कवितेत त्यांना आखेर स्त्री ही एक वस्तु आहे. ही कल्पना अस्वस्थ करते स्त्रीच्या अस्तित्वाची जाण त्यांच्या काव्याला येते स्त्री ही कुटुंबाचा आधार आहे. याचे भान त्या कवितेत ठेवतात. त्यांच्या कवितेतुन आपल्याला निखळपणे जगण्याचे अनमोल विचार दिसतात. स्त्रीच भावविश्व त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थांनी असून बदलत्या सामाजिक, सांस्कृतीक वातावरणात होणारी स्त्रीमनाची कासावीसी, त्यांचे ताणतणाव त्या आपल्या कवितेतुन व्यक्त करतात. त्यामुळे निसर्ग सौंदर्याबराबरच अपार्थिव तत्वाच आकर्षण जीवनाबरोबर येत असलेले भावगांभिर्य यांनी त्यांची कविता प्रगल्भ होत गेली पद्‌मा यांनी मराठी साहित्यात आपले स्थान ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ केलं आहे.

स्त्री प्रमाचे विविध पैलू विपूलतेने आणि सरसतेने दाखण, नव्या युगातील स्त्रीचा वस्तुनिष्ठ व तेजस्वी आदर्श पुढे ठेवणं समाजवादाचा स्पष्टपणे पुरस्कार करणं निसर्ग प्रतिमा आणि शालीन सयंम ही पद्‌मा गोळे यांच्या कवितेची वैशिष्टये आहेत. त्यांच्या काव्यात सहजता व कोमलता हे गुण प्रामुख्याने आढळतात. ही प्रतिभावांत कवयित्री कवितेच्या रूपाने आजही अजरामर आहे असे म्हणावेसे वाटते.

**३) संजीवनी मराठे :**

कवयित्री संजीवनी या नावाने काव्यलेखन करणाऱ्या संजीवनी मराठे या कवयित्री तर होत्याच शिवाय कविसंमेलनात स्वत:च्या कविता सुरेल आवाजात त्या गातही आसत त्यांचा पहिला कवितासंग्रह काव्य संजीवनी –१९३२ साली प्रकाशीत झाला नंतर राका –१९३९, संसार –१९४३, छाया –१९४९, चित्रा –१९५७, चंद्रफुल –१९७१, मी दिवाणी –१९८१, आत्मीय –१९९४ अशा अनेक कवितासंग्रहातुन आणि भावपुष्प व परिमला या गितसंग्रहातुयन त्यांची काव्य जिवनातील वाटचाल वाचकांना अनुभवता आली. मराठे यांच्या कविता तरल आणि संजीव स्वप्नांची निर्मिती करणारी आहे. त्यांच्यावर भा.रा.तांबे यांच्या भावगितांचा प्रभाव होता.

संजीवनी बाईंची सामाजीक जानीव संसार या कविता संग्रहात थोडयाफार प्रमाणात व्यक्त झाली आहे. स्वत:च्या अस्तित्वाची जानीव आजच्या स्त्रीस होऊ लागली आहे. हयाचे प्रत्यांतर त्यांच्या पुढील ओळीतुन येते.

**''मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी,**
**कलावती, शास्त्रज्ञ, विधीगुणी नसे मी,**
**विश्वाची मी जणू समूर्त स्त्री माझे नाव असे''**

त्यांनी स्त्रीच्या विविध भुमिका आत्मविश्वासाने येथे मांडण्याचे दिसुन येते सातत्याने ४०–५० वर्शे लिखान करणाऱ्या कवयित्री संजीवनी मराठे यांची ही कविता प्रथम स्त्रीला प्रेयसीच्या रूपातच पाहते स्त्री पुरूषामध्ये समानता असावी जीवभाव असावा अशी सुशिक्षित आधुनिक स्त्रीची स्वप्ने त्या व्यक्त करतात. पण तरीही कवितेत स्त्रीची समर्पनाची भावना दिसते त्यांच्या नंतरच्या काही कवितातून आधुनिक स्त्रीने मागितलेल्या समानतेची जाणीव दिसते परंतु त्यांचा कवितेचा स्थायीभाव झोकुन देण हाच आहे.

**४) शांता भोळके (१९२१–२००२)**

त्यांनी भरपूर काव्यलेखन केले आहे. त्यांचे कविता संग्रह पुढीलप्रमाणे आहेत. वर्षा (१९४७), रूपसी (१९५६), तोच चंद्रमा (१९७३), गोंदल (१९७५), जन्मजान्हवी (१९९०), पुवसंध्या (१९९६).

मराठी वाङमय कोळीगीते या गीतप्रकारास पुनरूज्जीत करण्याचे श्रेय शांताबाईकडे जाते ३०० वर्षाची परंपरा असलेला लावणी प्रकार शांताबाईनी चित्रपट गीतासाठी हाताळला मराठीतील पहिली स्त्री लावणीवर असा बहुमान पटकावला शांताबाईनी काही नाटयगीते लिहीली अस्सल मराठमोळी शब्दकला चित्रमय शैली आणि रेखीव रचना त्यांच्या भगीतात्म कवितला या काळात विलक्षण लोकप्रियता लाभली. शांताबाईनी अनेक वर्षे सातत्याने काव्यलेखन करून मराठी कवितेला स्वत:च्या भावविश्वात गुंतवून ठेवले.

**५) प्रभा गणोरकर :**

यांच्या व्यतीत –१९७४ विवर्त –१९८५ हया कवितासंग्रहातून रगीच्या अंतर्मनाचे आणि प्रेमानुभवाच्या विविध छट कव्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतील दु:ख अंतर्मुख करणारे आहे प्रीतीच्या निराशेतुन दुरतेतुन ते जन्मलेले आहे गणोरकरांचे अनुभवविश्व समृद्ध आहे त्यांच्या कवितेतून सफल प्रेमानुभाव पेक्षा विफल प्रेमानुभव प्रामुख्याने व्यक्त झाला आहे असे म्हणावे लागेल. इ.स. १९७५ हे आंतरराष्ट्रीय रगीवर्ष जाहीर झाले या निमित्ताने स्त्रीयांच्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार होऊ लागला. प्रभा गणोरकर यांचा विवर्त हा काव्यसंग्रह – १९८५ मध्ये प्रकाशित झाला. त्यात नेविवेतील रणीमन व्यक्त झाले त्यासाठी झाड ही आदिबंधात्मक प्रतिमा वापरली आहे. प्रेम व विश्वास रगीच्या मनातील कोलाहल त्यांनी 'ट्रस्टगेम दोन' या कवितेतून स्पष्ट केला आहे.

नव साहित्यातील मनोविश्लेषनाचा संस्कार आणि महानगरिय संवेदनाचा ठसा प्रभा गणोरकरांच्या काव्यातुन उमटतो.

**६) मल्लिकाह अमरशेख :**

वाळूचा प्रियकर –१९७९ साली हा कविता संग्रह प्रकाशित झाला त्यांनी स्त्रीचं आयुष्य म्हणजे मुक्या वेदनाचं वाटोळ म्हणटलं आहे प्रचंड वेगाने बदलणारी

मुंबई, तेथे पुरूषाबरोबर स्त्रीच ही आयुष्य फरफटत चाललय, जीवन यांत्रीक झालयं, प्रेमाला वेळ नाही, जीवनातील असुरक्षितता वाढली, घुसळुन काढणाऱ्या या जीवनकलहाला त्यांनी काव्यातुन प्रकट केले आहे.

स्त्रीशरीर आणि तिच्या जाणीवा हयांच्या विषयी मत व्यक्त करणाऱ्या मल्लिका अमरशेख हयांनी वेश्या जीवना विषयी, वेश्याच्या भनंग आयुष्यविषयी त्वेषाने आपले विचार व्यक्त कले आहेत. स्त्रीवादी जाणीवा मल्लिका अमरशेख यांच्या कवितेत स्पष्टपणे दिसतात. वेगाने फरफटत चालेले स्त्रीपुरूषांचे आयुष्य, अनिष्ठ प्रथा अस्तित्व टिकवण्यासाठी दयावा लागणारा झगडा हयांचे चित्र मल्लिकांच्या कवितेतुन मोठया ताकदीने व्यक्त झाले आहे.

**समारोप :**

साठोत्तरी काळातील काही महत्वाच्या मराठी कवयित्रींची सुरू असलेली वाटचाल आजपर्यंत यशस्वीपणे चालु आहे. या प्रदिर्घ वाटचालीमध्ये मराठी कविता विविधांगाने बहरली, फुलली आणि समृद्ध झाली.

साठोत्तरी कालखंडात इंदिरा संताच्या कवितेतुन पतिविरहाचे दु:ख प्रामुख्याने व्यक्त झाले आहेत. पद्मा गोळे यांच्या कवितेतुन स्त्रीप्रेमाची विविध रूपे व्यक्त झाली असून स्त्रीजीवना विषयचे पुरोगामी विचार स्त्री जीवनातील दु:खे व्यक्त झाली आहेत.

संजीवनी मराठे यांच्या कविता रविकिरण मंडळाच्या कवितेच्या वळणाच्या असुन त्यातुन प्रेमाची विविध रूपे साकार झाली आहेत. शांता भोळके यांनी सातत्याने काव्यलेखन केले असुन त्यांची कोळीगीते, लावणीगीते, नाटयगीते, भावगीत असे अनेक काव्यप्रकार हाताळले आहेत.

थोडक्यात मराठी कवयित्रींच्या १९६० पुर्वीच्या कवितामधुन हे लक्षात येते की, घर–संसार पति–मुले हे अनुभववि  व  अनेक कवयित्रींच्या कवितेमध्ये आलेले आहेत.

इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता भोळके हया कवयित्रींच्या कवितामधुन स्त्रीजीवना विषयीचे विचार व्यक्त झाले आहेत. तसेच स्त्री केवळ भोगवादी नसुन ती माणुस आहे. माणुस म्हणुन स्वत:च्या अधिकाराने जगण्याचा तिला हक्क आहे. अशा हक्कांची अधिकारांची स्वकर्तुत्वाची जाणीव तिला झाल्याचे ही हया कवितामधुन जाणवते.

साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती ही की कवयित्रीची व काव्य संग्रहाची वाढ ही प्रचंड प्रमाणात झाली आहे. त्यांचे अनुभववि  व ही विस्तारलेले आहे. साठपुर्व कवयित्रीच्या कवितेपेक्षा साठोत्तरी कवयित्रींच्या कवितेत प्रेमानुभव आधिक धीटपणे व्यक्त झालेला आहे.

या कालखंडात मराठी काव्याने नवीन वळणे प्राप्त केली या कालखंडात काव्याला नवचैतन्य प्राप्त झाले असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ :**

१) जाधव रा.ग. आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रका  ान पुणे.

२) मराठे संजीवनी संजीवनी (संपा भालचंद्र खांडेकर) अनमोल प्रका  ान पुणे.

# साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागर कथेतील स्त्री दर्शनाचे स्वरूप

प्रा. डॉ. सिध्दार्थ कुंडलिक इंगोले
स्व.पुष्पा देवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड जि. वाशिम

प्रस्तावना :-

आधुनिक मराठी वाङ्मयात १९६० नंतर अनेक साहित्य प्रकार उदयास आले आहेत. साठोत्तरी मराठी साहित्यात जरी आधुनिक मराठी वाङ्मयाचे क्रांतिकारी प्रसाद उमटत असले तरी, पुरुषप्रधान संस्कृतमध्ये किंवा व्यवस्थेमध्ये स्त्री ही मुल आणि मूल या मर्यादा बाहेर गेली तरी ही समीक्षा अंती काही घटक व क्षेत्र २१ व्या शतकातही स्त्रीची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रगती झाली असे घोषित करीत असले तरी ही काही क्षेत्रात आधुनिक पुरुषप्रधान संस्कृतीचे चटके नागर स्त्रीला कमी अधिक प्रमाणात सोसावे लागतात. एकोणिसाव्या शतकातील महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले या महान समाजसुधारकांनी स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी खूप परिश्रम घेतले. विसाव्या व्या शतकात सुधारणाही झाल्या. विसाव्या शतकातील स्त्रीने स्त्रीवाङ्मयात अनेक साहित्य क्षेत्रात प्रगती केली.विशेष म्हणजे स्त्री जागृतीच्या बाबतीत ग्रामीण भागापेक्षा नागरी भाग अग्रेसर आहे. स्त्री शोषणाचा रंग फक्त ग्रामीण भागापेक्षा चकाकता आहे. जागतिकीकरणाच्या युगामध्ये सर्व प्राणी मात्रात श्रेष्ठ मानवप्राणी आणि मानवण्यात सर्वात श्रेष्ठ स्त्री आहे. महापुरुषाचा वैचारिक प्रेरणेमुळे व विचारांच्या प्रभावाने स्त्री आज सर्वोच्च पदावर जाते आहे. शिक्षणाचा वसा घेउन आज स्त्री नगर भागातही प्रगती पथावर आहे. ती कथा वाङ,मय व कादंबरीत आपल्या व्यथा व वेदना जाहिरपणे मांडत आहे. अद्यशिक्षिका कांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचा आदर्श डोळयासमोर ठेवून स्त्रिया आणि मुली जागतिकीकरणाच्या लाटेमुळे शहरीकरणामुळे झोपडपट्टीतील गरिब मुली डॉक्टर, वकील, इंजिनीयर, प्राध्यापक गायक, कामगार, आमदार, खासदार होत आहेत. त्याचे श्रेय सावित्रीबाई फुलनांच जाते.

जागतिकीकरणामुळे शहरामध्ये जीवन जगणा-या माणसासोबतच गुन्हेगार वेश्या, व्यभिचारी यांचे ही जीवन नागरकथेत चित्रित झालेले मराठी वाडमयात दिसून येते. घर, घरातील कुटुंब सांभाळणा-या गृहणीपासून ते नोकरी किंवा स्वातंत्र व्यक्तिमत्वासाठी जागतिकीकरणामध्ये संघर्ष करणाऱ्या साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागरी कथेतील स्त्री दर्शनाचे स्वरूप याचा आढावा सदरील शोध निबंधामध्ये वास्तव रूपाने घेण्याचा प्रयत्न केला आहे.

साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागरीकथेतील स्त्री दर्शनाचे स्वरूप :

जागतिकीकरणानंतर मराठी नागरिकथेमध्ये कौटुंबिक जीवन, नोकरी करणा-या स्त्रियांच्या समस्या प्रेम, दलिताविषयी दुःख व सहानुभूती घरातील व ऑफिसमधील आर्थिक विषमता, भावनिक व बौद्धिक आंदोलने, सामाजिक, मानसिक अन्याय, अत्याचार, रुढी विरूध्दचे बंड व विरोध मराठी साहित्यात नागर कथेतील रूढीच्या विरुद्ध केलेला विद्रोह मराठी साहित्यात नागर कथेत प्रामुख्याने नगरातील स्त्री समस्याचे चित्रण येते. नागर स्त्री कथेत पुणे, मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरातील स्त्री जीवनाचे दर्शन होते. त्यांचा भौतिक सुख सुविधेतील जीवनशैली,त्याच प्रमाणे मध्यमवर्गीय जीवनाबरोबरच चाळीत, झोपडपट्टीत राहणा-या दारिद्रयात जीवन जगणा-या व संघर्ष करण्यापासून ते श्रीमत स्त्रीपर्यंत विविध स्तरातील वास्तव जीवनाचे दर्शन खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण यामुळे बदलून गेले आहे. ग्रामीण भागातील पुरुषप्रधान वृत्ती आणि शहरी भागातील पुरुषप्रधान प्रवृत्ती हा नव्याने फरक साहित्यात रेखाटलेला फरक नव्याने मराठी वाङ्मयातील कथा या साहित्य प्रकारात दिसून येतो. पुरुष प्रधान संस्कृतीमुळे व वर्तनामुळे स्त्रीच्या वाट्याला अनेक दुःख व वेदना आणि शोषण, अन्याय अत्याचार आल्यामुळे त्या स्त्रिया जागृत झाल्या पण.. त्यांचा विद्रोह साहित्यिक साहित्य कृतीमध्ये सौम्यपणाने रेखांकित झालेला दिसून येतो. अर्थातच त्यांचा विद्रोह पेटून उठलेला दिसून येत नाही. वाङ्मयातील अधोरेखांकित स्त्रीचे लैंगिक, शारीरिक, भावनिक शोषण

होते. तिच्याकडे व्यक्ती म्हणून न पाहता एक मादी व वस्तू म्हणून पाहिले जाते. व तिचे शोषण केल्या जाते. म्हणून या विषयी प्रभा गणोरकर म्हणतात.

"स्त्रीकडे स्त्री म्हणून न पाहता व्यक्ति म्हणून कुटुंबाचा, समाजाचा घटक म्हणून, पुरुषाप्रमाणेचं विशिष्ट स्थितीत. स्थलकामाच्या चौकटीत जगणारे मन ही अस्तित्व म्हणून पाहत तिच्या क्रिया प्रतिक्रियांचे चित्रण नवकथेत प्रथम केले,'[1].. वरिल मानसिकतेच्या कथा साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेल्या नागरकथेतील स्त्री दर्शनाच्या स्वरूपाच्या कथांमधून वरिल मानसिकतेचे चित्रण होताना दिसते.

साठोत्तरी मराठी नागरी कथेतील स्त्री दर्शनाचे स्वरूप अभ्यासतांना ग्रामीण कथेतील मानसिकता किंवा माणूस आणि नागरी दलित कथेतील ग्रामीण, नागरी माणूस यामध्ये सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक भिन्नता आहे. वरिल स्वरूपाचा फरक दलित नागर आणि ग्रामीण कथा हयामधून दिसून येतो. हा फरक दर्शवितांना रा.ग. जाधव समिक्षक म्हणतात "दलित कथेने ग्रामीण आणि नागरी या दोन्ही परिसराचा वेध घेतला आहे. नागरी परिसराच्या संदर्भात शहरातील झोपडपटया, गलिच्छवस्त्या, कामगार वसाहती, मोलमजुरी करणा-यांचे जग या सारख्या क्षेत्रातील मोठे अपूर्व असे जीवन चित्रण दलित कथेत व्यथित झाले . त्यामुळे दलित्वाची संकल्पना आपोआपच विस्तृत झाली आहे."[2].. म्हणून डॉ. अजली सोमन यांनी प्रा. रा.ग. जाधव यांच्या मतांच्या सदर्भात काढलेले उद्गार किंवा मत अतिशय महत्वाचे वाटते त्याचबरोबर साठोत्तरी मराठी कथेने नागरी मराठी कथेला नव चैतन्य दिले आहे. म्हणून नवकथकारांनी कथेच्या क्षेत्रात खरोखर क्राती केली आहे. खरा अनुभव कथेत वास्तव जीवनाभिमुख केला. म्हणून वरिल मताची पृष्ठी देताना 'गंगाधर गाडगीळ' म्हणतात. की, "नवकथेच्या लेखकांनी कथेच्या क्षेत्रात अनेक संकेत झुगारून दिले आहेत. हे साठोत्तरी मराठी साहित्यातील कथेचे मोठे वैशिष्ट आहे. आणि तत्पूर्वी मराठी साहित्यात संकेतांचा बुजबजाट झालेला होता. म्हणूनच हे वैशिष्ट्य अधिक मोलाचे ठरत आहे.

साठोत्तरी मराठी साहित्यात नागरकथेतील स्त्री दर्शनाच्या स्वरूपाचे परिणाम :

साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागरकथेतील स्त्री दर्शनाच्या स्वरूप समजून घेतांना परिवर्तनाच्या आणि विकासाच्या काळात आज स्त्रियां नौकरी, कामाच्या निमित्ताने घराबाहेर पडत आहेत. परंतु त्यांना नोकरी करतांना कंपनी, उद्योग, गृह उद्योग, ऑफिस ह्या ठिकाणी नागर, शहरी स्त्रियांना आजही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. स्त्रियांच्या विनयभंगाचे छेडछाडीचे, मानहानीचे, मानसिक, भाविक, शोषणचे प्रकार ग्रामीण व नागरी भागात गंभीर होत आहेत. हुंडाबळी, वासनेचा बळी घटस्फोट खून, हल्ले, बलत्कार इ. समस्याचे चित्रण नागरी कथांमधून होतांना दिसून येते. हे शोषण अन्याय, अत्याचार थांबला पाहिजे तेव्हाच सावित्रीबाई आणि महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेली खरी स्त्री-प्रतिमा प्रत्यक्षात समाजात वावरताना दिसेल. समाजातही राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व्यावसायिक क्षेत्रात कर्तृत्वान स्त्री आहेत. लोकशाहीला अभिप्रेत असणारी स्त्री समाजात खंबीरपणे उभी राहिली पाहिजे.

हया बाबतीत डॉ. सौ. कल्पना बोरकर म्हणतात, "समाजामध्ये अनेक स्त्रिया स्वातंत्र विचाराच्या, आत्मविश्वासू व आपले चांगले व्यक्तिमत्व घडविण्याचा निश्चय करणा-या असतात. हे करत असताना त्यांना अनेक अडचणींना तोड द्यावे लागते" [4]..

वरील समस्येमुळे स्त्रियांना अनेक मूलभूत हक्कापासून वंचित व्हावे लागत आहे. काही कुटूंबातील व्यक्तिचा पाठींबा असतो. म्हणून त्या प्रगती पथावर आहेत. राजकारणामध्ये पण ग्रामीण आणि नागरी स्त्रियांना वर्चस्वाचा बळी द्यावा लागत आहे. कारण की, नवरा सांगेल त्या ठिकाणीचं राजकिय पदाधिकारी महिला नामधारी म्हणून सही करत आहे. सत्ता स्त्रियांच्या हाती... पण मात्र अधिकार पुरुषाच्या हाती. असे दुहेरी शोषण शहरातील स्त्रियांचे २१ व्या शतकातही होत आहे. हे प्रामुख्याने साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेल्या नागर कथेतील स्त्री दर्शनाच्या स्वरूपाचा वैशिष्ट्यपूर्ण स्पष्टपणे दिसून येते. सदरील शोधनिबंधामध्ये निवडक विषयाचा आढावा संशोधनात्मक दृष्टीने घेतला आहे. प्रगतीच्या व एकविसाव्या शतकातही स्त्रियांचे बऱ्याच क्षेत्रांमध्ये व घटकांमध्ये शोषण होताना दिसून येत आहे. ते शोषण व अत्याचार काही प्रमाणात नागर स्त्रिया आजही सहन

करतांना दिसून येत आहेत. हे वर्णन साठोत्तरी मराठी साहित्यात व्यथित झालेल्या नागरिक कथेतील स्त्री दर्शनातून दिसून येते.यांनी जे कथेमध्ये मांडले आहे ते वरिल समस्याचे कोडे नाते संबंधाच्या बाबतीतून सोडवताना दिसून येतात. ह्या संदर्भात म.द.हातकणंगलेकर म्हणतात. "बदलत्या परिस्थितीत कौटुंबिक नात्यामध्ये निर्माण झालेली अस्वस्थता व अदृश्य ताण यांचा वेध ती कथा घेते." [5]..

अशाप्रकारे साठोत्तरी मराठी साहित्यात नागरिक कथेतील स्त्री दर्शनाच्या कथेतील व्यथा वेदनांच्या स्वरूपाचा सदरील आढाव याशोधनिबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक कथाकारांनी स्त्रियांच्या समस्यांचे वेगवेगळे पंदर हळूवारपणे उलगडून कथेत मांडतांना वास्तव प्रयत्न केला आहे. हे कथन रेखाटतांना घर, नोकरी आणि कुटुंब सांभाळून जीवनातील करिअर करतांना येणारा कामाचा ताण, स्पर्धेमधील नोकरी व करिअरची स्पर्धा तणाव, नातेसंबंध, परिस्थितीसी संघर्ष करताना इ. समस्यांना नागरी स्त्रियांना तोंड द्यावे लागत आहे. याचा संशोधनात्मक उलगडा या शोधनिबंधामध्ये केला आहे.

समारोप :-

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या बदलत्या रेट्यामुळे साठोत्तरी मराठी नागर कथेतील स्त्री दर्शनाचे स्वरूप व्यक्त करतांना प्रथमच त्याच्या शोषणाच्या किंवा अन्याय-अत्याचारांच्या समस्या प्रथम सोडविल्या पाहिजेत. या संगणकाच्या युगात कितीही प्रगती केली तरी, स्त्रीला प्रगतीच्या क्रांती प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे. त्याशिवाय खरोखर महापुरुषांच्या विचारांना अभिप्रेत असलेली "परिवर्तनवादी स्त्री "समाजात वावरताना दिसून येणार नाही.

म्हणून ग्रामीण स्त्री जीवन असो किंवा नागरी स्त्री जीवन असो ह्यात क्रांती व परिवर्तनशीलता अभिप्रेत आहे. असा क्रांतिकारी बदल प्रामुख्याने झालाचं पाहिजे. असा वरिल संशोधनाचा मुख्य व प्रांजळ हेतू आहे. म्हणून साठोत्तरी मराठी साहित्यात उमटलेले नागरकथेतील

स्त्रीदर्शनाचे स्वरूप वरिलप्रमाणे संशोधनात्मक रित्या अभ्यासले आहे.

संदर्भग्रंथ :-


१) 'प्रभा गणोरकर," मराठी कथेतील स्त्री- चित्रण" 'अक्षर यात्रा' १९९९-२०००, पू.क. ७९.

२) अंजली सोमण, 'मराठीत कथेची स्थिती गती' प्रतिमा प्रकाशन -- पुणे १९९५ पृ.क्र. १९०.

३) "गंगाधर गाडगीळ" खडक आणि पाणी उत्कर्ष प्रकाशन पुणे- २००३ पृ. क्र. १७७.

४) 'कल्पना बोरकर "स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण कथा आणि स्त्री" "स्वरूप' प्रकाशन औरंगाबाद पहिली आवृत्ती ६ डिसेंबर २०१५ पृ. क्र. १४२.


***

# परीघा वरून कवितेचं बोट धरून चालणाऱ्या...

## प्रा. डॉ. श्यामल गरुड

मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

मराठी साहित्यात गेल्या तीन दशकांपासून स्त्रीवादाची सकस चर्चा होताना दिसते आहे. आज स्त्रीवादी भगिनी भाव आणि जात वास्तवाच्या तात्विक मुद्यां भोवतीचं धुकं ही बऱ्या पैकी स्पष्ट झालेलं आहे. उच्चवर्णीय स्त्रीवादी संघटनांची पितृसत्ते विरोधातली लढाई वरच्या आळीपुरतीच मर्यादित राहिली. कारण उच्च जातीत जन्माला येण्याचे' प्रिव्हलेज' नाकारून त्यांना कुठला ही संघर्ष उभा करायचा नव्हताच. किंवा त्यात त्या अपयशी ठरल्या त्यामुळे त्यांना पुरुषसत्ताक भिताडावर डोकं आपटणे किंवा त्याला विरोध करीत संघर्ष जारी ठेवणे क्रम प्राप्तच होते. पुढे स्त्रीवादी संघटनांचे 'सर्व स्त्रिया या दलित आहेत' हे राजकीय विधान ही मग निकालात निघाले. कारण जात व्यवस्थेच्या उतरंडीला नकार न देता समानता कशी प्रस्थापित होणार होती? हाच कळीचा मुद्दा होता. याच पार्श्वभूमीवर मग दलित स्त्रीवाद म्हणजेच आजचा आंबेडकरी स्त्रीवाद आणि बहुजन स्त्रीवाद अशी विभागणी होणे क्रमप्राप्तच होती. त्यातूनच पुढे यादोन्ही अब्रा म्हणी स्त्रीवादी चळवळीने म. फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जाती अंताच्या चळवळीच्या प्रेरणा घेऊन आपल्या अस्तित्वाचे प्रश्न ऐरणीवर आणणे ही स्वाभाविकच होते. महेंद्र भवरे आंबेडकरी

स्त्रीवादाच्या पाया भरणी विषयी आंबेडकरी स्त्रियांच्या कवितांच्या अनुषंगाने अत्यंत मूलभूत संदर्भ देतात. -

"शंभर- दिडशे वर्षापूर्वी म. फुल्यांनी स्त्री पुरुष समतेचा विचार मांडला आहे. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे या स्त्रीवादाच्या उद्गात्या आहेत. विसाव्या शतकात हिंदू कोड बील मांडून भारतीय स्त्रीच्या समग्र विकासाची मागणी केली आहे. या महापुरुषांच्या प्रेरणेतून स्त्रीवादी आविष्काराची सुरुवात फुले आंबेडकरी साहित्याच्या प्रांतात झाली आहे. त्यासाठी पाश्चात्य स्त्रीवाद किंवा फ्रेंच लेखिकांनी मांडलेल्या स्त्रीवादाच्या कुबड्या घेण्याची गरज उरली नाही. पाश्चात्य मांडणीत भारतीय धर्म, जाती व्यवस्था, वर्ण व्यवस्था, धर्म ग्रंथ, श्रुती स्मृती, धर्माने केलेले कायदे या गोष्टी समोर ठेवून मांडणी झालेली नसते. भारतीय परंपरेत वैदिक वाङ्मयात पुरुषसुक्तात माणूस जन्माचे सूत्र सांगितले आहे. ब्राम्हण मुखातून, क्षत्रिय बाहूंतून, वैश्य मांड्यातून आणि शूद्र पायातून जन्माला आले आहेत. मानवी जीव जन्मास कसा येतो हे जीवशास्त्राने सांगितले आहे. स्त्री पुरुष समागमातून स्त्री बिजांड आणि पुरुष शुक्राणू यांच्या संयोगातून गर्भ धारणा होते. गर्भाने विशिष्ट काळ पूर्ण केल्यानंतर जीव जन्मास येतो. परंतु वैदिक वाङ्मयात, मानवी जीव जन्मास घालण्याच्या संदर्भात स्त्री योनीचा कुठेही संबंध येत नाही. तिचे अस्तित्व नाकारूनच निर्मितीचे सूत्र कथन केले जाते. यासर्व भानगडीत स्त्रीवादी चिकित्सा कशी करायची याची मांडणी तथाकथीत मराठी स्त्रीवाद्यांनी करणे गरजेचे आहे."---[१]

आंबेडकरी – बहुजन स्त्रियांनी जात व्यवस्था आणि पितृसत्ता यातील श्रेष्ठ –कनिष्ठत्वाची उतरंड डोळया समोर ठेवूनच आपल्या स्त्रीवादाची मूल्यात्मक बांधणी केलेली आढळून येते. ज्या देशात रक्त

शुद्धी आणि वंश शुद्धीच्या भ्रामक भाकड कथांनी इथल्या जातीची निर्मिती केली, स्त्री यांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी रुढी – परंपरेच्या गोंडस प्रथा रुजविल्या, जातिबाह्य विवाहांना बंदी घालून जात समूहातील स्त्रियांवर स्वतःची जात व्यवस्था शुद्ध ठेवण्याचे नियम लादले, त्यातूनच स्त्रियांचे जातिनिहाय शोषण झाले. या संदर्भात बहुजन स्त्रीवादी अभ्यासक संध्या नरे – पवार लिहितात -

"इथली पुरुषसत्ता ही ब्राह्मणी नीतिमूल्यांवर आधारित आहे असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा त्याचा संबंध या नियमावलीशीच असतो. या नियमावली ब्राह्मण जात समूहांचे स्त्रियांची लैंगिकता बंदिस्त करत या जातींना अधिक श्रेष्ठत्व देतात तर मधल्या मागास जातीच्या स्त्रियांची लैंगिकता उच्च – जातीयांसाठी उपलब्ध करून देत त्या जातींचा दर्जा कनिष्ठ ठरवतात."---(२)

या जातीच्या तटबंध्या पुरुषसत्ता सांभाळतात. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत मूलभूत मांडणी करून इथल्या अब्राम्हणी स्त्रीवादाचे सूत्र सांगितले आहे की, 'स्त्रिया या जाति व्यवस्थेचे प्रवेशव्दार आहेत'. थोडक्यात ब्राम्हणी मूल्यांवर आधारित जात व्यवस्थेने आणि पितृसत्तेने वेगवेगळया जातीच्या स्त्रियांसाठी वेगवेगळ नियम करून ठेवले आहेत. महात्मा फुले यांनी आपल्या 'कुळबिन अखंड' यात विस्तृत मांडणी केलेली आहे. जात वर्ण वर्चस्व वाद समाज व्यवस्थेत दलित –बहुजन आणि इतर मागास घटकातील स्त्रियांचे एकूण शोषण, जात, पितृसत्ता, वर्णव्यवस्था आणि श्रम व्यवस्थेत ही तिला खालच्या दर्जात लोटून विभागलेली आहे. अगदी मागास जातीच्या स्त्रियांची लोककला ही पुरुषसत्ताक, उच्चवर्णीय लोकांच्या मनोरंजनासाठी, उपभोगासाठी वापरली जाते की काय असे

चित्र आहे. जातवर्ण वर्चस्व वादात जातीचे – संस्कृतिचे श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी स्त्रीचे शरीर हेच मुख्य माध्यम (हत्यार) बनविले गेले आहे. यासर्व पार्श्वभूमीवर आंबेडकरी – बहुजन आणि इतर मागास स्त्रीयांच्या संदर्भात आंबेडकरी बहुजन स्त्रीवादाने महत्त्वाचे हस्तक्षेप नोंदविले आहेत. या परीघावर च्या स्त्रियांची एकूण ब्राम्हणी पितृसत्तेकडे बघण्याची प्रक्रिया आपणास त्यांच्या साहित्यातून वाचावयास मिळते. त्यात ही 'कविता' हा वाङ्मय प्रकार परिघावरच्या स्त्रियांचे असंख्य अंधारे कोनाडे अधिक उजागर करताना दिसतो.

दलित - बहुजन – मागास स्त्रियांची अंतःस्थ वेदना स्त्रियांनी आपल्या कवितेतून अधिक मोकळे पणाने व्यक्त केली आहे. प्रज्ञा दया पवार आपल्या एका कवितेत म्हणते -

**"एकविसाव्या शतकाच्या सांस्कृतिक चिखलात**
**आता वाढत चाललाय दिशा हिन कोलाहल**
**चहुबाजूनी** चिणला **जातोय तुझा बुलंद आवेग**
**तरीही तू निमूटपणे चालतेस**
**त्यांनी आखून दिलेल्या रस्त्यावरून**
**तरीही तू बोलत नाहीस दबलेल्या हुंकारा बद्दल**
**रक्ताच्या सुकलेल्या ओघळा बद्दल"**

अगदी पुराण कथे पासून ते आजचा ऐतिहासिक आढाव्यात स्त्रियांचे खच्चीकरण आणि शोषण जसेच्या तसेच होत आहे की काय? हा प्रश्न कवयित्री प्रज्ञा पवार आपल्या कित्येक कवितेतून विचारतेय. ती पुढेही म्हणते -

**"दिशांवर चढलेली अमानुष काजळी**
**अजून तशीच आहे शंबुका, रामराज्यात होती तशीच**

**मी वाट पाहतेय इतिहासाच्या पानावर**
**तू पेरून ठेवलेल्या सुरुंगाच्या दाहक स्फोटाची"**

शंबुकाचा वर्ण व्यवस्थेच्या विरोधातला विद्रोह प्रज्ञा पवार वर्तमानाच्या पटलावर आणून इतिहासाची छाननी करते. जात व्यवस्थेची नस चाचपडत समष्टीच्या दुःखाचे मूळ शोधण्याचे काम करते.

परीघावरच्या स्त्रियांच्या कविता जात-पितृसत्ता अन् संस्कृतिच्या भुयारात कोंडलेल्या प्रतिध्वनींना उजागर करतात. खरंतर स्त्रीच्या आत्मभान जागृतीची अपरिहार्यता हाच परीघावरच्या स्त्रियांच्या कवितेचा आत्मस्वर राहिला आहे. हा प्रवास 'स्व' पासून बाह्य समष्टी पर्यंत अमर्याद पणे त्यांच्या कवितेतून – वाचावयास मिळतो. निरजा यांची या संदर्भातील 'खैरलांजी ते कोपर्डी' ही कविता भगिनी भावाच्या अनुषंगाने महत्वाची आहे ---

**"खैरलांजी ते कोपर्डी**
**व्हाया दिल्ली, मुंबई आणि गावा शहरातला**
**कोणता ही सुनसान प्रदेश**
**फक्त नावं बदलताहेत जागांची**
**माझ्या ओलजपलेल्या योनीत**
**सरकावले जाता हेत सत्तेचे झेंडे आणि**
**त्याच्याच मेणबत्त्या करून काढले जाताहेत मोर्चे**
**कौर्याचे दाखले देत वाजवताहेत तबकडी बातमीची**
**काय असते जातबाईची आणि कोणता असतो धर्म?**
**बदलतो का वेदनेचा स्तर जात बदलली तर ?**
**शरीराला ओरबाडणाऱ्या चेहऱ्यांवर कसलं असतं समाधान**

**बाईला भोगल्याचं की जातीला भोगल्याचं ?"**

ब्राम्हणी जात वर्ण वर्चस्व वादी तटबंदी मागासवर्गीय स्त्रियांची लैंगिकता दलित – बहुजन मागास जातींना दहशतीत व तुम्ही तुमच्या पायरीवर रहायाचसाठी वापरली जाते. हे पितृसत्तेचे राजकारण स्त्रीवादी विचार विश्वाने वेळोवेळी उघडे पाडले. नीरजा या सांस्कृतिक राजकारणाचा भेसूर चेहरा ओरबाडून पुढयात ठेवते. तर दुसऱ्या बाजूस संध्या नरे – पवार बहुजन स्त्रियांची जात व्यवस्थेने केलेली कोंडी स्त्रीवादाच्या आधारे उघडी पाडते. संध्या नरे – पवार लिहिते -

"स्त्रीया या जाति व्यवस्थेचे प्रवेशव्दार आहेत, असे जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, तेव्हा ते स्त्रियांच्या लैंगिकतेवरच्या नियंत्रणाचाच मुद्दा अधोरेखित करतात. महाड इथल्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या वेळी भाषण करताना – तुमच्या पोटी जन्म घेणे पाप का ठरावे? असा प्रश्न बाबासाहेबांनी उपस्थित अस्पृश्य स्त्रियांना विचारला होता. या प्रश्नातून आंबेडकर ब्राम्हण स्त्रिया आणि अस्पृश्य स्त्रिया, सवर्ण स्त्रिया आणि शूद्र स्त्रिया यांच्यातील भेद स्पष्ट करतात. तसेच स्त्रिया केवळ मुलांचीच नाहीतर जातींची ही निर्मिती करतात किंवा जात व्यवस्था तिच्या कडून ती करवून घेते हे स्पष्ट करतात."...[३]

अब्राम्हणी स्त्रीवाद आणि एकूणच पितृसत्ताक व्यवस्थेतील स्त्रियांची होरपळ मराठी कवयित्रिंनी खूप ताकदीने पकडली आहे. बाई - जात-संस्कृती अन् आजची तिची कु तर ओढ ही नव्वदोत्तर स्त्री कवितेतून नेटके पणाने समोर आलेली आहे. स्त्रियांच्या जगण्यातला

फोलपणा उंबरठ्यात स्थैर्य जरी असलं तरी त्यात तिचं होणारं अवमूल्यन ती थेटपणे कवितेतून समोर ठेवते -

**"तो म्हणतो कधी ही, कुठे ही, कशाहीसाठी**
**मी पोसतो तुला**
**ती**
**कधी ही, कुठे ही, कशाही साठी नाही**
**पण कधीतरी ती म्हणते...**
**त्या बदल्यात**
**मी झोपते तुझ्या सोबत**
**घरच्या घरी वेश्या होते बाई"**

सुनीता झाडे हिच्या कवितेतलं बाईपण समष्टीचं दुःख घेऊन येतं. बाईचं 'झोपणं' तिच्या कुठल्या स्थैर्याला अधोरेखित करतंय? ही आत्मभानाची बाराखडी जात वास्तवाच्या आणि स्त्रीवादाच्या विष्लेषणातून अधिक स्पष्ट झालेली आढळून येते.

सिसिलिया कार्व्हालो याच पार्श्वभूमीवर सांस्कृतिक प्रतिकात्मकतेवर अत्यंत सौम्य भाषेत फार मोठा आशय घेऊन बोलते -

**"टिकल्या ही आता सात जन्म पुरतील की काय**
**अशा चिकटून राहू लागल्या हेत भाळा**ला
**कानी कपाळी ओरडून सांगितलं, पिच्युईटरी** ग्लॅंड्सना
**की, कशाला हवी तुम्हाला ही सोबत ?**
**म्हणाल्या कप्पाळ तुझं?**
**ओरबाडून खरवडून निघत नाही**
**गोचडी सारख्या आहेत त्या**
ग्लॅंड्सच्या **कसल्या... टॅब्यूच्याच**

**नसातलं रक्त शोषून टच्च फुगतात**
**अन्फुटतात कपाळभर लालीलाल"**

भारतीय विवाह संस्थेने स्त्रियांना स्थैर्याने जगण्यासाठी सोयीचे तत्त्वज्ञान दिलेले आहे. प्रतिकांच्या माध्यमातून सुरक्षित जगण्याची हमी देणाऱ्याच तत्त्वांचा कडेलोट ऱ्हास परिघावरील कवितांनी पार उघडा पाडला. शोषक व्यवस्थेच्या प्रयोजनाचे फसवे बुरखे फाडण्याचे काम अब्राम्हणी कवयित्रींनी वेळोवेळी केले आहे. शास्त्र पुराणात दडलेल्या विषमतेला खऱ्या अर्थाने भिडलेल्या या कवयित्रींचा लेखाजोखा बाई –संस्कृती अन् कवितेद्वारे अधिक सखोल पणे पुढे येणे गरजेचा आहे.

मी माझ्या कवितेच्या काही ओळींनी परीघावरच्या कवितांचा समारोप करते --

**'बाय अलुत्या बलुत्यातली असो**
**की विद्येच्या महाव्दारातली**
**खाटीक खान्यातल्या कसायाच्या हातची दोरी तिलाच दिसते**
**लेकुरवाळया माय वाटेवर ही त्याच्या डोळयातली**
**हमदर्दी रांडेची** शिवी **तिलाच ऐकू येते**
**पण बाय इंद्रियांच्या उठवळ बाजाराची सावरा सावरी**
**करून हात खंगाळून घेण्यापूर्वी**
**अनू मेंदुतली शाई सुकण्या आधीच**
**छळछावण्यांना ताकदीनिशी भिडूच**
**...पण त्या आधी घरातल्या सैताना विषयी** थोडं **बोलू...**
**सैतानाची नखे उपटण्या पूर्वी!"**

परिघा वरील लिहित्या स्त्रियांनी जात-पितृसत्ता यांच्या जखमाचि घळतन ठेवता बाईच्या दुःखाच्या मुळाशी असणारी जात, घराचा आदिबंध आणि त्यातली घुसमट पुढयात आणली. आणि म्हणूनच जात पितृसत्तेच्या विरोधातली अपरिहार्यता बेंबीच्या देठापासून सांगणाऱ्या या कविता पारंपरिक जखमांच्या शास्त्राची पडताळणी करतच पुढयात येतात. आमचा कवी बंधू अरुण काळे म्हणतो "कोणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहीत नसतो... अब्राम्हणी स्त्रियांची कविता ही मुळात अक्षर सुधारण्यासाठी नाहीच आहे. या कवितांना जातीअंताच्या चळवळीत आपल्या माणूसपणासाठी अखंड लढायचं आहे. हाच या कवितांचा जाहिरनामा आहे !

**- श्याम गरुड**

**संदर्भ**


१) महेंद्र भवरे : 'अतिरिक्त' अंक, ऑगस्ट-२०१४ संपादक -दा. गो. काळे, दिनकर मनवर पृ.क्र. ५३.

२) संपादक : वंदना भागवत, : 'संदर्भा सहित स्त्रीवाद-स्त्रीवादाचे समकालीन चर्चा विश्व' अनिल सपकाळ,'बहुजन स्त्रीची लैंगिकता आणि जात' गितालीवी. मं लेखिका – संध्या नरे – पवार पत्रिकेशन प्रकाशक- 'शब्द पब्लिकेशन' वझिराना का, बोरीवली (4) मुंबई- ४०००० १.प्र. आ. २०१४ पृ .क्र. ३९७

३) तत्रैव :पृ. ३९६


***

# साठोत्तरी मराठी कादंबरीतील स्त्रियांच्या अस्तित्वाचा शोध

डॉ. अतुल पाटील
मराठी विभाग, मू. जे. महाविद्यालय, जळगाव.

आधुनिक मराठी साहित्याचा अभ्यास करतांना स्त्रीवादी दृष्टीकोनातून झालेले लेखन हे अस्तित्त्वाचा शोध घेणारी भूमिका, दुय्यम सामाजिक स्थिती आणिप्रखर वास्तवता मांडते. भारतीय समाजातील स्त्रिया या जन्मापासून विविध भूमिकांमध्ये जगत असणाऱ्या पुरुषांशी भावनिक पातळीवर जोडलेल्या असतात. म्हणून तिचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पुरुषाच्या सर्वच बाबींशी सबंध असतो. समाजात वावरत असतांना तिला नकळतपणे पुरुषांशी कोणत्यातरी भूमिकेतून नाते ठेवावेच लागते. आणि त्यातूनचस्वभावाच्या वेगळेपणामुळे, विचारांच्या भिन्नतेमुळे समस्या निर्माण होतात आणि या समस्यांचेच प्रतिबिंब स्त्रीवादी साहित्यात उमटलेले दिसते. परंतु काही कादंबरीकार स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करत नसतांना सुद्धा त्यांच्या साहित्यातून स्त्रियांच्या शोषणाचा आणि भावनिक आंदोलनांचा आशय वास्तवपूर्ण अनुभव घेऊन साकार झालेला आहे. त्याचा लेखनाचा संदर्भ स्त्रीवादी साहित्याच्या दृष्टीने फारसा घेतला जात नसावा, परंतु त्या साहित्यातून स्त्री जीवनाचा भावनिक आणि सामाजिक स्तरावर शोध घेतला जाऊ शकतो. साठोत्तरी साहित्यात चित्रिण केलेल्या अनेकघटना-प्रसंगातून स्त्रियांच्या जीवनातल्या वेगवेगळया समस्यांचीच उदाहरणे समोर येतात.

१९६०च्या नंतर मराठी कादंबरीच्या क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल झाले. आधीच्या काळाचा विचार केला तर, संघर्षातूनच मराठी कादंबरी आकाराला येऊ लागली. 'यमुना पर्यटन', 'मुक्तामाला', 'मधली स्थिती' यासारख्या कादंबऱ्यातून मराठी कादंबरीत स्त्रियांच्या प्रश्नांची पावले उमटलेली दिसतात.१८५० ते १८७५च्या काळात मराठी समाज जागृत होत होता. सामाजिक सुधारणावादी विचार या काळात प्रभावीपणे मांडले जात होते. जुन्या व्यवस्थेला, समाज रचनेला हादरे बसत होते. समाजामध्ये सुधारणावादी आणि विचार करणारी मंडळी यांच्यात संघर्ष सुरू होता. १९६० नंतर उपेक्षित राहिलेल्या स्त्रिया

आणि समाजातील अनेक स्तर विकासामुळे जागृत होत होते. त्यांच्यात नवसुशिक्षित पहिली पिढी तयार होत होती. बहुजन समाजात स्वतःच्या अस्तित्वाविषयीच्या जाणीवांचा, हक्कांचा उदय होत होता. अशा परिस्थितीत अनुभवातून काही साहित्यिक सामाजिक कादंबरी लिहू लागले. स्त्रियांच्या दुःखांना वाचा फोडू लागले. भांडारकर, रानडे, लोकहितवादी, गो. ग. आगरकर यांनी सामाजिक स्थिती आणि तिच्या मर्यादा दाखवून देणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यानंतर पुढच्या टप्प्याचा विचार केला तर, दोन महायुद्धांमुळे सैतानी वृत्तीचा, दुष्काळाचा, भीषणतेचा वास्तव अनुभव कादंबरी लेखनामध्ये प्रदर्शित होऊ लागला. त्यानंतर १९५० च्या जवळपास स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये वेगळयाच जाणवेचे लेखन निर्माण झालेले दिसते. नवसुशिक्षित पिढ्या तयार व्हायला लागल्या होत्या. त्यातूनच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय व सर्वांगीण स्वरूपाचे लेखन निर्माण व्हायला लागलं. बहुजन समाजामध्ये स्वतःच्या अस्तित्वाविषयीच्या जाणिवांचा उदय झाल्याने नवजागृत बहुजनांचा वैचारिक संघर्ष दाखवणारे लेखन निर्माण व्हायला लागलं. १९७० च्या नंतर स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, जनसाहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी वेगवेगळया प्रकारांनी साहित्याची निर्मिती होऊ लागली. याच काळात कादंबरीने आत्मनिवेनाच्या अंगाने स्वतःचे स्वरूप धारण केलेले दिसतं. स्वतःच्या जीवनाच्या हकीकती लिहून काढाव्यात, तशा प्रकारचे लेखन या कादंबऱ्यांचे आहे. नंतरच्या काळात कादंबरींचे हे रूप अनेक नवजागृती झालेल्या स्त्री साहित्यिकांनी स्वीकारलेलं दिसते.

१९६०नंतरचा काळ मराठी कादंबरीच्या संदर्भात अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण मानला जातो. १९६० नंतर अधिक स्पष्टपणे स्त्रीवादी, ग्रामीण, दलित, पौराणिक, अस्तित्ववादी जाणीव अशा अनेक दिशा, नीती झपाट्याने विकसित झाल्या. समाजवास्तवाची नवनवीन क्षेत्रे तिच्यात येत होती. भाषा अधिक जागरूकपणे तिच्यात आपले अस्तित्व सिद्ध करीत प्रभावशाली होत होती. त्यात 'धग', 'माणूस', 'कोसला', 'वैतागवाडी', 'टारफुला', 'इंधन', 'चक्र', 'अजगर', 'स्वामी' या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येतो. या साहित्यकृतीतून स्त्रियांच्या समस्यांना थोड्या प्रमाणात का होईना परंतु स्थान देण्याचा पर्यंत आहे. १९७० नंतर रा. र. बोराडे, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे यांची ग्रामीण कादंबरी अवतरीत झाली. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीचे स्वरूप पाहताते ग्रामीण कादंबरीकार म्हणूनच त्यांचा

विचार करणे महत्त्वाचे वाटते. गावागावांच्या आणि घराण्यांच्या आपापसातील कहाण्या त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचे विषय झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये संघर्ष, त्यातून निर्माण होणाऱ्या घटना यांना साहजिकच प्राधान्य आहे. प्रणय-प्रसंग, योगायोग हे त्यांच्या कादंबरीमध्ये नकळत आलेले विषय आहेत. अण्णाभाऊंनी 'फकीरा', 'वैजंता', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'रानगंगा', 'पाझर', 'वारणेचा वाघ', 'चंदन', 'केवड्याचे कणीस', 'चिखलातील कमळ' अशा अनेक कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. या कादंबऱ्यांच्या आशयात स्त्रियांची भावनिक घालमेल आणि सामाजिक स्तरावर स्त्री अस्तित्त्वाचाशोध घेण्याचा प्रयत्न आहे. 'फकीरा' अण्णाभाऊंची सर्वात जास्त लोकप्रिय ठरलेली कादंबरी आहे. या कादंबरीविषयी मधुकर वाकोडे लिहितात- 'लोकमानसातील इतिहासाला साहित्याचे रूप देणारी 'फकीरा' ही पहिली प्रादेशिक कादंबरी आहे.' इंग्रजी कालखंडात फकीराने वारणेच्या खोऱ्यामध्ये जी बंडखोरी केली, गावासाठी जिथे थरारक प्रयत्न केले, त्याची दखल इतिहासाने घेतली नाही. मात्र लोकमाणसाने ती घेतलेली दिसते. आपल्या गावात जत्रा भरावी म्हणून राणोजीने केलेल्या धाडसामुळे तो देवत्वापर्यंत जाऊन पोहोचतो. आया बहिणींची अब्रू वाचवण्यासाठी वाघासारखा धावून जाणारा सत्यवान हा लोककथांचा विषय बनतो. या सगळया लेखनातून ग्रामीण भागातील हे लोकमानस या कादंबऱ्यांचा मुख्य आशय किंवा केंद्रवर्ती भूमिका झालेल्या आहेत. असे म्हणता येईल.

त्याचप्रमाणे उद्धव शेळके यांच्याही कादंबऱ्यातून ग्रामीण स्त्री वास्तवाचा वेध घेतलेला लक्षात येतो. त्यांची 'धग' ही कादंबरी मराठी साहित्य क्षेत्रामध्ये मैलाचा दगड आहे. कादंबरीच्या रचनातंत्राला झुगारून ग्रामीण वास्तवाचा समर्थ अविष्कार घडवणारी ही कादंबरी त्या काळात लिहिलं जाणं हे एक नवल आहे असं लक्षात येतं. या कादंबरीविषयी म. सू. पाटील लिहितात की, 'धग' ही कठोर वास्तवाचे कलात्मक रूपवैशिष्ट साकरणारी मराठीतली पहिली ग्रामीण कादंबरी म्हणावयास हरकत नाही.' ही कथा हिंगणघाट मोझरी या विदर्भातल्या खेड्यामध्ये घडलेली आहे. स्वतःचे गरोदरपण, बाळंतपण याचीही परवाना न करता कौतिक नावाच्या स्त्रीची कथा या कादंबरीत आलेली आहे. कितीही कष्ट केले तरी हाती अपयशच येत जातं ही कौतिकची जीवनगाथा आहे. मुलांकडे लक्ष द्यायला तिला कधी वेळच मिळाला नाही. संसारातून मन उडालेला महादेव कासम सोबत महादेवाच्या यात्रेला जातो आणि तिकडेच ख्रिश्चन मिशनरीसोबत निघून जातो.

त्याच्या वाटेला डोळे लावून बसलेल्या कौतिकला ही बातमी समजल्यार ती कोसळते. कौतिकचा आक्रोश आणि नामाचे अस्वस्थ बालपण हे वाचकांचे हृदय हेलावून टाकते.‘धग’ या कादंबरीतील ग्रामीण अनुभवविश्वाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे या कादंबरीची विदर्भातली भाषा होय. निवेदन प्रमाणभाषेतून असलं तरी संवादातून ग्रामीण बोलीभाषेचे उपयोजन लेखकाने या कादंबरीत केले आहे. कुठेही दिखाऊपणा दिसत नाही. साध्या सरळ भाषेतून हीकादंबरी अवतरी झाली आहे. कौतिकच्या अनुभवातून विदर्भातल्या ग्रामीण स्त्रीसमस्यांचा आणि वास्तवाचा शोध घेता येतो.

जयवंत दळवी यांनी सुद्धा कोकणच्याच प्रादेशिक जीवनाचं विश्लेषण स्त्रीवादी विश्लेषण प्रतिबिंबित केले आहे. त्यांच्या साहित्यातील विविधतापूर्ण लेखनामुळे शहरी मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण ते समर्थपणे करू शकले. ‘सारे प्रवासी घडीचे’, ‘महानंदा’ यासारख्या कादंबऱ्यांमधून त्यांनी कोकणी जीवनाचा आढावा घेतलेला दिसतो. त्यांच्या कादंबऱ्यांमधून दिसते की, नायक गावाकडे पाठ फिरवतो त्यामुळे तेथल्या जीवनाला आपण मुकलो आहोत ही खंत त्याच्या मनाला आहे आणि आता हे ग्रामीण जीवन आपल्याला कधीही अनुभवायला मिळणार नाही हेही त्याला जाणवतं. या सगळ्या घटनांनी अस्वस्थमन त्यांनी साकार केले आहे. ‘महानंदा’ या कादंबरीमध्ये एका देवदासीच्या मुलीची परवड चित्रित केली आहे. घराण्यातील वाईट रुढीमुळे महानंदा आपल्या रूपलावण्याने, अमोल प्रीतीने मन खेचून घेते, तिची झालेली परवड, तिला आयुष्यात येणाऱ्या अडचणी यांचे चित्र या कादंबरीत आलेले आहे. कोकणी जीवनाचे चित्रण करताना जयवंत दळवी आपल्या वास्तव घटनांनी भरलेल्या लेखनात अनोखे विश्व निर्माण करताना दिसतात. त्यातून कोकणातल्या देवदासींचे जीवन मोठ्या प्रमाणावर स्त्रीच्या सामाजिक प्रश्नांशी निगडीत आहे याचे चित्रण येते.

त्यानंतर मधु मंगेश कर्णिक यांची कादंबरी सुद्धा स्त्रीवादी दृष्टीकोनातून ग्रामीण, दलित आणि महानगरीय झोपडपट्टी मधल्या स्त्री वास्तवाचा वेध घेताना दिसते. देवालयांच्या आशयाने राहणाऱ्या आणि जीवन जगणाऱ्या भावीनींचे जीवन हा विषय अनेक लेखकांनी चित्रित केलेला दिसतो. देवकीच्या प्रेमासाठी गावाशी विरोध करणारे बाकीकाका तिच्याशी विवाह मात्र करू शकत नव्हते. शेवटी भावींनीचे जीवन म्हणजे देवाच्या पायावर वाहिलेले फुल या परंपरेत वाढलेली देवकी आपल्यामुळे कोणाचा संसार उध्वस्त होऊ नये म्हणून गाव

सोडून निघून जाते. याविषयीचे चित्रण या कादंबरीत आहे. 'भाकरी आणि फुल' यामध्ये महानगरीय झोपडपट्टी वास्तवाचे विदारक चित्रण आहे. अंधश्रद्धा, निष्क्रियता अशा प्रकारचंजीवन जगणारया लोकांचे जीवन त्यांनी आपल्या लेखनात चित्रित केले आहे.

या अशा वेगवेगळया प्रकारच्या कादंबऱ्यांमधून साहित्यिकांनी १९६० नंतरच्या स्त्री जीवनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वरील विवेचनावरून एकत्रित विचार करता सामान्य स्त्रियांचा आणि माणसाचा संघर्षपूर्ण इतिहासच कादंबरीत दिला जातो. समाजप्रवाहातील स्त्री आणि जनसामान्यांचे जीवनदर्शन कादंबरी घडवते आणि त्या जीवनदर्शनाच्या आधारे आपण त्या शोषण झालेल्या स्त्रिया आणि समाजाविषयी ऐतिहासिक निष्कर्ष काढतो.

संदर्भ-


१ बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरी –चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.

२ गाडगीळ गंगाधर, आजकालचे साहित्यिक, उत्कर्ष प्रकाशन पुणे.

३ देसाई रणजित, मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.


***

# ‘बिनपटाची चौकट’ या इंदुमती जोंधळे यांच्या आत्मकथनाचा चिकित्सक अभ्यास

सुरेखा भगवानराव आगळे
नूतन कन्या प्रशाला, सेलू जि.परभणी. पिन:- ४३१५०३

भारतीय स्वातंत्र्यानंतर देशात एक स्फूर्ती निर्माण झाली. स्वातंत्र्यपूर्वी भारत देशातील विविध स्वातंत्र्य चळवळी, लढे, आंदोलने झाली. यानंतर देशात स्थैर्य निर्माण व्हायला सुरुवात झाली. भारतीय स्वातंत्र्यपूर्वीही भरपूर प्रमाणात मराठी भाषेतील लेखन झाले आहे. त्यात प्रामुख्याने स्त्रियांपेक्षा पुरुषांचे लेखन मोठ्या प्रमाणात झाले आहे असे दिसते. मराठी साहित्य भांडारात एकोणिसाव्याव्या शतकात काही लेखकांनी जीवनवादी साहित्य लिहिले ज्यांना जसे अनुभव लिहावेसे वाटले तसे. अनुभव, वातावरण, पात्रे ,कथानक साहित्यात उतरले. तर काही लेखकांनी आपल्या कल्पनेच्या विश्वात भोग, विलास, श्रीमंती, कल्पनेतील जग मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. १९६०नंतर भारत देशात मोठ्या प्रमाणात काही घटना घडवून गेल्या जसे स्वातंत्र्य चळवळ, कामगार चळवळ, धर्म सुधारणा चळवळ, मंदिर प्रवेश चळवळ, महाडचा सत्याग्रह हिंदू कोड बिल, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, या सर्वांचा परिणाम म्हणून मराठी साहित्यातील वाङ्मय लेखन झाले. कारण की साहित्यात भारतीय स्वातंत्र्य चळवळ कामगार चळवळ, महाड सत्याग्रह, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या विविध चळवळीचे प्रतिबिंब साठोत्तरी साहित्यात पाहावयास मिळते स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात धार्मिक, जातीय असमानता गावागावातील अन्याय, अत्याचार अस्पृश्यता या गोष्टी पराकोटीला गेल्या होत्या. धर्म सुधारणा चळवळ, मंदिर प्रवेशाची चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. जवळजवळ सगळे प्रयत्न संपल्यावरही इथल्या धर्म वाद्यात काडीचीही सुधारणा झाली नाही.

म्हणून आपल्या दलित असलेल्या समाजाला हिंदू धर्मात मान स्वाभिमान मिळणे शक्य नाही ज्या धर्मात माणसाला माणूस म्हणून जर किंमत मिळणार नसेल, जनावरापेक्षाही हीन अशी माणसांना वागणूक दिली जात असेल, तुच्छ लेखले जात असेल....! पाणवठ्यातील पाणी घेण्याचा अधिकार नाकारला जात असेल तर अशा अन्यायकारक धर्मात राहणार नाही असा निर्धार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आणि आपल्या लाखो अनुयायांसोबत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी माणसाला माणूस म्हणून वागणूक देणारा मुळ भारतातील असणार्या "बौद्ध" धर्मात लाखो जनसमुदायादायासह नागपूर येथे प्रवेश केला. ही घटना इतिहास बदलणारी ठरली. या घटनेनंतर धर्मांतरित जातींच्या मध्ये आत्मभान निर्माण झाले.

१९६० नंतर दलित आदिवासी ग्रामीण स्त्रीवादी साहित्य मोठ्या प्रमाणावर लिहिले जाऊ लागले. १९६० नंतर जसे दलितांमध्ये एक चैतन्य निर्माण झाले. स्वची जाणीव झाली आणि आत्मभान जागे झाले, तसेच भारतीय स्वातंत्र्य, संविधान, हिंदू कोड बिल, पुरुष लेखक मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन करू लागले. त्यातून स्त्रियांच्या जीवनात साहित्य लेखनाची प्रेरणा वाढीस लागली. कारण स्वातंत्र्योत्तर काळात धर्मांतरानंतर आदिवासी आणि स्त्रिया यांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले शिक्षण हे वाघिणीचे दूध आहेप्राकरेलतो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे उद्गार असे उद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडयांन काढले होते. हे शिक्षण घेतलेले बछडे शिक्षणामुळे आता सशक्त आणि बुद्धिमान, प्रतिभावंत निपजत होते. त्यातून एक एक हिरा आणि हिरकणी बाहेर पडत होती. शिक्षणामुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्याचे काम झाले होते. हिरकणी स्वगत लिहिण्यास सज्ज झाली होती. कविता, कथा, कादंबऱ्या आणि आत्मकथनं लिहिण्यास स्त्रियांनी या काळात सुरुवात केली. १९६० नंतरचे स्त्रीवादी लेखन हे १९१० ते १९५० च्या लेखनापेक्षा तुलना करता आत्मभान जागे करणारे असे होते. रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, लक्ष्मीबाई टिळक, यशोदाबाई जोशी, यांच्या समकालीन आत्मभान पंडिता रमाबाई तसेच १९व्या शतकाच्या पूर्वार्धातील लेखन म्हणजे शिक्षण वृत्ती आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या

लेखनातून सामाजिकप्रश्न, दलित, स्त्रियांविषयी, कळवळा कळवळा दिसून येतो. ताराबाई शिंदे ताराबाई शिंदे यांच्या स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ ग्रंथ एकोणिसाव्या काळात शतकात लिहिला गेला. या ग्रंथातील पुरुषांवरील परखड भाष्य हे खरोखर विद्रोही लेखन म्हणावे लागेल.

याच समकालीन यात समकालीन "मुक्ता साळवे" यांचा आमचा धर्म कोणता हा निबंध हा तत्कालीन समाज, व्यवस्था यांच्यासमोर प्रश्न विचारणारा होता. दलितांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारा निबंध होता. नक्कीच ही विद्यार्थ्यांनी आद्य शिक्षक महात्मा ज्योतिबा फुले आणि आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या शाळेतील शाळेतील पहिली विद्यार्थिनी होत्या. प्रत्यक्ष या ऋषीतुल्य शिक्षकांचा प्रभाव विद्रोही मुक्त साळवे यांच्या विचारांवर पडला. तो मुक्ता साळवे यांच्यालेखनातून दिसून येतो.

एकोणिसाव्या शतकातील बोटावर मोजण्या एवढ्या स्त्री लेखिकांनी समाजाचे प्रत्यक्ष दर्शन आपल्या चरित्रात किंवा वाङमय लेखनात केले आहे. त्यात समाजातील विषमता, स्त्री विषयक दृष्टिकोन, याला वाचा फोडण्याचा प्रयत्न खऱ्या अर्थाने याच लेखिकांनी करून पुढील काळातील स्त्री लेखिकांना वस्तूपाठच दिला आहे.

साठोत्तरी काळातील स्त्रिया ह्या स्त्रिया ह्या आत्मभान जागृत झालेल्या झालेल्या असल्याने असल्याने त्यांच्या त्यांच्या प्रत्येकीच्या लेखनात लेखनात एक एक वेगळीच विश्व विश्व तिच्या वाट्याला आले होते तिच्या आयुष्यातील दुःख तिच्यावरील अन्याय अत्याचार सामाजिक कौटुंबिक कौटुंबिक शोषण जीवनातील काही सुखद काही दुःखद प्रसंग त्यांच्या आत्मकथनात पाहायला मिळतात." साठोत्तरी काळातील साहित्यकृती.... बिनपटाची चौकट....... लेखिका इंदुमती जोंधळे या आत्मकथनाचा एक चिकित्सक अभ्यास." विनाशकाली विपरीत बुद्धीही या संस्कृत मधील सुभाषिताप्रमाणे इंदुमती जोंधळे यांच्या वडिलांच्या क्षणिक रागामुळे त्यांचे सुखी कुटुंब कसे दुःखाच्या खोल खोल दरीत बुडून जाते भयानक असे करपलेले बालपण आणि बालवयातील अकल्पनीय चित्त थरारक मनाला विषन्न करणारे अनुभव पाहून मन सुन्न होते.

१) आई वडिलांचा आंतर जातीय विवाह: साहेबराव जाधव साहेबराव जाधव इंदुमती जोंधळे यांचे वडील आणि कमला ढोले ढोले इंदुमती जोंधळे यांच्या आई यांचा विवाह आंतरजातीय विवाह होता साहेबराव जाधव आणि रंगनाथ ढोले हे दोघे जिवलग मित्र होते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ते दोघेही भूमिगत राहून स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष लढत होते लढत होते अंबाजोगाई तालुक्यातील देवळा या गावी कमला ढवळे राहत होत्या त्यांचा भाऊ रंगला ढोले यांना एके दिवशी ब्रिटिश सैनिक अटक करतात त्यांना शिक्षा करतात तुरुंगात दाबून ठेवतात दाबून. रंगनाथ ढोले हे जातीने ब्राह्मण व साहेबराव जाधव हे मराठा जातीचे पण दोघा मित्रांचा एकमेकांवर खूप जीव होता रंगनाथ ढोले ब्राह्मण असल्याने व घरी मोठे देवस्थान असल्यामुळे घरी नेहमी पोथी वाचन पूजा अर्चना भजन कीर्तन होत असे. साहेबराव जाधव यांनीही वारकरी संप्रदाय म्हणजेच म्हणजेच पांडुरंगाची भक्ती करायचे ब्राह्मण नसूनही ब्राह्मण प्रमाणे त्यांच्यावर तसे संस्कार झाले होते रंगनाथ ढोले या मित्राला ब्रिटिशांनी अटके टाकल्यामुळे मित्राच्या कुटुंबाच्या जबाबदारी कुटुंबाची जबाबदारी साहेबराव यांच्यावर आली होती म्हणून साहेबराव रंगनाथराव यांच्या घरातील सर्व गोष्टीकडे स्वतः च्या कुटुंबाप्रमाणे जातीने लक्ष देत होते घरातील कामाबरोबर मंदिरातील पोथी वाचन पोथीचा अर्थ सांगणे हा नित्यक्रम त्यांचा चालू असायचा. रंगनाथ ढोले यांची पत्नी व बहीण कमला या दोघे घरी असायच्या कमला तरुण होती व सुंदर होती कमला आणि साहेबराव यांच्यातील जवळीक वाढत गेली दररोज सायंकाळी होते ऐकायला सोबत जाणे येणे घरातील साहेब रावांचा वावर यांचा वावर यामुळे साहेबांचा काळा सावळा रंग पिळदार शरीर जाड जोडला मिशा देखणे रुबाबदार व्यक्तिमत्व होते साहेबराव चे लग्न झालेले होते त्यांना दोन मुलेही होते. एकांत आणि सहवास यामुळे साहेबराव आणि कमला यांचा जीव एकमेकात गुंतला आणि एक दिवस दोघे रात्रीच्या अंधारात घोड्यावरून गावातून पळून गेले कारण त्यांच्यातील प्रेमाची कोण कोण हे कमला यांच्या भाऊजीला लागली होती ही गोष्ट रंगनाथराव यांना कळण्या अगोदर दोघेही लग्न करून वैवाहिक जीवन जगण्यासाठी कुटुंबाचा समाजाचा मित्राचा विचार न करता पळून गेले.

२) आई वडिलांचे वैवाहिक जीवन: ‘देवळा’ या गावातून साहेबराव हे कमला ला म्हणजे आपल्या बायकोला घेऊन कोणत्या गावी गेले हे

कोणालाच माहीत नव्हते.लेखिका इंदुमती जोंधळे या सांगतात, ही गोष्ट वडिलांनी कोणालाच सांगितली नाही. नंतर बर्दापूर जवळ काही मैलांवर असलेल्या 'मोरवड'या ठिकाणी साहेबराव जाधव यांनी शाळा स्थापन केली. ते स्वतः सातवी पास होते. ते हाडाचे शिक्षक होते.शिस्तीचे होते.त्यांचे हस्ताक्षर सुंदर होते. लेखिकेच्या आई 'कमला जाधव'यानीही शिक्षक घेतलेले होते. हे दांपत्य विद्यादान देण्यासाठी सज्ज झाले होते. ज्ञानदान हेच काम मोठ्या निष्ठेने करायले लागले. दोघेही शाळेत शिक्षकांचे काम करायचे. नंतर काही काळानंतर कुटुंबातील आर्थिक स्थिती कमकुवत होत होती सुरुवातीला जुळी झाली आणि वारली, नंतर इंदुमती, श्रीराम, रमेश, मुन्नी अशी चार अपत्ये झाली. कमला कुटुंबातील आर्थिक घडी बसविण्यासाठी लेकरांचा सांभाळ करत किराणा दुकान चालवायच्या. सगळं काही व्यवस्थित चालल होतं. संसार अगदी गुण्यागोविंदाने नांदत होता. पण साहेबराव यांचा स्वभाव आता संशयास्पद होत होता. सोन्यासारख्या बायकोवर त्यांना संशय यायचा दुकान म्हणलं ग्राहक येणारच. त्यात 'कमला' या अत्यंत सुंदर असल्याने साहेबराव यांचा राग दिवसेंदिवस वाढत चालला होता.

३) विनाशकाले विपरीत बुद्धी: साहेबराव यांचा स्वभाव आणि रोज रोज च्या भांडणाला कंटाळून कमला जाधव 'किराणा दुकान बंद करण्याचा निर्णय घेतातहळूहळू दुकानातील सामान कमी होत जाते. दुकानाला घरघर लागते. एक दिवस......त्या दिवशी व्दादशी असते, आदल्या दिवशीची एकादशीचा उपवास सोडण्यासाठी पहाटेच 'कमला जाधव' उठतात साहेबरावांना शाळेला पाठवतात, बाळगोपाळांना स्नान घालतात. चूलीवर एकीकडे वरण, एकीकडे भात शिजायला ठेवतात. पोळया करण्यासाठी पिठाचा उंडा चुरुन ठेवतात, तितक्याच मुन्नी रडते म्हणून तिला पाजण्यासाठी घेऊन बसतात, ते मुन्नीचं दूध पिणे शेवटचे ठरले. मुन्नीला दूध पाजत असतानाच एक गृहस्थ दुकानावर येतो. बाहेरुन आवाज देतो.तेव्हा कमला '..... दुकान बंद असल्याचे सांगतात, पण तो व्यक्ती खूप काकुळतीला येऊन मागतो खायला घरात काही नाही म्हणतो,

म्हणून माऊलीच्या मायेने कमला '..... दुकान उघडतात आणि सामान देतात पण त्या माणसाकडे सामानाचे पैसे नसतात. तो व्यक्ती अडचण सांगतो, नंतर पैसे देतो असे सांगतो कारण तो खूप गरीब असतो. तो माणूस जातो, तितक्यातच साहेबराव जाधव घरात येतात, आणि त्यावेळी कमला दुकान बंद करत असतात, दुकान का उघडले, कोण आले होते, पैसे कुठे आहेत असे वेगवेगळे प्रश्न एका दमात विचारतात आणि रागाने लाल होतात, कमला यांना जवळच असलेल्या जात्याचा खुंटा काढून मारतात. पाठीवर मारतात आणि नंतर डोक्यात तशाच त्या बाजूला असलेल्या जात्यावर पडतात, आई.....ग..........!असा एकदाच आवाज येतो आणि त्या रक्ताच्या थारोळयात पडलेल्या असतात. डोकं धुतल्यामुळे डोक्यावर कपडा बांधलेला असतो. लांबसडक केस आणि बांधलेला कपडा रक्ताने चिंब होऊन .....कमला 'यांच्या अंगाखाली पूर्ण रक्तच होते. कमला जाधव जमिनीवर कोसळताच बेशुद्ध होतात, श्रीराम, रमेश, इंदुमती, मुन्नी यांचा रडण्याचा मोठमोठ्याने आवाज येतो. नेमकं काय चाललंय कोणालाही कळत नव्हतं, पण साहेबराव लगेच भानावर येतात, सगळया लेकरांना पोटाशी धरतात आणि जोराचा हांबरडा फोडतात. संपल सगळं, माझी चार पाखरं चार दिशांना पांगतील...असे म्हणत धायमोकलून रडत होती.

साहेबराव जाधव यांना पुढील पूर्ण भविष्य दिसत होते पण क्षणिक राग आणि भीक माग. शेजारी पाजरी जमा होतात, साहेबराव जाधव स्वतःला पोलीसांच्या स्वाधीन करतात.शेजारचे लोक कमला जाधव यांना अंबाजोगाई येथे दवाखान्यात दाखल करतात आई दवाखान्यात.... वडिल तुरुंगात. इंदुमती आठ वर्षांच्या होत्या, श्रीराम, रमेश आणि मुन्नी यांमध्ये दीड ते दोन वर्षांचे अंतर होते.मुन्नी सहा ते आठ महिन्यांची असावी, आठ वर्षांच्या इंदुमती आता या तिन्ही लेकरांची माय झाल्या होत्या. काय करावं, काय झालं, काहीच कळत नव्हतं. मुन्नीला अर्धवट दूध पाजलेलं मुन्नी खूप रडत होती. वरण, भात आणि सुखी संसार यांची जागीच राख झाली होती. मुन्नीला कुठून दूध

आणावं, रमेश ही लहान होता या दोघांना काय, कुठून खाऊ घालावे या विचाराने इंदुमती जोंधळे कासावीस होतात, रात्रीच्या अंधारात मेंढ्या, शेळयांच्या गोठ्यात जावून....उंच उंच भिंती वरुन पोटाने सरपटत, दूधाचं भांड घेऊन अंधारात, तसच मेंढ्यांच्या स्तानाला धरुन दूध काढायचं, कधी शेळया, मेंढ्याचा पाय लागला की सगळं दूध सांडायचं, पुन्हा दुसरी शेळी मेंढी बघायची.... स्पर्शानेच .कारण सगळीकडे अगदी किट्ट अंधार असायचा. आल्या वाटेने जपून सरपटत जायचं. मुन्नीला, रमेशला दूध पाजायचं, कधी कधी खूप भूक लागली की, स्वतःच इंदुमती आणलेलं दूध प्यायच्या, पोटात नुसती आग पडायची. दूध काढताना, दूध स्वतः कधी कधी प्यायचं. कारण दिवसभर लेकरांचं काम, मुन्नीला सांभाळून खूप कठीण दिवस चालले होते ना आईचा ना वडिलांचा नातेवाईक या लेकरांना आपला समजत नव्हत माणूसकी झरा कोणालाच फुटत नव्हता कारण साहेबराव आणि कमला यांची जात वेगळी होती आंतरजातीय विवाहास इतका प्रखर विरोध हा या चिमुकल्यांच्या जिवावर उठला होता. गुबगुबीत असलेली मुन्नी आता मुडदूस झालेली दिसत होती, इंदुमती, श्रीराम, रमेश यांचीही अवस्था सारखीच झाली होती. पोटभर अन्न मिळत नव्हते.

४) आश्रय काही महिन्यांचा.. छळ चिमुकल्यां जीवांचा: साहेबराव जाधव आपल्या बहिणीच्या मुलांना पत्र पाठवून सांगतात की, माझ्या लेकरांचे खूप हाल होत असतील, तुमच्या घरी त्यांना घेऊन जा. माझे जे काही आहे ते घ्या पण माझ्या लेकरांचा चांगला सांभाळ करा. गुरे वासरे, दुकानातील सगळे सामान सगळे घेऊन जाण्यास सांगतात. अण्णा ‘नावाचे गृहस्थ येतात आणि सगळयांना आपल्या घरी घेऊन जातात. तिथे हे दोन भाऊ त्यांचा मोठा परिवार असतो. इंदुमतींना...... मनाला दिलासा मिळतो की, आता आपल्याला खायला मिळणार आपण उपाशी पोटी नाही राहणार. पण दुसऱ्या दिवशी पहाटेच उठून दगडी जात्यावर दळण दळायचे, दिवसभर घरातले, धुणी, भांडी, झाडझूड. गायी गुरांचे शेण काढणे, गोठा साफ करणे. कळी, फुलासारख्या लेकरांकडून हे अमानुष काम करुन घेतल्या जायचे. आठ वर्षांच्या इंदुमती...

त्यांना एवढ्या मोठ्या जात्यावर दळण दळायचे म्हणजे दिव्यच होते पण ईलाज नव्हता, उठत बसत, श्रीराम ची मदत घेऊन शकू ही अण्णांची मुलगी. या भावंडाप्रमाणे शकू सुध्दा ही सर्व कामे करायची भल्या पहाटे उठून पायली भर दळण दळायचे, दिवसभर धुणी, भांडी, झाडझूड, गुरांची शेण काढणे, सफाई करणे गोवऱ्या लावणे, नदीवर कपडे धुणे. श्रीराम ला गुरांचे शेण धरणे. हा सहा वर्षांचा असेल... पहाटेच्या अंधारात जनावरांना सोडायचे, पडलेलं शेण जमा करायचे काम त्याच्याकडे होते. एवढं लहान लेकरु थंडीत अंधारात उठून शेण धरायच एक दिवस श्रीराम शेणासोबत माणसांनी केलेली घाण सुध्दा शेण म्हणून टोपल्यात घेऊन येतो शकू ही गोष्ट तिच्या वडिलांना सांगते, तेव्हा ते अण्णा श्रीरामला जनावरांसारखं मारतात इतके वाईट दिवस जात होते. इंदुमती, श्रीराम, रमेश कसे बसे शीळी भाकरी पाणी खाऊन दिवस काढायचे. पण बिचारी मुन्नी अन्न दूधावाचून...... क्षीण झाली ह तिच्या हातात शिळया भाकरीचा तुकडा, इंदुमती तिला द्यायच्या. कारण इंदुमतींना दिवसभर काम असल्याने मुन्नीला घ्यायला वेळच मिळत नव्हता.आणि मुन्नी भूकेने व्याकूळ होऊन, तिचा रडण्याचा आवाज सुध्दा निघत नव्हत शिळी भाकरी खाल्ल्याने मुन्नीला ते पचायच नाही आणि ती सगळे बाळाते भरून टाकायची. तेवढे कपडे धुण्यासाठी नदीला जावं लाग साबण नाही, सोडा नाही आणि मुन्नीचे ते बाळाते घाणीने खूप चिकट व्हायचे. मग ते कपडे काळया मातीत रगडून धुवावे लागे. तिथे नदीवर आलेल्या बायका म्हणायच्या, बाप तुरुंगात, माय मरुन गेली आणि या लोकांनी लेकरांचा वनवास मांडलायहे ऐकून इंदुमतींना आई गेल्याच कळतं. वडिल तुरुंगात असल्याचे कळतं. घरी गेल्यावर तिघे भावंडं आईचं निधन झालं कळल्यावर खूप रडतात. त्यांना जवळ घेणार कोणी नसतं.

अक्षरशः वनवास चाललेला काही दिवसांनी मुन्नीपण झोक्यातच मरुन पडते.तिच्या शरीराचा पूर्ण सापळा झालेला असतो.मुन्नी कधी मरुन गेली हे इंदुमतींना कळत नाही.दिवसभर काम आणि मुन्नीचा रडताना आवाज पण येत नसेमुन्नीला... अण्णा जवळच्याच

उकीरडयात पुरुन टाक  तेव्हा मात्र या भावंडांच्या दुःखाचा बांध फुटतो.कारण मुन्नीलाकुत्रा,मांजरासारखं पुरुन टाकतात, तिच्या मरणाचं कोणाला काहीच वाटत नाही.

५) इंदुमतींची साक्ष: इकडे आल्यावर दोन तीन महिन्यांनंतर अण्णा 'इंदुमतींना अंबेजोगाई येथे त्यांच्या वडिलांना भेटायला म्हणून घेऊन जातात. तिथे रंगनाथ ढोले...मयत...कमला जाधव यांचे भाऊ, इंदुमतीला भेटतात, डोक्यावरून हात फिरवतात,खायला बिस्कीट पुडा देतात, प्रेमाने विचारपूस करतात आई वडील यांचे भांडण कशी झाली, तू काय पाहिलं तू हुशार आहेस असं म्हणून रडू लागले. पण इंदुमतींना काही कळेना पण तू जे मला सांगितलं तेच पोलीसांच्या समोर सांग असं सांगितलं. लहान मुले निरागस असतात अगदी तशीच उत्तरे पोलीस आणि अधिकारी यांच्या समोर सांगितली आईला कोणी मारलं, तू कुठे होती.... सगळं खरं खरं सांगितलत्या दिवशी अण्णा इंदुमतींना घेऊन अंबाजोगाई येथे एका पाहुण्यांच्या घरी थाबले होते, तेव्हा ते पाहुणे सांगतात.. चर्चा करतात की, आई तर वारली मग वडिलांना शिक्षा झाली तर लेकरांचं काय होईल. साहेबराव जाधव यांना कठोर शिक्षा होऊ नये म्हणून.... इंदुमतींनी आज दिलेली साक्ष उद्या बदलायची असत सगळया प्रश्नांची उत्तरे इंदुमतींकडून अगदी पाठ करून घेतली दुसऱ्या दिवशी कोर्टात इंदुमतींना न्यायाधिशासमोर उभे केले जा पोलिस इंदुमतींना प्रश्न विचारतात....पण इंदूमती आज वेगळेच उत्तर देत असते. हे पाहून न्यायाधीश आणि पोलिस कावरेबावरे होतात आणि विचारतात की तू जे काल सांगितले ते बरोबर का आजचे बरोबर तेव्हा इंदुमतीं आजचं खरं कालचं खोटं असं सांगतात आणि इंदुमतींची साक्ष खरी ठरवली जाते. साहेबराव जाधव यांना वीस वर्षांची शिक्षा सुनावली जाते इंदुमती, श्रीराम, रमेश यांची अशीच एकदा भेट घेऊ दिली जाते.त्यावेळी मुन्नीच्या मृत्यू कसा झाला हे कळते ६) नवे द्वार.... जगण्याचा आधार: साहेबराव शासनाकडे विनंत्या करतात की माझ्या लेकरांची राहण्यासाठीची व्यवस्था करण्यात यावी. तेव्हा त्यांची विनंती, मागणी मान्य होते.... आणि एक दिवस एक पोलिस इंदुमतींना,

श्रीराम, रमेश यांना घेऊन अंबाजोगाई येथे येतात. पुढे त्यांना जालना येथे रिमांड होम मध्ये श्रीराम यांना ठेवतात आणि इंदुमतींना, रमेशला औरंगाबाद येथील पद्मपुरा येथील शिशुसदनमध्ये राहण्यासाठी जागा व्यवस्था करतात. येथूनच ही पाखरं....पांगली जातात,दूरावली जाता वर्षातून एकदा अशी तिघा...चौघांची भेट होत असते. पण या रिमांड होम मध्ये पोटभर खायला मिळू लागले, शिक्षण, कपडा लत्ता मिळू लागला. आता उपासमार आणि अमानुष काम यांपासून सुटका झाली होती. सर्व मुला मुलींना सारखेच कपडे, काही बाल गुन्हेगार तर काही अनाथ मुले येथे राहत होती. औरंगाबाद हून शिरुर आणि शिरुरहून कोल्हापूर येथील छात्रालयात इंदुमतींना पाठविण्यात आले. कोल्हापूरची शाळा, छात्रालय खूपच संस्कारित आणि उच्च दर्जाचे होत पण इंदूमती, श्रीराम, रमेश यांची भेट खूप महिने होत नव्हती, म्हणून वडिलांनी म्हणजेच साहेबराव जाधव यांनी अर्ज विनंत्या करुन इंदूमतींना पैठणला बोलावले.

७) ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचा परीसस्पर्श: इंदुमती चिपळूणकर....समाज कल्याण अधिकारी कोल्हापूर यांनी कोल्हापुरातील छात्रालयातील इंदुमतींची विचार पूस केली, तेव्हा तेथील सुप्रीडेंटेट भिडेताई यांनी सांगितले की, साहेबराव जाधव यांनी पत्र पाठवून इंदुमतींना पैठणला बोलावले. त्या भिडे ताईंवर भडकतात. सरळ औरंगाबाद जेलमध्ये जावून साहेबराव जाधव यांना भेटतात त्यांची कान उघडणी करतात. साहेबराव जाधव सांगतात की, लेकरांच्या प्रेमाने आंधळा झाला होतो. पुढे इंदुमतींचा शिक्षण चांगल्याप्रकारे प्रवास सुरु झाला. पैठणच्या सुप्रीडेंटेट शशिकला जाधव, कोल्हापूर च्या भिडेताई, गायकवाड काका, वसुंधरा देशमाने यांनी पोटच्या लेकरासारखा जीव लावला. आ. गो. कामत सर....शिस्त, प्रेम, आणि संस्कार यामुळे या सरांना प्रभाव इंदुमतींवर पडला. उषाराजे हायस्कूल, ताराराणी विद्यापीठ कोल्हापूर येथे इंदुमती यांच्या जीवनाचा मोठा काळ गेला. तेव्हा तिथे आलेले दिग्गज व्यक्ती यांच्या प्रभाव आणि संस्कारामुळे इंदुमतींचे व्यक्तिमत्व

फुलत गेले  मराठी साहित्यातील शिरोमणी वि. वा. शिरवाडकर, शिवाजी सावंत, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर इ. मोठ्याव्यक्तींच्या सहवास इंदुमतींना बालवयापासून महाविद्यालयीन जीवनापर्यंत लाभला.

रिमांड होम, शिशुसदन, छात्रालय, इत्यादींमधील चांगले वाईट अनुभव लेखिका आपल्या आत्मकथनात मांड हिंदकन्या छात्रालयात....दादा धर्माधिकारी, मामा क्षीरसागर, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बाबा रेडीकर, आचार्य भागवत, प्रभाकर कोरगावकर, इ. या धर्मदाय संस्थेत संस्कारक्षम कार्यक्रमास येत असत.  या समाजवादी... सर्वोदयी मंडळींच्या सहवासात इंदुमतींचा व्यक्ती विकास होत होता.

८) अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचा विशेष सहवास: इंदुमती १०ते१२वर्षांच्या असतील तेव्हा पासून आदरणीय अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचा सहवास लाभल १९४२_४४ला अण्णासाहेब सहस्रबुद्धे स्वातंत्र्य लढ्यातील भूमिगत होते. पू. अण्णासाहेब सहस्रबुद्धे छात्रालयाचे विश्वस्त होते तेव्हा वर्षातून एकदा मे महिन्यात गांधीवादी लोकांचे शिबीर होत होते. प्रभाकरपंत कोपरगावकर यांच्या इच्छेनुसार होत असे. ग. दि. मा. गीतरामायणकार. हे नेहमी कोल्हापूर येथे कार्यक्रमानिमित्त यायचे तेव्हा छात्रालयातील विद्यार्थी आणि त्यांच्याविषयीच्या चर्चेतून गायकवाड काका यांनी इंदुमतींचा पूर्ण इतिहास सांगितला, इंदुमतींना बोलून भेटून त्यांना इंदुमतींचा इतिहास चित्रपटाची पटकथा म्हणून लिहून काढला  तो चित्रपट अर्धवटच राहिला. ग. दि. मां. चे निधन झाले. नंतर आशा काळे यांची प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट नंतर कोणीतरी पूर्ण केला, असं इंदुमती सांगतात.

९) शिक्षण आणि नौकरी: कोल्हापुरातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. महाविद्यालयीन शिक्षण औरंगाबाद येथे घेतले. बी. ए. वर्धा सेवाग्राम येथे, बाबा आमटे यांच्या सहवासात झाले. गांधीवादी विचारवंत लोकांमध्ये इंदुमती विकसित होत होत्या. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या म्हणण्यानुसार इंदुमतींनी वर्धा येथे बी. एड. केले. औरंगाबाद मध्ये नौकरी लागण्यासाठी खूप

प्रयत्न केले पण मराठवाडयात नौकरी मिळाली नाही. कोल्हापूर येथे शिक्षिकेची नौकरी लागते.

१०) शेवटची भेट: साहेबराव जाधव यांची तुरुंगातूंन सुटका होते, पडत्या पावसात साहेबराव जाधव आपल्या लेकीला दिवसभर पूर्ण कोल्हापूर शहरात शोधत असतात आणि शेवटी ते लेकीला भेटतात. निर्वाणीचं बोलतात आणि पहिल्या बायकोच्या मुलांकडे गावी जातात. नंतर काही वर्षांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे कळते.

११) इंदुमती जाधव आणि भाई महावीर जोंधळे यांचा आंतरधर्मीय विवाह: श्रीराम, मैत्रीण आशाताई भांड, माया देशपांडे, यांनी पत्र पाठवून....भाई महावीर जोंधळे उपसंपादक दैनिक मराठवाडा असा मुलाचा परिचय सांगितला. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांना सर्वोदयचे नेते गंगाप्रसाद अग्रवाल यांनी पत्र लिहून कळवले होते की, अनंतराव भालेराव यांचे मानसपुत्र महावीर जोंधळे हा गुणी आणि सर्व गुणसंपन्न मुलगा आहे. सर्व जेष्ठ श्रेष्ठ व्यक्तींनी सुचविलेला वर अयोग्य असणे शक्य नव्हते. तरीही अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी त्यांना एकमेकांच्या भेटी घेऊन बोला. एकमेकांची स्वभाव जाणून घेण्याचा प्रयत्न करा नंतरच लग्नाचे ठरवू असे सांगितले कोल्हापूर येथील भेटीमुळे इंदुमती व भाई महावीर जोंधळे यांचे एकमेकांशी संवाद साधला गेल्यावर जीवनभर सोबत घेऊन राहू शकतो हा विश्वास दोघांना आला पुढे त्यांचा विवाह औरंगाबाद येथे कोर्ट मॅरेज पध्दतीने झाला. बिनपटाची चौकट असलेलं इंदुमतीचं आयुष्य आता सुरक्षित झालं होतं त्या चौकटीला आता सर्वगुणसंपन्न, जातीच्या, धर्माच्या चौकटी ओलांडून प्रेमाचे पट इंदुमती यांच्या जीवनाला देणारे ठरले. इंदुमतींसह भाई महावीर जोंधळे यांनी त्यांच्या दोन्ही भावांची जबाबदारी घेतली. पत्नीला समान दर्जा देत इंदुमतींना एक मैत्रीण,एक जीवन संगिनी म्हणून आदराने वागवले. अशा प्रकारे इंदुमतींच्या जीवनातील दुःखरुपी अंधःकार आता संपला होता. श्रीराम, रमेश, इंदुमती जोंधळे, महावीर जोंधळे असे एक कुटुंब तयार झाले. एका दुख:मय आत्मकथनाचा शेवट मात्र खूप सुखद आणि आनंददायी झाला आहे. भाई महावीर जोंधळे आणि इंदुमती जोंधळे या समाजवादी संस्कारांनी ओतप्रोत भरलेल्या या दाम्पत्याकडून समाजाला.

“बिनपटाची चौकट “या आत्मकथनातून दुःखाचा सामना कसा करावा हे कळते. दुःखातून बाहेर पडण्याची जीवन उर्जा मिळत जाते. एका दुःखद प्रवासातून पुन्हा जात _धर्म, जातीय_आंरजातीय हा विचार शून्य वाटायला लागतो.

“बिनपटाची चौकट “या आत्मकथनातून साहेबराव जाधव आणि कमला ढोले यांचा आंतरजातीय विवाह प्रवास. चुकीचे वर्तन, दु:खमय जीवन लेकरांच्या आयुष्याची राखरांगोळी, रक्ताच्या नात्यांची अमानुष वागणूक, तर माणूसकीचा प्रत्यय देणारे समाजवादी विचारवंत, रिमांड होम, शिशुसदन, छात्रालय, शाळा, महाविद्यालय, येथील लोकांनी रक्ताच्या नात्याला लाजवेल अशी मायेची पाखर घातलेली आहे, ती इंदुमती जोंधळे आपल्या आत्मकथनात मांडतात. यातून जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक होत जातो. पुन्हा एकदा इंदुमती जाधव आणि महावीर भाई जोंधळे यांचा आंतरधर्मीय विवाह पुढे समाजाला आणखी...समता, न्याय, विश्वबंधुता या मूल्यांची जोपासना करतानाचा परिपाठ देतो.इंदुमती जोंधळे आणि महावीर जोंधळे हे दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्व.... उत्तरोत्तर विकसित होत आहेत. ही संसार वेल अशीच फुलत फळत जावो हीच सदिच्छा........!

संदर्भ:-

१ बिनपटाची चौकट. लेखिका- इंदुमती जोंधळे.

***